श्री.के.क्षी.

# स्त्रीजीवन व विवाहविषयक लेखसंग्रह

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई

अनुक्रमणिका



**श्रीकृष्ण केशव क्षीरसागर यांचा जीवनपट**

जन्म ६ नोव्हेंबर १९०१ □ मृत्यू २९ एप्रिल १९८०

सातारा जिल्ह्यातील खंडोबाची पाल येथे जन्म. मराठी शिक्षण तेथेच. हायस्कूलचे शिक्षण सातारा गव्हर्नमेंट हायस्कूलमध्ये, १९१८ मध्ये मॅट्रिक. कॉलेज शिक्षण कर्नाटक कॉलेज, धारवाड व फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे. १९२२ मध्ये बी.ए. १९४५ मध्ये पुण्याच्या एम.ई.एस. कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक. १९६२ मध्ये त्याच कॉलेजमधून सेवानिवृत्त. पुणे येथे निधन.

त्यांची एक कादंबरी व एक कथासंग्रह प्रकाशित झाला असला तरी टीकाकार व निबंधकार म्हणूनच ते विख्यात.

अनुक्रमणिका

श्री. के. क्षी.

# स्त्रीजीवन आणि विवाहविषयक लेखसंग्रह

## अनुक्रमणिका

# श्री. के. क्षी.
# स्त्रीजीवन आणि विवाहविषयक
# लेखसंग्रह

लेखक
**प्रा. श्री. के. क्षीरसागर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई

## अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती** : मार्च १९९२

**प्रकाशक** : सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई ४०० ०३२

© प्रकाशकाधीन

**मुद्रक** : व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नी रोड, मुंबई ४०० ००४

**मुखपृष्ठ** : आनंद सबनीस

**किंमत** : रुपये ४२

## अनुक्रमणिका

# निवेदन

मराठी साहित्यसृष्टीतील एक नामवंत समीक्षक प्रा. श्री. के. क्षीरसागर हे त्यांना जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या अनेक सामाजिक व सांस्कृतिक समस्यांसंबंधी वृत्तपत्रांच्या स्तंभांमधून तसेच मासिकांतून सातत्याने लेखन करीत असत. आपण सौंदर्यवादी आहोत असे ते अभिमानाने सांगत असत. स्त्रीजीवनाचा विचारही आपण सौंदर्यवादी दृष्टिकोनातून करतो असा त्यांचा दावा होता. १९४३ ते १९८० या अडतीस वर्षांच्या काळात त्यांनी स्त्रियांविषयी केलेल्या विपुल लेखनापैकी ५६ निवडक लेखांचा हा संग्रह महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित केला जात आहे.

जगभरच्या स्त्रीमुक्ती चळवळीमुळे स्त्रियांचा समाजातील कनिष्ठ दर्जा, त्यांच्यावर पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत होणारे अन्याय व अत्याचार, त्यांचे हरतऱ्हेने होणारे शोषण या सनातन समस्यांची उत्तरे शोधली जात आहेत. या विचारमंथनाचे पडसाद भारतात उमटू लागले तेव्हा श्री. के. क्षीरसागरांनीही त्याची दखल घेतली. स्त्री-शिक्षण, स्त्रियांची सुरक्षितता, त्यांची वेशभूषा, त्यांच्यावर होणारे बलात्कार, नोकरी करणाऱ्या मिळवत्या स्त्रियांचे प्रश्न, सपत्नीकांचे द्वितीय विवाह, केशवपन, हुंडा यासारख्या दुष्ट रूढी, आहेर करण्याची तसेच लग्नसमारंभ साजरे करण्याची प्रथा, आंतरजातीय तसेच आंतरधर्मीय विवाह वगैरे अनेकविध प्रश्नांबाबतची मते क्षीरसागरांनी मोकळेपणे नोंदवली आहेत.

स्त्रीमुक्ती चळवळीच्या आजच्या पुरस्कर्त्यांना श्री. के. क्षीरसागरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन हा परंपरानिष्ठ व्यक्तीचा दृष्टिकोन असल्याचे सहज लक्षात येईल आणि त्यामुळे त्यांना तो रुचणारही नाही. विचारकलहात प्रतिपक्षाची बाजू समजावून घेणे महत्त्वाचे असते; तिचे समर्थन करण्याचे बंधन नसते. त्यादृष्टीने स्त्रीमुक्ती चळवळीच्या पाठीराख्यांनीही प्रतिपक्षाच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी का होईना क्षीरसागरांसारख्या समीक्षकांचे आक्षेप विचारात घेतले पाहिजेत.

**य. दि. फडके**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई,
दिनांक १५ जुलै १९९१

अनुक्रमणिका

# ऋणनिर्देश

प्रा. डॉ. सुरेंद्र बारलिंगे हे साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष झाल्यानंतर श्री. के. क्षीरसागर यांचे दोन लेखसंग्रह माझ्या विनंतीवरून त्यांनी व मंडळाने प्रकाशनासाठी स्वीकारले होते. पहिला, म्हणजे वाङ्मयीन लेखांचा संग्रह १९८४ मध्ये मंडळाने प्रकाशित केला. दुसरा, म्हणजे प्रस्तुतचा संग्रह आता १९९१ मध्ये प्रकाशित होत आहे.

या संग्रहात १९४३ पासून १९८० पर्यंत श्री. के. क्षी. यांनी लिहिलेल्या स्त्रीजीवन आणि विवाहविषयक लेखांचा समावेश केला आहे. हे सर्व लेख प्रकाशित झाले तेव्हा अनेकांना आवडले होते. आता ते एकत्र वाचावयास मिळत असल्याने वाचकांची मोठीच सोय होत आहे. श्री. के. क्षी. यांच्या अन्य पुस्तकांप्रमाणे या पुस्तकाचेही वाचकांकडून चांगले स्वागत होईल अशी आशा आहे.

पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. द. ना. धनागरे यांनी या पुस्तकाला विवेचक प्रस्तावना लिहिली आहे. प्रा. डॉ. धनागरे हे महाविद्यालयीन विद्यार्थी असल्यापासून श्री. के. क्षी. यांच्या लेखनाचे चाहते आहेत हे मला त्यांच्याकडूनच, ही प्रस्तावना लिहिल्यानंतर समजले. मला अर्थात्च फार आनंद वाटला. या प्रस्तावनेबद्दल मी त्यांची व्यक्तिशः आभारी आहे.

या पुस्तकाचे मुद्रण मुंबईत झाले. मी पुण्यात राहते. म्हणून पुस्तकाची प्रुफे पाहण्याची विनंती मी, श्री. के. क्षी. यांच्या लेखनाच्या आणखी एक चाहत्या आणि माझी मुंबईतील मैत्रीण असणाऱ्या सौ. सत्त्वशीला सामंत (निवृत्त भाषा उप संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य) यांनी केली. 'साने गुरुजी ग्रामविकास प्रतिष्ठान' सारख्या सार्वजनिक उपक्रमात व्यग्र असूनही त्यांनी माझी विनंती स्वीकारली. निर्दोष मुद्रणाबद्दलचा त्यांचा आग्रह आणि त्यासाठी कितीही कष्ट सोसण्याची त्यांची तयारी माझ्या चांगल्या परिचयाची असल्याने, त्यांनी हे काम स्वीकारल्यानंतर मी निश्चिंत झाले. त्यांची मी ऋणी आहे.

प्रस्तुत पुस्तकाला एखादे सुटसुटीत नाव असावे असे वाटल्यामुळे त्या बाबतीत मी सौ. सत्त्वशीला सामंत, प्रा. डॉ. व. दि. कुलकर्णी, प्रा. डॉ. द. ना. धनागरे, प्रा. डॉ. सु. रा. चुनेकर, प्रा. डॉ. कल्याण काळे आणि प्रा. डॉ. चंद्रशेखर बर्वे यांच्याशी चर्चा केली. सौ. सत्त्वशीलाताईंनी 'सीमंतिनी' हे नाव सुचवलेही होते. पण 'श्री. के. क्षी. : स्त्रीजीवन आणि विवाहविषयक लेखसंग्रह' हेच नाव बहुमताने मान्य झाले. त्यामुळे 'सीमंतिनी' हे नाव स्वीकारता आले नाही. पुस्तकाच्या नावाच्या चर्चेबद्दल या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

या पुस्तकासाठी केलेल्या साहाय्याबद्दल पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सौ. रमणम्मा आणि प्रा. डॉ. उत्तम भोईटे यांची मी आभारी आहे.

मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सुरेंद्र बारलिंगे व अन्य सदस्य यांची आणि आजचे अध्यक्ष प्रा. डॉ. य. दि. फडके यांची मी अत्यंत आभारी आहे. प्रा. डॉ. य. दि. फडके यांच्या कारकिर्दीच्या आरंभीच्या काळातच या पुस्तकाशी, मंडळाचे विद्यमान अध्यक्ष या नात्याने त्यांचा संबंध येत आहे. हा योग मला फार महत्त्वाचा वाटतो.

अनुक्रमणिका

या पुस्तकात समाविष्ट असलेल्या 'विवाहविषयक वास्तवता' या लेखाच्या उपमुद्रितावर केवळ 'वसुधा' एवढाच निर्देश होता. त्या लेखाचे प्रकाशन वर्ष आणि महिना शोधण्यासाठी 'वसुधा' मासिकाचे जुने अंक उपलब्ध करून दिल्याबद्दल पुण्याच्या शासकीय विभागीय ग्रंथालयाच्या ग्रंथपालांचे आभार.

मंडळाचे तत्कालीन सचिव कै. पं. रा. पाटील व त्यांचे अन्य सहकारी, तसेच शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाचे व्यवस्थापक व त्यांचे सहकारी यांचेही आभार.

पुस्तकाचे शीर्षक मोठे असल्याने पुस्तकाच्या डाव्या पानावर संपूर्ण शीर्षक न देता, 'श्री. के. क्षी. : स्त्रीविषयक लेख आणि . . . ' असा लघुरूपात उल्लेख केला आहे.

**शकुंतला क्षीरसागर**

## अनुक्रमणिका

# प्रस्तावना

महाराष्ट्र शारदेच्या मंदिरात ज्यांनी १९४० ते १९८० अशी चार दशके आपल्या बहुरंगी पण मौलिक अशा वाङ्मयीन कृतींच्या रूपाने सेवा करण्यात घालवली त्यांत कै. प्रा. श्री. के. क्षीरसागरांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागतो. त्यांच्या साहित्यनिर्मितीतील विविधता तर अगदी चटकन् लक्षात येण्यासारखी होती. 'राक्षसविवाह'सारखी कादंबरी ही श्री. के. क्षींच्या लेखणीच्या सर्जनशीलतेचा एक पैलू दाखविते, तर 'सुवर्णतुला' आणि 'सागरमंथन' ही त्यांनी लिहिलेली व्यक्तिपरीक्षणे, 'सेतुपार्वती'मधील संवेदनाशील मनाला भिडणाऱ्या लघुकथा व दीर्घकथा आणि 'व्यक्ति आणि वाङ्मय', ' वाङ्मयीन मूल्ये', 'उमरखय्यामची फिर्याद', 'टीकाविवेक' आणि इतर बरेचसे टीकाग्रंथ हे त्यांच्या लेखणीचे इतर पैलू दाखवितात. असे जरी असले तरी मराठीतील एक थोर टीकाकार आणि चिंतनपर किंवा विचारप्रधान लेखक म्हणूनच श्री. के. क्षीं.चा गौरवपूर्ण उल्लेख आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासात केला जाईल. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मिरज येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे श्री. के. क्षीं.नी अध्यक्षपद भूषविले होते यातच त्यांचे साहित्यक्षेत्रात स्थान केवढे मोठे होते आणि अधिकार काय होता या प्रश्नांची उत्तरे आपोआपच मिळतात.

अशा एका क्रियाशील आणि स्वयंसिद्ध-स्वयंभू लेखकाच्या स्त्रीजीवन आणि विवाहविषयक निवडक लेखसंग्रहास मी प्रस्तावना लिहावी असे महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृति मंडळाने मला सुचविले त्यावेळी मला आश्चर्य तर वाटलेच, पण काहीशी भीतीही वाटली. 'वटवृक्षासमोर वेलींनी काय दिमाख दाखवावा?' असे शालेय जीवनांत मराठी विषय शिकत असताना घोकलेले पण नंतर अगदी कंटाळवाणे झालेले दृष्टांत पुनः ताजेतवाने होऊन माझ्या मनात काहूर माजवू लागले. असे असतानादेखील मी ही प्रस्तावना लिहिण्याचे मान्य केले. कारण, त्यात माझा गौरव अधिक हे जरी खरे असले तरी, ह्या निमित्ताने ज्या श्री. के. क्षीं.बद्दल महाविद्यालयीन जीवनापासून मला कुतूहल होते, नितांत आदर होता त्यांना आदरांजली वाहण्याची आणि त्यांचे माझ्यावर जे काहीसे अप्रत्यक्ष आणि अदृश्य असे ऋण आहे त्यातून अंशतः का होईना उतराई होण्याची संधी ह्या प्रस्तावना-लेखनाच्या निमित्ताने मिळेल, ह्या भावनेने मी हे न पेलणारे शिवधनुष्य उचलण्याचे आव्हान स्वीकारले.

ह्या लेखसंग्रहाबद्दल काही लिहिण्यापूर्वी मी वर उल्लेख केलेल्या अप्रत्यक्ष ऋणाचे थोडेसे ससंदर्भ स्पष्टीकरण देऊ इच्छितो. तसा माझा आणि मराठी साहित्याचा 'जवळ असूनही दूर' अशा प्रकारच्या संबंध. 'मराठी वाङ्मय' हा विषय घेऊन मी बी. ए.चा अभ्यास केला त्यावेळी श्री. के. क्षी. हे साहित्यक्षेत्रातील फार मोठे प्रस्थापित असे दैवत होते. त्यांचा कोणताही ग्रंथ आमच्या अभ्यासक्रमात नव्हता, तरी १९५५ ते १९५७ ह्यादरम्यान नागपूरच्या हिस्लॉप महाविद्यालयात शिकत असताना त्यावेळचे आमचे प्राध्यापक डॉ. शं. दा. पेंडसे व डॉ. अ. ना. देशपांडे यांच्या तासांमध्ये श्री. के. क्षीं.चा उल्लेख अधूनमधून हमखास यायचाच. मराठीतील नामवंत टीकाकार असा त्यांचा लौकिक. असा लौकिक असलेल्या पुण्यामुंबईकडच्या अनेक विद्वान् मंडळींची व्याख्याने त्याकाळी नागपूरला होत असत, आजही होतात. १९५६ साली मी बी. ए.च्या दुसऱ्या वर्षात असताना श्री. बिंझाणी महाविद्यालयाने (जुने सिटी कॉलेज, नागपूर) प्रा. क्षीरसागरांची व्याख्याने आयोजित केली होती. आज ह्या घटनेस पाव-शतकाहून अधिक काळ लोटला असला तरी त्याबाबतीतल्या माझ्या आठवणी अगदी ताज्या आहेत. त्यासुमारास मी विद्यार्थी म्हणून महाल भागातच प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांच्या घरी खोली भाडयाने घेऊन राहात असे. प्रा.सावळापूरकर व प्रा. श्री. मा. कुलकर्णी हे बिंझाणी

अनुक्रमणिका

कॉलेजात मराठीचे प्राध्यापक आणि त्यांच्याच प्रयत्नांनी श्री. के. क्षीं.ची व्याख्यानमाला योजलेली. नागपूरच्या प्राध्यापक व विद्यार्थीवर्गाचा त्या व्याख्यानांना मिळालेला प्रतिसाद, तेथील विद्वान् संशोधकांशी आलेला संपर्क, नागपूर-वऱ्हाडकडचे आदरातिथ्य, विशेषतः प्रा. सावळापूरकर, प्रा. गो. मा. आणि श्री. मा. कुलकर्णींकडचा पाहुणचार, या सर्व गोष्टींनी खूपच भारावून जाऊन श्री. के. क्षीं.नी आपल्या 'तसबीर आणि तकदीर' (पृष्ठे २८७-२९०) या आत्मचरित्रात त्यांचा उलेख केलेलाच आहे. तेव्हा त्यांच्या तपशिलात जाण्याचे मी टाळतो.

श्री. के. क्षीं.ची ही नागपूर व्याख्याने फार गाजली. त्यांच्या श्रोत्यांमध्ये मीही एक होतो हे आज जरी अभिमानाने सांगता येत असले तरी त्या काळात हिस्लॉप व सिटी कॉलेजेसमध्ये काहीसे स्पर्धकांसारखे परस्पर संबंध होते आणि एका कॉलेजातल्या विद्यार्थ्यांना दुसरीकडच्या व्याख्यानांना जाण्याला मुभा असली तरी प्रोत्साहन मात्र मुळीच नसे. त्यामुळे काहीसे चोरूनच मी ही व्याख्याने ऐकली. मला स्मरते त्याप्रमाणे 'सौंदर्यशास्त्र आणि साहित्य', 'आधुनिक मराठी कविता', 'साहित्यातील स्त्रीदर्शन' ह्या विषयांवर श्री. के. क्षीं.ची व्याख्याने झाली. त्यांचा आशय त्यावेळी मला जरी फारसा कळला नसला तरी, अगदी श्री. के. क्षीं.च्या शब्दांतच सांगावयाचे झाल्यास, 'आकलनाआधीच आक्रमण' ह्या विद्यार्थीदशेतील स्वभावसुलभतेने मी एका व्याख्यानानंतर त्यांना कुठला तरी प्रश्नही विचारल्याचे स्मरते. तथापि 'टीकाकार असावे तर असे असावे' असा आदर्श मनात बिंबवण्याइतपत त्यांनी माझ्यावर छाप पाडली. टीका हे टीकेसाठी नसावी, तिला रचनात्मक आणि तात्त्विक अधिष्ठान असावे, ती व्यक्तीवर नसावी तर ज्या विचाराचा पुरस्कार किंवा विरोध ती व्यक्ती काहीशा दुराग्रहाने करू लागते त्या विचारसरणीवर असावी, आणि सरतेशेवटी टीका ही मर्मभेदी असूनसुद्धा वस्तुनिष्ठता, तर्कशुद्धता व बुद्धिप्रामाण्य ह्या तीनही निकषांवर सरस ठरणारी असावी, हे सर्व काही श्री. के. क्षी. त्यांच्या विषयाच्या विस्तारातून व मांडणीतून सांगून गेले. माझ्या दृष्टीने श्री. के. क्षीं.च्या त्या व्याख्यानांचे माझ्यापुरते फलित तेवढेच होते. मात्र ते विचारधन मी आजवर जोपासले आहे हे या संदर्भात सांगण्याचा मोह आवरता येत नाही. १९५७ साली बी. ए. परीक्षेत 'मराठी वाङ्मय' विषयात नागपूर विद्यापीठात दुसरा क्रमांक मिळवून रौप्यपदक प्राप्त करण्याइतपत मला चांगले गुण मिळाले असले तरी पुढे मी 'समाजशास्त्र' हा विषय एम. ए. करिता (डॉ. पेंडसे आणि डॉ. अ. ना. देशपांडे यांची नामर्जी पत्करून) निवडला. माझे क्षेत्र भिन्न झाले, एवढेच नाही तर व्यवसायाकरिता जवळपास सतरा वर्षे मी उत्तर भारतात होतो. त्यामुळेच तर मराठी साहित्याशी माझे 'जवळ असूनही दूर' असे नाते जडले. असे असले तरीही श्री. के. क्षीं.नी दिलेली शिकवण मात्र मला सारखी आठवत राहते. समाजशास्त्रात मी थोडे फार लेखन केले ते सर्व इंग्रजीत आहे. त्यात जिथे कुठे मूल्यमापन किंवा टीका करण्याचा प्रसंग आला तिथे तिथे 'टीकेलाही काही नैतिक बंधने असतात व वैचारिक धाटणी लागते' ह्या श्री. के. क्षीं.नी दिलेल्या मंत्राचे पालन करण्याचा मी सतत प्रयत्न करीत आलो आहे आणि ह्याच अर्थाने त्यांचे माझ्यावर अप्रत्यक्ष ऋण आहे असे मी वर म्हटले आहे.

डिसेंबर १९७७ मध्ये पुणे विद्यापीठात समाजशास्त्र विभागात माझी नेमणूक झाल्यानंतर मी प्रथम दीड-दोन वर्षे विद्यापीठ परिसरात राहात असे. त्या काळात संध्याकाळचे वेळेस श्री. के. क्षीं.ना फिरायला किंवा पाय मोकळे करायला बाहेर पडलेले मी अनेकदा पाहिले. तेही विद्यापीठ-परिसरातच राहात असत. पण तसा त्यांचा व माझा प्रत्यक्ष परिचय नव्हता. वीस-पंचवीस वर्षापूर्वीचा संदर्भ त्यांना चटकन् लक्षात येईल की नाही असेही वाटून त्यांना भेटण्याचे आणि स्वतःहून ओळख करून देण्याचे मला धैर्य झाले नाही. प्रकृतीने ते फार खालावलेले दिसत होते. पण त्याही दिवसांत मी त्यांचे नियतकालिकांतून, दिवाळी अंकांतून वगैरे लेख वाचलेत. त्यांतील काही प्रस्तुत लेखसंग्रहात घेतले आहेत. मात्र श्री. के. क्षीं.ना केव्हा तरी प्रत्यक्ष भेटावे व

जुनी आठवण काढावी असे मनास वाटे. त्यांचे स्नेही व नागपूरला माझे त्यावेळचे स्थानिक पालक असलेले प्रा. दादासाहेब सावळापूरकर सध्या निवृत्तीनंतर मुंबईस त्यांच्या मुलाकडे असतात. त्यांची भेट अधूनमधून घेत असतोच. पुण्यास मी विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रुजू झाल्याचा त्यांना स्वाभाविकच फार आनंद झाला. 'आता पुण्यास आलो म्हणजे तुला घेऊन क्षीरसागरांकडे जाईन, म्हणजे तुझी व त्यांची ओळखही होईल आणि जुन्या आठवणींना गप्पागोष्टींतून उजाळा मिळेल', असे दादासाहेब (प्रा. सावळापूरकर) एकदा म्हणाले होते. पण तो सुयोग येण्यापूर्वीच श्री. के. क्षीं.नी इहलोकाचा निरोप घेतला, त्यामुळे मनात सारखी रुखरुख वाटत होती. ती आता या प्रस्तावना-लेखनाच्या संधीमुळे काहीशी दूर झाली हे नक्कीच.

आता जरा प्रस्तुत लेखसंग्रहाकडे वळतो. स्त्रीजीवन, स्त्रीचा समाजातील दर्जा, स्त्रियांच्या समस्या, स्त्री-मुक्ती, आधुनिकीकरण व नव्या औद्योगिकरणामुळे स्त्रियांच्या बदललेल्या समस्या, विवाह-संस्था आणि पद्धती, जुनी व्यवस्था आणि नवे संदर्भ, विवाह-संस्थेचे भवितव्य-हे आणि अशा प्रकारचे विषय श्री. के. क्षीं.च्या सतत चिंतनाचे विषय होते. स्थूलमानाने हे विषय समाजशास्त्राच्या, विशेषतः भारतीय समाजशास्त्राच्या कक्षेत निश्चितच येतात. त्यामुळे श्री. के. क्षीं.च्या या लेखासंग्रहाचा आशय समाजशास्त्रीय (sociological) आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. त्यांचे विचार चिंतनावर आधारलेले असल्याने समाजशास्त्राच्या अभ्यासकांना अंतर्मुख करायला आणि विचार करायला लावण्याचे सामर्थ्य श्री. के. क्षीं.च्या लेखणीत आढळते.

संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' (International Women's Year) म्हणून जाहीर केले होते. त्याचा परिणाम, टपाल-तार किंवा रेल्वे अथवा एस.टी. (परिवहन) खात्याचे कर्मचारी अधूनमधून 'सौजन्य सप्ताह' पाळतात त्यासारखा, थोडाफार दिसला. भारतातही त्या निमित्ताने स्त्रियांच्या समस्या व त्यांचे समाजातील स्थान या विषयांच्या वेगवेगळ्या अंगांची चर्चाही झाली. समाजशास्त्रात तर Women's Studies हे एक अध्ययनाचे स्वतंत्र क्षेत्र मानले जाण्याइतपत या विषयांचा बोलबाला झाला. परिषदा आणि चर्चासत्रे झालीत व आजही होताहेत. त्यावर लेख लिहिले गेले व बरेच ग्रंथही प्रकाशित झाले. पण काही अपवाद वगळता त्यांतले बरेचसे पावसाळी छत्र्यांप्रमाणे उगवलेले होते. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाने आणलेल्या तात्पुरत्या उत्साहाच्या लाटेचा तो परिणाम होता. मात्र श्री. के. क्षीं.चे लेख हे काही त्या लाटेबरोबर वाहत आलेले लव्हाळे नव्हते. या संग्रहातील लेख मुळात जेव्हा प्रसिद्ध झाले त्या तारखा जर नीट पाहिल्या तर लक्षात येते की, 'सपत्नीकांच्या द्वितीय विवाहाचे अभिनंदन' हा श्री. के. क्षीं.चा लेख 'किर्लोस्कर' मासिकात सप्टेंबर १९४३ मध्ये प्रसिद्ध झालेला होता, तर शेवटचा लेख म्हणजे 'बलात्काराची सामाजिक आणि मानसिक मीमांसा' हा 'महाराष्ट्र टाइम्स', १३ एप्रिल १९८० च्या अंकामध्ये प्रसिद्ध झाला. म्हणजे जवळपास अडतीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात वेळोवेळी श्री. के. क्षीं.नी स्त्री-जीवन व विवाह-संस्था या विषयांवर जे चिंतन केले होते ते या सर्व लेखांच्या रूपाने आपल्या समोर आहे. त्यामुळे ह्या लेखांमधे समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेचे जसे प्रतिबिंब उमटलेले दिसते तसेच लेखकाच्या वैचारिक उत्क्रांतीच्या छटाही आढळतात.

१९६२ साली प्रा. श्री. के. क्षीरसागरांच्या स्त्रीजीवनविषयक लेखांचा एक संग्रह पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला होता. 'बायका' ह्या शीर्षकाखाली हे लेख प्रा. व. दि. कुलकर्णी यांनी संपादित करून त्यांच्या छोट्याशा प्रस्तावनेसह हा संग्रह छापला गेला होता. त्यातील लेख १९४२ ते १९५८ या सोळा वर्षांच्या काळात प्रासंगिक ऊर्मीप्रमाणे श्री. के. क्षीं.नी लिहिलेले होते. हा संग्रह एकूण बारा लेखांचा होता आणि त्यांचे विषय हे प्रस्तुत संग्रहातील लेखांशी मिळतेजुळतेच होते. पण एकंदरच आधीच्या संग्रहाची व्याप्ती तशी कमी होती. शिवाय

अनुक्रमणिका

१९५८ नंतरही, किंबहुना त्यानंतरच, स्त्रीजीवन, स्त्रियांचे सामाजिक स्थान, विवाहसंस्था, स्त्री-मुक्ती, स्त्रियांच्या आजच्या समस्या असल्या विषयांवर श्री. के. क्षीं.नी अनेक लेख लिहिलेत. अशा एकूण पन्नासपेक्षा अधिक लेखांचा व्यापक संग्रह वाचकांसमोर ठेवल्याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अभिनंदनच करायला हवे. मात्र 'बायका' हे पुस्तक प्रसिद्ध झाले तेव्हा 'हृदयाविष्करण' (पृष्ठे ४-८) करून आपली भूमिका सुस्पष्ट करण्यासाठी स्वतः श्री. के. क्षी. होते, पण आज मात्र ते नाहीत. त्यामुळे जाणकार तसेच जिज्ञासू वाचकांनी श्री. के. क्षीं.चे ते स्पष्टीकरण अवश्य वाचावे असे मी सुचवेन.

स्त्रियांच्या समस्यांचे विवेचन भारतीय सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेऊनच केले पाहिजे. हे तत्त्व श्री. के. क्षीं.नी अट्टाहासाने पाळले होते. म्हणूनच 'स्त्री'त्वाबद्दलच्या मूळ कल्पना ह्या त्यांनी भारतीय सांस्कृतिक परंपरेतूनच घेतलेल्या आढळतात. स्त्रियांना भोग्य वस्तू समजणे ही काही भारतीय संकल्पना नाही, तर तिचा प्रादुर्भाव पाश्चिमात्य देशांत औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलशाहीचे जे वर्चस्व प्रस्थापित झाले त्यामुळे झाला. 'चिपळूण-चंद्रोदय' (१९५०) विशेषांकातील 'स्त्रिया व संस्कृती' ह्या लेखात श्री. के. क्षी. म्हणतात :—

> "भारतीय संस्कृतीमध्ये 'भोग' आणि 'त्याग' यांची एक बेमालूम गुंफण आहे... भोग हा मूलतः गर्ह्य नाही, पण भोगाच्याही पलीकडे काही आहे याची जाणीव मात्र सदैव हवी, अशी भारतीय संस्कृतीची बैठक आहे. (पण) आज नव्या स्पर्धा-युगामुळे, व्यापारी युगामुळे व भौतिक तत्त्वज्ञानामुळे काही माणसे केवळ भोगाकडे वळत आहेत, तर काही केवळ त्यागाकडे वळत आहेत. यंत्राने बदललेली राहाणी आणि स्पर्धेने वेडावलेली मने, यांना संस्कृतीच्या मूळ बैठकीची आठवण करून द्यायला स्त्रियाही मूळ ठिकाणावर उरल्या नाहीत... तर, काय होईल..."

आणि हीच श्री. के. क्षीं.ची खरी हळहळ आहे. त्यांच्या विचारांची ही बैठक पाहिली तर, ते परंपरेची कास धरणारे, गतकालातून प्रेरणा घेणारे व काहीसे बुरसटलेले लेखक होते असा आभास निर्माण होतो. पण तो पूर्णतः बरोबर नाही. 'संस्कृतीचा स्थिरबिंदू स्त्रियांच्या राहाणीत असतो, प्रपंचातील स्त्रियांची भूमिका त्यागाची असेल . . . . . ., शरीरशृंगार हा त्यांचा इतका स्वभावधर्म असतो की वार्धक्यातही त्यांची हौस मरणार नाही, आणि शालीनतेचा आणि लज्जेचाही उपयोग शरीरशृंगाराकरताच कसा करावा हे भारतीय स्त्रियांना उत्तम कळते' असे म्हणणाऱ्या श्री. के. क्षीं.ना बदलत्या काळातही स्त्रियांनी 'कुलीन स्त्री आणि गृहिणी' पदाचीच कास धरावी याची खंत वाटते. खऱ्या अर्थाने स्त्री-शिक्षणाचा प्रसार व्हावा व स्त्रियांनी आवश्यक तेव्हा अर्थार्जन करून आपल्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करावा हा विचार श्री. के. क्षीं.नी तितक्याच कळकळीने मांडलाय. ते म्हणतात, "शिक्षणामुळे स्त्रियांच्या सुखात भर पडली की नाही हा एक प्रश्नच आहे. पण अशिक्षितपणामुळे निर्माण होणाऱ्या दुःखांपेक्षा शिक्षणामुळे उत्पन्न झालेली दुःखे पत्करावी." ('चिपळूण—चंद्रोदय' विशेषांक, १९५०, पृष्ठ १२)

स्त्री-सुधारणा ही श्री. के. क्षीं.ना मान्य आहे, पण ती एका मर्यादेपर्यंतच. केवळ पाश्चात्यांचे अंधानुकरण करणारी सुधारणा चळवळ त्यांना मान्य नाही. स्त्री-शिक्षणाचा उद्देश 'आधुनिक व सुशिक्षित गृहिणी' तयार करणे हा जसा नसावा, तसेच स्त्रियांचे पुरुषीकरण किंवा त्यांना पुरुषसदृश करणे हाही नसावा हे त्यांनी तितक्याच आग्रहाने मांडले आहे. म्हणूनच अनुकरणप्रिय समाजसुधारकांनी व्यक्तिशः कित्येक स्त्रियांचे तर नुकसान केलेच आहे, पण संपूर्ण समाजाचेही अपरिमित नुकसान केले आहे असे ते मानतात. स्त्रियांना समान संधी, शिक्षण व्यवसायातील संधी मिळाव्यात असा एकीकडे पुरस्कार करणारे श्री. के. क्षी. तितक्याच आग्रहाने असेही

म्हणतात की, "प्रत्येकीने पुरुषांचे व्यवसाय करण्याइतके शिक्षण संपादन करण्यात काळाचा व बळाचा अपव्यय करू नये". एकंदरच स्त्री-शिक्षण व सुधारणा याबाबतीत श्री. के. क्षीं.ची भूमिका समन्वयवादी आहे हे स्पष्ट होते. अर्थात्च प्रत्येक समन्वयवादी तत्त्वात एक अंतर्विरोध (dialectical opposition) असतोच हे काही अधिक खोलात जाऊन सांगण्याची गरज नाही. आणि म्हणूनच एकीकडे 'सूक्ष्म कर्तृत्वापेक्षा स्थूल कर्तृत्व आणि तत्त्वापेक्षा व्यक्ती यांचे आकर्षण स्त्रियांना आजच्याही युगात अधिक वाटते' असा स्त्रियांवर आरोप करणारे श्री. के. क्षी. "स्त्रियांनी 'रक्षित जीविकाक्रम' (sheltered existence) स्वीकारणे हे स्त्रियांच्याही हिताचे आहे, पुरुषांच्याही हिताचे आहे आणि मुलांच्या हिताचे तर आहेच आहे" ('जीवनशिक्षण', डिसेंबर १९६० मधील लेखात) असे सांगून मोकळे होतात. थोड्याफार फरकाने हाच विचार त्यांनी 'प्रज्ञालोक' (मे १९६२) मध्ये लिहिलेल्या 'स्त्रीविषयक आदर्श—जुना आणि नवा' या लेखातही पुनः मांडला आहे. त्यामुळे तथाकथित समन्वयवादी बुरख्याचा वापर करून परंपरावादी भूमिकेचाच पाठपुरावा तर ते करीत नाही ना, अशी शंका येऊ लागते. आधुनिकतेचा स्वीकार तर करायचा, पण पारंपरिक सांस्कृतिक मूल्ये मात्र जपायचीच असा समन्वयवादी विचार मांडणाऱ्यांना हा अंतर्विरोध का दिसत नाही हेही मग समजू लागते. आणि मग, 'पुरोगामी जातीइतकी मागासलेली जात माझ्या तरी पाहण्यात नाही', ('वैशिष्ट्य', एप्रिल १९६६, पृष्ठ १३) असे श्री. के. क्षी. का म्हणतात हेही उमजू लागते.

आधुनिक युगाची वाटचाल करणाऱ्या पण परंपरेच्या बंधनांत जखडलेल्या भारतीय समाजात सुशिक्षित, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या विविध समस्यांची चर्चा श्री. के. क्षीं.नी बऱ्याच स्फुट लेखात केली आहे. वाढत्या दाक्षिण्य-शून्यतेमुळे घराबाहेर पडून स्वावलंबी बनू पहाणाऱ्या स्त्रियांच्या चारित्र्य व शीलरक्षणाचा प्रश्न, घरी नवऱ्याची आणि ऑफिसात साहेबाची मर्जी सांभाळताना स्त्रीची होणारी मानसिक ओढाताण, तसेच पतीस शरीरसुख, मुलांना ममता आणि संस्कार देताना आणि कुटुंबातील वडीलधाऱ्यांशी नम्रतेने वागताना तिची होणारी तारेवरची कसरत, ह्या सर्व बाबतींत श्री. के. क्षीं.ना स्त्रियांबद्दल अपार सहानुभूती आहे. जबाबदाऱ्या वाढत चालल्या असल्या तरी स्त्रीयांकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षा कमी होण्याची चिन्हेही दिसत नाहीत, उलट त्या वाढतातच आहेत असा आजचा अनुभव आहे. स्त्रियांना सामाजिक समानता मिळणे योग्य असल्याचे प्रतिपादन करताना मात्र श्री. के. क्षी. आजच्या पुरुषप्रधान व्यवस्थेची अनिवार्यता काहीशा अगतिकतेने स्वीकारताना दिसतात (उदाहरणार्थ, 'शिक्षण की वळण' हा लेख, एस. एन. डी. टी. कन्याशाळा ज्युबिली अंक, १९६९).

मग स्त्री-मुक्तीची किंवा विमोचनाची कोणती संकल्पना श्री. के. क्षीं.ना अभिप्रेत आहे? या प्रश्नाचा विचार ते सामाजिक संस्था आणि सामाजिक स्थैर्य यांच्या संदर्भात करतात. समाजाचे सातत्य टिकवावयाचे असेल आणि काही विशिष्ट नीतिमूल्ये वर्धिष्णु व्हायची असतील तर कुटुंब व गृहसंस्था ही टिकलीच पाहिजे, हे मूलभूत तत्त्व आणि त्याच्या अनुषंगाने येणारी काही जीवनमूल्ये (values) स्वीकारूनच ते स्त्री-मुक्तीचा विचार करतात. कायद्याने स्त्रियांना अधिकार आणि स्वातंत्र्य दिले तरी निसर्ग एक विशिष्ट प्रकारचे श्रमविभाजन (division of labour) स्त्री-पुरुषांवर लादत असतो. निसर्गाने घालून दिलेल्या ह्या लक्ष्मणरेषा उल्लंघण्याचा प्रयत्न स्त्री-मुक्ती आंदोलनाने केला तर तो व्यर्थ होईल असा ते इषारा देतात ('स्त्री-विमोचनाचा खरा मार्ग','स्त्री' मासिक, ५०० वा अंक, मे १९७२). या आंदोलनाची उद्दिष्टे निदान पुरुषसदृश पॅन्ट-शर्ट घालून स्त्रिया साध्य करू शकणार नाहीत आणि पुरुषांशी पुरुषी गुणांत स्पर्धा करण्याचे खूळ माजवून तर मुळीच करू शकणार नाहीत, (स्त्रियांचे लिब् म्हमजे काय? 'तेजस्वी', १३ एप्रिल १९७५) असेही ते बजावतात. अर्थात् स्त्रियांना पूर्णपणे

पुरुषाचे आज्ञापालन करण्याचा (submission) अथवा पतिपरायणतेचा सल्ला श्री. के. क्षी. देतात असे नाही. तथापि, कुटुंबव्यवस्था अबाधित टिकविण्याचे सामाजिक मूल्य त्यांनी स्वीकारलेले असल्याने 'स्त्रीचा मुख्य धर्म पतीला प्रिय होऊन संसाराचे सुख साधणे हा होय' असा धर्मशास्त्रप्रणीत मार्ग ते दाखवितात. गृहसंस्था टिकविण्याबाबत स्त्रियांच्या जबाबदाऱ्यांकडे श्री. के. क्षी. जितक्या बारकाईने लक्ष देतात तेवढे मात्र ते पुरुषांनी त्यांच्या मनोवृत्तीत बदलत्या काळानुसार कसा बदल घडवून आणला पाहिजे याची दखल घेत नाहीत, असे दुर्दैवाने म्हणावे लागते. पर्यायाने समाजाचे स्थैर्य, सांस्कृतिक मूल्ये, कुटुंब संस्थचे सातत्य हे सांभाळण्याची सर्व जबाबदारी फक्त स्त्रियांचीच, असे ते सुचवितात की काय असे वाटू लागते (उदाहरणार्थ, 'स्त्री-विमोचनाची शक्याशक्यता', 'पुरोगामी महिला', मे १९७६). श्री. के. क्षीं.ची ही भूमिका दुराग्रही वाटते. आजच्या स्त्रीमुक्ती आंदोलानास ती मुळीच मान्य होणार नाही हे काही वेगळे सांगायला नकोच. उलट स्त्रीमुक्ती चळवळीच्या आजच्या नेतृत्वास त्यांचे या लेखसंग्रहातील विचार निश्चितच प्रक्षोभक वाटणार.

याचा अर्थ श्री. के. क्षीं.नी स्त्रियांबाबत पूर्णपणे अनुदार भूमिका घेतली किंवा त्यांची 'टर' उडविण्याच्या स्वरात लेख लिहिलेत असाही नाही. क्षीरसागरांना स्त्रियांबद्दल नितांत आदर आहे, त्यांच्या कर्तबगारीबद्दल आणि कर्तव्यबुद्धीबद्दल अभिमान वाटतो आणि स्त्रीदाक्षिण्याची जाणीवही आहे. पण ते स्त्री-स्वातंत्र्य, समता आणि तिचे मानवी हक्क (rights) या संकल्पनांचा विचार फ्रेंच आणि औद्योगिक क्रांतीनंतर युरोपात ज्या "स्वातंत्र्य, समता आणि बंधुता" (Liberty, Equality and Fraternity) या संकल्पनांचा प्रादुर्भाव झाला त्या संदर्भात किंवा त्या पातळीवर करायला तयार नाहीत. असे करणे म्हणजे आपला सांस्कृतिक मूल्यांचा श्रेष्ठ वारसा सोडून पाश्चात्यांचे अंधानुकरण करणे होय असे श्री. के.क्षीं.ना वाटते. पण केवळ 'चूल आणि मूल हेच स्त्रियांचे क्षेत्र आहे' अशी भूमिका घेण्याइतपत श्री. के. क्षी. बुरसटलेले नाहीत, तर "स्त्रियांची भूमिका गृहरक्षणाची आहे, प्रेम व प्रेरणा पुरविण्याची आहे. स्त्री पुरुषाच्या क्षेत्रात शिरल्याने पुरुष नोकरीला महाग होईल ही मुख्य अडचण नाही, तर 'गृह' ही संस्था आपल्या सुंदर सम्राज्ञीला मुकेल, आणि पुरुष हा प्राणी थकून घरी आल्यावर भेटणाऱ्या प्रेमाला व प्रेरणेला मुकेल ही मुख्य अडचण आहे", ('हृदयाविष्करण', बायका, १९६२, पृष्ठ ७) असा विचार ते मांडतात. पण ही भूमिका म्हणजे 'चूल आणि मूल' कल्पनेला सौंदर्यवादी मुलामा चढवून पुनःप्रतिपादन (sophisticated restatement) केल्यासारखी वाटते.

स्त्रीचा खरा धर्म 'लज्जा, विनय आणि त्याग' हे आपल्या भारतीय स्त्रीत्वाचे सद्‌गुण टिकवणे हाच आहे असे श्री. के. क्षी. म्हणतात. तात्पर्य, त्यांना स्त्री-पुरुष समानता व स्त्री-हक्क यांकडे आगरकरी सुधारकी चष्म्यातून पाहणे मान्य नाही. 'बायका' ह्या त्यांच्या पुस्तकात लिहिलेल्या प्रस्तावनेत (पृष्ठ ८-ब-क) प्रा. व. दि. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे श्री. के. क्षीं.ची भूमिका ही एका सौंदर्यवादी सुधारकाची (romanticist reformer ची) आहे, 'स्त्रीसुधारका'पेक्षा 'स्त्रीपूजका'ची आहे. पण त्यांच्या ह्या सौंदर्यवादाचा आणि स्त्रीपूजेचा गाभा तरी काय आहे? प्रा. क्षीरसागरांना स्त्री म्हणजे प्रणयगीताचा आणि काव्यमाधुर्याचा स्त्रोत असावी असे वाटते. स्त्रियांनी शिक्षण घ्यावे, आवश्यक असल्यास नोकऱ्या कराव्या, पण ती 'स्त्री' उरणार नाही अशा प्रकारे जर त्यांच्या कौटुंबिक व समाजिक समस्यांचे निराकरण आधुनिक स्त्री-मुक्तिवादी सुधारक करू लागले तर ते त्यांना मान्य नाही. अशा सौंदर्यवादी तत्त्वचिंतकाला फक्त स्त्रीचे शरीर दिसते, तिची केशभूषा व शृंगार दिसतो, पण स्त्रीच्या शरीराशिवाय, तिच्या लज्जेशिवाय व कमनीयतेशिवाय तिला एक मन आणि संवेदनाही असते याची जाणीव मात्र प्रकर्षाने आढळत नाही असेच शेवटी म्हणावे लागते.

अनुक्रमणिका

या ग्रंथातील लेख मूल्याधिष्ठित (value-based) आहेत. त्यात भारतीय सांस्कृतिक परंपरेत स्त्रियांकडे पाहण्याच्या भूमिकेचा पाठपुरावा आहे. पण ते करीत असतानाही श्री. के. क्षी. आधुनिकतेशी थोडीफार तडजोड करायला तयार आहेत, मात्र त्यामुळे पुरुषप्रधानतेची व गृहसंस्थेची चौकट कुठे विस्कळीत होता कामा नये. त्या मर्यादेपर्यंतच त्यांना तडजोड मान्य आहे. त्यात एक सुंदर जीवनदृष्टी (world view) आहे किंवा फार मोठे तत्त्वज्ञान किंवा सिद्धांत (theories) आहेत असे म्हणणे जरा अतिरंजितपणाचे होईल. श्री. के. क्षीं.च्या लेखणीला तात्त्विक स्पर्श असतो, बैठकही असते. पण खोल तात्त्विक चर्चात व वादांत मात्र ते शिरत नाहीत. पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष करण्यात त्यांना रुची नाही. काही लेखांत अशी चर्चा थोड्याफार प्रमाणात अढळते, पण सर्वच लेखांत मौलिक किंवा मूलभूत स्वरूपाचे तत्त्वचिंतन नाही. किंबहुना बरेचसे लेख हलकेफुलके म्हणजे स्फुटलेखांच्या स्वरूपात प्रासंगिक ऊर्मीप्रमाणे लिहिलेले आहेत. त्यात पत्रकारी लेखनाची धाटणी आहे. अर्थात् असे म्हणताना 'पत्रकारितेला तात्त्विक किंवा वैचारिक अधिष्ठान नसते' असे मला सुचवायचे नाही. पण वृत्तपत्रीय स्तंभांतून केलेले स्फुट लिखाण हे त्याच्या प्रासंगिक प्रयोजनापासून तर शैलीपर्यंत सर्वच बाबतींत तात्त्विक लिखाणापेक्षा भिन्न असते हे नाकारून चालणार नाही. श्री. के. क्षीं.ची भाषाशैली व त्यांच्या लेखनातील वाङ्मयीन गुण यांवर लिहिण्याचा मला अधिकार नाही. मात्र समाजशास्त्रीय विषयांवर लेखन करूनही त्यांनी बोजड शास्त्रीय संज्ञा (terminology) वापरण्याचा मोह पूर्णपणे टाळलाय. त्यामुळे त्यांची भाषा सुबोध वाटते ह्याचा विशेष उल्लेख करावासा वाटतो.

श्री. के. क्षीं.चे लेख चिंतनावर आधारलेले आहेत, संशोधनावर नाहीत. ते नेहमीच चिंतन (ideas) आणि संशोधन (research on facts) यात फारकत करीत आलेत. तसा कबुलीजबाबही त्यांनी दिलाय ('तसबीर आणि तकदीर', पृ. २९०). तथ्यांचा आधार फारसा नसल्याने त्यांच्या काही विधानांमध्ये उथळपणा वाटतो. स्वतःस आलेले तुरळक अनुभव ते लेखांतून मांडतात. तेवढा आधार निश्चितच असतो. पण कोणत्याही विधानांना शास्त्र-प्रामाण्याच्या कसोटीप्रमाणे लागणारे तथ्यांचे बळ मात्र त्यांच्या विधानांना नसते. अर्थात् ती तथ्यांशी पडताळून पाहता येण्यासारखी आहेत. हे काम समाजशास्त्राचे अभ्यासक अधिक चांगले करू शकतील. विचार-कल्पना आणि तथ्ये (संशोधन) यांच्या परस्पर देवाणघेवाणीतूनच सामाजिक तत्त्वांचे नीट आकलन होऊ शकते, त्यांची फारकत करून नव्हे. अर्थात् अशा प्रकारचे समाजशास्त्रीय संशोधन श्री. के. क्षीं.नी केले नाही असे म्हणणे म्हणजे अवास्तव टीका होईल. तशी अपेक्षा करणेही बरोबर नाही. उलट अशा संशोधनासाठी भरपूर विचार व संकल्पना ते देतात हेच त्यांचे फार मोठे योगदान आहे.

या लेखसंग्रहात एक महत्त्वाची उणीव आहे. यातील बहुतांश लेखांतील स्त्री-चित्रणात श्री. के. क्षीं.ना महाराष्ट्रीय, शहरी, मध्यमवर्गीय व त्यातल्या त्यात पुणेरी-सदाशिवपेठी-स्त्री अभिप्रेत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. ही गोष्ट 'धकाधकीच्या युगातील स्त्री' ('आपण', २० एप्रिल १९६८) या लेखात ते प्रांजळपणे कबूलही करतात. तसेच, 'सुशिक्षित स्त्रियांची भजनी मंडळे' (१८मार्च १९७०) आणि 'नवरेशाही संपण्याची लक्षणे नाहीत!' ('तेजस्वी', २९ जून १९७५) या लेखांतही आपला रोख मध्यमवर्गातील स्त्रियांच्या परिस्थितीवरच आहे अशी कबुली ते देतात. मात्र इतर बऱ्याचशा लेखांत ते 'स्त्री' ही एक सामान्य जाती किंवा कधी 'भारतीय स्त्री' असे गृहीत धरून विधाने करतात, परंतु त्यामागे ही महाराष्ट्रीय—पुणेरी मध्यमवर्गीय स्त्रीच डोकावीत असते हे वाचकांच्या लक्षात येईलच. ज्या देशातील, ७५ टक्के जनता खेड्यांत राहते तेथील कोट्यवधी ग्रामीण स्त्रियांचे काय? केशवपनाची सक्ती आणि पुनर्विवाहाचे बंधन यांसारख्या अठराव्या व एकोणिसाव्या शतकातील ब्राह्मणी समाजातील शृंखलांनी तिला फारसे जखडले नव्हते, तरी सतत काबाडकष्ट करून आणि द्रव्यार्जनास हातभार

लावूनही ग्रामीण स्त्रीचे दास्य हे शहरी मध्यमवर्गीय स्त्रियांच्या मानसिक कोंडमाऱ्यापेक्षा भयंकर दारूण होते व आजही आहे. श्री. के. क्षी. त्या ग्रामीण स्त्रीचा मुळीच विचार करीत नाहीत. ग्रामीण जीवन हे त्यांच्या अनुभवविश्वाचा भाग नाही म्हणून म्हणा, किंवा ग्रामीण स्त्री ही त्याच्या सौंदर्यवादी दृष्टिपथात येत नाही म्हणून असेल, तिचा विचार मात्र या लेखांमध्ये नाही.

श्री. के. क्षीं.नी अनेक विषय ह्या लेखांत हाताळले आहेत. स्त्रियांचे शिक्षण असो, नोकरीतून उद्‌भवणारे प्रश्न असोत, त्यांची वेषभूषा व राहणी, कुटुंबसंस्था, विवाहसंस्थेत आवश्यक असलेले बदल, आहेर, हुंडा, केशवपन, मुस्लिम, आर्य व कोमटी समाजांतील स्त्रियांची दुःखे व समस्या, स्त्रियांवर होणारे अत्याचार-गुन्हे, बलात्कार, द्वितीय विवाह, इत्यादी अशा एक ना अनेक विषयांवर त्यांनी त्यांचे विचार परखडपणे मांडलेत. असे सडेतोड लेखन करण्यासाठी आपल्या तत्त्वांशी एकनिष्ठ राहण्याचे धैर्य (courage of conviction) असणारा लेखकच हवा. श्री. के. क्षीं.नी ते धैर्य दाखविले आहे. पण हे लेख सर्वांनाच सारखे स्वीकारार्ह वाटणारे नाहीत. काहींना ते विवाद्य, तर काहींना अप्रिय वाटतील. पण त्या लेखांमागे त्यांच्या प्रामाणिक भावना व दीर्घ चिंतन आहे हे मान्य करावे लागेल. कोणत्याही विचारांचे सामर्थ्य हे, ते इतरांना किती पटतात यापेक्षा त्यांना कितपत विचार करण्यास प्रवृत्त करतात, या मापदंडाने मोजायचे असते. या निकषावर मला हा लेखसंग्रह बहुमोल वाटतो.

आज स्त्रियांच्या समस्या व स्त्री-विमोचनाचा विचार विविध अंगांनी होत आहे, किंवा तसा विचार व चर्चा करण्यास आज पोषक वातावरण होत आहे-हे एक सुचिन्ह आहे. स्त्रीजीवनाकडे तटस्थ किंवा त्रयस्थ भूमिकेतून पाहण्याची पुरुषांची सवय थोडीफार का होईना कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्त्रीजीवन, विवाह व कुटुंबसंस्था यांचा सर्वांगीण आणि तेवढ्याच खुल्या दिलाने विचार होण्याची आवश्यकता आहे ही जाणीव समाजशास्त्राचे अभ्यासक, समाजसुधारक, स्त्रिया व दलित यांच्या उत्थानासाठी प्रयत्नशील असलेले राजकारणी नेते, विचारवंत लेखक, पत्रकार व सगळ्याच थरांतील सामाजिक कार्यकर्ते याच्यांत वाढत्या प्रमाणात आज दिसून येत आहे. त्यामुळे श्री. के. क्षीं.च्या लेखसंग्रहावर बरीच चर्चा होणार हे नक्कीच. पण त्या चर्चेमुळे स्त्रीमुक्तीच्या व स्त्रीसुधारणेच्या प्रक्रियेस एक गती मिळेल असा मला विश्वास वाटतो.

या लेखसंग्रहास प्रस्तावना लिहिण्याची संधी मला दिली याबद्दल पुनः एकवार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मी आभार मानतो.

२९ एप्रिल १९८२<br>पुणे विद्यापीठ<br>पुणे ४११ ००७

**द. ना. धनागरे**<br>प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग<br>पुणे विद्यापीठ

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

स्त्रियांवर आरोप ........ २१
स्त्रिया आणि संस्कृती ........ २५
पक्षहीन महिला परिषद ........ २९
आजच्या स्त्रीशिक्षणाची दिशा ........ ३३
स्त्रीविषयक आदर्श-जुना आणि नवा ........ ३७
स्त्रिया लग्न कशाला करतात? ........ ४२
माझ्या दृष्टिकोनातून ........ ४५
स्त्रियांच्या नोकऱ्या : आणखी एक दृष्टिकोन ........ ५०
स्त्री-विमोचनाची आजची दिशा ........ ५३
धकाधकीच्या युगातील स्त्री ........ ५८
शिक्षण की वळण ........ ६०
स्त्रियांच्या सुरक्षिततेचा कूट प्रश्न ........ ६३
महिलांवरील अत्याचार-मनोरचना ........ ६६
सुशिक्षित स्त्रियांची भजनी मंडळे ........ ६९
मुसलमान स्त्रियांची दुःखे ........ ७२
स्त्री-विमोचनाचा खरा मार्ग ........ ७५
स्त्री-सौंदर्यातील 'रोख' भाग ........ ७८
भारतीय स्त्रीचे दौर्बल्य ........ ८०
बंदुकांनी स्त्रियांचे रक्षण होईल का? ........ ८२
पुन्हा एकदा केशवपन! ........ ८५

स्त्रियांचे 'लिब्' म्हणजे काय? ........ ८७
एक आधुनिक आई ........ ९०
नवरेशाही संपण्याची लक्षणे नाहीत! ........ ९३
स्त्री-दाक्षिण्याची वाढती गरज ........ ९६
कौटुंबिक-सामाजिक संरक्षण-स्त्रियांची महत्त्वाची गरज ........ १००
स्त्री-विमोचनाची शक्याशक्यता ........ १०३
पतित स्त्रियांचे संरक्षण ........ १०६
नडलेली स्त्री ........ १०९
स्त्रियांच्या पुरुषीकरणाची आवश्यकता आहे काय? ........ ११२
सुशिक्षित स्त्रियांना माहेर ........ ११५
युद्धोत्तर स्त्रीवरील कामाचा बोजा ........ ११८
स्त्रियांसंबंधीचे वाढते गुन्हे ........ १२१
स्त्री-सौख्याची नवीन पाहाणी ........ १२४
आजच्या स्त्रीचा 'डबल रोल' ........ १३०
स्त्रियांचे रक्षण : नागरिक अवनती कशी जाईल? ........ १३३
स्त्रियांवरील अत्याचाराचे गुन्हे ........ १३६
बलात्काराची सामाजिक आणि मानसिक मीमांस ........ १३९
सपत्नीकांच्या द्वितीय विवाहाचे अभिनंदन ........ १४४
सपत्नीकांचे द्वितीय विवाह आणि आगरकरी सुधारक ........ १४८
विविध विवाहांची आवश्यकता ........ १५५
आधुनिक विवाह असुखावह होणे अपरिहार्य आहे काय? ........ १५९
केसरीच्या संपादकांचा गाजलेला विवाह ........ १६७

हुंडा, वारस आणि विवाह ........ १७४
विवाहविषयक वास्तवता ........ १७८
कोर्टात गाजलेले भिन्नधर्मी विवाह ........ १८३
समस्या जुनीच : अर्थात् सुशिक्षितांच्या विवाहाची ........ १९०
नवे बालविवाह ........ १९८
आजचे लग्नसमारंभ ........ २०१
आपल्याकडील विवाहाची आर्थिक बाजू ........ २०४
आर्य वैश्य समाजाने दाखविलेले सामूहिक विवाहाचे धैर्य ........ २०७
आधुनिक लग्नसमारंभातील अराजक ........ २१०
विवाह : बंधन की साधन? ........ २१६
आधुनिक स्वयंवरातील अडचणी ........ २१९
कोमटी समाज घडवीत असलेले स्वयंवर मेळावे! ........ २२२
विवाहातील आहेर-एक सक्ती! . . ........ २२५

भाग पहिला

# स्त्री- जीवनविषयक लेख

प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर

## अनुक्रमणिका

## १

# स्त्रियांवर आरोप

मी माझ्या भगिनींवर जे आरोप करणार आहे ते माझे एकट्याचे आहेत असे मी समजत नाही, आणि त्याही तसे खास समजणार नाहीत. अनेक पुरुषांच्या मनात अनेकदा जे येऊन जाते, जे त्यांना अनेकदा अस्वस्थ करते तेच मी सांगणार आहे. पण म्हणून माझे काम सोपे आहे असे मात्र नव्हे, कारण माता, भगिनी, सहचारिणी हे ज्यांचे जिव्हाळ्याचे नाते त्यांच्यावर आरोप करणे म्हणजे काही सोपे काम नाही! "To be wroth with those we love, works like a madness in the brain." "प्रेमाच्या माणसांवर रागावण्याचा प्रसंग आला म्हणजे डोक्यात एक प्रकारचे काहूर उठल्यासारखे वाटते. " असे एका कवीने म्हटले आहे.

स्त्रियांवर होणाऱ्या ठरीव आरोपांचा इथे उच्चार करण्याचे कारण नाही. कारण, तुम्हांला ते नवीन आणि मला ते महत्त्वाचे वाटत नाहीत. कोणी म्हणतात, शास्त्रज्ञ, कवी, धर्मसंस्थापक, समाजवेत्ते हे सारे पुरुषांतूनच निघाले! तर कोणी म्हणतात, स्त्रियांचा मेंदू पुरुषांच्या मेंदूहून आकारानेच कमी आहे! एका जर्मन तत्त्ववेत्त्याची मजल तर स्त्रिया खऱ्या सुंदरही नसतात असे म्हणण्यापर्यंत गेली आहे. यांतील शेवटचा आक्षेप निदान पुरुषांना तरी खरा वाटणे शक्य नाही. इतर आरोपांचेही मला तितकेसे महत्त्व वाटत नाही. शास्त्रज्ञ आणि कवी यांचे प्रमाण सबंध मानवजातीत केव्हाही अत्यल्पच असणार. मग ते स्त्रियांतून निघाले काय आणि पुरुषांतून निघाले काय! मला वाटतं शेक्सपीअर-टागोर, आइन्स्टाइन्-रामन् हे स्त्रियांतून निघत नाहीत असे मानले तरी त्या गोष्टीचा उल्लेख करण्यात पुरुषांना खंत वाटण्याऐवजी एक प्रकारचा गुप्त अभिमानच वाटत असावा. कारण स्त्रियांत प्रतिभेचे आणि पराक्रमाचे प्रमाण कमी असले तरी त्यामुळे पुरुषाचे नडते अगर नुकसान होते असे नाही. स्त्रियांमधील ज्या दोषांमुळे पुरुषांचे नुकसान होते, पुरुषांना दुःख वाटते, स्त्रियांसंबंधी आणि त्यांना घडविणाऱ्या विधात्यासंबंधी कोडे पडते, ते दोष वेगळेच आहेत.

आणि ते दोष वेगळे आहेत याचे कारण स्त्रियांचे गुणही वेगळेच आहेत. स्त्रियांना महत्त्व प्राप्त झाले याचे इंगित त्यांच्या शरीरबळातही नाही की त्यांच्या बुद्धिबळातही नाही. ते इंगित त्यांच्या आकर्षकपणात आणि सदयपणात आहे. 'सौंदर्य' शब्द मी मुद्दाम वापरला नाही. 'सौंदर्य' सर्वच स्त्रियांत असेल असे नाही. पण आकर्षकपणा (charms) मात्र जवळजवळ सर्वच स्त्रियांत असतो-निदान असणे शक्य आहे. आकर्षकता आणि सदयता यांच्या जोरावर स्त्रिया स्वतः प्रिय होतात, इतकेच नव्हे तर मानवी जीवन सह्य, सौम्य आणि प्रिय करून सोडतात. यांत स्त्रियांचे बळ आहे, इतकेच नव्हे तर यांत त्यांचे सामाजिक महत्त्वही आहे.

स्त्रियांकडे न्यायदानाचे काम दिल्यास ते त्या योग्य प्रकारे पार पाडू शकणार नाहीत, त्या राज्यपदावर बसल्यास अनर्थ होतील, वगैरे कुतर्क पुरुषांनी अनेकदा केले आहेत. मला मात्र "स्त्रियांच्या हाती सत्ता आली तर" हा शब्दप्रयोगच हास्यास्पद वाटतो. असा काळ केव्हा होता काय, की जेव्हा स्त्रियांच्या हाती अपार सत्ता नव्हती? ऐन अभिषेकाच्या दिवशीच आपल्या युवराज पुत्राला वनवासाला धाडणाऱ्या राजा दशरथापासून तो दिगंत साम्राज्यावर पाणी सोडणाऱ्या आधुनिक सम्राटापर्यंत अनेक सत्ताधीशांवर स्त्रियांनी सत्ता गाजविल्याचे इतिहासात नमूद आहे.

अर्थात्, काव्य आणि इतिहास यांचे ऐसपैस हवाले देऊन, चालू काळी स्त्रियांच्या हाती राजकीय, सामाजिक सत्ता देण्याच्या प्रश्नावर मी पांघरूण घालू पाहतो असे मात्र नव्हे. मला एवढेच म्हणायचे आहे की, जी सत्ता स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने भोगतील, तो तितकी मोठी नाही की जितकी त्यांची निसर्गदत्त सत्ता आहे!

स्त्रियांची स्वाभाविक सत्ता सूक्ष्म आणि गुप्त आहे व म्हणूनच अधिक प्रभावी आहे, कारण जे सूक्ष्म असते ते स्थूलाहून अधिक बलाढ्य व दुर्दम्य असते असे समजणारांपैकी मी आहे. आणि या सूक्ष्म स्त्री-सत्तेसंबंधीच पुरुषांना अनेकदा गुणगानही करावे लागते आणि गाऱ्हाणेही करावे लागते.

आपल्या आकर्षणाच्या, दयेच्या आणि प्रेमाच्या बाबतीत स्त्रिया अद्याप वनस्पतिसृष्टी आणि (मनुष्येतर) प्राणिसृष्टी यांच्या अंधकार-युगातच चाचपडत आहेत असे आढळून येते आणि मग ज्यांच्यामुळे पुरुषाच्या पराक्रमाला आणि प्रतिभेला स्फुरण चढते, ज्यांच्याखातर त्यास समाज आणि संस्कृती यांची मातब्बरी वाटते त्या भूदेवताच आपल्या विचारांच्या आणि विकारांच्या बाबतीत अद्याप प्राथमिक अवस्थेत असल्याचे आढळून आल्यावर त्यास आश्चर्य व खेद वाटल्यावाचून राहात नाही.

अगदी प्राचीन काळी, मानवी समाजाच्या रानटी अवस्थेत स्त्रियांच्या मनावर दोनच गोष्टींचा विशेष परिणाम होत असला पाहिजे. एक म्हणजे बलवान् आणि धाडसी अशा पुरुषाच्या पराक्रमाचा आणि दुसरा म्हणजे अकारण हसणाऱ्या आणि अकारण रडणाऱ्या अशा अर्भकाच्या असहायतेचा. सामर्थ्याच्या प्रदर्शनाने स्तिमित होणे आणि असहायतेच्या दर्शनाने द्रव पावणे हे स्त्रियांचे मनोधर्म आजही आहेत तसेच आहेत. आजचे सुधारलेले जग पराक्रम आणि दया या दोन्ही बाबतींत रानटी अवस्थेच्या किती तरी पुढे गेले आहे. आजच्या जगात प्रभावी होणारे सामर्थ्य केवळ शारीरिक, दृश्य आणि व्यक्तिगत असे उरले नाही. ते सूक्ष्म, अप्रत्यक्ष आणि संघटित असे झाले आहे. शिकार, तिरंदाजी, पेहेलवानकी यांत दिसून येणारे शरीरबळ आज मागे पडले असून, सहकार्य, संघटना, बुद्धिमत्ता यांच्या द्वारेच आधुनिक जगातील सामर्थ्य अधिक व्यक्त होत आहे. तसेच, केवळ दृष्टिगोचर होणाऱ्या असहायतेने व कारुण्याने द्रव पावणे हे आजच्या जगात पुरेसे नाही. अनेक दूरस्थ आणि अदृश्य दुःखे दूर करण्यात आजचे समाजनेते व्यग्र आहेत. सारांश, सामर्थ्य आणि असहायता या दोहोंच्याही बाबतीत केवळ प्राथमिक मानवी अवस्थेतील कौतुक आणि करुणा यांचा आज उपयोग नाही.

पण कर्तृत्व आणि करुणा या दोन्ही क्षेत्रांत सुधारलेला पुरुष कितीही पुढे गेला असला तरी, त्याला या दोन्ही क्षेत्रांत स्त्रियांच्या सहजस्फूर्त सहानुभूतीची आवश्यकता मात्र पूर्वीइतकीच आहे. मानव तिरंदाजीसारख्या प्राथमिक शस्त्रविद्येच्या कितीही पुढे प्रगत झाला असला तरी, स्त्रियांच्या कौतुकाची आणि सदय वृत्तीची गरज न भासण्याइतका पुढे तो कधीच जाणे शक्य नाही. जोपर्यंत स्त्रीच्या पोटीच पुरुष जन्म घेत आहे तोपर्यंत त्यास स्त्रीच्या सहानुभूतीची, अभिज्ञतेची आणि सदयतेची गरज राहणारच.

पण आजच्या परिणत सुधारणेच्या युगातही स्त्रियांचे कौतुक आणि करुणा ही मात्र प्राथमिक अवस्थेतच राहिल्याचे दिसून येते! जे स्थूल, दिखाऊ आणि नजीक असेल तेवढेच स्त्रियांच्या कौतुकाचा विषय आजही होते. मला तर कित्येकदा असे वाटते की, हॅम्लेट्सारखी अपूर्व भूमिका प्रतिभेने कल्पून शब्दांनी अमर करणारा

शेक्सपीअर आणि तीच भूमिका अभिनयाने वठविणारा गणपतराव जोशी असे दोघे स्त्रियांच्या पुढे येऊन उभे राहिले तर, त्यांतील गणपतराव जोश्यांच्या गुणांनी स्त्रिया अधिक स्तिमित व आनंदित होतील!

शास्त्रज्ञ, कवी आणि महात्मे यांच्याकडे स्त्रिया आकर्षिल्या जात नाहीत असे नाही, पण ते त्यांच्या खऱ्या जीवनकार्यामुळे अगर तत्त्वज्ञानामुळे नव्हे, तर त्यांना हळूहळू लाभणाऱ्या व्यक्तिमाहात्म्यामुळे.

सूक्ष्म कर्तृत्वापेक्षा स्थूल कर्तृत्व आणि तत्त्वापेक्षा व्यक्ती यांचे आकर्षण स्त्रियांना आजच्या युगातही अधिक वाटते, असा माझा त्यांच्यावर आरोप आहे.

पण स्त्रियांच्या अभिज्ञतेत स्थूलत्व आणि असंस्कृतता अधिक आढळते हीच काय ती आपत्ती नाही. स्त्रियांच्या आदरबुद्धीत व त्यागबुद्धीत पुष्कळदा लहरीपणा आणि तऱ्हेवाईकपणाही आढळतो. कर्तव्यदक्ष आणि प्रेमळ पुत्राहून बेपर्वा आणि कृतघ्न पुत्राकरिता जीव टाकणाऱ्या माता अनेकांनी पाहिल्या असतील. गुणवान् व इमानी प्रियकर झिडकारून, हिरवट व बेइमान प्रियकराचा अंगीकार करणाऱ्या स्त्रिया मानसशास्त्रज्ञ आणि व्यवहारज्ञ या दोघांनाही बुचकळ्यात पाडतात आणि याचे कारण अज्ञान अगर भोळेपणा एवढेच असते तर एवढेच आश्चर्य नव्हते. कित्येकदा त्या उघड्या डोळ्यांनीच अस्सल टाकून कमअस्सल पत्करतात.

त्यागबुद्धी, दुसऱ्याकरिता जीवित धोक्यात घालणे, या बाबतीत स्त्रिया पुरुषाला कधीच हार जाणार नाहीत आणि त्यागापेक्षा मोठा गुण कोणता असू शकेल? पण हा त्याग त्या योग्य कार्यात अथवा योग्य व्यक्तीकरिताच करतील असा मात्र नियम नाही! मला वाटते, अशा अनुभवावरूनच कोणा एका कवीने—

"O woman! thou hast made heaven too cheap!" असे म्हटले असावे!

त्यांच्या अभिज्ञतेत लहरीपणा आढळतो त्याला आणखीही एक कारण असू शकेल. स्त्रिया अभिनयात व मायावीपणात निष्णात असतात. (जुने शास्त्रकार तर तो त्यांचा जन्मस्वभावच मानीत असे दिसते!) कवीसमोर त्या नकळत काव्यप्रेमी बनतील, विरक्तापुढे विरक्त दिसतील, बुद्धीमंताशी बौद्धिक खेळ खेळतील! पण यांपैकी कोणतीच वृत्ती त्यांची स्वतःची नसेल! सान्निध्यात येणाऱ्या पुरुषाला आपलासा करण्याच्या तंत्राचा तो केवळ एक अंक असेल!

या दृष्टीने पाहता, स्त्रिया पुरुषाहून अधिक व्यवहारी असतात. पुरुष एकेका ध्येयापुढे, आवडीपुढे अगर नादापुढे स्वतःला व स्वहिताला विसरतो ; तर स्त्री एखाद्या ध्येयाने अगर नादाने रंगलेली दिसत असताही तिच्या जीवनातील जो प्रमुख नाद व हेतू तो ती विसरत नाही. ती आपल्या ध्येयावर वा जीवितकार्यावर प्रेम करीत आहे असा पुरुषाला भास होतो; पण ती तो नकळत अभिनय करीत असते. थोर कार्याशी वा ध्येयाशी याहून अधिक समरस होण्याची तिची पात्रताच नसते की काय कोण जाणे!

आजच्या युगात पुरुषवर्ग मानव्याला उपकारक अशा अनेक सूक्ष्म कार्यांत व्यग्र आहे. नव्या जगात प्रतिभा, कर्तृत्व आणि सहृदयता यांचे नवे नवे आविष्कार दिसत आहेत, अशा युगातही स्त्री जुनेच आकर्षणविषय

कवटाळून बसत आहे व अशा प्रकारे आपल्या नैसर्गिक सामर्थ्याचा दुरुपयोग करीत आहे. स्त्रियांत शास्त्रज्ञ आणि कवी निर्माण होत नाहीत हा माझा स्त्रियांवर आरोप नाही; तर पुरुषांत शास्त्रज्ञ आणि कवी निर्माण करण्याचे त्यांच्या अंगी असलेले सामर्थ्य त्या वाया दवडीत आहेत हा माझा त्यांच्यावर आरोप आहे. माझ्या भगिनींस आरोप कबूल आहे काय?

अर्थात्, माझ्या या आरोपासंबंधी माझ्या आधुनिक भगिनीचे प्रत्युत्तर कळण्याची मजप्रमाणेच रेडिओच्या श्रोत्यांनाही उत्सुकता असेल अशी मला खात्री आहे.

हंस (वनिताविश्व),
जून १९४६, पृ. ४९-५१.

अनुक्रमणिका

# २

## स्त्रिया आणि संस्कृती

मला वाटते जर्मन कवी गटे यानेच कुठे तरी "कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचा परमोच्च बिंदू पहावयाचा असेल तर, तो त्या समाजातील कुलस्त्रियांच्या राहणीत पहावा" अशा अर्थाचे उद्‌गार काढले आहेत. आपणांपैकी प्रत्येकजण असेच म्हणेल असे नाही; काहींना या उद्‌गाराचे थोडे नवलही वाटेल, तर काहींना एका सौंदर्यपूजक पाश्चात्य कवीने स्त्रियांची केवळ दरबारी भाषेत स्तुती केली आहे असे वाटेल. पण स्त्री म्हणजे काय आणि संस्कृती म्हणजे काय, याचा थोडा अधिक विचार केल्यास हे उद्‌गार केवळ यथार्थच नव्हेत, तर सर्वमान्य होण्यालायकही आहेत असे आढळून येईल.

संस्कृती म्हणजे काय हा प्रश्न अनेकदा विचारला जातो व प्रत्येकजण आपल्या पद्धतीने त्याचे उत्तर देतो. 'जीवनाकडे पाहण्याची विशिष्ट दृष्टी' अशी संस्कृतीची एक सुटसुटीत व्याख्या एका विद्वानाने केली आहे. प्रत्येक समाजाला कोणते तरी एक ध्येय सर्वोच्च असे वाटत असते व त्या ध्येयाला अनुसरून आपल्या राहाणीची जी मांडणी तो समाज करतो, तीच त्याची संस्कृती म्हणून ओळखली जाते व म्हणूनच 'संस्कृती' या आजकाल फारच चलनी झालेल्या शब्दात पोषाखापासून मोक्षसाधनापर्यंत सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो. पण संस्कृतीची तात्त्विक चर्चा करणारे लोकच काय ती संस्कृती बनवितात असे मात्र नव्हे. तात्त्विक चर्चा करणाऱ्या-बोलणाऱ्यांवरून पाहिले तर संस्कृती म्हणजे कधी केवळ शीलच होय असे वाटेल, तर कधी केवळ धर्मपालनच होय असे वाटेल, तर कधी तत्त्वज्ञानच होय असे वाटेल. या तिहींचा उपयोग ध्येय ठरविण्यापुरता खास आहे. परंतु चैत्रातील गौर म्हणजे ज्याप्रमाणे नुसती देवी नव्हे की नुसती पूजा नव्हे, त्याप्रमाणेच संस्कृतीचे आहे. तिजमध्ये देवीइतकेच महत्त्व तिच्या निमित्ताने केलेल्या मांडणीला उर्फ आराशीला आहे.

जेव्हा आपण संस्कृती टिकवायची म्हणतो तेव्हा, एखादी नैवेद्यही न खाणारी देवी टिकवायची असे म्हणत नसून, तिची मांडलेली आरास टिकवायची व ती आरास मांडण्यामागची हौस टिकवायची असे म्हणत असतो आणि जेव्हा संस्कृती बदलत आहे म्हणून आपण अस्वस्थ होतो तेव्हा, ती आरास विसकटत आहे म्हणून अस्वस्थ होतो.

आज आपल्या या प्राचीन समाजाची ही मांडणी बरीच विसकटलेली दिसत आहे व त्यामुळेच समाजातील विचारी लोक अस्वस्थ झालेले दिसत आहेत. उलट ही मांडणी इतकी जुनाट आणि ठरीव झालेली होती की ती मोडली तरी हरकत नाही, पण तिच्यात काही बदल झाला पाहिजे असे म्हणणारे अनेक लोक होते. संस्कृतीची देवी त्यांच्याच नवसाला पावली असावी असे क्षणभर वाटण्यासारखी स्थिती आज तरी दिसत आहे, व म्हणूनच या विसकटलेल्या संस्कृतीकडे पाहिल्यावर प्रथम समाजातील स्त्रियांचा विचार विचारवंतांच्या मनात येतो.

अलीकडे कन्हय्यालाल मुनशी यांनी हिंदू विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगी केलेल्या भाषणाच्या निमित्ताने व त्यापूर्वी त्यांच्या विद्याभवनाच्या समारंभाच्या निमित्ताने मुंबईच्या काही इंग्रजी पत्रांनी भारतीय

संस्कृती ही काही वेगळी चीज आहे काय असा प्रश्न उपस्थित केला होता. एके काळी ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पाठीशी असणाऱ्या मुंबईच्या टाइम्सने हा प्रश्न उपस्थित करून, आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनाचा आव आणला होता. प्रत्येक देशाची राहणी ही त्यांच्या भूगोलाने, इतिहासाने व त्यांच्या तात्त्विक आदर्शामुळे बदलते हे जर खरे असेल तर, "भारतीय संस्कृती ही काय चीज आहे?" हा प्रश्न पडण्याचे कारण नाही. एखाद्या देशाची भाषा वेगळी आहे म्हणून ज्याप्रमाणे आश्चर्य अगर मत्सर वाटण्याचे कारण नाही, त्याचप्रमाणे त्याची संस्कृती वेगळी आहे म्हणूनही आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सर्व संस्कृतींचे ध्येय एक आहे असे क्षणभर मानले-असे मानणे अर्थात्च अज्ञान होय —तरी, ते ध्येय गाठण्याकरिता जीवनाची मांडणी सर्वजण एकच करतील, असे मात्र नव्हे.

भारतीय संस्कृतीमध्ये 'भोग' आणि 'त्याग' यांची एक बेमालूम गुंफण आहे. केवळ संन्याशांचा समाज बनू शकत नाही; तसाच केवळ उझू शरीरपूजकांचाही समाज बनू शकत नाही. ही दोन्ही सत्ये नवीन आहेत असे नव्हे; परंतु ही तत्त्वे आरंभापासून चित्तात वागवून प्रत्येक संस्कृतीची मांडणी होतेच असे नव्हे. भोग हा मूलतः गर्ह्य नाही; पण भोगाच्याही पलीकडे काही आहे याची जाणीव मात्र सदैव हवी, अशी भारतीय संस्कृतीची बैठक आहे.

आज नव्या स्पर्धायुगामुळे, व्यापारी युगामुळे व भौतिक तत्त्वज्ञानामुळे काही माणसे केवळ भोगाकडे वळत आहेत, तर काही केवळ त्यागाकडे वळत आहेत. यंत्राने बदललेली राहणी आणि स्पर्धेने वेडावलेली मने, यांना संस्कृतीच्या मूळ बैठकीची आठवण करून देण्याला स्त्रियाही मूळ ठिकाणांवर उरल्या नाहीत-त्याही या वावटळीत सापडल्या तर काय होईल असा प्रश्न विचारवंतांपुढे पडला तर नवल नाही!

वास्तविक स्त्रिया म्हणजे कोणी अद्‌भुत प्राणी आहेत अशी स्थिती नाही. पुरुषाप्रमाणे स्त्रियांना वासना आहेत; पुरुषांप्रमाणे स्त्रियांवर बाह्य घडामोडींचे परिणाम होणे शक्य आहे. आणि तरीही हेलकावे खाणाऱ्या संस्कृतीचा स्थिरबिंदू स्त्रियांच्या राहणीत असतो ही गोष्ट खोटी नाही. कारण मूलतः त्यांच्या मनात व राहणीत भोग व त्याग यांचा मिलाफ आढळतो. केवळ ज्ञानाच्या अगर विरक्तीच्या मागे लागलेल्या पुरुषाला त्या वैयक्तिक प्रपंचाच्या मर्यादेचे स्मरण करून देतील, पण प्रपंचातील त्यांची भूमिका मात्र त्यागाची असेल. त्या विद्वान् नसतील पण शहाण्या असतील; शूर नसतील पण धीराच्या असतील; पुरुषाप्रमाणे चैन करणे त्या गर्ह्य समजतात पण वार्धक्यातही त्यांची हौस मरणार नाही. शरीरशृंगार गर्ह्य मानण्याइतक्या त्या वेदान्ती होणार नाहीत पण शालीनता विसरण्याइतके बेभान होणेही त्यांना परडवणार नाही. किंबहुना शालीनतेचा आणि लज्जेचाही उपयोग शरीरशृंगाराकरता कसा करावा हे भारतीय स्त्रियांना उत्तम कळते-निदान कळत असे!

पण हे सर्व कुलस्त्रियांचे आणि गृहिणींचे वर्णन आहे. आजही कुलस्त्रिया व गृहिणी आहेत, म्हणूनच समाज व संस्कृती अस्तित्वात आहेत. मग स्त्रीजीवनातही विसकटल्याप्रमाणे वाटत आहे ते काय? 'कुलस्त्री' ही जात अगर category आजही आहे. पण तो संस्कृतीचा स्थिरबिंदू आहे ही कल्पना मारण्याचा यत्न होत आहे. हेच दुसऱ्या भाषेत सांगावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, 'गृहिणी' कडे अगर 'कुलस्त्री' कडे आज पुढारीपण राहिले नाही. ज्या संयमयुक्त संसारोपभोगाचे सुकाणू धरून त्या एकेजागी बसलेल्या असतात त्याला आजच्या भडक युगात मानाचे स्थान मिळत नाही! निदान तशी त्यांची आपली वरवर कल्पना होते व त्यामुळे आज कुलस्त्रियांना दुसऱ्या कोणाचे तरी पुढारीपण पत्करावेसे वाटते-कुणाचे तरी अनुकरण करावेसे वाटते.

आजच्या भडक युगाचे भडक चित्र काढणारे पुढारी म्हणजे वृत्तपत्रांचे संपादक होत. जे सरळ आणि संयमित आहे त्याची 'न्यूज' उर्फ बातमी होऊ शकत नाही, हे प्रसिद्धच आहे! एखादे मूल 'धडपणे जन्माला आले', 'बाळबाळंतीण खुशाल आहेत' ही एखाद्या संसारी गृहिणीला महत्त्वाची वार्ता वाटेल. पण वृत्तपत्राला ती उपयुक्त वार्ता होण्यास त्यास तीन पाय अगर तीन डोळे असावे लागतात! निदान ते 'कायरो ते कराची' या वाटेवर विमानात जन्माला आले असे तरी कळावे लागते! वृत्तपत्रांच्या या भडक चित्रकलेत सार्वजनिक क्षेत्रात चमकणाऱ्या स्त्रिया आणि चित्रपटाच्या क्षेत्रात विख्यात झालेल्या नटी यांना महत्त्वाचे स्थान मिळते. साहित्यिकांच्या कल्पनासृष्टीतही अद्‌भुत आणि असाधारण जीवनक्रमाचीच चित्रे अधिक आढळतात! त्यामुळे संथपणे जीवनपथ आक्रमणाऱ्या-किंबहुना जीवनाची नौका उत्तान विकारांच्या वाऱ्यांच्या सपाट्यात सापडू नये म्हणून धडपणाऱ्या बिचाऱ्या गृहिणींना एक प्रकारचा 'न्यूनगंड' वाटू लागतो.

आज महाराष्ट्रीय स्त्रियांच्या जीवनातही अनेक कारणांनी बदल होत आहे. त्यातील काही आपल्या शक्तिबाहेरची आहेत तर काही आपण आपल्या हातांनी निर्माण केलेली आहेत. शिक्षणामुळे स्त्रियांच्या सुखात भर पडली की नाही हा एक प्रश्नच आहे. पण अशिक्षितपणामुळे निर्माण होणाऱ्या दु:खांपेक्षा शिक्षणामुळे उत्पन्न झालेली दुःखे पत्करावी असेच मी म्हणेन. शिक्षणामुळे स्त्रियांच्या अंगावर अधिक कामे येऊन पडली यात मात्र शंका नाही. परीक्षा पास होण्याचे अग्निदिव्य बाजारहाट करण्याची जबाबदारी शक्य तर नवऱ्याच्या कामाचा वाटा उचलणे जमाखर्च-पत्रव्यवहार वगैरे पाहणे आणि शिवाय शिक्षण वाया जाऊ नये म्हणून एखादी नोकरीही पत्करणे! आणि ही कामे वाढली म्हणून मूळची कामे कमी झाली असे मात्र नाही. निसर्गाने लावून दिलेले अपत्य-संगोपन आणि गृहरक्षण ही दोन्ही कामे आहेतच.

आजच्या बदललेल्या जीवनक्रमात स्त्रियांचाही जीवनक्रम बदलणे स्वाभाविक आहे. पण त्यांची जीवनातील भूमिका मात्र बदलण्याचे कारण नाही. आणि ती भूमिका म्हणजे भोग आणि त्याग यांची सांगड घालण्याची भूमिका होय. आजच्या या भडक युगात तर या त्यांच्या भूमिकेचे महत्त्व अधिकच आहे. काही लोक समजतात त्याप्रमाणे या नव्या यांत्रिक सुधारणेच्या युगात जर विजेचे बटन दाबताच, ताटे तयार होणार असतील आणि पाट मांडले जाणार असतील तर, स्त्रियांवरील जबाबदारी कमी न होता उलट वाढणारच आहे.

मी वर संस्कृतीची एक व्याख्या सांगितली. तशीच संस्कृतीची दुसरी एक खूण काही लोक सांगतात. 'संस्कृती' ही ज्यांना दिवसभर काम करावे लागते त्यांच्या समाजात फार विकसित होत नाही. ज्यांना 'फुरसत' सापडते तेच कला व संस्कृती यांची वाढ करू शकतात. पण त्यावरूनच असे एक गमक बसविण्यात आले आहे की, एखादा समाज आपला फुरसतीचा वेळ कसा घालवतो यावर त्यांच्या संस्कृतीची उंची मापता येते.

फुरसतीच्या वेळात जेथे ज्यांचा कोणताच लागाबांधा नाही असे अनेक लोक जमतात, आणि जेथे त्याच्याकरता वेळ घालविण्याची अनेक साधने पत्त्यांच्या डावापासून तो पेयांच्या बाटल्यापर्यंत ठेवली जातात, त्या ठिकाणास पाश्चात्य देशात 'क्लब' असे म्हणतात. सुस्थितीतील लोक वेळ घालविण्याकरिता क्लबमध्ये जातात, तर गरीब स्थितीतील लोक सिनेमागृहात अगर दारूच्या दुकानात जातात आणि आजची बकाल शहरे लक्षात घेता, बिचारे दुसरे काय करणार? स्त्रियांच्या राहणीवरून संस्कृती मापणारे विचारवंत आणि रिकामा

वेळ घालविण्याच्या साधनावरून संस्कृती मापणारे विचारवंत दोघे नकळत एकाच प्रश्नाकडे वळतात असे मला वाटते. 'सुखी आणि कर्तृत्ववान् पुरुषांच्या जीवनाला स्त्रिया मर्यादा घालू शकतात की नाही?' हाच सुसंस्कृत समाजासंबंधी विचारावयाचा मुख्य प्रश्न ठरेल, असे मला तरी वाटते. जर स्त्रिया समाजजीवनाचा मध्यबिंदू असतील तर, क्लब, सिनेमा आणि दारूचे दुकान अगर चहाचे दुकानही —यांना अवास्तव महत्त्व येणार नाही.

'संन्यासी संस्कृती' ज्याप्रमाणे स्त्रिया आहेत म्हणूनच अस्तित्वात येऊ शकत नाही, त्याचप्रमाणे 'उठवळ' संस्कृतीही कुलस्त्रियांच्या महत्त्वामुळेच अस्तित्वात येणार नाही असे मला वाटते. पण संस्कृतीच्या मांडणीमागील आपले सूत्रधारत्व टिकवावयाचे असेल तर, स्त्रियांनी आपली भूमिका समजावून घेतली पाहिजे व कोणत्याही भडक चित्रामुळे भडकून न जाता त्या भूमिकेला चिटकून राहिले पाहिजे.

विशेषतः, शहरांत तरी स्त्रियांनी संस्कृतीच्या क्षेत्रातील आपल्या या महत्त्वाच्या स्थानासंबंधी निश्चित जाणीव ठेवली नाही तर, त्या आपले पुढारीपण गमावून बसतील.

आजच्या युगात इतर अनेक मोहांहून प्रसिद्धीचा मोह हा फार बलवत्तर झालेला आहे. शहरातील स्त्रियांच्या कर्तव्यात व राहणीत बदल झाला आहे. पण दानतीत व मूळ भूमिकेत फरक झाला आहे असे मात्र मला वाटत नाही. प्रसिद्धीची हाव आणि अनुकरणाची प्रवृत्ती यामुळे पुण्यामुंबईत स्त्रियांचे जीवन बाह्यतः बदलल्यासरखे दिसत आहे. पण उलट संस्कृतीचा मध्यबिंदू या नात्याने त्यांच्यावरील जबाबदारी आजच्या या भडक काळात अधिक वाढत आहे. स्त्रियांना मिळत असलेल्या शिक्षणाचा उपयोग ही वाढती जबाबदारी पार पाडण्याकडे त्यांनी केला तर, आजच्या उठवळ संस्कृतीला आपल्या समाजात फारसा थारा मिळणार नाही.

भडक चित्रे रंगवून स्त्रियांना स्वतःच्या मूळ भूमिकेविषयी साशंक बनविणारे 'पुरोगामी' लेखक संपादकही मनातून स्त्रियांसंबंधी हीच अपेक्षा धरतात असे दिसून येते.

अत्यंत स्वैरपणे जन्म घालवणाऱ्या लॉर्ड बायरनने अंतकाली पुढील उद्गार काढल्याचे सांगतात—

"No man ever respected a virtuous woman more than I."

चिपळूण-चंद्रोदय, विशेषांक १९५०,
पृ. १०-१३.

अनुक्रमणिका

# ३

# पक्षहीन महिला परिषद

येत्या मे महिन्यात 'अखिल भारतीय महिला परिषदे'चे पंचविसावे (रौप्य महोत्सवी) अधिवेशन पुणे येथे भरणार आहे. ओळीने पंचवीस वर्षे अखिल भारतीय मार्गदर्शनाखाली भरत आलेल्या या परिषदेला प्रथमपासूनच मोठी प्रतिष्ठा व प्रसिद्धी होती. अलीकडे तिची प्रतिष्ठा अधिकाधिक वाढण्याचे कारण उघडच आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या प्रचंड आणि प्राचीन राष्ट्रातील स्त्रीजागृतीला आशियातील पुरोगामी चळवळीत महत्त्वाचे स्थान मिळणे स्वाभाविक आहे.

**महाराष्ट्रातील स्त्रीजागृतीचे कार्य**

भारतीय स्त्रीजागृतीच्या चळवळीमध्ये महाराष्ट्राचे कार्य मोठे आहे. उत्तरेकडील स्त्रियांहून दक्षिणेकडील स्त्रिया पूर्वीपासूनच अधिक स्वतंत्र व बुद्धिमान् म्हणून प्रसिद्ध आहेत. राजमाता जिजाबाई, राणी ताराबाई, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई यांसारख्या कर्तबगार महाराष्ट्रीय स्त्रियांची नावे हिंदुस्थानभर महशूर आहेत. अर्वाचीन काळातही पंडिता रमाबाईंसारख्या महाराष्ट्रीय स्त्रीचे नाव विद्वत्ता आणि धाडस या गुणांमुळे हिंदुस्थानभर गाजले होते. श्रीमती रमाबाई रानडे यांनी धिम्मेपणाने केलेले समाजकार्य पुण्यातील सुप्रसिद्ध 'सेवासदन' संस्थेच्या रूपाने आजही दिसत आहे. महाराणी चिमणाबाईसाहेब गायकवाड यांनी आपल्या विख्यात पतीच्या सहकार्याने केलेले समाजकार्यही प्रसिद्ध आहे. महिला परिषदेच्या प्रतिष्ठापनेलाही राणीसाहेबांची मातब्बर मदत झालेली आहे.

आज या परिषदेची रौप्य महोत्सव शुभसंवत्सरी पुण्यास बोलावणाऱ्या पुणेकर स्त्री-कार्यकर्त्यांना महाराष्ट्राची ही थोर परंपरा चालवावयाची आहे ; इतकेच नव्हे तर, बदललेल्या काळाला अनुसरून तिजमध्ये भर घालायची आहे. कारण इतर क्षेत्रांप्रमाणेच स्त्रीजागृतीच्या क्षेत्रानेही गेल्या काही वर्षांत मोठीच मजल मारलेली आहे. पदवीधर स्त्रियांची संख्या गेल्या वीस वर्षांत बेसुमार वाढली आहे. पुरुषांच्या बरोबरीने द्रव्यार्जनाचे व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचीही संख्या आज मोठी आहे. विविध प्रकारच्या संस्था चालविणाऱ्या स्त्रियाही आज अनेक आहेत. प्रत्यक्ष राजकारणात भाग घेणाऱ्या स्त्रियांचाही वर्ग आज निर्माण झाला आहे. या पुढारलेल्या अवस्थेत पुण्यात भरणाऱ्या महिला परिषदेचा व्याप सांभाळणे, सावरणे व योग्य वळणावर नेणे ही कामगिरी सोपी नाही. सौ. शोभनाबाई रानडे, सौ. ताराबाई साठे (रानडे), सौ. यमूताई किर्लोस्कर, सौ. रमाबाई बकली यांच्यासारख्या नव्या विचाराच्या व अनुभवी स्त्रिया हे अवघड काम उत्तम प्रकारे पार पाडण्याची आज कोशीस करीत आहेत.

**परिषदेबद्दलचे आक्षेप**

कार्यकर्त्यांच्या धावपळीबरोबरच आक्षेपकांची व कांक्षेखोरांचीही धावपळ सुरू होत असते! महिला परिषदेंच्या या गाजणाऱ्या अधिवेशनासंबंधीही तोच अनुभव आला तर नवल नाही. ही परिषद म्हणजे श्रीमंतांच्या बायकांचा एक वार्षिक सण होय, या आक्षेपापासून तो ही परिषद हळूहळू कम्युनिस्टांच्या ताब्यात जाणार येथपर्यंत दोन्ही टोकांचे आक्षेप आज ऐकू येतात.

अनुक्रमणिका

मिसेस् कझिन्ससारख्या हिंदुस्तान मायभूमी मानणाऱ्या युरोपियन विदुषीने या परिषदेची स्थापना केल्यापासून आजपर्यंत भारतीय स्त्रियांच्या स्थितीत पुष्कळच बदल झालेले आहे आणि या स्थित्यंतराच्या प्रमाणात परिषदेच्या स्वरूपातही बदल होणे अपरिहार्य आहे. तथापि, या परिषदेत स्त्रियांच्या स्थित्यंतराचे प्रतिबिंब दिसणे आणि चालू राजकीय भांडणांचे प्रतिबिंब दिसणे यांत फरक आहे. आजच्या स्त्रियांच्या, तरुणांच्या, विद्यार्थ्यांच्या-किंबहुना साहित्यिकांच्याही चळवळीत जो काही अस्वाभाविक प्रकार घडतो तो मात्र वेगळाच आहे. त्यात त्या त्या क्षेत्रातील स्थित्यंतरे प्रतिबिंबित होण्याऐवजी राजकारणातील पक्षभेदच अधिक प्रतिबिंबित होतात! आणि अखेर अशा परिषदा म्हणजे समाजाच्या वेगवेगळ्या घटकांच्या विकासाचे साधन बनण्याऐवजी राजकीय चळवळ्यांच्या हाताला हात लावणाऱ्यांच्या परिषदा बनतात.

राजकारणी लोकांनी काढलेले प्रश्न, त्यांनी योजलेले उपाय, त्यांनी ठरविलेले समाजसेवेचे मार्ग यांखेरीज समाजसेवेचे मार्गच न सुचणे हे आपल्या बौद्धिक दारिद्र्याचे लक्षण आहे. राजकीय हक्कांच्या बाबतीत पुरुषांची बरोबरी करणे, धार्मिक रूढी आणि आर्थिक हलाखी यांच्यावर इलाज म्हणून कायदे मागणे, जातीयताविरोध, युद्धविरोध यांसारख्या राजकीय घोषाणांत सूर मिसळणे वगैरे गोष्टी स्त्रियांच्या परिषदेच्या कक्षेत येत नाहीत असे नाही, पण एवढ्यावरच या परिषदा संपल्या तर, सर्वसामान्य राजकीय परिषदांच्या नकलेपलीकडे यात कार्य साधणार नाही. ज्यात कायद्यांचा व राज्ययंत्राचा संबंध येत नाही व म्हणूनच ज्यास प्रचलित राजकीय पक्षभेदाचा उपसर्ग पोहोचत नाही असा समाजसेवेचा, देशसेवेचा व राजकीय कार्यांचाही केवढा तरी मोठा भाग असतो. 'रचनात्मक कार्य' म्हणून ओरड करणारांनाही या देशात पुष्कळदा हा पक्षहीन देशसेवेचा मार्ग दिसत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सत्ताकांक्षी राजकारणाच्या क्षेत्रात रुतलेल्या पुरुषवर्गाला जी गोष्ट साधत नाही, ती सेवाधर्मी स्त्रियांना अधिक लवकर साधेल असे आम्हांला वाटते.

**ऐश्वर्य-प्रदर्शनाची हौस**

पण राजकीय पक्षभेदांत गुरफटण्याच्या आरोपाच्याही आधी, केवळ स्त्रियांवरील असा जो आरोप अशा चळवळीवर होतो त्याचा विचार केला पाहिजे. सत्ताभिलाष हा ज्याप्रमाणे पुरुषांचा निर्विवाद दोष, तसाच ऐश्वर्य-प्रदर्शनाची हौस हा स्त्रियांत आढळणारा निर्विवाद दोष होय. लग्नकार्यात ज्या ऐश्वर्याचे प्रदर्शन होते त्याचेच प्रदर्शन अशा परिषरदांत होऊ लागले तर, विहिणींच्या फणकाऱ्यांचेही दर्शन सार्वजनिक व्यासपीठावर झाल्याखेरीज राहणार नाही! पण त्याला इलाज श्रीमंतिणींवर बहिष्कार टाकणे हा खासच नव्हे! केवळ श्रीमंत स्त्रियांतच प्रदर्शनाची हौस असते ही कल्पना खरी नाही. धनसंपदेपेक्षाही रूपसंपदेच्या प्रदर्शनाचा मोह स्त्रियांत अधिक दुस्तर असतो. ही परिषद म्हणजे शालूपैठण्यांची परिषद असते, अशी टीका करणाऱ्या संपत्ति-विरोधी स्त्रिया सौंदर्यविरोधाचीही एखादी मोहीम काढणार की काय? सारांश, दिमाखाची हौस हा दोष सार्वजनिक कार्यास विघातक आहे ही गोष्ट खरी असली तरी, केवळ श्रीमंतीवर करडी नजर ठेवून तो दोष टळणार नाही. रूप, बद्धिमत्ता, विद्वत्ता, संपत्ती, सत्ता यांपैकी प्रत्येक प्रकारचे धन दिमाखाची प्रवृत्ती उत्पन्न करतेच.

पण केवळ हे ऐश्वर्यच काय ते या बाबतीत गुन्हेगार असते असे नाही. ऐश्वर्याला रिकामटेकडेपणाची, निर्बुद्धतेची आणि भावनाशून्यतेची जोड मिळाली तरच, दिमाख, पोषाखीपणा आणि निष्क्रियता यांचा प्रवेश होईल. सारांश, स्त्रियांच्या चळवळीत गोळा होणाऱ्या स्त्रिया श्रीमंत आहेत की गरीब आहेत, शालू नेसलेल्या

आहेत की साडी नेसलेल्या आहेत, वेण्या सोडून आल्या आहेत की 'बॉब्' करून आल्या आहेत यापेक्षा त्या बुद्धिमान आहेत की निर्बुद्ध आहेत, हृदयाने श्रीमंत आहेत की दरिद्री आहेत, याला अधिक महत्त्व आहे.

आज या देशात हजारो स्त्रिया सुशिक्षित व सुबुद्ध आहेत. त्यांतील शेकडो स्त्रिया या ना त्या स्वरूपात सार्वजनिक कार्याशी संबद्ध आहेत. शेकडो स्त्रियांना वैयक्तिक जीवनात व आपत्तीतच सार्वजनिक प्रश्नांचे दर्शन घडलेले आहे. अशा प्रांतोप्रांतींच्या स्त्रिया वर्षातून एकवेळ एकत्र येऊन आपले अनुभव एकमेकींना नुसते कथन करतील तरीही त्यात केवढे तरी सार्वजनिक कार्य होईल! पण आज मात्र दुर्दैवाने असे घडते की, अशा प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या विचारांची देवघेव होण्याऐवजी प्रारंभापासूनच राजकीय पक्षोपपक्षांच्या शंकाकुशंकांना आणि अडवणुकीला सुरुवात होते.

**संभाव्य उपसर्ग**

आज तरी निदान स्त्रियांच्या चळवळीला स्त्रियांच्या दोषांपेक्षा पुरूषांच्या दोषांचा उपसर्ग होण्याचा संभवच अधिक आहे. पोषाखीपणा, नटवेपणा, वैचारिक मागासलेपणा, या दुर्गुणांपेक्षाही, प्रत्येक क्षेत्रात राजकीय पक्ष आणि पुस्तकी तत्त्वज्ञान घुसडविण्याची प्रवृत्तीच आज अधिक विघातक होत असते. ज्यांना वैयक्तिक जीवनात दुःखांशी गाठ पडून सामाजिक दुःखांची जाणीव झालेली आहे, ज्यांना सभोवतालच्या समाजातील अज्ञान व दारिद्र्य पाहून कामाला बाहेर पडावे असे वाटले आहे, ज्यांना गांधीजी, ज्योतिबा फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, आण्णासाहेब कर्वे, यांच्या जीवितकार्यातून कार्याची दिशा दिसलेली आहे, ज्यांना आरोग्य आणि साक्षरता यांच्या प्रसाराच्या निमित्ताने समाजाच्या विविध थरांची साक्षात् भेट झालेली आहे अशा शेकडो स्त्रिया आज हिंदुस्थानच्या दाहीदिशांना विखुरलेल्या आहेत. राजकीय पक्षांच्या हाताला हात लावणे आणि 'रॅडिकल' (जहाल) सामाजिक तत्त्वज्ञानाची पोपटपंची जशीच्या तशी पत्करणे एवढ्यावरच अशा खऱ्या कार्यकर्त्यांचे समाधान होईलसे वाटत नाही!

आज स्त्रियांच्या चळवळीला जर कोणता मुख्य धोका असेल, तर तो म्हणजे पुरुषांच्या चळवळींचे शेपूट बनून राहण्याचा होय! 'तुम्हांला बेकारीच विशेष खुपत आहे,' 'दुहेरी नीती हेच तुमचे मुख्य दुःख आहे'; 'युद्धे नाहीशी करणे हे तुमचे पहिले काम आहे', यांसारखे अनेक मंत्र त्यांना पुरुषांच्या चळवळीतून पुरविले जातील, पण पुरुषांच्या चळवळीची नक्कल करणे हे आपले काम नसून, त्या चळवळीतील उणिवा काढून टाकून अधिक उच्च व शुद्ध भूमिकेवरून काम करणे हे आपले काम आहे ही महत्त्वाकांक्षा स्त्रियांनी ठेवणे जरूर आहे.

**स्त्रीस्वभावातील गुणांचे दोष**

या बाबतीत त्यांना गांधीजी, फुले, विवेकानंद, सिस्टर निवेदिता यांच्यासारख्या राजकारणाच्या पलीकडे पोहोचलेल्या नेत्यांचा जेवढा उपयोग होईल तेवढा राजकारणी लोकांचा होणार नाही. गांधीजींनाही मी या राजकारणातीत वर्गातच घातल्याचे पाहून कित्येक भगिनींना आश्चर्य वाटेल. तथापि, गांधीवादाचा सूक्ष्म अभ्यास केल्यास त्यांस असे दिसून येईल की, धर्म आणि समाजसेवा हाच गांधीजींच्या कार्याचा गाभा असून, राजकारण हा केवळ परिस्थितीने लादलेला तात्पुरता भाग होता. पण दुर्दैवाने स्थिती अशी झाली की, अन्यायाचा प्रतिकार करण्याऱ्या गांधीजींच्या भोवती अनुयायांची जेवढी दाटी झाली, तेवढी दाटी समाजसेवा आणि साधनशुद्धी करणाऱ्या गांधीजींच्या भोवती झाली नाही. विवेकानंद, दयानंद, राममोहनराय,

अनुक्रमणिका

लोकहितवादी, फुले यांच्यासारख्या समाजोद्धारकांसंबंधी निस्सीम आदर असूनही मी असे म्हणेन की, गांधीजींसारखा जबरदस्त समाजसेवक अर्वाचीन काळात झालेला नाही. त्यांनी राजकारणाहूनही समाजोद्धारावर भर दिला. त्यांनी समाजोद्धाराचे नवे आणि अस्सल देशी मार्ग शोधून काढले. त्यांनी बाटगी आणि पुस्तकी सामाजिक तत्त्वज्ञाने दारातदेखील उभी केली नाहीत. त्यांनी स्त्रियांतील भक्तिभावना आणि परोपकारबुद्धी अचूक ओळखून, तिचा आपल्या कार्यात उपयोग करून घेतला. इतर समाजोद्धारक स्त्रियांचा उद्धार करायला सरसावले होते, तर गांधीजी स्त्रियांच्या सात्त्विक प्रवृत्तीचा कित्ता पुढे ठेवून पुरुषांची सुधारणा करू पाहात होते. सारांश, विख्यात वंगसाहित्यिक शरदबाबू यांच्या खालोखाल जर कोणी समाज सेवक स्त्रीस्वभावातील अमोल गुणांवर लुब्ध असेल, तर ते महात्मा गांधीच होते. गांधीजींच्या राजकीय नेतृत्वाचे चीज त्यांच्या पिढीच्या राजकीय पुढाऱ्यांनी केले, पण त्यांच्या सामाजिक नेतृत्वाचे चीज करणे हे त्यांच्या कार्यानेच जागृत झालेल्या आजच्या भारतीय महिलांचे कार्य आहे.

**समाजसेवेचे रहस्य**

आजची महिला परिषद हिंदू कोड बिलाला पाठिंबा देते की नाही, मुंबई प्रांताबाहेरही एकपत्नीत्वाचा कायदा मागते की नाही, स्त्रीपुरुषांना एकच नैतिक कसोटी मागते की नाही, या गोष्टींना जितके महत्त्व आहे त्याहून, गांधीजींसारख्या असाधारण नेत्यांच्या जीवितकार्यातून आजची हिंदी स्त्री कितपत स्फूर्ती घेते हा माझ्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. निर्धन आणि अशिक्षित खेडवळांशीदेखील समरस होणे, आधुनिक जीवनातील ग्राम्य भोगलोलुपतेबद्दल घृणा बाळगणे, श्रीमंतांबद्दलही द्वेषबुद्धी न बाळगणे, पुस्तकी तत्त्वज्ञानापेक्षा प्रत्यक्ष समाजात-विशेषतः अशिक्षित समाजात मिसळून सामाजिक तत्त्वज्ञान हस्तगत करणे या गोष्टींत गांधीजींच्या समाजसेवेचे रहस्य आहे.

लेनिननेही या तत्त्वावरच भर दिलेला होता. "ज्यांना कामकरी-शेतकऱ्यांना केवळ शिकवता येते ते खरे बोल्शेव्हिक पुढारी नसून ज्यांना कामकरी-शेतकऱ्यांपासून शिकताही येते ते खरे बोल्शेव्हिक पुढारी होत, हे तत्त्व आम्हांला लेनिनने शिकविले" असे जोसेफ स्टॅलिन याने सुप्रसिद्ध स्टॅखॅनॉव्ह चळवळीतील एका परिषदेत सांगितले होते. अशिक्षित बांधवांत मिसळणे, इतकेच नव्हे तर त्यांच्यापासून चार गोष्टी शिकणे हे गांधीवादी समाजसेवकाचे लक्षण आहे. आजच्या समाजसेविका हे करू शकतील तर, त्यांना कोणत्याही पक्षाचे अगर पुढाऱ्याचे अनुयायित्व करण्याचे कारण नाही.

दुसऱ्याकरिता जगणे ही स्त्रियांना अगदी सहज गोष्ट आहे. केवळ त्यांनी आपल्या आत्मनिरपेक्षतेचे क्षेत्र स्वतःच्या कृतज्ञ भाईबंदांपुरते मर्यादित न ठेवता विशाल समाजापर्यंत वाढविले पाहिजे आणि ही एकच गोष्ट आमच्या स्त्रिया गांधीजींपासून शिकल्या असतील तर, त्या इतर कोणत्याही पक्षाच्या अगर व्यक्तींच्या हस्तावलंबनाखेरीज स्त्रियांची संघटना करू शकतील.

रविवारची लोकसत्ता
(सुखसंवाद, वर्ष ४, क्र. २३)
५ एप्रिल १९५३, पृ. (? )

अनुक्रमणिका

# ४

## आजच्या स्त्रीशिक्षणाची दिशा

एके काळी महाराष्ट्रात व अखिल हिंदुस्थानात स्त्रियांच्या शिक्षणाला विरोध होता. तो आज पूर्णपणे नाहीसा होऊन स्त्रियांच्या शिक्षणाला कुठलाही अटकाव राहिलेला नाही. शहरांतून तर आज पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया शिक्षण घेत आहेत असे दिसून येईल आणि तरी स्त्रीशिक्षणाच्या अभिमान्यांना आज सर्वतोपरी समाधान आहे, असे म्हणता येत नाही. स्त्रीशिक्षणापासून जे फल अपेक्षित होते ते आजच्या शैक्षणिक प्रगतीत दिसून येत नाही अशीच रुखरुख दिसून येईल.

या रुखरुखीतील सर्वच रुखरुख 'स्त्रीशिक्षणा'संबंधी आहे असे मात्र नाही. एकंदर आजच्या शिक्षणाबद्दलच असमाधान आहे. आजच्या प्राथमिक, दुय्यम आणि उच्च शिक्षणाची आखणी प्रायः इंग्रजी अंमलाच्या प्रथमार्धातच होऊन गेली. इंग्रजी अंमलातील शिक्षणाचा प्रमुख हेतू केवळ चांगले कारकून तयार करण्याचा होता हे म्हणणे जरी थोडे अतिरेकी आणि कृतघ्नपणाचे असले तरी, त्या शिक्षणात मुळात बरेच दोष होते. पहिली गोष्ट म्हणजे ते शिक्षण राष्ट्रीय परंपरेत बसणारे व राष्ट्रीय परंपरा निर्माण करणारे नव्हते. इतकेच नव्हे तर, सामान्य बुद्धीच्या तरुण-तरुणींना तर ते अराष्ट्रीय, परकीय आणि परधर्मीय परंपरेत नेऊन दाखल करी! अध्यापनाच्या भाषेपासून ते अध्यापकाशी वागण्याच्या पद्धतीपर्यंत प्रत्येक बाबतीत आम्ही इंग्रजांची परंपरा म्हणजेच परदेशी आणि परधर्मी परंपरा उचललेली होती.

पण हा परंपरेचा भाग सोडला, तरी आधुनिक इंग्रजी शिक्षणाचा सामान्य उद्देश स्त्री-पुरुषांना माहीतगार व कार्यक्षम करणे एवढाच असतो असे दिसून येईल. जेव्हा आपण आजच्या शिक्षणाविषयी तक्रार करतो तेव्हा, हे मर्यादित ध्येय गाठण्यातही ते शिक्षण कुचकामी ठरत आहे हा त्याचा अर्थ असतो. उदाहरणार्थ, बारा वर्षे इंग्रजी शिकून दोन वाक्येही सफाईदारपणे लिहिता वा बोलता न येणे, सोळा वर्षे स्वभाषा शिकून दोन ओळीही शुद्ध लिहिता न येणे, इत्यादी.

परंतु खरा हेतू चांगले कारकून तयार करणे हा नव्हे. आधुनिक जगात अपरिहार्यत्वाने लागणारे तांत्रिक ज्ञान देणे हा तर शिक्षणाचा हेतू आहेच; पण त्याबरोबरच व्यक्तीच्या अंगी मूळचा असलेला उत्साह, जोम व स्वाभिमान वाढविणे-निदान टिकविणे-हे शिक्षणाचे कार्य आहे. व्याकरण, गणित, इतिहास, पदार्थविज्ञान यांसारख्या विषयांचे ज्ञान प्राथमिक व दुय्यम शिक्षण संपवलेल्या मुलामुलींना समाधानकारक असते की नाही, हा प्रश्न आपण तूर्त बाजूला ठेवू ; पण ज्याला या विषयाचे बऱ्यापैकी ज्ञान आहे, पण या ज्ञानाने 'सुशिक्षित', केवळ 'शिक्षित', अथवा केवळ 'परीक्षोत्तीर्ण' झालेला विद्यार्थी हताश आणि संशयात्मा झालेला आहे असे दिसून येत असेल तर, आपण त्याची ती उमेदीची बारा वर्षे सत्कारणी लागली असे म्हणू शकतो काय?

हा प्रश्न मुलांच्या बाबतीत तर महत्त्वाचा आहेच, पण मुलींच्या बाबतीत त्याहून अधिक महत्त्वाचा आहे. याची कारणे दोन : पहिले असे की, मुलींच्या शैक्षणिक आयुष्यात वाया घालविण्याला मुलांच्या इतकी वर्षेच उपलब्ध नाहीत आणि दुसरे असे की, जीवितावर श्रद्धा नसणे हे पुरुषांच्या बाबतीत नुसते अपायकारक असेल

तर, स्त्रियांच्या बाबतीत ते भयावह किंबहुना अनर्थावह आहे आणि म्हणूनच स्त्रियांच्या शिक्षणाच्या दिशेचा येथे अगदी त्रुटित विचार करीत असता मला दोनच धोक्यांकडे अंगुलिनिर्देश करायचा आहे. एक म्हणजे बहुमोल वर्षांचा अपव्यय आणि दुसरा म्हणजे बहुमोल भावनांचा अपव्यय.

आजचे पुरुषांचेही शिक्षण सध्या लागणाऱ्या कालावधीपेक्षा अल्प अवधीत संपवता येईल असे मी अनेकवार प्रतिपादले आहे. स्त्रियांनाही पुरुषांचाच अभ्यासक्रम दिल्याने त्यांच्या अमोल पूर्वायुष्यातली काही वर्षे क्षुद्र उद्योगात आणि क्षुद्र अनुकरणात खर्ची पडतात. आज उच्च शिक्षण घेतलेले तरुण पंचविशी उलटल्यावरही परीक्षा व पदव्या यांत व्यर्थ भर घालीत असतात आणि तिशी उलटेपर्यंत स्थायिक झालेले नसतात. पुरुषांच्याच कॉलेजात जाणाऱ्या, पुरुषांच्याच अभ्यासक्रमांच्या पदव्या संपादणाऱ्या स्त्रिया याच दीर्घसूत्री आणि अगतिक शर्यतीत शिरत आहेत. स्त्रियांच्या पूर्वायुष्यात वाया घालवण्याइतकी वर्षे नसतात हे मी सांगायला हवे असे नाही. पुरुषांच्याच नोकऱ्या पटकावणे हे स्त्रियांना अशक्य नाही हे आता भरपूर सिद्ध झाले आहे ; पण ते दूरदर्शीपणाचे आहे हे मात्र अद्याप सिद्ध झालेले नाही.

आज सुशिक्षित समाजात एखादी उपवर तरुणी बी.ए. झालेली नसेल तर, तिच्यात थोडे वैगुण्य आहे, असे समजण्यात येते. म्हणजे केवळ 'वैगुण्य नाही' एवढे ठरविण्याकरिता कमीत कमी सोळा वर्षे परीक्षा देत राहावे लागते. आयुष्याबद्दलचा आत्मविश्वास वाढलेला असतो असेही दिसत नाही. विवाहातील काही अडचणी कमी झालेल्या असतात, तर काही नव्याने निर्माण झालेल्या असतात. विवाहोत्तर आयुष्याला उपयोगी अशा चार-दोन गोष्टी मिळवल्या असल्या तर त्याच्या दुप्पट गोष्टी गमावलेल्या असतात. समाधान एकच असते आणि तेही 'अकरणात्मक' असते. 'मी इतर मुलींच्यापेक्षा शिक्षणात (म्हणजे परीक्षांच्या याद्यात! ) मागे नाही!' एवढे समाधान मिळवता मिळवता बहुशः संसार, आरोग्य आणि मनाची उभारी यांचा खेळखंडोबा झालेला असतो. विवाह आणि पहिले अपत्य यांना अयोग्य विलंब झालेला असतो. विवाहानंतर प्रकृतीने मुली 'सुधारतात', या नियमाचा आज व्यत्यास झालेला आढळतो. प्रत्यक्ष संसारातल्या धकाधकीत पडल्यावर त्यांना असे आढळून येते की, आपल्याजवळ जुन्या कमी शिकलेल्या स्त्रियांइतका उत्साहही नाही-सोशिकपणाही नाही! आणि तरीही ज्यांना ज्यांना म्हणून शक्य आहे त्या मुली बी.ए., बी.एससी. किंवा अन्य पदव्यांचे शिक्षण घेण्याची धडपड करीतच असतात. ती संधी मिळाली नाही तर, स्वतःला अभागी समजतच असतात. पुरुषही बी.ए. नसलेली बायको पत्करणे कमीपणाचे समजत या आंधळ्या शर्यतीला वेग देत असतात!

मागच्या दोन-तीन पिढ्यांत जे स्वतःला सुधारक म्हणवीत त्यांच्यापुढे शिक्षणाचा खरा, स्वतंत्र बुद्धीचा काही कार्यक्रम नसून ते आपल्या स्त्रियांना केवळ इंग्रजसदृश करण्याच्या धडपडीत व्यग्र होते, असा आरोप विख्यात समाजशास्त्रज्ञ ज्ञानकोशकार केतकर यांनी केला आहे. आजच्या स्त्रीशिक्षणाचे उद्दिष्ट 'स्त्रियांना पुरुषसदृश करणे हे आहे' असे मी म्हणेन आणि या उद्दिष्टात व्यक्तिशः कित्येक स्त्रियांचे तर नुकसान आहेच, पण एकंदर समाजाचे नुकसान त्याहून अधिक आहे. प्रथम स्त्रियांना बुद्धिमत्तेत, कर्तृत्वात आणि पराक्रमात जात्याच कनिष्ठ मानायचे, आणि मग त्यांनी या सर्व क्षेत्रांत चमक दाखवताच नवा शोध लागल्याप्रमाणे चकित व्हायचे हा सामुदायिक बावळटपणा, मला वाटते, आता भरपूर झाला! आता तो थांबवायला हरकत नाही. फार दूर न जाता केवळ आपण मराठेशाहीचा इतिहास पाहिला, तरी राज्यकारभार, लढाया, आरमारी युद्ध यांपैकी कुठलीही जबाबदारी वेळ पडल्यास स्त्रियांनी तडफेने पार पाडली आहे असे दिसेल आणि ज्या जुन्या समाजाला

आपण सनातनी म्हणतो त्यानेही या जबाबदाऱ्या योग्य वेळी स्त्रियांवर निःशंकपणे सोपवल्या आहेत ; पण माझ्या या ऐतिहासिक उल्लेखात 'वेळ पडल्यास', 'योग्य वेळी' या शब्दांना महत्त्व अधिक आहे हे मुद्दाम सांगितले पाहिजे. अकारण केवळ बरोबरी सिद्ध करण्याकरिता जुन्या काळी स्त्रिया पुरुषांच्या उद्योगात पडत नसत ; पण असे असून इंग्रजी शिक्षणाचा प्रसार होऊ लागल्यानंतरच्या दोन-तीन पिढ्यांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीला आणण्यात एक प्रकारचे कौतुक, एक प्रकारचे 'रोमँटिक इंटरेस्ट' आमच्या काही समाजसुधारकांना वाटू लागले. आज या स्त्रीपुरुष स्पर्धेतला कौतुकाचा आणि रोमान्सचा भागही संपून गेला आहे. पुरुषांच्या जीवनातला रखरखीत काबाडकष्टी भाग आज पुष्कळ स्त्रियांच्या वाट्याला येऊ लागला आहे आणि सुशिक्षित, स्वावलंबी स्त्रीच्या वाट्याला आज कौतुकाऐवजी कीव येऊ लागली आहे आणि म्हणूनच स्त्रीशिक्षणाच्या ध्येयासंबंधी फेरविचार करण्याची आज वेळ आली आहे.

आज स्त्रियांना शिक्षण देताना दोन गोष्टींचा विचार करायला हवा. आजच्या सुधारलेल्या, संघटित, गुंतागुंतीच्या जीवनाला जेवढे वाङ्मयीन, शास्त्रीय आणि तांत्रिक ज्ञान प्रत्येक समाजघटकाला हवे, तेवढे स्त्रीलाही मिळायला हवे. नाही तर ती प्रवास, पत्रव्यव्हार, कौटुंबिक व्यवहार यांतही परावलंबी होईल. त्याचप्रमाणे आपत्काळी स्वतःचे सर्व व्यवहार स्वतः पाहाणे-वेळप्रसंगी थोडेफार द्रव्यार्जनही करणे इतपत शिक्षण प्रत्येक स्त्रीला आज आवश्यक आहे. पण ही साधने जवळ आहेत एवढ्याचकरिता त्यांचा उपयोग करणे, शिक्षणाचा उपयोग करायला दैनंदिन जीवनात संधी नसली की लगेच नाउमेद होणे, ही मनोवृत्ती मात्र अयोग्य आहे. आज जी अशी वृत्ती उत्पन्न झाली आहे, ती स्त्रीशिक्षणासंबंधीच्या भ्रांत कल्पनांमुळे, अर्थात् काही उथळ, अनुकरणप्रिय समाजसुधारकांनी पिकवलेल्या कल्पनांमुळे उत्पन्न झाली आहे.

स्त्रियांना पुरुषांच्याच उद्योगात प्रविष्ट करणे हा सामाजिक अपव्यय होय. स्त्रियांचा सामाजिक उपयोग गुप्त धनासारखा, गुप्त मंत्रासारखा आणि राखीव सैन्यासारखा व्हायला हवा. जो आपल्या गुप्त धनाची जाहिरात करतो, जो आपले राखीव सैन्य पहिल्याच चकमकीत तोंडाशी देतो, तो व्यवहारदृष्ट्या उतावीळ आणि अदूरदर्शी. आजच्या समाजात हा उतावीळपणा व अदूरदर्शीपणा चालला आहे की नाही, हे पाहण्याची वेळ आली आहे. उपजीविकेच्या स्पर्धेत स्त्रियांना अकारण फेकल्यामुळे वेळप्रसंगी पुरुषांना धीर आणि कुमक द्यायला कोणी उरत नाही, हा तर एक तोटा आहेच ; परंतु स्पर्धेच्या क्षेत्रापासून, व्यवहारी जगताच्या बेमुर्वत नजरेपासून स्त्रिया दूर असल्या तर त्यांच्या अंगी जे तेज संचित होते, ते त्या सदैव चवाठ्यावर वावरल्याने उधळून जाते, हा आणखी एक तोटा आहे. स्त्रियांच्या लज्जेत आणि भीड-मर्यादेत बाह्यतः दौर्बल्य दिसत असले तरी, प्रसंगी त्या मर्यादशील जीवितातूनच तेजाचा प्रत्यय आणि पुरवठा होतो. व्यवहारात फार तोंड न घालणाऱ्या स्त्रीने नाजूक प्रसंगी दिलेल्या सूचक मसलतीचा मनावर जो परिणाम होईल, तो वेळी-अवेळीं वादविवाद करणाऱ्या स्त्रीच्या अस्खलित भाषणाचा तरी होईल की नाही याची मला शंकाच आहे ; पण हे स्फूर्तिदायी संचित बल स्त्रियांच्या अंगी येण्याकरिता स्त्रिया पुरुषाहून वेगळ्या आणि दूर असणे जरूर आहे असे मला वाटते.

आज स्त्रियांचा उपयोग सामाजिकदृष्ट्या आणि मानसशास्त्रदृष्ट्या आपण उधळेपणाने करीत आहोत. 'आपण' हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे. कारण उतावळ्या पुरुषांच्या भरीला पडून स्त्रियाही आज स्वतःच्या सामर्थ्याचा दुरुपयोग करीत आहेत. स्त्रियांनी 'रक्षित जीविकाक्रम' (sheltered existence) स्वीकारणे हे स्त्रियांच्याही हिताचे आहे, पुरुषांच्याही हिताचे आहे आणि मुलांच्या हिताचे तर आहेच आहे. भीड,

संयम, आडपडदा यांत स्त्रियांचे केवळ रक्षण आणि आच्छादन आहे असे नव्हे, तर त्यांचे 'तप' देखील आहे आणि या तपाचा उपयोग संपूर्ण समाजाला आणि मानवजातीला आहे. "इतिहासकालीन स्त्रिया बाहेरच्या जगात वावरत नसून वेळप्रसंगी पराक्रम करीत" असे म्हणणे माझ्या दृष्टीने अवास्तव आहे. मी म्हणेन, "त्या अकारण बाहेर उधळत नसत, म्हणूनच प्रसंगी अतर्क्य कतृत्व दाखवीत."

याचा अर्थ स्त्रियांनी अडाणी, दलित आणि दुर्बल राहावे असा खासच नव्हे. आधुनिक जगाचे गुंतागुंतीचे व्यवहार जाणण्याइतपत शिक्षण त्यास जरूर हवे; परंतु प्रत्येकीने पुरुषांचे व्यवसाय करण्याइतके शिक्षण संपादन करण्यात काळाचा आणि बळाचा अपव्यय करू नये एवढेच. तसेच 'आपण पुरुषांहून कमी नाही' हे दाखविण्यातही त्यांनी बळाचा अपव्यय करू नये! किंबहुना 'आपण पुरुषांहून दुर्बल आहो', 'बाह्य जगताला आपण पुऱ्या पडणार नाही', असा जुन्या स्त्रियांप्रमाणे बहाणा करणे त्यांना अनेक दृष्टीने फायद्याचे होईल!

माझी वरील विचारसरणी मान्य असेल तर, स्त्रियांकरिता वेगळ्या आटोपशीर (condensed) अभ्यासक्रमांची आणि अर्थात् वेगळ्या शाळांचीही गरज आहे. माझी वरील विचारसरणी मान्य असेल तर, पुरुषांशी समानता दाखविण्याकरिता स्त्रियांपुढे आज जे अनेक उद्योग ठेवण्यात येत आहेत त्यांचा मोह स्त्रियांनी स्वसंरक्षणार्थ निग्रहपूर्वक टाळला पाहिजे. स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रातील आजच्या अभ्यासक्रमातही बदल झाला पाहिजे आणि मनोरचनेचाही बदल झाला पाहिजे. आणि त्याकरिता आजची बहिर्मुख अनुकरणप्रधान विचारसरणी सोडणे प्रथम अगत्याचे आहे.

जीवनशिक्षण,<br>डिसेंबर १९६०, पृ. २६८-२७१.

अनुक्रमणिका

## ५

# स्त्रीविषयक आदर्श-जुना आणि नवा

जुना काळ म्हणजे स्त्रियांच्या पारतंत्र्याचा काळ आणि नवा काळ म्हणजे स्त्री-स्वातंत्र्याचा काळ अशी एक समजूत आहे, आणि ती स्थूलमानाने खरी आहे. आज पाश्चात्य देशांत आणि त्यांच्या अनुकरणाने सर्वच देशांत स्त्रीशिक्षण आणि स्त्री-स्वातंत्र्य या गोष्टी निरपवाद आदर्श म्हणून पत्करण्यात आल्या आहेत. आधुनिक म्हणविल्या जाणाऱ्या या सर्व देशांत स्त्रिया खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाल्या आहेत असे जरी म्हणता आले नाही, तरी जुन्या काळातील स्त्रियांच्या मानाने त्यांना पुष्कळच स्वातंत्र्य आहे.

हे स्वातंत्र्यदेखील अर्थात् सापेक्ष आहे. कारण खऱ्या अर्थाने पुरुष तरी कुठे स्वतंत्र आहे? तोही पोटाचा गुलाम असतो. 'अर्थस्य पुरुषो दासः' या वचनाचाही एक अर्थ हाच आहे. तथापि, द्रव्याचे दास्य, रुढीचे दास्य, एकंदर भौतिक परिस्थितीची ताबेदारी ही स्त्री आणि पुरुष यांना साधारण म्हटली तर, स्त्रीच्या वाट्याला आणखी काही दास्ये किंवा ताबेदाऱ्या जुन्या काळात होत्या हा स्त्री-दास्याचा एक अर्थ होतो.

स्त्रिया पुरुषांइतक्या स्वतंत्र्य नव्हत्या याचा अर्थ त्यांच्यावर पुरुषांनीच गुलामगिरी लादली होती, असाही केला जातो. हा अर्थ अंशतः खरा असला तरी सर्वथा खरा नाही. स्त्रियांच्या पारतंत्र्याचे मूळ त्यांच्या आर्थिक पारतंत्र्यात आहे. हे आर्थिक पारतंत्र्य काही दृष्टींनी क्रमप्राप्त आहे आणि म्हणूनच ते प्रायः चारी खंडांत दिसून येते. पण या आर्थिक पारतंत्र्याचेही मूळ त्यांच्या मातृत्वाच्या जबाबदारीत आहे. गर्भावस्था आणि प्रसूतिकाल या दोन गोष्टींना स्त्रीजन्मात मर्मस्थान असल्यामुळे, जीवनार्थ कलहातून स्त्रियांना बाजूला काढणे जुन्या समाजांना अपरिहार्य वाटले. स्त्रियांच्या वेगळ्या दर्जाचे मूळ या अपरिहार्यतेत आहे. त्यांना लागू होणाऱ्या वेगळ्या (विवाहविषयक) नीतीचेही मूळ यातच आहे. स्त्रियांच्या जुन्या दर्जाचे मूळ त्यांच्या या मातृत्वरूप मर्मस्थानात आहे हे जरी खरे असले तरी, त्यांच्या जुन्या पारतंत्र्यांची सर्वच मुळे त्यांच्या 'मातृत्वा'त सापडतात असे म्हणणे चूक होईल. इसापनीतीतील घोड्याने स्व-रक्षणार्थ पाठीवर बसविलेला माणूस, त्याच्या पाठीवर कायमचा स्वार होणे हे जितपत वाजवी, तितपतच अपत्यजनन आणि अपत्यसंगोपन यांच्या निमित्ताने 'गृहिणी' बनलेल्या स्त्रीवर पुरुषाने सर्वच बाबतींत हुकूमत गाजविणे हेही वाजवी! पण या स्वामित्वाचे मूळ मात्र केवळ पुरुषाच्या अरेरावीत नसून स्त्रीच्या मातृत्वातही आहे. उलटपक्षी या गृहबद्ध अबलेचादेखील पुरुष स्वखुषीने दास बनतो असेही अनुभवाला येते.

आजच्या सुधारलेल्या काळात द्रव्यार्जन, गृहसेवा, अपत्य-संगोपन इत्यादी बाबतींत स्त्री पूर्वीइतकी बद्ध राहिलेली नाही ही गोष्ट उघड आहे. गृहसेवेकरिता तिने पूर्वीपेक्षा कमी वेळ दिला तरी आज चालते. द्रव्यार्जनाचे क्षेत्र आज पूर्वीपेक्षा कमी धोक्याचे आणि कमी धकाधकीचे असल्याने स्त्रिया पुरुषांचे बहुतेक सर्व व्यवसाय करू शकतात, असे दिसून येते. अपत्य-संगोपनाच्या कामात आजच्या स्त्रीचा जुन्या स्त्रीहूनही अधिक वेळ जात आहे हे खरे; (कारण शहरी राहणीमुळे आणि विभक्त कुटुंबामुळे या महत्त्वाच्या कामात तिला मदत करणारा, नवऱ्याखेरीज कोणीच नातेवाईक उरलेला नाही.) तथापि, नव्या राहणीमुळेच अपत्यांची संख्या मर्यादित करणेही आजच्या कुटुंबांना अधिक शक्य झालेले आहे. सारांश, आजच्या काळात स्त्रीने नोकरी,

समाजसेवा, नाट्यसेवा, इत्यादी उद्योग केले तरी चालण्यासारखे आहेत. नव्हे, गृहकर्माव्यतिरिक्त इतर उद्योग हाती घेणे आज तिला काही दृष्टींनी अपरिहार्य झाले आहे.

तथापि, आजचे यंत्रयुग सुरू होईपर्यंत स्त्री नाइलाजाने घरी बसत होती व तिच्या या स्थानबद्धतेमुळे तिचे आणि समाजाचे केवळ नुकसानच होते असे गृहीत धरण्यात आपले काही चुकत आहे की काय, हे पाहिले पाहिजे. उपयुक्तता आणि सामर्थ्य यांच्यासंबंधीच्या आजच्या विज्ञानयुगातील कल्पनाच कदाचित् चुकीच्या असणे शक्य आहे. वस्तुतः विज्ञानयुगात मूलतः काही दोष नाही. कारण विज्ञान हेही एका भूमिकेवरील ज्ञानच आहे. ते अंतिम ज्ञान नसेल, ते एकमेव ज्ञान तर नाहीच; तथापि कोणत्याही पातळीतले असले तरी, ज्ञान हे उपयुक्तही आहे आणि पवित्रही आहे. पण विज्ञान हेही ज्ञानच असले तरी, त्या ज्ञानाचा विज्ञान युगात होणारा विनियोग सर्वस्वी ज्ञानयुक्त अथवा शहाणपणाचा असेल असे मात्र नाही. भौतिक सृष्टीचे कायदे शोधणे वा शिकणे हे ज्ञानातच मोडत असले तरी, 'भौतिक जीवनापलीकडे काही नाही' असे मानणे हे विज्ञानही नव्हे आणि अध्यात्मही नव्हे. तसेच, जड सृष्टीचे कायदे माहीत करून घेणे वेगळे आणि त्यांचा उपयोग वस्तूच्या उत्पादनाकरता करणे वेगळे. हेच अधिक तात्त्विक भाषेत सांगायचे झाले तर, विज्ञान वेगळे आणि technology वेगळी. विज्ञान हे अध्यात्मज्ञानाइतके श्रेष्ठ नसेल, पण तरी ते ज्ञानही आहे आणि श्रेष्ठही आहे. उलट तांत्रिक ज्ञान अथवा technology ही एक प्रकारची करामत किंवा craft आहे, ते ज्ञान नव्हे, श्रेष्ठ ज्ञान तर नव्हेच नव्हे. अणूचे घटक शोधून काढणे हे ज्ञान आहे; पण त्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करणे-मग तो उपयोग गजबजलेले जपानी शहर मारण्याकरता असो की अणुशक्तीने जहाजे चालवून मक्केची यात्रा सुलभ करण्याकरता असो,-हे ज्ञान नव्हे तर करामत आहे.

आजच्या विज्ञानयुगात अध्यात्मापेक्षा विज्ञानाला महत्त्व आले आणि विज्ञानापेक्षा त्यांच्या व्यावहारिक विनियोगाला महत्त्व आले. जेथे ज्ञानाचीच अशी 'अवगणना' अथवा मिथ्या गणना झाली, तेथे मूल्यांचे सर्वच गणित चुकल्यास नवल काय? "ज्ञानाचे ध्येय उत्पादन; उत्पादनाचे ध्येय वस्तूचा आस्वाद घेणे नव्हे, तर व्यापार करणे; सामर्थ्य स्तब्धतेत नसून धडपडीत आणि गोंगाटातच आहे; सुख हे शांततेत व निःशब्दतेत नसून धावपळीत आहे!" ही विज्ञानयुगाची 'मूल्यपरंपरा' होय असे म्हणता येईल. 'सूक्ष्मापेक्षा स्थूल श्रेष्ठ', 'स्तब्धतेपेक्षा गतिमानता श्रेष्ठ'- अर्थात् 'अव्यक्ता' पेक्षा 'व्यक्त' श्रेष्ठ, अशी ही विचारसरणी आहे! या विचारसरणीचा परिणाम जशा इतर क्षेत्रांत झाला तसा तो मानवाच्या मापनातही झाला. क्रियाप्रवण बहिर्मुख, संकोचहीन व आक्रमक मनुष्य हा अधिक निकोप मानला जाऊ लागला. शांत, अंतर्मुख, संकोची आणि नमते घेणारा मनुष्य रोगट आणि न्यूनतायुक्त मानला जाऊ लागला. स्त्रियांसंबंधीच्या अपेक्षांत व आदर्शातही या स्थूल जडवादी मूल्यांचा परिणाम झाल्याखेरीज कसा राहील?

स्त्रीचे शारीरिक वा मानसिक सामर्थ्य हे सुप्त आणि अप्रत्यक्ष असावे अशी जुन्या युगाची अपेक्षा असे. तिच्या अंगी सौंदर्य, उत्साह, विलासप्रियता आणि शौर्य हे सर्व विशेष असतात. परंतु या सर्वांचा उपयोग तिने फार संयमाने आणि संकोचाने करावा अशी तिच्या जुन्या चाहत्यांची आणि भक्तांची अपेक्षा असे. सौंदर्याचा उपयोग कलात्मक संयमाने करणे यालाच मी स्त्रियांची लज्जा असे समजतो. स्त्रीसौंदर्याला हुकमी उठाव देणारा कोणता मानसिक गुण असेल तर तो म्हणजे लज्जा. इतकेच काय? ज्या स्त्रीला सौंदर्य लाभले नसेल तिनेदेखील हा मानसिक दागिना चढविला की तिला अल्पशी का होईना आकर्षकता प्राप्त होते. वीररसाचा स्थायीभाव जो

अनुक्रमणिका

उत्साह, तो स्त्रियांच्या अंगी पुरुषांहूनही अधिक असतो, हे आपल्या शास्त्रकारांनी ओळखले आहे की नाही कोण जाणे; परंतु स्त्रीद्वेष्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शोपेनहौरने मात्र ते पुरते ओळखलेले दिसते. तो स्त्रियांना सुंदर गणायला तितकासा राजी नाही; पण त्यांच्या उत्साहाचे आणि उल्हासाचे मात्र तो वर्णन करतो. (They are known for their high spirits.) पण हा उत्साह त्यांनी पुरुषांच्या स्थूल आणि रानवट पद्धतीने व्यक्त करावा हे म्हणणे मात्र वेडेपणाचे होईल. घरामधील ठराविक आणि मामुली कर्तव्येच त्या जणू धार्मिक निष्ठेने पार पाडतील. वाघाच्या अंगावर धावून जाणारा पुरुष, स्वतःचे किंवा मुलांचे दुखणे अपेक्षेपेक्षा अधिक लांबले तर गांगरून जातो. पण या चिंतेच्या आणि कंटाळवाण्या काळात स्त्रीचा उत्साह तिला कधीच दगा देत नाही. तसेच स्त्री ही पुरुषापेक्षा विलासप्रिय आहे, हे आमच्या प्राचीनांनी ओळखले होते. पण म्हणून तिने आधुनिक स्त्रीप्रमाणे exhibitionist व्हावे अशी प्राचीनांची अपेक्षा नव्हती. लज्जेच्या आणि निषेधाच्या पडद्यातच तिची विलासप्रियता अधिक प्रभावी ठरत असे. ज्याला प्रत्यक्ष लढाऊ आणि आक्रमक शौर्य म्हणतात, तेही प्राचीन स्त्रीच्या ठिकाणी अपेक्षित नसेल असे नव्हे. पण तेही ती संयमात आणि काबूत ठेवी. पुरुष हा केव्हाही लढण्याला उत्सुक असे, तर स्त्री सामान्यतः प्रथम भीतीचे प्रदर्शन करी; आणि आणीबाणीच्या प्रसंगीच काय ती अचाट साहस करून दाखवी. म्हणजे विलासप्रियतेप्रमाणेच तिचे शौर्यदेखील सामान्यतः सुप्त असे.

स्त्रीने आपल्या प्रत्येक शक्तीचा उपयोग संयमाने, संकोचाने, आढेवेढे घेत आणि चातुर्याने करावा अशी जुन्या जगाची अपेक्षा असे. या अपेक्षेत बाह्यतः दास्य आणि अंतःपुर यांचे वातावरण दिसले तरी, ते वातावरण निर्भेळपणे दोषास्पदच होते, ही पुरोगामी मंडळींची कल्पना तपासून पाहिली पाहिजे. जो वर्ग नेहमी चवाठ्यावर दिसेल तोच स्वतंत्र आणि श्रेष्ठ, जो अंतर्गृहात असेल तो परतंत्र आणि कनिष्ठ होय, हा नियम निरपवाद नाही. घरातील महत्त्वाचा भाग उघड्यावर ठेवणे ही आधुनिक शहरी घरांची पद्धत म्हटली, तर उघड्यावर फक्त देवडी व देवडीवाले ठेवणे आणि बैठकीची जागा थोडी आत ठेवणे; -स्त्रियांच्या बैठकीची जागा त्याहून आत ठेवणे ही जुन्या वाड्यांतली पद्धत म्हणता येईल. यात स्त्रियांचे पारतंत्र्यही होते आणि माहात्म्यही होते. स्त्रियांचा गोषाही होता आणि स्त्रियांचे रक्षणही होते. पण या गोषाचे कारण 'स्त्रिया दुर्बल आहेत' एवढेच केवळ नव्हते. स्त्रियांचा प्रभाव हा अप्रत्यक्षपणातच अधिक खुलतो आणि चढतो हे एक कलातत्त्व या सर्व समाजव्यवस्थेत सूचित होते. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' म्हणजे स्त्रीला स्वातंत्र्य दिल्यास ती अविचार करील असा अर्थ क्वचित् का होईना मनात येत नसेल असे नव्हे, परंतु या वचनाच्या मागेपुढे उल्लेख रक्षणव्यवस्थेचा आहे—नियंत्रणाचा किंवा पहारा करण्याचा नाही हे लक्षात घेतले पाहिजे. (पिता रक्षति कौमार्ये... इ.). हा संदर्भ लक्षात घेतल्यास स्त्रीच्या निवांत जीवनक्रमाची (sheltered existence) ही व्यवस्था आहे हे लक्षात येईल. आणि या सुरक्षणात मनूने कदाचित् केवळ त्यांचे शारीरिक दौर्बल्य लक्षात घेतले असेल. पण वेगवेगळया कालखंडांतील समाजधुरिणांनी स्त्रियांचे सौंदर्य आणि आदरणीयत्व लक्षात घेऊनही या सुरक्षणव्यवस्थेचे माहात्म्य वाढविले. पण पुरुषांनी मनात काय योजले, याहीपेक्षा स्त्रीवर त्याचा परिणाम काय झाला हे लक्षात घेण्यासारखे आहे.

पडद्यात राहिलेली स्त्री तेजात, चातुर्यात आणि प्रसंगविशेषीच्या धाडसात कमी नव्हती हे इतिहासातील शेकडो उदाहरणांवरून स्पष्ट होईल. जेव्हा निर्वाणीचा प्रसंग नसे, तेव्हाही स्त्री केवळ पडद्यात किंवा स्वयंपाकघरात कुढत बसण्याचे काम करी, ही कल्पना इतिहासावरूनही तितकीशी खरी ठरत नाही, की वर्तमानकाळावरूनही खरी ठरत नाही. नित्याच्या धकाधकीत स्त्रीला आणून उभी करणे जुने पुरुष कमीपणाचे समजत, हा जुन्या अन्तर्गृहाचा एक अर्थ होय, तर दुसरा अर्थ म्हणजे सर्वच सामाजिक सामर्थ्य रोजच्या

जीवनार्थ कलहात आणून उभे करणे जुन्या पुरुषांना व्यवहारशून्यतेचे वाटे. अन्तर्गृहात बांधून राहणाऱ्या स्त्रियांचा एक उपयोग राखीव दलासारखा होई. पण त्यांच्या सौंदर्याचा, सलज्जतेचा आणि प्रेमाचा आणखी जो उपयोग असे, त्याची वाच्यता न करण्यातच शास्त्रकार आणि कर्ते पुरुष शहाणपणा समजत. तो उपयोग म्हणजे पुरुषांच्या मनात आपल्या बाह्यतः दुर्बल आणि परावलंबी राहणीने ईर्ष्या आणि अहंभाव उत्पन्न करणे हा होय. आपण केवळ अबला नव्हे, याची जाणीव जुन्या स्त्रियांना आजच्या 'अ-मितभाषी' स्त्रीहून अधिक असे. पण पुरुषाला कर्तबगार आणि जबाबदार बनविण्याकरता ती 'आम्हा बायकांना काय कळणार?', 'पुरुषांचं वेगळं पडतं' यांसारखे उद्‌गार सकाळ-संध्याकाळ तोंडातून काढून स्वतःच्या अबलापणाची जाहिरात करी. पुरुषाला ती नेहमीच निर्भय आणि शूर समजे असे नव्हे; वेळप्रसंगी त्याला हिणवून ती 'बांगड्या भरायला' ही सांगत असे, हे जुन्या बखरीच्या पानापानात पाहायला सापडेल. सारांश, ती अबला नसून 'रक्षितबला' आणि बलप्रेरका असे, असेच दिसून येईल.

स्त्रियांच्या रूपाचा आणि गुणांचा असा 'वक्र' आणि कलात्मक उपयोग करून घेणारा जमाना-मग तो हिंदुस्तानामधला असो की युरोपमधला असो-कलात्मकता आणि मानसशास्त्र या दोन्ही दृष्टींनी अधिक कुशल आणि प्रगत होता असे मला वाटते.

स्त्री ही पुरुषापेक्षा हीन आहे असे म्हणण्याचा मोह त्या काळच्या पुरुषांना होत नव्हता असे नव्हे, पण प्रत्यक्षात पुष्कळदा तिला मूर्धस्थानही दिले जाई आणि उलट, आज समानतेच्या पुकाऱ्यात तिला पुरुषसदृष बनविण्याचा मूर्ख हव्यास सुप्तपणे वावरत आहे, हे विसरता येणार नाही. जुनी स्त्री समान नव्हती, पण काही प्रसंगी ती कनिष्ठ असे, तर काही प्रसंगी श्रेष्ठ असे. मात्र ती कधीच पुरुषसदृश मानली जात नसे. आणि यातच प्राचीनांचे उपजत (instinctive) शहाणपण दिसून येते. स्त्रीमध्ये पुरुषापेक्षा वेगळ्या शक्ती आहेत व त्यांचा समाजात उपयोग करून घेण्याच्या पद्धतीही वेगळ्या आहेत, हे जुन्या समाजांनी आजच्या समाजापेक्षा अधिक चाणाक्षपणाने हेरले होते. आजच्या जगात विज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र यांची अपरंपार वाढ झाली असूनही स्त्रियांच्या सामाजिक उपयोगाबाबत अडाणीपणा वाढत आहे ही गोष्ट बाह्यतः आश्चर्यकारक वाटली तरी केवळ स्वाभाविक आहे. समाजवर्धन ही एक कला आहे, नव्हे संसार हीच एक कला आहे याची जाणीव यंत्रपूजन, वेगपूजन आणि उत्पादन यांनी नादावलेल्या आजच्या युगातून पार नाहीशी झाली आहे. जीवन म्हणजे एक 'काळ-काम-वेगाची' शर्यत असून प्रवासाचा आणि उत्पादनाचा वेग वाढवून ती जिंकता येईल अशी आजच्या वेगमूढ, यंत्रपूजक जगाची कल्पना आहे. जीवनाची शर्यत दिक् आणि काल यांचे आलोडन करून कुठे तरी आणि कोणत्या तरी तारखेला जिंकून संपवता येईल अशी खुळी कल्पना आजच्या विज्ञानपूजक जगाने घट्ट पकडून ठेवली आहे. सर्वांना समान विद्या, समान हक्क, समान वेग, समान धन, प्राप्त करून देईपर्यंत सुख आणि सुधारणा यांचे स्टेशन गाठता येणार नाही असे ठरवून 'साधनांना समानता' हे ध्येय गाठण्याची 'रेस' आज चारी खंडात चालू आहे. परंतु जीवनाची शर्यत दूर कुठे पोहचल्यावर जिंकायची नसून बसल्या जागीच जिंकायची आहे हे विज्ञानवादी मनाला समजू शकत नाही. अधिक उत्पादनाने जग अधिक सुखी आणि सुंदर व्हावयाचे नसून बसल्या जागी अधिक शांतपणे जीवनाची व्यवस्था लावल्याने ते सुंदर होत असते हे कळण्याला लागणारे मनःस्वास्थ्य आजच्या जगाला नाही. आजच्या समानतेच्या आणि शर्यतीच्या मनोगंडामुळे माणसांना द्रव्याचा, निसर्गाचा, स्त्रियांचा आणि स्वतःचाही योग्य उपयोग कोणता याचा विचार करायलाच वेळ नाही.

हा धावरेपणा केव्हा संपेल तो संपो; पण त्या युगात technology ची वाढ कमी झाल्यानेच की काय कोण जाणे! —हा हावरेपणा आणि धावरेपणा नव्हता, त्या युगात निसर्ग, स्वगृह, अपत्य, स्त्री—फार काय स्वतःच्याच नाजूक भावना यांचा जीवनसौंदर्यात उपयोग कोणता याचा विचार मानवाने अधिक केला होता. देवळांची इस्पितळे, उपवनांची उपनगरे, वाड्यांची दुकाने आणि स्त्रियांचे पुरुष बनविण्यापूर्वी जुन्या जगाच्या सांस्कृतिक मूल्यांचा विचार अधिक निर्मळ मनाने केला तर फायदा होण्याचा संभव आहे.

जुन्या मूल्यांत आणि जुन्या जगात काही दोष नव्हते असे मला म्हणावयाचे नाही. जुन्या जगात स्त्री पददलित होण्याला अधिक अवसर होता, हे कुणालाही कबूल करावे लागेल. आजच्या जगात स्त्री सुविद्य होत आहे ही गोष्ट कोणीही इष्टच मानील (जुन्या जगात विद्याहीनतेच्या बाबतीत पुरुष आणि स्त्री यांच्यामध्ये फारसे अंतर नव्हते हे मात्र विसरून चालणार नाही! ) पण याचा अर्थ असा नव्हे की, पुरुष आणि स्त्रिया दोघांचाही उपयोग एकच असे समजून शिक्षण आणि व्यवसाय यांची आखणी व्हावी! स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीचीच काय पण पुरुषांहून कित्येक बाबतींत श्रेष्ठही आहे. पण स्त्रियांना 'समान' मानणे वेगळे आणि 'सदृश' मानणे वेगळे. आजच्या समानतेच्या युगात जर मुख्य कोणती चूक होत असेल तर, ती वस्तूवस्तूंतींल आणि व्यक्तीव्यक्तींतील भेद न ओळखण्याची होय. आजच्या वेगपूजक युगात जर कोणती चूक होत असेल तर ती स्वस्थ बसून विचार करण्याचे महत्त्व न ओळखण्याची. आजचे युग घिसाडघाईचेही आहे आणि घिसाड्यांचेही आहे. अशा युगात सोन्याच्या तराजूने मापण्याच्या वस्तूंची हेळसांड आणि गल्लत झाली तर नवल काय? पण या 'गलती' ला आणि गफलतीलाच प्रगती म्हणण्याचा शहाणपणा होऊ लागला तर, प्रगतीच्या 'रेलगाडी' ची साखळी ओढून तिच्या सारथ्यांना विचार करायला लावणे हेही एक प्रगतीचे साधन आहे!

अधिक उत्पादन आणि अधिक समानता या दोन घोषवाक्यांखेरीजही काही घोषवाक्ये आजच्या जगापुढे ठेवण्यासारखी आहेत एवढे जरी आजचे विचाराग्रणी ध्यानात घेतील, तरी पुष्कळ कार्य होण्यासारखे आहे. स्त्रीला पुरुषसदृश बनवून यंत्रयुगाच्या गिरणीतील मजूर बनविणे शक्य नाही असे नाही. पण त्यात साधेल काय हा प्रश्न आहे. पुरुष जगातील रुक्षपणा आणि एकदेशीयता कमी करायची असेल तर, स्त्रियांचे जग अलिप्त आणि 'सुरक्षित' ठेवणे हाच एक मार्ग आहे. स्त्रियांचे वेगळेपण मान्य करणे म्हणजे त्यांच्यावर कमीपणा लादणे नव्हे. ईश्वरी सृष्टीतील एखाद्या बहुमोल वस्तूचे—रत्नांचे वैशिष्टय ओळखण्यात तर्कशास्त्रापेक्षा सौंदर्यदृष्टीचाच उपयोग अधिक आहे असे मला वाटते.

प्रज्ञालोक,<br>
मे १९६२, पृ. २५-३१.

अनुक्रमणिका

६

## स्त्रिया लग्न कशाला करतात?

परवा माझे एक मित्र आपल्या मुलीची विवाहविषयक मते आपल्याला कळत नाहीत, अशी तक्रार घेऊन माझ्याकडे आले. साधारणपणे 'आई-बापांच्या मताने विवाह' व 'स्वतः निवड करून केलेला विवाह' असे दोन प्रकार आजच्या परिस्थितीत आपल्या डोळ्यांसमोर येतात. पण त्या मुलीच्या कल्पनांकडे पाहता, तिचा भर स्वतःच्या निवडीवरही नव्हता. तिचे म्हणणे लग्नातील पैशाअडक्याच्या देवघेवीला आज जे प्रमुख स्थान येते त्याने सर्व काही बिघडते. याचा अर्थ मी तरी प्रथम 'तिला हुंड्याची चाल पसंत नाही' एवढाच घेतला, नव्हे 'त्यात तुमच्या मुलीने अशी कोणती नवीन कल्पना सांगितली? हुंड्याविरुद्ध तर गेली पन्नास वर्षे आपण ओरडत आहोत (अर्थात् आपण मुलाच्या लग्नाच्या वेळी हुंड्याच्या चालीविरुद्ध ओरडा करीत नाही, तो भाग वेगळा! )' असे मी माझ्या मित्राला म्हणालो.

माझी कल्पना अशी झाली की, या मुलीच्या लग्नात चांगल्या स्थळाच्या दृष्टीने जेवढा खर्च करणे अवश्य ठरेल तेवढा खर्च करण्यास माझा मित्र समर्थ नाही. पण तशी स्थिती नाही असे माझ्या मित्राकडून स्वच्छपणे सांगण्यात आले. पैशाची अडचण नाही व प्रेमविवाहासंबंधीही मुलीचा हट्ट नाही. मग नेहमीच्या पद्धतीने लग्नाची बैठक रीतसर भरवन उभयपक्षी रस्सीखेच करून सातआठ हजार रूपये खर्च केल्यास, या मुलीला एखादा बी.एस्सी. टेक., फॉरिन रिटर्न्ड किंवा एखादा आय्.ए.एस्. सहज मिळाला असता.

विवाह व स्त्रिया यांसंबंधी मी अनेक लेख व एखादे पुस्तकही लिहिलेले असून, माझ्या डोक्यात ही 'केस' शिरत नाही, हे पाहून माझा मित्र अधिकच गोंधळला व मुलीकडूनच तिचे म्हणणे मी समजावून घ्यावे असे त्याने ठरविले.

"मुलीकडच्या माणसांनी हुंडा, मानपान यांत फार खर्च करून बुडणे तुला मान्य नाही, एवढंच ना?" मी प्रारंभ केला.

"तसंच केवळ नाही" मुलीने थोड्या गंभीरपणे व थोड्या अविश्वासानेच बोलावयास सुरूवात केली. आपल्या मानसिक अडचणी (conscientious objections) यांच्या डोक्यात शिरतील की नाही व आपणांस त्या नीटपणे मांडता येतील की नाही, यासंबंधीच तिला अविश्वास वाटत होता. "ज्या लग्नांत पैशाच्या देवघेवीला महत्त्व येते ती लग्नं मला वधूच्या व वराच्या दोघांच्याही दृष्टीने अपमानास्पद-नव्हे लज्जास्पद वाटतात! पैशाच्या जोरावर खपविली जाणारी मुलगी आणि पैशाच्या लोभानं वा लाभानं स्वतःला उपलब्ध करून देणारा मुलगा, या दोघांचंही स्थान माणसांत नसून बाजारच्या मालात आहे. प्रथम विकाऊ माल म्हणून एकमेकांपुढे उभे राहून, पैसा चुकता झाल्यावर हृदयाच्या गाठी सोडण्याच्या तयारीला लागणारे वधूवर एक योगी तरी असले पाहिजेत, नाही तर पक्के बाजारी तरी असले पाहिजेत!"

'या मुलीचे स्थान बाजारात नसले, तरी पुस्तकी जगात आहे!' असे माझ्या मनात आल्याखेरीज राहिले नाही. प्रेमविवाहाची गोष्ट एक वेळ वेगळी, पण त्रयस्थांनी ठरवून होणारे विवाह देण्याघेण्याच्या बोलण्याखेरीज कसे होणार, हे मला समजेना. किंबहुना 'लग्नाचे बालणे म्हणजे देण्याघेण्याचे बोलणे' हा माझा दीर्घकालीन समज माझ्या डोक्यातून निघेना. उलट, लग्नात पैशाची बोलणी करणाऱ्या माणसाची मूल्ये विवाहसंबंधाला तनुविक्रयाच्या पातळीवर आणतात, हे आपले मत ती मुलगी संतापाने पण अडखळत अडखळत मांडीत होती.

विवाहाला बर्नार्ड शॉने 'licensed prostitution' (समाजाच्या परवान्याखाली चाललेला तनुविक्रय) हे भयंकर नाव दिले आहे ही गोष्ट, इंग्रजी वाचन बेताचेच असलेल्या त्या मुलीला माहीत नसली तरी, माझ्या मनात मात्र आल्याशिवाय राहिली नाही!

पण विवाहसंबंधावर आणखीही एका बाजूने आर्थिक व्यवहाराची छाया पडलेली आहे. मुलाला जशी चांगली नोकरी, तसे मुलीला चांगले स्थळ. ती तिची जन्माची भाकरी आहे, अशी समजूत सर्व समाजात दिसून येते. मग तो पाश्चात्य समाज असो की पौर्वात्य समाज असो, "For a woman marriage is a career."(स्त्रीच्या दृष्टीने विवाह म्हणजे चरितार्थाचे साधन वा एक मानाचा पेशा होय.) असे बर्नार्ड शॉ यानेच म्हटले आहे. पण मग व्यवसायवंत स्त्रीयांनी अथवा 'career women' नी विवाह कोणत्या भूमिकेवरून करायचा? त्यांच्या कर्तृत्वाला त्यांच्या नोकरीत वा स्वतंत्र व्यवसायात उत्तम वाव असतोच. एखादी लेडी डॉक्टर, स्त्री प्रोफेसर किंवा मुख्याध्यापिका जीवनात कर्तृत्वाचे एकमेव क्षेत्र म्हणून विवाह करीत नाही, उपजीविकेकरिता तर नाहीच नाही. अर्थात् व्यवसायवंत स्त्रियांचा विवाहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असणे शक्य आहे. जन्माची भाकरी अथवा प्रतिष्ठा मिळविण्याचे एक साधन म्हणून त्या विवाहाकडे पाहात नसतात. भाकरी, प्रतिष्ठा, मानाचे काम ही तिन्ही त्यांना आधीच लाभलेली असतात. लग्नाने स्त्रियांना (पुरुषांपेक्षा) ज्या 'जादा' गोष्टी मिळतात त्यांची अपेक्षा नसूनही ज्या स्त्रिया लग्न करतात त्यांचे विवाहच एका अर्थाने 'शुद्ध विवाह' म्हणता येतील! अर्थात् ही थोडी चमत्कारिक कल्पना मला त्या मुलीच्या विचित्र आक्षेपांचा विचार करीत असतानाच सुचली.

चांगली प्रतिष्ठेची नोकरी वा आवडती कला हस्तगत असूनही ज्या स्त्रिया विवाह करतात, त्यांचा विवाहातील हेतू कोणता? अर्थात्, सनातनी लोक असोत की आधुनिक लोक असोत, माझ्या या प्रश्नाला खासच हसतील! आणि म्हणतील—"अहो, अशा स्त्रिया लग्न कशाकरता करतात एवढेही तुम्हाला कळू नये? मुले हवी असतात म्हणून!"

या रुक्ष लोकांच्या या थोड्याशा चावट उत्तराला तितकेच चावट प्रत्युत्तर देणे अशक्य नाही; पण सौंदर्यवादी लोक व द्रव्यवादी लोक या दोघांनीही केवळ आपल्या तर्कटांनी आणि तरंगांनी स्त्रीमनाची परस्पर चिरफाड करण्यापेक्षा वस्तुस्थिती पाहणे अधिक चांगले. 'विवाहाचा हेतू प्रजा होय' हा निष्कर्ष शास्त्रकारांना मागाहून काढता येत असला तरी, मुळात स्त्री-पुरुष मुलाच्या अपेक्षेने एकमेकांकडे ओढले जात नसतात! एकमेकांच्या आकर्षणानेच ते एकत्र येतात.

या आकर्षणाचा फायदा घेऊन शास्त्रकार आणि वडीलधारी माणसे आकर्षणाच्या एंजिनाला पैसा आणि प्रतिष्ठा यांसारखे मालगाडीचे डबे जोडतात, एवढेच काय ते! 'लग्न म्हणजे जन्माची भाकरी', 'नवरा म्हणजे

जन्माचा मालक' वा 'एंप्लॉयर' या कल्पनांत 'करिअर वुमेन' ना अथवा व्यवसायवंत स्त्रियांना फारसा अर्थ वाटत नाही. याचा परिणाम म्हणजे त्यांची निवडीची दृष्टी मूलतःच बदलते. जो आपल्यापेक्षा शिक्षणाने, दर्जाने, द्रव्यार्जनाने व वयाने मोठा असेल तोच 'नवरा' होण्याला पात्र, ही कल्पना त्या गृहीत धरणार नाहीत. कोणत्याही एका गुणामुळे किंवा एकंदरीत आकर्षक स्वभावामुळे जो त्यांना जन्माच्या सहवासाला हवासा वाटेल, त्याच्याशीच अशा स्त्रिया विवाह करतील. अशा विवाहाची आपल्याकडेही काही उदाहरणे आहेत. त्यांतले प्रसिद्ध उदाहरण म्हणजे श्री. बालगंधर्व यांच्या विवाहाचे. अशा विवाहात तारुण्य, द्रव्यार्जन इत्यादी गोष्टी साफ-साफ गौण ठरविलेल्या दिसतील!

पण पाश्चात्य देशांत असे विवाह या शतकातच नव्हे, तर गेल्या शतकातही झालेले आहेत. सर्वांत आश्चर्यकारक उदाहरण म्हणजे होमिओपॅथीचा जनक प्रख्यात डॉ. हानेमान याचे. हानेमान ऐशी वर्षांचे असता, एका पस्तीस वर्षांच्या श्रीमान फ्रेंच कुमारिकेने केवळ एका विद्वान् संशोधकाच्या आयुष्यात त्याचा मददगार होण्याच्याच दृष्टीने त्याच्याशी विवाह केला. त्यानंतरची नऊ वर्षे डॉ. हानेमानच्या आयुष्यातील सर्वांत सुखाची गेली असे त्याचे चरित्रकारच आवर्जून सांगतात!

विवाह म्हणजे 'खाण्यापिण्याची आणि प्रजा होण्याची जेथे सोय आहे अशा दावणीला एक परावलंबी गाय नेऊन बांधणे' हा अर्थ प्रौढ आणि स्वावलंबी स्त्रियांच्या बाबतीत टिकत नाही, एवढेच यावरून दिसते.

आपल्याकडे अद्याप इतकी ध्येयवादी लग्ने दिसत नसली तरी, आईबापांच्या पैशांकडे पाहून होणारी लग्ने काही स्त्रियांना तरी आज हास्यास्पद वाटू लागली आहेत, हेच माझ्या मित्रकन्येच्या त्या विचित्र अटीवरून दिसून येत नाही का?

केसरी (सहज संवाद),
३० जानेवारी १९६६, पृ. ४.

अनुक्रमणिका

७

## माझ्या दृष्टिकोनातून

माझे 'बायका' हे पुस्तक अमरावतीच्या एका प्रकाशकाने प्रसिद्ध केल्याला आता चार वर्षे झाली असतील. त्यावर 'फार टीका झाली' असे मी म्हणत नाही. उलट 'कमी टीका झाली' असेच मी म्हणतो. परंतु याचा अर्थ त्यातील विचारांचे स्वागत झाले, म्हणून टीका बेताची झाली असेही मी मानीत नाही. कारण मला भेटणाऱ्या वाचकांत 'बायका' या पुस्तकावर गरम झालेले वाचकच मला अधिक भेटतात आणि त्या गरम मंडळीत स्त्रिया अधिक असतात. काही आपला राग पत्राने कळवितात, काही अमरावती-नागपूरसारख्या दूरच्या शहरांतून पुण्यास आल्यास मुद्दाम आधी पत्र लिहून माझ्याशी कडाक्याचा वाद करून आपली नाराजी माझ्यापर्यंत पोहचवितात. त्या मानाने लेख वा परीक्षण लिहून आपला विरोध जाहीर करणारांची संख्याच उलट कमी आहे!

टीकेला उत्तर देण्याची मला आवश्यकता भासली नाही. याला कारण काही नाही. 'नवसांप्रदायिकाप्रमाणे टीकेसंबंधी उद्धट दंभ' अथवा 'पोज' हे मात्र खास नव्हे. कारण मी हाडाचा प्रचारक अथवा 'मिशनरी' आहे! आणि उद्धट बनणे, -विशेषतः उद्धटपणाचे मौन!-प्रचारकाला कधीच परवडत नाही. पण माझे टीकाकार जर माझे पुस्तक-विशेषतः त्याची प्रस्तावना पुन्हा वाचतील तर, त्यांना 'आपल्या आक्षेपांना जागा नाही' असे आढळून येईल आणि तरीही आजच्यासारख्या वेगळ्या प्रसंगी वेगळ्या माध्यमातून मी 'स्त्रियासंबंधीचा माझा दृष्टिकोन' मांडला तर, त्यात काहीच नवा प्रकाश पडणार नाही असे नव्हे.

पहिली गोष्ट म्हणजे मनुष्याचा 'स्त्रीविषयक' दृष्टिकोन एक असू शकेल, आणि 'आजच्या स्त्रीसंबंधी' त्याचा दृष्टिकोन वेगळा असू शकेल, हे फारच थोड्या वाचकांनी लक्षात घेतले आहे असे मला दिसले. याला कारण कदाचित् हे असेल की, मला भेटलेले वाचक बहुधा 'पुरोगामी' जातीपैकी होते आणि या जातीइतकी मागासलेली जात माझ्या तरी पाहाण्यात नाही!

थोडक्यात व एकदम सांगायचे तर, मला स्त्रियांसंबंधी आत्यंतिक आदर आहे; पण आधुनिक स्त्रीसंबंधी मात्र तितका निर्भेळ नाही. पण एखाद्या मनुष्याने आधुनिक स्त्रियांच्या गतानुगतिक वृत्तीसंबंधी नापसंती दर्शविली की तो अखिल स्त्रीजातीचा विरोधक आहे असा समज आणि ओरडा करणे कित्येकांना सोयीचे जाते. उदाहरणार्थ, माझ्या पुस्तकाच्या मथळ्याबद्दलच पुष्कळ स्त्री-पुरुषांनी तक्रार केली. मथळ्यापासूनच स्त्रीविषयक अनादर व्यक्त होतो असे त्यांचे म्हणणे. यासंबंधात समंजस स्त्रीयांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, घरगुती मराठीपासून ज्याची फारकत झाली आहे आणि जे वर्तमानपत्री भाषेचे दास आहेत त्यांच्या भाषेचे नियम त्यांनी प्रत्येक लेखकाला लावू नयेत. 'बायकामंडळींसमोर धूम्रपान करू नये', 'त्याच्या घरी कोणी बायकोमाणूस नाही', 'बायकांची पंगत' हे सर्व शब्दप्रयोग अस्सल आणि घरंदाज मराठीत मोडतात व त्यात अस्सल स्त्रियांना अपमानाचा वासही येत नाही. अर्थात् बायकामुलांच्या घरात वाढलेले वाचक आणि वर्तमानपत्रांवर पोसलेले वाचक हा भेद येथे मी केलेला आहे! आता इंग्रजीतून उसना घेतलेला आदर आणि उसनी घेतलेली भाषा पाहा. काही वर्षांपूर्वी पुण्याच्या वृत्तपत्रात वाचलेली एक वार्ता आठवते: 'काल रोजी येथील गणपती चौकात चार

मांगगारोडी महिलांनी एका सद्गृहस्थाचे रिस्टवॉच लांबविले!' सारांश, 'बायका' शब्द अनादरवाचक आहे आणि 'महिला' शब्द आदरवाचक ही कल्पना अवास्तव आहे.

पण मथळ्यासंबंधीचा हा प्रश्न सोडला तरी, माझ्या स्त्रीविषयक आदराचा प्रश्न उरतोच. मला तो का आहे एवढेच येथे सांगतो. कोणाही पुरुषाला जर कोणती गोष्ट सर्वांत अवघड जात असेल तर ते म्हणजे, अहंकेंद्रितता सोडून काम करणे. स्वार्थत्याग करतानाही तो अहंकाराने स्वार्थत्याग करील. ज्ञान, पराक्रम, कला या गोष्टी पुष्कळ पुरुषांनी संपादन केलेल्या आढळतात. तथापि, 'अहमस्मि' हा त्या सर्वांचा आधारस्तंभ असतो. उलट, सामान्यातली सामान्य स्त्रीदेखील, तो सहज सोडू शकते. नव्हे तो आपण सोडला आहे हेदेखील तिच्या ध्यानात येत नाही. याबाबतीत स्त्री ही पुरुषापेक्षा जन्मतःच श्रेष्ठ आहे. स्त्रीसंबंधीच्या माझ्या आदराचे हे एक मुख्य कारण आहे.

दुसरे कारण म्हणजे सामान्य स्त्रीदेखील समाजात सौंदर्य आणि आनंद याची वाढ करीत असते. कृत्रिम पाश्चात्य रंगरंगोटी करून क्लबमध्ये किंवा थिएटरमध्ये जाणारी स्त्रीच काय ती समाजाच्या आंनदात भर घालते असे नव्हे, तर नऊवारी नेसून संसारात राबणारी वा देवाला जाणारी स्त्रीदेखील पुरुषापेक्षा अधिक नीटनेटकी आणि आनंदी असते. अहंकारामुळे पुरुष जसा सहज महत्त्वाकांक्षी बनतो तसाच तो सहज हताश आणि दुर्मुखलेलाही बनतो. पण स्त्री साध्या गोष्टींनी आनंदित होते, कष्टांना भीत नाही ; वार्धक्यातही हौस आणि कौतुक या भावनांना पारखी होत नाही. शोपेनहौरसारख्या स्त्रीद्वेष्ट्यालाही "She is known for her high spirits." ('उल्हास हे तिचे एक वैशिष्ट्य म्हणून प्रसिद्ध आहे.') असे नमूद करावे लागले आहे.

सारांश, केवळ व्यक्तीचा नव्हे तर समाजाचा संसारही स्त्रीच्या त्यागावर आणि उत्साहावर चाललेला आहेसे दिसेल. पण स्त्रीच्या या गुणांमुळे व स्वभावधर्मामुळेच तिच्या जीवनाला आणि कर्तृत्वाला सामान्यपणे काही मर्यादा पडतात. कुणाकरता तरी घर सजविणे, कुणाकरता तरी जगणे हा तिचा स्वभाव असल्याने कोणी ना कोणी प्रेमाचे ग्राहक (recipients), सेवेचे ग्राहक तिला सदैव घट्ट धरून ठेवावे लागतात. नवरा आणि मुले हे तिच्या प्रेमाचे आणि सेवाशुश्रूषेचे प्रमुख ग्राहक होत. पुरुष अरेरावी असतो म्हणून नव्हे, मुले अजाण, परावलंबी असतात म्हणून नव्हे, तर स्त्रीच्या पोटात प्रेमाचा दुर्दम्य साठा असतो म्हणून स्त्री दुसऱ्याकरिता हसतमुखाने खपत असते.

अर्थात् हा मी स्वभाव म्हणून सांगितला. जगात स्वभावाला आणि सहजतेला नेहमीच वाव असेल असे नव्हे. स्त्रीच्या सेवाप्रधान, त्यागप्रधान जीवनाला खरा प्रतिसाद कोणता? त्यांच्याबद्दल कृतज्ञता आणि अभिज्ञता बाळगणे. पण आपण पुरुष पुष्कळदा स्त्रीचा त्याग ही आपली वडिलार्जित मिरास समजून चालतो आणि त्यांच्याशी कधी लाडावलेल्या मूर्ख मुलासारखे वागतो, तर कधी कृतघ्न उनाड माणसासारखे वागतो. या वृत्तीमुळे पुष्कळदा स्त्रियांचा छळही होतो. पण यावर इलाज स्त्रियांना पुरुषांप्रमाणे राठ, ऐदी आणि उनाड बनविणे हा एकच आहे, असे नव्हे. त्यांना (हक्काकरिता) भांडखोर आणि कजाग बनविणे हाही नव्हे, तर पुरूषांना अधिक दाक्षिण्य, अभिज्ञता आणि कृतज्ञता शिकविणे हा होय. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कोणतेही काम वा पराक्रम करू शकतील याबद्दल कधीच शंका प्रदर्शित केलेली नाही. जे जे पुरुष करून दाखवतात, ते ते स्त्री करून दाखवील ; स्त्री जे जे करून दाखविते ते मात्र पुरुष करून दाखवू शकणार नाही. सामाजिक

प्रगती, उद्योग आणि संरक्षण यांकरिता पुरुषाच्या शक्तीचा आणि अहंकाराचा उपयोग आहे. सामाजिक स्थैर्य, सभ्यता आणि प्रसन्नता याकरिता स्त्रीच्या त्यागमय आणि सहज प्रसन्न वृत्तीचीच आवश्यकता आहे.

पण आज आपण करीत आहोत काय? स्त्री जी भूमिका शांतपणे पण नैसर्गिक समाधानाने वठविते ती वठविण्यात 'पराक्रम' नाही, अर्थात् आनंद व कर्तृत्वही नाही अशी पुरुषी कल्पना आपण स्त्रियांच्या डोक्यात भरवीत आहोत. कर्तृत्वाची आणि सार्थकतेची ही ढोबळ जाहिरातबाज आणि बहिर्मुख कल्पना आजच्या बहिर्मुख आणि पश्चिमाभिमुख जमान्याला साजेशीच आहे! पुरुषांच्या क्षेत्रात म्हणजे स्पर्धा आणि परदास्य यांच्या क्षेत्रात शिरणे म्हणजेच प्रगती आणि स्वातंत्र्य ही कल्पना भ्रामक आहे, हे अनेक स्त्रियांना आज स्पर्धेच्या बाजारी जगाचा अनुभव घेतल्यावर कळून येत आहे. घराबाहेर पडणारी 'नवी स्त्री' आज जागजागी दिसत आहे. पण घराचे व गृहिणीचे महत्त्व ओळखून स्वतःच्या घरात कृतज्ञतेने आणि दाक्षिण्याने वागणारा 'नवा पुरुष' मात्र अद्याप जन्माला आलेला नाही. आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे तथाकथित पुरोगामी स्त्रियांच्या गोटांतूनही 'नव्या पुरुषा'ची मागणी नाही! 'घराबाहेर न पडलेल्या' स्त्रीची मूक आणि सात्त्विक समाजसेवा ओळखून स्वगृहातच स्त्रीदाक्षिण्य, कृतज्ञता, मूक सहकार्य दाखविणाऱ्या पुरुषापेक्षा आणि खोट्या समानतेची साद घालून घराबाहेर बोलावणाऱ्या व घराबाहेरच दाक्षिण्य दाखविणाऱ्या उथळ पुरुषाचीच अद्याप मागणी करीत आहेत. सारांश, पुरुषाची ढोबळ आणि तोंडाळ भूमिका वठविण्याकरिता पदर कसून उभी ठाकलेली स्त्री ही खरी 'नवी स्त्री' नसून, स्वतःची निःशब्द, शांत आणि संसारप्रेमी भूमिकाच श्रेष्ठ मानणारी आणि तिचे श्रेष्ठत्व मानणाऱ्या 'नवपुरुषाची' ची मागणी करणारी स्त्री ही खरी नवी स्त्री होय.

राहता राहिला प्रश्न अपवादभूत स्त्रियांचा. काही स्त्रिया विद्याव्यासंग, संशोधन, लेखन यांत रममाण होतील. काही सार्वजनिक पुढारी वा लढवय्याही होतील तर काही कलेच्या क्षेत्रातील नैपुण्यामुळे गायिका, नटी वा नर्तिका होतील. यांतील सर्वच क्षेत्रे सारखी असून सर्वच गृहिणीधर्माला विरोधी आहेत अशी कल्पना करून घेण्याचे कारण नाही. अत्यंत सनातनी स्त्रियांनीही राज्यकारभार व सेनानायकत्व वा संस्थाचालकत्व केल्याची उदाहणरणे जुन्या नव्या इतिहासात आहेत. देवी अहिल्याबाई (होळकरीण) कमालीची धार्मिक असूनही राज्याचा कारभार, परराज्याशी मुत्सद्देगिरी आणि सैन्याच्या हालचाली चालवू शकत असे. अर्थात् पुरुषाशी स्पर्धा करण्याकरिता नव्हे, तर पुरुषाची रिकामी जागा भरून काढण्याकरिताच तिने या उलाढालीच्या आयुष्यात पाऊल टाकले. झाशीच्या राणीचा दिवसातील बहुतेक काळ धार्मिक कृत्यांतच जात असे. तिने अतुलनीय शौर्य गाजविले तेव्हा ती केवळ बावीस वर्षांची म्हणजे हॉस्टेलमध्ये राहून एम.ए.चा अभ्यास करणाऱ्या आजच्या मुलीच्या वयाची होती. आज मराठी मुली निर्वासित पंजाब्यांचे अंधानुकरण म्हणून जो पोशाख करतात त्यापेक्षाही 'पुरोगामी' पोशाख (पठाणी फेटा, विजार, इ.) ती दरबारापुरता करीत असे, तर बाकीचा वेळ शुभ्र मलमलीचे पातळ, डोक्यावरूनच पदर या वेषात प्रायः देवघरात बसून काढीत असे. आजही सर्वस्वी धार्मिक वृत्तीच्या असून राजकारणात भाग घेणाऱ्या, प्रसिद्धी टाळून संस्था चालविणाऱ्या स्त्रिया बृहन्महाराष्ट्रात कोठे दिसून येतात. पण स्त्रियांच्या पुरुषी कर्तृत्वाला वाव देणे वेगळे आणि 'कर्तृत्व' म्हटले की काय ते पुरुषांच्या क्षेत्रातच, अशी कल्पना करणे वेगळे. उलाढाली व लढाया यांचा अंतिम हेतू शांत, निर्वेध गृह्यजीवन हाच असतो. गृह्यजीवनाला तुच्छ लेखणारी विचारसरणी सांगून जे लोक प्लॅटफॉर्म गाजवितात त्यांना राजकीय पराक्रम वा सामाजिक कर्तृत्व यांचे अंतिम उद्दिष्टच कळलेले नसते. लढाईचे उद्दिष्ट सुसंस्कृत

समाजाला शांतता मिळवून देणे हे असते. पुरुषी कर्तबगारीची सफलता, चार भिंतींच्या आत शांतपणे गृहिणीची कर्तव्ये करणाऱ्या स्त्रीच्या संसारसुखात असते.

माझ्या स्त्रीविषयक दृष्टीकोनातील एका भागासंबंधी काही भगिनींनी साफ चुकीचा ग्रह का करून घ्यावा हे मात्र मला कळत नाही. माझ्या 'बायका' या पुस्तकात, मी 'society women' अथवा 'समाजयोषिता' म्हणून ज्यांना म्हणता येईल त्यांची भूमिका गृहिणीच्या भूमिकेला विरोधी असल्याने ते दोन वेगळे वर्ग असावेत असे सुचविले आहे. पाश्चात्य देशांत 'सोसायटी विमेन' म्हणून ज्यांचा उल्लेख होतो त्यांचे जीवन आपल्या परिस्थितीतील गृहिणीजीवनाशी जुळण्यासारखे नाही हे उघड आहे. शिवाय, सामाजिक आकर्षणबिंदू बनणे, फॅशनचे नेतृत्व करणे, अनेक पुरुषांच्या आकर्षणाचा विषय होणे हे ज्या स्त्रियांचे विशेष म्हणून मानले जातात त्यांचा वर्ग सर्वस्वी स्वतंत्र करण्यात समाजाची आणि त्यांची स्वतःचीही सोयच आहे. कला, संभाषणचातुर्य व सार्वजनिक ठिकाणचे आदरातिथ्य याच गुणांची ज्यांच्याकडून अपेक्षा आहे अशा स्त्रियांचा वर्ग प्राचीन ग्रीसमध्ये वेगळा होता व अर्वाचीन जपानमध्ये वेगळा आहे. याचाही मी या संदर्भात माझ्या पुस्तकात निर्देश केला आहे. पण पुण्याकडील एका पदवीधर स्त्रीने आपल्या डोक्यातून एक विचित्र कल्पना काढून मुंबईच्या 'वसंत'मध्ये यासंबंधात बराच रोष व्यक्त केला आहे. या भगिनीचे म्हणणे असे की, ज्या स्त्रिया काही ध्येयवादाने अविवाहित राहतात त्यांनी 'society women' ची भूमिका वठवावी असे मी म्हणत आहे. अर्थात् माझ्या पुस्तकातील 'सांस्कृतिक सौंदर्य आणि स्त्रिया' हे प्रकरण पाहिल्यास अविवाहित राहणाऱ्या स्त्रियांना मी कोणताही उपदेश केलेला नाही असे दिसून येईल. नाट्यनृत्यादी कलांचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया आणि गृहिणी यांचे वर्ग वेगळे असावेत एवढेच मी सुचविले आहे. तसेच, ध्येयवादामुळे असो की वैयक्तिक अडचणींनी असो-आजन्म अविवाहित राहणाऱ्या स्त्रिया आणि नाट्यनृत्यादी कलांचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया यांचे वर्ग वेगळे असावेत, असेही मी म्हणेन. यात गृहिणींचा आणि कुमारिकांचा मी गौरवच करीत आहे.

स्त्रियांच्या वेशभूषेसंबंधीही मी माझ्या पुस्तकात व अन्यत्र लिहिले आहे. त्यांचाही विपर्यास केलेला मी पाहिला आहे. स्त्रियांनी सुंदर पोषाख करू नये असे मी कधीच म्हटलेले नाही. पण सुंदर नसलेले वेशभूषेचे प्रकार स्त्रिया जेव्हा केवळ 'नवे' आणि 'पाश्चात्य' एवढ्याच कारणास्तव उचलतात तेव्हा मी वेशसौंदर्याखातर त्याच्यावर कडक टीका करतो. माझे स्त्रीसौंदर्याबद्दलचे विचार दोन वर्षांपूर्वीच्या 'मनोहर' मासिकाच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेले आहेत. केशकलाप हा स्त्रियांचा सौंदर्याचा एक प्रमुख भाग आहे हे कुणालाही मान्य होईल. पण आधुनिकतेच्या पाश्चात्य-सदृशतेच्या वा सोयीच्या नावावर आमच्या स्त्रिया हे सर्वमान्य सौंदर्यांग कापून फिरू लागल्या तर त्यांना कुणीही वेड्यातच काढील. (अर्थात् येथे स्त्रियांचा दृष्टिकोन व पुरुषांचा दृष्टिकोन असा प्रश्नच नाही. शेकडा नव्याण्णव स्त्रिया व पुरुष यांचे यात मतैक्यच असणार.)

पण माझ्यासारख्या सौंदर्यवाद्याने अशा कुरूप फॅशनवर टीका केली व त्याबद्दलही त्याच्यावर कोणी स्त्रीद्वेषाचा आरोप केला तर, त्यात समंजसपणाचा भाग नाही हे उघड आहे.

'स्त्रियांचा पोषाख हा पुरुषांचा विषयच नाही', असाही युक्तिवाद काही स्त्रीपुरुष माझ्या स्त्रीविषयक विचारांवर टीका करताना करतात. अथार्त् हे मत साफ वेडपटपणाचे आहे. कारण स्त्रियांचा पोषाख मुख्यत्वेकरून पुरुषांचे मत चांगले व्हावे म्हणून आहे व पुरुषांचा पोषाख स्त्रियांचे मन आपणांविषयी चांगले व्हावे

म्हणून आहे असे मी मानतो. 'स्त्री आणि पुरुष हे दोन प्राणी वेगळ्या आणि सर्वस्वी असंबद्ध जगात राहात आहेत' हे मत वेडपट स्वातंत्र्यवाद्याखेरीज कुणी मांडीलसे वाटत नाही. स्त्रियांची निसर्गातील भूमिका लक्षात घेऊनच त्यांचे समाजातील स्थान असावे व पुरुषांनी केवळ नैसर्गिक अनुकूलते (advantages) च्या जोरावर स्त्रियांना तुच्छ लेखू नये आणि त्यांच्या सौम्यतेचा व त्यागीपणाचा गैरफायदा घेऊ नये, हा माझ्या या संबंधातील विचारसरणीचा गाभा होय. माझे पुस्तक सुबुद्धपणे व अविकृत मनाने वाचणाऱ्या अनेक स्त्रियांना माझे हे मत मान्य झाल्याचे मला माहीत आहे.

सारांश, हा वाद 'स्त्री विरुद्ध पुरुष' असा नसून, 'वेड्या भगिनी विरुद्ध शहाण्या भगिनी' असा आहे. माझे पुस्तक मात्र मी दोघांनाही अर्पण केल्याचे दिसेल!

वैशिष्ट्य,
एप्रिल १९६६, पृ. (?).

अनुक्रमणिका

## ८

# स्त्रियांच्या नोकऱ्या : आणखी एक दृष्टिकोन

रेडिओवरील परिसंवादाचे जे आवडते विषय आहेत त्यातला हा प्रमुख आहे. मी स्वतःच या विषयावरील परिसंवादात मुंबई आणि पुणे रेडिओवरून निदान अर्धा डझन वेळा तरी भाग घेतला असेल. 'स्त्रियांनी नोकऱ्या कराव्यात की करू नयेत!' या जुन्याच प्रश्नाभोवती या चर्चा अद्याप घोटाळत असतात! पण आधीच हजारो सुशिक्षित स्त्रिया किरकोळ नोकऱ्यांपासून मोठ्या अधिकाराच्या नोकऱ्यांपर्यंत सर्व तऱ्हांच्या नोकऱ्या करीत आहेत अन् त्या पुरुषांइतक्याच जबाबदारीने अन् नैपुण्याने करीत आहेत.

पण म्हणजे याबाबतीत आता विचार करण्याला जागा किंवा 'प्रॉब्लेम' उरला नाही, असे मात्र नव्हे! प्रथम स्त्रिया कारकून, शिक्षक, वकील, डॉक्टर, प्रोफेसर, इ. झाल्या तर इकडचा सूर्य तिकडे उगवेल अशी आपण धास्ती घेत होतो. उलट एकदा, मोठमोठ्या ऑफिसांत एकाआड एका खुर्चीवर बूटपँटऐवजी, गोल पातळ आणि अंबाडा पाहण्याची सवय झाल्यावर आपण नोकरीच्या क्षेत्रापुरत्या तरी स्त्रियांना पुरुषच मानू लागलो आहोत आणि समाजशास्त्राच्या अन् प्राणिशास्त्राच्या दृष्टीने आपण ही एक घोडचूकच करीत आहोत. स्त्रियांनी नोकऱ्या करण्यात काही तोटा नाही, उलट पुष्कळ फायदेच आहेत. पण नोकरी करणाऱ्या स्त्रियाही स्त्रियाच आहेत हे विसरण्यात मात्र आपण स्त्रियांना नकळत वाईट वागणूक देत आहोत.

आज सामान्य रेडिओवक्त्याचे या विषयावरचे भाषण आपण ऐकले तर, आपल्याला दोन दृष्टिकोन एकमेकांविरुद्ध, पण जुनेच-ऐकायला सापडतील. एक पक्ष स्त्रिया पुरुषापेक्षा कोणत्याही बौद्धिक, व्यावसायिक क्षेत्रात कमी नाहीत ही जुनीच गोष्ट तावातावाने सांगेल, तर दुसरा पक्ष स्त्रियांच्या नोकरीपेशातले जुनेच धोके पुन्हा नव्या भाषेत सांगेल. सुशिक्षित, सुस्वरूप, तरुण स्त्रियांनी 'बॉस'रूपी परपुरुषाच्या खोलीत सहीकरिता कागद घेऊन उभे राहायचे, वरिष्ठाच्या मेहेरनजरेत आपल्या प्रतिस्पर्धी 'कलीग'पेक्षा अधिक भरण्याकरिता कामातल्या वाकबगारीपासून बोलण्यातल्या गोडव्यापर्यंत सर्व अस्त्रे वापरायची — छे! स्त्रियांच्या नोकरीतले नाजूक धोके बोलून दाखवणारा पुरुष क्षुद्र किंवा मागासलेला ठरेल, पण ते नाकारणारा तर आंधळाच म्हणावा लागेल! शिवाय, आणखी एक प्रसिद्ध आक्षेप-एका स्त्रीची नोकरी म्हणजे निदान एका तरी पुरुषाची बेकारी होय!

पण हे तोटे घोकता घोकताच, आज सर्व व्यवसायांत-पोलीस खात्यात देखील! स्त्रियांचा एवढा भरणा होत आहे की, आक्षेपकांच्या आक्षेपांनी रुसण्याइतकं मन नाजूक करून, स्त्रियांनी एक आठवडा संपावर जायचे ठरविले तर, आपली शासनयंत्रणाच कोलमडून पडेल.

पण म्हणून त्यांच्या व्यावसायिक जीवनात विचार करण्यासारखे प्रश्नच उरलेले नाहीत ही कल्पना मात्र तितकीच वेडेपणाची आहे. शिक्षणात आणि व्यवसायात आपण आज समान हक्काच्या पोपटपंचीमुळे निसर्गनिर्मित (स्त्री-पुरुष) भेद मानीत नसल्याने पुरुषांचे हाल होत नाहीत. पण स्त्रियांचे मात्र हाल होत आहेत. (स्त्रीच्या शरीररचनेमुळेच होणाऱ्या नाजूक कुचंबणेचा उच्चार मी संकोचामुळे तूर्त टाळतो.) परंतु स्त्री

द्रव्यार्जनाला पात्र आहे असे समजण्याइतका पुढारलेला पुरुष, 'फुलटाईम' नोकरी करणाऱ्या स्त्रीला त्याच्या जोडीला फुलटाईम घरकामही करण्याइतकी खंबीर समजू लागला आहे! काही घरकामे यंत्राने अन् शहरी सोयींनी होऊ लागली तरीही, नोकरी करणारा पुरुष घरी काय करतो आणि नोकरी करणारी स्त्री घरी काय करते याची डायरी डोळे उघडणारी ठरेल. हा दुहेरी ताण पत्करून पुरुषाच्या बरोबरीचे ठरण्याचा मान स्त्रियांना थोडा महागातच पडत आहे, असे मला वाटते.

याला इलाज स्त्रियांनी पुन्हा स्वयंपाकघरात कोंडून घेणे हा नव्हे, तर आमच्या कचेऱ्यांनी, शिक्षणसंस्थांनी आणि इतर सर्वच व्यवसायांनी स्त्री ही पुरुषापेक्षा कमी नाही, हे जसे आतापर्यंत शिकून घेतले तसे आता 'स्त्री म्हणजे पुरुष नव्हे' हे शिकण्याची वेळ आली आहे! तसेच, स्त्रिया चोवीस तासांच्याच दिवसात दोन साहेबांची नोकरी करण्याची अवघड सर्कस फार काळ करू शकणार नाहीत, हेही समाजाने लक्षात घ्यायला हवे!' हे सगळं सांगणं ठीक आहे, पण याच्यावर इलाज काय? इलाज मी तरी एकदम 'मूले कुठार' या जातीचा म्हणजे 'radical' सुचवीन.

स्त्रियांचे कामाचे तास पुरुषांच्यापेक्षा वेगळे आणि कमी ठेवले तरच त्यांची ही कुत्तरओढ संपेल. सकाळी साडेनऊच्या आत नवऱ्याचं जेवण, मुलांची जेवणं, मधल्या वेळचे डबे हे सगळं संपवून, घाईघाईनं जेवून सुपारी चघळीत बसस्टॉप गाठणारी, अन् ऑफिस संपल्याचा गजर कानी पडल्याबरोबर परत बसस्टॉप गाठणाऱ्या कुंभमेळ्यात पुरुषांच्या बरोबरीनं धावत सुटणारी स्त्री, डोळ्यापुढे आणा! म्हणजे मी काय म्हणतो ते समजेल. अन् शिवाय, घरी गेल्यावर पुरुषाला सिगारेटच्या धुरात समाधिस्थ होण्याइतपत तरी मोकळीक असते, पण स्त्री घराच्या कंपाऊंडमध्ये पोहोचण्याच्याही आत, तिचा तिसरा साहेब-छोटा अविनाश-तिच्यावर रुष्ट होऊन सामोरा आलेला असतो!

नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांचा प्रश्न तर इतका अवघड आहे की त्याच्याकडे आपण डोळेझाक कशी करतो याचं मला नेहमीच आश्चर्य वाटतं. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना नेणती, अंगावर पिणारी मुलं असू शकतील ही कल्पनाही आपण जणू बहिष्कृत समजतो. दोन माणसांच्या संसारात नोकरी करणारी स्त्री मुलांची काय व्यवस्था लावून ऑफिसात जात असेल? की घरात कुणी म्हातारी सासू, आई, आजी असली तरच या स्त्रिया नोकरी करू शकतात? म्हणजे ग्रीक समाजातली कलानिर्मिती जशी गुलामांचा स्वतंत्र वर्ग असण्यावरच अवलंबून होती, तशी पुरुषांच्या बरोबरीनं नोकरी करणारी स्त्री ही आजची 'समान संस्कृती' घरातल्या आजीबाईंच्या अस्तित्वावरच अवलंबून आहे, असं म्हणावं लागेल. म्हणजे ज्या घरात आजीबाई आहेत त्या घरातल्या तरुण स्त्रीनेच नोकरी करावी, हा एक नवाच दंडक झाला. पण हा दंडक पुरोगामी कसा काय ठरतो देव जाणे!

पण या अडचणीवरही 'तुमचा तोडगा काय तो बोला!' असं लोक मला म्हणणारच. कुठलीही व्यवस्था अर्धवट करणं म्हणजे शुद्ध अर्धवटपणा होय, एवढंच माझं याला उत्तर आहे. गिरणीत कामगार स्त्रियांच्या मुलांकरिता जर 'क्रेश' (creche) ची म्हणजे 'बालसंगोपनगृहा' ची व्यवस्था असते, तर तीच व्यवस्था सेक्रेटरिएट, सेंट्रल बिल्डिंग, सिव्हिल कोर्ट, युनिव्हर्सिटी यांच्या ऑफिसात का नसावी? पण मी हे घरी बसून लेखात लिहीत आहे, म्हणून बरं! सभेत किंवा ऑफिसच्या स्टाफरूममध्ये सांगेन, तर पुरुषच काय, स्त्रियासुद्धा

माझ्या अंगावर धावून येतील! एम्.ए. झालेल्या स्त्रियांनी ऑफिसात मुलं आणायची! अन् ती सार्वजनिक पाळण्यात घालून ठेवायची? इश्श! अय्या! अब्रह्मण्यम्!

ऑफिसात जाणाऱ्या स्त्रियांना मुलं असतात या गोष्टीचा उच्चार करणंदेखील 'un-fashionable' किंवा गाढवपणाचं समजलं पाहिजे! मग त्यांचे पाळणे उघडपणे हालवणं म्हणजे जंगलीपणाच! त्या काय मजुरांच्या बायका थोड्याच आहेत?

यालाच मी अर्धवट दृष्टी आणि अर्धवट सुधारणा म्हणतो! नोकरी करणाऱ्या स्त्रिया स्त्रियाच आहेत हे कबूल करायला आम्हांला जणू लाज वाटते!

केसरी (सहज संवाद),
२१ मे १९६७, पृ. ७.

अनुक्रमणिका

# ९

## स्त्री-विमोचनाची आजची दिशा

सुधारकांनी जेव्हा महाराष्ट्रीय स्त्रीच्या दास्यविमोचनाचा कार्यक्रम हाती घेतला तेव्हा ती कोणत्या अवस्थेत होती, हे एका शब्दात सांगणं कठिण आहे. ती दास्यात होती म्हणावं, तर जिजाबाई, ताराबाई, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई यांच्यासारख्या कर्तबगार स्त्रिया डोळ्यांपुढे उभ्या राहातात. ती स्वतंत्र होती म्हणावं तर सासू, नवरा, बाळंतपण यांच्या दडपणानं जेरीला आलेली, स्वतःच्या उंबरठ्याबाहेर पडण्याची वेळ आली की बावरणारी, अशी अबला डोळ्यांपुढं उभी रहाते. ती अशिक्षित होती, पण असंस्कृत नव्हती. (शिवाय, त्या काळात पुरुष तरी कुठं सुशिक्षित होते?) म्हणजे शिक्षणात त्या काळी स्त्रिया पुरुषांच्या 'बरोबरीनं' च चालत होत्या. स्त्रियांवर त्या काळी सर्वांत मोठे दडपण होते ते शील, कुलीनता आणि मर्यादशीलपणा यांच्या निर्बंधाचं. आणि या बाबतीत सबंध भारतानेच अतिरेकीचा उच्चांक गाठला होता यात शंका नाही. बालविवाहाची चालही शीलरक्षणाकरताच होती, असं काही लोक म्हणतात. लहानपणीच नवरा करून दिला, म्हणजे मुलीचं वाकडं पाऊल पडण्याचा संभव नाही, अशी ही विचारसरणी होती. पण बालविवाहानं विवाहपूर्व अनीती टळली, तरी विवाहबाह्य संबंधाची शक्यता उरतेच, त्याला बालविवाह काय करणार? ते काहीही असो, बालविवाह हे स्त्रीच्या परवशतेचं आणखी एक कारण होतं.

सुधारकांनी स्त्री-विमोचनाचे जे मार्ग काढले त्यांत शिक्षण आणि प्रौढविवाह हे प्रमुख होते. किंबहुना शिक्षण हाच बाकीच्या सर्व विमोचनमार्गांचा पाया होता. स्त्रियांच्या शिक्षणाला मान्यता मिळाली की त्यांचं लग्नाचं वय वाढणारच. लग्नाचं वय वाढलं की प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह, आजन्म अविवाहित राहाण्याचं स्वातंत्र्य, इत्यादी गोष्टी आल्याच. आजचं पुढारलेल्या जातींतील स्त्री-जीवन पाहिलं, म्हणजे या सर्व बाबतींतील स्त्रीस्वातंत्र्य स्थिर झालेलं दिसेल. पण पहिल्या पिढीचे सुधारक आज फिरून जिवंत झाले तर, त्यांना याखेरीज इतरही गोष्टी स्त्री-जीवनात शिरलेल्या दिसतील. त्या सर्वांनाच 'विमोचन' हे नाव देता येईल की नाही कोण जाणे! आणि दुसरी गोष्ट म्हणजे जुन्या स्त्रियांपेक्षा आजच्या स्त्रिया कितीही वेगळ्या दिसत असल्या तरी त्यांचं परावलंबित्व अथवा पुरुषावलंबित्व कमी झालं आहे की नाही याची शंकाच आहे. शिवाय, त्या स्वतंत्र झाल्यानं त्यांचा दर्जा वाढला की कमी झाला हाही प्रश्नच आहे.

पूर्वी स्त्रियांना स्वातंत्र्य नसे, पण मान असे. नजरकैदेत ठेवलेल्या राजबंद्यासारखी त्यांची स्थिती असे. घरात काय काम करावं लागेल तेवढंच. बाकी बाहेरची त्यांची सर्व काम त्यांच्याकरिता कोणीतरी करीत असे. प्रवास असो, प्रपंचातला बाजारहाट असो, कोर्टकचेऱ्यांची कामे असोत, त्यांची झळ त्यांना लागू नये अशी तरतूद असे—नव्हे असा जणू गुप्त करारच असे. कोणत्याही धकाधकीच्या मामल्यात स्त्रियांना तोंडाशी देणं म्हणजे पुरुषाची नामुष्की ठरे. अशा प्रसंगांतून स्त्रियांना अलगद बाजूला करून आपण पुढं होणं यात पुरुषाचं दाक्षिण्य दिसून येई. ज्या समाजात स्त्रीस्वातंत्र्य वाढीला लागलेलं दिसून येतं त्या समाजातून स्त्रीदाक्षिण्य बहुधा पळ काढताना दिसून येत. आणखीही एका गोष्टीचा निर्देश केला पाहिजे. स्त्रिया स्वतःच सामर्थ्याची अन् धैर्याची कामं करू लागल्यावर पुरुषांच्या कर्तृत्वाला अन् शौर्याला स्फूर्ती पुरवण्याची त्यांची पडदानशीन शक्ती कमी झाली. सुंदर पण असहाय अशा स्त्रीच्या अब्रूकरता, रक्षणाकरता पुरुष जो पराक्रम करी, तो त्याच्याबरोबरीनं

समाजात वावरणाऱ्या 'मुक्त' स्त्रीकरता तो करील की नाही याची शंकाच आहे. पुरुषी सद्गुणांच्या विकासाकरता स्त्री असहायच राहाणं आवश्यक आहे असं दिसून येईल. अर्थात् स्त्रीच्या असहायतेनं पुरुषांचे काही दुर्गुणही वाढीला लागतात, हे मी विसरलेलो नाही. स्त्रीच्या सौंदर्यामुळं आणि असहायतेमुळं पुरुषांचं दाक्षिण्य वाढीला लागतं, तसंच त्याचं sadism ही वाढीला लागण्याचा संभव असतो. स्वभावतः स्त्री masochist असते, तर पुरुष sadist असतो असं मानसशास्त्र सांगतं. (masochist = प्रिय व्यक्तीकडून छळ करून घेण्यात आनंद मानणारा; sadist = प्रिय व्यक्तीला छळण्यात आनंद मानणारा.)

स्त्री स्वतंत्र्य झाली तर ती पुरुषाची बरोबरी करण्यातच काय तो आनंद मानील, ही सुधारकांची कल्पना त्यांच्या कल्पकताशून्य तर्कटीपणाला साजेशीच होती. स्वातंत्र्याचा उपयोग स्त्री आपल्या शारीरिक आकर्षणाचं (sex appeal चं) भांडवल करण्याकरताही करू शकेल. जुन्या जमान्यातील स्त्रीच्या वेशभूषेचे प्रेक्षक बहुधा तिच्या आप्तवर्गातील स्त्री-पुरुष असत. आजच्या जमान्यातील स्त्रीच्या वेशभूषेचे प्रेक्षक समाजाच्या सर्व थरांतील परपुरुष असतात. आज ज्या शिक्षणानं आणि स्वातंत्र्यानं स्त्री प्रोफेसर, बॅरिस्टर वा एडिटर बनू शकते त्यानंच ती 'समाजयोषिता' अथवा 'society woman' ही बनू शकते.

प्रसिद्ध चिनी लेखक लिन् युटांग् यानं पाश्चात्य स्त्रियांच्या आजच्या पोषाखाकडे पाहून काही गमतीचे उद्गार काढले आहेत. आजचं जग-विशेषतः पाश्चात्य जग-अद्यापही पुरुषाच्या हुकमतीत आहे याचा त्यानं एक विचित्र पुरावा दिला आहे. पाश्चात्य स्त्रिया आपल्या शरीराचा चार-पंचमांश भाग उघडा टाकून फिरतात, याचाच अर्थ, आजच्या जगात पुरुषांच्या डोळ्याला अधिक महत्त्व आहे हा नाही का? पण स्त्रीशरीराचं हे फाजील अनावरण केवळ व्यक्तीच्या मर्जीनुरूपच होतं असं नव्हे. त्यात कधीकधी 'बिझनेस्'चाही भाग असतो. लिन् युटांग् म्हणतो, "नाट्य, नृत्य, चित्रपट यांसारख्या कलांच्या क्षेत्रांत फक्त स्त्रियांच्याच शरीरांचं प्रदर्शन होत असतं, ही गोष्ट आजची कला मुख्यत्वेकरून पुरुषांच्या तृप्तीकरता असते हेच सिद्ध करते!" तो पुढे म्हणतो- "The theatre strips to tease, but generally strips the women to tease the men and does not strip the men to tease the women." -"प्रेक्षकांच्या मनाचा प्रक्षोभ करण्याकरता नाट्यगृहं शरीर अनावृत करण्याचा मार्ग पत्करतात. पण बहुधा स्त्रियांना अनावृत करून पुरुषांना खिजवलेलंच अधिक आढळतं. पुरुष-नटांना उघडं करून स्त्रियांना प्रक्षुब्ध केलेलं क्वचितच आढळतं!"

स्वामी विवेकानंद नेहमी म्हणत की, स्त्रियांचं विमोचन करणं हे पुरुषांचं काम नव्हे. स्वातंत्र्याची आणि आनंदाची पुरुषी कल्पना स्त्रियांवर लादणं म्हणजे पुन्हा एक पारतंत्र्यच नव्हे का? स्त्रियांनी पुरुषांची कामं केली तरच त्यांना सन्मान मिळावा, स्वातंत्र्य मिळावं, अन् त्यांनी संसार केला तर त्या उपेक्षणीय ठराव्यात, ही पुन्हा जुन्या पुरुषांचीच दृष्टी नव्हे का? स्त्रियांचे खास गुण आणि खास कार्यक्षेत्र पुरुषांना आदरणीय वाटत असेल तर, स्त्रियांना पुरुषांसारखं बनवण्याचा यत्न होणार नाही. त्यांच्या मूळ स्वरूपातच त्यांना मान मिळेल. लज्जा, संकोच, दुसऱ्याकरता जगण्यात आनंद, मनांची कोमलता हे स्त्रियांचे गुण मुळातच आदरणीय आहेत. स्त्रिया पुरुषांसारख्या झाल्या तरच आदरणीय, नाहीतर त्या दुर्बल आणि केवळ छळण्यालायक (exploit करण्यालायक) अशी कल्पना आधुनिक काळात रूढ होत आहे. या कल्पनेचा परिणाम म्हणजे सर्व समाजच रुक्ष, अहृदय, अरसिक आणि स्वयंकेंद्रित बनणं हा होईल. स्त्रिया स्त्रियांसारख्या असल्या तर, पुरुष त्यांना exploit करू शकतात हे सत्य आहे; पण म्हणून त्यांना पुरुषांसारखं बनवणं हा मार्ग नव्हे. लोकशाहीतील

व्यक्तिस्वातंत्र्याचा कम्युनिस्ट लोक गैरफायदा घेतात, हे लोकशाहीतील न्यून होय. पण म्हणून लोकशाही राज्यानं हुकमशाही पत्करणं हा त्यावर इलाज होऊ शकेल काय?

स्त्री आणि पुरुष यांतला भेद कमी करणं हे काही तथाकथित क्रांतिवाद्यांनी आपलं उद्दिष्ट बनवलं आहे. याचं सर्वांत हास्यास्पद उदाहरण डॉ. लोहिया यांच्या काही विचारांत सापडेल. स्त्रियांच्या बाबतीत आपण भारतीयांनी पावित्र्य कल्पनेचा अतिरेक केला आहे हा त्यांचा मुख्य आरोप आहे. 'पुरुषांच्या जीवनात जर एकाहून अधिक प्रेमसंबंध येऊ शकतात, तर स्त्रीवरच एकनिष्ठेची सक्ती का? स्त्रियांना एक नीती आणि पुरुषांना दुसरी, असं का?' असा लोहियांचा प्रश्न आहे. वैवाहिक नीतीत पुरुषाचं स्खलन झालं तर ते उपेक्षणीय, अन् स्त्रीचं स्खलन मात्र अक्षम्य, असं का? हे प्रश्न लोहियासारख्या बुद्धिमान् माणसानं विचारावेत हे एक आश्चर्य होय. पण समानतेच्या मृगजळामागं लागलेला बुद्धिमान् मनुष्यही किती भ्रामक विचार कवटाळतो ते यावरून दिसून येईल. एकदा प्रेमविवाहाला समाजानं मंजुरी दिली, की एका स्त्रीच्या जीवनात एकाहून अधिक प्रेमसंबंध घडले तर त्याला मंजुरी देणं क्रमप्राप्तच आहे. इतकंच नव्हे, तर अशा समाजात क्वचित् विवाहपूर्व गर्भधारणा वा संतती हीदेखील एक क्षम्य घटना म्हणून मान्य करायला हवी, हे लोहियांचं म्हणणंही रीतसरच आहे. बालविवाहरूपी अनैसर्गिक संस्था टाळायची असेल तर प्रौढ विवाहातील काही धोकेही पत्करलेच पाहिजेत. पण म्हणजे स्त्री-पुरुषांना एक वैवाहिक नीती लावावी वा लावणं शक्य आहे असं नव्हे. 'विवाह' हा एकच शब्द स्त्रीच्या व पुरुषाच्या बाबतीत लोक लावीत असले तरी, विवाहबंधनाचा अर्थ पुरुषाच्या बाबतीत जो आहे त्यापेक्षा स्त्रीच्या बाबतीत अधिक खोल आणि गंभीर आहे. 'To a woman marriage is career.' असं बर्नार्ड शॉ यांनी म्हटलं आहे, त्यात पुष्कळच तथ्य आहे. शिवाय, स्थिर आणि सुरक्षित संसारी जीवनाची स्त्रीला पुरुषाहून अधिक गरज असते. विवाहरूपी शृंखलेशी खेळणं तिलाच परवडणारं नसतं. वैवाहिक पावित्र्य हे तिच्या जीवनात एक जोखड नसून ते तिचं एक प्रकारचं भांडवल असतं. स्त्रीच्या नैतिकतेला पुरुषांनी क्षुल्लक लेखायचं ठरवलं तरी स्त्रियाच नैतिकतेला महत्त्व देतील. आणि याला कारण त्यात त्यांचा व्यावहारिक फायदा आहे हेच केवळ नव्हे. पुरुषापेक्षा स्त्रीला जसं स्वच्छतेचं वेड अधिक असतं, तसंच पावित्र्याचंही वेड अधिक असतं. आपल्या स्त्रीविषयक पराक्रमाबद्दल (gallantry बद्दल) वल्गना करणारे पुरुष दुर्मिळ नाहीत; पण स्वतःच्या विवाहबाह्य प्रेमसंबंधाबद्दल वल्गना करणारी स्त्री (आपल्या समाजात तरी) शोधूनही सापडणार नाही. अशा स्थितीत स्त्रियांना वेगळी नीती लावणं ही गोष्ट त्यांच्या दृष्टीने अन्यायाची नव्हे तर अभिमानाची आहे. यात विषमता आहे, पण स्त्रीला समाजानं अधिक सुसंस्कृत व अधिक पवित्र मानल्यानंच ती विषमता उत्पन्न झाली आहे.

पण पावित्र्य कल्पनेबद्दलचा लोहियांचा तिटकारा इतक्यात थराला गेला आहे की, शारीरिक शुद्धाशुद्धतेच्या कल्पनांचीही त्यांनी चेष्टा केली आहे! मासिक पाळीच्या वेळी स्वतःला अशुद्ध समजून बाजूला बसण्याच्या प्रथेची चेष्टा करून ते म्हणतात, "पुरुषाच्या शरीरातूनही मलमूत्राची अशुद्धता असतेच! मग त्यांनी बाजूला का बसू नये?" स्त्रियांना या अवस्थेत विश्रांतीची जी गरज असते ती भाबड्या स्पर्श कल्पनेनं निश्चित भागते. पण स्त्री-पुरुषांतील शारीरिक भेद कबूल करणं हेदेखील लोहियांच्या 'कडक साम्यवादा' ला मंजूर नाही. लोहियांसारखा अविवाहित पंडितच असला हास्यास्पद 'साम्यवाद' कवटाळू शकेल, एवढंच या बाबतीत म्हणता येईल!

अनुक्रमणिका

स्त्री-पुरुषांची समानता कल्पिणारे आधुनिक क्रांतिवादी लोक भारतीय पातिव्रत्य कल्पनेचीही अशीच कुचेष्टा करतात. 'स्त्रियांविषयीचे भारतीयांचे विचार केवळ लैंगिक नीतीत गुरफटलेले आहेत, पातिव्रत्य म्हणजे केवळ 'योनिशुचिते'ला महत्त्व देणारी खुळचट नीती होय' असा उपहास करण्यात आला आहे. पातिव्रत्याला अथवा एकंदर लैंगिक नीतीला कोणी किती महत्त्व द्यावं हा ज्याचा त्याचा स्वतंत्र प्रश्न आहे. स्त्री-पुरुषांच्या अनिर्बंध संबंधाला मान्यता देणं हेही एखादा क्रांतिवीर 'पुरोगामी' सद्गुणांत घालू शकेल. पण योनीचं पावित्र्य आणि मनाचं पावित्र्य यांत संबंध नाही असं मानणं हे पुरोगामित्वात कसं बसतं हे मात्र सांगण कठिण आहे. स्त्री-पुरुषांचा शरीरसंबंध इतका क्षणिक आणि फुटकळ असू शकेल असं समजणाऱ्या पुरोगाम्यांची मानवी मनासंबंधीची कल्पना अगदीच यांत्रिक असली पाहिजे.

कायद्यानं लादलेलं एकपत्नीकत्व म्हणजे स्त्री-पुरुषांना समान करण्याचा एक मार्ग आहे अशीही समजूत दिसते. वास्तविक प्रौढ विवाह आणि घटस्फोटाची तरतूद या दोन सुधारणांनी स्त्रियांच्या दुःस्थितीचं निवारण झालं होतं. सक्तीच्या एकपत्नीकत्वानं त्यात काही भर पडली असं वाटत नाही. स्त्री-पुरुषांच्या वैवाहिक नीतीत फरक आहे त्याची कारणं वेगळीच आहेत. सामान्यतः पुरुष हा कुटुंबातील मिळवता माणूस असतो, त्यामुळं त्याला जाब विचारणं सोपं नसतं. पुरुषावर गर्भधारणेची जबाबदारी निसर्गानं टाकलेली नाही, त्यामुळंही त्याला स्वैर संबंधाचं स्वातंत्र्य अधिक आहे. अपत्यसंगोपनाची-म्हणजे लहान अर्भक अंगावर वाढवण्याची-जबाबदारी पुरुषावर पडत नसल्यामुळंही पुरुष अधिक स्वैर वागू शकतात. या त्यांच्या स्वैरतेच्या हक्काला एकपत्नीकत्वाच्या सक्तीनं कितपत आळा बसतो हा एक प्रश्नच आहे. उलट त्यामुळं आज स्त्रीला अधिक धोकाच उत्पन्न झाला आहे. अन्य स्त्री घरात आणणारा पुरुष आज पहिल्या निरपराध स्त्रीला घटस्फोटानं घराबाहेर घालवील असा धोका उत्पन्न झाला आहे.

स्त्रियांच्या कुटुंबातील दर्जाबद्दल स्त्रीविमोचक लोक पुष्कळदा अव्यवहार्य ध्येयवादाची भाषा बोलतात. पती आणि पत्नी ही दोन्ही एका रथाची दोन चाकं असल्यानं त्यांना समान दर्जा पाहिजे असं म्हटलं जातं. पण कुटुंब ही एक संस्था आहे हे मान्य केल्यावर एका संस्थेला दोन प्रमुख असणं कितपत व्यवहार्य आहे याचा विचार या लोकांनी केलेला दिसत नाही. एक स्त्रीसत्ताक कुटुंब तरी असेल, नाहीतर पुरुषसत्ताक कुटुंब तरी असेल. ज्यांना स्त्रियांच्या दर्जाबद्दल वैषम्य वाटत असेल त्यांनी सरळ मातृसत्ताक समाजव्यवस्थेचा पुरस्कार करावा. परंतु एका घरात दोघं प्रमुख झाल्यास अराजक माजेल. नमतं घेण्याची भूमिका पुरुषाकडे दिली तर त्याच्यातील पौरुष कमी होऊन बाहेरच्या जगातही तो नमतंच घेऊ लागेल. ही आपत्ती टाळण्याकरता स्त्रिया बाह्यतः नमतं पुरुषावर हुकूमत गाजवतात.

विवाहसंस्था आणि कुटुंबसंस्था या संस्थाच मुळात सदोष आहेत. पण त्यांच्याऐवजी दुसऱ्या संस्था निर्माण करू पहाणाराला हातच टेकावे लागतात. त्यांच्यापेक्षा कमी दोष असलेली संस्था निर्माण करणं अशक्य आहे असं आढळून येतं. सॉक्रेटिसला एका तरूणानं विचारलं, "मी विवाहबद्ध व्हावं की अविवाहित राहाणं बरं?" सॉक्रेटिसनं उत्तर केलं, "काहीही केलंस तरी तुला पश्चाताप करावाच लागेल." सर्व मानवी संस्था म्हणजे स्वेच्छेनं पत्करलेल्या तडजोडी आहेत. त्यांतील दोष त्या संस्थांच्या निर्मात्यांना माहीत नसतात असं नव्हे. पण कमीत कमी दोषांची एक योजना म्हणून त्यांनी ती स्वीकारलेली असते. स्त्रियांचं काही बाबतींतलं पारतंत्र्य हे त्यांची काही दुःखं टाळण्याकरताच त्यांच्यावर लादलेलं आहे-किंबहुना त्यांनी पत्करलेलं आहे.

अनुक्रमणिका

ज्यांना स्त्रियांच्या विषमतेची आणि स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची तीव्र जाणीव असेल त्यांनी ती जाणीव ठेवून त्यांच्याशी आदरानं आणि सहानुभूतीनं वागणं एवढाच विषमता कमी करण्याचा मार्ग आहे. दिखाऊ हक्क नव्हेत, तर स्त्री-पुरुषांची परस्परांबद्दलची जाणीव हा विषमता कमी करण्याचा, दुःख कमी करण्याचा मार्ग आहे. प्रौढ विवाह, शिक्षण, द्रव्यार्जनाची मोकळीक, या सुधारणांनी स्त्रीची काही दुःखं कमी झाली आहेत; पण काही वाढलीही आहेत. पुरुषानं स्त्री-जीवन समजावून घेणं आणि स्त्रीनंही स्वतःचं जीवन समजावून घेणं, हाच स्त्रीच्या दुःखनिवारणाचा खरा मार्ग आहे. स्त्री आणि पुरुष हे सुशिक्षित पण अडाणी असल्यास हक्कांनी दुःख वाढण्याचाच संभव अधिक, असं आजच्या स्थितीवरून तरी म्हणावं लागतं.

हंस, दिवाळी १९६७,
पृ. ३९-४१.

अनुक्रमणिका

# धकाधकीच्या युगातील स्त्री

मुंबईच्या एका दैनिकात काही दिवसांपूर्वी एका भगिनीने सात्त्विक संतापाने एक लेख लिहिला होता. त्यांनी किंवा संपादकांनी त्याला "भित्रेपणाची बाळगुटी प्यालेल्या मेषपात्र सुशिक्षित महिला" असा मथळा दिला होता. मुंबईच्या 'लोकल'मध्ये प्रवास करून व शिवाय नोकरी करून एखाद्या सुशिक्षित स्त्रीला किती वैताग येत असेल याची कल्पना त्या लेखावरून येत असली, तरी त्यात केलेलं रोग-निदान मात्र त्या वैतागामुळेच थोडंसं भलत्या दिशेला गेलं आहेसं वाटलं. आजच्या जमान्यात अन् त्यातल्या त्यात मुंबईच्या लोकलमध्ये, सुशिक्षित मध्यमवर्गीय स्त्री, कष्ट करून धष्टपुष्ट झालेल्या 'कोळणी', 'माळणी', 'वडारणी' शी यशस्वी मुकाबला करू शकत नाही, म्हणून तिला एकदम 'मेषपात्र' ठरवणं योग्य आहे की नाही, याची शंकाच आहे. शिवाय, रागाच्या भरात झाला तरी कोळी, माळी, वडारी 'महिलां'चा उल्लेख 'ईण' प्रत्ययान्त जातिवाचक स्त्रिलिंगानं करणंदेखील काही मंडळींना दाक्षिण्यशून्यतेचं वाटेल. बाकी 'दाक्षिण्य' म्हणजे 'पुरुषांनी स्त्रियांच्या बाबतीत दाखविण्याचा दिखाऊ हळुवारपणा' अशी व्याख्या केली तर गोष्ट वेगळी! कारण मग स्त्रियांनी स्त्रियांबद्दल दांडगाईची भाषा वापरायला हरकत नाही!

'सुशिक्षित स्त्री' ही तिच्या या नावाच्या शब्दार्थामुळेच (अगदी 'बाय डेफिनिशन!') आहे तशी असणं अपरिहार्य नाही का? आधी स्त्री ही 'स्त्री' म्हणूनच थोडी सालस, सौम्य असणार, त्यात पुन्हा शिक्षणानं एक वेगळी इभ्रत किंवा 'डिग्निटी' येणार. शिक्षणानं पुरुषदेखील थोडे अंतर्मुख, अलिप्त, आत्मनिमग्न बनतात. मग स्त्रियांना दुसऱ्या पॅसेंजर्सच्या भांडणात मन घालण्याइतका उत्साह कुठून येणार? त्यामुळे अशिक्षित स्त्रिया जागा अडवून बसून वर शिरजोर वर्तन करतात, अन् सुशिक्षित स्त्रिया मात्र एकमेकींच्या मदतीला जात नाहीत, अशी स्थिती आहे खरी. पण त्याबद्दल ओरड करणं म्हणजे एकपरीने 'गूळ घेऊन गुळाचा पैसा मागण्यातला' प्रकार नव्हे काय? शिक्षण, स्त्रीत्व, पांढरपेशेपणा आणि शिवाय आधुनिक (इस्त्रीयुक्त!) वेश इतकं असून वर कोळणींशी झटापट करण्याची तयारी असावी ही अपेक्षा दुहेरी नाही का होत?

पण तो लेख लिहिणाऱ्या भगिनीने दाखविलेली ही अपेक्षा अगदी अशक्य कोटीतली आहे असे मात्र मी म्हणत नाही. अगदी 'लोकल'मधला नव्हे तरी 'थ्रू' गाडीतला एक किस्सा आठवतो. माझ्या माहितीची एक कॉलेजकन्यका दादर स्टेशनवर पुण्याकडे जाण्याऱ्या गाडीत बायकांच्या डब्यात शिरत होती. तिला धक्का देऊन एक श्रमजीवी महिला पुढे घुसली. ही कॉलेजकन्यका एन. सी. सी. वगैरे सर्व 'प्रशिक्षणा'तून पार झालेली व शिवाय जात्याच थोडी फाजील धीट म्हणून प्रसिद्ध होती. तिनं त्या श्रमजीवी महिलेच्या श्रीमुखात भडकावली! तो अपमान गिळूनही त्या अशिक्षित बाईनं गाडीत जागा पटकावली. तिच्या मागोमाग ही कॉलेजकन्यका शिरली आणि जेमतेम दाराशीच उभी राहू शकली. गाडी सुरू होईपर्यंत दम धरून गाडी सुरू होताच त्या अशिक्षित बाईनं या कॉलेजकन्यकेला तिच्या हातातील बॅगेसह प्लॅटफॉर्मवर ढकलली! अर्थात् तिची गाडी चुकली अन् (विवाहाच्या वयात) पाय कायमचा मोडणं थोडक्यात चुकलं!

पण रेल्वेतील बेकायदा वर्तणूक हा एक स्वतंत्र विषय आहे. त्याचा त्रास स्त्रियांनाच होतो असं नसून पुरुषांनाही तितकाच होतो. या देशात इंग्रजांचं राज्य होतं तेव्हापासून असं ठरून गेलं की, पहिल्या वा दुसऱ्या

वर्गात बसणारेच काय ते 'सभ्य गृहस्थ', तिसऱ्या वर्गात बसणारी ती मेंढरं! या समजुतीमुळे बहुसंख्य प्रवाश्यांच्या तक्रारी केवळ 'या कानानं ऐकून त्या कानानं सोडून द्यायच्या' अशी रेल्वे नोकरांनी मनाशी गाठ बांधून ठेवली आहे. त्यांना वठणीवर आणणं हे काम, आमची मतं लाचारपणे मागून लोकसभेत वा ॲसेंब्लीत जाऊन स्वस्थ बसणाऱ्या सभासदांचं आहे. साडेआठला घाईनं जेवण उरकून 'लोकल' पकडणाऱ्या स्त्रियांनी ते काम स्वतःच्या अंगावर घेण्यानं निभाव लागणार नाही!

पण आमच्या सुशिक्षित भगिनींवरील मेषपात्रपणाच्या आरोपाचं काय? त्या सभ्य आहेत, मेषपात्र आहेत की नुसत्या मध्यमवर्गीय आहेत? मला आजही असं वाटतं की, स्त्रियांचं रक्षण करणं हे पुरुषांचं काम आहे. अर्थात् हे मी मध्यमवर्गीय स्त्रियांबद्दल म्हणत आहे. त्यांना स्वतःला अस्तन्या मागे सारून (स्त्रियांच्या बाबतीत हा वाक्प्रचार अर्थशून्य आहे हे मी जाणतो! ) धक्काबुक्की करण्याची वेळ येणं हा समाजातल्या सभ्यतेचा पराभव आहे. त्यांच्या नुसत्या 'नफ़रती'च्या नजरेनं अशिक्षित आडदांड लोक वचकले पाहिजेत. 'कोळणी'शी किंवा 'वडारणी'शी एखाद्या पदवीधर महिलेनं यशस्वी मारामारी केली तरी मला फारसं समाधान वाटणार नाही. कारण त्यात त्या दोघीची बरोबरी झाली! पण महाराष्ट्रीय पांढरपेक्षा स्त्रियांपुरतंच बोलायचं झालं तर मी म्हणेन त्या भित्र्या वा दुबळ्या नसून 'निराधार' आहेत. अन् मुंबईत अशा स्त्रियांचा अपमान होऊ शकतो. त्यांत मुख्यतः महाराष्ट्रीय स्त्रियांच अधिक आहेत असं दिसून येईल. याचं मूळ कशात आहे? याचं मूळ त्यांच्या पुरुषांच्या सामाजिक दर्जात आहे. मुंबईत आज जे अनेकप्रांतीय, अनेकदेशीय लोक पोट भरत आहेत, पांढरा वा काळा पैसा कमावीत आहेत त्या सर्वांत महाराष्ट्रीय पुरुषाचा सामाजिक दर्जा निकृष्ट आहे असं दिसून येईल. तो केवळ निर्धन आणि निकृष्ट नोकरीत असतो एवढंच नव्हे, तर तो बहुधा खिन्न, त्रस्त आणि एकलकोंडाही असतो. तो स्वजनांनाच विटलेला असतो. शिवाय, अब्रूसंबंधीच्या त्याच्या कल्पना अतिरेकी असतात. आपल्या स्त्रियांचा अपमान होण्यानं त्याला जेवढा खेद होतो त्यापेक्षाही त्या अपमानाची चर्चा होण्यानं त्याला अधिक खेद होतो! अर्थात् स्त्रियांच्या अपमानाकडे डोळेझाक करणं एवढाच मार्ग तो पुष्कळदा स्वीकारतो!

उलट, महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय स्त्रिया धीट व नीटनेटक्या असतात. नोकऱ्यांत त्यांचाच भरणा विशेष आहे. सुशिक्षित फॅशनेबल स्त्रिया तर इतरांना काहीशा तोऱ्यात असल्यासारख्याच वाटतात. पण त्या तोऱ्यात असल्या तरी त्यांच्या बाजूने हात उगारणारेच काय, पण तोंड उघडणारेही कोणी नाही, हे समाजातील असंस्कृत, आडदांड लोकांना माहीत झालेलं असतं. तात्पर्य, महाराष्ट्रीय स्त्रीचा अपमान केला तर 'तेरीभी चूप, मेरीभी चूप' असा प्रकार होऊन सहीसलामत सुटण्याची गुंडांना आशा वाटते.

मी महाराष्ट्रीय स्त्री-पुरुषांची ही खास कैफियत मांडल्यानं काही लोकांना 'शिवसेने'चा वास न येवो म्हणजे झालं! पण स्त्रियांचा सामाजिक दर्जा त्यांच्या पुरुषांच्या दर्जावर अन् 'वकुबा'वर अवलंबून असतो, हे पुष्कळ स्त्री-कैवारी विसरतात. स्त्रियांना 'लोकल'च्या धकाधकीत शरीरबळाने स्वतःचं रक्षण करावं लागण्यात स्त्रियांचीच केवळ नव्हे तर त्यांच्या पुरुषांचीही मानहानी आहे.

त्या मानानं स्त्रियांचा तथाकथित 'मेषपात्रपणा'ही पुरवला असं मी तरी म्हणेन.

आपण,
२० एप्रिल १९६८,पृ.२.

अनुक्रमणिका

## ११

# शिक्षण की वळण

आज विसाव्या शतकात सर्वांनाच शिक्षणाची गरज आहे. मग समाजाच्या ज्या थरातील पुरुषवर्गात शिक्षणाचा भरमसाट प्रसार झाला आहे त्या वर्गातल्या स्त्रियांना शिक्षणाची गरज आहे असे कुणी प्रतिपादिले तर, त्यात नवल नाही. गेल्या काही पिढ्यांतल्या सुधारकांनी हेच प्रतिपादिले. अर्थात् त्यात चूक नव्हती. चूक वेगळीच होती. हे सुधारक तर्कवादी असल्याने, त्यांना कल्पनाशक्ती बेताचीच असे! पुरुषांचे शिक्षण अन् स्त्रियांचे शिक्षण एकच, अशी त्यांची सरळ, भाबडी कल्पना होती! जेव्हा, समाजाने त्यांना त्यांच्या या धोपटमार्गी समजुतीतला दोष दाखवून दिला तेव्हा, त्यांनी स्त्रियांकरिता वेगळे अभ्यास आणि वेगळी शाळा कॉलेजे काढण्याचे प्रयोग केले. अशा प्रयोगांत कै. धोंडो केशव ऊर्फ आण्णासाहेब कर्वे यांचा प्रयोग सर्वांत मोठा होता.

पण पुरुषप्रधान समाजात, स्त्रियांना शिक्षणापेक्षाही 'वळणा'ची गरज अधिक असते, हे सर्वच सुधारक विसरले. कुटुंबाचं आणि समाजाचं केवळ पोषण नव्हे, तर पालन करण्याचंही काम सर्व जगात स्वाभाविकपणे पुरुषांकडे असतं अशा पुरुषप्रधान समाजात स्त्रियांना वागावयाचं असतं, नव्हे महत्त्व मिळवायचं असतं. अन् म्हणूनच स्त्रियांना वेगळ्या 'वळणा'ची अथवा 'ट्रेनिंग' ची आवश्यकता असते. त्यांचा शिक्षणक्रम वेगळा असावा की नाही, यावर मतभेद होईल. (मी तर वेगळा शिक्षणक्रम नसावा असेच म्हणेन! ) पण मुलींना मुलांच्यापेक्षा वेगळं 'वळण' हवं, हे मात्र मी आग्रहानं सांगेन. शिक्षण असल्यावरही हे 'वळण' अथवा 'ट्रेनिंग' हवंच,-नव्हे, सुशिक्षित मुलींना या ट्रेनिंगची गरज अशिक्षितांहूनही अधिक आहे, असं मी म्हणेन. कारण शिक्षणामुळे स्त्रियांच्या मनात समानतेच्या खोट्या कल्पना शिरून पुरुषप्रधान समाजात वागण्याची त्यांची पात्रता उलट कमी होते असे दिसून येईल!

स्त्री-पुरुषांची समानता प्रतिपादण्याच्या या युगात माझं हे मत नव्यांना चमत्कारिक वाटेल, तर जुन्यांना धाडसाचं वाटेल. मुख्य प्रश्न ते मत धाडसाचं आहे की काय, हा नसून ते वास्तवाशी सुसंगत आहे की विसंगत आहे हा आहे. ते वास्तवाशी सुसंगत आहे असा माझा दावा आहे. अन् ते वस्तुस्थितीला धरून असलं, म्हणजे मग ते कुणाला चमत्कारिक वाटत आहे की काय याची चौकशी करण्याचं मला तरी कारण वाटत नाही. याबाबतीत एक साधी गोष्ट लक्षात घेणं जरूर आहे, - पण जी घेतली जात नाही ती म्हणजे, स्त्री-पुरुषांची 'समानता' म्हणजे स्त्री-पुरुषांची 'सदृशता' नव्हे! स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीचीच केवळ नव्हे, तर पुरुषापेक्षा कित्येकदा पात्रतेत अन् नेहमीच 'संस्कृती'त श्रेष्ठ असते, असं मी मानतो. आणि तरीही ती पुरुषापेक्षा वेगळी आहे हे विसरता येत नाही. तसेच, तिला पुरुषप्रधान समाजात राहायचं आहे, हेही विसरता येत नाही. अन् म्हणूनच शिक्षण असल्यावरही तिला 'स्पेशल ट्रेनिंग'ची गरज आहे असं मी म्हणतो.

तथाकथित समानतेच्या बाबतीतही काही उघड गोष्टी, काही 'फॅक्टस्' लक्षात घेणं जरूर आहे. स्त्रियांना सामाजिक समानता मिळणं योग्य आहे-नव्हे, सामाजिक क्षेत्रात पुरुषापेक्षा मानदेखील देणं योग्य आहे. पण म्हणजे कौटुंबिक क्षेत्रातही 'समानता' मिळू शकेल ही कल्पना चुकीची आहे. कुटुंब ही स्त्री-पुरुषभेदावर आधारलेली संस्था आहे. ती संस्था लहान आणि खाजगी आहे, पण तिचे अधिकार मात्र व्यापक आणि गंभीर

आहेत. एकमेकांच्या आणि अल्पवयस्क मुलाबाळांच्या, जन्माचं कल्याण (किंवा वाटोळं! ) करण्याचे अधिकार या संस्थेला समाजानं अन् संस्कृतीनं दिलेले आहेत. अशा या सर्वाधिकारी संस्थेला दोन 'प्रमुख' एकाच वेळी असू शकतील काय? अन् एकच कुटुंबप्रमुख असणं अपरिहार्य असलं तर, पुरुषाऐवजी स्त्री त्या संस्थेची प्रमुख असावी असं कुणी म्हणेल काय? अन् कुणी केवळ वादाकरिता म्हणून तसं म्हणालंच तर, मी पुरुषांनाही त्या स्त्रींप्रधान समाजात वागण्याचं 'स्पेशल ट्रेनिंग' (पुस्तकी शिक्षणाच्या जोडीला) दिलं पाहिजे असं प्रतिपादीन!

पण आजची अनिवार्य स्थिती म्हणजे पुरुषप्रधान जगात स्त्रीला वागायचं आहे ही आहे. या जगात भिंतीशी व्यर्थ टकरा न घेता, स्त्रीने मानानं-इतकंच नव्हे तर सफलतेनं कसं वागावं त्याचं 'ट्रेनिंग' देणं याला जुन्या, स्त्रीशिक्षण पूर्व जमान्यात 'वळण' असं म्हणत. स्त्रीचे वैवाहिक जीवन-साध्या भाषेत, 'सासरी जाणं' — म्हणजे एक नोकरी आहे, एक 'करिअर' आहे; ही गोष्ट समानतेच्या अन् प्रेमविवाहाच्या वर्तमानपत्री गप्पांमुळे आज आपण विसरतो. मुली, तरुण स्त्रिया तर विसरतातच, पण आम्ही पुरुषदेखील विसरतो. नोकरी अधिकाराची असो की हलकी असो, कारकुनी असो लष्करी असो, नोकरी म्हटली की तिचे नियम आले, तिची शिस्त आली, तिचं ट्रेनिंग आलं. जितकी नोकरी जबाबदारीची अन् मानाची तितकी तिची शिस्त कडक, तिचं ट्रेनिंग कडक. लष्करी नोकरीचंच पहाना! लष्करी अधिकाऱ्याएवढा रुबाब कुठल्याच अधिकाऱ्याचा नसेल ; पण त्याला जेवढी कडक शिस्त पाळावी लागते, कडक नियम सांभाळावे लागतात, तेवढे कुणालाच लागत नसतील. पाश्चात्य देशांतील परिचारिका असोत की संन्यासिनी (Nuns) असोत, त्यांना दिर्घकालपर्यंत 'छात्रावस्थे'त किंवा 'ट्रेनिंग'मध्ये राहावं लागतं. अन् नंतर जन्मभर कडक नियमपालन करावं लागतं. अशा स्थितीत, गृहिणीधर्म स्वीकारणाऱ्या तरुण मुलीला मात्र हायस्कूलच्या किंवा कॉलेजच्या पुस्तकाचा अभ्यास केला की पुरेसे 'ट्रेनिंग' मिळाले, असे मानण्याचा वेडेपणा स्वतःला पुरोगामी म्हणवणाऱ्या माणसांनी करावा, हे नवल आहे. किंबहुना, पुरोगामी माणसांखेरीज कुणीच असे मानण्याचा वेडेपणा करणार नाही!

स्त्रियांना गृहिणीधर्माचं शिक्षण द्यायचं म्हणजे त्यांना शाळा-कॉलेजातल्या इतिहास, भूगोल, फिजिक्स-केमिस्ट्रीच्या जोडीला शिवणकाम, भरतकाम, शिकवायचं, अशी काही विद्वानांची कल्पना आहे! नवऱ्याच्या उशीवर 'Good Night' किंवा 'Sweet Dreams' ही इंग्रजी अक्षरं रेशमानं भरता आली म्हणजे ती नवरी गृहिणीपदाला पात्र झाली! पण यांना शोभेच्या विद्या किंवा 'accomplishments' म्हणतात. हे गृहिणीपदाचे ट्रेनिंग नव्हे. फार काय, कठिण प्रसंगात नवऱ्याकरिता सुखाचा अन् स्वास्थ्याचा त्याग करणं हेदेखील गृहिणीचं ट्रेनिंग नव्हे. कारण तो प्रसंगच तशी स्फूर्ती देईल!

खरं 'ट्रेनिंग' दैनंदिन संसारिक जीवनाकरिताच अधिक आवश्यक असतं. भारतीय पत्नीची भूमिका ही रंगभूमीवरची प्रकाशातली भूमिका नसून, पडद्यामागे राहून स्टेज सजवणाराची, मेकअप करणाराची वा 'प्रॉम्पटिंग' करणाराची भूमिका असते. अशा भूमिकेकरिता जर भावी गृहिणीच्या मनाला कोणतं वळण द्यावं लागत असेल, तर ते मागं राहून आपलं काम करीत राहण्याचं! Remaining in the background' या वृत्तीचं! जर आजचं पुस्तकी शिक्षण तरुण मनातील आक्रमकपणा, आत्मप्रदर्शन अथवा दिखाऊपणा वाढवीत असेल, तर ते तरुण मुलींना गृहसंस्थेला अपात्र बनवीत आहे. याचा अर्थ त्यांना स्वयंपाक करता येणार नाही किंवा लहान मुलाची झबली शिवता येणार नाहीत, असा नव्हे. (जुन्या लोकांना ती भीती पडे! ) उलट, त्यात

आधुनिक मुली जुन्याच्यापेक्षाही तरबेज असतात! पण आपल्या आत्मप्रदर्शनामुळे, आग्रही वृत्तीमुळे किंवा 'assertiveness' मुळे त्या दुसऱ्यांना दुःखी करून स्वतः दुःखी होतील.

सामान्य दैनंदिन गोष्टी धिम्मेपणानं करणं, ज्याचं श्रेय नवऱ्याला किंवा मुलाला मिळणार आहे अशा कामाची तयारी किंवा शिदोरी मागं राहून करून देणं या गोष्टी पत्नी म्हणून किंवा आई म्हणून स्त्रियांना जन्मभर कराव्या लागतात. स्त्री एकवेळ हुशार नसली तरी चालेल, पण ती जर स्वतःचे प्रदर्शन करणारी,स्वतःला श्रेय मिळण्याकरिता तडफडणारी, तसे श्रेय मिळेल तरच काम करणारी असेल तर, गृहिणी म्हणून अपेशी ठरेल.

पुरुषाचं शिक्षण घेण्यानं, पुरुषांच्या शाळा-कॉलेजात जाण्यानं 'मुली बिघडतील' म्हणजे प्रेमात पडतील, किंवा कुणाच्या प्रेमाचा विषय होतील, ही जुन्या लोकांना भीती वाटे! आता ती भीती (वेगवेगळ्या कारणांनी! ) कमी झाली आहे. पण खरी भीती वेगळीच आहे. पुरुषी शिक्षणानं, पुरुष-विद्यार्थ्यांच्या अनुकरणानं, मुली प्रदर्शनप्रिय अन् 'assertive' बनल्या तर गृहसंस्थेला निरुपयोगी बनतील! त्यांना 'शिक्षणा'पेक्षाही 'वळणा'ची, ट्रेनिंगची इतकेच नव्हे तर बोलणं, चालणं, पेहेराव यांसारख्या गोष्टींतल्या शिस्तीची गरज आहे ती यामुळेच.

शिक्षण शाळा-कॉलेजं देतील, पण वळण लावण्याचं काम घरच करू शकेल. आज मात्र कॉलेज कन्यकांची तरी अशीच स्थिती दिसते की 'धोबी का कुत्ता, न घर का न घाट का!' शाळेच्या मुलींची स्थिती आज तशी नाही. पालकांच्या सहकार्याने 'शिक्षणा' बरोबरच 'वळण' लावण्याचं कामही केलंच तर कदाचित् शाळाच करतील!

ना. दा. ठा. कन्याशाळा, पुणे,
ज्युबिली अंक १९६९, पृ. ४-५.

अनुक्रमणिका

# १२

## स्त्रियांच्या सुरक्षिततेचा कूट प्रश्न

गेल्या आठवड्यात सोलापूर येथे भरलेल्या 'पूर्व महाराष्ट्र प्रांतिक महिला परिषदे'च्या अधिवेशनात आमदार सौ. प्रभाताई झाडबुके यांनी अध्यक्ष या नात्याने जे धीट, सात्त्विक संतापाचे उद्‌गार काढले ते आजच्या एका शोचनीय प्रश्नावर प्रकाश टाकणारे होते. त्या म्हणाल्या, ''नोकरी करणाऱ्या महिलांच्या शीलाची आज शाश्वती राहिलेली नाही... आमदार म्हणून नव्हे, तर एक स्त्री म्हणून मी माझी व्यथा बोलून दाखविणार आहे... शीलाच्या रक्षणासाठी महिलांना शस्त्र द्या म्हणण्याची पाळी यावी, हे देशाचे दुर्दैव होय...''

त्यांनी या संबंधात सरकारच्या कार्यक्षमतेवर जशी टीका केली, तशीच खेड्यापर्यंत पोहोचलेल्या 'टेरिलिन संस्कृती' वरही टीका केली. एक काँग्रेसपक्षीय आमदार या नात्याने सौ. प्रभाताई झाडबुके यांचे सरकार-दरबारातले ऋणानुबंध लक्षात घेता, त्यांच्या या स्पष्टोक्तीचे विशेषच कौतुक केले पाहिजे. सरकारी नोकरीतील स्त्रियांच्या संरक्षणासंबंधी त्यांनी जो कडक इशारा दिला तो योग्यच होता, पण हा प्रश्न केवळ नोकरीच्या क्षेत्रापुरता मर्यादित नाही, हे वृत्तपत्रांत स्त्रियावरील अत्याचाराच्या वा स्त्रियांच्या उपमर्दाच्या ज्या वार्ता येतात त्या पाहिल्या तर, सहज लक्षात येईल.

सोलापूरची ही परिषद चालू असतानाच, मुंबईच्या लोकल गाडीच्या पहिल्या वर्गात भर दिवसा, एका सुशिक्षित विवाहित स्त्रीचा अमानुष खून झाल्याची वार्ता पुण्या-मुंबईच्या वृत्तपत्रांत आलेली होती. रेल्वेसारख्या सरकारी वाहनांत, सार्वजनिक रस्त्यांत वा कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांवर अत्याचारच केवळ नव्हे, तर स्त्रियांची अप्रतिष्ठा होणेदेखील सरकारइतकेच समाजाला कालिमा आणणारे आहे. पुण्याच्या गणेशोत्सवाची वार्षिक वर्णने वाचली तर, त्यात करमणुकीच्या कार्यक्रमाप्रमाणेच स्त्रियांच्या विनयभंगाचे वा निदान उपमर्दाचे प्रकार हमखास वाचायला मिळतात. अशा मोठ्या शहरांतल्या मोठ्या उत्सवांत अलीकडे पोलीसलोक खास दक्षता घेऊन गुन्हेगार टिपून काढतात ही गोष्ट प्रशंसनीय आहे. पण सरकारइतकेच या बाबतीत समाजाचेही कर्तव्य आहे हे विसरता येत नाही. एक साधीच गोष्ट सांगावीशी वाटते. गर्दीचं आणि उत्सवाचं वातावरण पाहून, अनोळखी सभ्य स्त्रियांना उद्देशून घाणेरडे शब्द उच्चारणारे वा वेळप्रसंगी त्यांच्याशी अतिप्रसंग करणारे तरुण आढळल्यास, वृत्तपत्रांनाही योग्य भाषेत त्यांच्यासंबंधी तिरस्कार दाखविता येईल. पण पुष्कळदा इंग्रजी सामाजिक मूल्यांचं आणि इंग्रजी वृत्तपत्राचं अनुकरण करून अशा बिनअब्रूच्या असभ्य इसमांचा उल्लेख 'प्रेमवीर' या सौम्य थट्टेखोर शब्दाने केलेला आढळतो. याचं कारण इतकंच की, इंग्रजी वृत्तपत्रं अशा तरुणांचं वर्णन 'Roadside Romeos' या शब्दांनी करतात! या इंग्रजी शब्दप्रयोगात इंग्रज समाजाचीदेखील अशा वर्तमानासंबंधीची वृत्ती योग्य प्रकारानं प्रतिबिंबित होते असे मला वाटत नाही. रस्त्यातील स्त्रियांशी असभ्यपणे वा उल्लूपणे वागणारांना 'रोमिओ' म्हणणं, किंवा मजनू म्हणणं म्हणजे मवाल्यांना मानकरी बनवण्यातला प्रकार आहे! 'रोमिओ' या नावाचा हा उपयोग शेक्सपीअरला मान्य झाला असता असे मला वाटत नाही. काव्यात अमर झालेला मजनूही मवाली नव्हता! पण तूर्त आपल्याला काळजी शेक्सपीअरच्या अन् उर्दू कवीच्या भावनांची नसून रस्त्यांतल्या मवाल्यांच्या मनाची आहे. त्यांना या पदव्यांनी मूठभर मांसच चढत असेल.

मवाल्यांचे अप्रत्यक्षपणेही कौतुक होता उपयोगी नाही, ही झाली पहिली गोष्ट. पण हा प्रश्न केवळ असभ्यपणाचा किंवा स्त्रियांच्या उपमर्दाचा नाही. आगगाडीच्या डब्यात किंवा पुण्यासारख्या शहराच्या गल्लीबोळात अंगावरचे दागिने ओढण्याचे अनेक प्रकार होतात. क्वचित् त्यात विनयभंगाचाही हेतू असतो. अशा परिस्थितीत स्त्रियांना शस्त्र आणि शस्त्रशिक्षण देण्याची कल्पना अनेक वेळा निघते. सोलापूरच्या महिला परिषदेतही निघाली होती. पण तो इलाज केवळ निर्वाणीचा होय; अन् शिवाय त्याचा उपयोग संशयितच म्हटला पाहिजे. कारण एका बाजूला निर्ढावलेला गुन्हेगार अन् दुसऱ्या बाजूला जन्मात प्रथमच शस्त्र चालविणारी घरंदाज स्त्री, अशा मामल्यात शस्त्र कोणत्या पक्षाला अधिक अनुकूल होईल हे सांगायला नकोच. पण हेही खरे की, शस्त्र बाळगण्यानं अन् ते वापरण्याच्या मानसिक तयारीनं आमच्या अतिसभ्य स्त्रियांची प्रतिकारशक्ती वाढेल. मवाल्यांशी प्रसंग-अन् कदाचित अतिप्रसंग या कल्पनेनं त्या आजच्याप्रमाणं गर्भगळित होणार नाहीत. पण आमदार सौ. झाडबुके यांनी म्हटल्याप्रमाणं स्त्रियांना स्वतःचे संरक्षण करण्याची वेळ येणं हे दुर्दैवच होय. दुर्दैवच केवळ नव्हे तर कोणत्याही सरकारला अन् समाजाला ती लज्जेची गोष्टच वाटली पाहिजे. पण यात जबाबदारी फक्त सरकारचीच असं मानून चालणार नाही. प्रत्येक माणसागणिक एक पोलीस, असे तर सरकार खासच करू शकत नाही.

आज आपल्या समाजात भुरटे चोर आणि मवाली यांचं 'धैर्य' वाढलं आहे, अन् सभ्य माणसांचं धैर्य कमी झालेलं आहे. भर दिवसा रस्त्यात वा रेल्वे डब्यात एकट्या-दुकट्या चोरानं एखाद्यावर हल्ला केला तर, दुसरे प्रवासी मध्ये पडण्याची तर आशा नाहीच, पण साखळी ओढतील हीदेखील शाश्वती नाही. कुणी उगीच अडीचशे रुपये (दुरुपयोग ठरला तर होणारा दंड! ) भरायचे! गेल्या तेरा तारखेला मुंबई लोकलमध्ये झालेल्या खुनाच्या वेळची हकीगत बोलकी आहे. ''गाडी (कळवा स्टेशनवरून) पुढे गेल्यावर सौ. मंदा पाटणकर बसल्या होत्या त्या डब्यातून रक्ताचे ओघळ वाहत असलेले बाजूच्या डब्यातील लोकांना दिसले. परंतु भांडूप स्टेशन येईपर्यंत कोणीही गाडी थांबवून पोलिसांना कळविण्याचे कर्तव्य बजावले नाही. उलट भांडूप स्टेशनवर आल्यावर, शेजारच्या डब्यात काहीतरी भयानक प्रकार घडला आहे असे कळल्यावर, 'नको ती भाडनड' म्हणून प्रत्येकजण गुपचूप दुसऱ्या डब्यात जाऊन बसला. पोलिसांच्या नाकर्तेपणावर तुटून पडणारे लोक, जनतेची 'मला काय त्याचे' ही वृत्ती मात्र लक्षात घेत नाहीत.'' (दै. मराठा)

लोकांच्या या घाबरट वृत्तीचं मूळ शोधायचं म्हणजे या देशाचा बुद्धकालापासूनचा इतिहासच शोधायचा असा प्रकार आहे. आमच्या अहिंसावादाबरोबर आणि आमच्या निवृत्तिवादाबरोबरच आमच्यातली प्रतिकारशक्ती कमी होत गेली. आपलं काम अन् आपली सुरक्षितात सोडून एखाद्या धटिंगणाला हटकण्याला जी ताकत अन् फुरसत लागते ती आमच्या समाजात, विशेषतः सुशिक्षित समाजात आज उरलेली नाही. त्यातल्या त्यात मुंबईसारख्या ठिकाणी तर नोकरीवाल्या माणसांना पाच मिनिटांचीही फुरसत नसते. स्वतःच्या घरी कुणी मेलं तरी ज्या दुर्दैवी मध्यमवर्गीयांच्या डोक्यात 'साहेब रजा देईल की नाही?' हा पहिला प्रश्न येणार ते, शेजारच्या डब्यात खून झाल्यावर त्यात लक्ष घालून 'विकतचे श्राद्ध' घेतील, ही आशाच नको!

स्त्रियांवरील हल्ल्यात-मग ते शीलावर असोत की दागिन्यांवर असोत-ताकत अजमावली जाते ती स्यित्रांची नव्हे, तर त्यांच्यामागे उभ्या असलेल्या त्यांच्या पुरुषांची होय. वृत्तपत्रांतल्या वार्तांवरून तरी स्थूलमानाने असं म्हणता येईल की, हल्ले होणाऱ्या स्त्रियांत पारशी, मुसलमान, ख्रिस्ती स्त्रियांपेक्षा हिंदू स्त्रियांचीच

संख्या अधिक दिसून येते. त्यातही सुशिक्षित हिंदू स्त्रियांची संख्या अधिक दिसून येते, याची कारणं विचार करून शोधण्यासारखी आहेत. ज्या समाजातल्या पुरुषांजवळ पैशाचेही बळ कमी, दंडेलीची तयारी कमी त्या समाजातल्या स्त्रियांवर हल्ले करताना गुंडांना दहशत वाटत नाही. कारण गुंडांना दहशत प्रथमतः आजूबाजूच्या लोकांची असते-पोलिसांची गोष्ट नंतरची असते. आज हिंदू स्त्रियांची घराबाहेरची हालचाल ज्या प्रमाणात वाढली आहे त्या प्रमाणात त्यांचं धैर्य वाढलेलं नाही. शिवाय, इतर समाजांतल्या-विशेषतः पारशी, ख्रिस्ती, युरोपियन समाजांतल्या स्त्रियांच्या मानाने आमच्या स्त्रियांच्या अंगावर आजही सोनंनाणं हमखास अधिक मिळण्याची चोरांना उमेद असते! तसेच, इतर समाजांतल्या स्त्रियांप्रमाणे त्यांच्याजवळ, सहज लांबवण्यासारखी, जणू चोराकरिता तयार ठेवलेली मनीबॅगही असते. अनेक शतके मिळालेल्या शालीनतेच्या शिक्षणामुळे त्यांना जोरात ओरडण्याइतपतही प्रतिकारशक्ती नसते. उलट, सराईत चोरांजवळ केवळ रामपुरी चाकूच असतो असे नव्हे, तर माणसाच्या 'सायकॉलॉजी'चे ज्ञान केवळ चेहरा पाहून त्यांना होत असतं! त्यामुळे एकट्यादुकट्या शालीन स्त्रीवर म्हणजेच बहुसंख्य हिंदू स्त्रियांवर हल्ले करण्याचा चोरांना विशेष मोह होतो.

अर्थात् कनिष्ठ सरकारी नोकरीतील स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न व सर्व समाजांतल्या मोकळेपणानं वावरणाऱ्या पण शालीन स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हे दोन वेगळे प्रश्न आहेत. समाजातल्या शालीन स्त्रियांना घराबाहेर मोकळेपणानं वावरायचं असेल, एकटी-दुकटीने प्रवास करायचा असेल तर, नुकते शस्त्र बाळगण्यानं काम भागणार नाही. हा प्रश्न स्त्रियांच्या सशस्त्रतेचा नाही तर पुरुषांच्या सशक्ततेच्या, निर्भयतेचा आणि बेगुमानपणाचा आहे. सावरकरांनी हिंदूंच्या ज्या 'मला काय त्याचे'-या वृत्तीवर कडाका उडविला आहे, त्या वृत्तीचे मूळ हिंदूंच्या शारीरिक, मानसिक आणि आर्थिक दुबळेपणात आहे. ज्यांच्यावर स्वतःवर किंवा ज्यांच्या कुटुंबियांवर हल्ला झाला ते स्वतःदेखील 'नको ती कटकट' म्हणून पोलीसांशी सहकार्य न करता अंगचोरपणा करतात, ही पोलिसांची कायमची तक्रार आहे! अर्थात् पोलीसही कधी अंगचोरपणा करीत नाहीत असं नव्हे!

निदान स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ पोलिसांचा प्रश्न नव्हे एवढं तरी म्हटल्यावाचून गत्यंतर नाही!

केसरी (सहज संवाद),<br>२८ डिसेंबर १९६९, पृ. ८.

अनुक्रमणिका

# १३

## महिलांवरील अत्याचार-मनोरचना

स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण अलीकडे वाढले आहे का? की वृत्तपत्रांत ठळक वार्ता आली म्हणजे आपणांला एखाद्या गोष्टीचे प्रमाण अधिक वाटू लागते? पण अशा बाबतीत 'प्रमाण', 'सरासरी', 'शेकडेवारी' हे शब्द वापरणेच मुळी वेडेपणाचे आहे. आमच्या पुणे विद्यापीठ आवारात ''अलीकडे सापांचे प्रमाण कमी झाले आहे!'' असे मी जेव्हा थोड्या समाधानाने एका परप्रांतीय प्राध्यापकांना म्हटले तेव्हा, चकित व रुष्ट होऊन ते म्हणाले, ''Why, even one is enough! '' का? एक सापसुद्धा पुरेसा नाही का?

तोच न्याय स्त्रियांवरील अत्याचाराला लागू केला पाहिजे. पुण्याच्या गजबजलेल्या रेल्वे स्टेशनवर पाच वर्षांत एक बलात्काराचा प्रकार झाला, अन् समजा, कलकत्त्याच्या किंवा मास्कोच्या स्टेशनवर पाच वर्षांत दोन बलात्कार हे प्रमाणे पडत असले तर, पुण्याची स्थिती समाधानकारक समजायची का? या बाबतीत 'एक बलात्कारदेखील पुरेसा-म्हणजे सरकार व समाज यांना खडबडून जागे होण्याला पुरेसा आहे' हीच दृष्टी बरोबर आहे. पण वृत्तपत्रात ठळक ठशांचा मथळा येण्यापलीकडे अधिक खळबळ दिवसाढवळ्या रेल्वेच्या डब्यात कुलीन स्त्रीची अब्रू घेतल्यानेही आज होत नाही. किंबहुना ''पाचजणांना पोलिसांनी ताब्यात घेतले'', ''तरुणीला उपचारार्थ ससूनमध्ये पाठविले'', ''मॅजिस्ट्रेटकडून 'रिमांड' मागून घेतला'' अशा वार्ता वाचता वाचता, समाजाच्या संतापाची वाफ हवेत विरून जाते, असे म्हटले तरी चालेल. कधी कधी तर या अत्याचाराचे पुढे काय झाले हे आपल्याला कळतदेखील नाही. आपण नवे अत्याचार वाचण्यात जुने अत्याचार विसरून जातो!

चतुःशृंगीजवळ एका झाडाखाली स्कूलबसची वाट पाहाणाऱ्या एका सहा-सात वर्षांच्या बालिकेला चॉकोलेटची लालूच दाखवून एक वीस वर्षांचा माणूस रोज आडोशाला नेत असे व तो अखेर पकडला गेला, ही वार्ता पंधरा दिवसांपूर्वी येऊन गेली. पुढे त्या बालिकेचे काय झाले? त्या गुन्हेगार इसमाचे काय झाले? वृत्तपत्र-वाचकांना खबर नाही. हा विषय वृत्तपत्रवार्ताहर आणि पोलीस यांचाच फक्त आहे, असे आज आपण समजतो. पण जुन्या समाजात पोलीस आणि वार्ताहर यांच्याही आधी, रस्त्यावरच्या लोकांनी या गुन्हेगाराचा समाचार घेतला असता. कदाचित् त्याच्यावर 'लिंचिंग'चाही प्रसंग गुदरला असता. अठराव्या शतकात व्हर्जिनियातील कोणा एका 'कॅप्टन लिंच्' याने, गुन्हेगारांना लोकांनी तिथल्या तिथे ठेचण्याचा मार्ग मान्य ठरविला होता! पेशवाईत घाशीराम कोतवालाला त्रस्त ब्राह्मणांनी असाच ठेचून ठार केला!

हा प्रकार बेकायदा आणि अमानुष तर खराच, पण गुन्ह्याच्या जागेवरून गुन्हेगार पसार झाल्यावर पुरावा शोधीत बसणे, अन् अखेर 'सबळ पुराव्याअभावी' गुन्हेगार शिक्षेशिवाय सुटणे, यापेक्षा हा प्रकार बरा! अन् कोर्टात शिक्षा झाली तरी काय? एकीकडे सुधारणेच्या नावाखाली तुरुंगांना शाळांचे रूप देण्याचा कार्यक्रम सुरू असल्यावर, बिनअब्रूच्या निर्ढावलेल्या गुन्हेगारांना वर्ष दोन वर्षं तुरुंगात राहण्याचे भय का वाटावे? मी तर असे ऐकतो की, काही गुन्हेगार आपण केलेल्या स्त्रीविषयक गुन्ह्यांच्या 'सुखद' आठवणीने इतके धुंद असतात, की त्यांना मामुली सक्तमजुरीचे विशेष काहीच वाटत नाही.

अनुक्रमणिका

अलीकडे बलात्काराच्या गुन्ह्याबद्दल चार इसमांना गोळ्या घालून ठार केल्याची रशियातील वार्ता वृत्तपत्रांत आली होती. कम्युनिस्ट राजवटीतल्या 'फालतू' गोष्टी घेण्यापेक्षा, आमच्या 'समाजवादकांक्षिणी' राजवटीने अशा काही कडक न्यायाच्या गोष्टी का घेऊ नयेत, हे मला समजत नाही! जुन्या काळात चोरी करणाराचा हात तोडणे, अतिक्रमण करणाराचा पाय तोडणे, अशा 'अपराधी इंद्रियानुसार' शिक्षा असत. रेल्वे कंपार्टमेंटमधील स्त्रीच्या असहायतेचा फायदा घेऊन बलात्कार करणाऱ्या नरपशूंना अशी इंद्रियविच्छेदाची शिक्षा असती तर, स्त्रियांवरील गुन्हे आजच्याइतके वाढले नसते. बेगम नूरजहान हिच्या हातून तटापलीकडील माणसाला चुकून गोळी लागली. त्या माणसाची बायको दाद मागण्याकरिता आली असता, बादशहा जहांगीर याने तिच्या हाती तीच बंदूक देऊन सांगितले, "जिने तुझ्या नवऱ्याला गोळी घातली तिचा नवरा तुझ्यापुढे उभा आहे. घाल गोळी!" आज कायद्यात अन् शिक्षेत सुधारणा (म्हणजे सौम्यता! ) झाली आहे, पण गुन्हेगार मात्र आहेत त्याच पायरीवर आहेत! 'जहांगिरी' कायदा लागू केला तर, गुन्ह्यांचे प्रमाण कमी होईल. अर्थात् जबरी संभोगाबाबत हा 'eye for eye' चा कायदा लागू करावा, असे आपण भारतीय तरी म्हणणार नाही!

पण आज शिक्षण आणि यांत्रिक सुधारणा यांत वाढ असूनही लैंगिक गुन्हे कमी होत नाहीत याचे कारण शोधले पाहिजे. इतर सुधारणांबरोबरच वाचन आणि करमणूक यातही 'सुधारणा' झाली आहे! म्हणजे वाचणारांची संख्या वाढली आहे. गुन्हेगारांतही आज बहुतेक सर्व साक्षर, शिकलेले व वाचणारे असतात. पूर्वी ज्या लोकांना तमाशे आणि कुस्त्या एवढ्याच करमणुकी माहीत होत्या, त्यांना आज गुन्ह्याचे प्रात्यक्षिक दाखविणारे चित्रपट रोज उपलब्ध झाले आहेत. तमाशात खेडवळ शृंगार असे, पण गुन्हेगारीचे शिक्षण नसे.

पण त्यापेक्षाही अधिक कुसंस्कार गेल्या दहाबारा वर्षांतल्या लैंगिक लिखाणाने केले आहेत. त्यातले जे उत्तान असते त्याने फार तर कामुक वृत्ती निर्माण होईल, पण मनोविश्लेषण आणि अतिवास्तववाद यांच्या प्रतिज्ञेमुळे ज्या वाङ्मयात स्त्री-पुरुष आकर्षणाकडे थंड आदरशून्य वृत्तीने पाहिलेले असते त्या वाङ्मयाचा परिणाम आज समाजावर फार घाणेरडा होत आहे, अशामुळे स्त्रिया आणि स्त्रियांचा स्वाभाविक विनय यांकडे तुच्छेतेने पाहाण्याची वृत्ती निर्माण होत आहे. लज्जा, विनयवृत्ती या अर्थशून्य म्हटल्यावर, विनयभंगाचा आरोपही या नव्या तत्त्वज्ञानाप्रमाणे अर्थशून्यच ठरतो! थोडक्यात म्हणजे, स्त्री-पुरुषांमधील संबंध हा दोन जनावरांतील संबंधाच्या पातळीवर येऊन ठेपतो. राहता राहिली भीती कायद्याची! तिला वळसा कसा घालायचा ते शिकवणारे पंडित समाजात मिळतातच!

इकडे हळूहळू सिनेमापेक्षाही उघड आणि उत्तान करमणुकी साध्याभोळ्या मराठी समाजाला उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आपल्या समाजात पूर्वीही नृत्य नव्हते असे नाही. उलट, आजच्यापेक्षा त्याला अधिक हक्काचे स्थान होते. श्रीमंतांच्या लग्नकार्यात व दरबारात नायकिणीचे नाच 'सर्वमान्य परंपरा' म्हणूनच होत असत. पण त्या नृत्याला गायनाचे अधिष्ठान असे. ते नृत्य करणारा नायकिणींचा वर्ग वेगळा आणि पिढीजात असे. आज ते समारंभात्मक नृत्यप्रसंग संपुष्टात आले आहेत. उलट, खास शास्त्रीय नृत्याचा,- 'भरतनाट्यम', 'कथ्थकली', 'कथ्थक' इत्यादींचा प्रवेश आमच्या कुलीन स्त्रियांच्या कलोपासनेने झाला आहे. हे नृत्य कष्टसाध्य म्हणूनही फार वाढत नाही. अन् त्याला आपल्या पारंपारिक समारंभात स्थान नसल्यानेही ते लोकांपर्यंत पोहोचत नाही.

उलट, पाश्चात्य नृत्याचा प्रवेश मात्र चित्रपट, नाटक आणि नाइटक्लब यांच्याद्वारे अधिक होत आहे. आपल्या नृत्यात शरीराच्छादनाला, ड्रेपरीला आणि पदराच्या विभ्रमांना फार महत्त्व, तर पाश्चात्यांच्या आजच्या नृत्यात शरीर उघडे टाकण्याला महत्त्व! या 'उघडेपणा'चा शेवटचा प्रकार म्हणजे 'strip tease' नृत्य! खास धनाढ्य लोकांकरिता असलेल्या मुंबई-कलकत्त्याच्या हॉटेलांत 'कॅबरे' म्हणून जे नाच होतात त्यांत प्रायः नग्न अवस्थेत सुंदर स्त्रियांनी नाचणे, त्याच वेषात प्रेक्षकांत येऊन मिसळणे, हेच वैशिष्ट्य असते. एक दोन आठवड्यांमागे मुंबईच्या 'इलेस्ट्रेटेड् वीकली'ने, या (प्रायः) नग्ननृत्याच्या वर्णनार्थ खास अंक काढला होता व त्यात विवस्त्र अवस्थेत असलेल्या स्त्रियांचे फोटो छापले होते. या नग्ननृत्यात पूर्वी फक्त युरोपियन स्त्रियाच उपलब्ध असत. आज भारतीय स्त्रियांनीही इतपत प्रगती केलेली आहे! खुद्द पुण्यात महिला परिषदेच्या 'मौज' कार्यक्रमांत हे नग्ननृत्य झाल्याची तक्रार एका महिलेनेच केली आहे! हे सर्व सांगण्याचे कारण असे की, कलेची जागा आज 'नग्नता' अर्थात् स्त्रियांची नग्नता घेत आहे हे होय. अशा स्थितीत स्त्री-पुरुषांना एकमेकांविषयी वाटणारा संकोच आणि आदर नष्ट झाला तर नवल नाही. आणि लाज व आदर नष्ट झाल्यावर माणूस आणि पशू यांत फारसा फरक नाही. सामान्य माणसांना पशू बनवण्याचे कार्य सवंग मासिके व कथाकादंबऱ्या करीत आहेत, तर बड्या लोकांना पशुत्वाचा आनंद देण्याचे कार्य 'कॅबरे' हॉटेल्स करीत आहेत. या स्थितीचा संबंध लैंगिक गुन्ह्यांच्या वाढीशी तर नसेल ना?

तरुण भारत,
२५ फेब्रुवारी १९७०, पृ. २.

अनुक्रमणिका

# सुशिक्षित स्त्रियांची भजनी मंडळे

काही दिवसांपूर्वी मी एका धार्मिक उत्सवाच्या ठिकाणी गेलो होतो. एका प्रख्यात भजनी मंडळाचा कार्यक्रम त्या ठिकाणी होणार असे जाहीर झाले असल्याने, खूप समाज जमलेला होता. येणारं भजनी मंडळ पुण्याच्या पुढारलेल्या भागातलं अन् स्त्रियांचं होतं. ते येऊन दाखल होईपर्यंत उत्सव साजरा करणाऱ्या संस्थेचा नेहमीचा गायक कबीराची पदं म्हणत होता. स्त्रियांचं निमंत्रित मंडळ येऊन दाखल होताच, पहिलं तात्पुरतं पद्यगायन थांबलं आणि त्या प्रतीक्षित प्रख्यात भजनी मंडळाचं भजन सुरु झालं. काय असेल ते असो, त्या पहिल्या अप्रसिद्ध गायकानं जे भक्तीचं अन् वैराग्याचं वातावरण निर्माण केलं होतं, ते त्या स्त्रियांच्या सुरेल संगीत भजनानं निर्माण झालं नाही. वास्तविक आजकाल 'स्त्रियांची भजनी मंडळं' ही एक मोठीच सामाजिक चळवळ होऊन बसली आहे. ती खूप लोकप्रियही आहे, अन् (वेळ सत्कारणी लावायला) उपयुक्तही आहे. त्यात तंबोरे, हार्मोनियम, व्हायोलिन, सुस्वर आणि गानशिक्षित स्त्रिया हा सर्व सरंजाम असतो. पण हे सर्व असूनही त्या साध्या पद्यगायकाच्या भजनाचा परिणाम अधिक का व्हावा, असा विचार माझ्या मनात आला.

आजकाल रेडिओवरही अनेक स्त्रीपुरुष भजनं गातात. रेडिओनं या प्रकारच्या गायनाला 'भक्तिसंगीत' हे नाव देऊन टाकलं आहे. या नावामुळे दोन कार्यभाग साधले. पहिली गोष्ट म्हणजे नियोजित कार्यक्रमात 'अभंग' आहे, की 'पद' आहे, की 'धावा' आहे, ते ओळखून नेमकं जाहीर करायला नको! कारण मग पुष्कळदा पदाला 'अभंग' म्हणणं, अभंगाला 'पद' म्हणणं असा घोटाळा होतो. अन् दुसरी गोष्ट साधते ती म्हणजे 'भक्तिसंगीत' या नावानं तो 'सुगम संगीता'सारखा एक संगीताचा प्रकार ठरून भक्तीला गौणत्व येतं. हळूहळू स्त्रियांची भजनी मंडळंदेखील आपल्या कार्यक्रमांना 'भक्तिसंगीत' हे नाव देतील. नव्हे त्यांनी ते नाव दिलेलं बरं! कारण त्यांच्या कार्यक्रमात मला तरी 'भक्ती'चा भाग बेताचाच दिसतो. बहुतेक सगळं 'संगीत'च असतं. म्हणजे 'देवळात वा धार्मिक उत्सवात होणारा करमणुकीचा कार्यक्रम' असं त्याला हळूहळू स्वरूप येत आहे.

पण भजन करणाऱ्या स्त्रियांची अन् भजन बसविणाऱ्या संगीत-शिक्षकाची इच्छा मात्र ही स्त्रियांची भजनं 'करमणुकीत' जमा व्हावीत अशी खासच नसणार. म्हणजे या नव्या संगीत भजनाच्या शिक्षणात काही तरी चुकत आहे असं मला वाटतं. जी उणीव स्त्रियांच्या भजनी मंडळात दिसते तीच रेडिओवरच्या भक्तिसंगीतातही दिसते. म्हणून त्याचा थोडा विचार करायला हवा.

'लोकांनी अधिकाधिक भजन करावं', 'स्त्रियांनी दुपारचा वेळ भजनातच घालवावा' असा माझा आग्रह नाही. पण भजनी मंडळांनी अन् रेडिओकेंद्रांनी, 'भजन' म्हटल्यावर मात्र 'भजन'च द्यावं, भजन म्हणून नुसतं संगीत देऊ नये, असं मला वाटतं. आजकालच्या भजनी मंडळांची कल्पना मात्र उलट दिसते. आपण अभंगच रागदारीत म्हटला, आलटून पालटून एकेकीनं तंबोरा घेऊन ताना घेतल्या, म्हणजे नुसत्या भाबड्या भजनापेक्षा आपलं भजन अधिक उंचावलं अशी यांची कल्पना दिसते. म्हणून 'लाईट म्युझिक'चा कार्यक्रम अन् भजनाचा कार्यक्रम यांतला फरक या मंडळींनी ध्यानात घेतला पाहिजे. भजनात प्रसिद्ध संतांच्या प्रसिद्ध कवनांचं महत्त्व तानबाजीपेक्षा अन् सुरेल स्त्रीकंठापेक्षाही अधिक असतं, हे अलीकडे विसरलं जात आहे असं वाटतं. पुरुषांच्या

भजन मंडळातल्या प्रमुख गायकांचे आवाज स्त्रियांच्या आवाजाइतके गोड खासच नसतात, अन् तरी ते श्रोत्यांना भक्ती आणि वैराग्य यांच्या दुनियेत नेऊन सोडू शकतात.

मी पुणातल्या फार भजनी मंडळांचं भजन ऐकलं आहे असं नव्हे. पण माझ्या परिचयातलं उदाहरण म्हणून मला आठवतं, ते देतो. पुण्याचे श्री. दिनकरपंत नातू हे बेळगावकडील प्रसिद्ध संत बाळेकुंद्रीकरमहाराज यांची पदं भजनात म्हणतात. स्त्रियांच्या मानानं त्यांचा आवाज अर्थात्च थोडा 'भरडा' आहे. तरी पदांतील भाव श्रोत्यांच्या मनात उमटवून त्यांना तल्लीन करून सोडण्याचं कार्य भजनी बैठकीत तर होतंच, पण त्यांच्या रेडिओवरच्या भजनातही होतं. भजनातील गायनात गायनशास्त्रापेक्षा आणि सुस्वरापेक्षाही गायकाच्या तल्लीनतेचं म्हणजे स्वतःला विसरून गाण्याचं महत्त्व अधिक असतं. आमच्या स्त्रियांच्या भजनात नसतं ते नेमकं हेच! त्या स्वतःला विसरत नाहीत. इतकेच नव्हे, तर संतांच्या पवित्र वाणीपेक्षाही त्यांचं मन ताल, सूर, तबला, पेटी, तानबाजी यांत अधिक गुंतल्यासारखं वाटतं. सारांक्ष, त्यांचं नातं अभंगातल्या भावनेशी नसून फक्त संगीताशी आहे असा भास होतो. अर्थात् ही भजनसंस्थेशी प्रतारणा आहे, व्हायला हवं उलट. त्यांना स्वतःला आणि त्यांच्या श्रोत्यांना संगीताचं विस्मरण होऊन फक्त भक्तीचंच भान राहायला हवं. अन् हे सदाशिव पेठेतल्या कुलीन गायकांना तर अवघड नाहीच-पण गोहरजानसारख्या मुसलमान गायिकेलाही सहजसाध्य होतं.

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. साताऱ्याच्या शाहू नाट्यगृहात कलकत्त्याची प्रख्यात गायिका गोहरजान हिचा जलसा होता. आषाढी एकादशीचा दिवस आहे हे ओळखून त्या त्रिखंड फिरलेल्या चतुर कलावंतिणीनं —

राधेकृष्ण बोल मुख से ।
राधेकृष्ण बोल ।

हे प्रख्यात भजन इतक्या भक्तिभावानं म्हटलं की तालसुराऐवजी ते थिएटर त्या रात्री भक्तिभावानं भरून गेलं! मुसलमानांच्या कव्वाली गायनाचंही महत्त्व तानांपेक्षा तालात, आणि या दोहोंपेक्षाही शब्दोच्चारांत असतं. पण आजच्या स्त्रियांच्या भजनात व रेडियोवरील भक्तिसंगीतात नेमका हाच क्रम उलटविला जातो. आपल्याकडील भजनात म्हटले जाणारे अभगंच काय ते श्रोत्यांना परिचित असतात असं नव्हे, त्यातले स्वराघात, त्यातले विराम हेदेखील ठराविक आणि परिचित असतात. पण आजकालचे भजनवाले अन् रोडिओवाले त्या आघाताची (accents ची) अन् त्या विरामांची (pauses ची) केवळ (सिनेमातली, नाटकातली) चाल लावण्याकरिता मोडतोड करतात! अन् त्याचा परिणाम म्हणजे 'खरा तो प्रेमा' किंवा 'मम आत्मा गमला' ही चाल समोर उभी राहते, पण त्या चालीतला तुकाराममहाराजांचा अभंग मात्र अनोळखी बनून जातो!

पण कधीकधी याहीपेक्षा अतिप्रसंग केला जातो. राष्ट्रीय संतांचे अभंग म्हणायचे सोडून कोणातरी फडतूस कवीनं केलेले अभंग वा कुणातरी रेडिओ कवीची पदं भजनात म्हटली जातात. जिथे नुसती चाल बदलली तरी अभंगांचं वजन बिघडतं, तिथे खुद्द तुकाराममहाराजांचीच 'बदली' केल्यावर त्या भजनाचं वजन कसं कायम राहावं? शब्द, सूर आणि ईश्वरभक्ती यांचं वाकडं नाही. पण शब्दांवर सुरांची, अन् भक्तीवर संगीताची कुरघोडी होता उपयोगी नाही. गाणारा वा गाणारी 'भक्तीनं' गात आहे की 'शास्त्रानं' गात आहे ते त्यांच्या गाण्यात उमटतं. कव्वाली हे मुळात भक्तिगीतच आहे. रेडिओतील वा सिनेमातील कव्वाली गायन आणि

आमच्या भजनी मंडळ्यांचं अभंगगायन यांच्यामधील फरक पाहण्यासारखा असतो. तो फरक नुसत्या तालासुराचा नसतो, तर 'स्वरोद्गारा'चा किंवा voice production चा फरक असतो. 'गझल' (प्रेमगीत) असो, की 'कव्वाली' (भक्तिगीत) असो, मुसलमान गायक-गायिका बेंबीच्या देठापासून गातात, तल्लीनपणे गातात, बेहोशपणे गातात. आम्ही 'सांभाळून' गातो, श्वास राखून गातो, with reservations गातो! देवापुढे जातानासुद्धा आम्ही समाजाची लाज मानगुटीवर घेऊन जातो. आमच्या कलेत, आमच्या भावनाविष्कारात abandon नाही, बेहोशी नाही!

भक्ती आणि भीड यांचं वाकडं आहे. हाच भजनसम्राज्ञी मीराबाईच्या चरित्राचा इत्यर्थ नाही का?

तरुण भारत,<br>
१८ मार्च १९७०, पृ. २.

अनुक्रमणिका

# १५

# मुसलमान स्त्रियांची दुःखे

हमीद दलवाई हे तरुण मुसलमान कार्यकर्ते गेली चारपाच वर्षे मुसलमानांत विचार-जागृती करण्याचे कार्य धैर्याने व चिकाटीने करीत आहेत. मुसलमान समाजाला धर्मवेडेपणातून निधर्मीपणाकडे व विज्ञाननिष्ठेकडे आणण्याचा त्यांचा विचार दिसतो. ते हिंदूंच्या सनातनीपणावर आणि जातीयतेवरही टीका करतात. समाजवादी लोक आणि 'सेक्युलर सोसायटी'सारख्या संस्था यांचे त्यांना सहकार्य आहे. अगदी अलीकडे त्यांनी मुसलमान स्त्रियांत आपल्या हक्कांसंबंधी जागृती करण्याचे कार्य हाती घेतले आहे. मुसलमान समाजाचा धार्मिक बाबतीतील कडवेपणा लक्षात घेता, दलवाई यांनी हाती घेतलेले काम किती अवघड अन् धोक्याचे आहे, हे सांगायला नकोच. या आठवड्याच्या आरंभी त्यांनी पुण्यात जी 'मुस्लिम महिला परिषद' भरविली तिच्या वाटेतही सनातनी मुस्लिमांनी सुरुंग पेरले होते असे दलवाईंच्या एका भाषणावरून कळले. दिल्ली, अमरावती, सुरत यांसारख्या दूरदूरच्या ठिकाणांहून येणाऱ्या महिलांनी घाबरून येणे रहित करावे म्हणून, परिषदेच्या वेळी पुण्यात जातीय दंगे होणार आहेत अशीही शुभवार्ता पसरविण्यात आली होती!

इतक्यातूनही ज्या मुसलमान महिला दूरदूरहून परिषदेला आल्या त्यांचे आणि चालकांचे कौतुक केले पाहिजे. बहुसंख्य मुसलमान समाज हा विद्येत व संपत्तीतही मागासलेला आहे असे म्हणतात. मुसलमान स्त्रीसमाज तर आज मूकच आहे. त्याला वाचाळ करण्यात पुण्यातील पुरोगामी हिंदूंनी पुष्कळच पुढाकार घेतला. पण या हिंदू कैवाऱ्यांच्या भाषणात मुसलमानी धर्म आणि समाज यांच्या परिचयापेक्षा स्वधर्मीयांच्या दोषांचाच परिचय अधिक दिसला! विशेष म्हणजे ज्योतिबा फुले, आगरकर, कर्वे यांच्या काळात हिंदू स्त्रियांची जी स्थिती होती व हिंदू पुरुषांची जी वृत्ती होती तीच आज आहे असे गृहीत धरून हिंदू वक्ते असली भाषणे रंगवीत होते. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति!' याच्या आधीचे चरण आगरकरांच्या काळीही उच्चारले जात नसत आणि हमीद दलवाईंच्या काळीही कोणी उच्चारीत नाही! त्यामुळे मनूसारख्या आद्य शास्त्रकाराला मूर्खात काढणे सोपे जाते! 'स्त्रीला सदैव कुणातरी आप्तांचे संरक्षण हवे' एवढाच मनूच्या त्या श्लोकांचा अर्थ आहे. हे मत आजच्या काळातही सर्वमान्य होण्यासारखे आहे. स्त्रियांना-पोरीबाळींना नव्हे, अनुभवी स्त्रियांना-तरी त्रिवार मान्य होण्यासारखे आहे.

पण या परिषदेत मनूपेक्षा हजरत महंमद पैगंबर यांचा उल्लेख अधिक वेळा होईल अशी अपेक्षा होती. स्मृतिकार मनूने हिंदू स्त्रियांवर कोणता अन्याय करून ठेवला आहे यापेक्षा, पवित्र कुराणात आणि परंपरेने आलेल्या पैगंबर-वचनांत स्त्रियांना सामाजिक न्याय मिळण्याची कोणती व्यवस्था आहे, याचा उल्लेख अधिक झाला असता तर, मुसलमानी धर्म आणि स्त्रियांचे हक्क यांत विरोध नाही हे स्त्रियांना आणि समंजस पुरुषांना कळून आले असते.

चार बायका करण्याच्या मुसलमानांच्या हक्कासंबंधी कुराणातील वचन अर्थपूर्ण आहे. ''तुम्हांस ज्या स्त्रिया अनुरूप वाटतील त्यांतील दोघींशी, तिघींशी किंवा चौघींशी तुम्ही विवाह करा. पण त्यांच्याशी आपणांला

समदृष्टीने वागणे अशक्य आहे असे तुम्हांला वाटत असेल तर, फक्त एकच बायको करा. '' म्हणजे अखेर 'एकच बायको करा' असा कुराण-वचनाचा अर्थ होतो!

घटस्फोटासंबंधी स्वतः पैगंबरांचे जे वचन उपलब्ध आहे ते फारच अर्थपूर्ण आहे. ते वचन असे : The thing which is lawful but disliked by Allah is divorce. (कायदेशीर असून अल्लाला अप्रिय असलेली जर कोणती गोष्ट असेल तर ती घटस्फोट ही होय) या वचनावरून 'तलाक' संबंधीचेही पैगंबरांचे मत स्पष्ट आहे.

हिंदू धर्म आणि मुसलमानी धर्म या दोहोंतही स्त्रियांना आदराने, न्यायाने आणि प्रेमाने वागविण्यासंबंधी आदेश आहेत. प्रत्यक्षात, स्त्रियांना प्रेमानेही वागविलेले दिसते, तुच्छतेनेही वागविलेले दिसते. आदरानेही वागविलेले दिसते, अनादरानेही वागविलेले दिसते. धर्माज्ञांच्या जागी कायद्यांची कलमे आली तर, कोर्टात जाऊन निर्दय नवऱ्याकडून फारकत व पोटगी मिळवता येईल, प्रेम आणि आदर मिळविता येणार नाही. स्त्री-पुरुषांचे नाते हे प्रेम असेल तर सुखावह होण्यासारखे आहे. केवळ हक्क आणि कायदा यांच्या आधारावर सुखावह होण्यासारखे नाही. तसेच कायदे केले तरी त्यांची अंमलबजावणी करून घेण्याकरिता शिक्षण, पैसा आणि आप्तेष्टांची अनुकूलता हवी. हिंदू समाजाने आज पुरोगामी (म्हणजे पाश्चात्यसदृश) कायदे करून घेतले आहेत आणि तरी हिंदू स्त्रीला न्याय मिळत नाही अशी ओरड या परिषदेतच ऐकू आली. म्हणजे स्त्रियांची स्थिती कायदे बदलण्याने सुधारता येईल या कल्पनेतच काही दोष आहेत. किंबहुना रूढी बदलण्यानेही स्त्रियांची स्थिती सुधारेलच असे नव्हे. स्त्रीला मोटारचे दार उघडून देणारा, तिच्या अंगावर 'किमोनो' चढविणारा नवराही घरात जुलमी असू शकतो.

आजच्या विवाहसंस्थेत स्त्रियांच्या दुःखाचे मूळ आहे असे समजून सार्त्रसारख्या काही अति-पुरोगामी पाश्चात्यांनी लग्नाशिवाय स्त्रीजवळ राहून पाहिले. त्यामुळे स्वातंत्र्यात वाढ झाली, पण सुखात वाढ झालेली मात्र दिसून आली नाही! स्त्रियांना शिक्षण आणि द्रव्यार्जन यांची सवलत मिळाली की त्या सुखी होतील, अशी कल्पना होती. पण आज सुशिक्षित आणि मोठमोठ्या नोकऱ्या करणाऱ्या स्त्रिया अधिक सुखी आहेत असे दिसत नाही. उलट केवळ चूल आणि मूल सांभाळणाऱ्या स्त्रियाच त्यांना अधिक सुखी वाटू लागल्या आहेत. शिक्षण आणि द्रव्यार्जन यांची साधने स्त्रियांना मिळू नयेत असा याचा अर्थ नव्हे. पण स्त्रियांची दुःखे त्याहून खोल आहेत, हे स्त्रियांना सुख मिळवून देणाऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे.

खरे म्हणजे स्त्रियांना सुखी करण्याकरिता पुरुषांना सुधारले पाहिजे. पण त्याकरिता सुधारकांनी आपली 'सुधारणाकल्पना'च सुधारली पाहिजे! निधर्मी बनणे आणि हक्काकरिता भांडायला शिकणे म्हणजे 'सुधारणा' म्हणजेच 'प्रगती' अशी जोवर कल्पना आहे तोवर सुखात वाढ होणार नसून भांडणात वाढ होणार आहे. मुसलमान माणसांत अनेक दोष असले तरी धर्मश्रद्धा हेच त्यांचे बळ आहे हे विसरून चालणार नाही. त्याला केवळ कुराणाकडून सिव्हिल कोडकडे नेण्याने तो माणुसकीपासूनही अधिक दूर जाईल. त्याला 'सोयीच्या कुराणाकडून' 'खऱ्या कुराणाकडे' नेले पाहिजे.

स्त्रीच्या दुःखाचे मूळ तिच्या 'परावलंबित्वा'त आहे. पण 'परावलंबित्व' म्हटले की आमच्या सुधारकांना, समाजवाद्यांना, निधर्म्यांना आणि सिव्हिल कोडवाल्यांना फक्त आर्थिक परावलंबित्वच काय ते कळते! मार्क्स

अनुक्रमणिका

आणि सिव्हिल कोड यांमुळे 'भावना' या वस्तूचेच त्यांना विस्मरण झाले आहे! स्त्रीचे सुख प्रेमावर अवलंबून आहे, पैशावर आणि हक्कावर अवलंबून नाही! पोटाकरिता नव्हे तर प्रेमाकरिता ती अनेकदा छळ सहन करताना दिसते आणि या तिच्या वर्माचाच नेमका फायदा नवरा घेतो, मुलगा घेतो, भाऊ घेतो! स्त्री फक्त लहान असहाय अर्भकाचेच लाड करते असे नव्हे, ती धडधाकट सज्ञान नवऱ्याचेही प्रेमाखातर-तिच्या प्रेमाच्या भुकेखातर लाड करते! स्त्रीच्या या 'लालनस्वभावा'मुळेच पुरुष शेफारतात. म्हणजे प्रेमाच्या माणसांचे लडा करणे, त्यांना शेफारून ठेवणे यांत स्त्रीला एक सुख, एक चैन, एक 'luxury' वाटते. सुधारकांनी तिच्या सुखाचे कायदे केल्यावरही ती तेच करणार आहे! तिचा हा स्वभाव व तिचे पुरुष जातीवरील उपकार लक्षात घेऊन पुरुषांनी तिच्याबद्दल कृतज्ञता, आदर व दाक्षिण्य बाळगले पाहिजे, म्हणजे धार्मिकता आणि 'शिव्हलरी' या जुन्या सद् गुणांकडे वळले पाहिजे.

हमीद हलवाई यांचे उद्देश स्तुत्य आहेत. पण त्या उद्दिष्टांना निधर्मीपणा आणि सत्यशोधकपणा यांचा उपयोग अधिक आहे की धार्मिकता आणि दाक्षिण्य यांचा उपयोग अधिक आहे हा एक प्रश्नच आहे. स्त्री भांडखोर बनविणे हे आपले उद्दिष्ट असावे की पुरुष समंजस आणि कृतज्ञ बनविणे हे आपले उद्दिष्ट असावे याचा विचार आधीच व्हायला हवा. हिंदू सुधारकांनी, सत्यशोधकांनी पाश्चात्यांच्या पावलावर पाऊल ठवले, हमीद दलवाई हिंदू समाजवाद्यांच्या पावलावर पाऊल ठेवीत आहेत. स्त्रियांच्या सुखांचा विचार याहून खोल हवा!

तरुण भारत,
२ जानेवारी १९७२, पृ. २.

अनुक्रमणिका

## १६

# स्त्री-विमोचनाचा खरा मार्ग

इंग्रजी शिक्षणाने युरोपीय संस्कृतीशी संपर्क येण्यापूर्वी या दशातील स्त्रियांना पारतंत्र्यही होते आणि मानही होता. त्या केवळ गुलामगिरीतच होत्या हे खरे नाही, तसेच त्यांना स्वातंत्र्य होते हेही खरे नाही. 'आई' आणि 'सासू' म्हणून त्या सत्ता गाजवू शकत. 'पत्नी' आणि 'सून' म्हणून त्या छळ सोशीत असत. ही झाली कुटुंबातली त्यांची स्थिती. बाहेरच्या समाजात त्यांच्या कर्तृत्वाला वा व्यक्तिमत्त्वाला उघड आणि सार्वत्रिक अवसर नसे. पण प्रसंग पडल्यास त्या-मुलाच्या हिताला जपण्याकरिता का होईना-जमीनजुमला, सावकारी यांची व्यवस्था पाहात. राज्यकारभार व रणांगणही गाजवीत. कायद्याने किंवा धर्मशास्त्राने त्यांना या कर्तृत्वक्षेत्रात बंदी केलेली नव्हती. उलट, पाश्चात्य देशांतच स्त्रियांना कित्येक क्षेत्रे कायद्याने बंद होती.

असे असूनही भारतातल्या उच्चवर्गीय स्त्रीला अनेक उदाहरणांत छळ सोसावा लागे. पारतंत्र्य तर नक्कीच वाट्याला येई. ही स्थिती आज बदलली आहे काय? त्यामुळे स्त्रीची कुचंबणा संपली आहे, की नव्या कुचंबणेला प्रारंभ झाला आहे, हा प्रश्न या नव्या युगात विचारात घेण्यासारखा आहे. शिक्षणाने आणि नोकरी करण्यामुळे तिच्यावर नवीन ओझी पडलेली दिसत आहेत. शिक्षण आणि नोकरी ही क्षेत्रे फिरून वर्ज्य करण्याने स्त्रियांना नव्या युगात अधिक सुख लागेल का? शिक्षण घ्यावयाचे पण नोकरी, द्रव्यार्जन मात्र टाळायचे, असे करण्याने त्या सुखी होतील का?

स्त्रियांवर फक्त कष्टाची आणि पुरुषांच्या ताबेदारीचीच काय ती सक्ती आहे असे नव्हे. शील आणि लाजभीड-मर्यादा यांच्या बाबतीतही पुरुषांपेक्षा स्त्रियांकडून अधिक अपेक्षिले जाते. परपुरुषाशी सख्य वा सलगी केल्यामुळेदेखील त्यांचे संसारसुख संपण्याचा संभव असतो. मग उघड विवाहबाह्य संबंधाने तर समाजातही त्या बहिष्कृत ठरतात. पोषाख, बोलणे, चालणे या बाबतींतही त्या घरातच आणि समाजातही परतंत्र असतात. अर्थात् या जुलमापैकी काही बाबतींत पुरुषही तितकाच परतंत्र असतो हे विसरून चालणार नाही.

स्त्रियांच्या पारतंत्र्यापैकी काही भाग त्यांच्या शरीररचेनमुळे व त्यांच्याकडे निसर्गाने सोपविलेल्या प्राणिशास्त्रीय कार्यामुळे (बायॉलॉजिकल फंक्शन्स) उत्पन्न झालेला आहे. ते कार्य म्हणजे दुसऱ्यांनी त्यांच्यावर लादलेले ओझे मानता येणार नाही. कारण मूल वाढविण्यात त्याला अंगावर पाजण्यात त्यांना शारीरिक तृप्ती व सार्थकता लाभते. पण हे नाजूक काम करण्यात व्यग्र असलेल्या स्त्रीला सुरक्षित जीवनाची गरज असते. अपत्यप्राप्तीकरताच तिला पुरुषाचा संग पत्करावा लागतो असे नव्हे, तर अपत्यसंगोपनाकरताही तिला पुरुषसहकार्य आवश्यक असते. लग्न करण्याची व घर करण्याची गरज यातूनच निर्माण झाली. बाहेरचे काम व द्रव्यार्जन करणे पुरुषाकडे गेले, घर सांभाळणे स्त्रीकडे गेले. बाह्य स्पर्धा आणि आक्रमण यांपासून स्त्रीचे रक्षण करण्याचेही काम पुरुषाकडे गेले.

जी कनिष्ठ भूमिका व जे पारतंत्र्य स्त्रीने स्वतःच्या सोयीकरिता पत्करले आहे ते पुरुषाने, शास्त्राने वा रूढीने तिच्यावर लादले असे मानता येईल काय? पण स्त्रीच्या शारीरिक आणि सृजन-क्षेत्रीय गरजा

पुरुषस्पर्धेच्या भरात विसरून आजकाल तशी कल्पना केली जाते, हे मात्र खरे! पाश्चात्य लेखिका या विषयात किती संकोचहीन, लज्जाहीन बनल्या आहेत ते विख्यात फ्रेंच तत्त्वज्ञ आणि साहित्यिक सार्त्र यांच्या 'जीवन-जोडीदारणी'च्या एका तक्रारीवरून दिसून येईल. ती म्हणते, पुरुष प्रत्येक बाबतीत आपला वरचढपणा कसा टिकवितो याचे ठळक उदाहरण हवे असेल तर, मानवाची रूढ संभोगपद्धती पाहावी. सार्त्रची जोडीदारीण सिमांन द बो वॉय् पुरुषाच्या वरचढ वृत्तीबद्दल म्हणतेः

His domination is expressed in the very posture of copulation.

तिच्या मते संभोग हा स्त्रीच्या शरीरावर होणारा अत्याचार आहे. (Coitus is the violation of her body.) द बो वॉय् हिला येथे सार्त्रची बायको न म्हणता 'जोडीदारीण' म्हणण्याचे कारण, ते दोघे विवाहाशिवायच एकत्र राहतात. (नव्हे, विभक्त राहून संभोगासह सर्व सख्यसुखे भोगतात. उभयतांना हीच सुखे अन्यत्र लुटण्याचीही मुभा आहेच! ) पण तिचे अवघड फ्रेंच नाव वरचेवर उच्चारण्यापेक्षा आपण तिला येथे (तिच्या परवागनीशिवायच) 'मादाम सार्त्र' म्हणूया! इतर प्राण्यांचीही संभोगपद्धती 'मादाम सार्त्र' यांच्या या आक्षेपाला पात्र होणारीच आहे. म्हणजे तिचे मूळ पुरुषाच्या वरचढ मनोवृत्तीत नसून सर्वच प्राण्यांच्या शारीरिक सोयीत आहे, असे नव्हे का?

पण या सर्व वस्तुस्थितीचे वर्णन करणे म्हणजे 'स्त्रीवर जुलूम होतो', 'अन्याय होतो', 'स्त्रीची पिळवणूक होते', हे नाकारणे मात्र नव्हे. स्त्रीच्या गुलामगिरीचे मूळ गृहसंस्थेत व अपत्यसंगोपनात आहे. या दोन्ही गोष्टींना फाटा द्यायचा म्हटल्यास, रानटी अवस्थेकडे परत जावे लागेल. स्त्री-पुरुषांचे सहकार्य आणि परस्पर संरक्षण हवे असेल तर, गृहसंस्था टिकवावी लागेल. पण गृहसंस्था टिकवली की स्त्रियांची गुलामगिरी टिकलीच पाहिजे की काय, हा मुख्य प्रश्न आहे.

स्त्रियांची सध्याची गुलामगिरी कायद्याने नष्ट करणे शक्य नाही, कुटुंबसंस्था नाहीशी करूनही ती संपणार नाही. नोकरीत किंवा नाटक-चित्रपटादी व्यवसायात शिरल्याने तिच्यावर एका पुरुषाऐवजी अनेक पुरुषांची मर्जी राखण्याची पाळी येत आहे. ऑफिसच्या फायली आणि घरी वा पाळणाघरी राहिलेले मूल, या दोहोंत तिच्या नाजूक मनाची व शरीराची ओढाताण होत आहे; जुन्या काळात तिच्या कपाळी गुलामगिरी नव्हती असे नाही, पण शिक्षणाच्या आणि नोकरीच्या स्वातंत्र्याने तिची गुलामगिरी थोडी कमी झाली असली, तरी कुत्तरओढ वाढली आहे.

संततिनियमनाच्या साधनांसंबंधी काही आधुनिकांना वाजवीपेक्षा फाजील आशा आहे असे दिसते! एक तर ती साधने आमचे सरकार भासविते तितकी हुकमीही नाहीत, की निरुपद्रवीही नाहीत. गर्भसंभवाबरोबरच ती साधने आरोग्य नाहीसे करून अनेक व्याधी-विशेषतः स्त्रीच्या जीवनात-आणून सोडतात अशा तक्रारी सार्वत्रिक कुजबुजीत ऐकू येतात. संततिप्रतिबंधक साधनांच्या फायद्याच्या जशा जाहिराती होतात, तशा त्यांच्या उपद्रवाच्या जाहिराती होत नाहीत, एवढेच काय ते!

सारांश, शिक्षणाच्या वाढीमुळे स्त्रीची कुचंबणा कमी होऊन, ती आज मोकळेपणाने वागू शकते, मागू शकते हे खरे, पण तिच्यावरील ओझे कमी झालेले दिसत नाही. आधुनिक शिक्षण आणि स्वातंत्र्य स्त्रियांकरिता जे करू शकत नाही ते आजची पाश्चात्य विमोचन चळवळ करू शकेल काय, हा प्रश्न आहे.

जुन्या चळवळीचा उद्देश स्त्रियांना हक्क मिळवून देणे हा होता. आजच्या चळवळीचा उद्देश स्त्री-पुरुषांत कायद्याने वा रूढीने करून ठेवलेले भेद नष्ट करण्याचा आहे. हे शक्य आहे का? हे स्त्रीच्या फायद्याचे आहे का? की त्यात फायद्याबरोबर स्त्रीच्या वाट्याला नवे तोटेही येतील? दुसऱ्याच्या रागावर स्वतःचाच पाय मोडून घेण्याचा प्रकार तर त्यात होणार नाही ना?

मला वाटते, स्त्री-पुरुषांची समानता किंवा स्त्रीचे सर्व क्षेत्रांतील स्वातंत्र्य हे उद्दिष्ट ठेवून हा प्रश्न सुटण्यासारखा नाही. कुटुंब ही संस्था आपणांला टिकवायची आहे की नाही हा यातील मुख्य प्रश्न आहे. तसेच, पुरुषसदृश होणे हाच काय तो स्त्रीला विमोचनाचा आणि सुखी होण्याचा मार्ग आहे का, हा मुख्य प्रश्न आहे.

जे प्राणी 'पुरुष' नाहीत त्यांनी 'पुरुषसदृश', 'पुरुषतुल्य' होण्याची धडपड केल्यास त्यात त्यांना केवळ काल्पनिक (केवळ आपला हट्ट पुरविल्याचे) समाधान लाभेल, पण खरे सुख लाभणार नाही. शिवाय, एकंदर समाजसुखात आणि समाजविकासात स्त्रियांना जे स्थान आहे ते त्यांनी न स्वीकारल्याने जे सामाजिक नुकसान होईल ते वेगळेच!

स्त्रियांचा सामाजिक 'रोल' अधिक नाजूक, पण अधिक प्राणभूत (अधिक व्हायटल) आहे हे ओळखून समाजात त्यांना मानाचे आणि सुरक्षित स्थान देणे हाच स्त्रीची कुचंबणा कमी करण्याचा मार्ग होय. सर्व धर्मांनी त्यांच्या त्यांच्या संस्थापनेच्या काळाला धरून हेच करायला शिकविले आहे असे दिसून येईल. 'स्त्रियांचा योग्य तो मान राखा' हीच सर्व धर्मांची शिकवण आहे. ही शिकवण आचरणात यायची म्हणजे स्त्री व पुरुष या दोन जातींतील अधिक स्वतंत्र आणि बलवान् जात-म्हणजे पुरुषाची जात-सुसंस्कृत व पापभीरू झाली पाहिजे. पुरुष जात जोपर्यंत सुसंस्कृत होणार नाही तोपर्यंत केवळ हक्कांच्या भांडणाने, केवळ पुरुषसदृश होण्याने स्त्रिया अधिक दुःखीच होतील. त्यामुळे कुटुंबसंस्थाही मोडेल आणि कुटुंबसंस्था मोडणे म्हणजे संस्कृती मोडणेच होय. कुटुंब आणि संस्कृती न राखता केवळ 'स्वातंत्र्य' हे ध्येय ठेवून लढा केल्यास, स्त्रियांना संस्कृतिहीन समाजात राहण्याची तयारी ठेवावी लागेल.

म्हणून स्त्रियांच्या स्वातंत्र्याऐवजी पुरुषांना अधिक सुसंस्कृत, सोशिक आणि त्यागी करण्याची चळवळ हाती घेण्याची अधिक गरज आहे. तोच एक मार्ग आहे.

स्त्री मासिक (५०० वा अंक),<br>
मे १९७२, पृ. ८३-८५.

अनुक्रमणिका

## स्त्री-सौंदर्यातील 'रोख' भाग

'प्रियंवदे'ने लेखकांकडून स्त्रीसौंदर्यासंबंधीच्या 'वैयक्तिक' कल्पनांची अपेक्षा केल्यामुळे विषयाला आटोपशीरपणाही आला आहे आणि आम्हा लेखकांना स्वातंत्र्यही लाभले आहे. नाही तर 'सौंदर्य' हा विषय म्हटल्यावर, आम्ही साहित्यिक लोक एवढा घोळ घालतो की, वाचकांना काव्याचे काय, कलेचे काय की स्त्रीचे काय, 'सौंदर्य' म्हणजे नवकाव्यासारखी एक भयानक आणि किचकट गोष्ट आहे असे वाटू लागते!

म्हणून प्रथम स्त्रीसौंदर्यातल्या 'रोख' रकमेविषयी बोलतो. माणसं कबूल करोत की न करोत, त्यांचा मनावर पहिला 'रोख' परिणाम 'वर्णा'चा होतो. म्हणूनच तुर्की भाषेत म्हण पडली आहे, - ''स्त्री गोरी असली म्हणजे रूपाचा प्रश्न उरत नाही, पुरुष शूर असला म्हणजे शीलाचा प्रश्न निघत नाही!'' आपण तोंडानं 'वर्ण' म्हणतो, पण खरा परिणाम त्वचेच्या 'क्वालिटी'चा होत असतो, हे विसरून चालणार नाही. गोऱ्या रंगापेक्षा कधी कधी 'श्यामल' वर्ण अधिक परिणाम करतो, तो त्वचेच्या मुलायमपणामुळेच होय. मी वर्णाच्या खालोखाल केसांच्या वैपुल्याला महत्त्व देतो. केशकलाप हा स्त्रीचा पिसारा आहे. त्यात रूपाचं 'बहरण' किंवा 'luxuriance' आहे. या वैपुल्यात जोमही असतो आणि नाजूकपणाही असतो. जुन्या काळी काळेभोर केस प्रिय होत, तर आजकाल त्यात पिंगट, तांबूस, 'chestnut' झाक थोडी आधुनिक ठरते. दोहोंची सरासरी काढून मी माझ्या एका कथेत माझ्या नायिकेला केसांचा 'मधासारखा' रंग बहाल केला आहे!

त्यानंतर क्रम लागतो उंचीचा-अर्थात् बांध्यासह उंचीचा. कारण अंगलट सुबक नसेल तर, उंची-स्त्रियांची तरी-कुरूपतेत जमा होईल. महाराष्ट्रात स्त्रियांची उंची बेताचीच असते. पाच फूट दोन इंच उंचीची स्त्री कमी उंच मानली जात नाही. पाच फुटांपेक्षा कमी असेल तरच बुटकी मानली जाते. पण स्त्रीशिक्षणामुळे (अर्थात् स्वातंत्र्यामुळे) मुलींची उंची वाढली आहे, हे विसरता येत नाही. 'नाकेली' हा शब्द स्त्रियांच्या सौंदर्यवर्णनात आढळत असला, तरी पुरुषांइतकं (किंवा पारश्यांइतकं! ) धारदार नाक थोडं डोळ्यावरच येतं! 'अपरं' आणि काहीसं 'उचललेलं' नाक म्हणून स्त्रियांच्या नाकांत एक प्रकार आहे. तो अभिजात सौंदर्यापेक्षा 'गोंडसपणा'त (prettiness मध्ये) मोडेल. अपरं असून 'उचललेलं' मात्र नसेल तर, ते नाक 'तुटक' (abrupt) वाटतं. युरोपियन स्त्रियांची नाकं अशी असतात! डोळ्यांचं वर्णन आपल्या प्राचीन वाङ्मयात जागोजाग आढळतं. पण आज तरी वर्णनीय डोळे क्वचितच दिसतात. कदाचित् आधुनिक जीवनाबरोबर डोळ्यांतलं तेज कमी होत असेल. पण डोळ्यांच्या सौंदर्याप्रमाणेच 'पाहाण्या'चं म्हणून एक वेगळं सौंदर्य असतं, तेही आज नष्ट होत आहे. 'तिरछी नजर' (अपांगवीक्षित) व नखरेल नजर (निगाहे नाज़) या दोन्ही स्त्री-स्वातंत्र्याबरोबर गायब झाल्या आहेत! आज आमच्या स्त्रिया पुरुषी आणि 'प्रोजेक्' नजरेने पुरुषांकडे पाहू लागल्या आहेत. हाँ! एक मात्र इथे सांगितले पाहिजे. मी या लहानशा मतप्रदर्शनात स्त्रीसौंदर्याचा, 'स्तब्ध चित्र' म्हणून विचार करीत नसून, 'चलत् चित्र' म्हणून विचार करीत आहे. त्यात रूपाचाच केवळ नव्हे, तर 'स्त्रीत्वाचा' म्हणजे 'sex appeal'चाही अंतर्भाव होणं अपरिहार्य आहे. केवळ रूपदर्शनानं जी स्त्री आकर्षक होणार नाही ती क्रियावान् झाल्यावर (म्हणजे in action) आकर्षक होईल.

म्हणजे मी इथे 'विभ्रमां'चा विचार करणार आहे असे नव्हे. पण एखादी स्त्री, बोलत नाही तोपर्यंतच आकर्षक असेल; अन् तोंड उघडल्यावर त्यातून तिची बुद्धिहीनता, चैतन्यहीनता जाणवेल! पण उघडलेल्या तोंडाबरोबर आणखीही एका सौंदर्यांगाचा विचार करायला हवा. ते म्हणजे दात! स्वच्छ, सुबक, चमकदार दात, बोलण्याचे व विशेषतः हसण्याचे सौंदर्य वाढवतात. पण 'दात' हे एकच सौंदर्यांग असे आहे की, जे हृदयाप्रमाणे सामान्यतः झाकलेलंच असतं? अन् दात झाकलेले असतील तर नुसत्या ओठांच्या, म्हणजे जिवणीच्या सौंदर्यावरच भूक भागवून घ्यावी लागते!

पण नुसते दर्शन नव्हे, तर स्त्रीचा सहवासही प्रिय व्हायचा असेल तर, स्त्रीजवळ 'express' करायला काही तरी हवे! 'बोलण्या'चा, 'एक्सप्रेस करण्या'चा अर्थ इथे व्यापक घ्यायचा. सुबुद्ध 'ऐकणं 'देखील मी बोलण्यातच जमा करतो. काही स्त्रिया इतक्या सुंदरपणे 'ऐकतात', की बोलताना दिसतात त्याहून त्या ऐकताना सुंदर दिसतात! हो, पण बोलण्यावरून आठवलं,-स्त्रीच्या आवाजाचं काय? महाराष्ट्रीय स्त्रियांच्या आवाजाची एक युरोपियन मजजवळ तारीफ करीत होता. त्यांचा आवाज ख्रिस्ती आणि पारशी स्त्रियांसारखा किरटा, केकाटणाराही नसतो, की भसाडा वा पुरुषीही (सामान्यतः! ) नसतो. तो युरोपियन म्हणाला, 'They have clear voices', पण डोळ्यांच्या सौंदर्याप्रमाणे मराठी स्त्रियांच्या आवाजाचं सौंदर्यही अलीकडे कमी होऊ लागलं आहे, घोगऱ्या आवाजाचं प्रमाण वाढत आहे!

तसंच मितभाषित्व आणि लाजणं यांमधील सामर्थ्य आजची स्त्री विसरू लागली आहे. ''म्हणजे? आम्ही काय अहोरात्र दुसऱ्यांना आकर्षित करण्याच्या उद्योगातच मग्न राहावं की काय? '' असंही काही स्त्रिया यावर विचारतील. पण स्त्रियांचं आकर्षकत्व केवळ नवरा किंवा प्रियकर मिळवण्यापुरतंच आहे असं मी मानीत नाही. आकर्षकपणा हा स्त्रीचा धर्म आहे-सामाजिक कर्तव्य आहे. ज्या समाजातल्या स्त्रिया सुंदर, सलज्ज, आकर्षक आणि सुवेशवती नसतील त्या समाजातले पुरुष गबाळ, असंस्कृत आणि महत्त्वाकांक्षाहीन बनतील. केवळ एका पुरुषाचं मन वेधून घेणं नव्हे, तर संपूर्ण समाजाला सुसंस्कृत 'refined' बनवणं हे स्त्री-सौंदर्याचं उद्दिष्ट आहे.

या सूत्रमय 'सौंदर्यसूक्ता'त मी 'आंतरिक सौंदर्य' वगैरे गूढगुंजनात मुद्दामच शिरलो नाही! म्हणूनच मी याला सौंदर्यातील 'रोख' भागाचा विचार म्हटलं आहे. तसाच मी इथे वस्त्राभरणं, केशरचना, इत्यादी 'पुरवण्यांचा' विचार केलेला नाही. ईश्वरदत्त आणि हुकमी अंगांचाच केवळ विचार केलेला आहे. शेवटी माझं आणखी एकच मत सांगतो. यौवनाची स्तोत्रं कवी कितीही गावोत, -यौवना पेक्षा आरोग्याच्या टवटवीचं महत्त्व सौंदर्यात अधिक आहे!

प्रियंवदा,
सप्टेंबर १९७२, पृ. (?)

अनुक्रमणिका

## १८

# भारतीय स्त्रीचे दौर्बल्य

अलीकडे कोण्या एका लेखिकेने भारतीय स्त्रीचे वर्णन 'केंद्रबिंदू हरविलेली' असे केले होते म्हणे! सौ. स्नेहलता रणदिवे यांनी 'तेजस्वी'मधील लेखात तिचेच वर्णन 'कणा नसलेली' असे केले आहे. 'तेजस्वी'च्या संपादकांनी संबंधित अंक माझ्याकडे धाडून माझ्या प्रतिक्रिया मागवल्या याबद्दल मी आभारी आहे.

सौ. रणदिवे यांची ही समजूत मुख्यत्वेकरून भारतीय स्त्रीच्या 'गृह्य' पतीबरोबरच्या वर्तनावर आधारलेली आहे. पती म्हटला की स्त्री मान तुकविते, लग्नापूर्वी आई-बापांपुढेही ती तशीच मान तुकविते, ही सौ. रणदिवे यांची मुख्य तक्रार आहे आणि यावरूनच त्या भारतीय स्त्रीला 'कणा' नाही हा निष्कर्ष काढीत आहेत. उलट गांधीयुगात भारतीय स्त्रीला 'कणा' प्राप्त झाला, असेही त्या समजत आहेत. भारतीय स्त्री आदिमायेप्रमाणे बलवान् न होता दुर्बल झाली, याला कारण तिचे दुबळे पौराणिक आदर्श होत, असेही त्या मानतात. पौराणिक वाङ्मयात द्रौपदीचाच आदर्श काय तो सबल आहे, असे त्या म्हणतात. वास्तविक आपल्या पुत्रांनी बाहेरून काय आणले आहे हे न पाहाताच, कुंतीने जी आज्ञा केली तिला मान तुकवून एकाऐवजी पाच पती स्वीकारणारी द्रौपदी बलवान् कशी हा एक प्रश्नच आहे!

वास्तविक स्त्रियांच्या तडफदारपणाची उदाहरणे शोधायला गांधीयुगापर्यंत वाटचाल करण्याची गरज नाही. इतिहासात आणि वर्तमानकाळात ती उदाहरणे हवी तेवढी सापडतील. स्त्रियांनी राज्यकारभार हाकल्याची, खुनी कारस्थाने केल्याची, हाती तलवार घेऊन रणांगण गाजवल्याची उदाहरणे अर्वाचीन इतिहासात विपुल आहेत. लक्ष्मीबाई आंग्यांसारख्या स्त्रियांनी स्त्रीसैनिकांची जहाजे घेऊन पिढीजाद इंग्रज कप्तानांना नामोहरम केल्याचेही उदाहरण आहे. म्हणजे उरून उरते ती सौ. स्नेहलता रणदिवे यांची स्त्रियांच्या कौटुंबिक वर्तमानसंबंधीची तक्रार!

भारतीय स्त्री संसारात नवरा म्हणेल ते प्रमाण का मानते? तिला स्वतःची बुद्धी, स्वतःचे initiative नाही म्हणून की अन्य काही कारणाने? अन्य देशांतील स्त्रिया संसारात नवऱ्याचे निर्णय मानीत नाहीत की काय? भारतीय स्त्रीला 'कणाच नाही' असे म्हणण्यापूर्वी या प्रश्नांचा विचार केला पाहिजे.

प्रथम ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कुटुंब ही एक संस्था आहे व कोणत्याही संस्थेत दोन प्रमुख असून चालणार नाही. कुटुंबसंस्था, एक नवऱ्याच्या शब्दाप्रमाणे तरी चालेल नाही तर बायकोच्या शब्दाप्रमाणे तरी चालेल. आज बाह्यतः तरी ती नवऱ्याच्या आज्ञेप्रमाणे चालते. पुष्कळदा अप्रत्यक्षपणे पत्नी हुकमत गाजवते. उद्या बायकोच्या आज्ञेप्रमाणे कुटुंब चालावे असे ठरले तर, नवरा दुबळा होईल, 'बुळा' गणला जाईल, त्याला 'कणा' नाही असे एखादी मृणालिनी देसाई वा स्नेहलता रणदिवे म्हणेल. पण ज्यात दोघेही सारखेच 'प्रमुख' आहेत असे कुटुंब दाखविता येणार नाही. असे कुटुंब सुरळीत चालणार नाही. ऑफिसात किंवा राजकारणातही बॉसपुढे किंवा नेत्यापुढे नमते घ्यावेच लागते. नाही तर राजीनामा देऊन ऑफिसच्या वा पार्टीच्या बाहेर पडणे तितके सोपे अथवा शहाणपणाचे नसते. घर सोडण्यापेक्षा घर टिकवण्यालाच अधिक भक्कम कणा लागतो.

अगदी नाईलाज झाल्यावर, अगदी जुन्या बायकाही 'घर' म्हणजे नवरा सोडीत. पण त्या ते शौर्य समजत नसत, दुर्दैव समजत असत.

सुशिक्षित तरुणींच्या विवाहविषयक निर्णयाबद्दलची सौ. रणदिवे यांची तक्रार अधिक विचारार्ह आहे. पण त्यातही स्वयंनिर्णयरूपी इमारत एका खांबावर उभी राहू शकत नाही. आमच्या तरुणांतच जिथे अद्याप सामाजिक प्रौढत्व (maturity) आलेले नाही तिथे एखाददुसरी प्रौढत्व पावलेली मुलगी काय करणार? 'लग्नाची बोलणी पैशाच्या रकमांनी सुरू होत असतील तर ते लग्न मला नको आहे, ' असे म्हणणाऱ्या काही सुशिक्षित मुली मला ठाऊक आहेत. तसेच ती बोलणी वडीलधाऱ्यांनी वा मध्यस्थांनी करण्यापेक्षा आपणच कुठे तरी भेटून करू, असे मुलीने म्हटल्यास 'फॉरीन रिटर्न्ड' वरही बुजलेले मी पाहिले आहेत!

लग्नाच्या व्यवहाराला आज जे गुरांच्या बाजाराचे रूप आले आहे ते नष्ट करायचे असेल तर, 'तेजस्वी' मुलींनी स्वेच्छेने अविवाहीत राहाण्याची तयारी केली पाहिजे असे मानण्यास सौ. रणदिवे यांचे आणि माझे एकमत आहे. हळूहळू ती गोष्ट शक्यही होईल. पण स्त्रियांनी एकटे राहायचे म्हणजेही भोवतालच्या समाजाची-पुरुषांची-विशिष्ट सांस्कृतिक पातळी गृहीत धरली पाहिजेच. ज्या पुरुषांची वाईट दृष्टी टाळण्याकरता विधवांना पुन्हा कुंकू लावण्याचा मार्ग पत्करावा लागतो त्या समाजात, बरा-वाईट कसा का होईना, कुणी तरी पुरुष घरात असावा असे स्त्रीला वाटले तर, त्यावरून तिच्या 'कण्या'चे बळ मोजणे तितकेसे बरोबर होणार नाही. हळूहळू सुशिक्षित स्त्रिया एकट्या राहाण्याचे बळही दाखवीत आहेत हे विसरता येत नाही. मुलींनी स्वतःचा जोडीदार निवडण्याचे धैर्य दाखवणे हा केवळ धैर्याचा वा जबाबदारी पत्करण्याचा प्रश्न नाही. भोवतालच्या समाजाच्या पुढारलेपणाचा आणि संस्कृतीचाही तो प्रश्न आहे.

आणखी एका गोष्टीकडे सौ. रणदिवे यांचे लक्ष कसे गेले नाही याचे नवल वाटते. प्रवासात, रस्त्यात वा विश्वासाच्या एकांतात पुरुषाने अतिप्रसंग, अमर्यादा वा विनयभंग केल्यास भारतीय स्त्री कितपत प्रतिकारक्षमता दाखविते, हा प्रश्न ह्या 'कण्या'च्या प्रश्नात बाईंच्या डोक्यात कसा आला नाही कोण जाणे! हे अतिप्रसंग आणि विनयभंग पांढरपेशा हिंदू मुलींच्या वाट्याला अधिक येतात, असे वृत्तपत्रांतील वार्तांवरून म्हणता येईल. यात मात्र त्यांच्या प्रतिकारशक्तीचा वा 'कण्या'चा अभाव दिसतो खरा! आणि याला कारण, सीतासावित्रीचा आदर्श हे जरी नसले तरी, भोंगळ हरदास-पुराणिकांनी उभा केलेला अतिरेकी विनयाचा आदर्श हे तरी खास आहे. रस्त्यात वाईट नजरेने पाहाणाराला आमची खेडवळ शेतकरी स्त्री 'डोळे फुटले मेल्याचे!', 'मुडदा गडला!' हा आहेर चार लोकांना ऐकू जाईल अशाप्रकारे (audibly) करून खजील करील. 'कणा' नसलेली सुशिक्षित स्त्री तेवढेही करू धजणार नाही. तिचा 'मर्दपणा' लुंगी नेसून, केस कापून, पँट घालून फिरण्यातच काय तो आहे हे रणदिवेबाईंचे मत खरे मानणे भाग आहे!

तेजस्वी,
१५ एप्रिल १९७३, पृ. ३.

अनुक्रमणिका

# १९

## बंदुकांनी स्त्रियांचे रक्षण होईल का?

अलीकडेच पवनार येथे भरलेल्या 'अखिल भारतीय स्त्री-शक्ती संमेलना'चा त्रोटक अहवाल वृत्तपत्रांत वाचायला मिळाला. "स्त्रियांवर बलात्कार होऊ नये यासाठी सामाजिक वातावरण कसे बदलेल, स्त्रियांना आज जो अत्यंत खालचा दर्जा प्राप्त झाला आहे तो नाहीसा होऊन (स्वतंत्र) व्यक्ती या नात्याने स्त्रीला कसे जीवन जगता येईल, मातृत्वाचा गौरव समाजात कसा होईल, यांसंबंधी तीन दिवस या संमेलनात चर्चा झाली."

पण या त्रोटक वार्तेपेक्षाही ते संमेलन 'पवनार' येथे झाले, आणि विनोबा भाव्यांनी त्यात भाग घेतला, या गोष्टीचे महत्त्व अधिक आहे. "स्त्रियांवर बलात्कार होत असताना बलात्कार करणाऱ्या व्यक्तीस बंदुकीने ठार मारण्याचा अधिकार त्यांना मी देतो." असेही उद्‌गार विनोबांनी काढल्याचे प्रसिद्ध झाले आहे! श्री. विनोबा भावे यांचा अधिकार मोठा आहे. ते आधुनिक युगातले ऋषीच आहेत म्हटले तरी चालेल. पण वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या या उद्गारांचा अर्थ मात्र स्पष्ट नाही! विनोबा जो अधिकार 'देतो' म्हणतात, तो अर्थात् केवळ नैतिक अधिकार असणार! कायदेशीर अधिकार विनोबा कसे देणार? शिवाय, 'अधिकार त्यांना मी देतो' या ग्वाहीतील 'त्यांना' म्हणजे स्त्रियांना असा अर्थ असेल तर, ते अधिकच घोटाळ्याचे वाटते. इतक्या स्त्रियांनी बंदूक घेऊन फिरावे अशी विनोबांची अपेक्षा आहे की काय?

आणखीही कित्येक जळजळीत विचार या संमेलनात निर्मला देशपांडे, शोभना रानडे, आसामच्या बायदेव, इत्यादी स्त्रियांनी व्यक्त केले. "आज स्त्रीला 'व्यक्ती' म्हणून स्वतःची किंमत माहीत नाही. ती देहपरायण बनली आहे. स्वतःला अबला म्हणवून घेण्यात ती भूषण मानते. विवाह हेच ती जीवितातील ध्येय मानते." यांसारखे विचार या संमेलनात व्यक्त करण्यात आले.

स्त्रियांच्या दर्जासंबंधी आणि रक्षणासंबंधी वीररसात्मक उद्‌गार काढण्याचे दिवस संपले अशी आमची समजूत होती! पण ते संपलेले दिसत नाहीत. स्त्रियांचं रक्षण करणं हे पुरुषांचं पवित्र कर्तव्य आहे, असं प्राचीन काळी समजत. आजही तसं समजणारे लोक आहेत, पण काहींना ते मागासलेपणाचं वाटतं. स्त्रियांनी स्वतःचं रक्षण करावं, त्यांना तशा तऱ्हेचे हक्क आणि तशा तऱ्हेचं शिक्षण द्यावं, हे मत या लोकांना पुढारलेलं वाटतं. पण हे मत पुस्तकी आणि स्वप्नाळूपणाचं आहे, असं थोड्या विचारांती दिसून येईल. स्त्रियांनी घाबरट किंवा प्रतिकारशून्य असावं, असा याचा अर्थ नाही. पण स्त्रियांना हत्यारबंद करणं हा स्त्रियांविरुद्धच्या आजच्या वाढत्या गुन्हेगारीवर तोडगा खास नव्हे.

काही प्रत्यक्ष घटनांचा विचार केला तर, हे अधिक पटेल. खेड्यांतील शिक्षिका, नर्सेस आणि संततिनियमनाच्या प्रचारिका यांना येणारे कित्येक अनुभव वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेले आहेत. त्यावरून पाहता खेड्यातील एकटादुकटा मनुष्य स्त्रीशी अतिप्रसंग करायला धजतो असे नसून गावात एक प्रकारचे असंस्कृत आणि गुंडगिरीचे वातावरण असते व एकमेकाला संरक्षण देणाऱ्या गुंडांची एक अलिखित संघटनाच असते, असे दिसून येईल.

अनुक्रमणिका

स्त्री हत्यारबंद आहे की नाही हे अशा ठिकाणी अगदीच गौण ठरते. तिचे पोट म्हणजेच नोकरी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ज्यांच्यावर अवलंबून आहे असे लोकच तिच्या असहायतेचा गैरफायदा घेत असतील तर, नुसत्या बुंदकीने भागण्यासारखे नाही. जे कारस्थानीही आहेत आणि तरी आजच्या भ्रष्ट वातावरणात दुर्दैवाने जे पुढारीही ठरू शकतात अशांशी एखाद्या नोकरीपेशातल्या स्त्रीची गाठ पडल्यावर तिच्या हाती बंदूक देण्याची भाषा बोलणे, म्हणजे तिची एक प्रकारची थट्टाच होय.

आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. हा प्रश्न केवळ खेड्यांतील लोकांच्या असंस्कृतपणाचा किंवा अशिक्षितपणाचा नव्हे. हे लोक आपल्याच गावच्या बायकांचा उपमर्द इतक्या सहजपणे करणार नाहीत. कारण लगेच कुऱ्हाडी बाहेर पडतील. याचा अर्थ खेड्यांत नोकरीकरिता जाणाऱ्या स्त्रिया असहाय असल्यामुळेच आणि त्यांच्याकरिता कोणी कुऱ्हाड उगारणारा नसल्यामुळेच त्यांची विटंबना करणे खेड्यांतील वजनदार लोकांना सोपे जाते. शिवाय, या लोकांना कधी कधी उच्चपदस्थ लोकही संरक्षण देताना दिसतात! विनोबांसारख्यांनी या गोष्टींवर प्रथम इलाज करायला हवा. तो करण्याऐवजी स्त्रियांच्या हाती बंदूक देण्याची भाषा ही नाटकात शोभणारी भाषा होय! विनोबांसारख्या ऋषींच्या तोंडी शोभणारी भाषा नव्हे. पण पूर्व पाकिस्तानात हजारो स्त्रियांवर लष्कराने उघडपणे अत्याचार केल्यावरही आमचे सरकार व आमचे ऋषीमुनी त्यासंबंधी मूग गिळून बसत असतील तर, स्त्रियांची अब्रू या लोकांच्या दृष्टीने राजकारणापेक्षा तरी कमी महत्त्वाची आहे, हाच अर्थ निघत नाही काय?

पवनार येथील याच संमेलनात स्त्रियांच्या संघटना, सामाजिक क्रांतीत स्त्रियांचे 'योगदान' (?), स्त्रियांचा ब्रह्मचर्याचा 'अधिकार', इत्यादी गोष्टींचाही उच्चार झाला. येत्या ऑक्टोबरमध्ये 'स्त्रीशक्ति सप्ताह' साजरा करण्याचीही घोषणा झाली. यात नाट्यपूर्ण भाग बराच दिसतो. आजही स्त्रीला आजन्म अविवाहित राहण्यात कायद्याचा किंवा धर्माचा अडथळा येईल असे नाही. पण अविवाहित स्त्री-आजन्म अविवाहित स्त्री-पाश्चात्य देशांत जितकी सुरक्षित आणि सन्मान्य आहे तितकी या देशात आहे का, याचा प्रथम विचार झाला पाहिजे. ती आज एखादे कुटुंब किंवा एखादी संस्था यांच्या आश्रयानेच थोडीफार सुरक्षित राहू शकते आणि तेथेही तिला धोका नसतो असे नाही.

हे संमलेन 'पोस्टर्स हटाव दिन'देखील साजरा करणार आहे असे दिसते. पोस्टर्समध्ये स्त्रीशरीराचा दुरुपयोग कित्येकदा व्यापाराकरता केलेला असतो हे खरे. पण स्त्रीशरीराचा धंदेवाईक उपयोग हा पोस्टर्स आणि त्यांचे चित्रकारच करतात असे नव्हे अनेक जाहिरातींत चित्रे नसून फोटोग्राफ्स असतात, असे आढळून येईल. म्हणजे, स्त्रिया स्वतःच व्यापारी उपयोगाकरता स्वतःचे उघडेवाघडे फोटो देतात असे दिसते. अशा जाहिरातींचा निषेध हे संमलेन कशा प्रकारे करणार कोण जाणे! पण त्याहीपलीकडे वेगवेगळ्या कापडांची वा पातळांची जाहिरात करण्याकरता 'फॅशन परेड्स' म्हणून भरवल्या जातात. कपड्यांचे वेगवेगळे नमुने अंगावर घालून स्टेजच्या या विंगमधून त्या विंगमध्ये जाणं एवढाच अशा 'परेड'मधील कार्यक्रम असतो. म्हणजेच व्यापाऱ्यांच्या कपड्यांबरोबर स्वतःच्या शरीराचेही प्रदर्शन करणे हा या परेड्समधील कार्यक्रम असतो. काही कुलीन मुली अशा शरीरप्रदर्शनाला तयार होतात. एवढेच नव्हे तर, अशा फॅशन परेड्सचे उद्‌घाटन करण्यास स्वतः सांस्कृतिक पुढारी असलेल्या स्त्रिया मिळतात, ही गोष्ट पवनार येथील संमेलनाला माहीत आहे काय?

पण याच्याही पलीकडील प्रकार म्हणजे, या देशातील मुली अरबस्तान आणि इराणचे आखात या भागात घेऊन विकणारे दलाल संघटित धंदा करीत आहेस असा बोभाटा वृत्तपत्रांतून अनेकदा झालेला आहे. याचा तलाश आणि यावर इलाज कोण करणार आहे?

हे सर्व परिणाम स्त्रीला विवाहाशिवाय कोणतेही क्षेत्र मोकळे नसल्याचे होत असे म्हणता येईल काय? म्हणजे स्वातंत्र्याचा अभाव एवढीच आजच्या स्त्री-जीवनातील समस्या नव्हे. एकीकडे स्त्रीच्या असहायतेचा फायदा आजच्या भ्रष्ट राजवटीमुळे घेतला जात आहे, तर दुसरीकडे पुरोगामित्वाच्या आणि आधुनिकत्वाच्या नावाखाली स्त्रिया स्वतःच आपली नैतिक विटंबना करून घेत आहेत. पवनार येथील संमेलनात उच्चारल्या गेलेल्या कल्पना आणि उद्‌घोषिले गेलेले कार्यक्रम, हे दुहेरी अधःपतन रोखण्याला पुरेसे नाहीत. विज्ञान आणि अहिंसा यांच्या जपाने ही स्थिती सुधारेल अशी या संमेलनाची कल्पना दिसते! भ्रष्ट राज्यकारभार आणि विकृत पुरोगामित्व यांवर 'स्त्रियांना बंदुका देणे' हा इलाज होऊ शकेल काय?

मराठा, रविवार पुरवणी (श्री. के. क्षी. उवाच),
२१ एप्रिल १९७४, पृ. १.

अनुक्रमणिका

## पुन्हा एकदा केशवपन!

आगरकरी 'सुधारका'च्या काळात केशवपनासंबंधी जास्तीत जास्त जहाल आणि जास्तीत जास्त हृदयद्रावी लिखाण येऊन गेले. आणि तरी आगरकर हे केशवपनाच्या चालीसंबंधी सात्त्विक संताप व्यक्त करणारे पहिले सुधारक होते असे नव्हे. महात्मा फुले हेही पहिले नव्हते. लोकहितवादींनी या अभद्र आणि निर्दय चालीसंबंधी प्रथम संताप व्यक्त केला. त्यानंतर याच संतापाला आणि दयाभावनेला ललित वाङ्मयात स्थान देऊन आबालवृद्धांचे मन पिळवटून सोडले ते हरिभाऊ आपट्यांनी! हरिभाऊंचे 'पण लक्षात कोण घेतो?' हे शब्द १९७५ मध्ये पुन्हा खरे ठरतील अशी कुणाला कल्पनाही करवली नसती. पण सांगलीतील एका धर्ममार्तंडांच्या घरी घडलेला जो प्रकार काही आठवड्यांपूर्वी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाला आणि ज्यासंबंधी निष्फळ संताप महाराष्ट्रीय स्त्री-पुरुष वृत्तपत्रांतून आणि सभांतून व्यक्त करीत आहेत तो पाहिला म्हणजे विचित्र धार्मिक श्रद्धांमुळे मनुष्य किती निर्दय बनतो-आज सार्वत्रिक शिक्षणाच्या आणि स्त्री-स्वातंत्र्याच्या युगातही किती तो निर्दय बनू शकतो त्याची कल्पना येऊन मन चरकते.

सांगलीतील कोणा ईश्वरशास्त्री दीक्षित यांनी दुर्दैवाने नुकत्याच विधवा झालेल्या आपल्या तरुण सुनेचे केशवपन, अर्थात् तिच्या मनाविरुद्ध करविले, अशी मूळ वार्ता! ते केशवपन त्या सुनेच्या मनाविरुद्ध नसून तिच्या इच्छेवरूनच झाले होते, अशी दुसरी त्याहून विचित्र वार्ता! दुसरी वार्ता खरी मानली तर-म्हणजे 'सुनेचे ते निवेदन तिने स्वखुषीने दिले आहे', 'परिस्थितीच्या अपरिहार्यत्वामुळे दिलेले नाही' असे मानले तर, आणखीच कित्येक प्रश्न मनात उपस्थित होतात. कोणीही स्त्री-मग ती तरुण असो की वृद्ध असो, धार्मिक असो की अधार्मिक असो-स्वखुषीने केशवपनाला प्रवृत्त होऊन नापितापुढे बसेल काय? एकदा नव्हे, जन्मभर तोच अभद्र विधी उरकण्याचे स्वखुषीने पत्करील काय? म्हणजे यात केवळ केशवपनातील अभद्रताच सूचित होते असे नव्हे, तर संयुक्त कुटुंबपद्धतीतील जुलुम-जबरदस्तीही सूचित होते. एक-दोन मुले गळ्यात असलेली, सनातनी घरातील तरुण सून जेव्हा 'आपण स्वखुषीने या अभद्र रूढीला शरण गेलो' असे पोलिसांपुढे सांगते तेव्हा, तिच्या खुषीला सक्तीहूनही भीषण अर्थ असतो!

पण या प्रकारामुळे पुन्हा सनातनी आणि सुधारक ही दोन ठराविक लेबले लावून महाराष्ट्रीय ब्राह्मण समाजाची विभागणी करणे बरोबर होणार नाही. तसे करणे म्हणजे कपाळभर गंध लावून नाक धरून देवापढे बसणारा माणूसच काय तो स्त्रियांच्या बाबतीत निर्दय राक्षस होऊ शकतो, असा सिद्धांत मांडणे होय! 'सुधारक' आणि 'सनातनी' हे दोन वर्ग जसे हिंदू समाजात आहेत, तसेच सदय आणि निर्दय, उदार आणि अनुदार हेही वर्ग आहेत, हे विसरून चालणार नाही. केशवपनाची चाल आपण सनातन्यांच्या माथी मारतो, पण निर्दयपणा सर्रासपणे केवळ सनातन्यांच्या माथी मारता येणार नाही, हे विसरून चालणार नाही.

आमचे सुधारक बंधू केशवपनाची सक्ती करण्याचा गुन्हा करणार नाहीत, पण 'स्त्रियांच्या बाबतीत निर्दय होणारच नाहीत' असे म्हणण्याचा वेडेपणा कोणी करू नये. सुनेचे केशवपन करणारे लोक सुधारकांत नसतील, पण निर्दयपणाने बायकोला 'डायव्होर्स' घ्यायला लावून तिच्या जन्माची होळी करणारे बहाद्दर सुधारकांतही

दाखवता येतील. म्हणजे 'सुधारक' आणि 'सनातनी' असा भेद न करता, निर्दय आणि सदय, अनुदार आणि उदार असा भेद करणेच योग्य होईल. सनातन्यांचे अध्वर्यू आणि धर्ममार्तंड म्हणून प्रख्यात असणाऱ्या पुण्यातील एका विद्वानाचे उदाहरण मला आठवते. त्यांनी स्वतःच सांगितलेली हकीकत-एका विधवेला सनातनी नसलेल्या तिच्या दिराने गर्भपाताचा खोटा आरोप करून घराबाहेर काढले होते. वर उल्लेखिलेल्या कट्टर सनातनी पंडितांनी लोकापवादाची भीती असूनही मुलाबाळांनी भरलेल्या आपल्या घरात या विधवेला नोकरीस ठेवून घेतले. काही वर्षांनी स्वतंत्रपणे राहू लागल्यावरही जणू त्यांची कन्या किंवा बहीण असल्याप्रमाणे ती स्त्री या सनातनी पंडितांच्या घरच्या लग्नकार्यात येऊन त्यांना आहेर करीत असे! अर्थात् ती सकेश विधवा होती हे सांगणे नकोच. याही पंडितांच्या घरी सांगलीच्या ईश्वरशास्त्रींच्याप्रमाणे अग्निहोत्र होते.

दीक्षितशास्त्रींच्या सुनेच्या केशवपनाचे पडसाद महाराष्ट्र मंत्रिमंडळातील स्त्रियांपर्यंत पोहोचले आहेत. सांगलीतील स्त्रियांनी तर या प्रकरणात आरंभापासूनच धडाडीची भूमिका घेतली आहे. पुण्यातील समाजवादी स्त्रियांनी तर म्हणे वसुमतीबाईंच्या चारितार्थाचीही जिम्मेदारी घेण्याची तयारी दाखविली आहे. पण जिचे केशवपन झाले तिचीच नाखुषी नव्हती असा पोलिसांपुढे जबाब आहे म्हटल्यावर, सांगलीच्या 'निवेदिता प्रतिष्ठान'च्या डॉ. कुसुम घाणेकरांपासून ते मंत्रिमंडळातील सौ. प्रतिभा पाटलांपर्यंत सर्वांचीच तोंडे बंद झाली! अशा प्रकरणातील 'स्वखुषी' या शब्दाच्या अर्थाची अधिक छाननी व्हायला हवी. पूर्वी सती जात त्यादेखील 'स्वखुषीने'च जात? पण राममोहन रॉयसारख्यांनी पुढे होऊन सरकारी कायदा केल्यावर त्यांच्या त्या खुषीचे काय झाले कोण जाणे! पण सतीची चाल भीषण असेल तर, केशवपनाची चाल बीभत्स आहे. संन्यास्त वृत्तीनेच जर विधवेच्या मनाची केशवपनाची तयारी होत असती, तर या संन्यासिनी लोकांच्या पोळ्या लाटीत बसल्या नसत्या! त्या मठात किंवा वनात जाऊन राहिल्या असत्या.

सतीच्या कायद्याप्रमाणे असहाय विधवांच्या केशवपनाला हातभार लावणारांना सक्तमजुरीची शिक्षा ठेवली तर, अग्निहोत्राचेदेखील केशवपनावाचून अडणार नाही अशी माझी खात्री आहे! समाजवादी स्त्रियांनी एखाद्या वसुमतीबाईची जिम्मेदारी घेण्याने हे भागण्यासारखे नाही. सौ. प्रतिभा पाटील यांनी ईश्वरशास्त्रींना सविनय प्रार्थना करणे तर त्याहून व्यर्थ आहे. काही करायचेच असले तर प्रतिभा पाटलांसारख्या स्त्रियांनी विधवांच्या केशवपनाला हातभार लावणारे लोक पीनल कोडाखाली शिक्षेला पात्र ठरतील अशी व्यवस्था करावी.

मग ते लोक नातेवाईक असोत की नापित असोत!!

तेजस्वी (श्री. के. क्षी. उवाच),<br>
३० मार्च १९७५, पृ. २.

अनुक्रमणिका

# २१

## स्त्रियांचे 'लिब्' म्हणजे काय?

मला परवापरवापर्यंत 'लिब्' हा शब्दच माहीत नव्हता. मला वाटते तीन-चार वर्षांपूर्वी 'स्त्री' मासिकाच्या, की 'स्त्री'नं भरविलेल्या एका परिसंवादात भाग घेताना, मला तो शब्द प्रथम माहीत झाला. पण स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ जुनीच असल्यानं आता हे 'लिबरेशन' म्हणजे आणखी काय, ते मला कळेना. कोणा एकानं त्याचा खुलासा केला आहे. पूर्वी स्त्रियांना पुरुषांपासून स्वातंत्र्य हवे होते, तर आता त्यांना स्त्रीत्वातूनच सुटका करून घ्यावयाची आहे! स्त्रीत्वाची एकेक जबाबदारी आणि त्या जबाबदारीकरिता त्यांच्या वाट्याला आलेले स्त्रीशरीर यांच्यातूनच त्यांना मुक्तता हवी आहे! आजकाल तरुण मुली पॅन्टशर्ट घालून हिंडतात, त्याही उपक्रमाचा संबंध या 'लिब्' चळवळीशीच आहे.

स्त्रीच्या जन्माला आल्यावर कायद्याने, पोशाखाने अथवा संततिनियमनाने स्त्रीचे 'विमोचन' (lib) होऊ शकेल काय? काही पाश्चात्य स्त्रियांना तशी खुळी आशा वाटते आणि त्यांची प्रत्येक चळवळ उचलणाऱ्या आमच्या स्त्रियांना इकडेही स्त्रीविमोचनाची चळवळ करणे आवश्यक वाटते. म्हणूनच पाश्चात्यांच्या स्त्रीविमोचनाची गाडी कोठपर्यंत आली आहे ते पाहणे जरूर आहे. ते पाहाताना वर्तमानपत्रातील चळवळ नि जाहीर सभांत केली जाणारी भाषणे पाहून चालणार नाही. प्रत्यक्ष कौटुंबिक जीवनात व जबाबदाऱ्यांत कितपत बदल झाला आहे ते पाहिले पाहिजे. कुटुंबातील नवऱ्याचे 'डॉमिनन्स' ('दादागिरी') कितपत कमी झाले आहे? मुलांना जन्म देण्याची नि त्यांच्या अजाण अवस्थेत त्यांना अंगाखांद्यावर खेळवण्याची जबाबदारी कितपत कमी झाली आहे?

होय, या जबाबदाऱ्याही थोड्याफार कमी झाल्या आहेत. नोकरीमुळे नवऱ्याचा एकतंत्री अंमल थोडा कमी झाला आहे आणि मुलांची जबाबदारी संख्येने तरी कमी झाली आहे. आजन्म प्रसवक्रियेची जबाबदारी 'दो या तीन' या मंत्राने लग्नानंतरच्या चार-पाच वर्षांतच संपू लागली आहे, पण त्यामुळे 'लिब्'वाल्यांना आपले 'मंझिल' गाठल्याचे मात्र समाधान मिळालेले नाही. कारण स्त्रियांचे ध्येय नुसते पतीचे वर्चस्व झुगारून देण्याचे नसते, तर पतीवर वर्चस्व गाजविण्याचे असते. संततिनियमनाने किंवा द्रव्यार्जनाने पुरुषांचे वर्चस्व कमी करण्यास मदत होईल, पण पुरुषावर वर्चस्व गाजविण्याचे काय?

आपल्या खऱ्या उद्दिष्टाची, पुरुषावर हुकूमत गाजविण्याची तिकडील स्त्रियांना पुन्हा जाणीव झाल्यापासून तिकडे एक नवीनच चळवळ सुरू झाली आहे. त्या चळवळीचे नाव ''आकर्षक स्त्रीत्व संस्था'' या अर्थाचे आहे. त्या ठिकाणी खास स्त्रियांचे कसब, स्त्रियांना शिकविणाऱ्या शिक्षिका तयार होतात! तेथे 'काय शिकविले जाते' या प्रश्नापेक्षा, 'काय शिकविले जात नाही' हाच प्रश्न विचारावा लागेल. नवऱ्यावर रागावल्यावर पाय कसे आपटायचे, त्याच्याकडे तिरपे कसे पाहावयाचे आणि कोपावस्थेतही सुंदर कसे दिसायचे, यांसारख्या विषयांवर या संस्थेत 'ट्रेनिंग' दिले जाते.

अनुक्रमणिका

पण स्त्रियांचे हे नवे तत्त्वज्ञान म्हणजे एका अर्थाने जुनी 'ख्रिश्चियॅनिटी'च आहे. जुना ख्रिस्ती धर्म आणि जुना हिंदू धर्म स्त्रियांच्या बाबतीत सारखेच तत्त्वज्ञान सांगतात. पुरुष हा स्त्रीचा स्वामी (Lord) आहे आणि त्याच्या आज्ञेत राहाणे यातच स्त्रीला सुख आहे. म्हणजे आता स्त्रियांच्यापुढील 'प्राब्लेम'चे स्वरूप कसे होते ते पहा. ज्याच्या आज्ञेत राहाण्याशिवाय गत्यंतर नाही त्याला मुठीत ठेवण्याचा मार्ग शोधून काढणे. अर्थात् यात तोंडाळपणाचा आणि लढाईच्या भाषेचा उपयोग थोडाच आहे. हा प्रांत लबाडीचा (सद्हेतूमूलक लबाडीचा) आणि युक्तिबाजपणाचा आहे. आणि म्हणूनच 'लिब्'ची चळवळ मूर्खपणाची आहे अशी ज्यांची खात्री पटली आहे अशा एक-दोन नव्या पाश्चात्य 'नेत्या' जे काय शिकवतात, त्याचे वर्णन ''a kind of psychic Judo'' असे करण्यात आले आहे. थोडक्यात म्हणजे पाश्चात्य देशांतील अनुभवी स्त्रिया नव्या भाषेत जुनेच शहाणपण शिकवीत आहेत. 'पडून घर घेणे' अशी एक जुनी 'फ्रेज' किंवा म्हण खेड्यांत ऐकू येते. स्त्रिया ज्या प्रकारे आपल्या नवऱ्याच्या घराच्या स्वामिनी बनतात त्या प्रकारचेच जणू हे वर्णन आहे. योग्य वेळी, तोंड कडू न करता पड घेत घेत त्या आपल्या नवऱ्यावर हुकूमत गाजवतात, नव्हे नवऱ्यावर हुकूमत गाजविण्याचा तेवढा एकच मार्ग आहे. इतर वाटा गृहनाशाकडे आणि 'डायव्होर्स'कडे नेणाऱ्या आहेत.

म्हणूनच 'डायव्होर्स' आणि तोंडातोंडी हे ज्यांचे उद्दिष्ट आहे त्यांचा मार्ग आणि घर मोडू न देता नवऱ्यावर हुकूमत गाजवू पाहणाऱ्या स्त्रियांचा मार्ग, हे दोन अगदी वेगळे ठरतात. जुन्या हिंदू धर्मात किंवा ख्रिस्ती धर्मातही, 'स्त्रियांनी पुरुषांचे गुलाम व्हावे', 'पुरुष करतील तो छळ सहन करून घ्यावा' असे सांगितलेले नाही. पण दोन माणसे एकत्र राहिल्यावर कोणातरी एकाचीच हुकूमत चालणार ही वास्तवता लक्षात घेऊन, जुन्या धर्माने स्त्रियांना आज्ञापालनाचा किंवा 'submission'चा मार्ग सांगितलेला आहे. पण स्त्रीच्या नुसत्या 'सबमिशन'ने स्त्रीलाच काय पण पुरुषालाही सुख मिळेल असे नव्हे.

स्त्रीचा मुख्य धर्म आज्ञापालन हाही नव्हे की 'लिब्'ची चळवळ चालवणे हाही नव्हे. स्त्रीचा मुख्य धर्म पतीला प्रिय होऊन संसाराचे सुख साधणे हा होय, म्हणून 'लिब्'ला विरोध करणारा दुसरा एक पंथ पतिपरायणतेचा मार्ग पुरस्कारतो. पण या दोन्ही पंथांचा मुख्य उद्देश पुरुषाशी पुरुषी गुणांत स्पर्धा करण्याचे खूळ स्त्रियांच्या डोक्यातून काढून टाकणे हा आहे. पुरुषाशी स्पर्धा न करतील तर स्त्रिया पुरुषांहून श्रेष्ठ ठरतील, असा विरोधी न्याय आहे. कारण मग स्त्रियांच्या गुणांवरूनच स्त्रियांचे स्थान ठरेल.

पण अमेरिकन स्वभावाला धरून या 'लिब्'विरोधी नव्या पंथांनी स्त्रियांना काही विचित्र मंत्र दिले आहेत. एक स्त्री म्हणते-नवरा बाहेरून येण्याच्या वेळी बायकोने भयंकर 'सेक्सी' पोषाख करावा. पण या बाबतीत भारतीय स्त्रियांना पाश्चात्य स्त्रियांचे शिष्यत्व पत्करण्याचे कारणच नाही. 'आकर्षक स्त्रीत्व' संप्रदायाच्या नेत्या एक गोष्ट कशी विसरल्या याचे मला नवल वाटते. सेक्सी पोषाखापेक्षा आणि सेक्सी वृत्तीपेक्षा खऱ्या पुरुषावर सलज्जतेचा परिणाम अधिक होईल. जे मानसशास्त्रीय विजयंतत्र (psychic Judo) 'लिब्'विरोधी पाश्चात्य नेत्या शिकवीत आहेत त्यात लज्जेला किंवा लज्जाभिनयाला महत्त्वाचे स्थान देणे जरूर आहे. पण सगळ्याचा सारांश एकच. पडते घेतल्यासारखे दाखवून प्रतिस्पर्ध्यावर मात करणे यालाच जपानी द्वंद्वयुद्धाच्या तंत्रात 'ज्युडो' म्हणतात. जुन्या काळातील स्त्रियांचे लाजणे, रुसणे, पडते घेणे म्हणजे एक psychic Judo च होते. पण त्याचे मर्म न समजल्याने पाश्चात्य स्त्रियांनी प्रत्यक्ष लढाईचा मार्ग पत्करला. त्यात यश आले तर, त्या संसाराला

मुकतील. त्यांनी ज्युडोचा किंवा 'पडून घर घेण्याचा' मार्ग अनुसरला तर, 'खुळ्या पुरुषांना आपण जिंकले' असा भ्रम उत्पन्न करून स्त्रिया त्यांच्यावर मात करतील.

तेजस्वी (श्री. के. क्षी. उवाच),
१३ एप्रिल १९७५, पृ. २ व ८.

अनुक्रमणिका

# २२

## एक आधुनिक आई

त्यावेळी माझा 'लेखक' परीक्षेच्या अभ्यासाकरिता काही दिवस माझे लेखनाचे काम सोडून गेला होता. ''दुसरा कोणी तूच तुझ्या माहितीने पाहून दे! '' असे मी त्याला सांगितले. मी एकच अट घातली- ''तो तुझ्याइतका 'सालस' असावा, मग लिहिण्यात थोडा सुमार असला तरी चालेल!''

माझा रायटर 'पीएच्. डी.'ला प्रबंध सादर करण्याच्या गडबडीत होता. ''सर, एक एक सोबती तुम्ही पाहिले आहेतच! त्यापेक्षा, माझ्या बहिणीची एक मैत्रीण वाङ्मयाची भोक्ती आहे असं ती म्हणत होती, तिलाच तुमच्याकडे पाठवून द्यायला सांगू का?''

अलीकडच्या मुलांपेक्षा 'मुलगी' काही झाले तरी अधिक गरीब असणार, अशा हिशेबाने मी होकार दिला. माझ्या पीएच्. डी.च्या विद्यार्थ्याने माझ्याकडे धाडून दिलेली मुलगी विवाहित असून अन्यत्र नोकरी करीत असे. ती दिसण्यात आणि पोषाखात पूर्ण आधुनिक होती किंवा आजकालच्या आवडत्या शब्दांत वर्णन करावयाचे झाल्यास 'स्मार्ट' होती. तिला माझ्याकडे धाडताना, धाडणाऱ्या विद्यार्थ्याने तिच्यासंबंधी सहज थोडे सूचित केले होते. त्याचे म्हणणे, ती 'लेखिका' म्हणून तर येईलच, पण तिचे स्वतःचेही काही कौटुंबिक 'प्रॉब्लेम्स' आहेत.

तिच्याकडे पाहून तर मला तिला कोणतेच प्रॉब्लेम्स असतील असे वाटले नाही! ती प्रथम आली त्या दिवशी पॅन्ट आणि बुशकोट घालून आली होती. ती अति आधुनिक असली तरी स्वतःच्या पोषाखासंबंधी किंवा दिसण्यासंबंधी फारसा विचार करणारी दिसत नव्हती. आजच्या भाषेत सांगायचे म्हणजे ती कमीत कमी 'सेल्फकॉन्शस' होती. प्राथमिक माहिती म्हणून मी सहज तिच्या घरची माहिती विचारली. ''राहता कुठे? तुमचे मिस्टर काय करतात? पूर्ण वेळ नोकरी करीत असून तुम्हांला फिरून हे काम करणे कसे जमते?'' इ. इ.

शेवटी मी सहज विचारले, ''मुले-बाळे''? तिने उत्तर केले, ''मोठी मुलगी अकरा वर्षांची आहे आणि मुलगा सात वर्षांचा आहे.'' ही माहिती सांगताना, ती तितकीशी प्रसन्न दिसली नाही. आमचे लिहिण्याचे काम सुरू झाले. अधूनमधून लिहिण्याची घाई नसल्यास अथवा माझ्या डोक्यात विषय साचलेला नसल्यास इतरही विषय निघत. तो पीएच्. डी.चा विद्यार्थी म्हणाला 'ते' कौटुंबिक प्रॉब्लेम्स कोणते असतील असेही सहज माझ्या मनात येऊन गेले.

माझ्या विचारसरणीची आणि स्वभावाची थोडीफार अधिक माहिती झाल्यावर तिने त्या कौटुंबिक समस्यांसंबंधी काही अस्फुटपणे सूचित करण्यास सुरुवात केली. तिची मोठी मुलगी तिचे अजिबात ऐकत नसे, म्हणजे फक्त दहा अकरा वर्षांची मुलगी, ती मुळी तिला जुमानीतच नसे, ही तिची मुख्य समस्या होती. इतक्या लहान मुलीच्या समस्या त्या काय असणार? फ्रॉक कोणता घालावा? अभ्यासाला कुठे बसावे? बाहेरची माणसे आल्यावर त्यांच्यासमोर काय बोलावे अगर बोलू नये? या म्हणजे मोठ्याशा 'समस्या' आहेत असे नव्हे. पण या

आधुनिक आईची मुख्य समस्या वेगळीच होती. 'मुलगी आपल्या शब्दाला मानच देत नाही! ' जणू आपण तिच्या खिजगणतीतच नाही! आणि असे का व्हावे ते तिला कळत नसे. तिच्या दृष्टीने स्वतःमध्ये तर काहीच वैगुण्य नव्हते. ती दिसायला चांगली होती, तरतरीत होती. तिचे कपडे नीटनेटके असत. बाहेरचे लोक तिच्याकडे कौतुकाने पाहाताना दिसत. मग तिच्या मुलांनाच ती उपेक्षणीय का वाटावी?

एक दिवस माझे-तिचे त्या घरगुती विषयावरच बोलणे झाले. एरवी फुलपाखराप्रमाणे निष्काळजी दिसणारी आणि वयाच्या मानाने 'गर्लिश' दिसणारी ही तरुणी एवढ्या बाबतीतच सचिंत आणि खिन्न दिसत होती.

मी स्वतःला थोडाफार मनोवैज्ञानिक समजतो. निदान ज्यांच्याविषयी मला आस्था आहे त्यांच्या वैयक्तिक समस्या समजून घेण्याचा मला नाद आहे. 'मुलांच्या बाबतीत ही अयशस्वी का?' याची काहीशी कल्पना मला तिच्याकडे पाहूनही आली होती. मुलांची वडील माणसांसंबंधी काही विशिष्ट कल्पना असते. 'आई म्हणजे अमुक प्रकारची', 'वडील म्हणजे अमुक एक प्रकारचे' या कल्पना त्यांनी काही अंशी क्रमिक पुस्तकांत वाचलेल्या वर्णनावरून घेतलेल्या असतात, तर काही अंशी इतर मुलांच्या घरांतील वडील माणसांकडे पाहून घेतलेल्या असतात. मला एक असा लहान मुलगा माहीत आहे की जो आपल्या आईला 'आई' म्हणायला तयार नसे! एक तर तिचे घरातील नाव 'आक्का' होते. दुसरे म्हणजे तिच्या घरात तिची आई म्हणजे त्या मुलाची आजीही राहात असे. मी त्याला एकदा सहज म्हटले, ''अरे तू आईला आक्का काय म्हणतोस? 'आई' का म्हणत नाहीस?'' त्यावर तो म्हणतो, ''हट्! ही कसली आई? आई काही असं नेसत नाही.''

त्याची आजी 'सकच्छ' (नऊवारी) नेसत असे आणि घरात तिलाच 'आई' या नावाने संबोधीत असत. उलट, या मुलाची आई 'विकच्छ' (पाचवारी) नेसत असे. त्या बालमनाने मनाशी ठरवून ठेवले-सकच्छ नेसेल तीच आई! आणि आपली आई ज्याअर्थी पाचवारी नेसते त्याअर्थी ती बहीण, वगैरे कुठल्यातरी बरोबरीच्या नात्यांपैकी असली पाहिजे!

ते काही असो, मी त्या तरुण स्त्रीच्या घरी जायचे ठरविले. कारण 'पेशंट'चे घर पाहिल्याशिवाय डॉक्टरला पेशंट पुरता समजत नाही. मी तिची ती 'प्रॉब्लेम-मुलगी' पाहिली. ती इतरांशी चांगली वागे. अर्थात् माझ्याशीही चांगली वागली. पण आईशी मात्र ती काहीशा तुच्छतेने वागे. ती कोणी वडील माणूस आहे, असे समजायला ती तयारच दिसली नाही. वार्धक्यापर्यंत किंवा निदान पोक्त वयापर्यंत बालिश राहाण्याचा किंवा बालिश दिसण्याचा आजच्या स्त्री-पुरुषांचा जो अट्टाहास चालतो, त्याचा तर मुलांच्या मनावर असा विपरीत परिणाम होत नसेल ना, असे माझ्या मनात येऊन गेले.

पण त्या आधुनिक मातेची आणखीही एक तक्रार होती. ती म्हणजे, ''आणखी हा 'दिनकर' यात अगदीच लक्ष घालीत नाही? तिला कधी बोलतच नाही!'' ही ती तक्रार होय!

'दिनकर' म्हणजे या स्त्रीचा नवरा! आणि त्या 'प्रॉब्लेम-मुली'चा बाप! त्याला ती स्त्री स्वतःच्या मुलीसमोरही 'दिनकर' म्हणे! मुलगीही त्याला दिनकरच म्हणे. मुलगी आईला तिच्या नावानेच म्हणजे

'मालती' म्हणून हाक मारी! मुलगी हुशार होती. शिक्षकशिक्षिकांची आवडती होती. पण आईबापांना मात्र वडील माणसांत गणायला तयार नव्हती.

ही होती त्या आधुनिक आईची 'कौटुंबिक समस्या'! म्हणजे त्या अत्याधुनिक फॅशनेबल घरात नवराबायको होते. लहान हुशार मुले होती, पण 'वडील माणसे'च नव्हती. आपले आईबाप म्हणजे दोन मोठी मुलेच आहेत, अशी त्या मुलीची कल्पना होती! त्यांनी आपल्याला 'अमुक कर, अमुक करू नको' असं काय म्हणून सांगायचं? ही मालती आपल्यापेक्षा मोठी आहे, एवढ्या जोरावर आपल्यावर दादागिरी गाजवते, अशी त्या मुलीची तक्रार होती. त्यामानाने आमचा 'दिनकर' समजूतदार आहे, फारसा आपल्या वाटेला जात नाही, असेही तिचे मत होते! पण दिनकरच्या या बेपर्वाईबद्दल मालतीची तक्रार होती!

बाकी सर्व दृष्टींनी हुशार, स्मार्ट, सुखवस्तू आणि सुखी असलेल्या या तरुण आधुनिक आईची ही विचित्र समस्या कशी सोडवायची, हा मला प्रश्न पडला होता!

जुन्या जमान्यातले आईबाप अकाली प्रौढ होत, वृद्धही होत. आजच्या जमान्यातल्या तरुण-तरुणींना, 'प्रौढ दिसण्याची' नव्हे, 'प्रौढ होण्याची'च भीती वाटते! वाढत्या वयाबरोबर जोडीदार मिळवणे-लोकांवर 'इंप्रेशन' मारील असा जोडीदार मिळवणे, हा त्यांच्या सामाजिक ईर्ष्येचाच एक भाग असतो. अन् मग 'नको नको' म्हणत असताही घरात एकदोन लहान पाहुणे निसर्ग धाडून देतो. केवळ समाजाच्या डोळ्यांत भरण्याचीच महत्त्वाकांक्षा पोसणाऱ्या या तरुण मातेला या सर्वस्वी वेगळ्या प्राण्यांशी कसे वागावे याचे ज्ञानही नसते की त्यासंबंधी ईर्ष्याही नसते! केवळ स्वतःच्या 'दिसण्यात' दंग असलेल्या या आधुनिक स्त्रीवर निसर्ग एकदम वेगळीच जबाबदारी टाकतो. आपल्या अनुभवाची देणगी घेऊन आलेले वृद्ध लोकही आजच्या दोन खोल्यांच्या संसारात असू शकत नाहीत!

पहिले काही दिवस 'प्राणिसहज' (बायोलॉजिकल) वात्सल्यात निघून जातात. हळूहळू त्या लहान प्राण्याचेही व्यक्तिमत्त्व वाढू लागते. घराबाहेरचे जगही त्याला दिसू लागते.

अन् मग त्या मुलाबरोबरच त्याचा 'प्रॉब्लेम' ही वाढू लागतो! आधुनिक 'दिनकरा'चीही (नवऱ्याचीही) त्यात फारशी मदत होत नाही. अशी आहे आमच्या आधुनिक मातेची समस्या!

स्वराज्य (मुंबई-पुणे),
१४ जून १९७५, पृ. ३.

अनुक्रमणिका

# २३

## नवरेशाही संपण्याची लक्षणे नाहीत!

मध्यम वर्गातील विवाह जुळविण्याची समस्या-विशेषतः वधूच्या बाजूने किती बिकट आहे आणि तिच्यामध्ये एका ब्राह्मणेत्तर व्यापारी समाजाने कशी क्रांतिकारक पद्धतीने तोड काढली आहे, यासंबंधी माझ्या मागील एक स्तंभात मी लिहिले आहे. विवाह जुळविण्याइतकेच विवाह साजरा करणे वधूपक्षाच्या दृष्टीने आपण बिकट करून ठेवलेले आहे. विवाह समारंभातील कित्येक दिखाऊ, पोकळ आणि खर्चिक चालींसंबंधी मागील लेखात लिहिले. पण विवाह जुळविणे आणि आजच्या राक्षसी महागाईच्या काळात तो वरपक्षाच्या अपेक्षेप्रमाणे साजरा करणे एवढ्या दोनच दिव्यांतून वधूपक्षाला जायचे असते, असे नव्हे एवढे सर्व केल्यानंतर मुलीला आपण सुखात टाकली की दुःखात टाकली हा प्रश्न सुटायचाच असतो!

पहिली एक-दोन वर्षे रूढीप्रमाणे मानपान, नव वधू-वरांचे सामाजिक प्रदर्शन यात निघून जातात. वधू सुखात आहे की नाही, यापेक्षा नववधू पाहण्याचे सुखातच नातेवाईक अधिक गुंग असतात! पण नंतरच्या या नांदण्यात आणि नांदविण्यात पूर्वीप्रमाणेच आजही अनेक भ्रम आणि अनेक अहंकार डोकावत असतात. वधू-वरांच्या सुखापेक्षा, किंबहुना त्यांच्या सुखाला हातभार लावण्यापेक्षा अर्थशून्य मानपानांची चर्चाच वधू-वरांच्या घरात चाललेली असते. पूर्वी तर बिचारी वधू अजाण आणि अल्लड असे. तिला नवीन घरात आपलेसे वाटायला मदत करण्याऐवजी तिला व तिच्या माहेरच्यांना हिणविण्यातच वरपक्ष पुरुषार्थ मानीत असे!

आता प्रौढ वधूचा जमाना सुरू झाला आहे. म्हणजे वधूपक्षाचा अपमान आणि हाल संपले असे मात्र नव्हे. पूर्वी सासू-सासरे, जावा-नणंदा यांच्या लहरी सांभाळाव्या लागत. त्याऐवजी आज वराच्या लहरी सांभाळाव्या लागतात. पूर्वीच्या वरांना बिचाऱ्यांना लहरीच नसत, कारण ते अल्पवयस्क आणि अजाण असत. आजचे वर अल्पवयस्क नसतात एवढेच काय ते, पण ते अजाण नसतातच असे नाही. वरांना होणाऱ्या पहिल्या भ्रमाचे कारण ऐन तरुण वयात सर्वस्वी आपल्या ताब्यात असलेले माणूस त्यांना प्रथमच लाभत असते! त्यामुळे त्यांच्या स्वतःविषयीच्या भ्रमाला भलतीच भरती येते. पूर्वी पोरकट नवरेशाही अहंकारावर वडील माणसांच्या मतांचे आणि धाकांचे नियंत्रण होते. सामाजिक रूढीचेही बरेच नियंत्रण होते. आता नवरा हा प्राणी सर्वस्वी स्वतंत्र आणि म्हणूनच भ्रमाच्या बाबतीत पुष्कळदा फार पुढे गेलेला असतो. आपल्या तथाकथित क्रांतिकारक कल्पना आपल्या नववधूवर लादण्याच्या हक्काचा त्याला जणू उन्माद चढलेला असतो.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रायः त्यांच्याइतक्याच शिकलेल्या नववधू त्यांच्या खुळ्या कल्पनांना विनयपूर्वक विरोध करण्यालाही असमर्थ ठरलेल्या दिसतात! हे नवरे एखादी पदवी आणि एखादी नोकरी संपादन केलेले असतात, एवढेच त्यांचे कर्तृत्व. ज्याला विचार, प्रौढपणा किंवा संयम म्हणता येईल असे या पदवीबहाद्दरांच्या जवळ फारच थोडे असते. किंबहुना, परंपरा, प्रौढपणा आणि संयम यांचा भंग करणे म्हणजेच शौर्य, अशी या नववरांची पुष्कळदा कल्पना असते.

अनुक्रमणिका

या परंपरा-भंगातील पुरुषार्थाचे एक विचित्र उदाहरण मला आठवते. सुमारे पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. माझ्या एका क्रांतिकारक मित्राचे लग्न नुकतेच झाले होते. वधू पुण्यातील एका कॉलेजच्या होस्टेलमध्ये राहात असे. दिवस चांदण्याचे होते. आमच्या क्रांतिकारक नवविवाहित मित्राला रात्रीच्या वेळी होस्टेलवर जाऊन आपल्या वधूला चांदण्यात फिरायला नेण्याची लहर आली. पण एकट्याने वधूच्या होस्टेलवर जाण्यास विशेष ते काय? बरोबर एक-दोन मित्र घेऊन त्यांच्या समोर आपल्या पुरोगामित्वाचे प्रदर्शन करण्याचा त्या मित्राने विचार केला. त्या एक-दोन मित्रांत माझा अंतर्भाव होता. होस्टेलवर गेल्यानंतर आमच्या मित्राने आपल्या वसतिगृहनिवासी वधूला बाहेर बोलावून घेतले आणि आपल्या मित्रांशी पाश्चात्य पद्धतीने 'इंट्रोडक्शन' करून दिली, अर्थात् या इंट्रोडक्शनमध्ये हस्तांदोलनाचा अंतर्भाव होता हे सांगायला नकोच.

व्यक्तिशः मी पाश्चात्य रिवाजाशी अपरिचित नसलो तरी कारणाशिवाय आपल्या स्त्रियांना पाश्चात्य रिवाजाची दीक्षा देणे मला आजही मूर्खपणाचे वाटते. मग चाळीस वर्षांपूर्वी मला ते किती औचित्यशून्य वाटले असेल, हे सांगायला नकोच. सदर मित्राची पत्नी पुरोगामित्वात कमी नव्हती. तरी तिलाही पतिमित्रांशी हस्तांदोलन करणे कसेसेच वाटत होते. शिवाय स्पर्श टाळण्याला तिला इतरही कारणे होती. त्यांचा तिने नाइलाजाने अप्रत्यक्षपणे निर्देशही केला! पण आमचे क्रांतिकारक मित्र असे बहाद्दर की, तिने निर्देशिलेल्या स्पर्श-विषयक अडचणीमुळे हस्तांदोलनाला त्यांना दुप्पट अवसान चढले! कारण त्यात केवळ एका कृतीने सहजच दोन क्रांत्या घडत होत्या!

काही नववर आपल्या नववधूला तिच्या घरी पिढ्यानुपिढ्या शाकाहार चालत आलेला असून केवळ क्रांती म्हणून मांसाहाराची सक्ती करतात. तिला बिचारीला सवयीच्या अभावी त्याची चव तर राहोच, पण किळस येत असते. पण या क्रांतिकारक नवरोजींच्या लहरीला विरोध करून (क्षमापूर्वक का होईना) त्या अभक्ष्यभक्षणाचा इन्कार करण्याचे धाडस पदवीधर वधूलाही होत नाही. माझ्या माहितीच्या एका नववधूला सर्वसामान्य मांसाहाराची तर किळस होतीच, पण अंडे खाण्याने तर तिला वांतीच होई आणि तरी त्या अडाणी पदवीधर नवऱ्याच्या लहरीखातर तिला नित्य कुक्कुट-भक्षण आणि वांती या दोहोंचाही अनुभव घ्यावा लागे!

दुसऱ्या एका नववधूची ही कथा : तिचे केस हेवा करण्याइतके विपुल होते. गळ्यात दोन भरगच्च वेण्या सोडल्यावर ती 'पॉवरफुल' दिसते असे तिच्या मैत्रिणी म्हणत! विवाह झाल्यानंतर तिच्या 'मॉडर्नाइझ' झालेल्या पतीने जर कोणती पहिली गोष्ट केली असेल तर ती म्हणजे तिच्या त्या विपुल केशसंभाराला कात्री लावून तिचे डोके आणि मान पुरुषसदृश दिसायला लावले! तिला किंवा तिच्या मैत्रिणींना हे प्रिय होते असे नव्हे, पण 'यांच्यापुढे काय चालणार!'

कुणाचे काही आग्रह, कुणाचे काही आग्रह! एक अगदी शालीन आणि सुंदर मुलगी (जिच्या लग्नात मी हजर होतो) मी लग्नानंतर चार महिन्यांनी पाहिली तेव्हा, ती बेंबीच्या खाली वस्त्र नेसून फिरत होती. मला आश्चर्याचा धक्का बसला. नेसण्याचा उल्लेख अर्थात्च मी तिच्यासमक्ष करू शकलो नाही आणि तरी माझ्या चेहऱ्यावरील आश्चर्याचा धक्काही लपवू शकलो नाही. त्या मुलीने सलज्जतेने 'अपॉलोजाईज' केले. 'यांना अजंठा पद्धतीचं नेसणं आवडतं ना!'

अनुक्रमणिका

हे सर्व 'क्रांतिकारक' प्रकार पुढे सातत्याने चालत राहातातच असे नाही. पण नव्यानेच हातात सापडलेल्या स्त्री-व्यक्तीवर क्रांतीचे प्रयोग करणे हा आजचे आधुनिक पण अपक्व नरवर आपला हक्क समजतात.

तेजस्वी (श्री. के. क्षी. उवाच),
२९ जून १९७५, पृ. २.

अनुक्रमणिका

## २४

# स्त्री-दाक्षिण्याची वाढती गरज

स्त्रियांचा सामाजिक दर्जा वाढवायचा म्हणजे त्यांना पुरुष समजूनच वागवायचे ही कल्पना स्त्रियांच्या दृष्टीनेच घातुक आहे. 'समानता' म्हणजे 'सारखेपणा' नव्हे. Equality म्हणजे Uniformity नव्हे.

परवा वृत्तपत्रात 'पुण्यातील एका मुलीने टिंगलखोर मुलांपैकी एकाचा हात पकडला आणि त्याला आपला गुन्हा कबूल करावयास लावला' अशी वार्ता आली होती. तिच्या मदतीला रस्त्यातून जाणारे लोक आले तरी तिने त्यांचे साहाय्य स्वीकारले नाही, असेही त्या वार्तेत पुढे म्हटले होते व मुलीचे कौतुक केले होते.

अशा मुलीचे कौतुक कोणीही करील, मीही करतो. पण समाजातील असभ्य प्रवृत्तीच्या लोकांशी किंवा गुंडांची शारीरिक झटापट करण्याचा प्रसंग आपल्या स्त्रियांवर यावा, ही गोष्ट संपूर्ण समाजाला भूषणावह नाही. येथपर्यंत पाळी येते, याचाच अर्थ समाजातील अपप्रवृत्तीच्या लोकांना सभ्य समाजाचे भय उरलेले नाही. आपण रस्त्यात कोणाशीही दंडेली केली- स्त्रियांशीदेखील असभ्य वर्तन केले तरी, बाकीचे जाणारे-येणारे नुसते वाकडे तोंड करण्यापलीकडे त्यात लक्ष घालणार नाहीत अशी पुण्यासारख्या शहरातील गुंडांची मनोमन खात्री असते.

याला कारण लोकांचा दुबळेपणा किंवा उदासीनपणा एवढेच केवळ नाही, तर स्त्रियांच्या बाबतीतील सामाजिक कर्तव्याची जाणीव, शहरांच्या बकालीपणामुळे दिवसेंदिवस कमी होत आहे. एखादे शहर किंवा एखादा समाज हा संस्कृतीच्या कोणत्या अवस्थेत आहे हे पाहायचे असेल तर, त्या समाजातील स्त्रियांना कोणती वागवणूक मिळते, त्यावरून ओळखता येते.

यंदाचे वर्ष हे 'स्त्री-विमोचनाचे वर्ष' म्हणून गाजत आहे. त्या वर्षात स्त्रियांना गुंडांशी झटापट करण्याचे शिक्षण द्यायचे की पुरुषांना स्त्रियांबद्दलच्या सामाजिक कर्तव्याची जाणीव द्यायची, हा एक प्रश्नच आहे. स्वसंरक्षणाची जबाबदारी स्त्रियांवर टाकणे म्हणजे पुरुषांतील सभ्यता आणि स्त्रीदाक्षिण्य कमी करणे होय.

या दृष्टीने यंदाच्या आंतरराष्ट्रीय स्त्री-विमोचन वर्षातील कार्यक्रमांसंबंधीची कल्पना आपल्या समाजापुरती बदलायला हवी, असे मला वाटते. 'लिब्' चळवळीची अथवा जागतिक 'स्त्री-विमोचन चळवळी'ची मुख्य कल्पना स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीला आणणे ही आहे. ही कल्पना व्यवहार्य की अव्यवहार्य हा प्रश्न वेगळा. पण आपल्या समाजात तरी स्त्री-विमोचनाची ती पहिली पायरी होऊ शकत नाही. स्त्रियांविषयी आदर हीच पहिली पायरी मानणे जरूर आहे. कारण ज्या समाजात बहुतेक क्षेत्रांत स्त्रियांविषयी अनादर दिसून येतो त्या समाजातील स्त्रिया पुरुषांशी बरोबरी करू लागल्यास त्याला स्त्री-पुरुषांतील वितुष्टाचे स्वरूप येणे अशक्य नाही!

आपल्या समाजात पूर्वीपासूनच स्त्रियांविषयी अनादर आहे असे मला म्हणायचे नाही. पण दुर्दैवाने आपल्या स्त्रीविषयक आदराला कौटुंबिक आणि मर्यादित स्वरूप आलेले होते. आईसंबंधी आदर आपल्या

अनुक्रमणिका

समाजाला अपरिचित नव्हता, पण जो मनुष्य आईसंबंधी आदर दाखवी तोच पुष्कळदा स्वतःच्या बायकोला माणसाचा दर्जा देण्यालाही तयार नसे! आपला स्त्रीविषयक आदर कधीकधी 'स्थानबद्ध'ही असे, म्हणजे घरात येणाऱ्या किंवा दिसणाऱ्या स्त्रियांशी विनयाने आणि सलज्जतेने वागायचे, पण रस्त्यात दिसणाऱ्या परक्या स्त्रियांसंबंधी मात्र तो विनय किंवा ती लज्जा दाखवायची नाही. अशी आपली दुहेरी पुरुषी नीती पुष्कळदा दिसून येते! इंग्रजांच्या संपर्काने आपण घराबाहेरही स्त्रियांसंबंधी दाक्षिण्य दाखवण्याचा देखावा करू लागलो होतो, मुंबईसारख्या शहरात ट्राम, बस किंवा लोकलगाडी यांमध्ये अनोळखी स्त्रीलादेखील उठून जागा देण्याची रीत चालू झाली होती. पण स्वातंत्र्यानंतर ती इंग्रजी चाल मुंबईतही दृष्टीस पडेनाशी झाली आहे! ती चाल मुंबईसदेखील पारशी व ख्रिश्चन समाजाने प्रथम चालू केली. कारण आमचे लोक म्हणजे हिंदू समाजातील लोक, परस्त्रीला उठून जागा देण्यालाही लाजत असत!

आजही घराबाहेरील स्त्रियांशी आदराने वागण्याची वृत्ती आपल्या समाजामध्ये रुजलेली नाही. त्याबरोबरच ज्याला नागरिक धर्माची भावना (अथवा civic sense) असे म्हणतात ती आपल्या समाजात वाढलेली नाही. रस्त्यात कोणी कोणाला उपद्रव दिला किंवा कोणाला वाहनाचा धक्का लागला तर, त्याच्याकरता दोन मिनिटे थांबून चौकशी करणारेदेखील कमी, मग दहापाच मिनिटे मोडून त्याला मदत करणारे त्याहूनही दुर्मिळ.

या वृत्तीची झळ दोन पिढ्यांपूर्वी स्त्रियांना फारशी लागत नसे. कारण त्या एकट्या-दुकट्या घरापासून दूर सहसा जातच नसत. आता फिरायलाच केवळ नव्हे, तर नोकरीच्या वा सिनेमाच्या निमित्ताने स्त्रिया, बरोबर कोणी पुरुष माणूस घेतल्याखेरीज, घरापासून दूर चार दोन मैलही जाऊ शकतात. त्या स्कूटरसारखी वेगाची वाहने घेऊनही एकट्यादुकट्या जाऊ शकतात, स्त्री विमोचनाच्या दृष्टीने हे खासच पुढचे पाऊल आहे. पण मला जे सांगायचे आहे ते हे की, केवळ स्त्रीवर्ग आपले विमोनच निर्विघ्नपणे करू शकणार नाही. पुरुषवर्गास खरा सुसंस्कृतपणा आल्याखेरीज स्त्रियांचे विमोचन होणार नाही. एकटी स्त्री विमोचन करून पुढे गेली आणि पुरुष संस्कृतीच्या बाबतीत मागेच राहिला तर, त्या विमोचनाचे विडंबन होईल.

आजच्या आंतरराष्ट्रीय स्त्री-विमोचन कल्पनेतच मात्र हा भ्रम दिसून येतो. 'ज्या ज्या क्षेत्रांत पुरुषांना प्रवेश आहे त्या त्या क्षेत्रांत स्त्रियांनाही प्रवेश देणे म्हणजे स्त्री-विमोचन' अशी कल्पना दिसून येते. पुरुष जी कामे करू शकतात ती सर्व स्त्रिया करू शकतील, नव्हे आज प्रत्यक्ष करू शकत आहेत. ही गोष्ट हिंदुस्थानातही, गांधीजींच्या चळवळीनंतर आणि दुसऱ्या महायुद्धानंतर सिद्ध झाली आहे. पण स्त्रियांचा सामाजिक दर्जा वाढवायचा म्हणजे त्यांना पुरुष समजूनच वागवावयाचे ही कल्पना स्त्रियांच्या दृष्टीनेच घातुक आहे. 'समानता' म्हणजे 'सारखेपणा' नव्हे. Equality म्हणजे uniformity नव्हे, ही गोष्ट स्त्रियांचे कैवारी तर विसरत असतच, पण आज स्त्रियाही विसरत आहेत असे दिसते! त्यांनी समाजात सन्मानाची आणि सुसंधीची अपेक्षा करावी, पण पुरुषसदृश होण्याची किंवा पुरुषसदृश मानले जाण्याची अपेक्षा करू नये. त्या योगाने स्त्री-पुरुषांत परस्पर आदर राहण्याऐवजी स्पर्धा आणि तेढ उत्पन्न होईल.

स्त्रियांची लाज बाळगावी लागल्यामुळेच पुरुषांना मिश्र समाजात अधिक बेताने अथवा संयमाने वागावे लागते. साधी धूम्रपानाची गोष्ट घ्या. रेल्वेच्या कंपार्टमेंटमध्ये स्त्रिया असल्यास किंवा घरीदेखील बाहेरच्या स्त्रिया

बैठकीत असल्यास पुरुष सहसा सिगारेट शिलगावणार नाही. पण आम्हांलाही सिगारेट ओढण्याचा हक्क का असू नये, असे म्हणणारी स्त्रियांची पिढी निघाल्यास पुरुषांना संयमाचे स्मरण होण्याचेही कारण नाही! स्त्री-पुरुषांतील भेदामुळे आणि आदरामुळेच समाजात संयम आणि सभ्यता टिकून राहिली आहे.

स्त्रियांसंबंधीच्या आदराप्रमाणेच गुंडांपासून आणि असभ्य वृत्तीच्या लोकांपासून स्त्रियांना उपद्रव होऊ न देण्याची जबाबदारीही पुरुषांवर आहे. समानतेच्या नावाखाली या स्त्री-दाक्षिण्याचीही अपेक्षा उरली नाही, किंमत उरली नाही तर, पुरुषांतील मर्दपणादेखील हळूहळू नष्ट होईल, liquidate होईल. स्त्री-विमोचनाचे घोषवाक्य घोकताना स्त्रियांच्या 'असमानते'चेही अनेक सामाजिक उपयोग आहेत हे विसरून चालणार नाही.

सर्वांत मुख्य म्हणजे स्त्रियांच्या विनयामुळे आणि (खऱ्या वा दिखाऊ) 'अबलापणा'मुळे सामाजिक जीवनात एक 'नजाकत' येते. त्या स्त्रियांनाही विमोचनाचे नावाखाली धटिंगणपणाचे प्रदर्शन करावयास शिकविले तर, समाज पुन्हा रानटी अवस्थेला जाईल. यंदाच्या स्त्री-विमोचनाच्या वर्षात स्त्रियांना धटिंगण बनवण्याचा कार्यक्रम हाती घेण्यापेक्षाही पुरुषांना स्त्री-दाक्षिण्य शिकविण्याची अधिक गरज आहे. पुरुषांकडून स्त्रियांचा उपमर्द होणार नाही, झालेला सहन केला जाणार नाही याचा स्त्रियांना विश्वास वाटेल तर, त्या सहजच आजच्यापेक्षा धीट बनतील! आणि मग त्या धटिंगण बनल्या नाहीत तरी चिंता करण्याचे कारण नाही!

नोकऱ्यांत व सार्वजनिक जीवनात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संधी आणि वागणूक असणे, एवढाच आजच्या स्त्री-विमोचनाचा अर्थ दिसतो. पण स्त्रियांचा घरातील दर्जा सुधारण्याचीही या स्त्री-विमोचनाच्या चळवळीत योजना दिसत नाही. तो दर्जा पुरुषांनी आपल्याकडे स्वयंपाक, धुणी, भांडी ही कामे घेऊनही सुधारण्यासारखा नाही! कारण, गरोदरपण आणि बाळंतपण या अवस्थांमुळे स्त्रियांना काही वेगळ्याच अडचणी आणि पुरुषांहून वेगळाच दर्जा प्राप्त होतो.

तो दर्जा पुरुषांहून वस्तुतः श्रेष्ठ आहे, पण पुरुष त्याला कनिष्ठ मानणे अगदी शक्य आहे. म्हणजे पुरुषांच्या दृष्टीत आणि संस्कृतीत बदल झाला तरच, स्त्रियांच्या घरातील खऱ्या दर्जाला मान्यता मिळणे शक्य आहे.

'गृहलक्ष्मी' वगैरे शब्द स्त्रीच्या या नाजूक पण उच्च भूमिकेमुळेच निर्माण झाले. पण लग्नाकार्यापुरती 'गृहलक्ष्मी' असलेली गृहिणी ही पुरुषाचा वृत्तीमुळे व अधिकारामुळे 'केरसुणी' बनणे अगदी शक्य असते! केरसुणीला लक्ष्मी म्हणण्याचाही एक प्रघात आहे म्हणून केरसुणीला पाय लावायचा नसतो या समजुतीचे या ठिकाणी स्मरण होईल!

स्त्रीचा घराबाहेरील दर्जा कायद्यांनी आणि जाहीरनाम्यांनी सुधारला तरी, तिचा घरातील दर्जा कोणत्याही कायद्यांनी बदलणारा नाही. तो 'नवरा' या प्राण्याच्या वृत्तीवर आणि संस्कृतीवरच अवलंबून राहील. म्हणजे आता कशी मालिका लागते ते पाहा! स्त्रियांचे सर्व जीवन पुरुषांवर आणि मुलांवर केंद्रित, त्यामुळेच पुरुषांना अधिकार मिळालेला आणि पुरुषांच्या मनोरचनेत बदल होईल, त्यांचे मन सुसंस्कृत होईल तरच स्त्रीचा घरातील दर्जा सुधारणार!

अनुक्रमणिका

'लिब्' चळवळवाल्यांनी या वस्तुस्थितीची दखल घेतली तर, त्यांना आपल्या चळवळीची दिशा पुष्कळच बदलावी लागेल!

स्वराज्य,
२६ जुलै १९७५, पृ. ३.

## कौटुंबिक-सामाजिक संरक्षण-स्त्रियांची महत्त्वाची गरज

इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यापासून स्त्रियांच्या हक्कांचा आणि स्वातंत्र्याचा पुकारा सुरू आहे. आता स्त्री-शिक्षणाच्या भरपूर वाढीमुळे आपोआपच स्त्रियांचे जीवन बदलले आहे. गेल्या महायुद्धापासून शेकडो स्त्रियांचा अनेक खात्यांत प्रवेश झाल्याने, स्त्रिया पात्रतेत पुरुषांच्या बरोबरीच्या होत्याच, पण सामाजिक दर्जातही पुरुषांच्या बरोबरीच्या असल्याचा देखावा दिसू लागला. पाश्चात्य देशांतील 'Women's Lib' च्या वार्ता वाचून कित्येक स्त्रिया मासिकांतून धाडसी आकांक्षा व्यक्त करू लागल्या. काही पुरोगामी स्त्री-पुरुषांची तर अशी कल्पना दिसते की, 'डायव्होर्स', 'बर्थकंट्रोल' आणि 'गर्भपात' या तीन गोष्टी कायद्याने बिनशर्त मंजूर झाल्या तर, स्त्रियांना इहलोकी मिळवण्यासारखे काहीच उरणार नाही!

पण स्त्रियांचे हक्क म्हणजेच स्त्रियांचे सौख्य असे पाश्चात्य विमोचन चळवळीने आणि 'आंतरराष्ट्रीय महिला वर्षा'ने गृहीत धरले आहे की काय, असा सध्याच्या लिखाणांवरून आणि भाषणांवरून भास होतो. एकीकडे स्त्रिया व त्यांचे कैवारी नव्या नव्या हक्कांच्या घोषणा करीत आहेत, तर दुसरीकडे सकाळी वर्तमानपत्र उघडले रे उघडले की, त्यात स्त्रियांवरील अत्याचारांच्या वार्ता वाचावयास सापडत आहेत! नाशिक-पुणे यासारख्या पुढारलेल्या शहरापासून ते मराठवाड्यातील 'मानवत'सारख्या मागासलेल्या खेड्यापर्यंत सर्व ठिकाणच्या खुनांच्या आणि अन्य अत्याचारांच्या हकीकती वाचावयास सापडतात. यांतील फारच थोडे खून चोर-दरोडेखोरांनी केलेले आहेत. बाकीचे बहुतेक नवऱ्याने स्वतःच्या घरीच-किंबहुना शय्यागृहातच-बायकोचा केलेला खून, सासूने जाळलेली सून, बापाने केलेला मुलीचा खून यांसारखे निर्दय खून आहेत! 'मानवत'चे वीस खून कौटुंबिक नाहीत, पण अन्य प्रकारे पाशवी आणि रानटी आहेत. काय म्हणे कुमारिकेच्या रक्ताचा नैवेद्य! खून करून शिवाय तिचा विशिष्ट भाग कापून नेणे, इतके झाल्यावरही सबंध गाव दहशतीमुळे तोंड दाबून बसणे, असले प्रकार पाहिले म्हणजे आपण कोणत्या शतकात जगत आहोत तेच कळत नाही!

हे सर्व पाहिले म्हणजे स्त्रियांना आज युरोपियन थाटाचे हक्क आधी पाहिजेत की इंग्रजी शिक्षणाच्याही पूर्वी सर्वसामान्य कुटुंबात होते ते संरक्षण पाहिजे असा प्रश्न मनात येतो. पूर्वीच्या जमान्यात होत्या त्याहीपेक्षा स्त्रिया आज असुरक्षित आहेत असे दिसून येईल. स्त्रीस्वातंत्र्य वाढले आहे, पण त्याचबरोबरच स्त्रियांविषयीचा आदर कमी होत चालला आहे. आपल्या पाशवी कामवासनेकरता अथवा द्रव्यलोभाकरता आजचा मनुष्य आपल्या घरातील स्त्रीचा खून करायला तयार आहे. इतिहासकालात तुर्क आणि पठाण आक्रमकांनी शेकडो स्त्रियांचे अपहरण केले. बगदाद, समरकंद आणि कंदाहारच्या बाजारांत शेकडो भारतीय स्त्रिया गुलाम म्हणून विकल्या. तो जमाना इतिहासजमा झाला असे आपण इंग्रजी शिकलेले लोक समजत होतो, पण ते भाबड्या आधुनिकांचे स्वप्न ठरले. स्वराज्य मिळण्याच्या आधीच्याच वर्षी नौखालीतील बलात्काराच्या हकीकती वाचाव्या लागल्या. पण स्वातंत्र्याच्या अपरिहार्य प्रसववेदनांचा काळ असे समजून आपण तोंड कडू करून तोही घोट गिळला. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पाव शतकाने बांगलादेशात हजारो स्त्रियांवर झालेल्या बलात्काराच्या हकीकती आपणांस वाचावयास लागल्या! त्या पाकिस्तानी लष्कराने हिंदु-मुसलमान असा भेदही ठेवला नव्हता. सर्रास बांगलादेशच्या स्त्रियांवर त्या लष्कराने बलत्कार केले. स्वतःच्या मातेच्या देहासारख्याच

असणाऱ्या स्त्रीदेहाचे विशिष्ट अवयव कापून त्याची विटंबना केली. पुरुषांचे हक्क मागणाऱ्या विमोचनवर्षातील विमोचनवादी स्त्रिया, जणू हे सर्व अत्याचार विसरूनच गेल्या आहेत! त्यांचे लक्ष डायव्होर्स आणि बर्थकंट्रोल यांवर केंद्रित झाले आहे! काहीजणी कुमारिकांना मातृत्वाचा अधिकार मागत आहेत.

मला वाटते या 'लिब्'वाल्या (विमोचनवादी) स्त्रियांना स्त्रियांच्या 'हक्कां'ची जाणीव आहे, पण 'दुःखां'ची जाणीव नाही. एरव्ही त्यांनी खुद्द महाराष्ट्रातच स्त्रियांच्या खुनांच्या या वर्षी वाढलेल्या प्रमाणाचा या महिलावर्षात होणाऱ्या डझनावारी सभांपैकी एका तरी सभेत निर्देश केला असता.

शिक्षणाची आणि स्वातंत्र्याची वाढ झाल्यावरही आज विसाव्या शतकात, १९७५ मध्ये स्त्री अधिक असुरक्षित असण्याची कारणे या आंतरराष्ट्रीय महिलावर्षात शोधून काढणे अधिक अगत्याचे आहे. त्यामानाने कायदेशीर गर्भपाताचा आणि कौमार्यातील मातृत्वाचा हक्क कमी महत्त्वाचा आहे असे मी म्हणेन. आज स्त्री अधिक असुरक्षित कशाने झाली?

पूर्वीच्या संयुक्त कुटुंबात स्त्रीची पुष्कळदा कुचंबणा होई हे खरे. पण त्याचबरोबर आपोआप रक्षणही होई. अगदी परक्या माणसाशी बोलण्याचाही तिला प्रसंग येत नसे. आज कुटुंबे छोटी झाली आहेत, किंबहुना कुटुंब छोटे असावे हीच आपली इच्छा आणि मागणी आहे. या छोट्या कुटुंबातही काही फायदे नाहीत असे नव्हे. त्यात स्त्रियांना स्वातंत्र्य मिळते, त्यांची कुचंबणा होत नाही. पण त्यातूनच आत कित्येक धोके उत्पन्न होत आहेत. मोठ्या शहरांतील राहणीत, प्रत्येक बिऱ्हाड अशा स्वतंत्र ब्लॉकमध्ये असते की एका बिऱ्हाडातील माणसांचे दर्शन दुसऱ्या बिऱ्हाडाला आठआठ दिवस होत नाही. साहजिकच, एखाद्या स्वातंत्र फ्लॅटमधील श्रीमंत पतीने आपल्या पत्नीचा खून केला तर, त्याची वार्ताही बाह्य जगाला लागू शकत नाही. जुन्या मोठ्या कुटुंबात एखाद्या नवऱ्याला अत्याचार करण्याला नित्रस्तपणा मिळणे शक्य नव्हते. लगेच त्याचा हात त्याच्याच बापाने किंवा भावाने पकडला असता.

मोठ्या घरात पूर्वी व्यक्तीची थोडीफार कुचंबणा होई, हे खरे. पण आजच्या स्वतंत्र जमान्यात तरी व्यक्तीची कुचंबणा कुठे टळली आहे? एखाद्या नर्सवर तिच्या हॉस्पिटलमधील बॉस धर्मांतराची किंवा अन्य एखादी सक्ती करीत आहे, असे मध्येच ऐकू येते. म्हणजे सासूसासऱ्यांचा जाच गेल्यावरही आणि नोकरी करण्याइतके स्वातंत्र्य मिळाल्यावरही आणखी जाच उरलेतच. परक्याने केलेला जाच बरा, की घरच्यांनी केलेला जाच बरा, हा प्रश्न स्त्रियांनीच सोडवायचा आहे. स्त्रियांना शहरी रस्त्यांतून मोकळेपणाने फिरण्याचे स्वातंत्र्य आज आहे. पण त्यांच्याविषयीचा आदर, मुर्वत किंवा मर्यादा शहरी राहणीनेच पुरुषांच्या मनात उरलेली नसल्याने, त्यांना ते स्वातंत्र्य अपमानास्पद वाटू लागते. बसच्या 'क्यू'त किंवा बसमधील बाकावर आजच्या पुरुषाच्या संस्कृतीची परीक्षा होते व आपण कितपत सुधारलो आहोत ते पुरुषांपेक्षा स्त्रियांना अधिक समजते. एखादा समाज किती सुधारलेला आहे हे पाहावयाचे असेल तर, त्या समाजातील स्त्रियांना कोणती वागणूक मिळते वा कोणता अनुभव मिळतो यावरून ते ठरवावे, असे एक गमक पाश्चात्य लोक सांगतात. स्त्रियांना हक्क मिळाले आणि आदर मिळाला नाही तर, कायद्याच्या दृष्टीने ती पुढची पायरी असेल, पण संस्कृतीच्या दृष्टीने ती पुढची ठरणार नाही.

अनुक्रमणिका

आधुनिक राहणीने स्त्रियांचा आणखी एक तोटा केला आहे. विवाहसंस्थेत कोणत्याही सुधारणा झाल्या, विवाहाबाबत स्त्रियांना कोणतेही स्वातंत्र्य मिळाले तरी, माहेरची गरज स्त्रियांना जाणवणारच. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आज बहुतेक सुशिक्षित आणि शहरी स्त्रियांना माहेर असे उरलेले नाही, याची कारणे कोणती? आधी कुटुंबे लहान झाल्यामुळे माहेरही लाहन होऊन बसले आहे. त्यातच असे माहेर नवीन आलेल्या व्यक्तिवादी, सुशिक्षित सुनेच्या ताब्यात गेलेले! ज्या घरात आपल्या आईबापांनाही खुशीचे स्थान नाही व ज्या घरात आपल्यासारख्याच व्यक्तिवादी, सुखवादी स्त्रीने नवऱ्यास ताब्यात घेतले आहे, त्या घरात आपण माहेरवाशिणी परक्या ठरतो, असे आजच्या स्त्रीला आढळून येते.

स्त्रीला-प्रेमविवाहित स्त्रीलादेखील-आपल्या वैवाहिक जीवनातून, आपल्या नव्या घरातून 'रिलीफ' हवा असतो. त्यांनी आपल्या नवऱ्याच्या घरासंबंधी आणि त्या घरात आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्यासंबंधी कितीही वल्गना केल्या तरी, अखेर एखाद्या 'दुर्बल' क्षणी ''काही नाही! अखेर स्त्रीला माहेर हे हवंच!'' असे उद्‌गार त्यांच्या तोंडून निघालेले ऐकू येतात. 'साप म्हणू नये धाकला, अन् नवरा म्हणून नये आपला' अशी बहुजनसमाजाच्या तोंडी म्हण आहे ती यामुळेच.

विशिष्ट परिस्थितीत 'डायव्होर्स' अपरिहार्य असतो हे मलाही मान्य आहे. मी माझ्या लेखांतून व पुस्तकांतून जाहीरपणे तसे म्हटलेही आहे. पण 'डायव्होर्स' घेण्याकरताही stop-gap arrangement म्हणून माहेराची गरज आहे हे सत्य किंवा हा अनुभव विमोचनवाल्या किती स्त्रिया जाहीरपणे बोलून दाखवतात? त्यांना स्वतःच्या वा मैत्रिणीच्या अनुभवावरून ही गोष्ट माहीत असते, पण विमोचन वर्षाच्या सभेत मात्र त्या ती बोलून दाखवणार नाहीत. कारण तेथे 'यूनो'च्या किंवा अन्य एखाद्या पाश्चात्य संघटनेच्या पत्रकातून आलेले विचारच काय ते बोलून दाखवायचे असतात! आणि इंग्लंड, अमेरिका, रशिया यांसारख्या देशांत आपल्याकडील माहेरासारखे 'माहेर' पूर्वीही बेताचेच होते आणि आता तर मुळीच नाही. इंग्रजीत 'माहेर' या अर्थाचा एक सुटसुटीत शब्दही नाही. सारांश, स्त्रियांच्या ज्या गरजा किंवा मागण्या विमोचनवादी स्त्रिया बोलून दाखवतात तेवढ्याच त्यांच्या गरजा आहेत असे नाही. स्वातंत्र्यवादी स्त्रियांनाही-विमोचनवादी स्त्रियांनाही-स्वातंत्र्याइतकीच कौटुंबिक आणि सामाजिक संरक्षणाची गरज आहे.

स्वराज्य (मुंबई-पुणे),
११ ऑक्टोबर १९७५, पृ. २ व ७.

अनुक्रमणिका

## २६

# स्त्री-विमोचनाची शक्याशक्यता

संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे 'स्त्री-विमोचनाचे वर्ष' ठरविल्यापासून आपल्या देशातही स्त्री-विमोचनाच्या निमित्ताने (वर्तमानपत्रात येण्यासारखे) बरेच उपक्रम सुरू झाले आहेत, पण दुःखनिवारण हा पंचवार्षिक योजनेचा विषय होण्यासारखा नाही. स्त्रियांच्या दुःखाचे मूळ धार्मिक रूढींत, जुन्या कायदेकलमांत अथवा जुन्या सामाजिक संस्थांत आहे असे गृहीत धरून, 'जुने मोडा' ही चळवळ फुले आणि आगरकर यांच्या वेळेपासूनच चालू आहे. म. फुले व कर्वे यांनी स्त्रीदुःखनिवारणार्थ काढलेल्या संस्थांचे आणि सोसलेल्या त्रासाचे महत्त्व मी कमी मानतो असे नाही. पण बालविवाहाचे (शहरांतून तरी) उच्चाटन केल्यावरही स्त्रियांची विवाहमूलक दुःखे शिल्लक राहिली आहेतच. तीच स्थिती पुनर्विवाह समाजमान्य करण्याची. आज पुनर्विवाहाला मान्यता असूनही पुनर्विवाहांचे प्रमाण शून्यप्राय आहे.

काही सामाजिक दुःखे मांजरासारखी असतात! त्यांना एका दाराने बाहेर पिटाळताच ती दुसऱ्या दाराने आत आलेली दिसतात! पन्नास वर्षांपूर्वीपेक्षा आज शहरांतून विधवांची संस्था पुष्कळच कमी दिसेल, पण त्यांच्याच वयाच्या प्रौढ कुमारिकांचा प्रश्न दुसऱ्या दाराने आत शिरला आहे. बालवधुंचा सासुरवास प्रौढ विवाहाने संपुष्टात आला आहे, पण प्रौढ विवाहातील व्यक्तिस्वातंत्र्याने व छोट्या विभक्त कुटुंबाने नवराबायकोंचे स्वभाव न पटण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यावर तोडगा म्हणून आधुनिक सुधारकांनी कायदेशीर घटस्फोट हा मार्ग शोधून काढला. पण घटस्फोटानंतरही स्त्रियांची दुःखे उरतात. याची दखल घटस्फोटाचे पुरस्कर्ते फारशी घेत नाहीत. घटस्फोटाची वाट अजिबात बंद करणे मलाही मान्य नाही; पण घटस्फोट हा वैवाहिक दुःखावर रामबाण इलाज आहे हा काही लेखकांचा व वक्त्यांचा समज मात्र अगदीच भाबडा आहे. त्यामानाने खेड्यांतील अशिक्षित लोक अनुभवाने अधिक शिकले होते. 'पहिल्या वरा होतास बरा!' ही खेड्यातील म्हण तेच सांगते.

नवऱ्याची 'प्रॉपर्टी' हीच बायकोची 'प्रॉपर्टी' असे सर्व सुधारलेल्या देशांत समजतात. केवळ धर्मातच नव्हे, तर कायद्यातही स्त्री आणि पुरुष यांचे व्यक्तिमत्त्व अभिन्न समजले जाते. पण नवऱ्याच्या पश्चातच काय, पण हयातीतही या 'आदर्श' अभिन्नत्वामुळे स्त्रियांची केवढी कुचंबणा होते, ते स्त्रियाच जाणतात. नातेवाइकांकरिता किंवा पाहुण्यांकरिता दहापाच रुपयांचा खर्च करावयाचा म्हटला, तरी मध्यम वर्गातील स्त्रीला नवऱ्याच्या 'सँक्शन'ची वाट पाहावी लागते. अशा प्रसंगी हे नवरेही दुसऱ्याच्या भावनांची जाणीव क्वचितच ठेवतात व अज्ञानाने वा सहेतुकपणे आपल्या बरोबरीच्या बायकोच्या व्यक्तिमत्त्वाचा अवमान करतात.

त्यामुळेच स्वयंपाक व अपत्यसंगोपन यांसारखी महत्त्वाची (vital) कामे करणाऱ्या गृहिणीला पगार ठरवून देण्याची कल्पना अधूनमधून काही मासिके खेळवीत असतात! ही कल्पना स्त्रीच्या स्वाभिमानाला घातक असूनही मी एक वेळ पत्करीन, पण त्यात अडचणी नाहीत असे नाही. पगाराच्या रकमेसंबंधी अथवा तो चुकता करण्यासंबंधी नवराबायकोंत घासाघीस होणे, क्वचित् मुलाबाळांसमोरही घासघीस होणे हे कितपत इष्ट आहे, याचा विचारच करावा लागेल. त्यादृष्टीने आज स्त्रिया पुरुषांसारख्याच नोकऱ्या करू लागल्या हे वाईट नाही. त्यामुळे त्यांचा स्वाभिमान वाढला, त्यांचा धीटपणा वाढला, त्यांना पुरुषी जगाची अधिक जवळून माहिती

झाली. पण या फायद्याबरोबर त्यांना तोटेही पत्करावे लागले आहेत. ऑफिसच्या टेबलाशी किंवा प्रोफेसरच्या खुर्चीवर स्त्रिया पुरुषांची जागा घेऊ लागल्या तरी, त्यांची चुलीजवळची (फार तर गॅसजवळची) जागा घ्यायला दुसरे कोण आहे? म्हणजे या नव्या शिक्षणाने आणि आर्थिक स्वातंत्र्याने त्यांना उलट 'डबल रोल' करावा लागत आहे.

'संततिनियमनाचे आधुनिक उपाय स्त्रीस्वातंत्र्य झपाट्याने जवळ आणीत आहेत' असेही पाश्चात्य 'विमोचन-चळवळी'त मानले जाते. गर्भपात कायदेशीर ठरविणे हीदेखील स्त्रियांची (पाश्चात्य देशांत तरी) एक मागणी होती. असंमतीने आणि असंयमाने स्त्रीवर अपत्यभार लादणे ही गोष्ट म्हणजे एक मनुष्यनिर्मित संकटच आहे, या संकटाचा संपन्नतेशी वा विपन्नतेशी संबंध नाही. रूपाबद्दल व भाग्याबद्दल विख्यात असलेली साम्राज्ञी मुमताज महल ही आपल्या चौदाव्या बाळंतपणात मेली! काय आग लावावयाची आहे तिच्या ऐश्वर्याला? या दृष्टीने आधुनिक संततिनियमनाचे शास्त्रशुद्ध इलाज स्त्रियांना वरदानासारखे आहेत यात शंका नाही. तसेच, अज्ञानामुळे अथवा लोकलज्जेमुळे केलेल्या आडमुठ्या गर्भपातापेक्षा राजरोस गर्भपातात धोका कमी हेही खरे. पण संततिनियमन व गर्भपात यांचा गर्जनायुक्त पुरस्कार करणाऱ्यांना एक गोष्ट विसरता येणार नाही. अखेर गर्भधारणेचा काय वा गर्भपाताचा काय, धोका स्त्रीलाच पत्करावा लागतो. पुरुष सुरक्षित बाजूला उभा राहिलेला असतो! क्वचित् स्त्री इस्पितळात असता हा मर्द सिनेमाच्या अंधारात शेंगा सोलीत असतो!

यावरून असे दिसून येईल की, स्त्रियांवरील अन्याय व स्त्रियांची होणारी कुचंबणा कुणालाच अमान्य नाही; पण त्यावर होणारे कायद्याचे किंवा पुरोगामित्वाचे इलाज मात्र, काही लोक समजतात तितके रामबाण नाहीत! ॲलोपॅथीतील औषधाप्रमाणे यातील प्रत्येक उपायाला अपायाची किंवा 'side effects'ची भीती आहे. इकडे स्त्रियांच्या मुक्ततेची प्रदर्शने होत असता, तिकडे स्त्रियांवरील अन्यायच नव्हेत, तर अत्याचारही वाढत आहेत! गेल्या वर्षातील मराठी वृत्तपत्रे चाळली तरी या गोष्टीचा पुरावा मिळेल. जवळजवळ दररोजच्या अंकात स्त्रियांवरील अत्याचाराची एक तरी वार्ता वाचावयास सापडेल. त्यातल्या त्यात मनाला धक्का बसण्यासारखी गोष्ट म्हणजे सासरच्याच मंडळींनी प्रौढ वधूचा जीव घेऊन त्याला आत्महत्येचे रूप देण्याचे अनेक प्रकार उघडकीस येत आहेत! आणि हे केवळ खेड्यांतील नव्हेत तर नाशिक, पुणे यांसारख्या पुढारलेल्या शहरांतील प्रकार होत. म्हणजे गेल्या शंभर वर्षांतील समाजसुधारणा आणि स्त्रीशिक्षण पचवूनही आमच्या स्त्रियांचे सासर पूर्वीइतकेच अडाणी व अमानुष राहिले आहे.

अशा स्थितीत स्त्री-पुरुष समानतेचे नुसते ठराव करून हे स्त्री-विमोचनाचे वर्ष नवीन काही साधू शकेल असे वाटत नाही.

पण असली गुन्हेगारी मनोवृत्ती अपवादात्मक म्हणून क्षणभर बाजूला सारली तरी, साध्या विवाहात पैशासाठी होणारी अडवणूक ही अद्याप काडीमात्र कमी नाही! उलट शिक्षणाच्या आणि महागाईच्या वाढीबरोबरच हुंडा व मानपान यांच्याकरिता होणारी मागणी फुगतच चालली आहे. सामान्य स्थितीतील, किंबहुना गरीब स्थितीतील आई-बापांकडूनही दहा हजार वरदक्षिणा आणि मानपानाकरिता वर आणखी पाच हजारांची मागणी केली जाते! इकडे हुंडाबंदीचे कायदे होतच आहेत आणि तरुण पदवीधर सभा

गाजविण्याकरिता हुंडा न घेण्याची शपश घेतच आहेत! म्हणजेच लेख आणि सभा यांतील जीवन एक, तर प्रत्यक्ष विवाहाच्या वाटाघाटीतील जीवन वेगळेच अशी स्थिती आज तरी आहे.

इकडे मुलींनी पँट घालणे, स्त्रियांनी बॉब् करणे वगैरे स्त्री-पुरुष समानतेचे प्रयोग चालूच आहेत! म्हणजे पुरुषांच्या हृदयात पालट नाही, अन् स्त्रियांच्या पुरोगामित्वकल्पनांत काडीचा फरक नाही. त्या अजूनही पुरुषांशी 'सदृशता' म्हणजेच पुरुषांशी 'समानता' असे समजत आहेत. काहीजणी तर सिगारेट, ड्रिंक यांसारख्या व्यसनांत पुरुषांशी बरोबरी करणे हा समानतेचा मार्ग समजत आहेत! पण या दिखाऊ 'समानतेने' कुणाचे समाधान होईल ते होवो, अद्यापही स्त्रीचे सुख वेड्या वा शहाण्या, सज्जन वा दुर्जन पुरुषाच्या स्वाधीनच आहे!

दारूबाज मजुराच्या स्त्रीची अवस्था काय असेल याची कल्पनाच करावी. मजुराच्या स्त्रीचीच गोष्ट कशाला? आज सामान्य मध्यमवर्गीय सुशिक्षिताच्या घरातही दारू शिरली आहे. दारूबाजाला नेहमी कंपनी लागते. आजकाल काही नवरे मद्यपानाच्या बैठकीत बायकोचीच 'कंपनी' मिळवू लागले आहेत! स्त्रियांच्या हालअपेष्टांची चिंता वाहणारांनी स्त्रियांना पोषाखात आणि नोकरीत पुरुषसदृश करण्याची चळवळच तेवढी हाती घेऊन चालणार नाही. मद्यपानाविरुद्ध मोहीम ते हाती का घेत नाहीत?

सारांश, कायद्यांनी आणि आधुनिक फॅशनने स्त्रियांची जी मुक्तता होईल ती 'वरपांगी' आणि 'निगेटिव्ह' होईल. कारण, स्त्रीला घर सोडण्याची मोकळीक मिळवून देणे म्हणजे तिच्या सुखाची तरतूद करणे नव्हे. पुरुष सुधारल्याशिवाय स्त्रीच्या सुखाची शाश्वती नाही. नुसत्या हक्कांच्या प्राप्तीने नव्हे, तर समाज सुसंस्कृत झाल्यानेच स्त्रीची दुःस्थिती नष्ट होईल.

पुरोगामी महिला,
मे १९७६ (अंक १), पृ. ५-६ व १०.

२७

## पतित स्त्रियांचे संरक्षण

हिंदू समाजाने स्त्रियांच्या पावित्र्याची कल्पना अतिरेकी टोकाला नेऊन ठेवली. किंबहुना कोणताही सद्गुण इतका ताणायचा की, त्याला दुर्गुणाची फळे यावीत हा आम्हा हिंदू लोकांचा स्वभावच बनला आहे. सोवळे-ओवळे, स्पृश्य-अस्पृश्य, पवित्र-अपवित्र या कल्पना आपण किती ताणल्या आहेत! ब्रह्मचारी विश्वनाथजी यांनी 'पौरुष' सांगली (एप्रिल १९७६) मासिकात लिहिलेली 'माधुरी' ही सत्यकथा वाचून हा सर्व विषय मला आठवला. त्या कथेत ठाणे जिल्ह्यातील एका सुसंस्कृत व सुखवस्तू कुटुंबाने अलीकडेच जे वर्तन केले त्याचा वृत्तांत आला आहे. या कुटुंबातील तरुण, सुखरूप सासुरवाशीण, तिच्या नवऱ्यानेच घरात बाळगलेल्या परधर्मी मित्राच्या आहारी गेल्याचे निदर्शनाला आले होते. त्यावर तिच्या नवऱ्याने व सासऱ्याने कोणता नैतिक निर्णय घ्यावा? तिच्याबरोबर एक लांबचा दीर देऊन तिच्या सासऱ्याने व पतीने तिला मुंबईला धाडले. त्या दिराला 'इन्स्ट्रक्शन्स' काय? तर तिला बोरीबंदरच्या प्लॅटफॉर्मवर सोडून परत यायचे! अर्थात् त्या एकट्या-दुकट्या तरुण हिंदू सासुरवाशिणीवर कोणता प्रसंग गुदरला असेल त्याची सहज कल्पना करता येईल. कल्पना करता येत नसल्यास, सांगलीच्या 'पौरुष' मासिकातील विश्वनाथजींची मूळ कथाच वाचावी.

आपल्या घरातील स्त्रियांच्या पावित्र्यासंबंधी आपण काही उच्च आदर्श बाळगणे वाईट नव्हे. पण तो आदर्श बाळगताना आपण व्यक्ती, कुटुंब व समाज या सर्वांच्याच बाबतींत साफ आंधळे बनतो, हे वाईट आहे. अशा प्रकारे कौटुंबिक पावित्र्याच्या किंवा अब्रूदारपणाच्या नावाखाली एखाद्या तरुण सासुरवाशिणीला लाथ मारून बाहेर काढण्यापेक्षा तिचा जीव घेणेही अधिक सदयपणाचे होईल. म्हणजे वरवर पाहता जे 'पावित्र्य-प्रेम' दिसते ते वास्तवात निर्घृणत्व आणि भीरुत्व असते. 'या मुलीचे काही का होईना? लोकांत आपली बेअब्रू झाली नाही म्हणजे झाले,' अशी ही वृत्ती असते. कौटुंबिक निर्दयतेची शिकार बनलेल्या अनेक सासुरवाशिणी (आणि माहेरवाशिणीही) बोरीबंदरसारख्या अवाढव्य रेल्वे जंक्शनवर गुंडांच्या हाती लागतात.

मग अशा परिस्थितीत एखाद्या पतित स्त्रीच्या आप्तांचे कर्तव्य कोणते? त्यांना तिचा संताप येणे साहजिक आहे आणि संतापाच्या भरात तिला घराबाहेर काढावेसे वाटणेही साहजिक आहे. पण तरुण असहाय स्त्रीला घराबाहेर काढण्यात आपण नकळत काय करीत आहोत याचाही या संपप्त नातेवाइकांनी विचार करावयास हवा. ती गुंडांच्या हाती लागली तर तिच्या विटंबनेला पारावार उरणार नाही. ती जर बदमाश स्त्रियांच्या हाती लागली तर तिला वेश्येचे हीन जीवनही जगावे लागेल. ज्या जीवनाचा आपण तिरस्कार करतो ते जीवन जगणाऱ्या मवाल्यांना अथवा कुंटिणींना हे अब्रूदार लोक आपली घरंदाज सून संतापाच्या भरात जणू भेट म्हणूनच पाठवीत असतात!

पतित माहेरवाशिणींची गोष्ट याहून थोडी वेगळी असते. आजच्या प्रौढ विवाहाच्या काळात कुमारिकांवर अनेक प्रसंग येऊ शकतात. मोहामुळे असो, फसवणुकीमुळे असो, की बलात्कारामुळे असो, कुमारिकांचे पाऊल वाकडे पडणे शक्य असते. त्यातच आजची काही लैंगिक स्वातंत्र्यवादी मासिके, जणू धार्मिक कर्तव्य म्हणून स्वैराचाराचे समर्थन करीत असतात! तरुण-तरुणींचा विवाहपूर्व संबंध, किंबहुना विवाहबाह्य संबंध म्हणजे

विशेष बाऊ करण्यासारखी गोष्ट नव्हे, असे ही मासिके कंठशोष करून सांगत असतात. पण जेव्हा एखाद्या कॉलेजकुमारिकेवर क्षणाच्या मोहाने वेअब्रूचा प्रसंग येतो तेव्हा, तो प्रसंग निभावून नेण्याला या मासिकांचे संपादक पुढे येत नाहीत. त्या प्रसंगाला बिचाऱ्या आईबापांनाच तोंड द्यावे लागते अशा वेळी ते आईबाप सासरच्या माणसांपेक्षा अर्थात्च अधिक सहानुभूतीने वागतात. मी सासरच्या लोकांकडून 'जीजस् क्राईस्टने' सांगितलेला क्षमाशीलपणा अपेक्षीत नाही. पण ब्रह्मचारी विश्वनाथजींनी जिची हकीकत लिहिली त्या माधुरीच्या सासऱ्याला वा नवऱ्याला 'माधुरीला माहेर आहे' याचेही भान राहू नये हे केवढे आश्चर्य आहे! बोरीबंदरच्या प्लॅटफॉर्मवर नेऊन सोडण्याऐवजी त्यांनी जर तिला तिच्या आईबापाकडे नेऊन सोडले असते तर, निदान पुढची विटंबना तरी टळली असती. तिच्या पतनाबद्दल तिला क्षमा करून तिला घरातच ठेवून घेणे अशक्य झाले तरी, आपण निदान तिला गुंडांच्या वा कुंटिणखान्याच्या स्वाधीन करीत नाही ना, याचा तरी विचार हिंदू कुटुंबप्रमुखांनी करणे जरूर आहे.

पण याला सदयतेचीच केवळ नव्हे, तर सामाजिक दृष्टीचीही गरज असते. आणि हिंदू समाजात त्याचीच नेमकी वाण आहे! 'माझ्या घराचे नाव राहिले म्हणजे झाले, मग माझ्या कृतीने कुंटिणखान्याची भर झाली तरी पर्वा नाही. ' असली ही केवळ कौटुंबिक किंवा 'प्रायव्हेट' दृष्टी असते.

बालविधवांना आम्ही संन्यास द्यायला शिकलो, पण त्यांच्या संन्यस्त जीवनाचा समाजाकरता उपयोग करून घेण्याचे मात्र आमच्या डोक्यात आले नाही. आपण क्षणभर अशी कल्पना करू की, एखाद्या स्त्रीचे वाकडे पाऊल पडले आणि तिला सासरही नाही व माहेरही नाही अशी स्थिती झाली. पण म्हणजे लगेच तिला मवाल्यांच्या किंवा कुंटिणींच्या स्वाधीन व्हावे लागावे की काय? आज तसे व्हावे लागते. याला कारण आपला सामाजिक भित्रेपणा आहे. पतित स्त्रियांना, किंबहुना न सुधारणाऱ्या पतित स्त्रियांनाही, समाजात द्रव्यार्जनाची आणि स्वाभिमानाने जगण्याची संधी पाहिजे. मी म्हणेन, अशा स्त्रियांना जरी आपण महारोग्याप्रमाणे दूर ठेवले नाही तरी 'कॅन्व्हसर्स' म्हणून किंवा रंगभूमीवरील नटी म्हणून त्यांना द्रव्यार्जन करण्याला संधी असावी. पण आज आम्ही करीत आहोत उलटे! कुलीन स्त्रियांना रंगभूमीवर येण्याचे प्रलोभन दाखवीत आहोत आणि ज्यांनी सकारण वा अकारण आपले कुलीनत्व गमावले आहे त्यांना गुंडांच्या स्वाधीन करीत आहोत! किंवा आत्महत्येच्या वाटेला लावीत आहोत! कुलीनतेच्या अतिरेकी कल्पनांनी बंगालमध्ये अनेक कुलीन स्त्रियांना आपत्कालात वेश्याव्यवसाय पत्करावा लागलेला आढळतो. समाजात अनेक पवित्र स्त्रिया असणार, त्याप्रमाणेच थोड्याफार स्वैर वर्तनाच्या स्त्रियाही असणार. त्यांना द्रव्यार्जनाची आणि स्वतंत्र जीवनाची संधी उपलब्ध करून देणे हे समाजधुरिणांचे काम आहे. पण दुर्दैव हे आहे की, आमच्यांतील कुलस्त्रियाही परावलंबी आणि अकुलीन स्त्रियाही परावलंबी! कुलस्त्रियाही दुर्बल व अकुलीन स्त्रियाही दुर्बल! यामुळे समाजशत्रूंचे फावते.

हिंदू समाजाने पावित्र्याचे अथवा सोवळेपणाचे महत्त्व ओळखले, पण स्वतंत्रतेचे किंवा मानवी स्वाभिमानाचे महत्त्व ओळखले नाही. कुलीन सुवासिनीचा गौरव जरूर करा, पण व्यभिचारिणीवरदेखील जुलूम-जबरदस्ती होऊ देऊ नका! कुंटिणी, गुंड आणि फसवून परधर्मात नेणारे हस्तक यांपैकी कोणाच्याही हाती पतित स्त्रियादेखील सापडता उपयोगी नाहीत! पण त्याकरिता पावित्र्याच्या किंवा अब्रूदारपणाच्या नावाखाली स्त्रियांना रस्त्यावर सोडण्याचा अमानुष प्रकार बंद झाला पाहिजे. त्याचबरोबर असहाय आणि वंचित स्त्रियांची जागोजागी चौकशी करून त्यांना धैर्याने, धाडसाने व बंधुभावाने मार्गदर्शन करणारे समाजसेवक रेल्वे

जंक्शन्सवर आणि एस्.टी. स्टॅण्डवर उभे हवेत. इंग्लिश चॅनेल पोहत जाणे किंवा दहा पाच लोक गोळा करून हिमालयाचे शिखर गाठणे यातच काय ते धाडस आहे असे नव्हे. समाजाचे शत्रू कोण ते ओळखून असहाय व्यक्तींची त्यांच्या तडाख्यातून सोडवणूक करणे, यातही धाडसच आहे. पहिला प्रकार रिकामटेकड्या धाडसाचा आहे, तर दुसरा प्रकार सुयोग्य धाडसाचा आहे.

पण असे धाडसी स्वयंसेवक फिरू लागल्यावर विमोचित व्यक्तिंना आसरा देणाऱ्या संस्था जागोजाग हव्यात.

पण स्वयंसेवक आणि संस्था यांचेदेखील बल हे सेक्रेटरी, अध्यक्ष, पावतीपुस्तके यांत नसते, तर देशभक्ती आणि समाजप्रेम यांत असते.

निर्धन बैराग्यांनी चालविलेला मसुराश्रम आज एक अभेद्य दुर्ग होऊन राहिला आहे, तो फंडाच्या जोरावर नव्हे, तर निर्भयता आणि स्वजनप्रेम यांच्या जोरावर होय. पतित माधुरीला धाडसाने, प्रेमाने आणि चातुर्याने फिरून सासर आणि माहेर मिळवून देणारा मसुराश्रम आज खरे समाजकार्य करून राहिला आहे!

धर्मभास्कर, वर्ष ६, अंक १-२,
मे-जून १९७६, पृ. २९-३०.

## २८

# नडलेली स्त्री

गेल्या पाऊणशे वर्षांत महाराष्ट्रीय स्त्रीचे कल्पनेपेक्षाही अधिक विमोचन झालेले आढळेल. तिची बालविवाहातून मागेच सुटका झाली आहे. (अर्थात् मी हे पुढारलेल्या वर्गासंबंधी बोलत आहे.) तिची सासरच्या जाचातूनही सुटका झालेली आहे. उच्च शिक्षणामुळेही ती धीट आणि स्वावलंबी बनली आहे. ती द्रव्यार्जन आणि पुरुषी जगातील नोकऱ्या करू लागली आहे. आणि तरीही पुरुषांपुढे ती परावलंबीच आहे. याचे कारण काय?

याचे कारण विवाहासंबंधीच्या आपल्या कल्पनांत सापडेल. विवाहाच्या बाजारात आजही पुरुष अटी घालू शकतो. कारण, कुठे तरी समाजाच्या अंतर्मनात 'पुरुष विवाहाशिवाय राहू शकेल, पण स्त्रीला विवाहाशिवाय गती नाही' ही कल्पना खोल रुजून बसली आहे.

हे कदाचित् खरे असेलही. पण या कल्पनेचे परिणाम स्त्रियांना फारच भोवतात. जेव्हा एखादी एम्.बी.बी.एस्. झालेली मुलगी स्वतःच्या पगाराच्या आणि उंचीच्या आकड्यासह विवाहाची जाहिरात देते तेव्हा, मला ती एक सामाजिक 'ट्रॅजेडी' वाटते. जाहिरात पुरुषही देतात. पण स्त्रियांना नडवण्याचा हक्क मात्र पुरुषांनाच असतो. याचे कारण लग्नाच्या बाबतीत स्त्री हीच नडलेली व गरजू अशी सार्वत्रिक समजूत असते.

हुंड्याच्या चालीचे मूळ स्त्रियांच्या या नडलेपणात व गरजूपणातच आहे. स्त्रियाही विवाहाशिवाय राहू शकतात असा काळ आला म्हणजे पुरुषांचा आजचा 'डिक्टेट' करण्याचा हक्क नष्ट होईल. स्त्रियांनाही लग्नाशिवाय आपल्याला गती नाही या कल्पनेने जी हतबलता येते ती येणार नाही. म्हणजे लग्नाखेरीज गती नसणे यातच स्त्रियांचे आजचे निम्मे परावलंबित्व आहे. त्या सासूच्या जुलमातून सुटल्या, त्या पुरुषांच्या बरोबरीने पदव्या व पैसा मिळवू लागल्या. पण विवाहाच्या बाबतीत मात्र त्यांची वेसण अद्याप पुरुषांच्या हातीच आहे.

वास्तविक असे का असावे? पुरुषाशिवाय स्त्री संसार मांडू शकत नाही हे जितके खरे, तितकेच स्त्रीशिवाय पुरुष संसारी व अब्रूदार होऊ शकत नाही हेही खरे. मग पुरुषाच्या हाती अटी घालण्याचा अधिकार का असावा? हुंड्याची चाल म्हणजे या डिक्टेटरशिपचाच पोटहक्क होय. काही समाजात स्त्रियांही हुंडा मागू शकतात. काही समाजांत स्त्रिया दीर्घकाल किंवा आजन्म अविवाहित राहू शकतात. आज आपल्या समाजातही मुलींना दीर्घकाल अविवाहित राहणे हे पूर्वीइतके कमीपणाचे मानले जात नाही. आणि तरी पाश्चात्य समाजात अविवाहित असून प्रतिष्ठित आणि समाधानी असलेल्या स्त्रियांचे जेवढे प्रमाण आहे तेवढे अद्याप आपल्याकडे नाही. तीसच्या पुढे अविवाहित राहिलेली स्त्री केवढीही पगार मिळवणारी असो, कितीही पदव्या मिळवलेली असो, काही दृष्टींनी विपन्न व दुर्दैवी समजली जाते. तिने लग्न 'केले नाही' असे समजण्याऐवजी, 'तिचे लग्न होऊ शकत नाही' अशी समजूत करून घेण्याची प्रवृत्ती आपल्या समाजात दिसून येते.

अशा स्त्रियांत स्वतःही स्वतःला अनाथ आणि दुर्दैवी समजण्याची प्रवृत्ती कधी कधी दिसून येते. याचे कारण अविवाहित आणि विशेषतः एकट्या राहणाऱ्या स्त्रीला आपल्या समाजात 'स्टेटस' तर नाहीच, पण सुरक्षितताही नाही असे आढळून येते. लग्नाच्या बाजारात वधू तेवढ्या गरजू आणि वर मात्र घोड्यावर बसलेले, असे दिसण्याचे मुख्य कारण हे आहे. सुशिक्षित व मिळवती एकटी स्त्री निर्भयपणे आणि स्वतंत्रपणे राहण्याला समाजात विशिष्ट सांस्कृतिक दर्जा वाढलेला असावा लागतो. स्त्रियांविषयी आदर असेल तरच एकट्या स्त्रीचे जीवन समाजात सुरक्षित राहू शकते.

अधिकाधिक स्त्रियांनी अविवाहित राहावे असे मी प्रतिपादन करीत नाही. पण नाइलाज म्हणून कुठलातरी दोन पायांचा प्राणी पत्करण्यापेक्षा अविवाहित राहाणे हे देखील चांगले हा माझा सांगण्याचा उद्देश आहे.

नडल्यामुळे किंवा अपरिहार्यत्वामुळे जो वर पत्करला जातो त्याला एक प्रकारचा कमीपणाच वाटायला हवा. कारण ती निवड 'निगेटिव्ह' किंवा 'अकरणात्मक' असते. आजन्म अविवाहित राहणाऱ्या स्त्रीला आपल्या कौटुंबिक व सामाजिक जीवनात दर्जा नसतो. विवाहित स्त्रीला असते तसे तिला नवऱ्याचे संरक्षणही नसते. आणि या सर्वांहून मोठे वैगुण्य म्हणजे तिला संततीलाही मुकावे लागते. एवढे मानसिक आणि व्यावहारिक तोटे पत्करण्यापेक्षा बराच काळ अविवाहित स्थितीत काढल्यावर ती गौण किंवा दुय्यम दर्जाची निवडदेखील पत्करते. अशा निवडीत तिलाही अन्याय असतो आणि तिच्या वरालाही अन्याय असतो. ही निवड 'खरी' किंवा 'पॉझेटिव्ह' नसते, तर 'खोटी' किंवा 'निगेटिव्ह' असते. अशा निवडीत पती व पत्नी दोघेहीजण असंतुष्ट आणि रुष्ट असतात. अशा जुलमाच्या रामरामापेक्षा स्त्रियांनीदेखी आजन्म अविवाहित राहणे बरे.

या अविवाहित संप्रदायाचे आणखीही काही फायदे होणे संभवनीय आहे. विवाह हा सक्तीचा विषय नसून त्याला अविवाहित जीवनाचाही पर्याय आहे-व तो सन्मान्य पर्याय आहे, ही गोष्ट एकदा समाजमान्य झाली की, पुरुषांची अटी घालण्याची वृत्तीही थोडीफार शिथिल आणि दुर्बल होईल. अविवाहित राहाण्याची तयारी असल्यास मुलीही मुलांना अटी घालू शकतील आणि एकंदरीतच आज जी वरपक्षाची 'डिक्टेटरशिप' चालू आहे ती नरम येईल.

मी हे काही काल्पनिक जगातील बोलत नाही; किंवा यात स्त्रियांना भलत्याच भरीला घालण्याचाही प्रयत्न नाही. एम.ए. किंवा एम.बी.बी.एस. झालेल्या मुलींचे बाप जेव्हा वरपक्षाच्या अवास्तव बाजारी अटी मान्य करतात तेव्हा, मला त्यांची व त्यांच्या मुलींची कीव येते. उलट माझ्या पाहण्यात अशा काही मुली आहेत की, ज्या वरपक्षाला काही अटी 'डिक्टेट' करतात. माझ्या माहितीतील बुद्धिमान्, पदवीधर आणि रूपाने मध्यम असलेल्या एका मुलीने दाखविलेला बाणेदारपणा या संदर्भात मला आठवतो. तिने तिच्या आर्थिक दृष्ट्या सामान्य स्थितीत असलेल्या वडिलांना प्रारंभीच सांगून ठेवले होते... ''माझे लग्न जुळविताना पैशाच्या देवाण-घेवाणीचे शब्द कानी येता उपयोगी नाहीत. सौद्याची भाषा कानी न पडता जमले तरच मी लग्न करीन.''

या मुलीला हुंडा, मानपान वगैरेकरता खर्च करण्याची ऐपत नव्हती असे नाही. कारण तिची स्वतःची प्राप्तीच मुळी (त्या काळातल्या) एक हजाराच्या आसपास होती, पण लग्नात देण्याघेण्याची भाषा निघणे हे

तिला असंस्कृतपणाचे लक्षण वाटे. तिच्या विवाहाला थोडा उशीर लागला, पण अखेर तिच्या तोलाचा (foreign-returned) आणि तिच्याच विचारांचा हुशार व उमदा नवरा तिला मिळाला. एखादे वेळी आजन्म अविवाहित राहण्याचीही तिच्यावर पाळी आली असती. पण मागासलेल्या विचारांचा, बाजारी वृत्तीचा नवरा पत्करण्यापेक्षा अविवाहित राहण्यातच ती अधिक सुखी झाली असती, अशी माझी खात्री आहे.

आजच्या लग्नांना लिलावाचे आणि पैशाच्या प्रदर्शनाचे स्वरूप आले आहे. त्यात वरपक्षाची क्षुद्र व असंस्कृत वृत्ती तर दिसून येतेच. पण त्याबरोबरच वधूपक्षाची हतबलता आणि मजबुरीही दिसून येते. विवाहासारख्या पवित्र आणि जिव्हाळ्याच्या संबंधात एक पक्ष असा हतबल असावा हे सामाजिक निरोगीपणाचे लक्षण नव्हे. मुलीच्या बापाने मुलीला काही होऊ नये असे माझे म्हणणे नाही. पण ते लग्नातच देण्याच्या पद्धतीमुळे त्याला वाटमारीचे स्वरूप येते! आजच्या विवाहातील आर्थिक व्यवहार आपल्या असंस्कृतपणाचा पुरावा आहे. स्त्री-विमोचनाची गर्जना करणाऱ्या पुरोगामी महिलांनी पहिला पराक्रम या क्षेत्रात दाखवावा. पैशाची भाषा काढणाऱ्या वा खपवून घेणाऱ्या नवरोजीला खजील करून तो 'सुशिक्षित' या नावाला पात्र नाही असे या मुलींनी त्याला सुनवावे. वेळप्रसंगी या मुद्यावर विवाहाची बोलणी मोडावीत आणि त्या सर्व प्रकाराला तोंडी प्रसिद्धी द्यावी. स्त्रियांचे विवाहाखेरीज चालत नाही आणि पुरुषांचे मात्र चालू शकते, ही सामाजिक 'myth' खोटी पाडून दाखवायची असेल तर, विशिष्ट तत्त्वाकरता अप्रिय स्पष्टोक्तीपासून ते आजन्म अविवाहित राहण्यापर्यंत सर्व काही करण्याची तयारी आधुनिक मुलींनी दाखविली पाहिजे.

स्त्री-विमोचनावर नुसती भाषणे करण्याचा काळ संपला!

पुरोगामी महिला,
जून १९७६, पृ. २६-२८.

अनुक्रमणिका

## २९

## स्त्रियांच्या पुरुषीकरणाची आवश्यकता आहे काय?

स्त्री-विमोचनाचा विचार करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या डोक्यात किंवा निदान अंतर्मनात एक चुकीची कल्पना दडलेली दिसते. स्त्रियांचा दर्जा आणि कर्तृत्व वाढवावयाचे असल्यास, पोषाख आणि वागणूक यांच्या बाबतीत स्त्रियांनी पुरुषसदृश बनले पाहिजे. पूर्वीच्या जमान्यातील स्त्री सलज्ज, दुरुस्त (aloof) असे हे खरे. आता, लाजाळूपणात मानसिक दडपणाचा आणि कधी कधी हीनत्व भावनेचा भाग असतो. पण तोही नेहमीच असतो असे नव्हे. जुन्या स्त्रियांच्या लज्जाविनयातही दोन प्रकार असत असे दिसून येईल. काही स्त्रिया, विशेषतः तरुण स्त्रिया, खरोखरीच सलज्जा आणि विनयवती असत. पण ज्या स्त्रिया मनमोकळ्या, धीट, किंबहुना, काहीशा धटिंगण असत त्यांनीही परक्या पुरुषासमोर लज्जेचे आवरण घ्यावे किंवा आव आणावा, अशी त्या काळची रीत होती. अशा वागण्याला त्या काळी स्त्रियांच्या 'good manners' समजत.

पण लज्जेत किंवा विनयात नेहमीच हीनत्वाची भावना असते असे नव्हे. मी मघाशी लज्जेच्या संबंधी जो 'आवरण' म्हणून शब्द वापरला तो सहेतुकपणे वापरला. स्त्रियांचे लाजणे पुष्कळदा 'आवरण' म्हणूनच वापरले जाते. उन्हाचा ताप निवारण्याकरिता ज्याप्रमाणे आपण आपल्या डोक्यावर छत्री धरतो, तसाच पुरुषांच्या दृष्टीचा ताप टाळण्याकरिता, उद्धट किंवा अप्रिय दिसण्याचे टाळण्याकरिता स्त्रिया मुखावर लज्जेचे अवगुंठन घेतात! पण त्यात 'आपण पुरुषापेक्षा कमी आहोत' ही भावना नसून पुरुषांपेक्षा सभ्य आहोत, हीच भावना असते असे आढळून येईल.

जुन्या स्त्रियांचा पोषाख, बोलणे, चालणे, या सर्वांच्या बुडाशी ही सभ्यतेच्या जबाबदारीचीच भावना होती असे दिसून येईल. ज्या स्त्रिया इतक्या सभ्य किंवा संवेदनशील नसत, त्यांच्या वागण्यात लज्जाविनयाऐवजी केवळ दुरूस्तपणा किंवा 'अलूफ्नेस्' असे. पण परिचित पुरुषांच्या बाबतीत केवळ 'दुरुस्तपणा' योग्य ठरत नाही. त्यात इतर लोक पुरेसे सभ्य नाहीत असा भाव डोकावतो! कधी कधी काही जुन्या स्त्रियांच्या बाबतीत त्याला नखऱ्याचे रूप येई. पण शिक्षण आणि कर्तृत्व यांची वाढ झाल्यावर 'आपल्या वागण्याचे हे जुने वळण बदलले पाहिजे' असे काही स्त्रियांना वाटू लागले आहे.

शिक्षण आणि आधुनिक स्वातंत्र्य यांमुळे स्त्रियांच्या विचारात आणि वागण्यात आपोआपच थोडाफार फरक होईल हे खरे. पण 'आपण मुक्त आहोत' हे दाखविण्याकरिता मुद्दामच पुरुषी भाषा, पुरुषी मुखाविर्भाव व पुरुषी पोषाख यांचा त्या अवलंब करू लागल्या आहेत. हे आवश्यक आहे काय? हे उपयुक्त आहे काय? क्वचित् एखाद्या स्त्रीच्या लेखनात पुरुषी बेफाटपणाही दिसू लागला आहे! मी काय म्हणत आहे ते लक्षात येण्याकरता, मी 'स्त्री' मासिकातील देवयानी चौबळ या लेखिकेच्या लिखाणाकडे अंगुलिनिर्देश करीन.

पण स्त्री-पुरुष समान आहेत किंवा समान मानले जावेत, या कल्पनेचा एक उलटा परिणामही दिसू लागला आहे. ज्या क्षेत्रात स्त्रिया पुरुषांची कामे पुरुषांपेक्षाही कार्यक्षमतेने करून दाखवीत आहेत त्या क्षेत्रात त्या, पुरुषांच्या मत्सराचा विषय होत आहेत. "तुम्ही पुरुषांची काम करून दाखवितो म्हणता, पुरुषांच्या एवढे

पगार घेता, तर मग स्त्री म्हणून वेगळ्या सवलती का मागता?" अशी भाषा ऐकू येते. स्त्रियांना, सुशिक्षित पदवीधर स्त्रियांनाही-ज्यात शारीरिक कष्ट आहेत अशी कामे देणे, लायब्ररीसारख्या ठिकाणी रात्री दहापर्यंतची 'ड्युटी' देणे आणि त्यानंतर एकटीला दूरचा बसचा प्रवास करायला लावणे, वगैरे प्रकारांच्या मुळाशी हीच भावना आहे. अशा कामातून स्त्रियांना वगळले तर, त्यांचे सहकारी 'अन्याय्य भेदभाव केला' अशी ओरड करतील या भीतीने त्यांचे 'बॉस्' त्यांना पुरुषांपेक्षा कोणतीही सवलत देत नाहीत. कायद्यानेच बाळंतपणाची रजा मंजूर केली आहे, ही तरी मेहेरबानीच म्हणायची! पण शरीरधर्माच्या दृष्टीने स्त्रियांना एवढी एकच रजा पुरेशी आहे असे म्हणता येणार नाही. मासिक पाळीच्या वेळी त्यांना शारीरिक वा मानसिक श्रम करावे लागणे आरोग्यदृष्ट्या योग्य नाही. पण संकोचामुळे स्त्रिया ती अवस्था इतरांना सांगतही नाहीत आणि एक प्रकारच्या रुग्णावस्थेत कष्ट करीत राहातात.

यावरून पुरुषांचे उद्योग आणि जबाबदाऱ्या अंगावर घेणाऱ्या एका इतिहासप्रसिद्ध स्त्रीची हकीकत मनात येते. झाशीची राणी लक्ष्मीबाई राज्यकारभार आणि लष्करी नेतृत्व यात पुरुषालाही लाजवील इतकी कर्तबगार होती, हे प्रसिद्धच आहे. पण तिलाही तिची स्त्री-जात, तिचे स्त्रीत्व ऐन आणीबाणीच्या प्रसंगी कसे नडले याची इतिहासकारांनी नोंद केलेली नाही. झाशीच्या सुप्रसिद्ध किल्ल्याला इंग्रजांचा वेढा पडून 'आपल्याला टिकाव धरता येणार नाही' अशी परिस्थिती दिसू लागल्यावर, पाठीला दत्तक मुलगा बांधून, इंग्रजाची फळी फोडून ग्वाल्हेरकडे 'सटकायचे' असा राणीने विचार केला. पण ऐन वेळी या तरुण राणीला तिच्या स्त्रीशरीरधर्माने म्हणजे मासिकपाळीने गाठले! त्यावेळी या शूर राणीलाही आपल्या स्त्रीजन्माचा, स्त्रीशरीराचा क्रोध आला. त्या आवेगात तिने काढलेले उद्‌गार पुरोगामी वाचकांना विचारात पाडतील. ती म्हणाली, "मला रांडराला कुणी सांगितला होता हा राज्य करण्याचा आणि लढाई लढण्याचा खटाटोप?" वास्तविक ही राणी लहानपणापासूनच पुरुषांत खेळलेली, जोर-जोडी-मलखांब केलेली, म्हणजे मर्दानी स्त्रीच होती. घोड्यावर बसण्यात आणि अश्वपरीक्षेत तर ती पटाईत होती. पण पाठीवर मुलगा बांधून एखाद्या स्त्रीने शत्रूच्या फळीतून घोडा फेकणे म्हणजे चेष्टा नव्हे! त्यातच मासिक धर्मासारखी अडचण उभी राहिल्यावर धैर्याचा पर्वत असलेली ती स्त्रीदेखील क्षणभर नाउमेद झाली. ही हकीकत एवढ्याकरताच सांगितली की, पुरुषांइतक्या कर्तबगार स्त्रीलाही स्त्रीच्या म्हणून काही खास अडचणी (disabilities) असतात आणि स्त्रियांचे हे वेगळे जीवन स्त्रियांनीही न लाजता पत्करले पाहिजे-कबूल केले पाहिजे. आणि पुरुषांनीही 'त्या आपली बरोबरी करीत आहेत' याबद्दल दुस्वास न करता त्यांच्या या अडचणी, या 'disabilities' ओळखल्या पाहिजेत, त्यांना 'सर्व्हिस रुल्स्' मध्ये कायदेशीर स्थान दिले पाहिजे.

म्हणून मुख्य प्रश्न स्त्रियांनी पुरुषांची कामे, पुरुषांचा पोषाखही करावा ही न करावा हा नसून, त्यांच्या स्वाभाविक 'disabilities', स्वाभाविक अपात्रता न विसरता आणि स्त्री-जन्मातील खास वैशिष्ट्ये आणि खास मूल्ये न गमावता पुरुषी जबाबदाऱ्या कशा स्वीकारावयाच्या हा आहे.

स्त्री-जन्मात काही खास कर्तृत्वाला जागा आहे. स्त्रियांच्यामुळेच आणि स्त्रियांच्या रूपानेच काही खास मानवी मूल्ये निर्माण होतात आणि जोपासली जातात, याची जाणीव आजकाल पुरोगामी पुरुषच काय, पण स्त्रियाही विसरत आहेत! ज्या घरात स्त्री नाही ते घर आणि ज्या घरात स्त्री आहे ते घर, ज्या बैठकीत स्त्रिया नाहीत ती बैठक आणि ज्या बैठकीत स्त्रिया आहेत ती बैठक, यांतील अंतर लक्षात घेतले, तर, इंग्रजीत ज्याला

'feminine touch' म्हणतात तो लक्षात येईल. फार कशाला एखाद्या माणसाच्या घरी गेल्यावर त्याने स्वतः चहा करून आणून देणे आणि त्याच्या बायकोने चहा करून आणून देणे यातील अंतर किरकोळ असेल, पण सूक्ष्मही आहे. शाळाकॉलेजांतून स्त्रिया काम करू लागल्या, त्यामुळेही तेथील कामात आणि वातावरणात स्त्रीत्वाची नजाकत व निष्ठा आली, हे पाश्चात्य निरीक्षकांनी मागेच ओळखले आहे. 'स्त्रीत्व' हा काही पुरोगामी स्त्रिया समजतात त्याप्रमाणे उणेपणा नसून 'विशेषपणा' आहे. स्त्रीचा स्त्रीपणा जाऊन तिचे कर्तबगारीचे क्षेत्र वाढले तर, ते वाडा पाडून गोठा बांधण्यासारखे होईल. झाशीची राणी आपल्या लहानशा दरबारात बसताना अंगावर पठाणी पोशाख चढवीत असे; पण तिचे बाकीचे कार्यक्रम, वृत्ती आणि उद्‌गार पाहिल्यास तिचा शारीरिक व मानसिक नाजूकपणा, तिचा जनानी 'चार्म' यत्किंचितही कमी झालेला नव्हता, असे दिसून येईल. अहिल्याबाई होळकर हिची हकीकत तीच आहे. ती कडकही होती, धार्मिकही होती आणि धोरणीही होती. तिच्यापुढे पुरुष अधिकारीही चळचळा कापत. प्रत्यक्ष राघोबादादाने एका प्रसंगी तिच्यापुढे हात टेकले होते! पण तिला काय की लक्ष्मीबाईला काय, स्त्रीत्व सोडण्याची गरज भासलेली नव्हती. समाजाच्या कर्तृत्वात भर पडली आणि स्त्रीत्वाने मात्र समाजातून पलायन केले तर, तो सामाजिक फायदा की तोटा, याचा निर्णय ज्याची मूल्ये पक्की आहेत तोच करू शकेल.

स्त्रीत्वाच्या रूपाने अवतीर्ण होणारी मूल्ये स्त्री-विमोचनाच्या आवेशात व आवेगात नष्ट तर होत नाहीत ना, याचा विचार विसरता येत नाही.

पुरोगामी महिला,
जुलै १९७६, पृ. २६-२७.

अनुक्रमणिका

## ३०

# सुशिक्षित स्त्रियांना माहेर

स्त्रियांच्या प्रश्नांपैकी विवाहसंबंधीच्या प्रश्नावर इतके लिहिले गेले आहे की, त्यांच्या जीवनातल्या इतर प्रश्नांकडे प्रायः दुर्लक्षच झाले. अशा दुर्लक्षित प्रश्नांपैकी त्यांच्या माहेरासंबंधाचा प्रश्न हा एक आहे. अगदी अलीकडे या प्रश्नासंबंधी एक परिसंवाद भरविण्यात आला, तोही स्त्रियांना तो प्रश्न जाणवला म्हणून नव्हे, तर सिनेमावाल्यांना तो प्रश्न सुचला व त्यांनी आपल्या चित्रपटाची जाहिरात करण्याकरिता काही स्त्री-पुरुषांना वेठीला धरले म्हणून! या परिसंवादात अर्थात्‌च वाद करण्याला महत्त्व असल्याने, दोन टोकांची मते मांडण्यात आली. त्यात एका शहाण्या बाईंनी असे प्रतिपदिले की, आता या नव्या जमान्यात स्त्रियांनी माहेराची अपेक्षा धरू नये. अर्थात् एका स्त्रीनेच हा शहाणपणा दाखवल्यामुळे मला फार आश्चर्य वाटले. अनेक पिढ्या एखादी संस्था किंवा रूढी चालत आल्यावर व आता ती मोडत आहे असे दिसल्यावर 'त्या संस्थेची आशा धरू नका' एवढेच सांगणे हा शहाणपणाही नव्हे की सुधारणाही नव्हे.

'माहेर' ही संस्था इतक्या सहज विसरण्यासारखीही नाही, की विसर्जित करण्यासारखीही नाही. इतर देशांचे मला माहीत नाही, पण महाराष्ट्रात तरी माहेराला स्त्रीच्या जीवनात किती जिव्हाळ्याचे स्थान आहे ते स्त्रियांना तरी सांगावयाची वेळ येऊ नये. अनेक स्त्री-गीतांत स्त्रियांनी माहेरासंबंधी नाजूक भावना व्यक्त केलेल्या आढळतील. लहान मुलींच्या भोंडल्याच्या गाण्यातही मुलींची सासरासंबंधीची नावड, आणि माहेरासंबंधीची आवड-किंबहुना उघड पक्षपाती भावना दिसून येते, आणि त्यात आश्चर्य काहीच नाही. आश्चर्य आहे ते स्त्रीच्या वाट्याला आलेल्या विचित्र जन्माचे आहे. बिचारी एका घरात जन्माला येते, त्या घरात बालपणाचे दिवस आनंदात आणि प्रेमाच्या, लाडाच्या वातावरणात घालविते. त्यानंतर एक दिवस तिच्या जीवनात 'विवाह' नावाची एक क्रांती घडते. तिच्यामुळे घडणाऱ्या दूरगामी परिणामांची तिला आजच्या प्रौढ विवाहाच्या दिवसांतही पुरती कल्पना नसते. मग बाराव्या अन् चौदाव्या वर्षी लग्न होण्याच्या जमान्यात तिला काय कल्पना असेल, देव जाणे!

अर्थात् विवाह ही एक अपरिहार्य अशी घटना आहे. म्हणजे ती अवांच्छित आहे, असेही नव्हे. त्या घटनेची तर मुली व त्यांचे आईबाप वाट पहात असतात. पण या शुभ आणि स्वागतार्ह घटनेबरोबरच, बिचाऱ्या अल्पवस्यक स्त्रीच्या जन्मात एक समस्या निर्माण होते. अगदी नव्या अनोळखी घरात जुळवून घेणे! याला इंग्रजीत problem of adjustment असे गोंडस आणि व्यापक नाव आहे. पण adjustment किंवा 'जुळवून घेणे' ही सोपी गोष्ट नाही. जिथे तीस-तीस वर्षे एकत्र काढलेल्या नवरा-बायकोंनादेखील जुळवून घेणे जड जाते, तिथे एकदम नव्या घरी गेलेल्या लहान मुलीला, सासू-सासरा, जाऊ, दीर, नणंद आणि मुख्य म्हणजे नवरा, यांच्याशी जुवळून घेणे किती जड जात असेल! साधारण अनुकूल स्थिती असल्यास तीही कसरत त्या वर्षानुवर्षे करतात. पण आजन्म 'ॲडजस्टमेन्ट'चा ताण त्यांच्या मनावर पडल्याशिवाय राहात नाही. नोकरीतील ताणाहूनही हा ताण अधिक असतो आणि म्हणूनच निदान नोकरीत मिळते तितकी तरी हक्काची रजा स्त्रियांना या चोवीस तासांच्या नोकरीतून मिळणे अशक्य आहे, हे जुन्या काळच्या भारतीयांनी ओळखले होते. म्हणूनच

महाराष्ट्रात 'माहेर' या सुटसुटीत व गोड शब्दाला जो बहुविध अर्थ आला आहे तो व्यक्त करणारा शब्दही इंग्रजी भाषेत नाही!

स्त्रियांचे हे सुखद आणि अत्यावश्यक विश्रांतिस्थान 'हवे की नको?', 'त्याची आशा स्त्रियांनी धरावी की धरू नये?' हा प्रश्न उपस्थित व्हावा, हे आश्चर्यही आहे आणि दुर्दैवही आहे. पण प्रश्न उपस्थित झालेला आहे खरा! हा प्रश्न सुखासुखी उपस्थित झालेला नाही. स्त्रिया शिकू लागल्यावर सासरी 'सासरपणा' जसा कमी झाला तसाच माहेरचा माहेरपणा कमी झाला. सासरच्या घरी जमते घेण्याचे किंवा 'ॲडजस्टमेन्ट'चे प्रश्न कमी झाले. कारण फक्त नवऱ्याशीच जुळवून घेण्याचा प्रश्न उरला, आणि तोही सासरी जाणाऱ्या मुली प्रौढ आणि सुशिक्षित असल्याने पूर्वीसारखा राहिला नाही तर, उलट त्याच विभक्त कुटुंबाच्या पद्धतीमुळे माहेराचे माहेरपण नष्ट झाले. आई-बाप हयात आहेत तोवर थोडेतरी माहेर शिल्लक असते. पण त्या आई-बापांचेही 'डीव्हॅल्युएशन' (अवमूल्यन) झालेले असते. ते बहुदा परगावी मुलाच्या घरी सुशिक्षित आणि बेमुर्वतखोर सुनेच्या राज्यात येऊन राहिलेले असतात. जिथे ते स्वतःच आंगतुक ठरलेले असतात तिथे लग्न होऊन नवऱ्याच्या घरी गेलेली त्यांची मुलगी त्याहूनही unwelcome (अवांच्छित) पाहुणी ठरली तर, आश्चर्य नाही. बिचारी आई-बापांमुळे आणि आई-बापांकरिता ठराविक जीवनात थोडा बदल म्हणूनही ती तशीच माहेरी येते. पण जिथे आई-बापच ओझ्यासारखे वाटत असतात, तिथे हिच्या येण्याने आनंद कोठून होणार? मग तिला वहिनीबाईचे चढेल बोलणे, बढाया, वगैरे ऐकून घ्याव्या लागतात!

मागे मी एकदा एका सार्वजनिक समारंभानिमित्त सन्मान्य पाहुणा म्हणून एका बड्या आय.सी.एस. अधिकाऱ्याकडे उतरलो होतो. समारंभ एका स्त्री-संस्थेचा असल्यामुळे त्यांची पत्नी हीच माझी 'होस्ट' होती. निवेदनाच्या सोयीकरता आपण त्या बाईंना मिसेस शिरगावकर म्हणू या. मी तिथे पोहचल्यानंतर व माझी आणि मिस्टर शिरगावकर यांची ओळख करून दिल्यानंतर, थोड्या वेळाने तिथे एक साधी-भोळी तरुणी आली. सार्वजनिक काम करणाऱ्या तालेवार मिसेस शिरगावकर त्या बाईकडे पहात म्हणाल्या, ''मिस्टर शिरगावकरांची बहीण''. ही गोष्ट सुमारे वीस वर्षांपूर्वीची आहे. मला त्यावेळी या विचित्र इन्ट्रोडक्शनचे थोडे आश्चर्यच वाटले. म्हणजे, शिरगावकर बाईची नणंद ना? मग 'या माझ्या वन्सं' असे म्हणण्यास हरकत कोणती होती?

पण माझे त्यावेळचे आश्चर्य आज तर अगदीच जुनाट आणि व्यर्थ ठरेल. आज सासरच्या माणसांकरता असलेली जुनी आदरार्थी संबोधने शहरात तरी कोणीच उपयोगात आणताना दिसणार नाहीत. भाऊजी, वन्सं, यांसारखी आदराची आणि जिव्हाळ्याची संबोधने टाकाऊ ठरली एवढाच याचा अर्थ नव्हे, तर नवीन गृहिणींना सासरच्या नातेवाइकांबद्दल जिव्हाळा वाटत नाही व उपचारार्थ आदर दाखविण्याचीही गरज वाटत नाही, असा याचा अर्थ आहे. ही परिस्थिती शोचनीय होय. अर्ध्या तासाच्या लग्नसमारंभाने परक्या घरात, पूर्वी सून आणि आता मालकीण बनणाऱ्या स्त्रीने जिव्हाळा किंवा आदर दाखवावयाचा तो केवळ सनातनी चालरीत म्हणून नव्हे.

परक्या स्त्रीने नव्या नातेवाईकांना आपलेसे करून घेण्याचे हे एक तंत्र पूर्वीच्या दूरदर्शी लोकांनी तयार करून ठेवले होते. त्यामुळे नव्या सुनेच्या श्वशुरगृहवासाने उत्पन्न होणारे 'घर्षण' किंवा 'friction' कमी करण्याचे काम होत असे. जिव्हाळ्याच्या आणि आदराच्या नुसत्या अभिनयानेदेखील वादावादी आणि बाचाबाची पुष्कळच

टळत असे! आज या औपचारिक आदराला फाटा मिळाल्याने, चार परकी माणसे एकत्र जमल्यावर-एका घरात जेऊ खाऊ लागल्यावर, जे परकेपणाचे वातावरण उत्पन्न होते, ते नव्या सुना आपल्या नवऱ्याच्या घरी उत्पन्न करीत आहेत. पण जी सून हे तुटक आणि निष्प्रेम वातावरण आधुनिकतेच्या नावाखाली उत्पन्न करते तिलाही वर्षातून चार दिवस माहेर हवेच असते! तीही माहेरी गेल्यावर आपल्या बी.ए. झालेल्या भावाला कब्जात घेणाऱ्या पदवीधर भावजयीबद्दल तक्रार करीतच असते! अशा पदवीधर भावजया आपल्या नणंदांचे आपल्या विचित्र वागणुकीने माहेर नष्ट करीत आहेत, आणि त्या नणंदा माहेरी येणाऱ्या आपल्या नणंदांचे माहेर नष्ट करीत आहेत! या अर्थशून्य 'गृहदाहा'ला कुठेतरी आळा घालणे आवश्यक नाही का? एकीला सासरचे सुख, किंबहुना उद्धटपणाचे सौख्य मिळण्याकरता दुसरीचे माहेरचे सुख नष्ट होणे अपरिहार्य आहे काय? 'नव्या जमान्यात माहेराची आशा धरू नका' हा एका पुणेरी विदुषीने केलेला उपदेश खरेच हितावह आहे काय?

मला वाटते, यात खोट्या गर्वाचा आणि उथळ अदूरदृष्टीचा भाग पुष्कळच आहे, मग 'नवा काळ', 'नवी आर्थिक परिस्थिती', 'लहान कुटुंबे' वगैरे कितीही झाकणे या अदूरदृष्टीवर घातली तरी, स्त्रियांना-नंणदा, भावजया (दोघींनाही) — माहेराची गरज आहे, हेच त्यातील एक 'आर्यसत्य' आहे! एवढे जरी तूर्त पुरोगामी म्हणवणाऱ्या महिलांनी मान्य केले तरी पुरेसे आहे.

पुरोगामी महिला,
ऑगस्ट १९७६, पृ. १३-१४.

अनुक्रमणिका

## ३१

# युद्धोत्तर स्त्रीवरील कामाचा बोजा

अलीकडेच पुण्यातील एका प्रमुख गणपतीपुढे 'घरकाम स्त्रियांनी करावे की पुरुषांनीही करावे?' या विषयावर परिसंवाद ठेवण्यात आला होता. स्त्री-पुरुषांतील स्पर्धेसंबंधी अथवा तंट्यासंबंधी ठेवलेले असले विषय कधीच गंभीरपणाने हाताळले जात नाहीत. श्रोत्यांत जमलेल्या स्त्रियांना चिडवून, डिवचवून, हशा पिकवण्याकरिता पुरुष वक्ते बोलत असतात, तर घरच्या पुरुषांवर समोरासमोर तोंडसुख घेणे अडचणीचे असल्याने, तो कोंडलेला राग बाहेरच्या पुरुषांवर उगविण्याकरिता परिसंवादातील स्त्रिया तावातावाने बोलत असतात! अखेर फळ काय? तर हास्याची लयलूट आणि गांभीर्याचा दुष्काळ!

पण, म्हणजे हा प्रश्न स्त्रियांना सतावून सोडीत नाही, असा मात्र याचा अर्थ नव्हे. अकरा ते सहा ऑफिसमध्ये काम करणाऱ्या स्त्रिया टेबलावरील फायलींच्या ढिगातून डोके वर काढून अथवा त्याच ढिगाआड डोके लपवून जेव्हा एकमेकींशी बोलतात तेव्हा, त्यात हाच विषय प्रमुख असतो. ''आमच्या 'ह्यां' ना घरातली इकडची काडी तिकडे करायला नको. बँकेत मीच जावं, मुलांचे अभ्यास मीच घ्यावेत, फार काय यांची पॅन्ट, बुशकोटदेखील लॉंड्रीत मीच द्यावी!'' तेवढ्यात नवीनच लागलेली, बॉब् केलेली, केवळ 'पॉकेटमनी' करता नोकरी करणारी तरुण असिस्टंट म्हणते, ''अहो आमचा रमेश तर वर्तमानपत्र चाळण्याखेरीज आणि आलेल्या मित्रांबरोबर चकाट्या पिटण्याखेरीज काहीच करीत नाही. ते एक असो, पण एकसारखी तोंडात सिगारेट! त्याच्या तोंडालाच काय पण कपड्यालादेखील सिगारेटची घाण येत असते. आपण बायका नोकरी करायला लागल्यावर आपलं काम वाढलं आणि पुरुषांचं कमी झालं!''

त्यावर थोडी सिनिअर असलेली, जिची मुलगी आता लग्नाला आली आहे, अशी मोठ्या टेबलाशी बसलेली बाई म्हणते, ''अहो आता हे पुरुष, 'नोकरी असलेली वधू पाहिजे' असं जाहिरातीत चक्क लिहू लागले आहेत!''

मला वाटतं पुण्याच्या गायकवाड वाड्यातील परिसंवादापेक्षाही ऑफिसमधील फायलींच्या आडून होणाऱ्या या परिसंवादाला अधिक गांभीर्य असतं. स्त्रिया नोकरी करू लागल्यापासून त्यांच्यावर कामाचा दुहेरी बोजा पडू लागला आहे, ही गोष्ट सत्य आहे. पण त्यावर उपाय पुरुषांनी घरकाम करणे किंवा निदान पूर्वी करीत होते तेवढा तरी बाजारहाट करणे हाच आहे काय? हा उपाय अंमलात आणता येईल काय, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. स्त्रिया नोकऱ्या केव्हा आणि कशाकरिता करू लागल्या याची थोडी आठवण केल्याशिवाय, सध्याच्या या विचित्र परिस्थितीचे खरे मूळ सापडणार नाही. गेल्या महायुद्धात रेशनिंग, मिलिटरी अकाऊन्टस्, वगैरेंच्या निमित्ताने शहरांतून ऑफिसांची संख्या वाढली आणि स्त्रियांना नोकऱ्या देण्याकडे प्रथम सरकारचा आणि नंतर खाजगी ऑफिसांचा अधिकाधिक कल झाला. पण त्यांना तरी नोकरीकरिता एकदम इतक्या स्त्रिया कोठून उपलब्ध झाल्या? याचं उत्तर शोधण्याकरिता थोडी याच्याही आधीची आठवण केली पाहिजे. 'स्त्रियांना शिक्षण द्या', 'लग्नाच्या वयाची मर्यादा वाढवा' वगैरे चळवळी युद्धाच्याही आधी निदान पन्नास वर्षे तरी चालू होत्या. त्या चळवळी कामचुकार, सिगारेट फुंकणाऱ्या पुरुषांनी खास काढलेल्या नव्हत्या. त्या काढल्या होत्या

धोंडोपंत कर्व्यांसारख्या स्त्रियांच्या कैवाऱ्यांनी आणि त्यांच्याबरोबरच स्वतः स्त्रियांनी! गरीब स्त्रियांना द्रव्यार्जन करता यावे, अनाथ विधवांच्या नशिबी दुसऱ्याच्या घरी पोळी लाटण्याचे काम येऊ नये एवढ्याकरिता ही स्त्री-शिक्षणाची आणि स्त्रियांच्या द्रव्यार्जनाची चळवळ होती. पण मागणी आणि पुरवठा यांचा सिद्धांत या क्षेत्रातही दुर्लभ्यच ठरणार! सुशिक्षित स्त्रियांची संख्या आणि सुशिक्षित स्त्रियांना असणारे स्वातंत्र्य प्रमाणाबाहेर वाढल्यावर आवश्यकता नसलेल्या स्त्रियाही नोकरी करू लागल्या. कारण ज्यांना आर्थिक दृष्ट्या आवश्यकता नव्हती त्यांनीही नोकरीमुळे स्त्रियांना मिळणारे स्वातंत्र्य आणि द्रव्यार्जनामुळे येणारा स्वाभिमान दिसल्याशिवाय राहात नव्हता.

म्हणजे आज नोकरी करणाऱ्या सर्वच स्त्रिया, पुरुषांच्या सांगण्यावरून अथवा कुटुंबाच्या गरजेकरिताच नोकरी करीत आहेत असे नव्हे. नोकरी करणे हा स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा आणि संचारस्वातंत्र्याचा एक अपरिहार्य भाग होऊन बसला आहे. म्हणजे नोकरी करण्याने मुळातच स्त्रियांची एक गरज पुरविली जात आहे. अशा परिस्थितीत आमची आर्थिक स्वातंत्र्याची आणि संचारस्वातंत्र्याची मागणी पुरविण्याकरिता पुरुषांनी घरकाम करावे असे त्यांना कसे म्हणता येईल? तसेच जी कामे पूर्वी स्त्रियांची नव्हेत असे मानले जाई तीही त्या करून शकतात, असे दिसून आल्यावर पुरुष ती कामे टाळल्याशिराय कसे राहतील?

पुरुष हा स्वभावतः कामचुकार आणि आळशी प्राणी आहे. ज्या ज्या समाजातील स्त्रिया द्रव्यार्जन आणि घराबाहेरील व्यवहार पाहण्याइतक्या धीट आहेत, त्या त्या समाजातील पुरुष आळशी आणि रिकामटेकडे बनल्याची उदाहरणे आहेत. माझे वडील सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी ब्रह्मदेशात गेले होते. आजची स्थिती मला माहीत नाही, पण त्या काळात दुकान चालविणे, बाजारहाट करणे, इत्यादी कामे ब्रह्मदेशातील स्त्रियाच करीत असत असे माझे वडील सांगत. पण म्हणजे तेथील पुरुष स्वयंपाक करीत असत किंवा मुले सांभाळत असत, असे तुम्हांला वाटते की काय? तशी कल्पनाच करू नका! त्या काळातील ब्रह्मी पुरुष एका गालात अफूची गोळी ठेवून खुशाल सुस्तपणे बसून राही. घराबाहेर पडण्यात स्त्रियांना जर 'विमोचन' वाटत असेल (आणि ते थोडे खरेही आहे) तर, त्यांनी घरकामाची अन्य काही व्यवस्था करायला हवी. पाश्चात्य देशांत पुष्कळसे काम यंत्राच्या मदतीने होते आणि पुष्कळसे जिन्नस बाजारात आयते मिळतात. उदाहरणार्थ, आपल्याकडे धान्य निवडण्यापासून, दळून आणण्यापासून, शिजवण्यापर्यंत, फोडण्या-मसाले करण्यापर्यंत बायकांना जी अनंत कामे करावी लागतात, त्यांतील फारच थोडी पाशात्य स्त्रियांना घरी करावी लागतात. रोजच्या अन्नासंबंधी आपल्या देशात वरच्या जातीपासून खालच्या जातीपर्यंत सर्वांच्या कल्पना फार कडक आणि सोवळ्या आहेत. हिंदूंतील सर्वच जातींचे स्वयंपाकघर जितके स्वच्छ असते, तितके इतर समाजांतील वरिष्ठ वर्गाचेही स्वयंपाकघर स्वच्छ नसते. स्वच्छतेच्या कल्पनेतून सोवळेपणाची कल्पना निघाली. स्वच्छतेच्या कल्पनेतून नित्य स्नान करण्याची चाल निघाली. हिंदुस्थानातील खालच्या जातीतील समजला गेलेला मनुष्यही नित्य स्नान करणे अपरिहार्य समजतो असे आढळेल. वर कडक इस्त्रीचे कपडे वापरणे, रस्त्यात कागदाचा कपटाही दिसू न देणारे पाश्चात्य लोक, अगदी अलीकडेपर्यंत महिन्या-दोन महिन्यांनी एकदा स्नान करणे पुरेसे मानीत! (आता थोडा बदल झाला आहे, असे म्हणतात.) अन्न आणि शरीर यांच्या स्वच्छतेसंबंधी आत्यंतिक कल्पनांतून हिंदू स्त्रियांच्या घरकामाची वाढ झालेली आहे. त्या घरकामाच्या जोडीला साडे दहा ते साडे पाच नोकरी, त्या नोकरीकरिता व लोकल पकडण्याकरिता घरातून साडे आठला बाहेर पडायचे म्हटल्यावर अन्नासंबंधीच्या आणि स्वच्छतेसंबंधीच्या जुन्या कल्पना सोडाव्या लागणार, सोडाव्या लागत आहेत. ज्या स्त्रिया एक जिन्नस

तयार करताना तीन-तीनदा हात धुतात, त्या ऑफिसात दमून मधल्या सुट्टीत हॉटेलमध्ये गेल्यावर जे जे जिन्नस खातात ते गलिच्छ नोकरांनी, गलिच्छ हातांनी तयार केलेले असतात. इराण्याच्या हॉटेलमधील किंवा ख्रिस्ती, युरोपीयन वगैरेंच्या हॉटेलमधील स्वच्छता बाहेरच्या टेबलापुरती असते. त्यांच्या किचनमध्ये डोकावण्याची सोय नसते. Don't peep into the kitchen या म्हणीवरूनच पाश्चात्यांची स्वयंपाकघरे कितपत स्वच्छ असतात ते दिसून येईल.

सारांश, स्त्रियांच्या घराबाहेर पडण्याने आणि वरच्या जातीदेखील मांसाहार करू लागल्याने, आपल्या स्वयंपाकघराची गत तीच होणार आहे. सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पना खुळ्या आणि निराधार आहेत हे खरे, पण त्या कल्पनांमुळेच हिंदूंची स्वयंपाकघरे आणि हिंदूंचे रोजचे अन्न इतरांच्या अन्नापेक्षा स्वच्छ असते हेही खरे. स्त्रियांच्या नोकऱ्यांमुळे आपणाला कोणती किंमत द्यावी लागणार आहे, ते यावरून दिसून येईल. समंजस पुरुष पूर्वीपासूनच स्त्रियांना घरकामात थोडीफार मदत करीत आले आहेत. जे बायकोवर अरेरावी गाजवीत ते आईपुढे तरी गुलामाप्रमाणे वागत, म्हणजे कोणत्या ना कोणत्या नात्याने स्त्रीची सेवा करताना पुरुष आढळत असत. आज स्त्रियांनी शिक्षणामुळे, शहरी राहणीमुळे आणि स्वातंत्र्यप्रेमामुळे, आपली कामे वाढवून घेतली आहेत. म्हणून लगेच पुरुष त्यांची कामे उचलतील ही कल्पना अवास्तव आहे. मुळातच घरातील कामे स्त्रियांकडे अधिक असत. ऑफिसमध्येदेखील काही विशिष्ट वृत्तीच्या मुली सोडल्यास स्त्रियाच पुरुषांपेक्षा मन लावून काम करतात, असा या देशातील अनुभव आहे आणि जर्मनीसारख्या परदेशातीलही अनुभव आहे. चुकारपणा, उनाडपणा, व्यसनीपणा हा पुरुषाचा स्वभाव आहे. स्त्रियांच्या आजच्या स्वातंत्र्यामुळे पुरुषांच्या चुकारपणाचे वर्धन होत असेल तर, स्त्रियांनी आपल्या नोकऱ्यांचा आणि स्वातंत्र्याचा फेरविचार करणे एवढाच मार्ग मला तरी दिसतो. पुरुषांच्या स्वभावात, अर्थात् सर्वसामान्य पुरुषांच्या स्वभावात बदल होणे फारसे संभवनीय नाही. उदाहरणार्थ, मुले सांभाळणे बायकांवरच येणार! गरोदरपणातही बाहेरची कामे करण्याने स्त्रियांचेच हाल होणार. मासिक पाळीसंबंधी 'आळीमीळी' पाळण्याची पाश्चात्य फॅशन सुशिक्षित स्त्रियांनी उचलली आहे! त्याचा परिणाम म्हणजे पाळीच्या काळात सायकल मारणे, स्कूटर चालविणे, बस, लोकल, यांच्याकरिता धावपळ करमे, उभ्याने प्रवास करणे, इत्यादी अपकारक गोष्टी स्त्रियांना पत्करावे लागत आहेत. पुरुषांनी घरातील किरकोळ कामे करण्याने स्त्रियांच्या आजच्या जीवनातील या आपत्ती टळतील असे नव्हे.

हा प्रश्न पोरकट विनोदाकरिता आणि तरुण स्त्री-पुरुषांनी एकमेकांना डिवचण्याकरता एखादा परिसंवाद ठेवल्याने सुटण्यासारखा नाही. आपण आपली प्राचीन राहाणीच बदलू पहात आहोत, तर त्या बदलाबरोबर येणाऱ्या गैरसोयींचा आणि आपत्तींचा विचार शांतपणे पोक्त स्त्री-पुरुषांनी करायला हवा. 'चालू फॅशन म्हणजे सर्वस्व' असे मानणाऱ्या पिढीला तो प्रश्न सोडवता येणार नाही.

पुरोगामी महिला,
दिवाळी विशेषांक, १९७६,
पृ. १५-१६ व १०४.

अनुक्रमणिका

# ३२

## स्त्रियांसंबंधीचे वाढते गुन्हे

गेल्या दोन-तीन वर्षांतील वृत्तपत्रीय वार्ता सहज आठवल्या तर, स्त्रीविषयक गुन्ह्यांचे प्रमाण वाढते आहे, असे दिसून येईल. म्हणजे, नुसते विनयभंग किंवा अंगावरील जिनसांकरिता धक्काबुक्की यांसारखेच गुन्हे नव्हेत, तर स्त्रियांच्या खुनांचे प्रमाणही वाढलेले दिसेल. अगदी अलीकडचे गाजलेले उदाहरण म्हणजे, कोकणातील चंद्रकला लोटलीकरच्या खुनाचे उदाहरण होय. दोन-तीन वर्षांपूर्वी मंदा पाटणकर या लोकलने मुंबईत जाणाऱ्या मुलीचा चमत्कारिक रीतीने झालेला खून असाच गाजला होता.

हे झाले उघड्यावरील व रस्त्यावरील खून. पण घरातल्या घरात नातेवाइकांनी केलेल्या खुनांच्या वार्ताही गेल्या दोन-तीन वर्षांत कितीतरी आलेल्या आठवतील. 'चेटूक करते' या संशयावरून नाशिक येथील एका सासुरवाशिणीचा अमानुष खून वृत्तपत्रांत अनेक दिवस गाजत होताच. त्याच्याही आधी आपल्या धर्मपंथाच्या बाहेरील व्यक्तीशी प्रेमविवाह ठरवणाऱ्या शीख डॉक्टरणीचा गूढपणे घरातल्या घरात गळा दाबून जीव घेतल्याची वार्ता गाजली होती, आणि नंतर खटला गाजला होता. त्या खटल्यातील शेवटचे आश्चर्य म्हणजे सर्व आरोपी निर्दोष सुटले होते. आणखीही असेच घरातल्या घरात झालेले खून आजही वर्तमानपत्रांत चर्चिले जात आहेत. मानवत येथील खून मालिका म्हणजे तर त्या भागातील मानवजातीला कलंकप्रायच होय. या सर्व कथा प्रत्यक्ष खुनाच्याच असल्याने वर्तमानपत्रांत ठळकपणे चर्चिल्या गेल्या. पण ज्यात प्रत्यक्ष खून झालेला नाही, तर एखाद्या स्त्रीचे अनन्वित हाल आणि विटंबना झालेली आहे असे अनेक प्रकार वृत्तपत्रांत येतही नाहीत. ते घडल्याची कुजबूज आपल्याला समाजात ऐकू मात्र येते. गुंडांनी पळविल्यामुळे अब्रूला आणि घरादाराला मुकून अखेर कुंटणखान्यात दाखल झालेल्या अनेक स्त्रियांच्या हकीकती समाजात दबलेल्या आवाजात सांगितलेल्या ऐकू येतील. खून झालेल्या स्त्रियांहूनही अशा स्त्रियांचे जीवन किती खडतर बनते ते, ब्रह्मचारी विश्वनाथजी (मसुराश्रम, गोरेगाव) यांचे 'शुद्धिकथां'चे पुस्तक वाचल्यास कळून येईल. यात फसलेल्या अनेक मुली प्रौढ आणि सुशिक्षित, तर त्यांना फसवणारे दर्जाने हीन आणि अशिक्षित असल्याचे दिसून येईल.

या सर्व गुन्ह्यांतून काही निष्कर्ष काढण्यासारखे आहेत. स्त्रियांविरुद्ध गुन्हा करणे गुन्हेगारांना अधिक सोपे जात असावे. तसेच, स्त्रियांविरुद्ध गुन्ह्यांत प्रतिकाराची शक्यता कमी आणि लाभ मात्र दुहेरी! असा गुन्हेगारांचा अनुभव असावा. काही तोळे सोने आणि एक तरुण स्त्री, ही दोन्ही एकाच गुन्ह्याने आणि केवळ घाबरट प्रतिकारानंतर मिळू शकत असतील तर, पुरुषाऐवजी स्त्रीवर हात टाकणेच गुन्हेगार अधिक किफायतशीर समजतील, हे उघड आहे. शिवाय, प्रत्यक्ष हात टाकण्याचे किंवा हल्ला करण्याचेही पुष्कळदा कारण पडत नाही; नुसत्या दहशतीने किंवा फूस लावण्यानेही तीच फलप्राप्ती पुष्कळदा करून घेतलेली आढळते. पण किती झाले तरी, बाहेरच्या गुन्ह्यांचे प्रमाण घरांतील गुन्ह्यांपेक्षा कमीच असणार. केवळ बेजबाबदारपणे जेव्हा एखादा नवरा बायकोला घराबाहेर घालवितो किंवा जीवन नकोसे करतो तेव्हा, त्या अमानुष गुन्ह्याला पुष्कळदा वाचाही फुटत नाही. सहज चार मंडळींत अशा गोष्टी निघाल्या असता, प्रत्येकाच्या माहितीत निदान दहा-दहा तरी असले अमानुष प्रकार असलेले आढळतील. मुसलमान समाजातील तोंडी घटस्फोटाने स्त्रियांवर केवढी आपत्ती येऊन कोसळते ते त्या समाजातील लोकच आता जाहीरपणे बोलू लागले

आहेत. पण, 'तलाक' किंवा तोंडी घटस्फोट फक्त मुसलमानांतच आहे, असे समजण्याचे कारण नाही. हिंदू समाजात 'तलाक' हा शब्द नाही. पण 'विवाहित स्त्रीला काही हक्क असतात' या गोष्टीची क्षिती न बाळगता तिला केवळ स्वतःच्या अरेरावीखातर एका वस्त्रानिशी घराबाहेर घालवणारे शेकडो नवरे हिंदू समाजात आहेत! मुसलमानांतील 'तलाक'नेच उलट स्त्रीला एकतरी हक्क मिळतो, आणि तो म्हणजे पुन्हा लग्न करण्याचा! पण परित्यक्ता हिंदू स्त्रीला पहिल्या नवऱ्याने टाकले असूनही दुसरा नवरा करण्याचा हक्क मिळविण्याकरिता कोर्टात हेलपाटे घालावे लागतात! पती समंजस असल्यास हिंदू विवाह ही एक आदर्श संस्था मानता येईल; पण पती असमंजस आणि आडमुठा असल्यास हिंदू विवाहाइतकी अमानुष संस्थाच दाखविता येणार नाही. कारण त्या विवाहाने एका मूर्ख आणि क्रूर पुरुषाच्या ताब्यात एक असहाय स्त्री दिलेली असते. 'स्त्रीला अमानुषपणे वागविण्याचा रीतसर परवाना' हेच अशा विवाहाचे स्वरूप असते. अशा विवाहाने वर्षानुवर्षे पीडित असलेल्या स्त्रीवर तिचा नवराच प्रत्यक्ष गुन्हे करीत असतो! या पीडित स्त्रियांना त्राता कोण?

पूर्वीच्या जमान्यात या स्त्रिया नुसत्या पीडित असत, पण रस्त्यावर फेकल्या जात नसत. कारण, निराधार नातेवाईकांना रस्त्यावर न सोडणे, हे त्या काळातील कुटुंबवत्सल लोक आपले एक कर्तव्य मानीत. पण आजकाल शहरांतील कुटुंबे लहानही झाली आहेत आणि विचाराने पाश्चात्यही झाली आहेत. अशा छोट्या कुटुंबाला निराधार नातेवाईक स्त्रीला चार दिवसदेखील थारा देणे परवडतही नाही, की पसंत पडतही नाही. अशा स्त्रियांविरुद्ध त्यांचा विकृत नवराच फक्त गुन्हा करतो असे नव्हे, तर संपूर्ण समाजच उघड्या डोळ्यांनी गुन्हा करीत असतो.

हे राजरोस गुन्हे थांबविण्याचा मार्ग कोणता? स्त्रीची मानसिक आणि आर्थिक असहायता कमी करणे, हाच एक मार्ग आहे. नवरा आपल्याला खुशाल स्वतःच्या मर्जीनुसार घराबाहेर घालवू शकतो, ही स्त्रियांची समजूत नष्ट झाली पाहिजे. अशा नवऱ्याला आपणही घराबाहेर का घालवू नये? घर आपलेही आहे, असे म्हणण्यास त्यांनी शिकले पाहिजे आणि अशा परिस्थितीत घराबाहेर पडणे एवढाच एक सोयीस्कर मार्ग असेल तर, आपले कपडेलत्ते आणि दागदागिने घेऊन बाहेर पडण्याचा हक्क त्यांनी बजावला पाहिजे.

आधी हे हक्क बजावणाऱ्या स्त्रिया कमी, त्यातून एखादी तशी असलीच तर, ती अब्रूच्या खोट्या कल्पनांनी अर्धमेली झालेली! आणि बिचारी तशी न होईल तरच आश्चर्य! कारण समाजातले इतर लोक, शेजारीपाजारी, दूरचे नातेवाईकदेखील तिच्यावरील अन्यायाने व्यथित आणि संतप्त होण्याऐवजी एकमेकांच्या कानांत कुजबुजून तमाशा पहाण्याच्या 'मूड'मध्ये असतात.

अशा वेळी 'महिला मंडळे' आणि 'स्त्रीसखी संस्था' यांचा 'रोल' कोणता असतो, ते सांगणे कठिण आहे. अर्थात् नवरा-बायकोच्या भांडणात पडणे ही गोष्ट सोपी नसते. कारण, भांडण कशामुळे होत आहे, काय खुपत आहे, कोण दोषी आहे हे प्रत्यक्ष त्या घरातीलही तिसऱ्या व्यक्तीला सांगता येत नाही; मग बाहेरचे लोक काय सांगणार? पण, 'व्हिक्टिम' (बळी) कोण आणि 'व्हिक्टिमायझर' (छळणारा) कोण हे सांगणे कठिण नसते. त्या दोहोंतील बदमाष कोण आणि अश्राप कोण, हे शेजारीही सांगू शकतात. त्यातील छळणाऱ्या 'पार्टी'ला शिक्षा सुनावणे जरी आपल्या हाती नसले तरी, छळ सोसणाऱ्या व्यक्तीला साहाय्य करणे त्रयस्थ व्यक्तीलाही अशक्य ठरू नये. शेजारीपाजारी लोक, विशेषतः पुरुष आपल्या हेतूविषयी संशय घेतला जाईल या भीतीने दुबळे

बनतात, हे खरे. पण हादेखील स्त्रियांसंबंधीच्या आजच्या सामाजिक, घाबरट, नेभळट दृष्टिकोनाचाच परिणाम होय. पण शेजाऱ्यांची आणि पुरुषांची गोष्ट सोडली तरी, स्त्रियांच्या संस्थांनी अशा प्रसंगी सरसावून पुढे का येऊ नये? आपले स्त्रीदाक्षिण्य आणि आपल्यातील 'स्त्रीसख्या' अद्याप पोषाखी आणि व्यासपीठापुरत्याच आहेत, असा तर याचा अर्थ नव्हे?

अशा 'छलित' आणि 'दलित' स्त्रियांना त्वरित कायद्याची मदत मिळवून देणे एवढे तरी अशा संस्थांना अशक्य ठरू नये!

पुरोगामी महिला,
जानेवारी १९७७, पृ. ९-१०.

# ३३

## स्त्री-सौख्याची नवीन पाहाणी

स्त्रियांच्या पुरोगामी संस्था स्त्री-स्वातंत्र्याच्या नव्या आवृत्तीची मागणी करीत आहेत, ते योग्यच आहे. परंतु त्या नव्या आक्रमणाच्याही आधी स्त्रियांकरता काही गोष्टी मिळवायच्या आहेत, त्यांचीही आठवण स्त्रियांच्या हितचिंतकांनी आणि स्वतः स्त्रियांनी ठेवायला हवी.

वृत्तपत्रांतील गुन्ह्यांच्या बातम्यांकडे वरवर नजर टाकली तरी स्त्रियांसंबंधीचे गुन्हे या पाच वर्षांत वाढले आहेत, असे दिसून येईल. त्यांतील घरगुती गुन्ह्यांची संख्या चिंतनीय आहे. नवऱ्याने बायकोला जाळून मारली, ती निजली असता डोक्यात दगड घातला, सासू-नणंद यांच्या साथीने बायकोचा खून केला-यांसारख्या अनेक वार्ता वाचल्याचे प्रत्येक वृतपत्र-वाचकाला स्मरेल. क्वचित् केवळ अनुमतीशिवाय जातीबाहेर विवाह करणाऱ्या प्रौढ सुशिक्षित मुलीचा तिच्या आईबापांनीच खून केल्याच्या वार्ताही वाचण्यात येतात.

सौदी अरेबियाच्या राजकन्येची वार्ता नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. तिने राजघराण्यापेक्षा कमी दर्जाच्या घराण्यातील वराशी विवाह केला होता. याकरिता तिला भर बाजारात गोळ्या घालण्यात आल्या व तिच्या वरालाही ठार मारण्यात आले. या अरबी शौर्याच्या मानाने आपल्याकडील कुटुंबियांचे शौर्य अद्यापि जरी कमी असले तरी, कौटुंबिक गुन्ह्यांची संख्या भयप्रद आहे. पण हे पोलिसांच्या कक्षेत येणारे गुन्हे क्षणभर दृष्टिआड केले तरी, आधुनिक सुशिक्षित समाजातही तरुण मुलींचे वैवाहिक जीवन अनेक उदाहरणांत समाजाला लांच्छन ठरण्याइतके दुःखी आहे. त्यांचे दुःख वृत्तपत्रांत येऊ शकत नाही, याला कारण फक्त त्यांचे मौनच आहे. त्यांचे ते दुःख त्यांनी बरीच वर्षे सोसल्यावर, त्यांच्या आईबापांपर्यंत फार तर पोहोचते. 'पुन्हा त्या नवऱ्याचं किंवा त्या सासरच्या घराचं तोंड पाहू नये' अशी स्थिती असली तरी, 'कुलीनत्वामुळे' असो की 'अगतिकत्वामुळे' असो, आई-बाप तिला परत सासरी नांदण्याचा सल्ला देतात आणि ते बरोबरही असते. कारण आज पदवीधर झालेल्या आणि नोकरी करण्याची तयारी असलेल्या स्त्रियांचीही हक्काच्या घराबाहेर पडल्यावर काय स्थिती होते, हे त्यांनी पाहिलेले असते.

अशा स्थितीत फक्त स्त्रियांनाच हक्काची जाणीव करून देणे पुरेसे नाही. त्यांचा तो हक्क त्यांना घराबाहेर पडण्याची किंवा कोर्टाची वाट दाखवू शकेल, पण सुखाकरता व स्वास्थ्याकरता लग्न केल्यावर, त्या लग्नातून बाहेर पडण्याचा हक्क' हा फार मोठा हक्क मानता येणार नाही! तो एक प्रकारे आत्महत्या करण्याचाच हक्क होय. तरुण-तरुणींना हक्कांसंबंधी सुशिक्षित करून सध्याची सांसारिक दुरवस्था संपण्यासारखी नाही. नव्या जोडप्यांना केवळ हक्कांचीच नव्हे तर सांसारिक कर्तव्यांचीही जाणीव करून-द्यायला हवी. पण दोघांची मने एकमेकांविषयी विटल्यानंतर एखाद्या कर्तव्याची वा एखाद्या आवश्यक अशा त्यागाची जाणीव करून देण्याने कार्यभाग कितपत साधेल, हाही एक प्रश्नच आहे.

आपण स्त्रियांचे शिक्षण आणि स्त्रियांचे हक्क यांसंबंधी वृत्तपत्रांतून आणि व्यासपीठांवरून कितीही बोललो तरी, परंपरेने मनात रुजलेल्या कित्येक समजुती तशाच कायम असतात. संसारातील कित्येक रूढीही तशाच

शिल्लक असतात. पत्नीच्या काही अपेक्षाही तशाच असतात. अगदी 'मॉर्डर्न' पतीलाही पत्नीने नवऱ्याच्या इच्छेप्रमाणे वागावे असे मनातून वाटत असते. त्याचे पूर्वीचे हट्ट आता बदललेले असतील एवढेच.

अलीकडेच कळलेली एका नव्या संसारातील हकीगत : नवऱ्याच्या बेजबाबदारपणाला आणि बेपर्वाईला विटून तरुण पत्नी भांडण करून माहेरी आली होती. तो सुशिक्षित नवरा आपल्याइतक्याच शिकलेल्या व नोकरी करणाऱ्या त्या बायकोला मारीत असे, लाथा घालीत असे आणि तरी ती घरातून बाहेर निघून आल्यावर त्याला तिचे आश्चर्य वाटत होतेच! कारण दोन-तीन वर्षे तिने ती अपमानास्पद आणि असंस्कृत वागणूक, बाहेर परीस्फोट न करता, सहन केलेली होती.

आजकाल नवरे अधिक जंगली झाले आहेत असे नव्हे. पूर्वीही ते तितकेच जंगली होते. उलट, आजच्या वधू प्रौढ आणि शिकलेल्या असल्यामुळे मूर्ख नवऱ्यांनाही, छळ आणि लाड यांची खैरात आलटून-पालटून करावी लागते. पण पूर्वीचा तरुण नवरदेव मूर्ख असो की शहाणा असो, तामसी असो की सज्जन असो-तो आजच्या नवरोबाइतका स्वतंत्र नसे. त्याच्या हुकमतीवर वृद्धांचे अधिराज्य असे आणि कुटुंब मोठे असल्याने त्याला भावाबहिणींचीही लाज असे.

आज पुष्कळदा तरुण आणि अननुभवी नवरा-बायको, कुटुंबात एकेकटीच असल्याने स्वातंत्र्यही वाढले आहे आणि छळणूकही वाढली आहे. कारण ज्यांचा धाक धरावा किंवा लाज धरावी, अशी माणसे या स्वतंत्र पण एकलकोंड्या कुटुंबात नसतात. त्यातच आधुनिकतेच्या नावाखाली म्हणजेच निर्बुद्ध अनुकरणाच्या नावाखाली कनिष्ठ मध्यमवर्गीयांमध्येही दारूचे व्यसन प्रतिष्ठा पावत आहे, निदान त्यासंबंधी पूर्वीएवढी लाज उरलेली नाही.

"आपण 'बिअर'देखील घेत नाही का?", "आपण झोपण्यापूर्वी एखादा पेग घ्याल तर आपली प्रकृती निश्चित सुधारेल." यांसारखी मुक्ताफळे सुशिक्षित, ब्राह्मण आणि मराठी कुटुंबांमध्ये ऐकू येऊ लागली आहेत. 'मनुष्य मिलिटरीत गेला म्हणजे तर त्याने दारू घेतलीच पाहिजे' अशी कल्पना काही लोक करून देत आहेत! छोटे कुटुंब, त्यात वडीलधारे मनुष्य नाही, स्वातंत्र्याच्या कल्पना वाढलेल्या आणि त्यातच दारूचा प्रवेश म्हटल्यावर त्या कुटुंबातील रात्रीचे दृश्य काय असेल याची सहजपणे कल्पना करता येईल. काही सुशिक्षित नवरे दारूतील अपरिहार्य अशी सोबत म्हणून शेजाऱ्यांना, मित्रांना आणि पुष्कळदा बायकोलाही मद्यपानाच्या बैठकीतील सहप्रवासी करीत आहेत.

या अर्धसंस्कृत नवऱ्यांची स्वातंत्र्यविषयक कल्पनादेखील अर्धवटच असते. आपण स्वतः खुळ्या रूढींतून मुक्त होणे एवढीच त्यांची स्वातंत्र्याची कल्पना नसते. आपल्या मुक्ततेच्या कल्पना बायकोवर लादणे, हे त्यांच्या स्वातंत्र्यकल्पनेच्या आड येत नाही! लग्न होऊन पहिल्याच खेपेला नांदायला आलेल्या सुंदर, कुलीन, सुशिक्षित, पंचविशीच्या घरात असलेल्या वधूला, तिच्या सौंदर्यकल्पना, शुभत्वकल्पना आणि स्वातंत्र्यकल्पना गुंडाळून ठेवायला लावून तिच्यावर 'बॉब'ची सक्ती करणारे अनेक महाभाग पाहाण्यात आहेत. वास्तविक, त्यांची वधू त्यांच्याइतकीच शिकलेली, कित्येकदा दोन-तीन पदव्या असलेली स्त्री असते. पण केवळ आपण 'नवरा' आहोत एवढ्याच हक्काच्या जोरावर हे महाभाग तिच्यावर 'बॉब'ची तरी सक्ती करतात, नाहीतर तिने नकार दिल्यास अन्य कारणांनी तिला छळू लागतात.

अनुक्रमणिका

या तथाकथित आधुनिक पतींच्या सुखाविषयीच्या कल्पना स्वातंत्र्याविषयीच्या कल्पनांइतक्याच हास्यापद असतात. एका अठ्ठावीस वर्षांच्या पदवीधर पत्नीला अशाच क्षुल्लक कारणावरून मारहाण करणाऱ्या पतीची सौख्यकल्पना तिच्या वडिलांच्या तोंडून मला ऐकायला सापडली. मारहाणीचा रिपोर्ट कानावर आल्यावर वडिलांनी आपल्या सुशिक्षित जामातांना जाब विचारला. त्यावर स्वतःला आधुनिक म्हणविणाऱ्या, पण स्वतःच्या प्रौढ सुशिक्षित पत्नीला झोपडपट्टीतल्या नवऱ्याप्रमाणे मारहाण करणाऱ्या त्या पतीने काय 'डिफेन्स' द्यावा? ''कसली तक्रार? तिला माझ्या घरी काय कमी आहे? तिला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य आहे. 'बॉब' करायला, 'लिप्स्टिक्' लावायला, 'स्लीव्हलेस'ला-सर्व काही करण्याला तिला स्वातंत्र्य आहे.''

हा स्वातंत्र्याचा जाहीरनामा जाहीर करण्याच्या दोनच दिवस आधी, या स्वातंत्र्यवादी पतीने पत्नीच्या डोक्यात कपबशी फेकून मारलेली होती. आधुनिक सुशिक्षित तरुण पत्नी 'मुकाट्याने मार खाते' असा याचा अर्थ नव्हे. जी जी उदाहरणे माझ्या कानावर आली त्या त्या उदाहरणांतील तरुण पत्नीने वेळप्रसंगी पतिराजांच्या श्रीमुखात उलट भडकावलेली होती. अन् हे प्रकार तीस-पस्तीस वर्षांपूर्वीही माझ्या ऐकिवात होते.

पण बायको अधूनमधून प्रतिकार करण्याइतकी धीट झाली, म्हणजे नवरा सुसंस्कृत झाला असा अर्थ नव्हे. नवराबायकोंत मतभेद होणे, दोघांनीही तापून बोलणे, किंबहुना मनस्ताप असह्य होऊन बायकोने चार दिवस माहेरी निघून जाणे, हे प्रकार आजच्या आप्तविहीन कुटुंबात घडले तर नवल नाही. पण आपल्यावर आजन्म अवलंबून असलेल्या तरुण स्त्रीच्या अंगावर हात टाकणे, यात पतीचाच अधःपात अधिक आहे.

'प्रसंगविशेषी परस्त्रीची अभिलाषा करणारा पती व तसे न करणारा परंतु स्वपत्नीला मारहाण करणारा पती, या दोहोंतील असंस्कृत नि खेडवळ पती कोणता?' असे मला विचारले तर, मी त्या मारहाण करणाऱ्याकडेच बोट करीन. शिक्षण वाढल्यानंतरही तरुण नवऱ्यांमध्ये काहीजण का होईनात, बायकोला मारहाण करण्याइतके खेडवळ आणि जंगली का निघावेत हा एक प्रश्नच आहे. स्त्री आणि पुरुष यांचे नाते केवळ प्रेमाचे किंवा कामविकाराचे आहे असे समजणे अज्ञानाचे होय.

स्त्री-पुरुषांत नैसर्गिक आकर्षण आहे. तसाच नैसर्गिक विरोध किंवा वैरभावही आहे. म्हणजेच स्त्री-पुरुष नाते हे 'लव्ह-हेट रिलेशनशिप'चे नाते आहे. आणि तारुण्य ही तर काही दृष्टींनी पशुत्वावस्थाच असते! त्या अवस्थेत कोणत्या तरी माणुसकीच्या प्रभावाची (sobering influence) आवश्यकता असते. समारंभपूर्वक लग्न, लग्नानंतर अनेक गौरवनिदर्शक सामाजिक समारंभ, वगैरे चालीरीतींचा उद्देश तरुण जोडप्यांत, विशेषतः तरुण पतींत लौकिकाची वा अब्रूची जाणीव वाढीला लागावी हाच आहे. घरात वडील माणसे असतील तर, त्यांच्या कौतुकाच्या शब्दांनी किंवा धाकाच्या बोलण्याने हेच मनुष्यत्ववर्धनाचे कार्य होत असते अथवा होत असे.

वडीलधाऱ्या आप्तांच्या उपस्थितीने तरुण जोडप्यांचा केवळ फायदाच होतो असे म्हणण्याचा भाबडेपणा आज तरी कोणी करील असे वाटत नाही. वडील माणसे हीदेखील माणसेच असल्याने, तरुण जोडप्यांच्या जीवनक्रमात त्यांच्या हातून पुष्कळदा अनिष्ट ढवळाढवळही होते. प्रत्यक्ष ढवळाढवळ आजच्या काळात झाली

नाही तरी, त्यांची- विशेषतः सासूची 'अदेखाई'ची नजर किंवा 'जेलसी' कुटुंबसौख्यात विष कालवू शकते. इथेही पुन्हा संमिश्र अशी 'लव्ह-हेट रिलेशनशिप'च अनुभवाला येते. सुनेचे कौतुकही होत असते आणि तिच्या चांगल्या गोष्टी पुष्कळदा अकारण वाईटही दिसत असतात. पण सासूपणाचे हे गैरफायदे पत्करूनही घरात कोणीतरी वृद्ध स्त्री असावी, निदान मूल सांभाळण्याकरिता तरी असावी, असे तरुण सुशिक्षित स्त्रियांना जाणवू लागले आहे.

लेकीचे किंवा सुनेचे बाळंतपण करण्याकरिता अमेरिकेत जाणाऱ्या वृद्ध स्त्रिया आज महाराष्ट्रात ठिकठिकाणी दिसू लागल्या आहेत. रागावून घर सोडून परगावी राहिलेल्या माताही नातवंडांकरता परत घरी येतात. इतके असून त्यांचा उपयोगही असतो आणि उपद्रवही होऊ शकतो. आणि मुख्य म्हणजे तरुण पतीला या वृद्ध आप्तांची लाज वाटली तरी भीती वाटतेच असे नाही. वृद्धांची उपस्थिती असूनही तरुण पती पत्नीशी रानटीपणाने वागू शकतो! यामुळेच पुष्कळदा तरुण पत्नीवर घर सोडण्याची पाळी येते. आणि अशिक्षित कुटुंबांतून तर 'पत्नी झोपली असता पतीने डोक्यात वरवंटा घालून तिचा खून केला' अशा वार्ता वृत्तपत्रांत येऊ लागतात!

म्हणजे यावर खरा उपाय वेगळाच आहे. स्त्री-सौख्यविषयक कित्येक लेखांत मी पूर्वीच म्हटले आहे की, स्त्रियांना सुखी करण्याचे इतर कोणतेही उपाय असले तरी, पुरुषांना सुसंस्कृत केल्याशिवाय स्त्रियांच्या सुखासंबंधी 'गॅरंटी' मिळणार नाही. मी 'सुसंस्कृत' हा शब्द वापरला आहे. नुसता सुशिक्षित हा शब्द वापरलेला नाही, याकडे मुद्दाम लक्ष वेधतो. पदवीधर झाल्यावरही किंबहुना परदेशयात्रा करून आल्यावरही 'नवरा' असंस्कृत राहू शकतो ही कटू वस्तुस्थिती लक्षात घेतल्यावर, पुरुषांना सुसंस्कृत करण्याचा मार्ग कोणता हा प्रश्न डोळ्यांपुढे उभा राहतो. अक्षरओळख, विविध वाचन, एकीहून अधिक भाषांचे ज्ञान आणि या सर्वांहून म्हणजे प्राचीन इतिहास आणि वाङ्मय यांचा परिचय, या सर्वांतून सुसंस्कार मिळत नाहीत असे नव्हे. निदान सुसंस्काराची साधने तरी हाती येतात.

पण सुसंस्कार म्हणजे नुसत्या पुस्तकी माहितींचे भांडार नव्हे. आचरण हा सुसंस्काराचा मुख्य पुरावा आहे आणि त्याबरोबरच सहृदयता हाही तितकाच प्रमुख पुरावा आहे. स्त्रीजातीविषयी आदर आणि कोमलभाव हे सुसंस्कृतपणाचे सर्वमान्य लक्षण आहे. स्त्रियांच्या 'लिबरेशन'ची चळवळ अनेक दृष्टींनी समर्थनीय आहे, किंबहुना आवश्यकही आहे; पण त्या चळवळीमुळे आधुनिक पुरुषांतील स्त्रीविषयक उरलासुरला कोमल भावही वाळून जाण्याचा मात्र धोका आहे! पण तो विचार तूर्त बाजूला सारला तरी, आधुनिक राहणीने आणि शिक्षणाने मनुष्याची सहृदयता वाढत आहे की कमी होत आहे? आज शास्त्रशुद्ध विचार आणि बुद्धिनिष्ठा यांवर इतका भर दिला जात आहे की, सहृदयतेचा बाजारभाव घटत तर नाहीना, अशी शंका येते!

पण हा प्रश्न इतका सीधा किंवा एकमुखी नाही. कधी कधी तर असे आढळून येते की, सहृदय आणि सुसंस्कृत नवरा आपल्या बायकोपुरताच हृदयशून्य आणि निष्ठुर बनलेला असतो! सासूची गोष्ट तर याहूनही गूढ आहे. ती मुलांची 'आई' असते, पण सुनांची मात्र सासू बनते! प्रख्यात तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती हे ''जीवन म्हणजे येथून तेथून 'रिलेशनशिप्'चा मामला आहे.'' अशा अर्थाचे प्रतिपादन अनंत वेळा करतात. मुलगी आईबापांच्या

घरातून परक्यांच्या घरी जाते : केवळ सवयीमुळे आपण ही एक साधी नित्याची गोष्ट मानतो, पण 'आई-बापांच्या घरातून सर्वस्वी अनोळखी घरात जाऊन पडणे' म्हणजे काय याची पुरुषांना कल्पनाही येणार नाही.

'राक्षसविवाह' या माझ्या कादंबरीत 'लग्न ही स्त्रियांच्या बाबतीत तरी एक शस्त्रक्रिया आहे' असे मी म्हटले होते. कै. खांडेकरांसारख्या संमेलनाध्यक्षांनाही ते मत विलक्षण वाटले होते. उलट, जुन्या बिचाऱ्या बाळबोध लोकांना मुलींच्या या विचित्र आणि दुःखद जीवनक्रमाची, सहृदयतेमुळेच थोडीफार कल्पना असल्यामळे, त्यांनी यावर 'बालविवाह' हा भाबडा उपाय शोधून काढला होता! अगदी लहानपणीच त्या परक्या घरी गेल्यास मुलींना ही शस्त्रक्रिया थोडीफार सोपी जाईल, अशी त्यात कल्पना होती. मन आणि शरीर टणक झाल्यावर, त्यांनी एक विशिष्ट वळण पक्के घेतल्यावर त्यांना दुसऱ्या तऱ्हेने वळविणे अधिक कष्टप्रद होते. (पहिली प्रसूती सोळा-अठराव्या आसपास झाली, म्हणजे 'सीझरिअन् ऑपरेशन'ची वेळ येत नाही त्यासारखाच या मानसिक 'ऑपरेशन'चा प्रकार आहे!)

पण बालविवाह हा तर सासरच्या छळणुकीवर मुळीच उपाय नव्हे, हे सनातनी लोकांनाही कळून चुकले आहे. जुन्या काळी नवरा आणि त्याच्या पदव्या पाहून देण्याची भाषा नसून 'घर' पाहून देण्याची भाषा असे. पण त्यातही काय पाहिले जात असे? तर फक्त बाह्यात्कारी बाळबोध वागणूक! पण बाह्यात्कारी 'टाय' लावणारा जसा अडाणी असू शकतो, तसेच गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घालणारे पुरुष आणि मोठे कुंकू लावणाऱ्या स्त्रिया याही 'अकुलीन' असू शकतात, याचा पदोपदी अनुभव येतो. म्हणजे मग 'मुलगी देताना' किंवा प्रौढ मुलीने 'स्वतःला देताना' पाह्यचे तरी काय? की आजच्या पाश्चात्य शिक्षणाच्या आणि अतिप्रौढ विवाहाच्या काळातही लग्न म्हणजे नशिबाचाच खेळ आहे?

म्हणजे, हा प्रश्न केवळ 'वर' किंवा 'घर' निवडण्याचा नसून, आपले विचार आणि संस्कृती सुधारण्याचा आहे. पूर्वी कुलीनता आणि धार्मिकता या दोन गोष्टी सांभाळल्या, की संस्कृती (कल्चर) वेगळी सांभाळायला नको, अशी समजूत होती. अर्थात् ती बरोबर होती असे नव्हे. आज मुलींना शिक्षण दिल्यानंतर आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व वाढल्यानंतर लग्न होत असल्याने, त्यांच्या वरांना आणखी थोडी संस्कृती व थोडी (चांगल्या अर्थाने) 'आधुनिकता' यांची जोड करून देणे आवश्यक झाले आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ रूढींना आणि वृद्ध आप्तांना धक्का देणे नव्हे! 'पतीने पत्नीचे व पत्नीने पतीचे मन ओळखणे' हा वैवाहिक संस्कृतीचा पहिला अवश्य भाग होय; स्त्रीदाक्षिण्य आणि गृह्यनीती हा दुसरा भाग होय. दुर्दैवाने आपल्या वाट्याला आलेली स्त्री आडमुठी किंवा असंस्कृत आहे असे आढळले तरी, तिच्या अंगावर हात टाकणे हे पतीच्या असंस्कृतपणाचे किंबहुना गुन्हेगार प्रवृत्तीचे लक्षण होय.

माझे हे विचार पत्करल्यास, आधुनिक स्त्रीलाही वैवाहिक जीवनासंबंधी वेगळा विचार करावा लागेल. पतीला ज्याप्रमामे पत्नी 'माझ्या कल्पनेप्रमाणेच असणार' असे गृहीत धरता येणार नाही, तसेच पत्नीलाही डोक्यावर अक्षता पडल्या की जन्माची तरतूद झाली, असे गृहीत धरता येणार नाही. आपली गाठ 'माणसा'शी पडली नसून जनावराशी पडली आहे असे दुर्दैवाने आढळून आल्यास, नुसता हाताने क्षणिक प्रतिकार करून भागणार नाही. सोशिकपणा, सौजन्य, देवाण-घेवाण यांनीही भागत नाही, असे आढळल्यावर घरातून बाहेर पडण्याचीही तयारी हवी. 'विवाह हा सुसंस्कृत संबंधच असला पाहिजे' हे सुशिक्षित स्त्रीचे ब्रीदवाक्य असले

पाहिजे. त्याहून विपरीत परिस्थितीत सापडली आहोत असे आढळल्यास, स्त्रियांची बाहेर पडण्याची व स्वावलंबनाची तयारी हवी.

तथापि, केवळ नोकरी करण्याची तयारी अथवा त्याकरता पदवी असणे म्हणजे स्वावलंबनाची तयारी नव्हे. कोणत्याही समाजात आप्तांच्या (मानसिक) आधाराशिवाय जगणे स्त्रियांना अवघड असते. याच अर्थाने मनुस्मृतीत मनूने 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असे म्हटले आहे. स्त्रियांना बंधन पाहिजे, बंदी पाहिजे असा त्या जगद्विख्यात समाजतत्त्ववेत्त्याच्या वचनाचा अर्थ नव्हता. आजच्या समाजात तर घराबाहेर पडणाऱ्या स्त्रीवर, आप्तांच्या अभावी निराधार जीवन जगण्याचाच प्रसंग आहे. या दृष्टीने स्त्रियांनी व त्यांना शिक्षण देणाऱ्या त्यांच्या आई-वडिलांनी शिक्षणाचा फेरविचार करणे जरूर आहे. आजचे कॉलेजशिक्षण प्रायः शोभेचे वा अलंकारवजा झालेले आहे. जीवन म्हणजे 'गंमत' किंवा 'पिक्निक्' नव्हे, हे जुन्या गृहशिक्षणात जितके लक्षात धरले जाई, तितके आजच्या पुस्तकी शिक्षणात लक्षात ठेवले जात नाही आणि त्या चुकीवर जणू कळस म्हणून लग्न म्हणजे एक आजन्म टिकणारा 'हनीमून' आहे, असे काही जोडपी आरंभी तरी गृहीत धरतात!

पण स्त्रियांनी वैवाहिक जीवनात कटू अनुभव आल्यावर स्वतंत्रपणे जगायचे म्हटल्यास, केवळ त्यांना स्वतःलाच नव्हे, तर सर्व समाजाला वेगळे शिक्षण द्यायला हवे. आपल्या आजच्या समाजाची एकट्या स्त्रीला आदराने वागविण्याची मानसिक तयारी नाही, या गोष्टीचाही स्वतंत्र जीवन जगणाऱ्या स्त्रीला विचार करावा लागेल. पण हा विषय स्वतंत्र आहे. जन्मभर रानटीपणाशी तडजोड करण्यापेक्षा, एकटेपणाचे धोके पत्करण्यालादेखील आधुनिक स्त्रीने तयार असले पाहिजे. तिच्या आप्तांनी, मित्रांनी व सल्लागारांनी अशा जगातही तिचे पाय मागे ओढता कामा नयेत. ही परिस्थिती लक्षात घेऊनच तिचे शिक्षण झाले पाहिजे.

स्त्री मासिक,
जुलै १९७८, पृ. ५५-५८.

अनुक्रमणिका

## ३४

# आजच्या स्त्रीचा 'डबल रोल'

प्रथमतः आपल्या संस्थेच्या हीरक महोत्सवानिमित्त मी प्रथम तिचे अभिनंदन करतो. अशा प्रसंगी साठ वर्षांपूर्वीच्या तिच्या आठवणी मनात येणे साहजिक आहे. पण त्यांचा केवळ उडता उल्लेख करून मी आजच्या स्त्री-जीवनातील एका महत्त्वाच्या प्रश्नावर लिहिणार आहे. तुमची शाळा प्रथम सदाशिव पेठ रस्त्यावरील फडतरे वाड्यात होती, त्या वेळचे तिचे स्वरूप मनात येते. तिच्या पहिल्या काही वर्षांतील वार्षिक संमेलनांचे फोटो जर तुम्ही पहाल तर, तुम्ही जणू जुन्या पुण्याचे चित्र पाहत आहात असे तुम्हांला वाटेल. त्यावेळच्या शाळकरी मुलीदेखील नऊवारी नेसलेल्या आणि अंबाडे बांधलेल्या अशा तुम्हांला दिसतील. आणखीही एक गोष्ट आठवते ती अशी की, त्यावेळच्या हायस्कूलच्या ५ व्या नि ६ व्या इयत्तेतील (आजच्या ९ व्या, १० व्या इयत्तेतील) मुलीदेखील आजच्या कॉलेजमधील मुलींच्याहूनही मोठ्या दिसत किंवा असत.

त्या वेळच्या व्यक्तींपैकी आज आठवणारी प्रमुख व्यक्ती म्हणजे प्रो. गो. म. ऊर्फ बापूसाहेब चिपळूणकर ही होय. त्यांचा स्वभाव त्यांच्या या आवडत्या संस्थेपुरता तरी स्वप्नाळू होता. त्यांच्या डोक्यात सदैव संस्थेसंबंधीचे नवे नवे उपक्रम खेळत असत. ते वृत्तीने अत्यंत सालस व काहीसे भाबडेदेखील होते. पुष्कळदा भोवतालचे लोक सालस अधिकाऱ्याचा गैरफायदा घेतात तसा त्यांचाही घेतला जाई, असे मला वाटते. सालस आणि काळजीखोर माणसांना बहुदा पोटातील अल्सरचा त्रास होतो. खाण्यापिण्याचीही आठवण न ठेवता कन्याशाळेकरता खपणाऱ्या या ध्येयवादी माणसाचा पोटाच्या याच विकाराने बळी घेतला, असे मला स्मरते. संस्थेच्या हीरक महोत्सवानिमित्त हा पुण्यात्मा स्वर्गातही प्रार्थना करील, अशी माझी भावना आहे.

पण आज मी आजच्या स्त्री-जीवनविषयक एका महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी चार शब्द लिहिणार आहे. अलीकडेच श्रीमती मृणाल गोरे आणि अहिल्याबाई रांगणेकर या पुण्यात आल्या असता, त्यांनी नोकरीच्या क्षेत्रात स्त्रियांना विषमतेची वागणूक मिळते यासंबंधी तक्रार केली. एखाद्या अधिकाराच्या जागेला स्त्रिया पात्र असूनही त्यांना डावलले जाते अशी त्यांची तक्रार होती. स्त्रिया पुरुषांपेक्षा बुद्धिमत्तेत अथवा कर्तबगारीत यत्किंचितही कमी नाहीत ही गोष्ट आता वादविवादाच्या पलीकडे गेली आहे. पण पात्रतेत त्या पुरुषांच्या बरोबरीच्या असल्या तरी, त्यांनी पुरुषांचीच सर्व कामे करावीत किंबहुना पोषाख, केशभूषा यांतदेखील पुरुषसदृश व्हावे ही भूमिका मान्य होण्यासारखी नाही. कारण बौद्धिक पात्रता आणि अधिकार-पात्रता पुरुषांच्या बरोबरीची असली तरी, स्त्रियांचे निसर्गदत्त जीवन पुरुषांच्यापेक्षा वेगळे आहे हे विसरता येत नाही.

पण आज नेमके हेच विसरले जात आहे-दुःखाची गोष्ट म्हणजे समतावादी स्त्रियाच नेमके हे विसरत आहेत व त्यामुळे स्त्रियांचीच कुत्तरओढ होत आहे. समतेचा हट्ट जेव्हा विसरतात तेव्हा स्त्रियाही आपली होणारी ओढाताण स्वतःशी तरी कबूल करतात. जबाबदारीच्या आणि अधिकाराच्या जागेवर स्त्रियांची नेमणूक झाल्यास, स्त्रिया आपली जबाबदारी पुरुषाहूनही अधिक सुबकपणे व समर्थपणे पेलून दाखवतात हे खरे! पण स्त्रीजीवनातील खास जबाबदाऱ्या आणि खास दौर्बल्ये (disabilities) त्यांचा पिच्छा सोडीत नसल्याने आपले होणारे हाल त्यांना मुकाट्याने सहन करावे लागतात. गरोदरपण, बाळंतपण, अपत्यसंगोपन या नुसत्या

जबाबदाऱ्या नव्हेत, तर अत्यंत नाजूक जबाबदाऱ्या आहेत. त्या मागच्या सुटत नसतानाही मोठाल्या जबाबदाऱ्यांकरता सभांतून आणि कायदेमंडळातून झगडणे त्यांना अंती सुखावह होईल की नाही याची शंकाच आहे. घरी लहान मूल ठेवून नोकरीत वरिष्ठांना तोंड देणाऱ्या आणि शिवाय घरी नवऱ्याच्या अधिकाराला जपणाऱ्या स्त्रियांची केवढी ओढाताण होत असते, याची आजच्या समाजाला रोजजीच जाणीव आहे. मासिक पाळीच्या वेळी लूनावरून किंवा मोपेडवरून आठ-दहा मैलांवरच्या ऑफिसला जाणे ही साधी गोष्टदेखील आरोग्यदृष्ट्या किती तापदायक होते व बोलून दाखवण्यास किती अडचणीची असते, हे नोकरी करणाऱ्या स्त्रियांना चांगले माहीत आहे. झाशीच्या राणीच्या काळात झाशीस गेलेल्या सुप्रसिद्ध गोडसे भटजींनी या संदर्भातील एक ऐतिहासिक हकीकत आपल्या आत्मचरित्रात निर्भीडपणे नमूद केली आहे. झाशीच्या किल्ल्यावर इंग्रजी फौजेच्या तोफांचा मारा होत असता शत्रूची फळी फोडून ग्वाल्हेरकडे निघून जाण्याचे जेव्हा विख्यात राणी लक्ष्मीबाई यांनी ठरविले तेव्हाचा प्रसंग. पाठीला दत्तक मुलगा बांधून हातात तलवार घेऊन घोडा फेकणे हे तर त्या प्रतिरणचंडीला अगदी सहज होते. पण त्याच वेळी मासिक पाळीचा शरीरधर्म बिचारीच्या वाट्याला आला. त्यातूनही तिने जे करायचे ते केलेच! पण तिच्या मनाला झालेल्या क्लेशांचे वर्णन गोडसे भटजीने मोठे हृदयद्रावक केले आहे. केवळ २२ वर्षांची ती शूर राणी म्हणजे आजच्या एम.ए.च्या वर्गांत असलेल्या मुलींच्या एवढी होती. ती जरी पठाणी पोषाख करून दरबारात बसत असे तरी, ती वृत्तीने व वर्तनाने कमालीची कर्मठ होती. ऐन फळी फोडण्याच्या क्षणी समोर ही नैसर्गिक आपत्ती उभी राहिल्यावर त्याचा तिच्यावर मानसिक परिणामही झाला. "मला रांडराला कुणी हा उद्योग सांगितला होता?" असा उद्‌गार तिने काढल्याचे नमूद आहे. ऐन संकटाच्या आणि वीरश्रीच्या क्षणी मनात असे विरक्तीचे विचार येणे किती धोक्याचे आहे ते सांगायला नकोच. इथे प्रश्न राणीच्या पात्रतेचा आणि शौर्याचा नसून, स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेल्या वैगुण्यांचा (disabilities चा) आहे. अशा स्थितीत, नोकरीच्या क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीकरिता भांडणे म्हणजे हालअपेष्टा मुद्दाम मागून घेणे होय. पण दुर्दैवाने स्पर्धेच्या नादाने समतावादी स्त्रिया ही चूक करीत आहेत.

पण हा प्रश्न स्त्री विरुद्ध पुरुष असा आहे असे समजण्याची आणखी एक चूक आजकाल होत असते. वस्तुतः स्त्रियांची ओढाताण होणे म्हणजे संपूर्ण संसाराचीच ओढाताण होणार असल्याने, त्यात पुरुषांची आणि मुलांचीही ओढाताण आलीच. म्हणून हा प्रश्न केवळ स्त्रियांचा नसून संपूर्ण समाजाच्या स्वास्थ्याचा आहे. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीची कामे करून शकतात की नाही हा प्रश्न नसून, समाजहिताच्या दृष्टीने त्यांनी ती करावीत की नाही हा मुख्य प्रश्न आहे. मग आजच्या स्त्रीशिक्षणाच्या आणि शहरी सुधारणांच्या काळात स्त्रियांनी काय केवळ चूल, मूल आणि फिरत्या लायब्ररीतून येणारी मासिके एवढ्यावरच काळ कंठावा की काय? या प्रश्नांचा विचार अगदी वेगळ्या भूमिकेवरून करायला हवा, ज्या नोकऱ्या-ज्या स्वरूपाच्या नोकऱ्या पुरुष करतात त्याच स्त्रियांना करायला लावणे हे सामाजिक कल्पनादारिद्रय होय. ज्यांना दुर्दैवाने घर चालविण्याचीच पाळी आली आहे त्यांनी वाटल्यास पुरुषांप्रमाणे पूर्ण वेळ नोकऱ्या (full time services) कराव्यात, पण इतर स्त्रियांकरता अर्धवेळ नोकऱ्या, घरी आणून करण्यासारखी कामे, वगैरे वेगळ्या प्रकारच्या योजना या पुढारी स्त्रिया डोक्यात का आणीत नाहीत हे मला समजत नाही.

पण एक गोष्ट मात्र होता उपयोगी नाही. स्त्रियांनी कमी वेळाची व कमी जबाबदारीची कामे पत्करली की लगेच पुरुषाने आपल्या मूळ वळणावर जाऊन त्या आपल्यापेक्षा कमी आहेत असे मानून, "हं, बोलून चालून

बायकाच" असे म्हणण्याचा मूर्खपणा करू नये. कारण पुरुषाच्या या मूर्खपणामुळेच स्वतःचे हाल सोसूनही पुरुषांची बरोबरी करण्याची धडपड स्त्रियांनी चालू केली! वास्तविक चांगले, स्वच्छ व सकस अन्न मुलांबाळांच्या आणि नवऱ्याच्या पोटात घालणे ही गोष्ट ऑफिसात खर्डेघाशी करून महिन्याकाठी पगार घरी आणण्यापेक्षा कुठल्याही प्रकारे कमी दर्जाची नाही. प्रेमाने, सौजन्याने आणि संतोषाने मुलांची निगा राखणे, नवऱ्याच्या मनाला स्वास्थ्य देणे हे काम तर पुरुषांच्या कोणत्याही कामापेक्षा अधिक महत्वाचे आणि अधिक अवघड आहे. पण म्हणून आम्ही पुरुषांनी स्त्रियांना कमी लेखण्याचे आपले सनातन व्रत सोडले आहे म्हणता की काय? म्हणजे मूळ चूक कामाच्या मूल्यमापनातच होत आहे. एका ग्रीक ट्रॅजिडीतील नायिका पुरुषाला म्हणते, "जीव धोक्यात घालून अपत्याला जन्म देणाऱ्या आम्ही स्त्रिया रणांगणावर मृत्यूला सामोरे जाणाऱ्या पुरुषांइतक्याच शूर असतो, हे तुम्ही पुरुष विसरता!" (युरिपायडिस).

स्त्रियांच्या जीवनाचा आणि स्त्रिया स्त्री म्हणून करीत असलेल्या कामांचा असा विचार करण्याऐवजी पाश्चात्य देशांतील 'लिब्' चळवळीच्या अनुकरणाने आणि बॅकवर्ड क्लासच्या लोकांच्या वळणावर नोकरीत बरोबरीचे हक्क आणि बरोबरीची शेकडेवारी मागण्याची अवदसा स्त्रियांच्या या शहाण्यासुरत्या पुढारणींना का आठवावी?

श्री. ना. दा. ठाकरसी कन्याशाळा<br>
हीरक महोत्सव अंक, पृ. २-३.<br>
तारका, अंक ५६ वा,<br>
१४ ऑक्टोबर १९७८.

अनुक्रमणिका

## ३५

# स्त्रियांचे रक्षण : नागरिक अवनती कशी जाईल?

तारीख १० नोव्हेंबरच्या 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध देशसेविका श्रीमती प्रेमा कंटक यांनी 'पक्षपाताविरुद्ध महिला बंड का करीत नाहीत?' हा लेख लिहिला आहे. त्यात स्त्रियांसंबंधीचे कायदे, स्त्रियांचे आरोग्य, इत्यादीसंबंधी आकड्यांसह तक्रार नोंदविली आहे. त्या लेखातील माहिती साधार व बहुमोल असून, लेखाच्या शेवटी स्त्रियांवर होणाऱ्या सर्व परिचित अन्यायांसंबंधी अत्यंत तीव्र शब्दांत निषेध केला आहे. त्या शेवटच्या भागासंबंधीच आणखी लिहिणे जरूर आहे. स्त्रियांचा अवमान करणे किंवा त्यांच्या अंगावर हात टाकणे हे कृत्य शौर्याचे नसून हीन मनोवृत्तीचे आहे, ही गोष्ट सर्वमान्य आहे. आपल्या देशात सार्वजनिक ठिकाणी व सार्वजनिक समारंभांत स्त्रियांना आदराने वागविण्याचीच परंपरा आहे. मातेविषयीचा आदर तर या देशात पूर्वी पराकोटीला गेला होता. पण गेल्या आठ-दहा वर्षांत व विशेषतः गेल्या पाच वर्षांत स्त्रियांसंबंधीचे गुन्हे वृत्तपत्रांत प्रामुख्याने आलेले दिसतात. दागिन्यांकरिता खून, कामुक संबंधामुळे खून, कौटुंबिक कलहामुळेही खून ही या गुन्ह्यांची विविध रूपे असतात. त्यांतील सर्वच गुन्हेगार सापडतात असे नव्हे आणि सापडले तरी पुरावा मिळविण्यास पोलिसांना फारच प्रयास पडतात. गुन्ह्यांच्या संख्येकडे पाहता, आपल्या समाजात हे प्रकरण नवीनच वाढत आहे असे दिसते.

पण पोलिसांनादेखील न आवरणारे हे गुन्हे वास्तविक त्यांना आवरण्यासारखे असतात. नागरिकांनीही हस्तक्षेप करण्यासारखे अनेक गर्ह्य प्रकार आजच्या सुधारलेल्या शहरी वस्तीत घडतात, याचा निर्देश अनेक वेळा वृत्तपत्रांतून होतो व श्रीमती प्रेमा कंटक यांनीही केला आहे. रस्त्याच्या गर्दीत स्त्रियांशी असभ्य वर्तन करणे हा प्रकार बाह्यतः किरकोळ वाटला तरी, स्त्रियांना मनस्ताप देणारा व अखेर समाजाला लांच्छनास्पद आहे. आजकाल मुंबईपेक्षाही दिल्लीत हे घृणास्पद प्रकार अधिक वाढलेले आहेत, असे दिसून येईल. श्रीमती कंटक यांचेप्रमाणे अनेकांनी 'स्त्रियांनीच समर्थ होणे' हा यावर इलाज सुचविला आहे. मधूनमधून स्त्रियांनी खंजीर बाळगावेत अशीही सूचना ऐकू येते!

स्वसंरक्षणार्थ स्त्रियांनी काहीही केले तरी ते योग्यच होईल. सैरंध्रीशी (द्रौपदीशी) विराटाच्या दरबारातील कीचक अतिप्रसंग करू लागला तेव्हा, द्रौपदीने त्याला लाथ मारून खाली पाडले असे महाभारतात वर्णन आहे. पण अशा झटापटीत स्त्री नेहमीच जिंकेल असे समजता येणार नाही आणि निर्लज्ज मवाल्याला, स्त्रीकडून धक्काबुक्की होण्यातही कदाचित् आपला हेतू सफल झाल्यासारखे वाटेल! प्रतिकारशून्य स्त्रीपेक्षा प्रतिकारक्षम स्त्रीला असभ्य माणूस अधिक वचकेल हे मात्र खरे.

पण सार्वजनिक ठिकाणी स्त्रीचे विनयरक्षण करणे हे पुरुषांचेच काम आहे, याची सर्व जबाबदार पुरुषांस जाणीव असते. पण आजकाल रस्त्यातील गर्दीत किंवा बसमध्ये स्त्रियांशी कोणी असभ्य वर्तन केले तर, त्या असभ्य पुरुषाला शासन करण्याला भोवतालचे लोक पुढे होत नाहीत. ही सामाजिक अथवा नागरिक अवनती होय. पोलीसही अशा असभ्य वर्तनाकडे कानाडोळा करीत असतील तर, त्याला कारण भोवतालच्या नागरिकांची आपल्याला मदत मिळणार नाही, ही जाणीवच होय. ज्या समाजात स्त्रियांच्या विनयरक्षणार्थ पुरुष

पुढे येत नाहीत तो समाज जिवंत आहे, असे म्हणता येणार नाही. स्त्रियांनी केवळ स्वसंरक्षणावर अवलंबून राहावे असे म्हणणे हा आपद्धर्मच होय.

या बाबतीत प्रेमाबाईंसारख्या सन्मान्य आणि पोक्त स्त्रियांनी आजच्या मुलींना वा स्त्रियांनाही काही सांगण्यासारखे आहे. स्त्रियांचा पोषाख विनयदर्शक आणि विनयरक्षक असेल तरच विनयभंगाच्या तक्रारीला अधिक जोर येईल. अलीकडे तीस-चाळीस वर्षांत स्त्रियांचा पोषाख विनयभंगाला अधिकाधिक आवाहन करणारा होत आहे. तो सौंदर्यवर्धक आहे की नाही, हा प्रश्न गौण आहे. तो सौंदर्यवर्धकही नाही, तर केवळ निर्बुद्ध अनुकरणपंथी आहे, असेही म्हणता येईल. पण स्त्रियांचा पोषाख कसाही असला तरी त्यामुळे पुरुषांचे असभ्य वर्तन समर्थनीय ठरते असे नव्हे.

मला आश्चर्य वाटते ते दुसऱ्याच एका गोष्टीचे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सेवादल, होमगार्ड्स इत्यादी अनेक निमलष्करी संघटना देशात असून सभ्यतेचे आणि लज्जेचे रक्षण करण्याचे प्रसंग आले म्हणजे यांतील कोणीच कसे पुढे येत नाहीत? गणपती उत्सवाचे वेळी रात्री-बेरात्री स्त्रियांचे जथे बोळाबोळांतून फिरू लागले व त्यांच्याच मागोमाग उनाड तरुणांचे तांडे फिरू लागले, म्हणजे वर्षातून एकदा आमच्या सरकारला जाग येते व खटले भरले जातात!

या देशात अनेक ठिकाणी स्त्रियांनी मुख्य मंत्रिपद भूषविले आहे व एका स्त्रीने अकरा वर्षे या प्रचंड देशाचा कारभार चालविला होता याचा श्रीमती प्रेमा कंटक यांनी निर्देश केला आहे. ही गोष्ट अर्थात्‌च स्त्रियांची कर्तबगारी दाखविणारी आहे. इंग्रजी विद्येचे 'वाघिणीचे दूध' मिळू लागण्यापूर्वीही या देशातील स्त्रियांनी ही कर्तबगारी दाखविलेली आहे. सुलताना रझिया, अहल्याबाई, लक्ष्मीबाई यांनी राज्यकारभारातील कर्तबगारी दाखविली आहे. पण इंदिराबाईंच्या कारकिर्दीतच पूर्व बंगालमध्ये हजारो स्त्रियांवर पाकिस्तानी लष्कराने बलात्कार केले. हा प्रश्न निदान आंतरराष्ट्रीय संघटनेपुढे नेण्यासारखा होता. या स्त्रियांत मुसलमान स्त्रियांइतक्याच हिंदू स्त्रिया होत्या. त्यांच्यावरील अन्यायाची दखल आंतरराष्ट्रीय संघटनेनेच नव्हे तर या देशातील कर्तबगार पंतप्रधान इंदिरा गांधी यांनीही घ्यायला हवी होती. एक लाख पूर्व पाकिस्तानी युद्धकैदी पोसण्याची जबाबदारी मात्र त्यांना दिसली. पण पाकिस्तान झाल्यामुळे ज्यांना त्राता उरला नाही त्या पूर्व बंगालमधील हिंदू स्त्रियांवरील जुलमाची विचारपूस हिंदुस्थानच्या स्त्री-पंतप्रधानांनी केल्याचे नमूद नाही. पक्षपाताविरुद्ध 'स्त्रियांनी बंड करावे' असे त्यावेळी कॉंग्रेसमधील स्त्रियाही म्हणाल्या नाहीत की महिला मंडळाच्या स्त्रियाही म्हणाल्या नाहीत

श्रीमती कंटक यांच्या लेखातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हुंड्याचा होय. या खेदजनक विषयावर गेल्या साठ वर्षांत इतके त्वेषयुक्त लिखाण झाले आहे व प्रतिज्ञा झाल्या आहेत की, त्यावर लेखन करणे आता लेखकांनाच निष्फळ वाटू लागले आहे. वराचा बाजार मांडणारी ही चाल लेखांनी आणि व्याख्यानांनी बदलणार नाही, हेच यावरून सिद्ध होते. मनुष्याच्या लोभीपणात आणि वधू-वरांच्या परावलंबित्वात याचे मूळ आहे. मला तर कधी कधी असे वाटते की, ज्यांच्यावर आई-बापांचा ताबा नाही असे नवरदेव, स्वतंत्रपणे ठरविलेल्या विवाहात, किंबहुना प्रेमविवाहातही आपल्या भावी वधूकडून हुंडा वसूल करतील. या बाबतीत प्रेमाबाईंनी सूचित केलेला मार्गच तेवढा परिणाम करू शकेल. सुशिक्षित उपवर मुलींनी

स्वतःचा लिलाव पुकारणाऱ्या वराशी विवाह करायचा नाही अशी प्रतिज्ञा करून लोभी वराला आणि वरपित्याला लाज आणावी. माझ्या जवळच्या आप्तांपैकी एका मुलीने तिचे वडील योग्य वेळी तिच्याकरिता स्थळे पाहू लागले तेव्हा जी प्रतिज्ञा केली (व तडीला नेली) ती प्रत्येक प्रौढ मुलीने करण्यासारखी आहे. तिने आपल्या वडिलांना सांगितले, "तुम्ही स्थळे पाहात आहात, पण प्रत्यक्ष लग्न ठरविताना पैसे देण्याघेण्याची भाषा निघाली तर, मी लग्नाला उभी राहणार नाही" अर्थात् मुलगी सुशिक्षित होती. पोस्ट-ग्रॅज्युएट कॉलेजमध्ये शिकविणारी होती व तिने ही प्रतिज्ञा करून योग्य स्थळ मिळवून दाखविले. अर्थात् मुलींनी एवढा धोका पत्करण्यापेक्षा आजकालच्या सुशिक्षित वरांनी आपण स्वतःची विक्री करून घेणार नाही असे ठरविणे अधिक सोपे व सोईस्कर आहे.

सकाळ,<br>२९ नोव्हेंबर १९७९, पृ. ४.

अनुक्रमणिका

# स्त्रियांवरील अत्याचाराचे गुन्हे

स्त्रियांवर होणाऱ्या बलात्कारांसंबंधी व कोर्टात लागणाऱ्या त्यांच्या निकालांसंबंधी गेल्या काही आठवड्यांत बराच जाहीर गवगवा झालेला आहे. मी स्वतः या संबंधात गेली दोन-तीन वर्षे तरी लिहीत आहे. स्त्रियांवरील सामुदायिक अत्याचारांचा गवगवा वर्तमानपत्रांतून होतोच. वैयक्तिक गुन्ह्यात वृत्तदृष्ट्या काही चमचमीतपणा असेल तर गवगवा होतो. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी गाजलेल्या लोटलीकर खून खटल्याचा गवगवा बराच झाला. त्या गुन्ह्याचे वैशिष्ट्य असे की, कुमारी लोटलीकर या सुस्वरूप आणि सधन स्त्रीवर ती एस.टी.ने प्रवास करीत असता प्रतिष्ठित गुंडांनी डोळा ठेवून व एकमेकांना साहाय्य करून अत्याचार तर केलाच, पण शिवाय बोभाटा होऊ नये म्हणून त्या तरुणीचा जीवही घेतला. असे अनेक गुन्हे गेल्या पाच वर्षांत वृत्तपत्रांत आलेले आढळतील. या लज्जास्पद परिस्थितीने संपप्त होऊन गेल्या रविवारी एक सार्वजनिक सभाही घेण्यात आली. त्या सभेने कायद्यातील दोषांवर बोट ठेवले. आपल्याकडील खुनासंबंधीचे व बलात्कारासंबंधीचे कायदे ब्रिटिश कायद्याच्या नमुन्यावर केलेले आहेत. दहा गुन्हेगार सुटले तरी हरकत नाही, पण एक निरपराध मनुष्य चुकीने दंडिला जाऊ नये, असे ब्रिटिश कायद्याचे तत्त्व आहे. शिवाय गुन्हेगारी सिद्ध करण्याची जबाबदारी फिर्यादी पक्षावर किंवा सरकारवर येते. त्यामुळेही गुन्हेगाराला सुरक्षिततेचे कवच मिळते.

याउलट फ्रान्समध्ये गुन्हेगारावरच आपले निरपराधित्व सिद्ध करण्याची जबाबदारी पडते, असे कळते. ते काहीही असो, आजच्या कायद्याने गुन्हेगारांना सुटून जाणे सुलभ होते, अशी तक्रार परवाच्या सभेत व त्यासुमाराच्या लेखनात केलेली आढळते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, आजचा कायदा पुरुषांनी केलेला व पुरुष-पक्षपाती आहे, म्हणून पुरुष गुन्हेगार सुटतात, असाही सूर परवाच्या लेखनात व भाषणात आढळतो. हा सूर साधार असो की निराधार असो, बलात्काराचा गुन्हा कोर्टात सिद्ध करणे तितकेसे सोपे नसते, ही गोष्ट खरी आहे. यावर एक तोडगा सुचविता येईल. प्रत्यक्ष बलात्काराचा आरोप गुन्हेगारावर न ठेवता विनयभंग आणि कामुक हेतूने स्त्रीवर हल्ला हे आरोप गुन्हेगारावर ठेवल्यास ते सिद्ध करणे सोपे जाईल व सिद्ध करताना फिर्यादी स्त्रीस लज्जास्पद प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रसंग येणार नाही. परवाच एका लेखिकेने यासंबंधात मार्मिक उदाहरणे दिली आहेत. जर फिर्यादी स्त्रीच्या अंगावर झटापटीत होणाऱ्या जखमांच्या खुणा नसतील तर, ती स्त्री खुशीने वश झाली, असे गृहीत धरून गुन्हेगार सुटल्याची उदाहरणे आहेत. याच्याही पुढे जाऊन काही हास्यास्पद प्रश्न स्त्रीला 'नामांकित' वकिलांनी विचारल्याच्या हकीकती ऐकू येतील. या सर्व प्रकारांत केवळ कायद्याच्या शब्दांवर विसंबून पळवाट काढण्याची प्रवृत्ती दिसून येईल.

काही आठवड्यांपूर्वी एका प्रतिष्ठित आणि पोक्त स्त्रीने स्त्रियांवरील अत्याचार टाळण्याकरिता स्त्रियांनी शस्त्रे बाळगावीत, असा जाहीर सल्ला दिला होता. या सर्व चर्चेत आणि जाहीर सल्ल्यात स्त्रियांसंबंधीचे गुन्हे ही केवळ स्त्रियांची बाब आहे अशी भूमिका दिसते, ही खेदाची गोष्ट होय. जिची अब्रू घेतली गेली किंवा निदान जिचा विनयभंग झाला ती 'स्त्री' असते हे खरे, पण ती कोणातरी पुरुषाची बहीण, कन्या किंबहुना पत्नी असते हेही विसरता येत नाही. म्हणजे ही विटंबना केवळ स्त्रीची नसून पुरुष जातीचीही आहे. ज्या समाजात स्त्रीची बेअब्रू केल्यावर पुरुषवर्ग खवळून उठत नाही त्या समाजात खरे पुरुषच नाहीत, असे म्हणावे लागेल. जवळ

चाकू किंवा सुरा बाळगून स्त्रिया पुष्कळदा स्वतःचे रक्षण करू शकतील. त्यात स्त्रीची अब्रू बचावेल, पण पुरुषांची अब्रू जाईल, हे विसरता येत नाही. तसेच स्त्रीसंबंधीच्या गुन्ह्यांच्या तपासात जर तपास करणारे पोलीस पैसे खाऊन किंवा अन्य फायद्याकरिता गुन्हेगाराला संरक्षण देत असतील तर, तीदेखील समग्र समाजाला लाज आणणारी गोष्ट म्हटली पाहिजे.

गेल्या काही वर्षांत विचारी माणसाला जर कोणती गोष्ट अस्वस्थ करीत असेल, तर ती म्हणजे या देशात स्त्रीची अब्रू आणि नागरिकांचे प्राण या गोष्टी पूर्वी नव्हत्या इतक्या सवंग झाल्या आहेत. याला सरकारचा गलथानपणा एवढेच कारण नसून, सर्वसामान्य नागरिकाचा नेभळेपणा व मनाचा बोथटपणा हेही कारण आहे. याला काही पुरोगामी संस्था 'स्त्री विरुद्ध पुरुष' असे स्वरूप देत आहेत, ही दुर्दैवाची व अडाणीपणाची गोष्ट आहे. तसेच 'प्रस्थापित वर्ग विरुद्ध इतर' असेही स्वरूप दिलेले आढळते. प्रस्थापित वर्ग म्हणजे जर सधन वर्ग असा अर्थ असेल तर, सधन वर्गाला गुन्हे पचविणे नेहमीच सोपे जाते, ही गोष्ट खोटी नाही. पण स्त्रियांविरुद्धच्या गुन्ह्यांच्या बाबतीत प्रस्थापित वर्ग आणि पुरुष-पक्षपाती कायदा या कारणांपेक्षा समाजाचा नैतिक बोथटपणा हे कारण अधिक तीव्रतेने मनात यावयास हवे. ज्या समाजात माणसाचा जीव घेणे किंवा स्त्रीची अब्रू घेणे ही गोष्ट मामुली समजली जाते त्या समाजाचा पूर्ण अधःपात झाला आहे असे समजले पाहिजे. आजची वर्तमानपत्रे उघडली तर, प्रत्येक आठवड्यात निदान दहा तरी माणसांचा जीव बेजबाबदार वाहतुकीने घेतला आहे असे दिसून येईल. दारू पिऊन वाहन हाकल्याने किंवा गर्दीच्या रस्त्यात गाडी पुढे काढण्यामुळे जर बिचाऱ्या एखाद्या माणसाचा जीव गेला तर, त्याला आजचा कायदा नुकसानभरपाईही देत नाही. म्हणजे त्याने स्वतः अपंग स्थितीत अथवा त्याच्या नातेवाइकांनी त्याचा जीव गेल्यावर कोर्ट-कचेऱ्यांची यातायात केली तर, एखादे वेळी त्याच्या जिवाचे मोल दहा-पाच हजार होऊ शकते. पण ज्याचा जीव गेला किंवा हातपाय मोडले त्याने पुन्हा कोर्ट-कचेऱ्या कराव्या अशी अपेक्षा करणाऱ्या कायद्याला 'कायदा' म्हणता येईल की नाही याची शंकाच आहे. ज्याच्या शरीराची किंवा जीवाची हानी झाली, त्याला इतर कोणत्याही पुराव्याची किंवा फिर्यादीची वाट न पाहता कमीत कमी वीस हजार रुपये नुकसानभरपाई मिळण्याची कायद्यात तरतूद असेल तर, आजचे (दारू पिऊन किंवा दारू न पिता) बेहोष झालेले ड्रायव्हर लोक एक दिवसात शुद्धीवर येतील! ही नुकसानभरपाई अर्थात् वाहनाच्या मालकाकडून वसूल केली जावी.

तशीच गोष्ट स्त्रियांसंबंधीच्या गुन्ह्यांची होय अशा गुन्ह्यांकडे आजचा कायदा पाहतो त्यापेक्षा अधिक गंभीरपणे पाहिले तरच तो सुधारलेला कायदा म्हणता येईल. आजच्या कायद्याप्रमाणे ज्या स्त्रीची गुंडांनी बेअब्रू केलेली असते, तिची पुन्हा कोर्टातील कार्यपद्धतीमुळे कोर्टातही बेअब्रू होते. त्याहून लज्जास्पद गोष्ट म्हणजे विनयभंगामुळे नाइलाजाने कोर्टाची पायरी चढलेली स्त्री आणि विनयभंगाचा गुन्हा पचविण्याकरिता कोर्टात खटला लढविणारा गुंड दोघांनाही कोर्टात सारख्याच दर्जाने वागविले जाते. अशा परिस्थितीमुळे अपघाती मृत्यूच्या बाबतीत काय, किंवा बलात्काराच्या बाबतीत काय, झाली एवढी विटंबना बस झाली, असे म्हणण्याकडेच त्या दुर्दैवी जीवांचा कल असतो.

यावर इलाज म्हणजे अशा बाबतीत संपूर्ण समाजाला चीड असणे हा होय. बेहोषपणाने जीव घेणारे ड्रायव्हर आणि बेफामपणाने समाजातील आया-बहिणींच्या अब्रूला हात घालणारे नरपशू यांना सभ्य समाजात जगणे अवघड वाटले पाहिजे, तरच त्या समाजाला सभ्य समाज म्हणता येईल. पण समाजाने कायदा हातात

घ्यावा अशी अपेक्षा करणे अधिक रास्त होईल. एका बाबतीत तरी पाकिस्तान आज भारताच्या पुढे गेला आहे असे म्हणावेसे वाटते. ती बाब म्हणजे गुन्हेगाराला जाहीरपणे फटके मारणे! शिवाजीमहाराजांच्या काळात अशा गुन्ह्यांना हात-पाय तोडणे, डोळे काढणे अशा शिक्षा असत. तुरुंग म्हणजे एक 'रेफर्मेटरी' आहे ही बावळट पाश्चात्य कल्पना त्या काळच्या महाराष्ट्रात मान्य समजली जात नव्हती.

यासंबंधात झालेल्या जाहीर चर्चांत 'कायदा प्रस्थापितांच्या बाजूचा आहे' असेही उद्‌गार परवा कायदेपंडितांनी काढल्याचे प्रसिद्ध झाले आहे. 'प्रस्थापित' हा शब्द अलीकडे इंग्लंड-अमेरिकेतील establishment या शब्दाच्या संदर्भात वापरला जातो. 'प्रस्थापित' म्हणजे 'सधन' असा घ्यायचा, की 'सरकारात हात पोहोचलेले' असा अर्थ घ्यायचा? 'सधन' असा अर्थ घेतला तर, पुष्कळदा ज्यांच्यावर बलात्कार झाला त्या स्त्रिया ज्यांनी बलात्कार केला त्या पुरुषांपेक्षा सधन असलेल्या दिसतात. कु. लोटलीकरसारख्या स्त्रिया निर्धन म्हणता येणार नाहीत. अशा स्थितीत 'प्रस्थापित विरुद्ध निर्धन' आणि 'स्त्री विरुद्ध पुरुष' असले फरक करणे म्हणजे समाजाच्या खऱ्या रोगाकडून भलतीकडेच दुर्बीण लावणे होय.

पण या सर्वांपेक्षा समाजात स्त्रीविषयक गुन्ह्यांसंबंधीची चीड आज आहे त्याहून शतपटींनी अधिक हवी. ही चीड फक्त स्त्रियांना वाटायला हवी, अशी काही लोकांची समजूत दिसते. पण स्त्रियांपेक्षाही पुरुषांना स्त्रियांवरील अत्याचारांसंबंधी चीड वाटायला हवी, तरच त्या पुरुषांना 'पुरुष' हे नाव शोभेल.

केसरी, रविवार पुरवणी,
१६ मार्च १९८०, पृ. ७ व ९.

अनुक्रमणिका

## बलात्काराची सामाजिक आणि मानसिक मीमांस

'रेप्'या शब्दाला कायद्यात एक विशिष्ट अर्थ आला आहे. पण मुळात हिंदी आणि मराठीमध्ये 'बळजबरी' या शब्दाचा अर्थ अधिक व्यापक आणि कमी पाशवी आहे. 'किशन करत बलजोरी' ही ओळ अनेक हिंदू गाण्यांत-सभ्य समाजात गायल्या जाणाऱ्या गाण्यांत-दिसून येईल. अशा ठिकाणी कृष्णावर 'रेप्'चा चार्ज नसून त्याचा पोरकट खोडकरपणासंबंधी घरगुती गाऱ्हाणे आहे!

'रेप्' शब्दाचा मूळ अर्थही 'जबरदस्तीने संभोग' असा नसून, जबरदस्तीने ओढून नेणे ('सीझींग बाय् फोर्स') एवढाच आहे. कायद्यातील 'रेप्'च्या गुन्ह्याचा अर्थ अधिक निश्चित आणि अधिक गलिच्छ आहे. रेप् किंवा जबरी संभोग म्हणजे जबरदस्तीने एखाद्या स्त्रीशी संभोग करणे असा कायद्यातील अर्थ आहे. इतर कोणत्याही गुन्ह्यापेक्षा हा गुन्हा, त्या गुन्ह्याचा बळी झालेल्या व्यक्तीच्या इष्टमित्रांनाच नव्हे, तर संपूर्ण समाजाला चीड आणणारा आहे आणि तरी असे गुन्हे अलीकडे बरेच होतात, असे वृत्तपत्रांतील वार्तांवरून दिसते. पण आजकाल जो मोठा गवगवा झाला आहे तो केवळ बलात्काराच्या गुन्ह्याबद्दल नसून, त्या गुन्ह्याच्या आरोपातूनही आरोपींना सोडणाऱ्या आजच्या पोलीस व्यवस्थेबद्दल, न्यायपद्धतीबद्दल झाला आहे.

बलात्काराचा गुन्हा हा खुनाहूनही चीड आणणारा मानला जातो, याला कारण त्यात केवळ शारीरिक दुखापत किंवा आर्थिक हानी नसून, मानसिक, भावनात्मक आणि शिवाय शारीरिक उपद्रव आहे. 'रेप्'च्या खटल्यात जेव्हा संभुक्त स्त्रीच्या अंगावर, विरोध करताना झालेल्या काही जखमा किंवा ओरखडे आहेत काय याची छाननी चालते तेव्हा, मनाच्या नाजूक जखमांकडे डोळेझाक करून स्थूल शारीरिक जखमांची मात्र चौकशी चालली आहे असे वाटते. या दृष्टीने मराठीतील "त्याने मेल्याने तिची अब्रू घेतली" हा प्रयोग अधिक अर्थपूर्ण आहे. प्रत्यक्ष संभोगापेक्षा आपल्या स्त्रीत्वाचा आणि अब्रूदारपणाचा एका हलकट माणसाने भयंकर अपमान केला, या गोष्टीने संबंधित स्त्रीच्या मनाचा अधिक संताप होत असतो. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आरोपीला सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली तरी, तितक्यानेही त्या स्त्रीला झालेल्या मानसिक यातनांची आणि मानसिक धक्क्यांची अल्पमात्र भरपाई होऊ शकत नाही.

पण खेदाची गोष्ट म्हणजे कित्येकदा, स्त्रीविरुद्ध गुन्हा करणारे लोक कायद्यात सापडणाऱ्या पळवाटांमुळे, वकिलांच्या बुद्धिचापल्यामुळे किंवा न्यायाधीशांच्या संशयवादातून निघालेल्या औदार्यामुळे साफ सुटूनही जातात! अशा वेळी संबंधित स्त्रीला आणि तिच्या आप्तेष्टांना किती मनस्ताप होत असेल, त्याची कल्पनाच केलेली बरी. शिवाय आजकालच्या शिक्षा फाजील सुधारलेल्या! वास्तविक बलात्कार हा गुन्हा इतका हीन वृत्तीचा आणि पाशवी आहे की गुन्हेगाराला चार-दोन वर्षे तुरुंगात सक्त मजुरीवर धाडणे म्हणजे सुट्टीवर गेल्यासारखेच वाटावे! 'गुन्हेगाराला शिक्षणाने आणि वातावरणाने सुधारता येते' ही पाश्चात्य कल्पना आपण दत्तक घेतली आहे. तिचा जबरी संभोगाच्या बाबतीत तरी दुरुपयोगच होत आहे. अशा गुन्ह्याला जर जुन्या काळातील किंवा आजच्या पाकिस्तानातील शिक्षांप्रमाणे कठोर (डिटरंट) शिक्षा मिळतील तर, गुन्ह्यांचे प्रमाण निश्चित कमी होईल. गुन्ह्यांचे प्रमाणे वाढण्याला आणखीही एक कारण आहे. पोलिसांच्या नाकर्तेपणामुळे

किंवा पुराव्याच्या ब्रह्मघोळामुळे अनेक गुन्हेगार सुटतात. त्यामुळे 'होतकरू' गुन्हेगाराला गुन्हा करण्याला उत्तेजन मिळते. बलात्काराच्या गुन्ह्याची आणखीही एक भयानक बाजू आहे. बलात्कारी मनुष्य स्त्रीच्या भावनांना किंवा जीवाला महत्त्व देत नाही, हे उघडच आहे. खटला आणि शिक्षा टाळण्याकरिता, उपभुक्त स्त्री-नामक क्षुद्र वस्तूचा नाश करण्यालाही अशा गुन्हेगारांना दिक्कत वाटत नाही, हे लोटलीकर खून खटल्यावरून दिसून येईल.

काही विवेचकांनी या गुन्ह्याच्या विवेचनात, 'पुरुष-प्रधान समाज' (पॅट्रिआर्कल सोसायटी), तसेच 'एस्टॅब्लिशमेन्ट विरुद्ध इतर' वगैरे मुद्दे उपस्थित करून एक प्रकारे धूळफेकच केली आहे. त्यांच्या मते, या समाजात पुरुषांचे प्राबल्य असल्यामुळे स्त्रीला न्याय मिळत नाही. या संबंधात लिहिणाऱ्या काही स्त्रियांनी तर, प्रत्यक्ष कोर्टात येणाऱ्या खटल्यांपेक्षा स्त्रियांवरील बलात्काराच्या प्रकारांची संख्या फार मोठी आहे, असे सूचित केले आहे. पण नोकरीतील किंवा कौटुंबिक जीवनातील अप्रत्यक्ष धाकदपटशाने होणाऱ्या बलात्कारापेक्षा (ब्लॅकमेलपेक्षा), इतरही काही भयानक गुन्हे आपण डोळे झाकून सहन करायला शिकलो आहो. पूर्व पाकिस्तानशी १९७१ मध्ये झालेल्या युद्धात, अडीच लाख स्त्रियांवर सैन्याने बलात्कार केले, असे 'टाइम्स ऑफ इंडिया'मधील लेखिकेने (लेखकाने?) नमूद केले आहे. हे राजरोसपणे भर रस्त्यावर झालेले बलात्कार आपणही विसरलो आणि आपले सरकारही विसरले, उलट ज्या लष्कराने आणि लष्करी अधिकाऱ्यांनी बंगाली हिंदू-मुसलमान स्त्रियांवर बलात्कार केले त्यांच्यापैकीच कित्येकांची आपल्या सरकारने युद्धकैदी म्हणून जावयासारखी बरदास्त ठेवली!

युद्धातील बलात्कारासंबंधी एक विचित्र स्पष्टीकरण देण्यात येते. तो बलात्कार म्हणजे युद्धातील शत्रूवर एक प्रकारचा सूड असतो, असे काही लोक मानतात. पण प्रत्यक्ष शत्रूवर सूड न घेता त्यांच्या शीलवान् स्त्रीवर सूड घेणे याचा नैतिकदृष्ट्या कोणता अर्थ होतो? जणू स्त्रीला स्वतःला मन, शील, भावना, अब्रू यांपैकी काही नसून, स्त्री म्हणजे शत्रूच्या ताब्यातील एक चैनीची वस्तू होय! अर्थात् ही कल्पना अत्यंत असंस्कृतपणाची आहे. लढाईत शत्रूच्या स्त्रिया हाती लागल्या तर, शिवाजीमहाराजही त्या ताब्यात घेत, पण शत्रूकडून खंडणी घेऊन त्यांना सन्मानपूर्वक त्यांच्या पालकाकडे पोचविले जाई. म्हणजे युद्धातही स्त्रीविषयक वर्तनात 'सुसंस्कृत' आणि 'असंस्कृत' असे दोन प्रकार आढळतात. शिवाजीमहाराजांच्या शत्रू स्त्रियांसंबंधीच्या उदात्त वर्तनाची खाफीखान या औरंगजेबाकडील इतिहासकारानेही प्रशंसा केली आहे.

रामायणकालात रावणाने सीतेचे बलात्काराने अपहरण केले (म्हणजे 'रेप्'च्या मूळच्या अर्थाने हा बलात्कारच होता.) पण रावण रामाचा शत्रू असला तरी, सुसंस्कृत राज्यकर्ता होता. त्याने सीतेला अशोकवनात ठेवून देऊन तिचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण या सर्वच राजकीय वा खाजगी प्रकारांत

स्त्री म्हणजे एक देण्या-घेण्यासारखी, उचलून नेण्यासारखी उपभोग्य वस्तू आहे, हीच कल्पना दिसते. सौंदर्य आणि दौर्बल्य एके जागी ठेवणाऱ्या निसर्गानेच अशा विकृत रानटी समजुतीला अवसर दिला आहे!

अशा स्थितीत स्त्रियांचे रक्षण करणे, नुसते शारीरिक रक्षण नव्हे, तर त्यांच्या भावनांचे व अब्रूचे रक्षण करणे याची जबाबदारी आजच्या कायद्यावर येते. गुन्हा सिद्ध करण्याची जबाबदारी पोलिसांवर आणि बळी पडलेल्या बिचाऱ्या स्त्रीवर टाकणे, म्हणजे गुन्हेगाराला कोर्टात जास्तीत जास्त सवलत देणे होय.

अनुक्रमणिका

त्यात आणखी दोन्ही पक्ष समान मानण्याने वकील लोकांकडून त्या अवमानित स्त्रीची अधिकच विटंबना होते. जी स्त्री आपली 'अब्रू घेतली' म्हणून कोर्टात जबाब द्यायला उभी राहते तिला विनयभंगाचा आणि जबरी संभोगाचा तपशील चार लोकांसमक्ष आणि तिची अब्रू घेणाऱ्या नीचासमक्ष विचारणे म्हणजे न्यायाची विटंबना होय. दोन-तीन पिढ्यांपूर्वी सातारा सेशन कोर्टाच्या आवारात ज्या आख्यायिका ऐकू येत, त्या म्हणजे तर स्त्रीच्या विटंबनेची परमावधीच होत. आम्ही त्या काळी असे ऐकले होते की, बलात्कारी गुन्हेगाराने 'तुला काय केले', 'कसे केले', इत्यादी प्रश्न तर वकील लोक विचारीतच; पण आणखीही एक किळसवाणा आणि मानसशास्त्रदृष्ट्या मूर्खपणाचा (ॲब्सर्ड) प्रश्न विचारीत. "तुझ्यावर जबरी केल्यावर तुला कसे वाटले? (बरे वाटले की नाही?)" हा प्रश्नही त्या काळी हुशार फौजदारी वकिलांचा पेटंट प्रश्न असे. तो प्रश्न विचारण्यातील वकिली हेतू उघड होता. ज्याअर्थी तुला बरे वाटले, त्याअर्थी तुझी त्या कृत्याला संमती किंवा खुशी होती. यावर एका फटकळ खेडवळ स्त्रीने दिलेले उत्तरही त्या काळी प्रसिद्ध होते. ती म्हणाली, "साहेब! साखर संडासात खाल्ली तरी गोडच लागणार!" तात्पर्य, जबरी संभोगाच्या अपमानानंतर भर कोर्टात विचारलेल्या असल्या लज्जास्पद प्रश्नांनी ती बिचारी स्त्री अर्धमेली होत असे आणि कधी कधी वकिली प्रश्नांत पाय अडकून खटला तिच्याविरुद्ध जात असे.

सुमारे एक वर्षापूर्वी 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये 'रेप्'संबंधीच्याच एका तडफदार पुस्तकाचे परीक्षण आले होते. पुस्तकाच्या लेखिकेने, स्त्रियांनी बलात्काराच्या प्रसंगांत जिवापाड विरोध करावा, लढा द्यावा, म्हणजे बलात्कार अशक्य होईल, असे प्रतिपादिले होते. दात, नखे आाणि लाथा यांचा बेसुमार उपयोग करावा, चवताळून उपयोग करावा म्हणजे बलात्कार अशक्य होईल, असे तिचे प्रतिपादन होते (लाथा गुन्हेगाराच्या शरीराच्या कोणत्या भागावर माराव्या, ते सांगायला नकोच!) पण अशा लढ्यात प्रश्न अब्रूचा असल्याने त्या प्रसंगात सापडलेल्या स्त्रीचे हातपाय गळणेच अधिक संभवनीय असते. तेवढ्यावरून म्हणजे तिने जोराचा विरोध केला नाही एवढ्यावरून त्या स्त्रीची संमती होती, असा निष्कर्ष काढणारे वकीलच केवळ नव्हेत, तर काही जज्जही आढळतात!

या सर्व परिस्थितीमुळे 'रेप्'च्या कायद्यात आणि 'रेप्'च्या खटल्यातील पुराव्यासंबंधीच्या कायद्यात बदल होणे जरूर आहे. केवळ पैसेखाऊ पोलीसच नव्हेत, तर न्यायप्रिय कायदेपंडित असलेले जज्ज आणि वकीलही अजाणता अशा खटल्यातील दुर्दैवी स्त्रीच्या विटंबनेत भरच घालतात!

माझ्या मते, फक्त कायद्यात सुधारणा होऊन हे गुन्हे कमी होणार नाहीत. बलात्कार करणाऱ्या पशूसंबंधी समाजात जेवढा संताप आणि तिटकारा पाहिजे तेवढा आज दिसत नाही, ही शरमेची गोष्ट होय. अशा गुन्हेगारास चांगले प्रतिष्ठित वकील मिळतात, याचे नवल वाटते. पण प्रत्येक गुन्हेगार कोर्टात दोषी ठरेपर्यंत निर्दोषी आहे असेच धरून चालायचे, या तत्त्वाचा हा परिणाम होय. कोर्टाचे 'प्रोसीजर' काहीही असले तरी, समाजाचे म्हणून काही 'प्रोसीजर' किंवा वर्तनक्रम का असू नये? समाजात जर एखादा मनुष्य गुन्हेगार आहे अशी सकारण समजूत असेल तर, समाजाने त्या माणसाला जीवन अवघड करायला पाहिजे. खुनी, बलात्कारी सर्व माणसांना समाजात जर सहानुभूती मिळत असेल तर, तो समाज कसला? ज्यांनी अमानुषपणे खून केले आहेत, ज्यांनी अल्पवयीन भावासमोर अल्पवयीन बहिणीची अब्रू घेतली आहे, अशा गुन्हेगारांचेही आजचे तरुण

व तरुणी उत्साहाने ऑटोग्राफ घेतात असे ऐकू आले म्हणजे आजच्या कायद्याचीच नव्हे, तर आजच्या समाजाची किळस येते. स्वराज्यात स्त्रियांविरुद्ध गुन्ह्यांच्या संखेत वाढ व्हावी, हा समाजाच्या अधःपाताचा पुरावा आहे.

पण व्यक्तींच्या केवळ क्षणिक वर्तनातच नव्हे, तर एकूण विचारसरणीतच अधःपात झालेला दिसू लागला आहे तरुण लेखिका कु. अमरजा पवार यांनी एका प्रांतातील मुख्य मंत्र्यांचे जे उद्गार उद्धृत केले आहेत ते जर बिनचूक उद्धृत केले असतील तर, ते मनाला धक्का देणारे आहेत. मंत्रिमहाशय म्हणतात, "टू रेप् इज ह्युमन". विरोधी पक्षाला डिवचण्याकरिता काढलेले उद्गार म्हणून हे उद्गार मानले तरी, ते सामाजिकदृष्ट्या भयावह आहेत.

इंग्लंडमध्ये गाजलेल्या लॉर्ड प्रोफ्युमो आणि क्रिस्टाईन कीलर यांच्या प्रकरणात आरोपी डॉ. वॉर्ड यानेच काय ते इतके विकृत मत व्यक्त केलेले नमूद आहे! शेकडो स्त्रियांशी सलगी असलेल्या डॉ. वॉर्ड याने एका प्रसिद्ध वृत्तपत्रप्रतिनिधीला आपला अनुभव म्हणून सांगितला आहे. "दे रीअली एंजॉय इट्, यू नो! दि गर्ल एंजॉय दि सेन्स ऑफ व्हायोलेशन." (त्यांना त्यात आनंदच वाटतो! स्त्रियांना बलात्काराच्या अनुभवात आनंदच वाटतो.)

मुख्य मंत्रिमहाशयांचे उद्गार आणि कुप्रसिद्ध डॉ. वॉर्ड यांचे उद्गार हे जर आजच्या पुरुषवर्गाच्या अंतरंगाचे अल्पांशानेही निदर्शक असतील तर, स्त्रियांनी स्वसंरक्षणाच्या तरतुदीला शक्य तेवढ्या लवकर लागावे हे बरे!

महाराष्ट्र टाइम्स, रविवार पुरवणी,
१३ एप्रिल १९८०; पृ. २.

अनुक्रमणिका

भाग दुसरा

# विवाहविषयक लेख

प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर

अनुक्रमणिका

## ३८

## सपत्नीकांच्या द्वितीय विवाहाचे अभिनंदन

अलीकडे झालेले सुशिक्षितांचे द्वितीय संबंध मला निषेधार्ह मुळीच वाटत नाहीत. आपल्या सध्याच्या समाजातील पुष्कळशा प्रथम विवाहांहून मला ते अधिक अभिनंदनीय वाटतात. मी बहुपत्नीकत्वास मान्यता देतो असे मात्र नाही. वैवाहिक नियमांच्या दृष्टीने आजच्या सर्व धर्मांत ख्रिस्ती धर्म अधिक श्रेष्ठ आहे असे माझे मत आहे.

हिंदू धर्माचा निषेध न करता द्वितीय विवाहाचा निषेध करणारे लोक अशा घटनांचा विचार करण्यास अपात्र तरी असले पाहिजेत किंवा ढोंगी तरी असले पाहिजेत.

एकनिष्ठेचे बंधन प्रीतिविवाहांतच इष्ट आहे व प्रीतिविवाहांतच शक्य आहे. अर्थात् अशा विवाहांत ते बंधन बाह्य धर्माचे न होता स्वयंस्फूर्त मनोधर्माचे असेल. आज जे द्वितीय विवाह करीत आहेत त्यांनी अशा कोणत्याच-म्हणजे प्रेमासारख्या-पवित्र बंधनांचे उल्लंघन केलेले नाही. कारण त्यांचे पहिले विवाह प्रीतिविवाह नव्हते आणि त्यांनी धर्मासारख्या बाह्य आणि अन्यस्थापित (दुसऱ्यांनी लादलेल्या) बंधनाचेही उल्लंघन केलेले नाही. कारण हिंदू पती आपण अनेक भार्या करणार नाही असे वचन मुळीच देत नाही. हिंदू पती अलीकडे पाचपन्नास वर्षांत बहुधा एकच पत्नी करीत असल्यास आणि अंगवस्त्रेही पत्करीत नसल्यास, ख्रिस्ती वैवाहिक नीतींच्या संपर्काने त्याच्यात झालेली सुधारणा, त्याचप्रमाणे सांपत्तिक व शारीरिक ऱ्हास हीच त्यास कारणे होत.

ज्या विवाहविधीप्रमाणे आपण विवाह करीत आहो त्या विधीत अनेक भार्या करण्यास पूर्ण मुभा आहे हे हिंदू स्त्री जाणून असते. बहुतेक पतींच्या सद्वर्तनामुळे अलीकडे तिला या गोष्टींचे विस्मरण पडत असल्यास, बोभाटलेल्या द्वितीय विवाहांनी तिला जागी करण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे ही फार चांगली गोष्ट आहे.

पूर्वी असे विवाह शेकडो होत; आजही अप्रसिद्ध लोकांत किती होतात याची चौकशी करण्याची गरज निषेधवाल्यांस वाटत नाही इतकेच. तरी पूर्वीपासून चालू असलेली, धर्मास मान्य पण माणुसकीस अमान्य अशी गोष्टच अलीकडील सुशिक्षित पुढे चालवीत आहेत असे मात्र नव्हे.

पूर्वीच्या 'दोन बायकांच्या दादल्या'हून अलीकडे ज्यांच्या विवाहाबद्दल वर्तमानपत्रांत टीका झाली अशा मंडळींत सद्सद्विवेकबुद्धी व माणुसकी अधिक निःसंशय आहे असे थोडा निकोप विचार केल्यास दिसून येईल. यांपैकी एकानेही इस्टेटीवर डोळा ठेवून द्वितीय विवाह केलेला नाही (पूर्वी हे कारण प्रभावी ठरे); एकानेही संततीवर नजर ठेवून दुसरी बायको केली नाही (द्वितीय विवाह करणारे पुरुष संततीदेखील संपत्तीला राखण म्हणूनच महत्त्वाची समजत हे लक्षात घेता); याही दृष्टीने अलीकडचे द्वितीय संबंध अधिकच उच्च भूमिकेवर आहेत हे दिसेल. शेवटची पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अलीकडचे बहुतेक द्वितीय विवाह प्रेमाखातर झालेले आहेत हे त्या विवाहावर आग पाखडणारांनीच कबूल केले आहे. अर्थात् याही दृष्टीने हे विवाह पूर्वीच्या पिढीतील द्वितीय विवाहांहूनच नव्हे, तर त्या त्या व्यक्तींच्या प्रथम विवाहांहूनही अधिक नैतिक ठरतात.

अनुक्रमणिका

यांपैकी एकाही पतीने प्रथम पत्नीची विटंबना किंवा बेजबाबदार हयगय केल्याचा बोभाटा नाही. पूर्वीचे नवरे पहिल्या बायकोने 'नावडती' या भूमिकेवर घरात राहावे अशी अपेक्षा करीत. तशी ती न राहिल्यास, वाटेल तर आणि मिळालेच तर तिने माहेरचे अन्न खावे अशी अपेक्षा करीत. हल्लीच्या एकाही द्वितीय विवाहातून पोटगीचा खटला उद्‌भवलेला नाही. प्रथम पत्नीस नवऱ्याच्या अनेकपत्नीत्वामुळे घटस्फोट मागण्याचा हक्क हिंदू धर्माने ठेवला असता तर यांतील एकाही पतीने घटस्फोट देण्यास खळखळ केली असती असे मला वाटत नाही. पहिला विवाह प्रीतिविवाह नाही आणि घटस्फोट घ्यायचा म्हटले तरी घेता येत नाही, अशा स्थितीत हर्षे-फडके-किर्लोस्कर यांसारखे लोक जे करीत आहेत त्याहून अधिक समंजस वर्तन कोणते ते निषेधवाल्यांस सांगता येणार नाही.

अशा प्रकारे नवीन प्रेमाकरिता द्वितीय विवाह करणारा हिंदू पतीदेखील पूर्वीच्या पिढीहून अधिक उच्च भूमिकेवर आहे. मग ज्याला पहिल्या बायकोस सुखी करण्यात-अनेक वर्षे प्रयत्न आणि त्याग करूनही-अपयश आले आहे अशा पतीला बेजबाबदारपणे निंदणारे लोक तर अधिकच मूढ आहेत. सुशिक्षितांच्या द्वितीय विवाहाचा निषेध करण्याची अडाणी आणि बेजबाबदार पद्धत ज्या विवाहापासून सुरू झाली तो कवी यशवंत यांचा विवाह माझ्या माहितीप्रमाणे आणि त्यांच्या इतर अनेक विद्वान् मित्रांच्या जाहीर निवेदनाप्रमाणे या सदरात पडतो. माझे मित्र कवी यशवंत हे एक कर्तव्यनिष्ठ व सोशीक पती होते. त्यांच्या सोशीकपणातून काहीच निष्पन्न होत नाही, प्रथम पत्नीला सुखी करणे वा तिजपासून सुख मिळविणे अशक्य आहे असे अनेक वर्षे दिसून आल्यावर त्यांनी द्वितीय विवाह केला. द्वितीय विवाह त्यांनी प्रेमात सापडून न करता जुन्या पद्धतीप्रमाणे वधू-संशोधन करून केला. तरीही त्यांच्यावर 'नवीन स्त्रीच्या पाशात सापडून जुनीचा संसार मोडणारे' अशी टीका निषेधवाल्यांनी केलीच! यावरून हे निषेध किती अडाणीपणाचे आहेत हे दिसून येईल.

निषेधवाल्यांचा ढोंगीपणा आणखी एका गोष्टीत दिसून येईल. जे जीर्ण धर्माला कवडीची किंमत देत नाहीत व जे पहिली बायको जिवंत असून विवाह करीत आहेत त्यांचा विवाह लावून दक्षिणा उपटणाऱ्या धर्ममार्तंडांचा निषेध हे लोक करीत नाहीत, एकपत्नीव्रताचा कायदा करायचा म्हटल्यास हेच जुनाट लोक प्रथम आडवे येतील. यावरून त्यांस द्वितीय विवाहांची चीड नसून, प्रेमशून्य विवाहावर प्रेमयुक्त विवाह उघडउघड मात करीत आहे त्याची चीड आहे असे वाटते. हे जुनाट लोक द्वितीय विवाहाचा आपण निषेध करीत आहो असे भासवतात; पण ते त्या विवाहातील सपत्नीकत्वापेक्षा 'सप्रेमत्वा' वरच खरे चिडलेले असतात. शक्य असते तर त्यांनी प्रत्येक प्रेमविवाहाचा आणि प्रत्येक प्रौढ विवाहाचा निषेध केला असता. आजवर या पक्षाने तेच केले. आज या बाबतीत मिळेनासा झालेला लोकमताचा पाठिंबा ते आज सपत्नीकत्वाच्या मागे लपून मिळवीत आहेत.

यांचे हे ढोंग उघडकीस आणण्याचा मार्ग म्हणजे एकपत्नीत्वाचा कायदा! एकपत्नीव्रताचा कायदा करावयाचा म्हटल्यास हेच लोक त्याच्याविरुद्ध जातील! कारण संततीकरिता, संपत्तीकरिता-किंबहुना केवळ उपभोगाकरिताही द्वितीय विवाह करण्याचा हक्क प्रत्येक पुरुषास आहे ही प्रत्येक सनातनी हिंदूची अभेद्य श्रद्धा आहे. त्यांच्यातील जे अगदी थोडे धर्मशास्त्रज्ञ आणि प्रामाणिक आहेत ते या निषेधाच्या ढोंगात सामील नाहीत. भाष्यकार अहिताग्नी राजवाडे, पंडित गो. म. जोशी यांजसारख्या अधिकारी विद्वानांनी निषेधकांच्या तोंडांस पाने पुसली आहेत असे मी खात्रीलायक माहितीवरून सांगतो.

अनुक्रमणिका

कित्येक पुरोगामी वृत्तपत्रे गफलतीने या निषेधात सामील झाली आहेत. 'विविधवृत्ता'सारखी पत्रे प्रामाणिक आहेत. उद्या एकपत्नीव्रताचा कायदा करायचा म्हटल्यास ही पत्रे निश्चित पाठिंबा देतील हीच त्यांच्या प्रामाणिकपणाची कसोटी होय. पण समाजात आज इष्ट विवाहपद्धती रूढ आहे असे समजून चालण्याची चूक त्यांच्या हातून होत आहे. जुनी विवाहपद्धती सुधारलेली नाही हे जर त्यांस मान्य असेल आणि तीतून बाहेर पडण्यास घटस्फोट अस्तित्वात नाही हेही जर ते जाणतात, तर त्यांनी एखाद्या दुर्दैवी प्रथम पत्नीच्या दुर्दशेमुळे भावनावश होऊन या प्रश्नावर लिहिणे त्यांच्या पुरोगामी भूमिकेस धरून नाही. त्यांनी भावनावश होऊ नये अशी त्यांच्या चाहत्यांची अपेक्षा आहे.

मुख्य गोष्ट म्हणजे पहिली बायको असता दुसरी बायको करणे कायद्याने मना व्हावयास हवे. पहिला नवरा असता दुसऱ्याशी विवाह करणाऱ्या स्त्रीचा विवाह ज्याप्रमामे कायद्याने विवाहच ठरत नाही, त्याचप्रमाणे सपत्नीकाचा विवाहच बेकायदा ठरला पाहिजे. तो विवाह लावणाऱ्या पुरोहितावर फौजदारी खटला करता यावयास हवा. पण असा कायदा केवळ सभेपुरता किंवा काव्य रंगविण्यापुरता करावयाचा नसल्यास त्या कायद्याची अपरिहार्य अशी दुसरी बाजू पत्करली पाहिजे. ती बाजू म्हणजे वधू-वरसंमत विवाह आणि समंजस घटस्फोट.

ख्रिस्ती धर्मनियमांत घटस्फोट आहे. हिंदूंच्याही अनेक जातींत घटस्फोट आहे. हिंदूंतील खालच्या जाती वरच्या जातींचे अनुकरण करण्यात मोठेपणा मानीत असल्याने त्यांच्यातील घटस्फोटही अनेकदा असून नसल्यासारखाच होतो.

ज्या समाजातील विवाह सज्ञान वधू-वर स्वतः ठरवीत नाहीत व ज्या समाजात पती किंवा पत्नी शरीरतःच विवाहास अयोग्य असली तरी सोडता येत नाही, त्या समाजातील द्वितीय विवाहांचा निषेध करणे म्हणजे व्यभिचारास राजमान्यता देणे होय. ही मान्यता अलीकडेच शिक्षणामुळे कमी झालेली होती ती फिरून चालू करणे योग्य नव्हे.

शारीरिक अपात्रता, व्यसनाधीनता, मानसिक विकृती आणि दुष्टपणा यांजपासूनही आजच्या विवाहित पतीस अगर पत्नीस घटस्फोटाच्या मार्गाने आपली सुटका करून घेता येत नाही. सुधारलेल्या व प्रौढप्रज्ञ समाजात तर मानसिक विरोधामुळेही घटस्फोट मिळणे मंजूर होईल. आजच्या रशियात तशी व्यवस्था आहे. या सुधारलेल्या विवाहव्यवस्थेत आज निषेधिले जाणारे सुशिक्षित द्वितीय वर मान्यत खास देतील, आणि म्हणूनच या व्यवस्थेच्या अभावी जीर्ण विवाह-पद्धतीतून बाहेर पडण्याचा कोणताही कायदेशीर मार्ग त्यांनी पत्करल्यास त्यांस दोष देता येणार नाही.

शेवटी या प्रश्नाची एकच बाजू उरते. ती बाजू थोडी करुण आणि उदासवाणी अशीच आहे. ती म्हणजे निषेधाच्या गोंगाटात सामील नसलेल्या आणि असहायपणे आपले दुःख भोगणाऱ्या आपल्या भगिनींची. त्यांचे म्हणणे ऐकू येणार नाही; पण निषेधवाल्या सनातन्यांस समाजाचे आधार किंवा स्वतःचे हितचिंतक समजण्याइतक्या त्या भ्रांतिष्टही खास नसणार. कारण व्यासपीठावर हातवारे करणाऱ्या स्त्रियांच्या मानाने त्यांस

कटु वास्तवतेची जाणीव अधिक आहे. अशा स्त्रियांना उपदेश करण्याचे धाष्टर्य करणे खरोखर गैर आहे. तथापि, त्यांच्यावरील आपत्ती कमी लेखण्याच्या दृष्टीने नव्हे, तर तिचे निदान करण्यास मदत म्हणून दोन शब्द सांगणे जरूर आहे. त्यांच्यावरील आपत्तींस त्यांचे पती हे कारण नसून केवळ निमित्तमात्र होत. त्यांच्यावरील आपत्तींस कारण जुना धर्म व तो जसाच्या तसा किंबहुना अधिक गलिच्छ स्थितीत टिकविण्याचा चंग बांधणारा जुना समाज होय. या अन्यायसंरक्षक मंडळींतच निषेधवालेही उभे आहेत-नव्हे, त्यांचे ते आधार आहेत हे स्त्रियांनी विसरू नये. या स्त्रियांवरील अन्यायाची निराकृती करता येणे दुरापास्त आहे. पण भावी पिढ्यांवरील-विवाहित स्त्रियांवरील, विवाहित पुरुषांवरीलही-अन्याय टाळावयाचे म्हटल्यास विवाहव्यवस्थेत बदल करणे हा एकच मार्ग आहे. हा बदल करायचा घाट घातल्यास त्यांचे आजचे ढोंगी कैवारीच आडवे येतील आणि ज्यांच्यावर क्रुद्ध होण्यास आज त्यांस कारण आहे ते द्वितीय विवाह करणारे पतीच मदत करतील असे त्यांनी निश्चित समजावे आणि पतीवरील राग (काही असलाच तर) जुन्याच समाजावर काढावा.

ज्या विवाहविधीचा तुम्ही आश्रय केलात (किंवा तुमच्या मातापितरांनी तुम्हांस तो करावयास लावला) त्या विवाहविधीत एकाच नव्हे, तर अनेक सवतींची सोय आहे हे तुम्हांस तुमच्या मातापितरांनी सांगितले नाही; पण परिस्थितीने आज सांगितले ते तुमच्या इतर भगिनींना सांगा आणि हिंदू विवाहपद्धतीत बदल घडवून आणा. जोपर्यंत तो बदल घडून आला नाही तोवर हिंदू पद्धतीने विवाह लावण्यास कोणाही स्त्रीने अगर पुरुषाने तयार होऊ नये अशी घोषणा करा.

जुन्या विवाहपद्धतीत फक्त स्त्रियांचीच कुचंबणा आहे असे नव्हे. एखाद्या स्त्रीने पुरुषास 'नको जन्म' करावयाचे म्हटल्यास त्यालाही तिजपासून सुटका नाहीच! म्हणून हा प्रश्न स्त्री विरुद्ध पुरुष असा आहे असेही समजू नका. आणि सरतेशेवटी शक्य तर आणि तुम्हांस पसंत असले तर, सवत समोर असताही संसार मोडू नका. ढोंगी सनातनी आपली ईश्वरदत्त शिंगे मोडून सुधारकांत शिरू पाहात आहेत. पण जर ते खरे सनातनी असतील तर, त्यांस तुम्हाला "कुरु सखीवृत्तिं सपत्नीजने!" (म्हणजे सवतीशी मैत्रिणीप्रमाणे वाग!) हा कालिदासोक्त उपदेशच करावा लागेल. पण तुम्ही मात्र शक्य तर जुन्यातील हा भाग पत्करून संसार चालू करा आणि नव्यातील विवाहसुधारणेची चळवळ हाती घेऊन भावी पत्नींवरील आपत्ती नाहीशी करा.

तुम्ही विवाहसुधारणेची (म्हणजेच एकपत्नीत्वाच्या आणि घटस्फोटाच्या कायद्याची) चळवळ हाती घेतल्यास तुम्हांला आजच्या तुमच्या निषेधवाल्या कैवाऱ्यांची मदत मिळो किंवा न मिळो, तुम्हांला तुमच्या सुविद्य पतीची मदत खास मिळेल; आणि तुमच्या नव्या सवतीचीही मदत मिळेल. कारण ते पुरुष व त्या स्त्रिया सुधारक आहेत. त्यांनी नकळत तुम्हांला दुःख दिले असले तरी समाजाचे दुःख ओळखणारे तेच आहेत.

किर्लोस्कर,
सप्टेंबर १९४३, पृ. ७९-८१.

अनुक्रमणिका

## ३९

# सपत्नीकांचे द्वितीय विवाह आणि आगरकरी सुधारक

हिंदुस्थानात स्वतंत्र विचारी माणसे इतर देशांहून कमी झाली असे मला वाटत नाही. पण अशी माणसे व त्यांचे विचार यांची वासलात लावण्याचे पद्धतशीर तंत्र हिंदुस्तानात जितके तयार आहे तितके अन्यत्र असेल की नाही याची शंकाच आहे. एखादा क्रांतिकारक पुरुष निर्माण होताच त्याला संत, पीर नाही तर अवतार बनवून मोकळे व्हायचे आणि त्याच्या विचारांतील एखाददुसराच सोयीस्कर विचार विपर्यस्त स्वरूपात उचलून त्याचे शब्दप्रामाण्य माजवायचे, हेच ते सुप्रतिष्ठित तंत्र. असे केल्याने दुहेरी सोय होते. क्रांतिकारकांची संत म्हणून पूजा केली की त्यांच्या चरित्राचे अनुकरण करण्याची जबाबदारी टळते आणि त्यांच्या एखाददुसऱ्या वचनाचे स्तोम माजविले की स्वतः स्वतंत्र विचार करण्याची ब्याद टळते! महाराष्ट्रात इंग्रजी अंमलानंतर ज्यांनी समाज-सुधारणेची पताका हाती घेतली, ते सर्वच मोठे क्रांतिकारक होते असे मला म्हणायचे नाही. पण त्यांच्याही चरित्रांतून आणि शिकवणुकीतून आमच्या वाचाळ सुशिक्षितांनी जर काही उचलले असेल तर चार-दोन विभूतिपूजा आणि चार-दोन अव्यवस्थित घोकीव अर्धख्रिस्ती सुधारणा-तत्त्वे! रानड्यांचा शताब्दी महोत्सव करणे, आगरकर, केशवसुतांना क्रांतिकारक म्हणून गौरविणे आणि त्यांच्या सुधारणा-तत्त्वांची अर्धीमुर्धी संथा पाठ म्हणणारांस विरोध करील त्याला सुधारणाविरोधी ठरविणे, एवढाच आजच्या वाचाळ सुशिक्षितांचा सुधारणावाद होय!

अर्वाचीन महाराष्ट्रात समाजसुधारणेचे पाच अंक झाले असे स्थूलमानाने म्हणता येईल. पहिला लोकहितवादींचा, दुसरा रानड्यांचा, तिसरा आगरकरांचा, चौथा सावरकर, केतकरांचा; आणि पाचवा आजच्या मार्क्सवादी पिढीचा. पैकी लोकहितवादी आणि केतकर यांचे हिंदू समाजाचे व संस्थांचे अवलोकन अधिक सूक्ष्म होते. त्यामुळे त्यांचा जिवंत सुधारणावाद सर्वसाधारण सुशिक्षितांस गोंधळात पाडतो. उलट ख्रिस्ती समाज किंवा मिल्ल स्पेन्सरादी तत्त्ववेत्ते यांवर आधारलेला सुधारणावाद पदवीखातर पुस्तके वाचणाऱ्या आधुनिक सुशिक्षितांस अधिक सुगम वाटतो. अद्यापही लेख लिहिणारे अगर व्याख्याने देणारे बहुतेक सुशिक्षित रानडे, आगरकरांच्या पलीकडे गेले नाहीत याचे कारण हेच.

या जुन्या व पुस्तकी सुधारकांनाच मी संक्षेपाकरिता 'आगरकरी सुधारक' हे नाव दिले आहे. अर्थात् आगरकरांच्या चरित्राचा व विचारांचा केवळ अर्धामुर्धा भाग या मंडळींनी उचललेला असतो. एखाद्या मनुष्याने जातिभेद, बहुपत्नीकत्व, वगैरे अनिष्ट रूढी नाहीशा करण्याचा काही वेगळा उपाय सुचविताच हे पुस्तकी सुधारक गोंधळून जातात. वास्तविक केतकरांचे समाजावलोकन व शास्त्राध्ययन, रानडे, आगरकरांच्या मानाने कितीतरी श्रेष्ठ प्रतीचे होते. परंतु आमच्या सुशिक्षित मंडळींस रानडे, अगरकरांच्यापेक्षा भिन्न असा सुधारणावाद असू शकेल ही कल्पनाच झेपण्यासारखी नव्हती! अर्थात् या पुस्तकी सुधारकांच्या दृष्टीने केतकर विक्षिप्त ठरले व लोकहितवादींबद्दल तर बहुतेकांना चिपळूणकरांच्या उथळ लेखापलीकडे माहितीच नसते. अशा स्थितीत विवेकानंदांसारख्या परप्रांतस्थ ध्येयवादी सुधारकाचे विचार पचनी पडणे तर या पुस्तकी मंडळींच्या बाबतीत सर्वथा अशक्य होते. गांधी तर बोलून चालून अन्तःप्रेरणावादी! मग आमच्या या पाठ्यपुस्तकांतर्गत बुद्धिवाद्यांस ते धर्मभोळे वाटणे अपरिहार्य आहे.

अनुक्रमणिका

आज चर्चात्मक खाणात किंवा लेखनात सामाजिक प्रश्नांचा थोड्या वेगळ्या रीतीने विचार करू पाहणाऱ्यांच्या वाटेत या जुनाट पुस्तकी सुधारणावादाचा मोठा अडथळा आहे. या पुस्तकी आणि संकुचित वृत्तीचा प्रत्यय सपत्नीकांच्या द्वितीय विवाहाबाबत जे लिखाण अलीकडे प्रसिद्ध झाले आहे त्यात स्पष्टपणे येतो. अलीकडे काही प्रसिद्ध व्यक्तींनी द्वितीय पत्नीचा अंगीकार करताच जिकडे तिकडे निषेधाचा कल्लोळ उठला. इतकेच नव्हे तर महाशिवरात्री दिवशी उपास न करणारा किंवा शिवालयात न जाणारा जसा हिंदुमात्राच्या कुतूहलाचा व अनादराचा विषय होतो तसा या बाबतीत निषेधाक्षर न उच्चारणारा हा, प्रत्येक सुशिक्षिताच्या कटाक्षाचा विषय होऊ लागला. या निषेधाच्या कुंभमेळ्यात सनातनी आणि सुधारक दोघेही भाविकपणे सामील झालेले पाहून आणि कायदेशीर संरक्षणाऐवजी निषेधाच्या नाटकावरच अधिक भिस्त आहे हे पाहून या सर्व प्रकारांत बुद्धिवादाचा कुठेच मागमूस नाही असे वाटल्यास आश्चर्य नाही.

मलाही तसेच वाटल्यामुळे मी 'किर्लोस्कर' मासिकाच्याद्वारे काही प्रश्न उपस्थित केले होते. (१) सनातनी मंडळींस बहुपत्नीकत्वाचा निषेध करता येईल काय? (२) निषेधविषय झालेल्या द्वितीय विवाहास बहुपत्नीकत्व म्हणता येईल काय? (३) कायदा करण्यात अंगचोरपणा दाखविणारांनी केलेला निषेध प्रामाणिक आहे काय? (४) सर्वसाधारण व्यावहारिक शरीरसंबंधाहून (marriage of convenience or convention हून) हे नवीन विवाह अभिनंदनीय नाहीत काय?

सामाजिक विषयावरील लेखनात सुस्त विचारांना डिंवचणारी व सूत्रमय लेखनपद्धती काही दृष्टींनी अधिक उपयुक्त असते. मी अशाच लेखनपद्धतीचा उपयोग "सपत्नीकांच्या द्वितीय विवाहाचे अभिनंदन" या लेखात केला होता. त्याचा अपेक्षित परिणाम म्हणजे सदर लेखावर 'यशवंत', 'स्त्री', 'भगिनी', 'महाराष्ट्र' वगैरे मासिकांतून टीकांचा भडिमार झाला. या सर्व टीका मी बहुपत्नीकत्वाचे मंडन करीत आहे असे गृहीत धरून झाल्या हे सांगणे नकोच. आणि माझ्या लेखाचा फक्त मथळाच डोक्यात शिरल्यास तसा अर्थ काढणे अशक्यही नाही! आणि लेखातील विचार धोपटमार्गी सुधारणेस धरून नसल्याने लेख वाचूनही तो ग्रह आगरकरी सुधारकांच्या डोक्यात कायम राहिल्यास आश्चर्य नाही.

अशा धोपटमार्गी अनाकलनाचे ठळक उदाहरण म्हणजे 'स्त्री' मासिकाच्या दिवाळी अंकात माझ्या लेखावर आलेली टीका (लेखिका गीताबाई साने). काही विशिष्ट परिस्थितीत सपत्नीकांनी द्वितीय केल्यास हरकत नाही हे मान्य करून लेखिका म्हणते, "...किर्लोस्कर, फडके इ. विवाह त्या सदरात येतात की नाही हे ठरविण्याचे काम एखाद्या न्यायाधीशाचे आहे, लेखकांचे नाही." अर्थात् या श्रमपरिहाराबद्दल सर्व लेखक सदर लेखिकेचे आभारच मानतील; पण या श्रमपरिहाराच्या बुडाशी असलेले श्रमविभागाचे तत्त्व मान्य करण्याइतके भोळसर न्यायाधीश मात्र मिळणे कठिण! कारण निषेध करण्याचा अधिकार हव्या त्या अज्ञ लेखकाचा आणि बेजबाबदार वक्त्याचा; पण शास्त्रविहितता ठरविण्यास मात्र न्यायाधीश हवा अशी लेखिकेची विचारसरणी आहे. यशवंत, किर्लोस्कर, फडके, हर्षे यांची उघड उघड नावे घेऊन अनेक लेखकांनी व वक्त्यांनी त्यांचा अत्यंत बेजबाबदार शब्दांत निषेध केला आहे. एका दैनिकाने तर यातील एका विवाहाचा उल्लेख करून हा 'निव्वळ बदफैलीपणा' होय असे म्हटले होते. उलट माझा लेख थोडा सूक्ष्मपणे वाचल्यास एखाद्या द्वितीय विवाहामागील परिस्थिती समजावून न घेता तिचा निषेध करीत सुटण्याच्या प्रवृत्तीचाच त्यात धिक्कार केल्याचे

दिसून येईल. परंतु सदर लेखिकेच्या मते असे बेजबाबदार निषेध करण्याचा अधिकार लेखकांना आहे, हे विवाह अनिषिद्ध ठरविण्यास मात्र न्यायाधीश पाहिजे.

या प्रश्नाची दुसरी बाजू सदर लेखिकेस अनाकलनीय होण्याचे आणखी एक कारण म्हणजे राष्ट्रांची व व्यक्तींची बारीक माहिती आपल्याखेरीज इतरांस उपलब्ध नाही ही तिची मनोरंजक समजूत! रशियातील घटस्फोटापासून तो एखाद्याची बायको बाहेर का फिरकत नाही तेथपर्यंत सर्व नाजूक बाबींचा उल्लेख आपल्याखेरीज कोणी केल्यास, एक तर तो गप्पा मारीत असला पाहिजे, नाहीतर न्यायाधीशाच्या क्षेत्रावर अतिक्रमण तरी करीत आहे असा सदर लेखिकेचा रोख दिसतो. घटस्फोटाच्या बाबतीत रशियाकडे बोट दाखविणारे लोक केवळ फॅशन म्हणून तो अंगविक्षेप करतात. रशियातील समाजव्यवस्था वेगळी आहे हे त्यास माहीत नसते असे सदर लेखिकेचे म्हणणे आहे. या म्हणण्यास दुसऱ्या एका भगिनीने 'स्त्री' मध्येच दिलेले उत्तर थोडे कडू असले तरी वाचण्यासारखे आहे. ती म्हणते- "हे म्हणणे जितके सोपे तितकेच पोकळ, प्रौढीचे व अज्ञानाचे आहे. रशियानेच हा लग्नाचा प्रश्न बऱ्याच समाधानकारक रीतीने सोडवला आहे."

मला सदर लेखिकेस (गीता साने) एवढेच सांगावयाचे आहे की, रशियाविषयीची अधिकृत माहिती काही लोक समजतात तितकी दुर्लभ नाही. आणि रशियाकडे बोट दाखविणारे लोक आपल्या समाजव्यवस्थेतील चालू अराजकतेहून आणि निर्जीवपणाहून रशियन समाजव्यवस्था अधिक स्वागतार्ह समजतात व म्हणूनच तिकडे बोट दाखवितात. रशियाचे नाव घेण्याच्या फॅशनवरून आणखीही एक लहानशी गोष्ट सांगावीशी वाटते. अर्धवट सुधारकांनी माझ्या लेखावर तोंडी व लेखी शिव्यांचा वर्षाव केला तर, उलट कित्येक कट्ट्या मार्क्सवाद्यांनी (तुरुंगातूनही) माझ्याशी मतैक्य असल्याचे कळविले!

दुसरी गोष्ट विशिष्ट जोडप्याच्या खाजगी परिस्थितीसंबंधी लेखिका सांगते, "माझ्या एका वृद्ध मित्राची पत्नी वेडसर असल्याने ते तिला घराबाहोर जाऊ देत नाहीत. त्याबाबत त्यांच्याबद्दल समाजाने अत्यंत अनुदार उद्‌गार काढलेले आहेत." इत्यादी इत्यादी इतर जोडप्यांच्या संबंधीही अशा काही नाजूक गोष्टी असतील, समाज असाच अनुदारपणा दाखवीत असेल व त्या अनुदारपणाचा निषेध करणे मजसारख्या एखाद्यास कर्तव्य वाटेल याची मात्र जाणीव सदर लेखिकेस नाही. कवि यशवंत यांच्या पहिल्या वैवाहिक जीवनासंबंधीचे काही उल्लेख मी अशा विषयावर लिहिताना नाइलाजाने जाहीर रीतीने केले होते. पुण्यातील प्रसिद्ध साहित्यिकांच्या सहीने अशाच प्रकारचा एक खुलासा त्यांच्या द्वितीय विवाहाच्या वेळी प्रसिद्ध झाला होता. तरी एखाद्या विवाहावर बेजाबदार टीका करताना त्याचा उल्लेख 'यशवंती विवाह' म्हणून करणे ही गोष्ट मात्र लेखिकेस निषेधार्ह वाटत नाही. लेखिकेच्या वृद्ध मित्रांइतकेच आमचे तरुण मित्र आम्हांस रक्षणीय वाटत असतील हे समजण्याइतकीही कल्पना लेखिकेने दाखविलेली नाही!

माझ्या लेखावर टीका करणाऱ्या सर्वच लेखकांनी माझ्या लेखाबद्दल सदर लेखिकेइतका चुकीचा समज करून घेतला आहे असे नव्हे. तथापि, या लेखिकेस आणखी एक-दोन जुनाट सुधारणावादी जोडीदार आहेत. सदर वादात प्रवेश करणाऱ्यांपैकी कित्येक अद्याप कोणत्या अवस्थेत आहेत हे पाहायचे असल्यास 'महाराष्ट्र' मासिकातील (नागपूरचे प्रसिद्ध द्विसाप्ताहिक नव्हे, पुण्यात निघणारे एक मासिक) 'सपत्नीकांच्या विवाहाचे वाढते विष' हा लेख पहावा. लेखकाने इतरांसंबंधी केलेल्या तुच्छतेच्या उल्लेखावरून लेखक

नामांकित असावा असे दिसते (नाव रा. पु. शं. पतके). पण पुढील वाक्सुमनांवरून त्यांच्या विचारसरणीबद्दल जितपत बोध होईल तितकाच त्यांच्या नामांकितपणाबद्दलही होईल. लेखक म्हणतो, "... परंतु एकदा विवाहवेदीने बद्धपरिकर झाल्यानंतर स्वतःच्या स्त्रीचे सर्वस्व लुटून तिला निकामी करून मग तिच्यावर बौद्धिक असमर्थचा छाप मारून..." इत्यादी इत्यादी.

"बौद्धिक तहानेने तुमचा प्राण व्याकुळ होत असेल तर, त्याला दुसऱ्या पत्नीचीच काय जरूर आहे? उत्तम ज्ञानी टीकाकार पुरुष मित्र हे काम करू शकणार नाही काय?"; "स्त्री ही जर संतति-उत्पादनास समर्थ नसेल तर, विवाहापूर्वी वैद्यकीय तपासणीचे अभावी परंतु नंतर दिसून येणाऱ्या अडचणीमुळे किंवा इतर अडचणीत मनुष्याला द्वितीय विवाहाची मोकळीक शास्त्रानेही दिली आहे." (अर्थ?) इत्यादी इत्यादी. सुभाषितांवरून लेखकाच्या विचारांची व अभिव्यक्तीची कल्पना येईल! या लेखातील अर्थशून्य भाग सोडल्यास बाकी फारच थोडे उरते व जे उरते ते इतरांनी अधिक चांगले म्हटले आहे. द्वितीय विवाह करणारांवर व त्यांचे समर्थन करणारांवर टीका करणारांत कोणकोणत्या प्रकारचे लोक आहेत हे या लेखकाच्या उद्धृत उद्‌गारांवरून समजेल एवढेच!

माझ्या लेखावर टीका करणाऱ्या इतर लेखकांनी इतकी हास्यास्पद विधाने केली नसली तरी, कित्येक प्रामाणिक गैरसमज मात्र करून घेतले आहेत व त्यामुळे कित्येक गैरलागू पण महत्त्वाचे आक्षेप घेतले आहेत. 'यशवंती विवाह' या मथळ्याखाली 'यशवंत'मध्ये लिहिणाऱ्या लेखिकेने (नाव श्री. प्रभावती) बेजबाबदार निषेधाच्या पायंड्याला प्रथम पायबंद घातल्याबद्दल माझे अभिनंदन करून नंतर पुरुषांतील संभोगवैचित्र्याचा रोग असाध्य की साध्य याची चर्चा केली आहे. स्त्रियांची एकनिष्ठा व मंदकामता पुष्कळदा आर्थिक व सामाजिक कारणांमुळेच उद्‌भवते याचीही जाणीव सदर लेखिकेने दाखविली आहे. शिवाय, पुरुषांप्रमाणे स्त्रियांचेही विवाहबाह्य संबंध होत असतील-त्या ते पुरुषाप्रमाणे कबूल करीत नसतील एवढेच-हेही ध्वनित केले आहे. पण 'यशवंती विवाह' हा अशा कामुकतेवर इलाज नसून विवाहबंधन व नीतिबंधन लवचिक करणे हाच खरा इलाज होय असे सुचविले आहे.

जे चार-पाच गाजलेले विवाह निषेधाचे विषय झालेले आहेत त्यांतून संभोगवैचित्र्याचा प्रश्न उपस्थित होतो असे मला वाटत नाही. पुरुषांना व स्त्रियांना दोघांनाही एकाहून अधिक व्यक्तींसंबंधी कामजागृतीचा अनुभव येणे पूर्ण स्वाभाविक आहे. पण सुधारलेल्या समाजव्यवस्थेत आपण अनेक प्राथमिक प्रवृत्तींवर खुषीने नियंत्रण घालतो, त्याप्रमाणेच कामप्रवृत्तीलाही घालतो; निदान तसे करण्याचे विवाहस्वरूप खुषीच्या कराराने कबूल करतो. संभोगवैचित्र्याचा प्रश्न आधुनिक द्वितीय विवाहांतून उपस्थित होत नसून जुन्या श्रीमंती बहुपत्नीकत्वातून उपस्थित होतो.

'आज मैथुनासंबंधी स्त्रियांत आढळणारी व्यक्तिनिष्ठा' या मुद्द्यावर श्री. प्रभावती यांनी केलेले विवेचन बहुतेक अप्रस्तुत, थोडेफार दुर्बोध आणि अंशतः तरी अमान्य होणारे असे आहे. लेखिकेच्या पुढील उद्‌गारांचा निर्णय वाचकांनीच करावा- "हा स्त्रीस्वभाव लक्षात घेता, घटस्फोट हे सपत्नीकांच्या द्वितीय विवाहामुळे होणारा अन्याय टाळण्याचे साधन नव्हे असेच मला वाटते. कारण साधारणतः एकदा लैंगिक संबंध एका पुरुषाशी झाल्यानंतर त्या भावना त्याच्याबाबत त्या स्त्रीच्या मनातून नाहीशा होणे कठिण वाटते आणि यदाकदाचित् त्या

पुरुषाबाबत त्या तितक्या उत्कटतेने न जाणवल्या तरी दुसऱ्याच्या बाबतीत तर खासच उद्‌भवणार नाहीत. शिवाय, जो पुरुष पहिलीपेक्षा चांगल्या अशा दुसऱ्या स्त्रींच्या समागमाचा हव्यास धरतो व ती दुसरी प्रेमपूर्वक त्याचा स्वीकार करते त्या पतीकडून प्रथम पत्नीस लैंगिक दृष्ट्या असमाधान वाटणे अशक्य असते, या दृष्टीने पतीला तिजपासून समाधान वाटत नसले तरी तिला त्याचा त्याग करणे जडण जाणार."

यात स्त्रियांच्या कामविचारासंबंधी जे जे म्हटले आहे ते ते सर्व सामान्यतः पुरुषांच्याहीसंबंधी म्हणता येण्यासारखे आहे, एवढेच मतभेदादाखल म्हणता येईल. घटस्फोट हा द्वितीय विवाहावरही तोडगा नव्हे की पतीच्या विवाहबाह्य विलासावरही इलाज म्हणूनही मी सुचविला नव्हता. अशा परिस्थितीत एखादीस घटस्फोट हवा असल्यास ती मिळावा, संसारसुखही नाही आणि घटस्फोटही नाही असे होऊ नये एवढेच माझे म्हणणे होते.

आधुनिक द्वितीय विवाह हा जुन्या बहुपत्नीकत्वासारखाच, असे समजणारांस मी अशी जाणीव करून दिलेली होती की, त्यांतील कित्येकांस प्रथमपत्नीमुळे जिणे अशक्य झालेले असणे असंभाव्य नाही व त्यांतील कोणीच "एकाच वेळी दोन बायका" पाहिजेत म्हणणारे नाहीत. घटस्फोट रूढ असता तर त्यांनी तत्काल प्रथम पत्नीस मुक्त केले असते. जनानखाना बाळगणारांची व आधुनिकांची वृत्ती याबाबतीत भिन्न होय.

सौ. ताराबाई कुलकर्णी यांनी इतर लेखक-लेखिकांप्रमाणेच निषेधिलेल्या सर्व विवाहांस पतीच्या कामुकतेखेरीज किंवा प्रेमवेडाखेरीज काहीच कारण असू शकणार नाही असे गृहीत धरण्याची चूक केलीच आहे. पण त्यांनी व रा. वसंत कानेटकर यांनी मला विचारलेल्या एका प्रश्नाचे उत्तर देणे जरूर आहे. तो प्रश्न म्हणजे हे सर्व प्रेमविवाह होत असे मी कसे म्हणतो. रा. वसंत कानेटकर यांनी तर माझ्या इतर लिखाणांतील प्रेमविषयक ध्येयवादाचा उल्लेख करून या सर्व सपत्नीकांच्या द्वितीय विवाहांना मी 'प्रेमविवाह' हे नाव दिल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे. सौ. ताराबाई कुलकर्णी व रा. कानेटकर यांचा आक्षेप प्रथमदर्शनी तरी साधार आहे हे कबूल केले पाहिजे. पण त्याला थोडा फार आधार मिळण्याचे कारण मी 'किर्लोस्कर'मधील माझ्या पूर्वपक्षात अवलंबिलेली संक्षेपपद्धतीच होय. "अलीकडचे बहुतेक द्वितीय विवाह हे प्रेमविवाह होत हे त्या विवाहावर आग पाखडणारांनीच कबूल केले आहे" असे मी माझ्या पूर्वपक्षात असे मी माझ्या पूर्वपक्षात म्हटले आहे. अर्थात् हे विवाह प्रेमामुळे झाले असले तरीही ते निषिद्ध होत असे म्हणणारांसच तेथे उत्तर दिले आहे. त्यामुळे ज्यांना हे विवाह प्रेमविवाहच नव्हेत असे म्हणावयाचे आहे त्यांना तेथील विवेचन अपुरे वाटणे साहजिक आहे.

परंतु ही मंडळीदेखील बऱ्याच गोष्टी गृहीत धरीत आहेत. सुखी संसार आणि सद्गुणी बायको सोडून दुसरीच्या नादी लागणारास प्रेमाचा अर्थ काय कळणार, अशी यांची भूमिका आहे. तेच प्रथम विवाहात बायकोच्या दोषामुळे दुःखी आहेत अशी त्यांनी क्षणभर कल्पना करावी व मग त्यास द्वितीय विवाहात केवळ कामुकता असते असे म्हणावेसे वाटणार नाही. पण प्रत्येक द्वितीय विवाहात केवळ कामुकता असते असे म्हणावेसे वाटणार नाही. पण प्रत्येक द्वितीय विवाहात पत्नी हीच दुःखी आणि पीडित असते असे गृहीत धरण्यास निषेधकांस काही आधार नाही हे मला पुनः पुन्हा सांगणे जरूर वाटते. पण यांतील काही विवाह केवळ कामुक आकर्षणामुळे झाले असे गृहीत धरले तरी, आजच्या समाजास त्यांचेसंबंधी एवढा आकांडतांडव

करण्याचा अधिकार पोहोचतो असे वाटत नाही. आपल्या रूढ कल्पनांविरुद्ध विवाह करणारा हा, कामुकता व परपीडन या दोन पापांचा धनी आहे असे समजणे ही तर्कदृष्ट्या पहिली चूक निषेधक करतात; व आज घरोघर होत असलेले विवाह कामुकतेहून उच्च पायावर आधारलेले आहेत (किंबहुना प्रीतिविवाह आहेत! ) असे समजणे ही दुसरी चूक करतात. प्रचलित विवाहांना पैसा आणि कामुकता यांच्या शिवाय फारच थोडा पाया आहे हे ज्यांना कळून आले आहे त्यांची द्वितीय विवाहासंबंधी मने कळण्यास अधिक खोलात शिरावयास हवे. 'स्त्री'मध्ये ''कायदा नसला तरी'' या मथळ्याखाली माझ्या लेखावर टीका करणारी लेखिका बर्नाड शॉचे 'marriage is licenced prostitution' हे मत अभिमानाने उद्धृत करील, पण त्यातून निघणारे निष्कर्ष मात्र ओळखणार नाही.

या बाबतीतील माझी मूल्यपरंपरा निश्चित आहे व ती मी माझ्या 'राक्षसविवाह' या पुस्तकात, तसेच 'स्त्रीसंभोगाची मानसिक बाजू' (यशवंत दिवाळी अंक, १९४२) व 'माझी नैतिक मूल्ये' (धनुर्धारी, दिवाळी अंक, १९४३) यांसारख्या समाजशास्त्र व नीतिशास्त्रविषयक लेखांत यापूर्वीही मांडली आहेत. ज्या स्त्रीबद्दल कामुक आकर्षक वाटले तिजशी पैसा, व्यावहारिक फायदे वगैरेंकडे दुर्लक्ष करून विवाहबद्ध होणारे पुरुष हे पैसा आणि प्रजोत्पादन यांवर नजर ठेवून डोळे झाकून कोणाही स्त्रीशी जन्म घालवणाऱ्या पुरुषांहून नैतिकदृष्ट्या उच्चतर भूमिकेवर आहेत असे माझे मत आहे. ज्या पुरुषांस पोट भरणे, द्रव्यसंचय करणे आणि 'one woman is as good as another'' या मोपॉसाँच्या नीतीने वागून जिच्याबद्दल प्रेमही नाही आणि कामुक आकर्षणही नाही अशा स्त्रीशी जन्म काढमे याहून उच्चतर जीवन माहीत नाही त्यांचेहून कामुक आकर्षणाकरिता विवाह करणारे श्रेष्ठ होत. पोटभरूपणा, रंगेलपणा व ध्येयवादित्व या क्रमाने असणारी माझी मूल्यपरंपरा मी 'माझी नैतिक मूल्ये' या 'धनुर्धारी' दिवाळी अंकांतील लेखात स्पष्ट केली आहेत. आजची रूढ नीती पोटभरूपणाच्या पलीकडे गेलेली नाही. रंगेलपणाखातर ती मोडणारा मनुष्यही एका अर्थाने उच्चतर भूमिकेवरच असतो.

या नितिमूल्यांच्या अनुरोधानेच मी ''एकनिष्ठेचे बंधन प्रीतिविवाहातच इष्ट आहे व प्रीतिविवाहातच शक्य आहे'' असे म्हटले होते. या विधानामागील मूल्यपरंपरा तर राहोच, पण यातील शब्दार्थही ''कायदा नसला तरी'' च्या लेखिकेस कळला नाही. सदर लेखिका विचारते- ''इतरांनी ठरविलेल्या मुलीशी लग्न करून आजन्म एकपत्नीनिष्ठ राहणाऱ्या हजारो मध्यमवर्गीयांची कृती अनिष्ट समजायची काय?'' नीतिशून्य विवाहांत एकनिष्ठेचे 'बंधन' अनिष्ट असे मी म्हणतो त्याचा अर्थ एकनिष्ठेचे 'पालन' अनिष्ट असा लेखिकेस वाटत आहे! प्रीतिशून्य विवाहांत कोणी आजन्म एकनिष्ठा पाळली तर मला काही म्हणायचे नाही. पण अशा विवाहांत जर कोणी ती सक्तीने लावू लागेल तर ते मी अनिष्ठ म्हणेन. पण जेथे शब्दयोजनेची सूक्ष्मता जाणण्याची पात्रता नाही तेथे सामाजिक भावनांतील व रूढींतील सूक्ष्म ध्वनी ओळखण्याची पात्रता अपेक्षिणे व्यर्थ होय! येथे मी एवढेच सुचवितो की, केवळ दुसरे लग्न न करणे म्हणजे एकनिष्ठा असे समजण्याइतके स्थूल विचार आज फार थोड्यांचे राहिले आहेत. तसेच आजन्म एकत्र राहणे व मुलेबाळे हा प्रीतीचा नक्की पुरावा मानणाऱ्या मंडळींनी स्वतःस पुरोगामी म्हणवून घेण्याकरिता आटापीटा करू नये हेच बरे! माझी विचारसरणी सदर लेखिकेस कळण्याचा फारसा संभव नाही. तरी ज्यांस ती कळण्यासारखी आहे आणि आजवरच्या माझ्या लिखाणाच्याद्वारे थोडीफार केलेली आहे त्यांच्याकरता मी पुनः सांगतो की, परस्त्रीवर प्रेम नसणे हा स्वस्त्रीवरील प्रेमाचा नक्की आणि भरपूर पुरावा असे समजणारांपैकी मी नाही. एखादा मनुष्य चंचल नसेल, पण दगड किंवा पशू असेल! आणि यांपैकी कोणाच्या निष्ठेस अधिक किंमत द्यावयाची हे स्त्रियांना चांगले कळते!

अनुक्रमणिका

गेले सहा-सात महिने अनेक जातींच्या अनेक स्त्री-पुरुषांनी अनेक मासिकांतून चालविलेल्या ह्या वादात केवळ सपत्नीकांच्या द्वितीय विवाहासंबंधीचा निकाल लागत आहे असे नव्हे, तर सुधारकांच्या दोन पिढ्यांचाही निर्णय होत आहे. रानडे, आगरकर स्वतः प्रामाणिक, पुरोगामी व बुद्धिमान लोक होते. परंतु त्यांच्या दृष्टीहून अधिक सूक्ष्म आणि व्यापक समाजदृष्टी उपलब्ध असूनही त्यांच्या वेळच्या घोकीव तत्त्वांपलीकडे ज्यांची दृष्टी जात नाही त्यांस नवीन विचार आकलन होणे शक्य नाही. शॉ, इब्सेन, टॉल्स्टॉय, रोलाँ वगैरेंची वचने पाठ म्हणणारी मंडळीही चालू समाजमूल्याच्या चक्राबाहेर पडलेली नसतात. सामाजिक न्याय, अन्यायाच्या गोष्टी करणारी व गोष्टी लिहिणारी मंडळीदेखील बाजार-गप्पा, अज्ञान व दुराग्रह एवढ्या भांडवलावरच इन्साफ करण्याची उमेद धरतात.

आज नियतकालिक लेखन विपुल वाढले आहे. अशा स्थितीत प्रत्येक मोठा माणूस सूक्ष्म विचार करणाराच असेल असे नाही. पण निदान आपल्याखेरीज अन्य विचारसरणी असू शकतील याची जाणीव ठेवल्याखेरीज विचारांची वाढ तर राहोच पण विचारांचा विनिमयही होणे कठीण. दर मेलने येणाऱ्या इंग्रजी पुस्तकांची नावे विष्णु सहस्रनामाप्रमाणे घोकणारे लोकही चिपळूणकर, आगरकर, वामनराव यांच्या पलीकडे गेलेले नसल्याचे आढळून येते. ज्यांचे समाजपृथक्करण, इतकेच नव्हे तर जीवनमूल्येच वेगळी आहेत असे काही विचारवंत असू शकतील, याची जाणीवच या धोपटमार्गी विचारसरणीने नाहीशी झाली आहे. लोकहितवादी, केतकर, राजवाडेद्वय यांसारख्या महाराष्ट्रीयांच्या आणि विवेकानंद, शरच्चंद्र, रवींद्रनाथ, गांधी यांच्यासारख्या परप्रांतीयांच्या विचारांचा परिणाम आपल्याकडील पुरोगामी म्हणविणाऱ्या लेखकांवरही झालेला दिसत नाही व जुन्या सुधारकांचे जे चार-दोन सिद्धांत या मंडळींच्या तोंडी असतात त्यांचे अपरिहार्य अर्थ (implications) या मंडळींच्या गावीही नसतात.

केतकरवादी असो, गांधीवादी असो की मार्क्सवादी असो-कोणीही आधुनिक सुधारणावादी 'प्रचलित विवाह व प्रीतिविवाह एकच', 'आजचे द्वितीय विवाह व जुने बहुपत्नीकत्व एकच' असे म्हणण्याचा मूर्खपणा करणार नाही.

ज्यांना परंपरा व पोटभरू वृत्ती यांखेरीज जीवनमूल्ये माहीत नाहीत असे सुधारक व ज्यांची जीवनविषयक मूल्ये निश्चित आहेत, इतकेच नव्हे तर अभिनव व उज्ज्वल आहेत असे क्रांतिवादी यांच्या पिढ्या तोडण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत या पिढ्या पृथक् ओळखल्या जात नाहीत तोपर्यंत केतकर-मत म्हणजे फक्त विक्षिप्तपणा समजणे, गांधीवाद म्हणजे केवळ देवभोळेपणा मानणे आणि रशियाकडे बोट दाखविताच केसेसेच होणे हे चालू रहणारच.

समीक्षक, 'वादचर्चा',
एप्रिल १९४४, पृ. १७-२०.

अनुक्रमणिका

# ४०

## विविध विवाहांची आवश्यकता

आज आपल्या समाजात विवाह-स्वातंत्र्य आणि विवाह-वैचित्र्य वाढत आहे अशा आपण कल्पना करून घेतो. प्रीतिविवाह, वैदिक विवाह, रजिस्टर विवाह वगैरे हव्या त्या पद्धतीने आज आपण विवाह लावू शकतो. यामुळे कित्येकांस मोठे समाधान वाटते, तर कित्येकांस मोठे भय वाटते. त्यांना वाटते आता हे विवाह-स्वातंत्र्य जाणार तरी कोणत्या थराला?

आमच्या काही मित्रांची या बाबतीतील कल्पना तर याहूनही सोईस्कर आणि सुटसुटीत आहे. ''अमक्याच्या लग्नात बँड, वाजंत्री काही नव्हते'', ''तमकीच्या लग्नात वर गांधी टोपी घालून बोहल्यावर उभा होता'', ''परवा एक लग्न पाच रुपयांत झाले'' ''काल एका लग्नात भटजींनी मंत्र म्हणण्याऐवजी प्रधानमंडळातील एका नामदार प्रधानाचे भाषण झाले'' यांसारख्या हकीगती हे लोक 'क्रांती'च्या म्हणून सांगत असतात. पण एवढ्यावरून आपल्या विवाहविषयक कल्पनांत क्रांती झाली असे म्हणता येईल काय, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

माझ्या मते आपल्या विवाहविषयक कल्पनांवर जुन्या कल्पनांचा संपूर्ण पगडा आहे. विवाह हा एक शोभेचा समारंभ आहे. आपले ऐश्वर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा मिरवण्यास विवाहसमारंभासारखे फक्कड साधन नाही. हीच ती जुनी-पुराणी कल्पना होय. माझ्या या म्हणण्यावरून कित्येकांची अशी कल्पना होईल की, ही कल्पना प्रत्यक्ष लग्नसमारंभाच्या चारदोन दिवसांपुरतीच असेल. हुंडा ठरविणे, हुंडा घेणे, घेतल्यावर तो सग्यासोयऱ्यांच्या कानांत फुगवून सांगणे येथपासून तो प्रयोजने, मिरवणुकी, वगैरेपर्यंतच या श्रीमंतीच्या कल्पनांचा पगडा असेल. पण मी तर असे म्हणेन की, जुन्या लोकांच्या दृष्टीने हा समारंभ चारदोन दिवसांचा नसून सबंध जन्माचा असतो. बायकोच्याद्वारे नवरा आणि नवऱ्याच्याद्वारे बायको श्रीमंतीचे आणि सुस्थितीचे प्रदर्शन करण्याचा कार्यक्रम जन्मभर चालू ठेवतात. आणि या ऐश्वर्यकल्पनेचा परिणाम वधूवरांची निवड आणि विवाहानंतरची त्यांची समाजातील वागणूक यांवर कायम होत राहतो. आणि याबाबतीत वरात काढून लग्न करणारे जुने लोक आणि व्याख्यान करून लग्न करणारे नवे लोक या दोघांत काडीचेही अंतर नाही.

पण जुन्यानव्यांस सारखे लेखण्यात माझी एक चूक होत आहे. आणि त्या चुकीमुळे जुन्या लोकांवर अन्याय घडत आहे. नवीन लोकांप्रमाणे जुन्या लोकांत ''सोशल स्टेटस्''च्या कल्पनेला प्राधान्य असले, तरी वैयक्तिक सोईलाही त्यात पुष्कळच वाव असे. म्हणजे एखादा विवाह जातिभेदाचे नियम आणि धार्मिक विधीचे नियम यांच्या आड येत नसल्यास त्यात फालतू गोष्टींचा विचार करावयास लागत नसे आणि त्या वेळी 'लोक हसतील की काय' या कल्पनेची भीती आजच्या पुरोगामी म्हणविणाऱ्या काळाहूनही कमी होती. एखादा श्रीमान् मनुष्य-किंबहुना गरीबही मनात येताच आणि अनुकूलता दिसताच हवी तेव्हा आणि हवी तितकी लग्ने करी. नाना फडणीस आणि सखारामबापू यांचा बरेच दिवस धुमसत असलेला तंटा सामोपचाराने मिटताच वयोवृद्ध सखारामबापूंना इतका हर्ष झाला की, त्यांनी साठीच्या घरात अष्टवर्षाकन्येशी आणखी एक विवाह उरकून घेतला. हा त्यांचा तिसरा विवाह होता की चौथा होता हे माझ्या लक्ष्यात नाही.

अनुक्रमणिका

ही परिस्थिती स्त्रियांच्या दृष्टीने मोठीशी सुखावह किंवा सुधारलेली नसेल. पण एक पक्ष म्हणजे वरपक्ष तरी त्या काळी आजच्याहून अधिक मुक्त आणि धीट असे.

आजची आपली विवाहसंस्था मात्र भीती, लोकलज्जा, धागधूग यांच्याच दडपणाने वाकून गेलेली आहे. स्थूलमानाने या भीतीचे दोन उगम असल्याचे आढळून येईल. एक भीती इष्टमित्रांची आणि दुसरी भीती खुद्द वधूची अगर वराची. वधूची भीती म्हटल्यास कित्येकांना आश्चर्य वाटेल. तथापि, वधूच्या निवडीत आकर्षणाइतकाच भीतीचा भाग असतो. ती बेईमान अगर डोईजड झाल्यास सुंदर अगर श्रीमंत असून तरी फायदा काय? आणि सुंदर अथवा प्रिय होण्यासारख्या वधूमुळेदेखील इष्टमित्रांचा राग होत असेल तर तिचा उपयोग काय? अशी दुहेरी भीती आजच्या निवडीचे नियंत्रण करीत असते. आणि ज्यांना आपण इष्टमित्र, वडीलधारी माणसे, वगैरे म्हणतो त्यांच्यासंबंधीच्या भीतीचेही थोडे पृथक्करण करावयास हवे. आणि तसे केल्यास ते सर्व अखेर नोकरीवाल्या समाजाच्या नोकरी लागण्याच्या भीतीपलीकडे काही नाही अथवा दरिद्री समाजाच्या, मोडकातोडका आधार गमावण्याच्या भीतीपलीकडे काही नाही असे आढळून येईल. बाबासाहेब रागावतील याचा अर्थ त्यांचे मित्र तात्यासाहेब रागावतील असा असतो. आणि तात्यासाहेब रागावतील याचा अर्थ त्यांच्या वशिल्याने आमच्या पुरोगामी आणि बंडखोर नवरदेवाची टेंपररी खात्यातील नोकरी कायम होण्याचा संभव दुरावतो एवढाच असतो.

माझ्या एका प्रख्यात साहित्यिक मित्रासमोर आम्हा दोघांच्या मित्राच्या द्वितीय विवाहाच्या विचारासंबंधी चर्चा चालली होती. नवीन झालेल्या कायद्यांच्या अडचणींचा अर्थात्च मला बाऊ वाटत होता. तर उलट माझे प्रख्यात मित्र म्हणाले, "कायद्याचा बाऊ आम्हांला नाही वाटत! लग्न करतील नाहीतर तसेच एकत्र राहातील. त्याच्याबद्दल आम्ही त्याला दोष देणार नाही-पण एक सांगतो तुम्हांला, हे त्याच्यासारख्यांचे काम नव्हे!"

माझ्या विद्वान् मित्राच्या बोलण्याचे मला आश्चर्य वाटले. जर वधू-वर राजी असतील तर अमक्याचे ते काम नव्हे, याला अर्थ काय? त्यातून विवाहाचा विचार करणारा माझा मित्र पुरोगामी होता व त्याची वधूही सुशिक्षित नि प्रौढ होती. सपत्नीकांच्या द्वितीय विवाहासंबंधी कायदा नसता तर ते विवाह करू शकले असते असे माझे म्हणणे. खुलाशादाखल मी काही विचारताच माझे विद्वान् मित्र उसळून म्हणाले, "अहो ज्याची प्राप्ती शंभराच्या आत आहे आणि ज्याला केव्हा कोणापुढे तोंड वेंगाडावे लागेल याचा नेम नाही तो म्हणे शिकलेल्या आणि श्रीमंताच्या मुलीशी दुसरे लग्न करणार! त्याला जगाला धुडकावण्याची धमक लागते."

मला या उद्गाराचे थोडे आश्चर्य वाटले. कारण याचा अर्थ विवाह-स्वातंत्र्य हा पुरोगामित्वाचा प्रश्न नसून श्रीमंतीचा प्रश्न आहे असा सरळ होत होता. जुने लोक एकांगी का होईना पण जेवढे विवाह-स्वातंत्र्य उपभोगीत होते तेवढेही नवीन लोक उपभोगीत नाहीत असा याचा अर्थ झाला.

सामाजिक प्रतिष्ठेच्या कल्पनांतून विवाहसंस्था मुक्त करून खऱ्याखुऱ्या सुखाची, निदान सोईची व या संस्थेची गाठ घालून द्यायची म्हटल्यास आपल्या विवाहविषयक कल्पना बऱ्याच बदलल्या पाहिजेत.

अनुक्रमणिका

पूर्वी विवाहाचे आठ प्रकार होते असे आपण म्हणतो. त्यातले उरले असे फार थोडे. शिवाय, काव्यात केवळ आदर्श पतिपत्नींचे वर्णन करताना, पत्नी पतीला अनेक नात्यांनी घरधनीण, सल्लागार, मैत्रीण, आवडती शिष्या, वगैरे नात्यांनी उपयोगी पडे असे वर्णन आपण करीत होतो. पण काव्यातील हे आदर्श आणि रोकड्या व्यवहारातील 'शोभण्याची' कल्पना या दोहोंचाही नव्या युगात फेरविचार व्हावयास हवा. आज ज्या अनेक हेतूंनी लग्ने होतात त्यांचा या दृष्टीने विचार करण्यासारखा आहे. ज्या विवाहात वडीलधाऱ्या माणसांची हौस भागेल असा विवाह; वधू-वरांत वैयक्तिक आकर्षण असल्यामुळे होणारा विवाह; मिळवत्या प्रौढ पुरुषाची कौटुंबिक गरज म्हणून (केवळ लैंगिक गरज म्हणून नव्हे) होणारा विवाह; श्रीमंत, प्रसिद्ध व सामाजिक महत्त्व पावलेल्या व्यक्तींची सामाजिक गरज (आतिथ्यविषयक, समारंभविषयक, इत्यादी) म्हणून होणारे विवाह; प्रसिद्धही नव्हेत आणि श्रीमंतही नव्हेत अशा माणसांस भासणाऱ्या आधाराच्या गरजेमुळे होणारे विवाह. एवढे आज होणाऱ्या विवाहांतही प्रकार असल्याचे दिसून येईल.

पण प्रकार एवढे असले तरी या सर्वांना मान्यता आहे असे नव्हे. वडील माणसांची हौस म्हणून लग्न करणारा सुशिक्षित तरुण आपला प्रीतिविवाह झाला नाही म्हणून खट्टू असतो. प्रीतिविवाह करून बसलेला तरुण (अर्थात् त्याला मन असल्यास) वडील माणसे दुखावली गेली म्हणून खिन्न होतो आणि वाळीत टाकल्यासारखा वेगळा राहातो! ज्या नूतन विवाहाच्या अवस्थेत त्याला पत्नीइतकीच कौतुकाची गरज असते त्या अवस्थेत तो कौतुकाला पारखा होऊन बसतो! आणि कित्येकदा त्याच्या 'नवप्रसूत कांतेस' बाळंतविडा करण्यास नर्सखेरीज कोणीही उपलब्ध नसते.

एखादा मिळवता आणि प्रतिष्ठित मध्यमवयीन पुरुष आपल्याच वयाच्या आणि दर्जाच्या प्रौढ कुमारिकेशी लग्न करतो. पण समारंभास जमा झालेल्या आप्तेष्टांच्या चेहऱ्यावर-किंबहुना स्वतः वधूवरांच्या चेहऱ्यावरही उत्सवाची मंगल छटा नसते. आणि याचेही कारण अद्याप आपल्या अंतर्मनावरील त्या मुंडावळ्या बांधलेल्या लाजऱ्या अल्लड वधूची आणि 'मंगल मातल्यामुळे' बेहोषपणे आनंद आणि मस्करी करणाऱ्या वऱ्हाड्यांची छायाचित्रे पुसून गेलेली नाहीत हेच होय. आणि यापुढे मी निर्देशिलेल्या दोन विवाह-प्रकारांत अर्थात् सामाजिक गरज म्हणून अथवा वैयक्तिक आधार म्हणून केलेल्या विवाहांत तर उत्सवापेक्षा उत्तरक्रियेची काळी छायाच अधिक असल्यास आश्चर्य नाही! आणि यामुळे ज्या विवाहांना हरकत नाही त्या विवाहांतसुद्धा आनंद नाही, अशी स्थिती आढळून येईल. आणि याकरिताच आपण तोंडाने पुरोगामित्वाची भाषा बोलत असताही आपल्या मनात ज्या जुन्या विवाहचित्राने घर केलेले असते ते चित्र पुसून काढले पाहिजे.

माझ्या या शब्दांचा अर्थ मी जुन्या पद्धतीचा विवाह खणून काढावयास निघालो आहे असाही काही लोक घेतल्यावाचून राहणार नाहीत. पण मला त्यांस हे सांगावयाचे आहे की, येथे मला वैवाहिक सुधारणेची 'केस' मांडावयाची नसून, वैवाहिक वैचित्र्याची आवश्यकता प्रतिपादावयाची आहे. समाजातील जबाबदार स्त्री अगर पुरुष जी गोष्ट विचारपूर्वक करील ती गोष्ट करताना त्या व्यक्तीला अगर तिच्या आप्तेष्टांना ओशाळल्यासारखे वाटणे हे गुलामांच्या अगर शूद्रांच्या मनोवृत्तीचे लक्षण होय. कोणता विवाह श्लाध्य आणि कोणता अश्लाध्य यावर या लेखात मला भर द्यावयाचा नाही, तर सर्वांनाच श्लाध्य वाटणाऱ्या विवाहातही केवळ अंतर्मनात चाललेल्या तुलनेमुळे वैगुण्य वाटणे या दौर्बल्याकडे मला लक्ष वेधावयाचे आहे.

पण याकरिता विवाहविषयक कल्पना बदलूनच चालणार नाहीत, तर विवाह हा शब्ददेखील बदलावा लागेल. कारण वेगवेगळ्या विवाहांच्या बाबतीत एकच शब्द वापरल्यामुळे हा गोंधळ उडत आहे असे दिसून येईल.

आणि या दृष्टीने अष्टविध विवाहांप्रमाणे मला नवीन पंचविध विवाह सुचवावयाचे आहेत.

(१) कुलविवाह, (२) प्रीतिविवाह, (३) गृहविवाह, (४) आतिथ्यविवाह आणि (५) आधारविवाह.

कुलाच्या प्रतिष्ठेकरिता आणि वडीलधाऱ्या माणसांची हौस करण्याकरिता होणाऱ्या विवाहास 'कुलविवाह' म्हणावे असे मला वाटते. स्त्रीपुरुषांनी-मग ते तरुण असोत की पोक्त असोत, एकमेकांसंबंधी आकर्षण वाटून केलेल्या विवाहास 'प्रीतिविवाह' असे म्हणावे. विशिष्ट व्यक्तीविषयी आकर्षण वाटत नसूनही जाणत्या स्त्रीने अगर पुरुषाने घर थाटण्याकरिता केलेल्या विवाहास 'गृहविवाह' म्हणावे. हा जसा प्रेमामुळे झालेला विवाह नसेल तसाच वडील माणसांच्या अगर गणगोताच्या मनोरथाप्रीत्यर्थ केलेला विवाहही नसेल. 'आतिथ्यविवाह' आणि 'आधारविवाह' यांतील हेतू नावावरून स्पष्ट होतो. हे दोन विवाह जुन्या विवाहातून त्यातल्या त्यात भिन्न असणार आणि याही विवाहाकडे जुन्या हौसेच्या आणि समारंभाच्या दृष्टीने पाहिल्यास ते कधीच रुचणार नाहीत हे उघड आहे व मनावरील हे जुने दडपण काढून टाकण्याकरिता त्यांचे बाबतीत 'विवाह' हा शब्द न वापरणेच उपयुक्त होईल. पण या शब्दाची आपल्या मनावर एवढी जबर पकड आहे की, 'विवाह' म्हटला न जाणारा कोणताही स्त्री-पुरुषसंबंध आपण अनीतीत गणू!

आणि दुहेरी पेच उत्पन्न होतो तो येथेच. 'विवाह' शब्द सार्वत्रिक करावा तर अष्टवर्षाविवाहाच्या काळचे वरात, घास घालणे, नाव घेणे वगैरेंचे जुनाट किटण अंतर्मनात नकळत गर्दी करते आणि 'विवाह' न म्हणावे तर आपल्या सन्मान्य पूर्वजांप्रमाणे आपण दासी, उपपत्नी अगर रखेली बाळगण्याच्या राजमान्य संप्रदायाचे पुनरुज्जीवन करीत आहोत की काय अशी शंका आपल्या मनात येते व म्हणून धार्मिक विधिपूर्वक केलेल्या विवाहासच एकाहून अधिक नावे रूढ केल्याशिवाय आपली ही एकसाची विवाहकल्पना बदलणार नाही.

महाराष्ट्रीय ब्राह्मणांहूनही अभिमानी आणि सोवळे असे मलबारमधील नंबुद्री ब्राह्मण हे अब्राह्मण अशा नायर स्त्रीशी लग्न करतात. आणि तरीहि जात, प्रतिष्ठा अगर सोवळे यांतील एकासही पारखे होत नाहीत! आणि याला कारण म्हणजे या जातिबाह्य विवाहास 'विवाह' न म्हणता 'संबंधम्' म्हणण्याची योजना त्यांनी करून ठेवली आहे!

केवळ एकाच गोष्टीबद्दल दोन शब्द वापरल्याने नंबुद्री ब्राह्मणांसारख्या सोवळ्या ब्राह्मणांच्या धर्मभावना शाबूत राहातात. यावरून केवळ शब्दानेही बरीच क्रांती होऊ शकते असे दिसून येईल.

मी सुचविलेल्या पाच विवाहांपैकी शेवटच्या दोन विवाहांस अनुक्रमे 'आतिथ्यम्' आणि 'आधारम्' अशी नावे दिल्याने विवाहसंबंधाची आपली जुनाट आणि एकसाची वृत्ती थोडी बदलून विवाहासंबंधीचा वास्तव दृष्टीकोन वाढण्यास मदत होईल.

रसना,
ऑगस्ट १९४७, पृ. ४३-५०.

अनुक्रमणिका

## आधुनिक विवाह असुखावह होणे अपरिहार्य आहे काय?

प्रथमतः 'आधुनिक विवाह' हे शब्द मी कोणत्या अर्थाने वापरतो हे सांगितले पाहिजे. कारण आजही 'प्राचीन' विवाह होत नाहीत असे नाही! जो विवाह वडील माणसांनी ठरविण्याऐवजी वधू-वरांनी स्वतःच अगर स्वतःच्या जबाबदारीवर ठरविला असेल त्याला मी 'आधुनिक विवाह' असे म्हणतो. कारण त्या विवाहातून निघणारी सुखदुःखे ही जुन्या विवाहातून निघणाऱ्या सुखदुःखांहून सर्वस्वी भिन्न असतात.

पण त्याचबरोबर प्रौढ व सुशिक्षित अशा सर्वच वधू-वरांचे विवाहही मी आधुनिक विवाहांच्या जातीत अंतर्भूत करीन. कारण अशा वधू-वरांच्या वैवाहिक जीवनात उद्‌भूत होणारे प्रश्न जुन्या जीवनात उद्‌भूत होणाऱ्या प्रश्नांहून प्रायः भिन्न आहेत.

तसेच 'असुखावह विवाह' हे शब्द मी कोणत्या अर्थाने वापरतो हेही सांगितले पाहिजे. नाही तर आधुनिक विवाह तितके सर्व दुःखमय असा माझ्या म्हणण्याचा अर्थ होईल. जुन्या 'सुखी' संसारापेक्षा आधुनिक 'दुःखी' संसारातदेखील अधिक सुख असते, हे माझे मत मला प्रथम सांगितले पाहिजे. कारण जुन्या घरात दुःख आहे की सुख आहे हे कळण्यालाच फारसा मार्ग नसे! त्या घरच्या दुःखाला 'आवाज करण्या'ची बंदी असे. कित्येकदा घरधनीण दुःखी असूनही घर सुखी असल्याचा देखावा दिसे. कित्येकदा धनी आणि धनीण दोघेही दुःखी असूनदेखील घर आबाद असल्याचे नाटक दिसे. कारण दोघांनाही राबवून मिष्टान्नावर ताव मारणारे आप्तेष्ट, त्या जुन्या 'मोठ्या' घरांना 'मोठी'च शोभा आणीत!

असे असूनही मी नव्या घरातील दुःखांचाच विचार करीत आहे, याचे कारण नवे दुःख बोलके झाले असल्याने त्याची चर्चा अधिक होत आहे. आणि नवे विवाह आम्ही नवीनांनी समाजात आणले असल्याने त्यांच्या दोषांचे निवारण करणे हे आमचे पहिले कर्तव्य आहे. कारण जुने लोक तर आपल्या फजितीला टपलेलेच आहेत!

नव्या विवाहातील असंतोषाचा काही अंश वडील माणसां'कडे' आणि वडील माणसां'पासून' असतो. प्रौढ वधू-वरांनी जुळविलेल्या विवाहास वडील आप्तेष्टांची अनुमती नसल्यास, ममतेला आणि कौतुकाला तर मुकावे लागतेच, पण कित्येकदा त्यांच्या रोषाला आणि विरोधालाही तोंड द्यावे लागते. तसेच अशा विवाहापासून वडील मंडळींना आणि एकंदर कुटुंबालाही कित्येकदा बराच मानसिक त्रास सहन करावा लागतो. कारण ज्यांच्यावर आपण प्रेम केले आणि ज्यांच्या हिताकरिता आपण खस्ता खाल्ल्या त्यांच्या कृतघ्नतेहून-अगर बेपर्वाईहूनही अधिक तापदायक गोष्ट दुसरी नाही.

आधुनिक वधू-वर कदाचित वडील माणसांच्या दुःखाचा अथवा विरोधाचा तितकासा विचार करणार नाहीत; पण तेवढ्याने आधुनिक विवाहसंस्था निर्विघ्न आणि निर्दोष होईल असे मात्र नव्हे. कारण आधुनिक वैवाहिक जीवनातील खरे दुःख वडील माणसांच्या विरोधामुळे निर्माण होत नसून तरुण माणसांच्याच-प्रेमी

जनांच्याच-अन्तविरोधातून निर्माण होते. मला वाटते य. गो. जोशी यांच्यासारख्या जुन्या कुटुंबसंस्थेच्या अभिमान्यांनीच एका कादंबरीत म्हटले आहे की, ''खरे प्रेमच कित्येकदा फार त्रागा करते!'' प्रेमविवाहात जोडपे जितक्या त्वेषाने भांडू शकेल तितक्या त्वेषाने जुने जोडपे भांडू शकणार नाही. कारण खरे भांडण बरोबरीच्या माणसांतच होऊ शकते. आणि जुन्या विवाहात बरोबरीचा संभव नसल्याने, छळ होत असे-पण भांडण होत नसे!

भांडण करणे हा प्रेमविवाहितांचा एक महत्त्वाचा हक्क असला तरी, त्यातून कायमचे वितुष्ट निर्माण झाल्यास त्या प्रेमी युग्माला प्रेमाचीही कला माहीत नाही आणि भांडणाचीही कला माहीत नाही, असे मी म्हणेन. चिरसहवासाने बोथट होऊ लागलेल्या भावनांना धार येण्यापुरताच भांडणाचा काय की विरहाचा काय उपयोग व्हावयास हवा.

पण ते काहीही असले तरी, प्रेमविवाहातील भांडण मुळात व्हावेच काय म्हणून हाही प्रश्न महत्त्वाचा आहे. आणि याचा उपयोग प्रेमविवाहाचे विरोधक तर प्रेमविवाहाची अनिष्टता सिद्ध करण्याकडेही करतात. व्यक्तिमत्त्वाची वाढ हे आजच्या सर्वच जीवनाचे वैशिष्ट्य आहे. त्यातून स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाला किंवा निदान त्याच्या प्रदर्शनाला अवसर असा अलीकडेच मिळत आहे. त्यामुळे पत्नीच्या स्वतंत्र वृत्तीला नव्या संसारात प्रथम कौतुक व नंतर विरोध यांचा अनुभव येणे अपरिहार्य झाले आहे. त्यामुळे आधुनिक जीवनात तरुण पति-पत्नी कित्येकदा पोरकट अहंकाराचे आणि मतभेदाचे स्तोम माजवून असंतोष निर्माण करताना आढळतील. किरकोळ वादात अशिक्षित स्त्रियांदेखील हार खात नाहीत; मग ''कॉम्प्लेक्स'', ''टीरनी'', ''आर्बिट्ररी'' यांसारखे घसघशीत इंग्रजी शब्द वापरणारी सुशिक्षित वधू तर नवऱ्याला सहजच चूप बसविते! जुन्या स्त्रियांना उघडपणे पड खाण्यात कमीपणा वाटत नसे. आधुनिक स्त्रियांना ते सयुक्तिकही वाटत नाही की शक्यही वाटत नाही. एकादेवेळी त्याही हार खातील; पण ती अशा ऐटीत खातील की बिचाऱ्या नवऱ्याला त्यांच्या त्या पराजयातील आणि तदनंतरच्या (तुच्छतागर्भ! ) मौनातील 'सुऱ्या' चांगल्याच जाणवाव्या!

व्यक्तिमत्त्वाची वाढ म्हटली की अपेक्षांची वाढ आलीच. आधुनिक विवाहित स्त्री-पुरुष असुखी असण्याचे कारण त्यांच्या अपेक्षा जुन्या संसारी मंडळींच्या अपेक्षांहून अधिक वाढल्या आहेत, हेही आहे. बरोबर स्वतःची लहानशी सतरंजी घेऊन (अपत्यद्वयांसह! ) कथाकीर्तनाला जाणारी जुनी गृहिणी सुखी असली, आणि दोन तासांच्या 'सिनेमा शो'च्या वेळीदेखील पोराबाळांचा 'शो' करणे खेडवळपणाचे समजणारी आधुनिक घरधनीण असंतुष्ट झाली तर, त्यात आश्चर्य असे काहीच नाही. मुलेबाळे, पाहुणे, आजारीपण, बाळंतपण या प्रत्येक बाबतीत आधुनिक जीवनातील वाढत्या अपेक्षांचीच अडचण अधिक होते. बिचाऱ्या मुलांच्या आगमनावरही इलाज निघाले, पण पाहुण्यांच्या आगमनावर मात्र गृहिणींना अद्याप तरी तोड सापडली नाही! पण माझा सांगण्याचा मुद्दा वेगळाच आहे. या सर्व बाबतींत आधुनिक पति-पत्नी पुष्कळदा असंतुष्ट दिसत असली तरी, त्याचे कारण आधुनिक घरातून 'सुखाने' पळ काढला आहे हे नसून आधुनिक घरात अधिक सुखाकांक्षांनी गर्दी केली आहे हेच आहे.

पण आतापर्यंत मी किरकोळ धुसफुशीची कारणे कथन केली; आता प्रेमविवाहात अगर आधुनिक जीवनात शिरलेल्या एका खास विकाराची नोंद केली पाहिजे आणि तो विकार म्हणजे 'स्त्री-पुरुष-मैत्री'! ''जे

तरवारीने उत्कर्ष पावतात, ते तरवारीनेच नाश पावतात" अशी इंग्रजीत म्हण आहे. जी लग्ने स्त्री-पुरुषांच्या आकर्षणामुळे जुळतात, ती स्त्री-पुरुषांच्या आकर्षणातच गारद होतात-निदान जखमी होतात, असे म्हणता येईल! ज्या आकर्षणाच्या आणि स्वातंत्र्याच्या वाटेने प्रेमविवाहातील पती येऊन पोहोचला ती वाट विवाहानंतर एकदम बुजून जाते असे नाही. फक्त ती सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या बंद आहे असे जाहीर करण्यात येते. स्त्रियांच्या आकर्षकतेला आणि स्वातंत्र्याला सामाजिक मान्यता हे प्रीतिविवाहाचे मूळ आहे. पूर्वीच्या पिढ्यांतही स्त्रिया आजच्याप्रमाणेच पुरुषांना आकर्षित करू शकत असत. परंतु एखाद्या स्त्रीच्या आप्तेष्टांनी पुरुषास विवाहासंबंधी विचारणा करीपर्यंत तिच्या आकर्षकतेची दखल घेणे अप्रतिष्ठितपणाचे मानले जाई. आणि एखाद्या पुरुषाने तिच्या सौंदर्याची दखल घेतली तर, तिला अगर त्याला विवाहाच्या दृष्टीने पुढाकार (initiative) घेता येत नसे. आज स्त्रीविषयक आकर्षण आणि विवाहविषयक अपेक्षा दाखविण्याची रूढी हळूहळू समाजमान्य होऊ लागल्यानेच प्रीतिविवाहाची शक्यता उत्पन्न झाली आहे. पण त्या रूढीस मिळालेल्या मान्यतेमुळेच स्त्री-पुरुष-मैत्री ही नवी चीज समाजात उत्पन्न झाली आहे. कारण परिचयातून प्रेम व प्रेमातून विवाह असा क्रम असली तरी, विवाह एकाच ठिकाणी शक्य असल्याने ज्यांचा परिचय झाला, पण प्रेमापर्यंत प्रगती झाली नाही, असे काही परिचित स्त्री-पुरुष समाजात निर्माण होतात. इतकेच नव्हे तर ज्यांच्याशी प्रेम जमले पण काही व्यावहारिक अडचणीमुळे विवाह होऊ शकला नाही असेही स्त्री-पुरुष समाजात दिसू लागतात. पूर्वी समाजात स्त्री-पुरुष-मैत्री अजिबात नव्हती असे नाही. पण ती बहीण-भावासारखी किंवा जीत शारीरिक आकर्षणाचा भाग नाही अशी असेल तरच तिला समाजात मान्यता मिळे. आज जे उघड उघड एकमेकांच्या शारीरिक आकर्षणामुळेच मित्र बनले असे अनेक स्त्री-पुरुष समाजात दिसणे अपरिहार्य झाले आहे. विवाहाची शक्यता नाहीशी होताच त्यांना आपल्या प्रेमाला निराळे वळण लावता आले असते. पूर्वीच्या जमान्यात तो प्रयत्न झाला असता किंवा निदान तसा प्रयत्न करणे प्रतिष्ठित संकेत तरी झाला असता; पण आजच्या आधुनिक दृष्टिकोनाप्रमाणे असे करणे अनावश्यक ढोंगीपणात जमा होते! व त्यामुळे जे एकमेकांना आकर्षक समजतात, जे नातेवाईक नाहीत आणि जे एकदा एकमेकांच्या प्राप्तीची धडपड करीत होते असे अनेक स्त्री-पुरुष प्रीतिविवाही समाजात वावरणे अपरिहार्य असते. स्त्री-पुरुषांतील हे नाते आपल्या समाजात तरी नवेच आहे. या नात्यातूनच इंग्रजी कथा-कादंबऱ्यांच्या वाचकांना परिचित असा सुप्रसिद्ध प्रेमाचा त्रिकोण तयार होतो.

विवाहापूर्वीच्या मैत्रीतच या त्रिकोणाचा जन्म आहे असे नाही. विवाहानंतरही स्त्रीचा पुरुषाशी परिचय आणि पुरुषाचा स्त्रीशी परिचय होऊन त्याचे पर्यवसान तिघांनाही उपद्रवकारी अशा मैत्रीत होऊ शकते. पण या सर्वांचेच मूळ समाजाने स्त्री-पुरुषांच्या आकर्षणास आणि परिचय-स्वातंत्र्यास दिलेल्या मान्यतेत आहे. आणि ही मान्यता असल्याखेरीज तर प्रीतिविवाह किंवा परिचयपूर्वकही विवाह होणे शक्य नाही. अशा प्रकारे प्रीतिविवाहाबरोबरच त्या विवाहाच्या विच्छेदाचे बीजही जन्माला आले आहे.

या सर्वच स्नेहाचे पर्यवसान वैवाहिक सौख्याच्या नाशात होते असे नाही. प्रीतिविवाह रूढ नसताही असा त्रिकोण तयार होतच नसे असेही नाही; पण त्या वेळी स्त्रीपुरुष-परिचयातील औचित्यकल्पना फारच कडक असल्याने पतीच्या अगर पत्नीच्या रोषाच्या भीतीनेही अशा स्नेहाचे बी जमिनीतच जळून जाई. आज कादंबऱ्या आणि चित्रपट यांत या त्रिकोणाखेरीज पानच हालत नसल्याने, जीवनातही असे त्रिकोण करणे, पाहणे आणि चर्चिणे हे आधुनिकतेचे लक्षण होऊ लागले आहे!

अनुक्रमणिका

अशा विवाहबाह्य स्नेहामुळे थोडा पेच निर्माण होणे अगदी अस्वाभाविक अगर भयंकर आहे असे मी म्हणत नाही. समाजात प्रीतिस्वातंत्र्य अजिबात नव्हते, तेव्हाही असे नाजूक धागे नकळत जीव धरीत. पण आजच्या समाजात स्त्री-पुरुष आपल्या आधुनिकतेच्या खुळचट कल्पनांनी हे प्रॉब्लेम्स निष्कारण वाढवितात असे आढळून येईल. आधुनिक स्त्रीची सवत, दहातील नऊ उदाहरणांत, तिनेच कौतुकाने घरात आणलेली 'इंट्रोड्यूस करून दिलेली' एके काळची 'मैत्रीण' असते असे आढळून येईल. नवऱ्याला न आवडणारा, स्त्रीचा स्नेहीदेखील बहुधा त्यानेच आधुनिकतेच्या प्रौढीने उत्तेजिलेला एके काळचा त्याचा 'स्नेही'च असतो. या बाबतीत स्त्रीने पुरुषावर आणि पुरुषाने स्त्रीवर नियंत्रण घालणे अनुदारपणाचे, भित्रेपणाचे आणि मागासलेपणाचे लक्षण समजण्यात येते. "आपल्याला नाही त्याचे काही वाटत!"; "I have given complete freedom to my wife!"; "She knows here own responsibility!" इ. इ. म्हणणाऱ्या पतींच्या घरांतील प्रेमाचे आणि विश्वासाचे वातावरण नाहीसे होऊ लागले तरी, त्यावर उघड दिसणारा इलाज करणेही त्यांस कमीपणाचे वाटते. आणि इकडे स्त्री तर मोहाच्या ओढीमुळे घसरत असते!

माझ्या माहितीच्या एका तरुण सुस्वरूप स्त्रीकडे एक आचरट तरुण नुकताच येऊ लागला होता. त्याचा येण्यातील उद्देश आणि तो स्वतः दोघेही उघड उघड इतके आचरट होते की त्याला घर बंद करण्यात संकट वाटण्याचेही कारण नव्हते. आणि तरीही नवराबायकोंत त्याच्या निमित्ताने चांगलाच वाद झाला. बायको म्हणे- "तुम्ही त्याला मजपर्यंत आणलातच कशाला!" नवरा म्हणे- "बसमध्ये गाठ पडली तेव्हा, तू त्याच्याशी अपॉइंटमेंट घेतल्याचे तो मला सांगत होता!" इतक्यातूनही त्याचे येणे आणि यांचे वाद वाढू लागले तेव्हा मी त्या दिलदार पतीला म्हटले-

"तुमचे दोघांचेही, तो आचरट आहे याविषयी जर मतैक्य आहे आणि तुमच्या मिसेस जर थोड्या भिडस्त आहेत-तर तुम्हीच त्या आचरटाला रस्ता का दाखवीत नाही?" त्यांनी उत्तर केले, "ती गोष्ट अगदीच सोपी आहे, पण तसे करीन तर ते 'नवरेपणा' गाजविण्यासारखे होईल!"

ही 'नवरा' ठरण्याची भीती ही एक खास आधुनिक चीज आहे! तिला जुन्या जमान्यात स्थान नव्हते आणि जुन्या पतींना तिचा अर्थही कळणार नाही! याच पतीने वेळ पडल्यास चार गुंडांशी दोन हातही केले असते! तो शारीरिक धाडसात उणा नव्हता. पण 'आधुनिकते'विरुद्ध पाऊल टाकणे त्याला भयंकर वाटत होते. पूर्वीच्या जमान्यात वडिलांची अवज्ञा करणे-वडिलांकडे दोष असला तरीही! —जसे जिवावर येई, तसे आजच्या जमान्यात अज्ञान माणसांना धाक लावणे जिवावर येते! कारण त्यात आधुनिकतेचा अवमान होतो!

पण याचा परिणाम कधी कधी मोठा करुणास्पद होतो आणि तो झाल्यावर इलाज नसतो. अशाच एका दिलदार आधुनिकाची स्वातंत्र्याचे खेळ खेळून पोळलेली पत्नी तापदायक अनुतापाच्या क्षणी जे म्हणाली ते मी कधीही विसरणार नाही.

ती मला म्हणाली, "वेळीच त्यांनी माझा तोल सावरायला हवा होता!"

अनुक्रमणिका

त्यावर मी म्हणालो, "पण ते उदार आणि पुरोगामी आहेत. बंधन घालून तुम्हांला सावरणे त्यांना मान्य नसेल. आणि त्यांच्या मनात आजही तुमच्याबद्दल आदर आणि प्रेम आहे. आणि तुम्हांला स्वतःची चूक आज पटल्याने तोही प्रश्न उरत नाही. मग तुम्हांला इतके कष्टी होण्याचे कारण काय?"

"आपल्या नव्या कल्पनांप्रमाणे वागण्यामुळे त्यांना काय समाधान वाटत असेल ते असो! पण माझाच उलट त्यांच्याविषयीचा आदर कमी झाला! संसारात माझा तोल जाऊ लागला तर, मला कुणाचा आधार नाही एवढं मला या सर्व प्रकारांतून पक्कं कळून चुकलं!"

स्त्रीला पतीकडून कोणकोणत्या जातीच्या आधारांची गरज असते, हे मला त्या अनुतप्त तरुणीच्या करुणोद्‌गारांवरून जितके कळले, तितके अनेक कादंबऱ्यांच्या वाचनाने कळले नसते!

पतीने हुकूमशाही गाजवावी असे मला म्हणायचे नाही. पण स्वातंत्र्याच्या गाभाऱ्यात भ्रष्टाकार होईल या धास्तीने उघड अविचारालादेखील आळा घालावयाचा नाही हे खास आधुनिक दुबळेपणाचे लक्षण आहे! पत्नीच्या बाबतीत पती, आणि मुलांच्या बाबतींत वडील माणसे हल्ली असले दौर्बल्य दाखवतात, याला कारण त्यांची स्वतःवरील आणि स्वतःच्या जबाबदारीवरील श्रद्धा-इतर अनेकविध श्रद्धांबरोबरच! – नष्ट झाली आहे, हेही असू शकेल!

आज कित्येक धाडसी समाजविरोधी विवाहही आप्तस्वकीयांना दुःखी करीत आहेत. स्वतः वधूला त्या विवाहाने सुख अधिक होते की दुःख अधिक होते हे अद्याप ठरायचे आहे. जातीबाहेरील आणि धर्माबाहेरील विवाह यांनाच मी समाजविरोधी विवाह म्हणतो. कारण ज्या समाजात आपले मित्र व नातेवाईक अधिक आहेत त्या समाजापासून अशा विवाहामुळे आपण दूर होण्याचा संभव असतो. अशा विवाहासंबंधी मत बनविताना पुष्कळच वैचारिक गोंधळ दिसून येतो. एका पुरोगामी विद्वानांशी यासंबंधी चर्चा करीत असता ते मला म्हणाले, "आजवर जर आपण जातिभेद, धर्मभेद मोडण्याच्या गप्पा मारल्या तर, आज आपल्या मुलांनी अगर मुलींनी परजातीत विवाह केल्यास इतका त्रागा करण्याचे कारण काय?"

जातिभेदातील कटुता कमी करणे आणि जातिभेद पूर्णपणे नाहीसे करणे यांतील फरक प्रथम ओळखला पाहिजे. आणि शिवाय, जातिभेद पूर्णतः नाहीसे करणे हे आपले अगदी नजीकचे साध्य मानले तरी, "जातिभेद अद्याप मोडलेले नाहीत" हेही विसरून चालणार नाही. या बाबतीत मी त्या विद्वान् गृहस्थांना बर्नार्ड शॉच्या समाजवादाचे उदाहरण दिले. बर्नार्ड शॉ म्हणतात कीं, मी कट्टर समाजवादी असलो तरी सर्व समाजात आर्थिक समता प्रस्थापित होण्यापूर्वीच मी माझी संपत्ती सर्वांना वाटून टाकावी, असा त्याचा अर्थ नाही! जातिभेद-नाशासंबंधीही तसेच म्हणावे लागेल. ते सामाजिक ध्येय असले तरी ते साध्य होण्यापूर्वीचे आंतरजातीय विवाह हे आप्तेष्टांना अप्रिय वाटणारच. आणि वधूवरांनाही ते सुखावह होतील की नाही हे त्यांच्या प्रेमाच्या आणि इतर ध्येयांच्या उत्कटतेवर अवलंबून राहील.

परधर्मीयाशी होणाऱ्या विवाहाची गोष्ट तर याहूनही गंभीर स्वरूपाची म्हटली पाहिजे. विशेषतः मुलीने विधर्मीयाशी विवाह करण्याने ती स्वधर्मीय समाजात मुकल्यासारखी होणे आज विसाव्या शतकातही अपरिहार्य

आहे. सुमारे वीस वर्षांमागे एका उच्चवर्णीय सुशिक्षित प्रौढ स्त्रीने सुशिक्षित मुसलमानाशी विवाह केला. सामान्यतः हिंदू स्त्रीचा मुसलमानाशी विवाह म्हणजे गफलतीशिवाय किंवा जबरदस्तीशिवाय होणारच नाही अशी भोवतालच्या घटनांवरून आपली कल्पना झाल्यास आश्चर्य नाही. पण पुण्यातील गेल्या पिढीतील हा विवाह त्याला अपवाद होता असे म्हणणे प्राप्त आहे. त्या विवाहाच्या वेळी महाराष्ट्रात मोठेच शाब्दिक वादळ माजले. पण तद्नंतर त्या विवाहाच्या परिणामासंबंधी विचार करण्याइतपतही लोकांना त्या विवाहात कुतूहल राहिले नाही. पण त्या विवाहाने हिंदू समाज एका कुलीन स्त्रीला आणि तिच्या अपत्यांना मुकला एवढा तरी दुष्परिणाम झालाच!

अलीकडेही एका पदवीधर महाराष्ट्रीय तरुणीने मुसलमानाशी विवाह केल्याचे वृत्त आले होते. उत्कट प्रेमाच्या निसर्गदत्त श्रेष्ठतेबद्दल मला पूर्ण आदर असून आणि मुसलमान समाजाबद्दल सद्भावना असूनही मला असे विवाह आजच्या काळात तरी उद्वेगजनक वाटतात. सुशिक्षित मुली स्वसमाजाच्या मताबद्दल किती अज्ञ अगर बेपर्वा आहेत याचे मी ते एक उदाहरण मानतो. हिंदू-मुसलमान ऐक्याचे ध्येय किती दिवसांनी साध्य होईल ते होवो; पण आज हिंदू समाजाविषयी तुच्छता आणि द्वेष पसरविणे हेच कार्य ज्या समाजातील अनेक लोकमान्य नेते करीत आहेत, त्या समाजातील एका घटकाची गृहिणी म्हणून त्या समाजात प्रवेश करणे म्हणजे हिंदू समाजाचा अत्यंत मोठा अपराध करणे होय. मुसलमान समाजात असा अपराध करणाऱ्या कन्येला कोणती वागणूक मिळेल हे सांगण्याचे कारणच नाही.

अशा विवाहातील सामाजिक बेजबाबदारपणा उघड असूनही आमच्या पुरोगामी मंडळींना मात्र त्याच्याविरुद्ध बोलण्याची चोरी वाटते! कारण तसे केल्यास आपण आधुनिकतेच्या देवळात विटाळ कालवल्यासारखे होईल, असे त्यांना वाटते! आपणच प्रेमस्वातंत्र्याचे गोडवे गायिले, आपणच धार्मिक स्वातंत्र्याचे स्तोम माजविले, आता आपल्या एखाद्या मित्राच्या मुलीने मुसलमान नवरा केल्यास त्याविरुद्ध बोलण्यास आपल्याला तोंड नाही, अशी ही बौद्धिक अगतिकतेची स्थिती असते! अशा विवाहांनी या मंडळींना मनापासून आनंद होणे शक्यच नसते; (आणि पाकिस्तानवादी मुसलमानांनी हिंदू-शीखांविरुद्ध केलेल्या पाशवी वर्तनानंतरही या मंडळींना अशा विवाहापासून सुख होत असल्यास, त्यांची गणना मनुष्ययोनीत करताच येणार नाही! ) पण तरीही त्यांना त्याचा उघड निषेध करण्याचे मात्र संकट वाटते.

पण या वृत्तीला 'सामाजिक औदार्य' हे नाव वेडपटांखेरीज (muddleheaded) लोकांखेरीज कोणी देईलसे वाटत नाही. हिंदू-मुसलमान समाजाचे आजचे संबंध लक्षात घेता, हिंदू स्त्रीने मुसलमानाशी विवाह करणे हे पुरोगामित्वाचे लक्षण नसून बुद्धिहीनतेचे, सामाजिक मागासलेपणाचे आणि विकारवशतेचे लक्षण आहे. जुनी स्त्री ज्याप्रमाणे एका वाड्यातील चालरीत, एका आईबापांची सुलतानी इच्छा, यापलीकडील समाज ओळखत नसे तशीच नवी स्त्री स्वतःचे मनोविकास आणि आईबापांचा हतबलपणा यापलीकडील विशाल समाजभावना ओळखीत नाही असेच म्हणावे लागेल! आणि या दृष्टीने पुष्कळ परीक्षा पास होऊनही ती मागासलेलीच राहिली असे म्हणावे लागेल.

पण आधुनिक विवाहस्वातंत्र्यातील या सर्व दोषांचे आणि त्या दोषांबाबत स्वातंत्र्यवादी मंडळी दाखवीत असलेल्या बौद्धिक दौर्बल्याचे मूळ आधुनिकतेच्या व स्वातंत्र्याच्या सदोष कल्पनेत आहे. आणि आपण एकदा

विवाहस्वातंत्र्य दिल्यानंतर आता आपणांस त्याविरुद्ध तक्रार करण्याचा अधिकार नाही अशी खुळी भावना आधुनिक म्हणविणारांनी करून घेतलेली दिसते. पण जुन्या वधू-वरांहूनही मोठी जबाबदारी नव्या वधूवरांवर येऊन पडते, हे या व्हिक्टोरिया राणीच्या काळातील आधुनिकांनी अद्याप ओळखलेले नाही! व म्हणूनच आमचे 'आधुनिक' हेच मागासलेले आहेत-काळाबरोबर चालणारे नाहीत, असे म्हणावे लागते. जुन्या वधू-वरांवर केवळ वडील माणसांना व घराण्याला न दुखविण्याची जबाबदारी असे, कारण ते बोलून चालून अज्ञानीच असत! उलट आधुनिक वधू-वरांवर समाज व तत्त्वप्रणाली यांच्यासंबंधीही काही जबाबदाऱ्या आहेत हे आधुनिकांनी ओळखले नाही. जुनाट रूढीतून मुक्तता म्हटली म्हणजे सर्वच जबाबदारीतून मुक्तता असा अर्थ नव्हे. आमच्या तरुण-तरुणींत जर कोणते वैगुण्य असेल तर ते अद्यापही वडिलांच्या जोखडातून मान काढून घेतलेल्या अजाण पोराप्रमाणे वागतात-जबाबदार आधुनिक समाजघटकाप्रमाणे वागत नाहीत, हे आहे. पैसा आणि रूढी यांच्याखातर ठरविले जाणारे विवाह बंद झाले हे ठीक झाले. पण तेवढ्याने भागले नाही. वधू-वरांनी स्वतः ठरविलेले विवाह हे वडिलांच्या तावडीतून निसटलेल्या उनाड पोरांनी ठरविलेले विवाह न ठरता, जबाबदार पुरोगामी नागरिकांनी पत्करलेले सामाजिक बंधन ठरणे जरूर आहे. तरुण-तरुणींस ही पुरोगामी नागरिकत्वाची भावना प्राप्त झाल्यास त्यांच्या विवाहनिर्णयात इष्ट तो समतोलपणा व गांभीर्य आल्याखेरीज राहणार नाही.

वधू-वरांच्या निवडीप्रमाणेच त्यांच्या भावी कालक्षेपावरही या वृत्तीचा विशेष परिणाम होईल. आजच्या प्रीतिविवाहित जोडप्यांत स्वातंत्र्यकल्पनेमुळे वा 'त्रिकोणादि' भानगडीमुळे जे प्रश्न निर्माण होतात त्याला मुख्य कारण म्हणजे प्रेमप्राप्तीच्या उद्योगातून मुक्त झाल्यानंतर प्रेमी युग्माला एकमेकांना छळण्याखेरीज उद्योग राहात नाही होय! मी असे म्हणत नाही की त्यांना पोटाचे आणि घरकामाचे उद्योग नसतात. पण त्या उद्योगांना मनात फारसे खोल स्थान नसते. ते वरवरचे उद्योग असतात. भावनांच्या दृष्टीने पाहता पत्नीला पती आणि पतीला पत्नी, यांखेरीज कोणी वाटेकरी उरलेला नसतो. थोडा चमत्कारिक वाटण्यासारखा शब्दप्रयोग पत्करून सांगायचे झाल्यास, 'अलीकडच्या संसारात पतिपत्नी एकमेकांच्या वाट्यास वाजवींपेक्षा अधिक येतात!' आप्तेष्टांनी भरलेल्या जुन्या घरात इतर नातेवाइकांच्या आडपडद्यामुळे तरुण पतिपत्नीच्या सहवासाला जो उठाव मिळे तो देण्यास आता कोणी राहिले नाहीत. त्यामुळे लवकर एकमेकांना एकमेकांचा सहवास वाजवीपेक्षा अधिक मिळू लागतो. त्यांच्या ते सहजासहजी ध्यानात येत नाही. धुसफूस, मतभेद, उतरते आकर्षण हे सर्व या अतिपरिचयाचेच परिणाम असतात!

पण याकरिता मी पुनः एकत्र कुटुंब आणि त्यातील अडाणी आणि मत्सरी नातेवाइकांचा घोळका, हा तोडगा सुचवितो असे मात्र नव्हे! तरी तरुण पतिपत्नींना मानसिक दृष्ट्या पथ्यकारक अंतरावर ठेवण्यास पाहुणे, वडील माणसे, सणवार, समारंभ यांचा जो उपयोग होत असे त्याची जागा घेण्यास आजच्या संसारात व्यक्तीही नाहीत आणि कर्तव्यही नाहीत. आणि त्यामुळेच विवाहाच्या पहिल्या कालखंडातच पतिपत्नी एकमेकांशी अतिपरिचित होऊन नंतरच्या कालखंडात एकमेकांस अप्रिय होण्यास मार्गास लागतात!

पतिसेवा, पितृसेवा, वगैरे कौटुंबिक ध्येये आधुनिक स्त्रीला संकुचित वाटली तर नवल नाही; पण त्यांच्याहून व्यापक ध्येये तिला न दिसल्यास तिच्या जीवनात भकासपणा आणि निरर्थकता थैमान घालणारच. एक तर तिचे जीवन आहारनिद्रादिकांच्या पलीकडे जाणार नाही; नाही तर ती पतीला आणि संसाराला

अनुक्रमणिका

उपद्रवकारक असे उद्योग आरंभील. दोन अनुरक्त व्यक्ती एकत्र आल्यावरही त्या दोघांची 'अनुरक्त' दोघांच्या सुखाहून उच्चतर उद्दिष्टांवर स्थिर झालेली नसेल तर, ती एकमेकाला खाऊ लागतील; नाही तर सुस्त, मंद आणि भकास बनतील!

जुन्या विवाहांतील लैंगिक आणि कौटुंबिक गुलामगिरीची अवस्था संपून आज प्रेम आणि स्वातंत्र्य यांचा उदय दांपत्यजीवनात झाला आहे, ही खास पुढची पायरी आहे. पण आधी सर्व प्रेमविवाह सारख्या दर्जाचे आणि उत्कटतेचे असतात असे नाही आणि अगदी लैला-मजनू यांची उत्कटता असली तरीही पतिपत्नी केवळ एकमेकांच्या प्रेमावर जगू शकत नाहीत. इतकेच नव्हे, तर ज्या विवाहाचा प्रारंभ उत्कट प्रेमात होतो त्याला तर सामान्य संसार अधिकच नीरस वाटण्याचा संभव असतो. पतिपत्नींना परस्परप्रेमाइतकेच उत्कट आकर्षण व जीवनध्येय सापडल्याखेरीज त्यांचे संसार सफल होणे शक्य नाही.

पण असे आकर्षण आणि असे जीवनमूल्य आजच्या संसारात कोणते आहे की ज्यात प्रेमबंधनाचे माधुर्यही आहे आणि धर्मबंधनाचे स्थैर्यही आहे? राजकारणात इलेक्शन, व्यापारात नफेबाजी आणि संसारात स्वेच्छाचार एवढीच काय ती दैवते आधुनिकतेचा तोरा मिरवणाऱ्या या युगात शिल्लक राहिली काय?

पण सनातनी श्रद्धा आणि शिस्त लयाला जाताच, आपली मने बिनधन्याच्या गुरांसारखी वावरू लागली तर, आपण खऱ्या अर्थाने 'पुरोगामी' ठरणार नाही.

प्रीतिविवाह आणि पुरोगामित्व या दोहोंचेही साफल्य जुनी श्रद्धा टाकण्यात नाही, तर नवी श्रद्धा निर्माण करण्यात आहे.

नवभारत,
मार्च १९४९, पृ. ४४३-४४९.

अनुक्रमणिका

# ४२

## केसरीच्या संपादकांचा गाजलेला विवाह

एखाद्या लष्करी अधिकाऱ्याच्या स्वभावाची परीक्षा करायची झाल्यास नेपोलियन त्याचा अपमान करून पाहात असे, असे सांगतात! स्वाभिमान दुखावल्यावर तो कसा वागतो हे पाहिल्यास त्याचे पाणी जोखता येते, असा नेपोलियनचा एक ठोकताळा होता. थोड्या फेरफाराने समाजाच्या नाडीपरीक्षेसंबंधीही असाच एक ठोकताळा सांगता येईल. त्या समाजाचे जुनेपुराणे समज दुखवून पहा, म्हणजे त्याचे खरे स्वरूप व्यक्त होईल.

'समाजसुधारणा', 'लोकशाही', 'हिंदुत्वप्रसार' वगैरे सुंदर आणि संदिग्ध शब्द वेगवेगळ्या व्यासपीठांवर वेगवेगळ्या प्रसंगांनी विराजमान झालेले दिसून येतील. परंतु त्या शब्दांचा आणि त्या व्यासपीठांचा संबंध कितपत आहे हे प्रत्यक्ष प्रसंगावरूनच ठरवावे लागेल आणि असा निर्णायक प्रसंग म्हणजे त्या समाजाच्या जुनाट समजुतींना धक्का लागण्याचा प्रसंग होय. गेले काही आठवडे वृत्तपत्रांतून गाजत असलेला आणि हा लेख लिहून होत असताच घडून आलेला 'केतकर-रेडमंड्' विवाह हा महाराष्ट्रातील पुरोगामी मंडळींच्या स्वभावपरीक्षेच्या दृष्टीने असाच एक परीक्षेचा प्रसंग होऊन गेला असे म्हटले पाहिजे.

वास्तविक मिश्रविवाह आणि प्रेमविवाह या दृष्टीने हा विवाह पुरोगामी मंडळींना सर्वथैव अभिनंदनीय वाटण्यासारखाच होता; तर विधर्मीय आणि विदेशीय स्त्रीने हिंदूधर्म स्वीकारून हिंदूधर्माच्या प्रेमाखातर केलेला विवाह, या दृष्टीने हा विवाह निःशेष हिंदूत्वनिष्ठांना अभिनंदनीय वाटावयास हवा होता. पण महाराष्ट्रीय लोकमताचे जे दृष्य दिसले ते काही वेगळेच होते.

हिंदुत्वनिष्ठांच्या शिबिरात तर द्विधा सूर ऐकू आलेच, पण आत्यंतिक पुरोगामी मंडळींनाही या विवाहाकडे प्रथम तरी निर्विकारपणे पाहणे जमले नाही, असे म्हणावे लागते. सुप्रसिद्ध साहित्यिक व पत्रकार श्री प्र. के. अत्रे यांच्या पुरोगामित्वाविषयी आणि प्रामाणिकपणाविषयी कोणीच शंका घेणार नाही, परंतु या विवाहीसंबंधीच्या त्यांच्या वृत्तपत्राच्या प्रथम प्रतिक्रिया सर्वस्वी अनुकूल नव्हत्या, ही गोष्ट अर्थपूर्ण आहे. आचार्य अत्रे यांच्या नवयुग पत्राने या विवाहासंबंधी स्थूलमानाने अनुकूल वृत्तीच धारण केलेली असली तरी, या प्रकरणातील त्या पत्राचा पहिला लेख महाराष्ट्रीय समाजाचे जुनाट पूर्वग्रह नकळत उघडे केल्याखेरीज राहिला नाही.

'नवयुग' मधील तो लेख (स्वतः अत्र्यांच्याच असे समजून मी लिहीत आहे.) एका कसोटीच्या प्रसंगाचे भेदक शब्दचित्र म्हणून बिनतोड आहे. त्या लेखात केसरी चालकांच्या पुराणप्रियतेचे व तारांबळीचे मनोहर व हुकमी शब्दचित्र आहे. पण स्वतः अत्रे हेही सर्वसामान्य पुराणप्रिय महाराष्ट्राच्या बाहेर नाहीत, हेही त्याच चित्रात चित्रित झालेले आहे. वास्तव चित्रणाच्या आवेशात, अत्रे बहुधा स्वतःचीही गय करीत नाहीत, हे अर्थात्च त्यांच्या प्रामाणिकपणाला भूषणावह आहे. केसरीचे संपादक श्री. ग. वि. केतकर आणि शुद्धीकृत युरोपीय महिला श्री. अमला रेडमंड् (आता सौ. केतकर) यांच्या नियोजित विवाहाने केसरी कचेरीत झालेल्या

आकांताचे वर्णन करता करता, आचार्य अत्रे यांना केतकरांच्या शारीरिक व्याधींचे आणि श्री. अमलाबाई यांच्या प्रौढ अपत्यांचे आणि पोक्त वयाचे उपहासयुक्त वर्णन करण्याचा मोह आवरला नाही, ही गोष्ट अर्थपूर्ण आहे.

केसरीच्या चालकांनी आपल्या एका सन्मान्य संपादकाशी आणि लोकमान्य टिळकांच्या नातवाशी कसे वागायला हवे होते, याची चर्चा करण्यापूर्वी सर्वसामान्य महाराष्ट्रीयाच्या अशा प्रकरणात कोणत्या स्वाभाविक प्रतिक्रिया होतात, हे पाहणेच अधिक अगत्याचे आहे आणि मौजेची गोष्ट म्हणजे, अत्रे काही दृष्टींनी आत्यंतिक पुरोगामी असूनही त्यांच्या पहिल्या लेखात याच प्रतिक्रिया नकळत व्यक्त झाल्या आहेत.

सर्वसामान्य महाराष्ट्रीय मनुष्य प्रेमाकडे थोड्या साशंक आणि बुजऱ्या दृष्टीनेच पहातो. वडीलधाऱ्या माणसांनी निर्विकार बुद्धीने ठरविलेला विवाह हाच सर्वोत्तम विवाह, अशी अद्यापही शेकडा नव्याण्णव महाराष्ट्रीयांची अतर्यामीची श्रद्धा आहे. इंग्रजी वाङ्मयातील प्रेमाचे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे स्तवन वाचून आमच्या वाङ्मयात आणि व्याख्यानात जरी प्रेमविवाहाला मान्यता मिळालेली असली तरी, समाजमन अजून चांगलेच 'बाळबोध' आहे असे दिसून येईल. वाङ्मयातील संकेत म्हणून आम्ही पत्करलेले हे इंग्रजी-प्रेम, अर्थात्च पंचविशीतील तरुण मने 'खरे' समजून चालतात; आणि पोरांच्या हट्टापुरतेच आपण त्याला मान्यता-अगर माफी देतो. परंतु पन्नाशी उलटलेल्या स्त्री-पुरुषांनी प्रेमाच्या गोष्टी केल्या तर, अत्र्यांसारख्या निधड्या सुधारकालाही धडकी भरते.

याचे कारण 'घरात दिवा लावायला' अगर 'पुण्याहवाचन बसवायला माणूस' म्हणून केलेला जुना विवाह तरी आपणांला माहीत आहे, नाही तर कादंबऱ्यांत रंगविलेला नवयौवनातील प्रेमविवाह तरी माहीत आहे. याव्यतिरिक्त अन्य हेतूने आणि वृत्तीने पोक्त स्त्री-पुरुष एकत्र येऊ शकतील ही कल्पना आमच्यातील पुरोगामी मंडळींसही सहसा खरी वाटत नाही. दोन व्यक्तींना एक कार्य, एक ध्येय अगर एक धर्म प्रिय आहे, म्हणून त्यांनी निम्मा संसार अन्यत्र उरकल्यावर एकत्र यावे ही गोष्ट एकंदरीत आम्हा निर्विकार आणि प्रापंचिक महाराष्ट्रीयांना थोडी थिल्लरपणाचीच वाटते, हे नाकबूल करण्यात हशील नाही.

पुण्यातील एका दैनिकात प्रसिद्ध झालेल्या एका वाचकाच्या पत्रात उपस्थित केलेली शंका या दृष्टीने बहुसंख्य महाराष्ट्रीयांचीच शंका आहे असे म्हणता येईल. सदर वाचक विचारतो, हिंदू धर्माची सेवा करण्याकरिता या युरोपीय महिलेस केतकरांशी लग्न लावूनच काय करायचे होते? ती त्यांची शिष्या अगर अनुयायी म्हणूनही काम करू शकली असती. मग, केतकरांना या बाबतीत शहाणपणाचे शब्द सुनविणारी वडीलधारी मंडळी, याच्याही पुढे जाऊन काही म्हणाल्यास आश्चर्य नाहीच. मी असे ऐकतो, की त्यांच्या समव्यवसायी मंडळींतील एकदोन वयोवृद्ध विधुरांनी आपल्या आदर्श जीवनाचा दाखला देऊन केतकरांना विचारले, 'आम्हांला जर एवढे मोठे आयुष्य सहधर्मचारिणीखेरीज कंठता आले, तर तुम्हांलाच ते एवढे जड का जावे?'

दैनिकात लिहिणाऱ्या त्या वाचकाच्या काय, की समक्षासमक्ष विचारणाऱ्या त्या समव्यवसायी मंडळींच्या काय, प्रश्नात धर्माधर्म, सत्यासत्य याहून, दुखावलेल्या रूढ कल्पनांचाच प्रश्न अधिक आहे. पुनर्विवाहितांहून ज्या अर्थाने विधुर श्रेष्ठ, त्याच अर्थाने विवाहितांहून अविवाहित श्रेष्ठ, असेही हे लोक म्हणू शकतील. पण ते तसे

म्हणताना आढळत नाहीत. किंबहुना मिश्रविवाहिताच्या खालोखाल जर ते कुणाला दचकत असतील, तर ते आजन्म अविवाहिताला. त्याबरोबरच हेही लक्षात घेतले पाहिजे की, केतकरांनी सध्याच्याच वयात कोकणातून एखादी सोळा वर्षांची वधू सौभाग्यवती करून आणली असती तर, त्यांस बहुदा आपल्या हक्काच्या पदावरून भ्रष्ट व्हावे लागले नसते.

आपल्या विवाहविषयक कल्पनांत अद्याप दोन प्रौढ नागरिकांवरील अगर दोन संस्कारवान धर्मबांधवांवरील विश्वासाहून अविश्वासाचा आणि भीतीचाच भाग अधिक आहे. केतकरांनी सोळा वर्षांची प्रथम वधू आणली असती तर, ते एखाद्या व्यक्तिमत्वसंपन्न प्रौढ स्त्रीच्या आहारी गेले नसून, समाजाच्या-म्हणजेच सनातन रूढीच्या आहारी आहेत, असा विश्वास या मंडळींना वाटून हायसे वाटले असते.

सासर, माहेर आणि जनलज्जा या तीन साखळदंडांनी करकचून आवळलेल्या अप्रबुद्ध आणि असहाय वधूचे चित्र आमच्या अंतर्मनात इतके खोल रुजलेले आहे की, एखाद्या पोक्त स्त्रीने राजीखुषीने, परस्पर ठरवून, आमच्या आप्तेष्टांतील एखाद्या पुरुषास वरले तर, आम्हांला तो पुरुष एखाद्या अवदसेच्या फेऱ्यात सापडल्याप्रमाणे वाटते. स्वयंवर-पद्धती, आणि त्यातूनही एखाद्या पोक्त स्त्रीने त्या पद्धतीचा आश्रय करणे, हे... (स्पष्टच सांगायचे तर...) आमच्या समाजास, सनातन आणि सुपरिचित अशा बाहेरख्यालीहूनही अप्रशस्त वाटते!

पण आपल्या या औचित्य-कल्पना निकोप आहेत असे मात्र सिद्ध होण्यासारखे नाही या कल्पनांच्या मुळाशी अनुदारवृत्ती आणि घाबरटपणा यांचाच भाग अधिक असल्याचे आढळून येईल. दोन प्रौढ व्यक्ती स्वतंत्र आणि निकोष बुद्धीने समाजाचे घटक म्हणून एकत्र येऊ शकतील ही गोष्ट आपणांस अशक्य वाटू लागली आहे, हे मोठेसे भूषणावह नाही. प्रौढ विधुरांनी विवाह करायचा, तो केवळ हातून काही वेडेवाकडे घडू नये आणि आपले अब्रूदार मित्र पाहुणे म्हणून आले तर, त्यांना खाणावळ दाखवावी लागू नये म्हणूनच फार तर करायचा, अशी यातील गृहीत भूमिका असते.

आणि आमच्यातील सुशिक्षितांना लाजेकाजेस्तव 'पुनर्विवाह' मान्य करावा लागला असला तरी, प्रौढ आणि अपत्यवती विधवेने पुनः 'वर' पत्करायचा, हे अद्याप आमच्यातील पुरोगामी मंडळींनाही फारसे रुचत नाही. आणि या सर्व औचित्यकल्पनांच्या मुळाशी आपल्या अंतर्मनात रुजलेली बाल-विवाहाची जीर्ण कल्पनाच आहे. विवाहकल्पनेतील जुनाटपणा जाण्यास वाङ्मयापुरता पुरोगामित्वाचा जप करून भागणार नाही, तर स्त्रीविषयक दृष्टिकोनातील अनुदारपणाच जाणे जरूर आहे. 'काही लाजिरवाण्या मनोविकारांना कायदेशीर वाट काढून देणे' आणि 'जेवणाखाणाची घरगुती सोय करणे' एवढाच स्त्री-सहवासाचा उद्देश आणि उपयोग ही कल्पना अद्यापही आपल्या मनातून गेलेली नाही.

अशा प्रकरणात आपण 'सुधारक आणि सनातनी', 'हिंदुत्वनिष्ठ आणि गांधीवादी' यांसारखे जे भेद करतो, त्यांचा उपयोग वर्तमानपत्री वर्गीकरणापुरताच असतो; खरा फरक उदार आणि अनुदार, सहृदय आणि अहृदय, असाच करणे युक्त होईल. आणि उदार माणसे सनातन्यांतही असू शकतील आणि गांधीवाद्यांत अगर मार्क्सवाद्यांतही नसू शकतील. माधवराव पटवर्धनांसारख्या सात्त्विक सुधारकाला आपल्या 'सुधारक' काव्यात

सनातन्यांहूनही सुधारकांवर अधिक कोरडे ओढावे लागले आहेत. कारण त्या काळातील अत्यंत पुरोगामी संस्थेतील-म्हणजेच डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील लोकही व्यवसायातील प्रतिस्पर्ध्यांशी वागताना सामाजिक ध्येयवाद गुंडाळून ठेवून वैयक्तिक मत्सरामुळे कसे सनातन्यांहूनही सनातनी बनत, याचा त्यांना अनुभव होता. केतकर विवाह प्रकरणाने कित्येक वाईट गोष्टींप्रमाणेच कित्येक चांगल्या गोष्टीही अनुभवास आल्या आहेत. केसरी संस्थेतील श्री. तात्यासाहेब करंदीकरांसारखी माणसे सनातनी आहेत व जशी आहेत तशीच ती वागली, यामुळे कुणालाच धक्का बसण्याचे कारण नाही, तथापि, त्यांच्या वागण्यात वैयक्तिक अनुदारतेचा भाग नाही, हे कबूल केले पाहिजे.

या विवाहामुळे केतकरांना पदच्युती पत्करावी लागली तरी, वृत्तिच्छेद पत्करावा लागलेला नाही. केसरी संस्थेहून अधिक पुरोगामी आणि अधिक लोकतंत्री संस्थेतच उलट 'पार्टी पॉलिटिक्स'मुळे केतकरांवर तो प्रसंग आला असता, असे आपण पुण्याच्या अर्वाचीन इतिहासावरून म्हणू शकतो. अर्थात् जन्माच्या व्यवसायाला मुकावे लागण्याच्या धमकीनेही तत्त्वदृष्ट्या युक्त असा निर्णय बदलायचा नाही, असे केतकरांनी ठरविले होते व ते अभिनंदनीय होते. आणखी एका चांगल्या गोष्टींचा वृत्तपत्रांनी याहून अधिक उल्लेख व गौरव करावयास हवा होता, असे मला वाटल्यावाचून राहिले नाही. ती गोष्ट म्हणजे केतकरांच्या कुटुंबीयांची उदार आणि समंजस वृत्ती ही होय. केतकरांच्या प्रौढ मुलामुलींनी तर या विवाहास अनुकुलता दाखविलीच; परंतु तुरुंगात घडून आलेल्या या मिश्रविवाह समारंभास केतकरांच्या मातोश्रीही हजर राहण्याकरिता नेल्या होत्या, हे वाचून तर कोणालाही त्यांच्या उदार वृत्तीचा व सामाजिक पुरोगामित्वाचा आदरपूर्वक गौरवच करावासा वाटेल.

जुन्या पिढीतील एका वयोवृद्ध स्त्रीने एवढे औदार्य दाखवावे आणि परोगामित्वाचा डंका झडविणाऱ्या कॉंग्रेस सरकारने मात्र त्या माउलीला तुरुंगाच्या दारातूनच परतावयास लावावे हे दृश्य चिंतनीय आहे. या लग्नामुळे मिसेस केतकर यांना एका हॉस्पिटलमधील आपल्या नोकरीला मुकावे लागले हे वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले वर्तमान जर खरे असेल तर, ते त्याहूनही शोचनीय आहे. म्हणूनच मी म्हणतो खरे भेद 'हिंदुत्ववादी' आणि 'गांधीवादी' नसून, 'उदार' आणि 'अनुदार' हे आहेत. 'विविधवृत्ता'सारख्या 'प्रागतिक' वृत्तपत्राने आणि 'मौज'सारख्या पुरोगामी वृत्तपत्राने या विवाहाला अनुकूलता दाखवून सनातनी हिंदुत्वनिष्ठांची कानउघडणी केली, हे योग्य आणि स्वाभाविकच झाले. परंतु काही हिंदुत्वनिष्ठ व्यक्तींनी आणि पत्रांनीही या विवाहाला निःसंदिग्ध सहानुभूती दाखविली आहे, ही गोष्ट विसरून चालणार नाही. या प्रकरणातील सर्वच उल्लेख मला उपलब्ध झालेले नाहीत. तथापि, 'दैनिक भारत' (पुणे), 'साप्ताहिक विवेक' (मुंबई) यांचे या बाबतीतील धोरण पुरोगामी होते. दे. भ. सावरकर यांचा केतकरांना संपूर्ण पाठिंबा होता, ही गोष्टही आपणांस विसरता येणार नाही आणि म्हणूनच 'हिंदुत्वनिष्ठ म्हणजे सनातनी' हे समीकरण या प्रकरणावरून तरी आपणांस मांडता येणार नाही. उलट मी तर असे म्हणेन की, केतकरांसारखा मनुष्य आंतरधर्मीय विवाहापर्यंत मजल—त्यात हिंदुत्वनिष्ठेचे कार्य साधते असे वाटत नसते तर-एरव्ही मारूच शकला नसता. केतकरांच्या पुरतेच बोलायचे तर हिंदुत्वनिष्ठेमुळे सनातनीपणा सुटल्याचे ते एक उल्लेखनीय उदाहरण आहे, असेच म्हणावे लागेल. उलट माडखोलकरांसारखे पुरोगामी संपादक केतकरांनी राजीनामा देणेच इष्ट होते असे प्रतिपादन करीत आहेत. माडखोलकरांनी दिलेली कारणे त्यांच्या मतांहूनही अधिक चमत्कारिक आहेत. आयरिश देशभक्त पार्नेल् याच्या चरित्राचा दाखला देऊन ते केतकरांना चारित्र्याची महती पटवीत आहेत. पार्नेल्च्या चारित्र्यावर त्याच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांनी अनेक प्रकारचे शिंतोडे उडविले होते. त्यांतील काही आरोपांची मदार ज्या पत्रावर होती

व ज्याचा फोटो लंडन टाइम्समध्ये प्रसिद्ध झाला होता, ते पत्र खोट्या सहीने (फोर्जरीने) तयार करण्यात आलेले होते. तथापि, या प्रकरणात माडखोलकरांच्या मनात मिसेस ओशी (Mrs. Oshea) हिच्या घटस्फोटाची केस आहे असे म्हटले (माडखोलकरांचा लेख आता मजपुढे नाही) आणि त्या प्रकरणातील पुरावा बनावट नव्हता असे धरले, तरी केतकरांशी त्या केसचा संबंध काय? पुनर्विवाह आणि व्यभिचार यांत विशेष फरक न मानण्याइतके माडखोलकर 'पुरोगामी' कधी झाले? आणखी एक मौज म्हणजे, स्वतःला 'पुरोगामी' समजणारे आणि सनातन्यांना हसणारे लोकच ब्राम्हणी सोवळेपणाच्या मगरमिठीतून सुटण्यापूर्वीच आज ख्रिस्ती सोवळेपणा गळ्यात घेत आहे व त्याला 'आधुनिकता' असे नाव देत आहेत. वास्तविक, अस्सल जुन्या परंपरेचे लोक विधुरावस्था आल्यास वार्धक्यातही विवाह करीतच; पण शिवाय बहुपत्नीकत्वात काहीच गौणत्व मानले जात नसल्याने, वार्धक्यात सुखासुखी नूतन विवाहसंबंधही अनेकवार करीत. नाना फडणवीस व सखारामबापू यांची एकमेकांविरूद्ध कारस्थाने बरीच वर्षे चालल्यावर, मध्ये एकदा उभयपक्षी समाधानकारक असा सलोखा झाला. त्या वेळी दोघांतील ज्येष्ठ मुत्सद्दी बापू यांना इतके हायसे वाटले की, त्यांनी आपल्या वतनाच्या गावी जाऊन आणखी एक लग्न उरकून घेतले. त्या वेळी हा विख्यात मुत्सद्दी सत्तरीच्या घरात आलेला होता व त्याची निदान एक तरी बायको हयात होती. नाना फडणवीसाच्या पश्चात्, त्याच्या अकरा वर्षाच्या विधवा पत्नीचा सांभाळ ब्रिटिश जेत्यांना नानांच्या उपाध्याकरवी करावा लागल्याचेही नमूद आहे. त्या काळात प्रौढ विवाह आणि विधवाविवाह रूढ नसल्याने उत्पन्न होणाऱ्या वैवाहिक विषमतेचा आज प्रश्नच नाही; पण कर्तबगार आणि सुखवस्तु माणसाच्या सुखप्रवृत्तीच्या आड येण्यास त्या काळी सोवळे हिंदुमहासभावादीही नव्हते की ख्रिस्ती विवाहनीती लादणाऱ्या लीलावती मुन्शीही नव्हत्या, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

गांधीजींपासून असो की युरोपियनांपासून असो, आम्ही हिंदू लोक नेमके उपासतापासाचे, संन्यासाचे आणि एकमेकांच्या शरीरसुखावर नजर ठेवण्याचे तत्त्वज्ञानच कसे शिकतो, याचे मला अद्याप तरी कोडे आहे! जोपर्यंत एखादा मनुष्य कर्तबगारी दाखवीत आहे, समाजाच्या उपयोगी पडत आहे तोपर्यंत आपले इतिहासप्रसिद्ध पूर्वज, त्याने लग्ने किती केली आहेत, किंबहुना किती अगंवस्त्रे बाळगळी आहेत, याचीही फारशी चौकशी करीत नसत. मुसलमानांचा आणि युरोपियन लोकांचा धर्म, नीतिनियमांच्या आध्यात्मिक ध्येयांच्याबाबत आमच्या धर्माहून कोणत्याही प्रकारे कमी आहे असे मला वाटत नाही; पण केतकरांचे सोवळे सल्लागार त्यांजकडून ज्या 'वैधव्यव्रता' ची अपेक्षा करीत आहेत त्याची अपेक्षा, एखाद्या पुरोगामी आणि कर्तबगार संपादकाकडून कोणाही मुसलमान अगर युरोपियन स्नेह्याने खास केली नसती! इंग्लंडचा राजा आठवा एडवर्ड याला, त्याच्या लोकविरुद्ध विवाह करण्याच्या निश्चयामुळे राज्य सोडावे लागले, हाही दाखला या प्रकरणी काही लोक देताना आढळतात. पण हा दाखला येथे अप्रयोजकपणाचा आहे. कोणत्याही प्राचीन राजघराण्याचा वारस हा एका अर्थाने त्या देशाच्या समग्र सामाजिक समारंभाचाही नेता असतो. त्याच्या राणीला अनेक सत्कार-समारंभांमधून प्रामुख्याने भाग घ्यावा लागतो. गणेशखिंडीत जुन्या सरंजामदारांचा आणि जाहागीरदारांचा दरबार भरविण्याची जबाबदारी तर केसरीकार आणि त्यांच्या पत्नी यांवर कोणी लादल्याचे ऐकिवात नाही! उलट धर्मवाह्यांना शुद्ध करून हिंदू धर्मात घेण्याचे शिवाजीमहाराजांचे क्रांतिकारक व्रत केसरीच्या संपादकांनी स्वखुषीने पत्करले आहे. पण आपण हे क्रांतिकारकाचे व्रत घेतले आहे की बाळबोध ब्राह्मणाचेच जुने ब्रीद चालविण्याचे ठरविले आहे, याचाच केसरीच्या कचेरीतील काही मंडळीच्या मनात अद्याप पुरता निर्णय झालेला दिसत नाही!

अनुक्रमणिका

एखाद्या युरोपियन स्त्रीने हजारो कोसांवरून येऊन, वर्षानुवर्ष हिंदूसमाजावर अहेतुक प्रेम करून, स्वधर्म सोडून अखेर हिंदू धर्माचा स्वीकार केल्यावर, तिला अस्पृश्यासारखी दूर ठेवणे हे खरे पाप की विधुरावस्थेत व्रतस्थता सोडून संसारसुखाकडे वळणे हे खरे पाप, याचा विचार हिंदूत्वनिष्ठ, गांधीवादी व ख्रिस्तीनीतिवादी या सर्वांनीच आज करावयास हवा. केतकर तर बोलून चालून विधूर होते; पण, एखाद्या सपत्नीकानेही प्रथम पत्नीच्या संमतीने शुद्धीकृत विधर्मी स्त्रीस गृहिणीपदाचा लाभ करून दिला तर, हिंदुत्वनिष्ठांनी तत्त्वतः त्याचे अभिनंदनच करावयास हवे. कारण 'एकपत्नीव्रत' हा भारतीय समाजास एक कौतुकास्पद असा गुण वाटत असला तरी, 'बहुपत्नीकत्व' हे पाप असे त्याने ख्रिस्ती समाजाप्रमाणे कधीच मानलेले नाही. आमच्या वैवाहिक कल्पनांत सौ. लीलावतीं मुन्शींच्या कायद्याने बदल होईल असे वाटत नाही. रेशनिंगचा कायदा पाळणाचा आणि पापपुण्याचा जेवढा संबंध, तेवढाच द्विभार्याप्रतिबंधक कायदा पाळण्याचा आणि पापपुण्याचा संबंध आहे. युनायटेड स्टेट्सारख्या ख्रिस्ती धर्मानुयायी देशातही, मॉर्मन्पंथीय ख्रिस्त्यांतील बहुपत्नीकत्व अगदी परवापर्यंत कायद्याने मोडून काढता आले नव्हते. कायद्याने एकपत्नीव्रत अगर विधुरव्रत लादणे म्हणजे दांभिकतेला आणि बाहेरख्यालीला राजाश्रय देणे होय, हे हिंदुत्वनिष्ठ 'सोवळ्यां' इतकेच ख्रिस्तानुकारी सोंवळ्यांनीही लक्षात ठेवले पाहिजे. आणि एकपत्नीव्रत लादण्यात नैतिक प्रगती असेल तर ब्रम्हचर्यव्रतही कायद्याने लादून वैवाहिक नीतीचा अखेरचा टप्पा एकदमच का गाठू नये?

पण या सर्व प्रकरणांतून उद्‌भवणारा खरा प्रश्न वेगळाच आहे. 'दमा झालेल्या विधुराने लग्न करावे की नाही', 'केसरीच्या संपादकाने झगा घालणाऱ्या विदेशी विधवेशी विवाह करावा की नाही' हा खरा प्रश्न नसून, 'हिंदुत्वनिष्ठा म्हणजे काय?' हाच यातून उत्पन्न होणारा खरा प्रश्न आहे. या खंडतुल्य देशात कृमिकीटकांप्रमाणे बुजबुजलेल्या असंख्य जाती आणि पोटजाती जशाच्या तशा जतन करणे म्हणजे हिंदुत्वनिष्ठा की हजारो वर्षांच्या आमच्या इतिहासातील धार्मिक ध्येयवादाविषयी आणि पराक्रमाविषयी अभिमान बाळगण व त्या पराक्रमाचे जिवंत वारस म्हणून जगण्याची उमेद धरणे म्हणजे हिंदुत्वनिष्ठा, हा प्रश्न स्वतंत्र हिंदुस्थानच्या विचारवंतांनी सोडविला पाहिजे. आपल्या धर्मात, तत्त्वज्ञानात, शिल्पगायनादी कलांत वाङ्मयात आणि सामाजिक सभ्यतेत खरोखरच काही लोभनीय आणि रक्षणीय असेल, तरच हिंदुत्वनिष्ठेला काही अर्थ आहे. केवळ काही अहिंदू समाज हिंदू समाजाच्या जीवावर उठले आहेत, म्हणून जीव बचावण्याकरिता एकत्र येणे एवढाच हिंदुत्वनिष्ठेचा अर्थ नाही, असे मी समजतो. आणि असे असले तर, ज्या सुसंस्कृत आणि सुविद्य परकीयांनी आमच्या इतिहासाच्या आणि संस्कृतीच्या प्रेमाखातर स्वतःचा देश व धर्म सोडला त्यांच्याबाबत आमच्या भावना कोणत्या आहेत व असतात, हे एकदा डोळे उघडून पाहिले पाहिजे. त्या परकीयांच्या ध्येयवादित्वाची विशालता, हिंदुस्थानला आपला देश व हिंदू धर्माला आपला धर्म मानण्यापर्यंत जावी आणि आमचा खेडवळ धर्माभिमान मात्र मडमेचा अगर साहेबाचा विटाळ आमच्या स्वयंपाकघराला नको म्हणून बुजरेपणाने दार लावून घेण्यातच व्यक्त व्हावा, ही स्थिती शोचनीय आहे!

ही स्थिती पेशवाईत होती, आणि आज संपूर्णपणे नाहीशी झाली आहे असा ज्यांना गोड भ्रम असेल, त्यांनी या देशाला आपला देश म्हणणाऱ्या पाश्चात्यांशी आपले वर्तन आजवर कसे होत आले आहे याचा एकदा शोध घ्यावा. ज्ञानकोशकार केतकर यांच्या युरोपीय पत्नी त्यांच्या पश्चात् पुण्यात एकदोन आठवडे राहाण्याकरता जागा शोधीत हिंडत असता, डेक्कन जिमखान्यावरील बेसुमार सुधारलेल्या वस्तीत त्यांना कोणता अनुभव आला याची हकीकत एक वर्षामागे मी साप्ताहिक 'लोकसत्ते'तील 'सुखसंवादा'त निवेदन केली

आहे. सावित्रीदेवींसारखी हिंदुत्वप्रेमी ग्रीक विदुषी आमच्या सुशिक्षित स्त्रियांस विभावरी शिरूरकर अगर मालतीबाई दांडेकर यांच्या इतपतही माहीत नसते, याचाही उल्लेख मी अन्यत्र केलेला आहे! या ग्रीक स्त्रीच्या असाधारण विद्वतेसंबंधी आणि असाधारण हिंदुत्वप्रेमासंबंधी मी मागे' 'वसंत' मासिकातच लेख लिहिला होता. त्यासंबंधी प्रो. बनहट्टी यांनी नागपूर येथील आपल्या 'समाधान' साप्ताहिकात उपहासयुक्त आश्चर्य व्यक्त केलेले होते. त्यांच्या म्हणण्याचा मतलब असा होता की, 'सावित्रीदेवीच्या हिंदुत्वप्रेमाचे क्षीरसागर एवढे स्तोम माजवितात, पण आम्ही हेच प्रेम पिढ्यानुपिढ्या दाखवीत आहोत, पण क्षीरसागर आमचे मात्र कौतुक करीत नाहीत!'

सावित्रीदेवींची सर्वमान्य विद्वत्ताही आमच्या आत्मसंतुष्ट जुन्या मंडळींस पटत नसल्यावर त्यांनी (सावित्रीदेवींनी) खाजगी संभाषणात मला सांगितलेला त्यांचा विवाहविषयक ध्येयवाद तर आमच्या पुरोगामी मंडळींसही अतर्क्य वाटण्याचा संभव आहे!

प्रो. बनहट्टी आणि ज. स. करंदीकर यांच्या विचारांत आणि व्यक्तिमत्त्वात जर कोणता दोष असेल, तर तो lack of imagination हा होय. आजच्या जगात हिंदुत्व टिकवायचे आणि वाढवायचे असेल तर, केवळ रुक्ष परंपरापालनाने भागणार नाही. परकीयांचे आपल्या संस्कृतीवरील प्रेम समजण्याइतपत तरी कल्पनाशक्ती आपल्या अंगी असणे जरूर आहे. 'हिंदुत्वनिष्ठा' ही केवळ 'बचाऊ' (defensive) सोवळेपणाची बाब नसून, कल्पक धर्माभिमानची 'imaginative partriotism' ची बाब आहे. हिंदूंच्या संस्कृतीत सोवळेपणाखेरीज जे काही आहे ते पाहण्याइतकी काव्यमयता आपल्यात असेल तर, हिंदुस्थानच्या चतुःसीमेतच काय, पण बाहेर चारी खंडांतही आपणांस हिंदुत्वप्रेमी लोक आढळतील!

सिस्टर निवेदिता, शीलवतीबाई केतकर, सावित्रीदेवी मुखर्जी, महात्मा गांधींच्या शिष्या मीराबाई यांच्या अपूर्व ध्येयवादासंबंधी अभिज्ञता व कृतज्ञता दाखविण्याऐवजी, 'या गोऱ्या मडमांकडून हिंदुत्वप्रेम नि देशप्रेम शिकण्याची आम्हांला तरी गरज नाही!' असे आत्मसंतुष्टतेचे उद्‌गार काढणे आम्हा हिंदूंच्या इतिहासप्रसिद्ध 'कूपमंडूक वृत्तीला' आणि आत्मघातकीपणालाच काय ते शोभते! प्राचीन अरब विद्वान अल्बेरुणी याने प्राचीन हिंदूंच्या ज्या करुणाजनक आत्मसंतुष्टतेचे वर्णन करून ठेवले आहे तिच्या पलीकडे आपण न गेल्यास, 'हिंदुत्वनिष्ठा म्हणजे संकुचितपणा' ही व्याख्याच अखेर खरी ठरेल!

हिंदू धर्माच्या पाश्चात्य अनुयायांचा उपयोग बहाद्दर समाजसेवक म्हणून तर आहेच, पण अतिपरिचयामुळे आपल्याच संस्कृतीसंबंधी मलिन झालेली आपली दृष्टी साफ करणारे नेत्रवैद्य म्हणूनही आहे.

शिवाजीमहाराजांप्रमाणे शुद्धीकृत मुसलमानांशी सोयरीक करण्याचे धैर्य दाखवायचे, की दुसऱ्या बाजीरावाप्रमाणे सोवळी वाळत घालून शनिवारवाड्याचे रक्षण करायचे हे हिंदुत्वनिष्ठांनी स्वतःचे स्वतःच काय ते ठरवावे!

वसंत,
ऑगस्ट १९५०, पृ. ४२-४५.

अनुक्रमणिका

# ४३

## हुंडा, वारसा आणि विवाह

आपल्या समाजसुधारणेच्या इतिहासात कित्येक प्रश्न काही काळ प्रमाणाबाहेर गाजले आणि नंतर मात्र ते न सुटताच मागे पडले.

आम्ही लहान असता बंगालमधील कोणा एका 'स्नेहलते'ने आईबापांचे हुंड्यापायी होणारे हाल चुकविण्याकरता अंगावर रॉकेल ओतून स्वतःला पेटवून घेतल्याची कथा पुण्यातील कॉलेज-तरुणांना व सुधारणावादी प्रोफेसरांना तप्त करती झाली होती. त्या वेळी कॉलेजांत सभा झाल्या, सभेत शपथा झाल्या व नंतरच्या हंगामात विवाह झाले. विवाहांत काय झाले याचे अहवाल उपलब्ध नाहीत!

ही गोष्ट पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वीची असावी. त्यानंतर बंगालची प्रगती मला माहीत नाही; पण महाराष्ट्र तरी कल्पनातीत 'पुढे' गेला आहे. तो इतका की, कित्येकांना विवाह-संस्थाच मुळी टिकेल की नाही याची चिंता पडली आहे! आणि तरी हुंड्याची संस्थाही टिकून आहे-नव्हे, ज्यांच्यावर त्या प्रकारची जबाबदारी आहे त्यांना ती चिंतातुर करीत आहे. प्रौढविवाह, प्रीतिविवाह, विधिविहीन नोंदणीविवाह, अभूतपूर्व स्त्री-शिक्षण आणि स्त्रियांचे वाढते द्रव्यार्जन या सर्व क्रांतिकारक सुधारणांतूनही हा हजार-दोन हजार रोकडाचा पेच गरीब वधूपित्यांना टळत नाही, हा प्रकार खरोखर अद्भुत म्हटला पाहिजे! सनातन्यांना आणि वृद्धांना 'शॉक्' करणाऱ्या गोष्टीही आपण केवळ वरपांगी आणि अनुकरणात्मक करीत असतो असा याचा अर्थ करायचा का?

आपल्याइकडील समाजसुधारणा म्हणजे बहुतांशी लेखीतोंडी चर्चाच असते. पण त्या चर्चेचाही पाया बहुजनसमाजाच्या वर्तनामागील प्रेरणांपर्यंत खोल कधीच पोहोचत नाही.

पुस्तकी न्यायबुद्धी (abstract justice) आणि अनुकरणात्मक पुरोगामित्व हेच आमच्या सामाजिक होकायंत्राचे काटे होत. हुंडा वाईट खरा, परंतु तो कसा रूढ झाला आणि जे क्रांती आणि पुरोगामित्व यांचे पुरस्कर्ते नाहीत त्यांनाही तो वेडेपणा वाटण्याकरिता काय केले पाहिजे, याचा विचार होण्याला अजूनही जागा आहे. हुंडा ही जर सनातनी वृत्तीची खूण आहे, तर शिक्षण आणि समाजसुधारणा यांच्या वाढीबरोबर हुंड्याची चाल कमी कमी व्हायला हवी होती. उलट वस्तुस्थिती तर अशी दिसेल की, इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराबरोबर विवाहाचा आणि हुंड्याचा प्रश्न अधिकच बिकट झाला. हे समजण्याकरता एखाद्या संशोधन संस्थेतील 'स्टॅटिस्टीशियन्'कडेच गेले पाहिजे असे नाही. इंग्रजी शिक्षणाची आणि इंग्रजी मनोवृत्तीची वाढ होण्यापूर्वी सामान्य स्थितीतील लोक गावातल्या गावात, नात्यातल्या नात्यात मुलगी देण्याची धडपड करीत. याची कारणेही पाहण्यासारखी आहेत. प्रवासाच्या सोयी आणि नोकरीधंद्याचे संबंध त्या वेळी इतके वाढलेले नसल्याने, नागपूरच्या माणसाने उठून पुण्यात मुले शोधीत हिंडायचे ही गोष्ट सहसा घडत नसे. प्रसिद्ध घराणी दूरवर माहीत असत व दूरच्या ठिकाणी सोयरिकीही करीत पण गरीब स्थितीतल्या माणसांनीही नोकरी, शिक्षण व विवाह यांच्या क्षेत्रांत जास्तीत जास्त बाजारभावावर नजर ठेवण्याची चाल त्या काळात नव्हती. पण त्यानंतरच्या काळात माधुकरी मागून हुजूर डेप्युटी कलेक्टरपर्यंत चढण्याची जशी लालूच दिसू लागली

त्याप्रमाणे बी. ए. होताच श्रीमंताची मुलगी आणि तिच्याबरोबर शिक्षणाचा खर्च निघण्याइतका हुंडा मिळवण्याची प्रथा पडली! लवकरच पुणे, मुंबई, कोल्हापूर, सांगली, नागपूर, अमरावती या लग्नाच्या पेठा झाल्या. आणि जन्माच्या संबंधात वधूपित्याने नाइलाजाने दिलेल्या हजारदोन हजार रुपड्यांना महत्त्व येऊन बसले. सारांश, सुधारणेसंबंधीच्या व्याख्यानांनी आणि लेखांनी हुंडा मागे हटण्याऐवजी धर्मसंस्कारशून्य स्पर्धाप्रधान समाजजीवनात हुंडा एखाद्या मोकळ्या पोळाप्रमाणे पुष्ट झाला! पण आज ज्या वृद्धांनी कुळाच्या इभ्रतीच्या पोटी हुंड्याची रक्कम गंभीरपणे ठरवायची त्यांना कित्येक विवाहांत स्थानच नसते! या अनपेक्षित वाटेने तरी हुंड्याचे मरण ओढवणार की त्यातूनही तो जगणार? प्रौढ वधू वरांनी स्वतः विवाह ठरवले तरी हुंड्याची चर्चा होईल का? मला हेही अगदीच अशक्य वाटत नाही. 'हाच मुलाचा बाप' या लोकप्रिय नाटकात वरेरकर यांनी हे हास्यकारक दृश्य दाखवलेही आहे. वधू आणि वर दोघे साथीदार बनून वधूपित्याला हुंडा व मानपान 'डिक्टेट' करू शकतात.

सारांश, हा सुशिक्षित आणि अशिक्षित यांच्यातील भेद नसून, माणसांना धन मानणारे आणि धनालाच प्राण समजणारे यांच्यातील भेद आहे.

तसेच, हा मुलीकडचे लोक आणि मुलाकडचे लोक यांच्या सदयते-निर्दयतेचाही प्रश्न नव्हे. कारण मुलीचा बाप स्वतःच्या मुलाच्या लग्नात निर्घृण आणि 'लिलावी' वृत्तीचा होण्याला कमी करीत नाहीच!

हे सर्व सनातनी आणि धर्मभोळ्या वृत्तीचे फळ आहे असेही नव्हे. भाडेचिठ्ठीप्रमाणे लग्नचिठ्ठी नोंदवून घेणारे बुद्धिवादी लोकही बायकोकडील पैशांवर नजर ठेवू शकतात. (की जशा बी. ए. झालेल्या सास्वा-नणंदाही मत्सरात आणि दुष्टाव्यात कमी नसतात! ) सारांश, हा नवमतवाद स्वीकारण्याचा प्रश्न नसून माणूसकी टिकवण्याचा प्रश्न आहे.

आणि या दृष्टीने पाहता नवमतवादाच्या वाढीबरोबर माणुसकीची वाढ मात्र झालेली दिसत नाही. माणुसकी वाढण्याकरता कोणताही कायदा किंवा क्रांतिवाद उपयोगी पडण्यासारखा नाही. त्याकरता सामाजातील भावना, प्रेरणा व इभ्रतीच्या कल्पना बदलण्याचा यत्न केला पाहिजे. हा प्रश्न न्यायशास्त्र आणि समाजशास्त्र यांच्याहीपेक्षा मानसशास्त्राचा आहे, किंबहुना हृदयपालटाचा आहे.

पण आज या परिस्थितीत कायद्याच्याच वाटेने एक बदल घडून येत आहे. आज मुलींना द्रव्यार्जनाचे साधन जे शिक्षण ते गेल्या दोन पिढ्यांतील शिक्षणप्रसारामुळे मिळालेच आहे, पण द्रव्यार्जनाबरोबर त्यांना वडिलांच्या इस्टेटीत वारसा मिळावा अशीही तरतूद होऊ घातलेली आहे. मुलींच्या वारसासंबंधी इतर दृष्टींनी मला येथे काहीच म्हणायचे नाही. मुलींना माहेरच्या इस्टेटीत वारसा नसल्यास विशिष्ट परिस्थितीत सासरीही थारा नाही आणि माहेरीही थारा नाही अशी स्थिती होते, ही गोष्ट खरी. तथापि, ही अपवादात्मक उदाहरणे व त्यातील दुर्दशेस कारणीभूत होणारी अपवादात्मक माणसे सोडून विचार करावयाचा म्हटल्यास, वारसाहक्काचा परिणाम विवाहाच्या बाबतीत मुलींना फारसा अनुकूल होईलसे वाटत नाही.

आज हुंड्यावर नजर ठेवणारे लोक उद्या मुलींच्या भावंडांची मोजदाद करून तिच्या वाट्याला येणाऱ्या इस्टेटीवर नजर ठेवतील!

मात्र प्रौढ कुमारिका व विधवा यांचे हाल थोडेसे कमी होतील.

हुंड्याच्या बाबतीत एखाद्या 'स्नेहलते'च्या आत्महत्त्येनंतर शपथा घेण्यापासून ते लग्नाच्या निमित्ताने मुलाचा व स्वतःच्या इभ्रतीचा लिलाव पुकारण्यापर्यंत आढळणाऱ्या आजच्या सर्वच वृत्ती अस्वाभाविक आहेत.

विवाहसंबंधात आर्थिक परिस्थिती अजिबातच लक्षात घेतली जाऊ नये ही भूमिका मी येथे स्वीकारीत नाही. अगदी अपवादात्मक असे प्रीतिविवाह सोडल्यास-आणि खरे प्रीतिविवाह अत्यंत अपवादात्मकच असतात-वधू-वरांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार न केल्यास त्यांचे वैवाहिक जीवन सुखी होण्याचा संभव कमी असतो. हुंड्याच्या बाबतीतही 'लिलावी' वृत्ती सोडणे म्हणजे अजिबात आर्थिक दृष्टीच सोडणे असे नव्हे. विवाहसंबंध हा दोन परक्या घरांचा संबंध जोडण्याचा एक महत्वाचा मार्ग असतो. या संधीचा फायदा सर्वसामान्य व्यवहारी माणसांनी सुखवस्तू घराण्याशी संबंध जोडण्याकरिता घेतल्यास नवल नाही. परंतु सुखवस्तू घरांशी संबंध जोडणे वेगळे आणि लग्नसंबंधाची वेळ साधून भावी सग्यासोयऱ्यांपासून एका रकमेने जास्तीत जास्त पैसा काढण्याचा प्रयत्न करणे वेगळे! अगदी व्यवहारी दृष्टीने पाहिले, तरीही हा प्रकार अदूरदृष्टीचा किंबहुना penny-wise, pound foolish या जातीतला वाटतो. एका विशिष्ट प्रसंगी अडवून पैसे काढण्याने घेणाऱ्याचाही जन्माचा फायदा होतो असे नव्हे आणि देणाऱ्याला त्यात नेहमीच संकट असते असेही नव्हे. पण मुख्य तोटा तो वेगळाच आहे. लग्नासारख्या अत्यंत जिव्हाळ्याच्या संबंधात प्रेम, रूप, स्वभाव, माणुसकी, वगैरे गोष्टींना महत्त्व येण्याऐवजी एक क्षुद्र रक्कम व खोटी इभ्रत यांना महत्त्व येऊन बसते व एकंदर सर्वच बनाव 'सौदा' आणि 'सट्टेबाजी' यांसारखा होऊन बसतो.

प्रेमविवाह तर फार दूरच आहेत, पण साधा, समंजस आणि माणुसकीचा विवाहदेखील आपल्या समाजात अद्याप रूढ नाही!

नव्हे, पूर्वी होता तितपतही तो आता समंजस आणि माणुसकीचा संबंध राहिला नाही. पूर्वी गावातील मुलगी, नात्यातील मुलगी, फार काय चांगल्या कुंडलीची मुलगी, वगैरे गोष्टींना जे महत्त्व दिले जात असे ते तर्कदृष्ट्या योग्य असो अगर नसो, हुंड्याच्या रकमेकडे पाहून किंवा मुलीने दिलेल्या परीक्षांच्या संख्येकडे पाहून केलेल्या निवडीपेक्षा ही जुनी भाबडी निवड अधिक बरी असेच मी म्हणेन. कारण पत्रिका किंवा जातकुळी यांना महत्त्व देणे हे क्षणभर भाबडेपणाचे मानले तरी, बाजारीपणाचे खासच नाही. आणि समाजसुधारणेच्या क्षेत्रात जर कोणती गोष्ट पुनः पुन्हा बजावून सांगण्याची जरूर असेल तर, ती म्हणजे सुधारणा आणि नवमतवाद यांच्या नावाखाली अनेक क्षेत्रांत आज 'बाजारवाद'च बोकाळत आहे! अगदी क्षुद्र फायद्याकरता आपण माणुसकी आणि सामाजिक सौंदर्य यांना दिवसेंदिवस पारखे होत आहोत. वस्तुतः हा समंजसपणा आणि हे सौंदर्य विवाहाच्या क्षेत्रात उत्पन्न होण्यास आजच्याइतकी चांगली संधी पूर्वी कधीच आलेली नसेल. समजून असो की न समजता असो, आज सुशिक्षित समाजात तरी प्रौढविवाह चांगलाच रूढ झालेला आहे. तथापि, हे प्रौढत्व आज केवळ वयापुरतेच दिसत आहे. म्हणजे वधू आणि वर यांची वये वाढलेली दिसत आहेत. परंतु बहुसंख्य उदाहरणांत

त्यांच्या भूमिका मात्र बालविवाहाच्या काळातीलच दिसत आहेत. प्रौढ आणि पदवीधर मुलामुलींचे विवाह ठरविण्याचे काम अद्याप वृद्ध माणसांकडेच जात आहे. शिवाय, वृद्धांनाही या बाबतीत पूर्वीच्याइतका आत्मविश्वास वाटणे शक्य नाही. कारण ज्यांची लग्ने ठरवायची ते आता पूर्वीसारखे अजाण नाहीत. या सर्वांचा परिणाम म्हणजे विवाहाच्या बाजारात अनिश्चितता व मंदी येणे हा होय. या परिस्थितीचा सर्वांत घातुक परिणाम वधूपित्यांवर होत आहे आणि त्यांच्या खालोखाल स्वतः वधूंच्या मनावर होत आहे.

हा सर्व परिणाम केवळ हुंड्यांचा असे मला म्हणायचे नाही. तो त्याहूनही एका व्यापक सामाजिक दोषाचा परिणाम आहे.

विवाहाच्या बाबतीतील आपली दृष्टी जुन्या जमान्यातील दृष्टीहूनही अधिक कृत्रिम, अव्यवहार्य आणि 'लिलावी' झाली आहे. लग्नात पैशाच्या किंवा इभ्रतीच्या दृष्टीने जास्तीत जास्त फायदा पाहणे ही वृत्ती जवळजवळ 'लिलावा'ची वृत्तीच होय असे मला तरी वाटते. मित्र किंवा शेजार निवडतानादेखील आपण केवळ व्यावहारिक फायदा पाहत नाही. (आणि जर तसा पाहात असलो तर मैत्रीला आणि शेजारपणालाही आम्ही अपात्र आहोत!) मग विवाहसंबंधात ही highest bidder शोधण्याची वृत्ती तर त्याहूनही अस्वाभाविक होय.

पण हा हृदयपालट होण्याकरता विवाहाकडे पाहण्याची दृष्टी बदलली पाहिजे. आणि ही गोष्ट आमचे तरुण व आमच्या तरुणी खरोखरीचे प्रौढ आणि खरोखरीचे सुशिक्षित झाले तरच होईल. आज ते समाजाला धक्का देण्याइतपतच किंवा आईबापांना धुडकावण्याइतपतच सुशिक्षित आहेत. पण वैवाहिक निवडीतला पोषाखीपणा, दिमाखीपणा आणि लिलावी वृत्ती सोडण्याइतपत मात्र ते सुशिक्षित झालेले नाहीत. विवाहाच्या क्षेत्रातील सामाजिक प्रतिष्ठेची आणि इष्टमित्रांना दिपवण्याची वृत्ती सुटेल तर, निवडीचा आणि हुंड्याचा दोन्ही प्रश्न सोपे होतील.

प्रीतिविवाहाची 'आत्मिक धमक' सर्वांतच असेल असे नाही; पण वर सुचविलेल्या 'खऱ्या प्रौढ विवाहा'ची धमकही तरुणांत नसेल तर, त्यांना सुशिक्षित म्हणणे रास्त होणार नाही.

रविवारची लोकसत्ता,
प्राप्तसंवाद, वर्ष २, क्र.१२
३ एप्रिल १९९५, पृ.५.

अनुक्रमणिका

# ४४

## विवाहविषयक वास्तवता

त्या दिवशी आम्ही-मी व माझे एक स्नेही जोडपे-एका विवाहोपयोगी तरुणाचा हृदयपालट करीत होतो. त्याने नुकताच एका नव्या वधूपित्याला नकार दिला होता. ज्या पित्याला नकार दिला होता तोही आमच्या मित्रपरिवारातलाच होता. त्याला नकार दिलेला कळल्यावर आम्हांला थोडे वाईट आणि थोडे बरेही वाटत होते. एका परिचित वधूपित्याचे यत्न फुकट गेले म्हणून वाईट, तर इतर ऋणानुबंधी वधूपित्यांना सुचवायला एक वर मोकळा झाला म्हणून बरे वाटत होते! दरम्यान त्या सुविद्य, सुजाण वराची स्थिती मात्र अनुकंपनीय झाली होती. ती इतकी की आरंभी ज्याला मी आकारण विवाह लांबणीवर टाकण्याबद्दल खडसावीत होतो, त्याचीच बाजू घेऊन पुढे मी त्या बैठकीत बोलू लागलो होतो.

तो मुलगा पदवीधर, मिळवता आणि लग्नाला योग्य झाल्याला आता चार-पाच वर्षे झाली होती. दरम्यान तो आपल्या पदव्यांत आणि ज्ञानातही भर घालीत असला तरी, विवाह लांबणीवर टाकण्यासारखे कुठलेच काम त्याने हाती घेतलेले दिसत नव्हते.

"मग निष्कारण लग्नाची चालढकल करून तू स्वतःचे पायजमे स्वतःच धूत, खाणावळीचे अन्न का खात बसला आहेस?" मी त्याला वेड्यात काढून विचारीत होतो. आमच्या स्नेही जोडप्याजवळ त्याला सुचवण्यासारख्या अगदी नात्यागोत्यातल्या मुली असल्याने ते तर अधिकच अधीरपणे त्याला छेडीत होते. विशेषतः त्यांपैकी पतिराज शास्त्रीय बाण्याचे भोक्ते असल्याने, त्या अविवाहित मुलाच्या नकाराची सर्व संभाव्य कारणे तर्कदृष्ट्या अंदाजून त्याने ती 'एंडॉर्स' करायच्या आधीच खोडून दाखवीत होते! "सध्या प्राप्ती कमी वाटत असेल तर, तीसुद्धा नोकरी करील." "तुमचे आधी कुठे जुळले असेल तर, तसे सांगा; आम्ही तुमच्या वडलांची संमती आणतो!" "तुमच्या उंचीला मुली कमी भरत असतील तर, आमच्याजवळ पाच फूट चारच्यादेखील दोन मुली आहेत. त्या जोश्यांची... मला वाटतं..."

तो 'लग्नाचा' मुलगा-किंवा सध्या लग्नाचा नसलेला मुलगा! —माझ्याकडे पाहून गालातल्या गालात हसत होता! कारण आमच्या 'सायंटिफिक' दृष्टीच्या मित्रांनी ठरवलेली नकाराची निदाने त्याच्या बाबतीत तरी खरी नव्हती! त्या मुलांन आता लग्न करावंच असं माझं मत असूनही (आणि त्याला सुचवण्यासारखी माझ्या आप्तांपैकी मुलगी असूनही) मी आता त्याची बाजू घेऊन त्या शास्त्रज्ञाशी तंडू लागलो.

"उंची आणि प्राप्ती यांची अडचण नसली तर, लग्नाला नकार द्यायला तुमच्या मते कारणच उरत नाही का?" मी शास्त्रज्ञांकडे पाहून म्हटले.

"दुसरं कसलं कारण?... तुम्ही पर्मनंट् आहात ना?" त्या शास्त्रज्ञांनी आणखी एक सांभाव्य कारण आठवून त्या तरुणाकडे पाहून विचारले.

अनुक्रमणिका

"अहो, तो अद्याप पर्मनंट् नाही याला कारण त्यानंच कायम होण्याला संमती दिलेली नाही. अन् शिवाय उंच, गोऱ्या मुली सांगून येऊनही त्यानं नकार दिला आहे. त्याचा नाकार मुलींना नसून लग्नालाच आहे, अशी माझी कल्पना आहे." मी म्हटले.

"लग्नाला नकार असायचं काय कारण?" शास्त्रज्ञ थोडे आश्चर्य आणि थोडी कीव करून म्हणाले, "आता तुमचं वय... पंचवीस तरी."

"तीस!" तो तरुण वयानं तितका दिसत नसूनही खरं ते वय सांगत असे.

लग्नाच्या विषयात एखादी प्रपंचेतर शास्त्रीयेतर दृष्टीही असते, याची त्या प्रापंचिक दृष्टीच्या शास्त्रज्ञाला जाणीव देण्याच्या हेतूनेच मी म्हटले, "लग्नालाच एखाद्याची हरकत असायला काय हरकत? विचारी तरुण लग्नाच्या बाबतीत नेहमी चालढकल करताना आढळतील अन् एक तरी तुम्हांला कबूल केलंच पाहिजे-लग्न म्हणजे अंधारात उडी आहे. मुलींना तर ती उडी घेताना अग्निदिव्य केल्यासारखं वाटत असेलच, पण मुलांनासुद्धा-विशेषतः चांगल्या मुलांना ती एक अंधारात उडीच वाटते. कुणाशी जन्माची गाठ पडेल कुणी सांगावं!"

"छट्! शक्य नाही! ..."माझ्या अज्ञानाची कीव करीत आमचे शास्त्रज्ञ मित्र म्हणाले, "शक्य नाही! हिंदू स्त्री पतीच्या सुखाकरताच जगते हे लक्षात ठेवा! 'कुणाशी गाठ पडेल' अशी शंका काढण्याची वेळ अद्याप तरी आपल्या हिंदू समाजात आलेली नाही." आमच्या शास्त्रज्ञ मित्रांची छाती सांस्कृतिक अभिमानानं भरून आली असली तरी, त्यांच्या समांतर रेषेतच बसलेल्या त्यांच्या पत्नींना हसू येत होतं. कारण 'कुणी तरी कुणाच्या तरी सुखाकरता जगणं' म्हणजे काय, याचा अर्थ त्यांना अधिक माहीत होता!

वास्तविक विवाहविषयक औदासीन्याबद्दल त्या तरुणाला दोष देत देतच मी त्या संभाषणात प्रवेश केला, परंतु आमच्या शास्त्रीय दृष्टीच्या मित्रांच्या विवाहविषयक निःशंकतेमुळे मला त्या साशंक तरुणासंबंधी उलट सहानुभूती वाटू लागली. आणि त्याबरोबरच आजच्या तरुण-तरुणींच्या वैवाहिक वृत्तीसंबंधी कुतूहल वाटू लागले. आज अनूरूप वर वा वधू शोधून काढायला वेळ लागतो, हे तर खरंच आहे; पण अशांचा शोध लागला तरीही कित्येकदा उभयपक्षी साशंकता, चालढकल आणि विलंबयुक्त नकार असा प्रकार दिसून येतो. हा कांक्षेखोर विलंब वरपक्षच लावतो असं नव्हे, तर वधूपक्षही लावतो. फरक इतकाच कीं, वधूपक्ष एकदा बोलणी सुरू केल्यानंतर चालढकल वा फाजील चिकित्सा दाखवीत नाही, तर आधी फाजील चिकित्सा करून नंतरच बोलणी करायला प्रारंभ करतो. पण एकूण विवाहविषयक अपेक्षाच वाढल्या आहेत की, विवाहविषयक साशंकता वाढली आहे?

आजच्या विवाहविषयक पूर्वचिकित्सेपैकी बरीच चिकित्सा आणखी पंचवीस वर्षांनी अनावश्यक व हास्यास्पदही ठरेल. एके काळी पोटजात आणि गोत्र यांची चौकशी झाल्याखेरीज मुलगा वा मुलगी पुढील चौकशीला 'एलिजिबल्'देखील ठरत नसे! आज पन्नास टक्के लोकांच्या बाबतीत तरी या गोष्टी निवडीचे क्षेत्र अकारण अरुंद करीत नाहीत. पण या गोष्टीहूनही हास्यास्पद अशा गोष्टींचा मात्र आजचे सुधारलेले वधू-वर

बाऊ करीत आहेत असे आढळेल. पसंत पडण्यासारख्या-नव्हे सहजासहजी हाती न लागण्यासारख्या एका हुशार मिळवत्या पदवीधर मुलाला बरेच दिवस स्थळे पाहणाऱ्या एका एम्. ए. झालेल्या मुलीने "पण त्यानं एम. ए. होऊन घ्यावं!" अशी सूचना कळविल्याचं मला माहीत आहे. या 'फाजील' सूचनेनंच ते लग्न मोडलं असं म्हणता येत नाही; पण ही अट मला गोत्राच्या अटीहून मूर्खपणाची वाटते. एम. ए. झालेल्या मुलीला पदवीधर पण एम्. ए. नसलेल्या मुलाशी लग्न करण्यात कमीपणा का वाटावा?

या अटीइतकीच खुळचट पण अतिकडक अट उंचीसंबंधीची आढळून येईल! मुलगा अगर मुलगी पाहाण्याच्याही आधी उंचीची चौकशी करणारे आईबाप अगर मध्यस्थ पाहिले म्हणजे मला गुरांच्या बाजाराची किंवा शिंप्याच्या दुकानाची आठवण होते! अनुरूप मुलगा पाहणे आणि अनुरूप कोट अगर ब्लाऊझ बेतणे या गोष्टी काहीच्या दृष्टीने सारख्याच ठरतात हे पाहून मला मानवी जोडप्यांची कीव येते! कै. माधवराव पटवर्धन यासंबंधात अनेकदा फार चिडून बोलत हे मला माहीत आहे. "तुम्ही बायको स्वतःकरता निवडीत नसून रस्त्यातल्या लोकांकरता निवडता. ती तुम्हांला सुखी करते की नाही यापेक्षा, तिला फिरायला नेताना लोकांना ती 'आपल्या बेताची वाटेल की नाही' याची तुम्हांला अधिक चिंता वाटते!"

बायको एम. ए. असल्यास नवरा निदान एम. ए. पाहिजे ही कल्पना अधिक मूर्खपणाची की बायकोपेक्षा नवरा थोडा तरी अधिक उंच पाहिजे ही कल्पना मूर्खपणाची हे ठरवणं कठिण आहे. पण गोत्र, पत्रिका वगैरेंना मागासलेपणात घालणारे लोकही उंची आणि पदवी यांच्यातील अनुरूपता पाहतात एवढ मात्र खरं! यातील सत्य आहे तरी काय? वस्तुस्थिती अशी आहे की, एम. ए. झालेल्या स्त्रीपेक्षाही बी.ए. किंवा बी.एससी. झालेला पुरुष कित्येकदा अधिक बहुश्रुत आणि तरतरीत असू शकतो. कारण वाचन, संभाषण आणि व्यवहारिक अनुभव यांत मिळवता पुरुष नुसत्या पदवीधर स्त्रीपेक्षा पुढे गेलेला असतो. आणि म्हणून एम. ए. झालेल्या स्त्रीचे एम. ए. नसलेल्या पुरुषाशी विवाह करायला कचरणे म्हणजे 'बी' या अक्षाराहून 'एम' हे अक्षर श्रेष्ठ मानणे एवढा अखेर अर्थ उरतो! तीच गत उंचीची. पुरुष हा स्त्रीपेक्षा 'उंच असावा' या अपेक्षेला अर्थ नाही. पुरुष हा स्त्रीपेक्षा अधिक तरतरीत, खंबीर वा आत्मविश्वासयुक्त असावा, या अपेक्षेलाच फार तर काही अर्थ आहे असं म्हणता येईल. 'फार तर' म्हणायचं कारण असं की, आर्थिक सुस्थिती असली म्हणजे इतक्यांचेही कारण नसतं. पुरुषाला 'न्यूनत्व गंड' वाटला नाही म्हणजे बस्स! पण उंची आणि पदवी या बाबतींत नवरा अनुरूप (म्हणजे बायकोहून तसूभर अधिक! ) असूनही त्याला 'न्यूनत्व गंड' असू शकेल! एखादा नवरा मनानं खंबीर, बुद्धीनं तरतरीत आणि एकंदरीत सुस्थितीत असला तर, 'आपण बायकोहून उंच नाही' एवढ्या गोष्टीमुळे त्याला 'इन्फीरिऑरिटी कॉप्लेक्स' वाटेल अस मला वाटत नाही. मग आज वधू-वर संशोधनाच्या वेळी 'शिंप्याची टेप' बरोबर घेऊन जाणाऱ्या टोळ्या का बरे दिसाव्यात? याचं कारण एकच. दांपत्यसुख एकमेकांवर आणि उभयतांच्या आप्तेष्टांवर अवलंबून ठेवण्याऐवजी आज आपण डेक्कन जिमखान्यावर किंवा चौपाटीवर फिरायला येणाऱ्या लोकांच्या नजरेवर अवलंबून ठेवू लागलो आहो. आणि म्हणूनच संध्याकाळी फिरायला जाताना एकशे एक टक्के अनुरूप दिसणारी जोडपी आजकाल घरी एकमेकांना विटलेली, किंबहुना एकमेकांना सोडण्याकरताच कोर्टात आलेलीही दिसतात.

आजचे पुरुष पदवीधर मुलींशी लग्न करायला भितात असाही एक उथळ निष्कर्ष काही 'रेडिओ विदुषीं'नी काढलेला मला कळला. पण याच्या अगदी उलट उदाहरणं माझ्या पाहण्यात आहेत. एका गोऱ्यापान, घाऱ्या डोळ्यांच्या, स्कूटरवरून फिरणाऱ्या तरुणाचं पुण्याच्या मागासलेल्या वस्तीत वाणजिनसांचं

अनुक्रमणिका

दुकान आहे. त्याचं आणि एका नीटस, निमगोऱ्या, सडपातळ बांध्याच्या, मोहक चेहेऱ्याच्या मुलीचं प्रेम जमलं. मुलाला मॅट्रिक झाल्याबरोबर वडलांचं दुकान चालवायला घ्यावं लागलं. मुलीच्या घरची गरिबी असूनही, वरच्या बहिणींची लग्नं व्हायची असल्यामुळे नादारी मिळवीत तिनं बी. ए.चा वर्ग गाठला. परिणाम काय? तर पैसेवाल्या पण कमी शिक्षणाच्या या दुकानदार तरुणाबरोबर विवाह करण्याला या मुलीच्या वडलांनी तीव्र विरोध करून या प्रेमी जोडप्याला खट्टू केलं.

या तरुणाला आपलं शिक्षण कमी आहे याची जाणीव मला तरी दिसली नाही. फार काय, आपला व्यवसाय अशिक्षितांच्या व्यवसायांत मोडणार आहे याचीही खंत त्याला अगर त्याच्या पसंतीच्या त्या वधूला दिसली नाही. पोटाचा व्यवसाय म्हणून तो साखऱ्याचे पुडे बांधीत असला किंवा हिंग, जिरे, गोडतेल यानी हात मळवीत असला तरी गावातून फिरताना तो वुलन पॅन्ट, 'शार्क'चा बुशकोट घालून स्कूटरवरून हिंडत असे. आणि गोराधारा असल्यानं एंजिनिअरिंगच्या 'फायनल' वर्षात आहे असं सागितलं तरी चालण्यासारखं होतं! शिवाय, प्रत्यक्ष बोलताना त्याला असं आढळून आलेलं असणारच की, परीक्षेकरता नेमलेल्या चार पुस्तकांबद्दल किंवा ती शिकवणाऱ्या पोषाखी प्रोफेसरांबद्दल जेव्हा आपली वधू बडबडते तेव्हाच फक्त आपल्याला गप्प राहावं लागतं; एरव्ही कुठल्याही विषयावर तिच्यापेक्षा आपल्याला अधिक माहिती आहे. हिम्मत आणि कर्तृत्व तर आहेच आहे!

अशा स्थितीत, पदवीधर मुलींशी लग्न करायला पदवीधर मुलंदेखील भितात या अफवेची संगती कशी लावायची? ही स्थिती काही 'केसेस्'मध्ये खरी असलीच तर मी तिचा अर्थ असा लावीन-पदवीधर मुली अधिक सुविद्य आणि खोल विचारांच्या असतात असं नव्हे, तर त्यांच्यात खोट्या अपेक्षा आणि अहंकार उत्पन्न झाल्यामुळे दुसऱ्यांशी जुळवून घेण्याची त्यांची शक्ती अजिबात नाहीशी झालेली असते. या अहंकारातदेखील 'मी विद्वान् किंवा कर्तृत्ववान् आहे' या कल्पनेचा भाग बेताचाच असतो. जो काय अहंकार असतो तो 'मी जुन्या जमान्यातली नाही' आणि 'जुन्यांशी मी जमवून घेणार नाही' या थाटाचा असतो! अगदी क्षुल्लक गोष्टींत-उदाहरणार्थ, पोषाख, सौभाग्यचिन्हं, इ.-वडील माणसांशी जुळतं घेण्यात आजच्या काही मुलींना कमीपणा वाटतो. बांगड्या न घालणं, छाती-पोट उघडं टाकणं, वेळप्रसंगी फ्रॉक घालून उघड्या पोटऱ्या मिरवणं या गोष्टी आजच्या मुली केवळ दळभद्र्या गतानुगतिक वृत्तीनं करतात. पण सासरच्या माणसांच्या मतांकरिता त्या गोष्टी सोडायची वेळ आली, तर मात्र एखाद्या क्रांतिकारकाचा कोटिक्रम आणि अहंकार उसना घेतात. सारांश, ज्या अहंकारामुळे काही सुशिक्षित मुलींचं सासरी जुळत नाही तो विद्येचा किंवा बुद्धीचा नसून उथळ अनुकरणी फॅशन्सचा असतो. अर्थात् याच्याशी पदवीचा संबंध असतोच असं नाही. पुण्याची मुलगी पुण्याबाहेरच्या सासरी नांदायला पुष्कळदा तयार नसते, याला कारण आपण मुक्त स्त्रियांच्या नगरातून बद्ध स्त्रियांच्या कुग्रामात जात आहोत, असं त्यांना वाटतं.

आज अनेक मुली माहेरच्या फाजील अभिमानानं सासर तुच्छ मानतात आणि सासरी अप्रिय ठरतात, असं दिसून येईल. लग्न झाल्यावरही माहेरचं आडनाव चालू ठेवणाऱ्या कित्येक अतिशहाण्या वधू सापडतील. आणि याचं कारण काय? तर रेडिओवर चार रडगाणी गाऊन माहेरचं आडनाव 'रेडिओस्टार' म्हणून विख्यात झालं आहे, अशी त्यांची कल्पना असते! कित्योक मुली सासरी मुर्ख ठरल्यावर स्वतःचा 'डिफेन्स' देताना, 'निदान मी गोखल्यांच्या (किंवा कुलकर्ण्यांच्या म्हणा हवे तर! ) नावाखातर तरी अशी वागणं शक्य नाही हे तुम्हांला कळायला हवं होतं!' असं आपल्या ओशाळलेल्या नवऱ्यालाच उलट बजावतात! सारांश, आजच्या

मुलींच्या व्यवहारशून्यतेबद्दल आणि जुळवून घेण्याच्या अपात्रतेबद्दल बराच बोभाटा असला तरी, त्याच्याशी त्यांच्या पदवीचा किंवा विद्येचा काडीमात्र संबंध नाही. मुलींना मुलाप्रमाणे वाढविण्याची आज जी खुळचट टूम निघाली आहे तिच्यामुळे त्यांना सुगृहिणी बनवणं म्हणजे 'मुसळाचं धनुष्य' बनवण्याइतकं कठिण होऊन बसलं आहे.

आजच्या पुष्कळ मुली सासरी जुळवून घेण्यात कमीपणा मानतात हे त्यांच्या बंडखोर बुद्धीचं लक्षण आहे, हा एकंदरीत सपशेल भ्रम आहे. मुलींनी मुलांच्या घरी नांदायला जायचं (मुलांनी मुलींच्या नव्हे! ) हे एकदा मान्य केल्यावर, तिथं जुळवून न घेणं हा बंडखोरपणा नसून मूर्खपणा आहे, हे अगदी थोड्या विचारानंदेखील कळण्यासारखं आहे. महाराष्ट्रीय दुकानदार गिऱ्हाइकाला शहाणपण शिकवण्याची अहंकारी चूक करून धंद्याचा चुथडा करतो, असं आढळेल. उलट त्याच्यापेक्षा दसपट वस्ताद आणि गबर असा गुजराथी अथवा मारवाडी दुकानदार गिऱ्हाइकाचा वेडा हट्ट ओळखून त्याच्या पदरात माल बांधील. तीच गोष्ट महाराष्ट्रीय नोकराची. स्वाभिमानाच्या किंवा प्रामाणिकपणाच्या खोट्या कल्पनांनी तो मालकाला खूश ठेवायला असमर्थ ठरतो. पण यावरून महाराष्ट्रीय नोकर उत्तर हिंदुस्तानी वा मुसलमान नोकरापेक्षा अधिक स्वाभिमानी असतो असं मात्र म्हणता येणार नाही. सुशिक्षित ब्राह्मण दुकानदार सामान्य मारवाडी दुकानदारापेक्षा अधिक बुद्धीमान् असतो, असंही म्हणता येणार नाही. भलत्या ठिकाणी अहंकार दाखवून सौदा बिघडवणं हे बुद्धिमत्तेचं लक्षण नसून निर्बुद्धपणाचंच लक्षण आहे. दुसऱ्याच्या घरी नांदताना आरंभी आपल्याकडे लीनता आणि लहानपणा घेणं हाच शहाणपणा आहे, हे जुन्या वधूंना कळत असे; तर आजच्या वधूंना ते कळण्याइतपत बुद्धी नसते हे या प्रकारतलं कटु सत्य आहे. या निर्बुद्ध अहंकाराला 'बंडखोरपणा' हे नाव देणं म्हणजेही एक निर्बुद्धपणाच होय.

सासरी जुळवून घेण्यात कला आणि शहाणपणा आहे असं प्रतिपादन केलं म्हणजे काही आधुनिक स्त्रिया अवास्तव आणि अतिरेकी उदाहरणं घेऊन ते अशक्य आहे असं सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. "जुन्या पंचवीस माणसांच्या एकत्र कुटुंबात मावस सासवा, चुलत सासरे यांची सेवा करणं आजच्या शिकलेल्या मुलीला शक्य नाही!" इत्यादी, इत्यादी कोटिक्रम एखाद्या 'पुरोगामी' मासिकात त्यांनी वाचलेला असतो. पण आजच्या मुली पाचपंचवीस दूरदूरच्या नातेवाइकांच्या चारचार चौकी वाड्यांतच केवळ मूर्ख ठरत आहेत असं थोडंच आहे! चार माणसांच्या संसारातही त्या मूर्ख ठरत आहेत. सासूला 'सासूबाई', सासऱ्याला' मामंजी' किंवा नणंदेला 'वन्सं' समजण्यालाही त्यांना कमीपणा वाटत आहे. ही सर्व माणसं 'ह्याची माणसं आहेत, आपली कुणी नव्हेत' असं समजण्यात 'आधुनिकता' आहे, अशी यांची समजूत दिसत आहे. जुन्या वधूला 'मला अधिक नातेवाईक आहेत' हे सांगण्यात अभिमान वाटे; नव्या वधूला माझ्या नवऱ्याच्या आईबापांना, भावंडांना माझे नातेवाईक 'समजण्याइतकी मी जुनी नाही' हे दाखवण्यात अभिमान वाटतो. शिकलेल्या वधूचं शिक्षण' सासरच्यांना जड वाटत नसून तिचं हे नवं 'इंग्रजी तत्त्वज्ञान' सासरच्यांना गृहनाशक वाटत आहे. या इंग्रजी तुसडेपणाचा आणि खऱ्या शिक्षणाचा संबंध काडीमात्र नाही. हा तुसडेपणा म्हणजे इंग्रजांची आम्ही पत्करलेली वाईट गोष्टींतली गुलामगिरी होय. हा नवा तुसडेपणा आणि इंग्रजाभिमान सोडून आम्ही जुना कुलाभिमान पत्करला तर, सुशिक्षितांच्या विवाहात आज उभा राहिलेला बागुलबुवा एकदम नष्ट होईल!

वसुधा, वर्ष ११, अंक ४,
मे १९६१, पृ. ३५-३७.

अनुक्रमणिका

# कोर्टात गाजलेले भिन्नधर्मी विवाह

गेल्या वर्षी एकदोन हिंदूमुसलमान विवाह हे फिर्यादीचा विषय झाल्यामुळे बरेच प्रक्षोभक ठरले. मी प्रेमस्वातंत्र्याचा भोक्ता असल्यामुळे या विवाहांकडे 'प्रेमविवाह' म्हणून पाहता येईल की काय याचा बराच विचार केला; परंतु यांतील एक विवाह तर हुंडा, 'गोत्र' (मुसलमान वराचे! ) पाहूनच झाला होता. म्हणजे तो प्रेमविवाह नसून सनातनी वधू-वर संशोधनपद्धतीचा विवाह होता. दुसरा विवाह प्रेमविवाहाच्या पद्धतीने ठरला, पण वधू-अर्थात् हिंदू वधू-कोर्टात फिर्यादी म्हणून उभी राहिली. या विवाहाकडेही मी प्रेमस्वातंत्र्याच्या मेहेरनजरेने पाहू शकत नाही. काही उदार समाजनिरीक्षक, 'लाखो लोकांपैकी दोन व्यक्तींचे विवाह कोर्टात आले तर, संख्यादृष्ट्या उपेक्षणीय होत' ही वृत्ती बाळगू शकतील. परंतु वृत्तपत्रांत या विवाहांना जे महत्त्व दिले गेले होते व कोर्टात प्रेक्षकांची जी गर्दी जमत असे तिच्याकडे पाहिले तर, या घटना केवळ संख्येवरून मोजण्यासारख्या नाहीत हे कुणाच्याही ध्यानात येईल.

अशा विवाहाकडे प्रौढविवाह, प्रेमविवाह व व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या भूमिकेवरून पाहाण्याचा 'उदारपणा' जसा काही व्यक्ती दाखवतात, तसाच 'आंतरधर्मीय' अतएव पुरोगामी विवाह, या दृष्टीने पाहण्याचा पुरोगामीपणाही करताना दिसतात, याही औदार्यात सामील होण्यास माझी 'ना' नाही. परंतु हिंदूस्थानात इतिहासकालापासून झालेल्या हिंदूमुसलमान विवाहांचं स्वरूप 'आंतरधर्मीय' मानणं मला शक्य वाटत नाही. कारण इतिहासकाली जे विवाह झाले ते हिंदू वधू आणि मुसलमान वर असे झाले, तेही जेत्या मुसलमान बादशहाने घातलेली मागणी नाकारल्यास होणारे राजकीय परिणाम टाळण्याकरता झाले. काही उदाहणांत तर मुसलमान आक्रमकांनी अविवाहित वा विवाहित स्त्रियांचा अपहारच केला. पण मुसलमान आक्रमकांची ही स्त्रिया मिळवण्याची विशिष्ट पद्धत क्षणभर दृष्टीआड करूनही, या सर्व अपहारांना आणि जबरी विवाहांना 'आंतरधर्मीय' विवाह हे पुरोगामी नाव द्यायचं ठरलं तरीही, एक अडचण उरते. अकबरासरख्या 'उदारधी' बादशाहाच्या मनात आंतरजातीय विवाह खरोखरच सुधारणा म्हणून करायचे असते तर, हिंदू वधूंप्रमाणे तो हिंदू वरांवरही सक्ती करू शकला असता. पण 'अन्यधर्मीय समाजांतील वधू राजसत्तेच्या वा अपहाराच्या जोरावर मिळवणे' यापलीकडे या ऐतिहासिक विवाहांना कुठलाही अर्थ नव्हता.

अर्वाचीन काळात राजसत्तेच्या जोरावर परधर्मीय वधू मिळवण्याचा मार्ग उरलेला नसला तरी, अपहार आणि सक्तीचे धर्मांतर हे मार्ग ब्रिटिश राज्यातही बंद नव्हते. वृत्तपत्रांच्या फायलींत अशा प्रकारच्या विवाहांच्या रोचक हकीकती आढळतील. शांततेच्या काळात अशा हकीकती तुरळक असल्याने वार्तेचा विषय होत. पण हिंदू-मुसलमानांने दंगे, फाळणीच्या काळातील सामुदायिक अत्याचार, रझाकार चळवळ वगैरेंच्या वेळी हेच प्रकार मोठ्या संख्येने होत असल्याने त्यांची गणती वृत्तपत्रांतही नोंदली जाणे शक्य नव्हते. दंग्याच्या काळातील या अपहाराला आणि सक्तीला राजसत्तेच्या जोरावर केलेले स्त्रीहरण म्हणता आले नाही, तरी सामुदायिक लढयातील स्त्रीहरण म्हणता येईल. हजारो हिंदू स्त्रियांचा अपहार अशा लढ्याच्या काळात झाला असला तरी, 'तितक्याच मुसलमान स्त्रियांचाही अपहार झाला' हा प्रत्यारोपही या बाबतीत लक्षात घ्यायला हवा. आपल्या समाजातील हजारो स्त्रियांचा अपहार षंढपणे पाहाण्यापेक्षा असा उलट बदला घेणे केव्हाही जिवंपणाच लक्षण

असले तरी, परधर्मीयांच्या स्त्रियांचा अपहार श्लाघ्य मानल्याचा दाखला हिंदूंच्या इतिहासात नाही. त्यामुळे अर्वाचीन इतिहासातील हे मुसलमान स्त्रियांचे अपहार हिंदू समाजाला फारसे आनंदप्रद झाले असतीलसे वाटत नाही.

दंगे संपल्यावर आणि देशाचे दोन दिशांचे दोन मोठाले प्रांत मुसलमानांना तोडून दिल्यावर हिंदू स्त्रियांच्या अपहाराच्या वा अपमानाच्या वार्ता वृत्तपत्रांत येणार नाहीत अशी आशा होती. परंतु ही आशा वृत्तपत्रांवरून खरी ठरत नाही. हिदुस्थानच्या राष्ट्रध्वजाचा अपमान व पाकिस्तानचा जयघोष हिंदुस्थान सरकारची प्रजा असलेल्या मुसलमानांनी केल्याच्या वार्ता सुमारे शंभर वेळा येऊन गेल्या असतील. अगदी अलीकडे म्हणजे गेल्याच वर्षात मुसलमानांच्या वेगळ्या राजकीय चळवळीची लाट उठली, त्या सुमारास स्त्रीविषयक गुन्ह्यांच्याही एकदोन प्रक्षोभक वार्ता येऊन गेल्या. जबलपूर येथील एका हिंदू कॉलेजकुमारीवर कोणी मुसलमान तरुणाने पाळत ठेवून एकटी गाठून बलात्कार केल्याचे वृत्त काही महिन्यांपूवी किती प्रक्षोभक ठरले होते, हे सर्वांच्या स्मरणात असेल. इतर अनेक प्रक्षोभक वार्तांप्रमाणे या वार्तेभोवतालच्याही प्रक्षोभाच्या लाटा दोनतीन महिन्यांत ओसरल्या. बलात्कार झाल्यामुळे त्या मुलीने आत्महत्या केली, अशी त्याहूनही संतापजनक वार्ता आलेली सर्वांच्या लक्षात असेलच. इतकेच असूनही गेल्या जुलैच्या अखेरीस जेव्हा या दुर्दैवी मुलीच्या पित्याच्या निधनाची वार्ता पुण्यामुंबईच्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली तेव्हा, ती चारसहा ओळींचीच होती व त्या वार्तेबरोबर पूर्वीच्या संतापजनक घटनांचा धागा कुणाला आठवलेलाही दिसला नाही. त्या बलात्काराच्या खटल्याचे पुढे काय झाले? गुन्हेगारांना शिक्षा झाली का? किती झाली? आरोपीच्या बाजूने साक्षीदार कोण होते?... मला तरी यासंबंधीची वार्ता वृत्तपत्रांत वाचल्याचे स्मरत नाही. कदाचित् खटला अद्याप चालू असेल; कदाचित् नसेल! पण वृत्तपत्रांत या कशाचाच उल्लेख नव्हता.

दुसरा असाच हिंदू स्त्रियांच्या विनयभंगाचा गुन्हा पोलिसांच्या दप्तरापर्यंत तरी पोचला की नाही याची शंकाच आहे. म्हैसूरसारख्या दक्षिणेतील शहरात हिंदू राजांच्या एके काळच्या राजधानीत, ईदच्या सणाच्या दिवशी भर रस्त्यात सुशिक्षित हिंदू मुलींवर हल्ला होऊन त्यांची विटंबना झाल्याची वार्ता पुण्याच्या वृत्तपत्रांत येऊन गेली. पण त्या संतापजनक गुन्ह्यासंबंधी म्हैसूर सरकारने पूढे काय केले हे मात्र वृत्तपत्रांत आलेले पाहण्यात नाही. त्या मुलींची अधिक विटंबना-कदाचित् सामुदायिक बलात्कार परप्रांतांतून तिकडे शैक्षणिक कार्याकरता गेलेल्या दोघा तरुणांच्या धाडसी प्रतिकारामुळेच टळली, हेही वृत्तपत्रांत त्या वेळी येऊन गेले होते. किंबहुना त्या दोघांपैकी गुजरातमधील श्री. दवे आणि पुण्याचे श्री. पंचनदीकर यांपैकी एकाने हा प्रकार चवाठ्यावर आणला असता नसता तर, बाह्य जगाला त्या संतापजनक प्रकारची आणि शूर प्रतिकाराची वार्ताही बहुधा कळली नसती, हिंदुमसलमान विवाहाकडे पाहाण्याची जशी एक पुरोगामी दृष्टी आहे, तशी हिंदू स्त्रीच्या विनयभंगाकडे पाहाण्याचीही एक 'उदार दृष्टी' आहे, हे त्या प्रकारणाच्या निमित्तानेच उघड झाले. नव्हे, जबलपूर येथील बलात्काराच्या वार्तेसंबंधी ही उदार दृष्टी घेणारे महाभाग निघाले. समाजात कॉलेजकुमारीवर बलात्कार, सुशिक्षित स्त्रियांचा विनयभंग यांसारखे गुन्हे घडणारच! त्यात लगेच जातीय गुन्हा पाहणे ही वृत्तीच उलट संकुचित आणि जातीय होय. गुन्हेगार सर्वच समाजात असतात! या विशिष्ट प्रकरणी ते विशिष्ट समाजातले-मुसलमानातले-होते असे दिसते. पण तेवढ्यावरून वृत्तपत्रांनी आणि वक्त्यांनी डोके फिरवून घेण्याचे फारसे कारण नाही.

अनुक्रमणिका

उदार थंडपणाचा उपदेश करणारे हे पत्रकार आणि पुढारी इतिहास वाचीत नसले तर, एक वेळ क्षम्य म्हणता येईल. (आजचे बहुतेक पुढारी इतिहासदृष्ट्या निर्विकार असतात, हे प्रसिद्धच आहे. बिचाऱ्या शिवाजीमहाराजांच्या वाट्याला मात्र गेल्या पाच वर्षांत काही इष्ट मनोविकार लागले आहेत हे देशाचे सुदैव होय! ) पण ते वृत्तपत्रेही वाचीत नाहीत असे कसे म्हणता येईल? फसवून लावलेले विवाह, बलात्कार, विनयभंग यांच्या वार्तांत मुसलमान फिर्यादी आणि हिंदू आरोपी असे खटले किती दाखवता येतील? 'मुसलमान आहो' असे सांगून हिंदू वरांनी मुसलमान मुलींशी फसवून विवाह लावल्याचे खटले वृत्तपत्रांत या पुढाऱ्यांनी वाचले आहेत का?... या संपादकांनी छापले आहेत का? तसे नसेल तर "त्या वार्ता मामुली गुन्ह्यांच्या होत" "त्यांना जातीय महत्त्व नाही", असे म्हणण्याचा उदारपणा हे लोक का दाखवितात?

अर्थात्, या सर्व वार्तांना जातीय इतिहासही आहे आणि जातीय अर्थही आहे हे मान्य केल्याखेरीज असल्या प्रक्षोभक घटनांवर तोडगा सुचविता येणार नाही. एक समाज दुसऱ्या समाजाला प्रतिकारहीन सोशीक समाज समजून इतिहासकालापासून कुरापतखोर बनला आहे की काय, एवढी शंकादेखील ज्या पुढाऱ्यांच्या मनात येत नाही, ते स्वसमाजाचे हितचिंतक नसून केवळ 'इलेक्शन'चे चिंतन करणारे आणि राजकीय प्रतिस्पर्ध्यांचे अहितचिंतन करणारे आहेत असे म्हटले पाहिजे. समजा, वर निर्देशिलेल्या गुन्ह्यांसारखे गुन्हे पाकिस्तानमधील अल्पसंख्यकांनी केले असते तर, तो अल्पसंख्याक पाकिस्तानात कितपत सुरक्षित राहू शकला असता? (अर्थात् कुठलाच जातीय गुन्हा न करताही पाकिस्तानातील हिंदूंचे जीवन असुरक्षित आहे, आहे असा बोभाटा वृत्तपत्रांतून अनेकदा झाला असला, तरी जातिनिरपेक्ष विचार करण्याचा व्यासंग वाढावा या हेतूने मी इथे, 'तसा बोभाटा नाही' असे गृहीत धरले आहे! ) ज्या हिंदूमुसलमान विवाहांचे स्वरूप केवळ वैयक्तिक धर्मबाह्य विवाहांचे आहे असेही काही विवाह दाखवता येतील. सुमारे तेहतीस वर्षांपूर्वी एका प्रसिद्ध विद्वान् घराण्यातील एका पदवीधर स्त्रीने एका सुशिक्षित मुसलमान वराशी लावलेला विवाह खूपच प्रशोभक ठरला होता. वधू-वर दोघेही प्रौढ आणि सुशिक्षित असल्याने, त्यांत कुणी कुणाला फसवण्याचा प्रश्नच नव्हता. तथापि, त्याही वेळी त्या विवाहाचे समर्थन करणारांनी वृत्तपत्रांत दिलेली समर्थने काळाच्या ओघात कितपत खरी ठरली, हे आज तेहतीस वर्षांनी पुन्हा पाहण्यासारखे आहे. ज्यांनी विवाहाचा निषेध केला, त्यांनी एका उच्चकुलीन सुशिक्षित स्त्रीने समाजाच्या भावनांचा आणि ऐतिहासिक संबंधाचा विचार न करता मुसलमान वराशी विवाह करावा, याबद्दल निषेध केला. पण निशेधकांच्या बाजूला एवढेच कारण असते तर, त्यांची बाजू खासच लंगडी ठरवता आली असती. कारण सुशिक्षितांनी जर समाजाला ठोकर देऊन व्यक्तिस्वातंत्र्याची पताका मिरवायची नाही, तर काय मेंढराप्रमाणे गतानुगतिक अशा अशिक्षितांनी? अर्थात्, हिंदूमुसलमान समाजांचे ऐतिहासिक संबंध ज्यांच्या गावीही नाहीत, अशा एकनिष्ठ व्यक्तिस्वातंत्र्यपूजकांनी त्या विवाहांचे अभिनंदन करणे प्राप्तच होते. पण निषेधकांच्या बाजूला आणखी एक प्रबल कारण होते. मुसलमानाशी विवाह लावणाऱ्या त्या पदवीधर बाई पुण्यातील पहिल्या प्रतीच्या मुलींच्या हायस्कूलमध्ये शिक्षिका होत्या. चौदा ते अठरा वयाच्या अज्ञान कुमारिकांना अशा धर्माभिमानशून्य, समाजाभिमानशून्य बाईच्या स्वाधीन करणे म्हणजे त्यांनाही त्याच वाटेला लावणे होय, अशी कल्पना मुलींच्या पालकांनी केली तर आश्चर्य करण्याचे कारण नाही. वृत्तपत्रांनी मुख्य ओरड केली, ती या बाबतीतच केली. पण या विवाहाचे समर्थन करणाऱ्यांनी जी कारणे पुढे केली होती, ती मोठी मनोरंजक होती. या बाई महाराष्ट्रातील प्रख्यात प्रार्थनासमाजी घराण्यातील होत्या आणि प्रार्थनासमाजी लोक जातिभेद, धर्मभेद मानीत नाही. निदान, त्यांनी हिंदू समजून हिंदूंनी आपल्या समाजाची

हानी झाली म्हणून ऊर बडवून घेणे, म्हणजे भोळसरपणाची परमावधी होय. कारण जेव्हा हे लोक प्रार्थनासमाजी झाले तेव्हाचे हिंदू समाजाची जी काय खरी-खोटी नुकसानी व्हायची ती होऊन चुकली!

या युक्तिवादाने हिंदूंचे दुःख कमी होणे शक्य नव्हते, हा भाग वेगळा. पण प्रार्थनासमाजवाद्यांचे हे समर्थन वास्तविक होते, की वकिली थाटाचे होते हे आता तेहतीस वर्षांनी, प्रार्थनासमाजी व्यक्तींना शोभेलशा निर्विकार मनाने शोधायला हरकत नाही. या विदुषीचा व त्यांच्या अपत्यांचा नंतर प्रार्थनासमाजाशी जिव्हाळ्याचा संबंध टिकून राहिला असेल असे आपण समजायचे का? एखादी प्रार्थनासमाजी स्त्री अन्य धर्मीयाशी विवाह लावते तेव्हा, तो अन्यधर्मी पुरुष प्रार्थनासमाजी लोकांप्रमाणे धर्मभेदातीत अशी खात्री करून मग लावते काय? जर प्रार्थनासमाजी लोक धर्मभेदातीत आहेत, तर त्यांच्यापैकी किती स्त्रीपुरुषांनी आजवर अन्यधर्मीयांशी विवाह केले? किती प्रार्थनासमाजी पुरुषांना 'ते हिंदू नाहीत' या 'क्वालिफिकेशन'मुळे मुसलमान वधूंनी राजीखुशीने वरले? या सर्व गोष्टींचा अहवाल प्रार्थनासमाजाने जरूर प्रसिद्ध करावा. माझ्या अल्पसमजुतीप्रमाणे जोपर्यंत धर्मभेद कायम आहेत, तोपर्यंत हिंदू समाज हेच प्रार्थनासमाजाचे माहेर राहणार. मुंबईत जेव्हा हिंदूमुसलमानांचे दंगे झाले तेव्हा, प्रार्थनासमाजी माणसांना मुसलमानांनी वेगळे काढल्याचे नमूद नाही. सारांश, आत्मनिष्ठ विचारात (subjectively) आपण कुठल्याही दुनियेत वावरत असलो तरी, वस्तुनिष्ठ जगात आपले नशीब हिंदूंशीच बांधलेले आहे. हे प्रार्थनासमाजी व्यक्तींनी व त्यांच्यासारख्याच हिंदूंतील non-conformist व्यक्तीनी विसरू नये. आपण हिंदू लोक मोठे 'भेदनिपुण' असल्याने एकमेकांना दूर लोटायला कितीही उत्सुक असलो तरी, दोन समाजांतील लढ्याच्या काळात आपल्या वाइटावर असलेले समाज आपली सोवळी व आपले जातिभेद मानायला तयार नसतात, हे आपण जितक्या लवकर ओळखू तितके चांगले! संघर्ष-कालात आपले दावेदार आपणांला एका मापानेच मापतात एवढ्याखातर जरी 'आपण सर्व एक' हे आपल्या लक्षात राहिले, तरी आपली गणना माणसांत करायला अधिक आधार मिळेल! एखाद्या प्रार्थनासमाजी पुरुषाला मुंबईत झालेल्या हिंदूमुसलमान दंग्याचे वेळी नळबाजारच्या ट्राममध्ये सुऱ्याचा प्रसाद मिळाला, म्हणून जरी आपण हिंदूंतीलच एक पंथ आहो हे कळले, तरी मी त्या सुराधारी सच्च्या मुसलमानाचे आभार मानीन! त्याचप्रमाणे एखाद्या प्रार्थनासमाजी स्त्रीला परधर्मीयांनी हल्ला केल्यामुळे 'धर्मभेद अद्यात संपले नाहीत' हे कळले, तरी मी तिचा बुद्धिवाद वास्तववादाला अगदीच पारखा नाही, म्हणूंन आनंद मानीन!

पण 'कोर्टात गाजलेल्या' या विवाहांवरून व विनयभंगांवरून, अखेर आजच्या काळात स्वतंत्र्य हिंदूस्थानमधील हिंदूमुसलमानांनी सामाजिक निष्कर्ष कोणते काढायचे? माझ्याप्रमाणे जे जे लेखक अशा विवाहांसंबंधी गंभीरपणे विचार करतात, ते ते संकुचित जातीयवादी, व्यक्तिस्वातंत्र्यविरोधी होत असे म्हणून भोंगळ पुरोगमित्वाची भूमिका घेऊन बसणे, हा बौद्धिक आलस्याचा एक फॅशनेबल प्रकार होय. खरे व्यक्तिस्वातंत्र्यवादी लोक यापेक्षा किती वेगळी भूमिका घेऊ शकतात, ते तेहेतीस वर्षांपूर्वी पुण्यात गाजलेल्या हिंदूमुसलमान विवाहाच्या वेळी मोठ्या चमत्कारिक स्वरूपात दिसून आले. ज्ञानकोशकार केतकर यांनी त्या प्रक्षोभक विवाहाच्या वेळी जी एक खोल विचारप्रवर्तक लेखमाला लिहिलेली होती, ती आजच्या 'पुरोगामी मंडळीं'चाही निद्रानाशकरण्याइतकी पुरोगामी होती. पण जेव्हा केतकरांना असे दिसून आले की, त्या विवाहातील हिंदू वधू पूर्ण विचार करून काय ते करीत आहे, आणि ती आपल्या निश्चयापासून ढळण्याचा संभव नाही, तेव्हा त्यांनी तिच्या विवाहाच्या नोंदणीवर साक्षीदार मिळवून देण्यालाही हातभार लावला! (माझे स्मरण बरोबर असेल तर, केतकरांच्या पत्नींनी त्या रजिस्टरवर साक्ष घातली होती! ) हे धाडस त्या दिवसांत

करणारांना जातीय किंवा सनातनी म्हणण्याचा खुळसटपणा, तथाकथित पुरोगामी लोकही करणार नाहीत, अशी आशा आहे! पण व्यक्तिस्वातंत्र्यवादी केतकरांनीही, 'व्यक्तीस्वातंत्र्य' हे शेवटचे मूल्य मानले नव्हते. व्यक्तीच्या सुखापलीकडे समाजाचे स्थैर्य आणि स्वास्थ्य म्हणून काही उरतेच व त्याचा विचारग्रणींनीच करायला हवा-विकारवश जोडप्यांनी नव्हे, हे त्यांच्या त्या लेखमालेचे सार होते!

आज केतकरांची ती बहुमोल लेखमाला माझ्यापूढे नाही, आणि दुर्दैवाने ती पुनर्मुद्रितही झालेली नाही. परंतु केतकरांनी आपल्या उदार आणि शास्त्रशुद्ध दृष्टीने, त्या लेखमालेत आंग्लशिक्षणसंपन्न महाराष्ट्रीय तरुणींच्या वैवाहिक प्रशनांचा विचार केलेला होता. एखाद्या सुशिक्षित महाराष्ट्रीय तरुणीचा चमत्कारिक विवाह ठरल्यावर किंवा लावल्यावर आमचा समाज खडबडून डोळे चोळू लागतो, अर्धवट झोपेतच काही सामाजिक सिद्धांत बरळू लागतो. त्या बरळण्याचा उपयोग फक्त वृत्तपत्रांच्या रकान्यांत होतो. आणि थोड्याच दिवसांत तो विवाह आणि ते बरळणे दोन्हींवरही पडदा पडतो! जे विचारवंत एखादा विवाह घडून आल्यावर वा गाजल्यावर त्यातील वधू-वरांच्या अनुरूपतेचा आणि अंतरंगाचा विचार करतात तेच एरव्ही अशा तरुणतरुणींना टाळून बाजूला सरकलेले असतात. आपल्या समाजातील तरुणतरुणी कोणत्या वर्तुळात वावरत आहेत, त्यांच्या भावनांवर कशाचे संस्कार होत आहेत, ते स्वतःच्या कुटुंबीयांपासून सकारण वा अकारण किती दूर बहकत आहेत, याचा अधूनमधून अंदाज घेण्याइतपतही तरुणांचा आणि वृद्धांचा संपर्क-खरा मनोमन संपर्क-राहिलेला नसतो, अन् एक दिवस ते तरुण आश्चर्याचा धक्का देतात; त्यांच्यासारखे अपक्व विचाराचे-किंवा आजन्मच गद्धेपंचविशीत घोटाळणारे! —नेते त्यांचे अभिनंदन करूनही मोकळे होतात. पण त्यांच्या पुढच्या आयुष्याची वार्ता मात्र अभिनंदनीय 'विवाहवार्ते' त मोडत नसल्याने, त्या संपादकांना वा नेत्यांना ती महत्त्वाची वाटण्याचे कारण नसते!

अभिनंदनीय न ठरलेल्या निधर्मी विवाहासंबंधीचेही वृत्तपत्रीय कुतूहल असेच अर्धवट असते. फसवून विवाह लावल्याच्या आरोपाखाली अलीकडे जे विवाह कोर्टात आले, त्यांतही एका मुसलमान आरोपीला शिक्षा झाली, तर दुसऱ्यातील आरोपी दोषमुक्त होऊन सुटला. पण दोन्ही खटल्यांतील वधूंची सामाजिक दुर्दशा प्रायः सारखीच असणार! पण ती दुर्दशा चटकदार वार्तेचा विषय होऊ शकत नाही, -अर्थात् कोर्टाप्रमाणेच वृत्तपत्रांच्या दृष्टीनेही त्यांची 'केस' संपुष्टात येते; पण त्या वधूंचे बिचाऱ्यांचे जीवन चालूच राहते.

ज्या खटल्यातील आरोपी 'वर' दोषमुक्त केला गेला, त्या खटल्यातील निकालपत्रात तर न्यायाधीशांनी, फिर्यादी वधू व आरोपी वर दोघेही अविचाराने वागले, आता त्यांनी आपल्या वागण्याचा परिणाम भोगावा, अशा अर्थाचे उद्‌गार काढल्याचे वृत्त वृत्तपत्रांत आले होते. मला ते संपूर्ण निकालपत्र पाहाण्याचे कुतूहल आहे. कायद्याच्या दृष्टीने योग्य तोच न्याय न्यायाधीशांनी दिलेला असणार. परंतु कायद्याच्या न्यायात सामाजिक आणि मानवी न्यायाची तरतूद असतेच असे नाही. एक विधर्मी जोडपे अविचाराने वागले तर, त्यातल्या दोघांवर होणारे परिणाम सारखेच असतील असे नव्हे. त्या दोघांच्या लिंगभेदाप्रमाणे ते परिणाम कमीअधिक ठरतील, -म्हणजेच स्त्रीला अद्दल अधिक घडेल. तसेच, त्या दोघांच्या समाजांतील पावित्र्य-कल्पनांवर त्यांच्या भावी दुःखाचे प्रमाण अवलंबून राहील. अविचाराच्या परिणामांचे प्रमाण कोर्ट विचारात घेऊ शकत नसले तरी, समाजाने ते विचारात घ्यायला हवे.

अनुक्रमणिका

सुशिक्षित हिंदू तरुणींना फसवणे वा उपद्रव देणे, इतर तरुणींना फसवण्याहून आजच्या राजवटीत वा 'समाजवटी'त अधिक सुलभ आहे की काय? या लेखाच्या द्वारे हाच प्रश्न मला विचारवंतांपुढे ठेवायचा आहे. मुंबईच्या एका दैनिकात नुकतीच एक अर्थपूर्ण वार्ता येऊन गेली. वांद्रा आणि बोरीबंदर रेल्वे स्टेशनांवर मुलींना उपद्रव देणाऱ्या काही कंपूंचा छडा पोलिसांनी लावला, अशा प्रकारची ती वार्ता होती असे स्मरते. आणि त्या कंपूत एका अहिंदू समाजातील तरुण बाहुल्याने असल्याचा निर्देश होता. या सर्व वार्तांवरून जे सामाजिक प्रश्न डोक्यात यायला हवेत त्यांचाच विचार डॉ. केतकरांनी तेहेतीस वर्षांमागच्या त्या लेखमालेत केला होता. हिंदू तरूणी आपल्या समाजातील-किंबहुना आपल्या लहानशा जातीतील-पुरुषांशीही मोकळेपणाने वागू शकत नाहीत. (याला कारण कदाचित् केवळ त्यांच्या उच्च औचित्य कल्पनाही असू शकतील. पण तूर्त आपणाला या वागण्याच्या कारणांकडे पाहायचे नसून परिणामांकडे पाहायचे आहे.) या संकोचाच्या परंपरेतच हिंदू तरुणी सुशिक्षित होऊन नोकऱ्याही करू लागल्या. उलट, इतर ख्रिस्ती, पारशी समाज आधी मुळात लहान, शिवाय त्या समाजांतील स्त्री-पुरुषांचे संबंध मोकळेपणाचे असतात. अशा स्थितीत हिंदू स्त्रिया बहुसंख्य समजल्या जात असूनही अल्पसंख्य समाजांतील स्त्रियांपेक्षा मित्रहीन आणि संरक्षणहीन असतात! उलट, हिंदू तरुण-पुन्हा औचित्य कल्पनांमुळेच-स्वसमाजातल्या स्त्रियांशी बोलणे टाळतात. या सर्वांचा परिणाम म्हणजे अन्य समाजांतील स्त्री-पुरुषांना हिंदू समाजातील स्त्रिया संभावित पण संरक्षणहीन भासतात. एका समाजाहून दुसरा समाज कमी अगर अधीक सभ्य असतो, असे मला मुळीच म्हणायचे नाही. फार काय, हिंदू तरुणांत स्त्रीदाक्षिण्य कमी असते, हे उथळ मतही मला मान्य नाही. डॉ. केतकर यांनी 'गोंडवनातील प्रियंवदा' या कादंबरीत ते अगदी लीलया खोडून दाखवले आहे. पाश्चात्य समाजातील स्त्रीदाक्षिण्य नाटकी आणि 'गोंडा घोळण्याच्या' सदारतले असते, तर हिंदू पुरुषांना स्त्रियांबद्दल खराखुरा आदर असतो, असे या कादंबरीतली एक स्त्रीच म्हणते! पण ते कसेही असले तरी, हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी सर्वच समाजांतील सभ्य पुरुषांना स्त्रियांविषयी सारखाच आदर असतो असे मी म्हणतो. परंतु मुळात सारखा आदर असला तरी, वर सांगितलेल्या विषम औचित्य कल्पनांमुळे आजच्या 'कॉस्मोपालिटन्' आणि बकाली शहरांत हिंदू स्त्रियांच्या वाट्याला काय येते, याचा आपल्याला विशेषेकरून विचार करायला हवा.

केतकरांच्या मते अहिंदू पुरुषांना आपल्या समाजातल्या चालीरीतींची बंधने नसल्याने ते ज्या निर्भीडपणाने मुलींशी बोलू शकतात, त्या निर्भीडपणाने आपले तरुण बोलू शकत नाहीत. याचा परिणाम म्हणजे हिंदू समाजातील प्रौढ कुमारिका आपल्या समाजातील पुरुषांकडून टाळल्या जातात आणि परक्या समाजातील पुरुषांच्या परिचयाच्या कक्षेत येतात. ही स्थिती केतकरांच्या काळी खरी असली तरी आज राहिली आहे असे वाटत नाही. अर्थात् आज आपल्या समाजातील प्रौढ मुलांमुलींचे विवाहही त्यांच्या स्वतःच्या पसंतीने जुळत आहेत. पण आजही आमच्या समाजाची नापसंती व संताप पत्करूनही क्वचित् का होईना अन्य समाजांतील तरुण आमच्या समाजातील मुलींशी विवाह करू शकतात; तर तेवढ्याच प्रमाणात आमच्या समाजातील तरुण अन्य समाजांतील तरुणींशी विवाह करू शकत नाहीत. अशी स्थिती असेल तर त्याची कारणे शोधली पाहिजेत. जाती-धर्माचे, देशाचे भेदही हळूहळू नष्ट होऊन मानवजात एक झाली तर, सर्व पुरोगामी लोकांप्रमाणे हिंदू समाजातील पुरोगामी लोकांनाही आनंदच होईल. परंतु हिंदू वधूशी सलगी करणे अहिंदूंना अधिक सोपे झाले असेल-किंवा त्याहूनही संतापजनक गोष्ट म्हणजे हिंदू वधूला फसविणे आज बिनधोकपणाचे असेल, तर मात्र ती गोष्ट समाज म्हणून आपणास लाजिरवाणीच म्हणावी लागेल. कायद्याप्रमाणे खटले चालणे, शिक्षा होणे किंवा सुटणे, या गोष्टी वेगळ्या. परंतु यात आपण एका मोठ्या अब्रूदार समाजाला दुखवीत आहो याची जर अशा

गुन्हेगारांना दहशत वाटत नसेल तर, त्यावरून निघणारा निष्कर्ष आपणांला फारसा भूषणास्पद नाही. ज्या समाजाच्या रागाला किंवा लोभाला या देशातलेच लहान समाज काडीइतकी किंमत देत नाहीत असा बहुसंख्य पण दलित आणि दळभद्रा समाज असेच आपल्या समाजाचे वर्णन करावे लागेल.

ज्या खटल्यात एका मुसलमान इसमाने हिंदू (ब्राह्मण) असे सांगून एकाहून अधिक सुशिक्षित ब्राह्मण मुलींशी विवाह केले, -नव्हे हुंडेही मिळविले असे निष्पन्न झाले, त्यावरून तर सुशिक्षित हिंदू समाजाने अधिकच धडा घेण्यासारखा आहे. ब्राह्मणांहून कमी सुशिक्षित समाजांत अद्यापही केवळ जातीचाच नव्हे तर कुळाचाही विचार करण्याची चाल आहे. वरिष्ठ दर्जाच्या मराठा घराण्यात, मुलगा केवळ मराठा आहे एवढेच पाहून भागत नाही, तर त्या मुलाच्या घराण्याच्या सोयरिकी कुणाकुणाशी झाल्या आहेत हेही पाहावे लागते. इतका तपशील तपासण्यात अर्थशून्य सनातनीपणा आहे असे पुरोगामी लोक समजतात. पण इकडे पुरोगामित्व म्हणून पाहतात काय? तर पगाराचा आकडा, पर्मनंट् असल्याचा लेखी पुरावा, हुंड्याची रक्कम, पदव्यांच्या अक्षरांची संख्या इत्यादी! जुने मराठे जातकुळीचा जो तपशील पाहात तो, आणि नवे ब्राह्मण पगार, पदवी, इत्यादींचा जो तपशील पाहातात तो, यांतील अधिक अर्थशून्य कोणता हे ठरविण्याला आता स्टॅटिस्टिकल् पुरावा गोळा होऊ लागला आहे ही आनंदाची गोष्ट आहे! जातगोतापेक्षा नुसता धट्टाकट्टा, शिकलासवरलेला मुलगा पाहण्याला महत्त्व देण्याच्या 'पुरोगामी' प्रवृत्तीला आलेलं गोड फळ म्हणजेच 'काझी खटला' असं मी म्हणेन! मुलाच्या घराण्याच्या सोयरिकी कोणकोणत्या घराण्यांशी आहेत हे पाहाणाऱ्या मराठा समाजातील वधुपित्याला जानवे घालून गोत्रप्रवर सांगणारा मुसलमान वर पत्करण्याची पाळी बहुधा आली नसती!

एकीकडे परंपरा धुडकावणारा तर दुसरीकडून पगार आणि 'पर्मनन्सी' यांना कुलशीलाहून अधिक पुजणारा आजचा सुशिक्षित वर्ग पुरोगामी विवाहपेक्षा बाजारी विवाहाकडेच अधिक झुकत आहे, असे मला वाटते. आणि जातधर्म यांसारख्या 'क्षुद्र' भेदांवरून उड्डाण केल्याची बढाई मारणारा आजचा समाज, स्वसमाजातील स्त्रियांच्या अपमानाबद्दल काही न वाटण्याइतका नादान बनत चालाला आहे असंही वाटतं. दोन संघटित अणि स्वाभिमानी समाजांत सलोखा नांदण्याचा जेवढा संभव असतो, तेवढा दुर्बल आणि सबल समाजांत नसतो. वृत्तपत्रांत येणाऱ्या केसेसवरूनच निष्कर्ष काढावयाचा झाला तर ख्रिस्ती, पारशी समाजांतील स्त्रियांचा अपमान अन्य समाजांतील पुरुषांकडून झाल्याची उदाहरणं जवळजवळ शून्य आहेत. उलट, हिंदू समाज त्या मानाने प्रचंड असूनही, त्यांतील स्त्रियांचा अपमान किंवा वंचना झाल्याच्या वार्ता अनेक आहेत. हिंदू समाजालाच तेवढे वैरी आहेत असं समजायला मी तयार नाही, तसं समजायला कारणंही नाहीत.

अजागळ माणसाचा खिसा कापला गेला किंवा विस्कळीत, गाफील समाजातील स्त्रियांचा अपमान करणं बिनधोकपणाचं वाटू लागलं तर, त्यात इतर समाजांपेक्षा या समाजाचाच दोष अधिक. मुसलमानांसह इतर समाजांशी मानाची मैत्री हवी असेल तर, विस्कळीतपणा, गाफिलपणा टाकून स्वाभिमानी व संघटित होणं एवढाच मार्ग बहुसंख्य हिंदू लोकांना आज मोकळा आहे.

वसंत, दिवाळी अंक,
१९६१, पृ. ५४-५८.

अनुक्रमणिका

## समस्या जुनीच : अर्थात् सुशिक्षितांच्या विवाहाची

अलीककडे मला एका प्रौढ सुशिक्षित वधूच्या पालकांबरोबर एका विवाह-संयोजक 'ब्यूरों'त जाण्याचा प्रसंग आला. या विवाहसंस्थेचे निरपेक्ष चालक माझ्या परिचयाचे असल्यानं केवळ त्या वधूसंबंधी बोलणं न निघता त्या क्षेत्रातील आजच्या अनेक समस्यांसंबंधीही बोलणं निघालं, अन् पालकांच्या वा स्वतः वधू-वरांच्या विविध प्रकारच्या अपेक्षाही पहायला सापडल्या. या विवाहसंस्थेत मला दिसणारं वधू-वरांचं मन अन् व्यवहारी जगात दिसणारं वधू-वरांचं आणि त्यांच्या आईबापांचं मन यांतली तफावत पाहून मला नवल वाटलं. पण त्याचबरोबर आपल्या विवाहविषयक कल्पनांत व व्यवहारात मुळातच चूक आहे हा माझा अनेक वर्षांचा सिद्धांत त्या संस्थेतल्या एकत्रित पुराव्यानं पुन्हा बळकट झाला. कारण जुन्या कौटुंबिक पद्धतीनं लग्न जुळवण्याचाही मला बराच अनुभव आहे.

आज सर्वसाधारण मुलांना वा त्यांच्या पालकांना लग्न जुळविण्याचे प्रकार विचारले तर, ते ढोबळमानानं दोनच सांगतील. एक म्हणजे आई-बाप, आप्तेष्ट यांनी ठरविलेला विवाह आणि दुसरा म्हणजे प्रेमविवाह. वास्तविक प्रेमविवाहाला आजच्याइतकी सुसंधी-नव्हे, गरज, निकड यापूर्वी कधीच नव्हती. शेकडो सुशिक्षित, प्रौढ तरुणतरुणी समाजात विवाहाच्या 'वेटिंगरूम'मध्ये साचून राहिलेल्या असणं यापेक्षा प्रेमविवाहाला अधिक उत्तम संधी ती कोणती? शिवाय आम्ही साहित्यिक मंडळी कथा, कादंबऱ्या, नाटकं, सिनेमाकथा यांच्या माध्यमांतून अहोरात्र प्रेमविवाहचा प्रचार करीतच आहोत. पण प्रचार हा शब्दसुद्धा थोडा चुकीचाच ठरेल. आम्ही आमच्या कल्पनाचित्रांत प्रेमविवाह युरोप-अमेरिकेहूनही हिंदुस्थानात अधिक दृढमूल झाला आहे असं रंगवतो! 'मालती'ला किंवा 'नयने'ला 'विलास'नं नाही तर 'हेमंत'नं मागणी घालणं, मग बाबासाहेबांनी कण्वाची भूमिका वठवून मालतीच्या पाठीवरून हात फिरवीत संमती देणं, स्वातंत्र्यदिनाच्या शुभमुहूर्तावर त्यांचं नोंदणीपद्धतीनं लग्न होणं अन् लगेच त्यांनी 'मधुचंद्रा'साठी (या भिकार भाषांतरी शब्दाचा अर्थ देव जाणे! ) कुठं तरी दूर जाणं, या गोष्टी समाजाच्याही आधी साहित्यात आणि चित्रपटात रूढ झाल्या आहेत. उलट समाजातच त्या तितक्याशा रूढ नाहीत.

त्या विवाहसंस्थेच्या मासिकात एका वधूनं स्वतःची सांगिलेली मानसिक अडचण आमच्या वास्तववादी कादंबरीकारांना विचारात पाडील. ती स्वतः डबल ग्रॅज्युएट असून कॉलेज-शिक्षिका आहे. ती धीट आणि पुरुषांत मिसळणारी आहे. विद्येच्या, व्यवसायाच्या, खेळाच्या वा सहलीच्या निमित्तानं तिचा अनेक तरुणांशी परिचय झालेला आहे. पण ती म्हणते, 'विवाहाचा गुप्त हेतू मनात धरून पुरुषांशी मैत्री करणं मला कधीच जमत नाही. अन् एकदा निकोप, निर्हेतुक पद्धतीनं परिचय झाल्यावर त्या परिचिताकडे विवाहाची गोष्ट काढणं तर मला त्याहूनही चमत्कारिक वाटतं! म्हणजे काय? लाजऱ्या मुलीचे परिचयच कमी होणार, तर निकोप मुलींना मतलबी परिचय जुळवणं कमीपणाचं वाटणार! उलटपक्षी शालीन, अभ्यासू मूलं अन् धीट, खिलाडू वृत्तीची मुलं, यांचीही स्थिती पुष्कळदा तीच झालेली आढळते. शालीन मुलं स्वाभिमानाच्या अन् सभ्यतेच्या अतिरिक्त कल्पनांनी परिचित मुलींकडे लग्नाचा विषय काढीत नाहीत, तर धीट, निकोप मुलींची मैत्री वेगळ्याच भूमिकेवर असल्यानं तीतही विवाहाचा विषय वर्ज्य ठरतो. अखेर प्रेमविवाह होतात तरी कुणाचे? लाजाळू मुली

अन् धीट मतलबी मुलं, त्याचप्रमाणं अर्धवट अशी श्रीमंतांची मुलं अन् मतलबी, अघळपघळ मुली! अर्थात् मी हे केवळ संभाव्यतेचं गणित सोडवीत आहेत. समसमासंयोगाचे अपवाद नसतील, असं मी म्हणत नाही. पण आजच्या समाजात अपेशी प्रेमविवाहाची उदाहरणं बरीच दिसली, तर नवल नाही, आणखी एक गोष्ट. रूढ विवाह अपेशी झाला तर, त्यात आळीमिळीचा संकेत तरी पाळला जातो. पण प्रेमविवाहातील परस्पर-समरसतेची जाहिरात आधीच झालेली असल्यानं, वितुष्ट निर्माण झालं तर त्याचा डंका तितक्याच जोरात वाजतो! शिवाय, आधुनिकत्वाच्या खुळ्या कल्पनांनी वधू-वरच पुष्कळदा आपले प्रामाणिक मतभेद 'ध्वनिक्षेपित' करतात!

कथाकादंबऱ्यांनी आणि पुरोगामी मंडळींनी ज्या विवाहपद्धतीला राजमार्ग खोलून दिला ती पद्धतीही फारशी निर्विघ्न नाही असं ठरल्यावर, वधू-वरांना व त्यांच्या आप्तेष्टांना फिरून तोच वधूपरीक्षेचा जुना रस्ता उरतो. रुक्ष, व्यवहारी तरुणांच्या मनाची कल्पना नसलेले लोक त्या मार्गाची प्रशंसा करतात. आमचे बुद्धिनिष्ठ पुरोगामी लोकदेखील एकदोन 'शर्ती' घालून ती जुनी विवाह-संयोजन-पद्धतीच मान्य करतात. आमच्या बुद्धिवादी मंडळींच्या अटी दोनच. एक अट म्हणजे प्रौढत्वाची. ती आज न मागताच पुरी होते! अन् दुसरी अट हुंडाविरोधाची. एवढ्या दोन अटी पुऱ्या झाल्यावर आमच्या रुक्ष, बुद्धिनिष्ठ मंडळींना विवाहात आणखी फारशी कोणती अपेक्षा नसते. ते फार तर, बॅंडवाजंत्री नको, जेवणावळीचा खर्च कमी करून एखाद्या संस्थेला देणगी द्यावी, असल्या अटी घालतील! 'प्रेमविवाह' की 'निष्प्रेमविवाह' याची ते फारशी चौकशी करणार नाहीत.

प्रेमविवाह ही व्यवहारिक विवाहपद्धती होऊ शकत नाही, ती नशिबाची वा योगायोगाची गोष्ट ठरते, हे पाश्चात्य देशांतील लोकांनाही मान्य करावं लागेल. या देशातल्या मुलामुलींना आज तरी प्रेमविवाहांत आणखी काही अडचणी आहेत हे वर सांगितलेल्या अनुभवांवरून दिसून येईलच. जुन्या विवाह-संयोजन-पद्धतीत प्रेमविवाहाला अवसर नव्हता, एवढाच तिचा दोष नव्हता. त्या पद्धतीत मुलगी 'पहाणं' एवढ्यालाच अवसर असे. अन् तेवढंही तीत जमत नसे! आज आपण रेडिओची मॉडेल्स पाहाताना जेवढी परीक्षा करतो तेवढीही त्या पद्धतीत मुलींची परीक्षा होऊ शकत नाही. शिवाय, रेडिओप्रमाणं मुलींची खरेदी व्हावी का, हा प्रश्न आहेच. पण आज तसा परीक्षेला मोठी अडचण म्हणजे मुली मोठ्या व सुजाण झालेल्या असतात ही आहे. त्यांची परीक्षा होण्याच्याही आधी त्या परीक्षकांची परीक्षा करून मोकळ्या होतात. सारांश, आजच्या प्रौढ सुशिक्षित वधूंची परीक्षा जुन्या बाजारपेठेप्रमाणं करणं म्हणजे वरपक्षानं स्वतःला हास्यस्पद करणं आहे. असं असून आजही हा द्विपादांचा बाजार तेजीत दिसतो, हे कसं काय? याला कारण आजची वधूपरीक्षा. बाहेरून वधू-वरांची परीक्षा असली तरी. आतून उभयतांच्या आर्थिक स्थितीची परीक्षा असते. वराची सांपत्तिक स्थिती तर वधूपक्ष उघडपणेच तपाशीत असतो; पण वधूची सांपत्तिक स्थितीही वरपक्ष अंदाजित असतो, किंबहुना उभयपक्षांचे मध्यस्थ सहज ओघात आल्याप्रमाणं भासवून स्वपक्षाच्या 'ऐपतदार' पणाची जाहिरात करीत असतात! वधूपक्ष मुलीला जन्मभर कितपत आरामात राहाता येईल हे पहात असतो, तर वरपक्ष लग्नात व लग्नानंतर काही वर्षं वधूच्या आईबपांना कितपत लुबाडता येईल हे पाहात असतो. या लोभी वा लुटारू दृष्टीमुळं स्वतः वधूची परीक्षा 'काळी-गोरी', 'उंच-बुटकी' या पलीकडे करण्याची गरज उरत नाही. अर्थात् ही ढोबळ परीक्षा वधू चहा घेऊन येत असतानाच संपते व नंतर 'इंन्कम्टॅक्स' इन्स्पेक्टरच्या क्षेत्रातले काम सुरू होते!

आजच्या प्रौढ वधू प्रेमविवाहावर भिस्त ठेवण्याइतक्या स्वप्नाळू नसल्या तरी, त्या जुन्या पद्धतीच्या वधूपरीक्षेला तयार आहेत असं मात्र नव्हे. त्या परीक्षेतील बाजारी शरीरप्रदर्शनाची तर त्यांना शिसारी आहेच, पण शिवाय लोभी दृष्टीचीही शिसारी आहे. ज्या विवाहांत उघडपणं पैशांच्या रकमांचा उल्लेख होतो ते विवाह जन्माची नाती ठरविण्यास कुचकामाचे आहेत असं प्रौढ कुमारिकांना वाटू लागलं आहे. शिवाय, त्यांना नवऱ्याच्या प्राप्तीची अन् पदव्यांचीही आता फारशी मातब्बरी वाटत नाही. कारण त्या स्वतः आज (अनेक उदाहरणांत) भावी वराइतक्याच पदव्या मिळवून बसलेल्या असतात! व पगारही मिळवीत असतात, वधूच्या पात्रतेत व अपेक्षांत बदल झाल्यानं स्थळांतील अनेक फलतू गोष्टींचं महत्त्व कमी होत आहे व मुख्य गोष्ट हळूहळू ठळकपणे डोळ्यांसमोर धरली जात आहे- ती म्हणजे दोघा स्त्री-पुरुषांची जन्माची सोबत.

ज्या परीक्षापद्धतीत आर्थिक व्यवहाराला अवास्तव महत्त्व येणार नाही, ज्या परीक्षापद्धतीत वडीलमाणसांचं अवास्तव दडपण पडणार नाही, अशी एखादी वधूवरपरीक्षापद्धती असू शकेल का, असं वधू-वर आज सवतःला अनेकदा विचारतात.पण 'वास्तववादी' म्हणवणाऱ्या कथाकादंबऱ्यांत त्यांना या प्रश्नाचं अगदीच अवास्तव अन् रोमँटिक उत्तर मिळतं! ते म्हणजे 'लव्ह मॅरेज'! विवाह ही गोष्ट 'आर्थिक' तरी झाली पाहिजे, नाही तर 'रोमँटिक' (पुस्तकांतल्यासारखी! ) तरी झाली पाहिजे, असं का? तिला काही रोखठोक प्रामाणिक स्वरूप देणं शक्य नाही का?

पण आजच्या कौटुंबिक वधू-वरपरीक्षेला मी लोभी किंवा लुटारू दृष्टीची ठरवलं तेही पूर्ण सत्य नाही. कारण जेव्हा दोन्ही कुटुंबं चांगलीच सधन असतात तेव्हा, द्रव्यलोभालाही अर्थ नसतो. वधूला वराच्या घरी जाऊन अधिक श्रीमंत घरी गेल्याचं समाधान नसतं, अन् वराला वधूकडून दहापाच हजार मिळवून फारसं काही साधायचं नसतं. अशा स्थितीतही दोन्ही पक्ष बंगला, मोटार, बेळगावपासून नागपूरपर्यंतचे श्रीमंत नातलग, यांच्या गोष्टी करीतच असतात! यात चोहो बाजूंना श्रीमंत नातेवाईक पेरून ठेवण्यानं येणारी सुरक्षिततेची लाचार भावना तर असतेच, पण त्याहूनही खोट्या मोठेपणाची भावना अधिक पोसली जात असते! मुलाच्या वा मुलीच्या पदव्या, उंची, वर्ण यांच्या उल्लेखांतही ही 'प्रेस्टिज्'ची भावनाच अधिक प्रबल असते. 'पहिल्या दोन सुना ग्रॅजुएट् आहेत, तर तिसरी निदान एम्. ए. तरी हवी! पहिल्या दोन मुलींना एंजिनियर नवरे मिळाले, तिसरीला नुसता प्रोफेसर बघून देणं बरं नव्हे! निदान I. A. S. तरी असावा! मुलीचा बाप अकोल्याला 'लीडिंग प्रॅक्टिशनर' आहे, मग ती पुण्यातील एका हेडमास्तरची सून होऊन कसं चालेल?

या प्रेस्टिज्च्या वा खोट्या मोठपणाच्या कल्पना केवळ वडीलमाणसांच्याच डोक्यात असातात असं नव्हे. मुलामुलींच्या डोक्यातही असतात. विशेषतः मुलींच्या डोक्यात फार असतात. असल्या बाह्य भपक्यावर आधारलेल्या लग्नाचा फुगा दुर्दैवानं फुटला तरीही, उभयपक्षांचा मोठेपणाचा हव्यास संपलेला नसतोच. लग्नापूर्वी लग्न जुळविण्याकरता ज्या मोठेपणाचा उल्लेख होत असतो, त्याचा उल्लेख नवरा-बायकोंत दैववशात् वितुष्ट आलं तर, उखाळ्यापाखाळ्यांत अधिक जोरानं होतो! म्हणजे वैवाहिक सुख बंगलेमोटारींत नाही, हे कळल्यावरही बंगलेमोटारींची मानसपूजा चालूच असते!

अशा लग्नांना 'प्रतिष्ठा-विवाह' किंवा 'marriage for social prestige' म्हणता येईल. एकदा ही प्रतिष्ठेची कल्पना सोडली की वधू-वरांच्या निवडीत क्रांतिकारक बदल झालेला दिसेल. या दृष्टीनं मला

परवाच्या माझ्या विवाहसंस्थेच्या भेटीत तर काही उघड चमत्कारच पहायला सापडले. संस्थाचालकांनी आम्हांला संस्थेमार्फत जुळलेल्या विवाहांतील वधू-वरांचे काही फोटो दाखविले. अर्थात् फोटोत सर्वच जोडपी अनुरूप दिसतात! असं असून त्यांनी मुद्दाम काही जोडप्यांचे फोटो आमच्यापुढे का टाकले, त्याचं कोडं मागाहून उलगडलं. एका फोटोतील वधू-वर सुस्वरूप, निकोप दिसत होती. आम्ही त्या फोटोकडे संतुष्टतेनं पहात आहोत हे पाहिल्यावर संस्थाचालकांनी वधू-वरांची माहिती सांगितली. वर सर्वदृष्ट्या अव्यंग असून फोटोत सुंदर दिसणारी ती वधू मात्र संपूर्णपणे मुकी व बहिरी आहे, अशी माहिती आम्हांला मिळाली.

चकित होऊन मी विचारलं, "अन् तरी त्या वरानं तिला पसंत केली? त्याच्यामध्ये काही दोष?"

"कोणताच दोष नाही या वरात! त्यानं तिची निवड केल्यामुळं उलट त्याच्या आईबापांचा त्याच्यावर कायमचा रोष झाला!"

ही निवड करणाराच्या उदार व स्वतंत्र वृत्तीबद्दल मला मनापासून आदर तर वाटलाच, पण ही निवड कशी शक्य झाली असेल याबद्दल माझ्या मनात विचारचक्रही सुरू झालं! मुलीला अथवा मुलाला 'चष्मा आहे' एवढ्याकरताही अनेकांनी नकार दिलेला मला माहीत आहे. तुम्हांलाही माहीत असेल! फार कशाला, एखाद्या चष्मेवाल्या मुलीनं मला सल्ला विचारला तर, मीदेखील तिला 'तू चष्मेवाला वर पत्करू नकोस' असंच सांगतो. कारण दोघांनाही तरुणपणात चष्मे म्हटल्यावर त्यांच्या मुलांना उष्टावणाच्या दिवशीच चष्मा लावायची वेळ यायची! कारण दृष्टीदोष आनुवंशिक असतात म्हणे! अशा स्थितीत या उदारधी मुलानं मुकी बहिरी वधू पसंत कशी केली असेल? मनोविश्लेषणात वा समाजविश्लेषणात शिरून मीही काही तर्क लढवू शकेन! (उदाहरणार्थ, त्या मुलाच्या एखाद्या नातेवाइकाची बायको फार बडबडी असेल; अलीकडच्या 'सुशिक्षित' वधू 'शब्दानं शब्द वाढवून' गृहस्वास्थ्य कसं बिघडवून टाकतात हे त्यानं पाहिलं असेल अन् गृहसुखाचा बिनतोड मार्ग म्हणून त्यानं मुकी मुलगी निवडली असेल! ) पण या उदाहणावरून खराखुरा निष्कर्ष काढायचा झाला तर, एकच निघेल! एकदा प्रतिष्ठेची दृष्टी सोडली की खऱ्या माणुसकीच्या दृष्टीला प्रारंभ होतो. प्रतिष्ठेकरता लग्न म्हटलं की त्यात स्पर्धेची, बढाईची दृष्टी आलीच. आणि स्पर्धा, 'भाववाढ' यांचा प्रवेश एकदा विवाहाच्या निवडीत झाला, की मिळत आहे त्याहून अधिक चांगल्या स्थळाची वा वधूची वाट मनुष्य पहात बसणारच! मग त्याला लिलावाचं स्वरूप येतं अन् एकदा आपण आपल्या स्वतःलाच लिलावाला काढलं म्हणजे त्या लिलावातल्या किंमतीला अंतच उरत नाही!

बहुधा ती सुंदर परंतु दुर्दैवी मुलगी पाहिल्यावर त्या उदार मुलाच्या मनातली स्पर्धेची अन् प्रतिष्ठेची भावना जाऊन, त्यागाची अन् सात्त्विक सुखाची भावना त्या ठिकाणी उदित झाली असेल. अन् तरीही ती केवळ परोपकारबुद्धी खास नसणार! कारण विवाह म्हणजे जसा लिलाव नव्हे, तसंच विवाह म्हणजे गोप्रदानही नव्हे! सुखाला अन् प्रेमाला पात्र, पण दुर्दैवानं विवाहाला मात्र अपात्र अशा एका मुलीला आपण सुखी करीत आहोत हा सात्त्विक अभिमान अन् ही जिद्द त्या मुलाच्या मनात असणारच! ती मुलगी सुंदर पण मुकी होती; त्याऐवजी कुरूप पण बालकी असती तर...?

अनुक्रमणिका

पण... पण म्हणूनच मी म्हटलं की, हृदयाच्या एका उदार ऊर्मीचा विचार करताना मनोविश्लेषणात शिरणं मला आवडत नाही! आजच्या वधू-वरांची निवड धड वास्तववादीही नाही की ध्येयवादीही नाही. ज्या पिढ्या, लहान वयात लग्नं ठरवून वधूला सासरची शिस्त, सासरची गोडी अन् सासरचा अभिमान, विविध परंपरांच्या आणि समारंभांच्याद्वारे शिकवीत, त्या बाहेरून गतानुगतिक दिसल्या तरी अधिक वास्तववादी होत्या. स्त्रीपुरूष आकर्षण हे नैसर्गिक असलं तरी, 'सासरचं आकर्षण' काही 'बायॉलॉजिकल्' खास नाही. ते कृत्रिम संकेतांनीच निर्माण करायचं असतं. त्याकरिताच विवाह समारंभामधून परस्परांचे मानपान असतात. त्याकरिताच वधूसारख्याच दोन पायांच्या नवरोजीला 'नवरदेव' बनवायचा असतो! त्याकरिताच वरातीच्या-गृहप्रवेशाच्या-एका रात्रीत वधूनं स्वतःचं जन्मघर सोडून परक्या घराचा अभिमानपूर्वक स्वीकार करायचा असतो. 'अभिमानपूर्वक' हे शब्द मी आवर्जून वापरीत आहे. आज अनेक प्रौढ वधू वराचा स्वीकार करतात, पण वराच्या घराचा स्वीकार करायला खळबळ करतात! साहजिकच आहे! जे झाड 'रोप' असताना कुंडीतून काढून बागेत नेऊन लावायचं, ते त्याला फांद्या फुटल्यावर, त्याचा बुंधा रुंदावल्यावर उकरून दुसरीकडे नेलंत तर, त्या जमिनीत ते खरं रुजतच नाही!

मी इथं बालविवाहाचा पुनरुद्धार करण्याची शिफारस करीत नाही. पण बालविवाहदेखील काही दृष्टींनी अधिक वास्तववादी होता, एवढंच सुचवित आहे. आणि पुन्हा असं सांगत आहे की, प्रौढ, सुजाण वधू-वरांचे विवाह सांपत्तिक स्थितीच्या वा प्रतिष्ठेच्या जुन्याच भूमिकेवरून झाले तर, त्यात रोमँटिक् आकर्षणालाही जागा नाही, ध्येयवादालाही जागा नाही की वास्तववादालाही जागा नाही. ही 'प्रतिष्ठेची दृष्टी' कशी नष्ट करायची? पैशाच्या गोष्टींचा उल्लेख विवाह होऊन काही वर्षं उलटेपर्यंत अजिबात टाळणं एवढाच मला तरी आज मार्ग दिसतो. जुने वधूपिते मुलीला मुलगा होईपर्यंत तिच्या सासरी जेवत नसत. तसल्याच एखाद्या नव्या संकेताची कल्पना अन् स्थापना उभयपक्षींच्या देणग्यांच्या बाबतीत करावी का? मुलीच्या लग्नाला तीन वर्षं होईपर्यंत वधूपित्यानं वराला कोणतीही देणगी देणं गर्ह्य समजण्यात यावं! अन् वरपक्षानंही मुलीला जे काय दागदागिने करायचे, ते तिला पहिला मुलगा (मुलगीही चालेल! ) झाल्यावर करावे. म्हणजे आज लग्नात जमलेल्या 'निरपेक्ष' गणगोतापुढं मानपानाचं, हुंड्याचं आणि दागिन्यांचं जे प्रदर्शन करावं व ज्या प्रदर्शनामुळं लग्नाला आज दोन जीवांच्या अन् दोन कुटुंबांच्या मीलनापेक्षा दोन इस्टेटींच्या चढाओढीचं रूप येतं, ते प्रदर्शन अन् ती चढाओढ कदाचित् बंद पडेल! लग्नात जमणाऱ्या गणगोताला मी 'निरपेक्ष' का म्हटलं ते सांगितलं पाहिजे. ज्यांच्या डोळ्यांच्या तृप्तीकरता अन् ज्यांचा भलेपणा मिळवण्याकरता दोन्ही पक्ष 'ऋण काढून सण' करीत असतात, ते तर बिचारे 'अनासक्त' म्हणजेच 'नवरा मरो' की 'नवरी मरो' या वृत्तीचे असतात!

लग्नातून ही गोष्ट प्रतिष्ठेची अन् चढओढीची वृत्ती जाण्याला आणखी एक गोष्ट केली पाहिजे. लग्न जमविताना वधू-वरांच्या खऱ्या आप्तांखेरीज, चलाख मध्यस्थांनाच आज मोकळं रान सापडतं ते बंद व्हावं. ज्यांना वध-वरांच्या खऱ्या सुखाची अन् हिताची पर्वा नाही त्यांचं महत्त्व केवळ उभयपक्षांचा आर्थिक फायदा करून देण्यानंच सिद्ध होणार असतं. पस्तीसशेवन पंचेचाळीसशेपर्यंत रक्कम नेऊन, ते वरपक्षावर 'इंप्रेशन्' मारू पहातात, तर पंचवीसशेच्या खाली न उतरणाऱ्या वरपक्षाला आशेवर यायला लावून शिवाय 'ज्याचा खर्च त्यानं' करायचा ठरवून, ते वधूपक्षाला चकित करतात! अर्थात् या हजार-दोन हजारांच्या चढउतारांचा संबंध वधू-वरांच्या सुखाशी किंवा उभय-कुटुंबांच्या सलोख्याशी काहीच नसतो. उलट त्या रकमांच्या हेलकाव्यांबरोबर उभयपक्ष एकमेकांच्या लोभीपणाची कल्पना बांधीत असतात!

ही खोट्या प्रतिष्ठेची अन् 'काढू' पणाची ('grabbing' ची) वृत्ती वधू-वरांची वयं वाढल्यामुळं किंवा वधू-वर पदवीधर झाल्यामुळं मुळीच कमी झालेली नाही. उलट वाढलेली आहे. विवाह ही स्वतःचं आर्थिक valuation ठरवून घेण्याची एक राजरोस पर्वणी आहे, अशी सुशिक्षितांचीही उघड कल्पना दिसते! आणि या कल्पनेमुळं विवाहासारख्या पवित्र आणि शाश्वत संबंधात खोटी, बाजारी दृष्टी शिरते. केवळ हुंड्याला बंदी घालणं वा वरपक्षानं खुषीनं हुंड्याची अट सैल करणं, एवढ्यानं लग्नाला आज आलेलं लिलावाचं स्वरूप बदलणार नाही. त्यातली प्रतिष्ठेची, खोट्या मोठेपणाची कल्पनाच नष्ट झाली पाहिजे. प्रेमविवाह हे या बाजारी विवाहाच्या अगदी विरुद्ध असं टोक आहे, उघड आहे. परंतु प्रेमविवाह 'व्हायचे' असतात, 'ठरवायचे' नसतात. प्रेम जमलं नाही तर, विवाहच करायचा नाही, अशी वरानं-वधूनंदेखील-प्रतिज्ञा केली तर, मी ती समजू शकेन. परंतु विवाह ही एक व्यावहारिक, सामाजिक गरजही आहे. फक्त ती पैसा लुटण्याची व पैशाचं प्रदर्शन करण्याची पर्वणी होऊ नये एवढंच! अन् म्हणून ज्या विवाहपद्धतीत प्रेमासारख्या योगायोगाच्या गोष्टींवर भिस्त ठेवावी लागणार नाही; अन् जीत द्रव्यलाभावरही दृष्टी राहाणार नाही, त्या पद्धतीला मी वास्तववादी विवाहदृष्टी म्हणेन. एखादी निरपेक्ष संस्थाही परस्परांशी मोफत पण प्रामाणिक माहिती पुरवून जर ही वास्तववादी दृष्टी निर्माण करू शकते, तर वधू-वरांच्या हिताची व कुटुंबाच्या लौकिकाची चाड असणारे वधू-वरपिते ती का निर्माण करू शकणार नाहीत?

एकीकडे पुरोगामित्वाच्या गप्पा मारणाऱ्या आजच्या सुशिक्षितांच्या विवाहसंयोजनात द्रव्यदृष्टी अधिक दिसू लागावी, या चमत्काराचा थोडा अधिक विचार केला पाहिजे. केवळ पैशाची दृष्टी ठेवून ठरवलेलं लग्न काय, की केवळ रूपाकडे पाहून ठरवलेलं लग्न काय, दोन्ही लग्नांना लिलावी स्वरूप येणं अपरिहार्य असतं. त्यात आरंभापासूनच प्रतिष्ठा आणि अहंकार पोसले जात असल्यानं, त्यांना कुठलंही सात्त्विक अधिष्ठान लाभलेलं नसतं. आजच्या भाषेत सांगायचं म्हणजे अशी लग्नं 'जडवादी मूल्यांवर' आधारलेली असतात. फार काय, मी आरंभी उल्लेखिलेल्या संस्थेसारख्या निरपेक्ष संस्थेमार्फत दोघा प्रौढ वधू-वरांनी लग्न ठरवलं, त्यात पैशाची वा रूपाचीही दृष्टी ठेवली नाही, केवळ उभयतांच्या आवडीची आणि सुखाची दृष्टी ठेवली, तरीही ते लग्न बाजारी ठरणं अशक्य नाही. किंबहुना आज 'प्रेमविवाह' म्हणून मानली जाणारी अनेक लग्नं, जुन्या वधूपरीक्षेच्या पद्धतीनं ठरविलेल्या लग्नाहूनही कमी सुखी होताना अनेकदा दिसतात, त्याचं कारणही शोधलं पाहिजे. मी प्रेमविवाहाचा पुरस्कर्ताच केवळ नव्हे, तर एका अर्थानं पूजक आहे. पण प्रेमविवाहासंबंधीच्या माझ्या अभिमानाचा अर्थ आजच्या प्रौढांना तर सहजासहजी कळणार नाहीच, पण प्रेमी युगुलांनाही नीटसा समजणार नाही. प्रेम ही श्रेष्ठ भावना आहे, एक श्रेष्ठ अनुभव आहे, असं जेव्हा मी म्हणतो तेव्हा, 'प्रेम ही वैवाहिक सुखाची "गॅरंटी" आहे' असा जर त्याचा कुणी अर्थ घेऊ लागले, तर मात्र त्याला माझा अर्थ समजलेला नाही! खरं उत्कट प्रेम हा एक खोल अनुभव आहे. या अनुभवानं पुरुष आणि स्त्री या दोघांचीही मानसिक व नैतिक वाढ होते, एवढंच मी म्हणेन. पण प्रेम ही एक 'चैन' आहे अशी उथळ कल्पना करून जे प्रेमाकडे पहातील त्यांच्या डोळ्यांत चांगलंच अंजन पडेल!

पण ही झाली खऱ्या प्रेमाची गोष्ट. आज समाजात वधू-वर आणि त्यांचं गणगोत ज्या विवाहाला 'प्रेमविवाह' नाव देतात, त्या विवाहाशी प्रेमाचा संबंध बेताचाच असतो. ज्या विवाहात वैयक्तिक आकर्षणापलीकडे कोणत्याही गोष्टीला महत्त्व दिलं जात नाही, त्याला आज आपण 'प्रेमविवाह' म्हणतो. अर्थात्

हा विवाह ठरविताना त्रास नसला, बाजारी वृत्ती नसली तरी, तो अंती असुखी होण्याचा पुष्कळच संभव असतो. शिवाय, खऱ्या प्रेमाप्रमाणं नुसत्या क्षणिक आवडीवर ठरलेल्या विवाहात उभयतांच्या मानसिक विकासाचीही शाश्वती नसते. जेव्हा दोन तरुण माणसं एकमेकांना वैयक्तिक सुखाचं साधन समजून एकत्र येतात तेव्हा, त्यांची अन् सुखाची चुकामूक होण्याचाच संभव जास्त. जीवनातल्या अत्यंत मोहक वस्तूंचा पाठलाग सरळ पद्धतीनं केल्यास नक्की फसावा, अशीच जीवनाची रचना आहे. स्त्री आणि कीर्ती यांच्यासंबंधी तर इंग्रजीत म्हणच आहे. तुम्ही त्यांच्या मागं लागलात तर, त्या तुम्हांला गुंगारा देतील, तुम्ही त्यांच्याकडे पाठ फिरवलीत की तुमच्या पायाशी लोळण घेतील! वैवाहिक सुखाचीही गोष्ट अशीच आहे. दोन व्यक्तींनी एकमेकांना सुखाचा केंद्र मानून, सुख हेच ध्येय ठेवून विवाह केला की, अपेक्षाभंगाचा रोपटं वाढू लागलंच म्हणून समजावं. दोन तरुण स्त्री-पुरुषांचा जन्माचा संबंध ही गोष्ट इतकी नाजूक आहे की, 'सरळ पाठलाग'नं त्यातून सुख मिळवणं अशक्य आहे. अप्रत्यक्ष, व्यक्तिनिरपेक्ष अशा पद्धतीनं हा संबंध झाला तर सुख मिळण्याचा संभव आहे! मी हे थोडं गूढवादी बोलत आहे असं काहींना वाटेल. पण जीवनातल्या कोणत्याही महत्त्वाच्या गोष्टीसंबंधी बोलताना गूढवादाच्या खोल पाण्यात पाय गेल्याखेरीज राहातच नाही. म्हणून थोडं स्पष्ट किंबहुना धार्मिक उपदेशासारखं वाटणारं असं बोलतो. दोन व्यक्तींच्या विवाहाचं ध्येय म्हणजे दोन व्यक्तींचं सुख एवढंच जोपर्यंत मानलं जाईल, तोपर्यंत तो विवाह दुःखाला कारणीभूत झाल्याशिवाय राहाणार नाही. पण कुटुंबाचं सुख, समाजाचं हित, फार काय, एकानं दुसऱ्याचं सुख (स्वतःचं नव्हे! ) हे ध्येय ठेवून लग्न केलं तरच, ते सुखी होण्याचा संभव आहे.

अन् केवळ स्वतःचं सुख अथवा 'eternal honeymoon' हे ध्येय मानून एकमेकांना बिलगणाऱ्या, आईबापांनाही झिडकारणाऱ्या जोडप्यांच्या विवाहाचं पर्यवसान कशात होतं? तर सुमारे दीड वर्षाच्या आत 'हनीमून' चा स्वर्ग खडबडीत पृथ्वीतलावर येऊन आदळलेला असतो! निदान त्याच्या आकर्षणाचं केंद्र, त्यांचा 'सेंटर ऑफ ग्रॅव्हिटी' बदललेला असतो. गुलाबाच्या ताटव्यातून एकमेकांचा हात हातात घेऊन फिरण्यात धन्यता मानणारे, जगातल्या इतर जीवांना केवळ 'क्षम्य उपद्रव' मानणारे हे प्रेमी जीव दीडदोन वर्षांत तिसऱ्याच एका जीवाचे नोकर बनलेले अढळतील! ज्या छोटया लिबलिबित जीवाला धड चालता येत नाही, बोलता येत नाही-स्वतःची मानदेखील सावरता येत नाही, अर्थहीन रडणं आणि दंतहीन हसणं या दोन अवस्थांनीच ज्याचं मनोगत आईलाही अंदाजावं लागतं, त्याच्या सेवेत हे ('हनीमून'करता जगापासून दूर पळणारे जीव) रममाण असतील! ते त्याच्या खुळ्या चाळ्यांचं तर कौतुक करतीलच, पण त्यानं पाळण्यातच उरकलेल्या नैसर्गिक विधींचही अपार कौतुक करतील!!

हेतू आणि फळ यांत केवढी ही तफावत! विवाह हे अखेर निसर्गानं, नियतीनं वा नियंत्यानं पसरलेलं एक दुर्गम आणि दुस्तर असं जाळं आहे! विवाहसंबंधात आपणाकडे कर्त्याची भूमिका नसून 'करणा'ची वा साधनाची भूमिका आहे, ही गोष्ट व्यक्तिवादी जोडप्यालाही सुमारे अठरा महिन्यांत कबूल करावी लागते!

म्हणून स्वतःचं सुख हे ध्येय न ठेवता, कुटुंबाचं व समाजाचं सुख हे ध्येय ठेवून जे विवाह होतात त्यांत निराशा, मतभेद, तंटे होण्याचा संभव कमी. वधूच्या सुखाचं केंद्र वर अन् वराच्या सुखाचं केंद्र वधू, अशी योजना केली की ती दोघं एकमेकांच्या निराशेची frustration ची केंद्र बनलीच म्हणून समजा! पण एकमेकांना परमप्रिय असलेल्या दोघांनीही आपल्या सुखाचं केंद्र कुटुंबसेवा, समाजसेवा हे केलं तर, त्याचा तोल राहून ती दोघंही

अनुक्रमणिका

अधिक सुखी होतील. 'सुख' ही गोष्ट उघड सामन्याने ओरबडण्याची वस्तू नसून, indirectly युक्तीनं चाखण्याची नाजूक वस्तू आहे. दुसऱ्याचं सुख, दुसऱ्याची सेवा हे उद्दिष्ट ठेवल्यानंच स्वतःचं सुख साधण्याचा संभव अधिक.

केवळ कामतृप्ती हे विवाहाचं उद्दिष्ट न ठेवता, गृहस्थधर्मपालन, पितरांच्या ऋणाची फेड (समाज-धर्म म्हणा!) ही उद्दिष्टं ठेवण्यात धर्मसंस्था वधू-वरांच्या सुखात कपात करीत नसून, सुखाचं रक्षण करीत असते.

आजच्या विवाहसंयोजनातला बाजारीपणा नष्ट करायचा असेल तर, प्रतिष्ठेची कल्पना विवाहाशी निगडित करणं निक्षून टाळलं पाहिजे; आणि कोणत्याही विवाह प्रकारात थोडंफार वाट्याला येणारं frustration (नैराश्य) टाळायचं असेल तर, सुखाच्या सुखाऐवजी तिसऱ्या कुणाचं तरी सुख हे उद्दिष्ट वधू-वरांनी डोळ्यांसमोर ठेवायला हवं.

तसं केलं नाही तर, म्हातारे आईबापच केवळ नव्हेत, तर तरुण वधू आणि वर हेही एकमेकांना शत्रू वाटू लागतील!

हंस, दिवाळी अंक,
नोव्हेंबर १९६६, पृ. २१-२५.

अनुक्रमणिका

## ४७

# नवे बालविवाह

मी परवा एका आधुनिक विवाहासंबंधी मोठी चिंतनीय वार्ता ऐकली. तुम्हांला वाटेल तो विवाह आंतरजातीय असेल, कदाचित् हिंदू-मुसलमान, हिंदू-ख्रिस्ती यांचा असेल, कदाचित् एखाद्या अतिआधुनिक जोडप्यानं विमानातच लग्न लावून हॅवाना बेटात 'हनीमून' साजरा केला असेल! छे! या वार्तांनी माझं मनोरंजन झालं असतं. पण मी चिंतेत पडलो नसतो. मी ऐकली ती वार्ता अशी: आज शिक्षणाकरता इंग्लंडमध्ये असलेल्या एका वरानं हुंडा, मानपानाच्या रकमेखेरीज लग्नाकरता इंग्लंडहून येण्याचा, परत इंग्लंडला जाण्याचा आणि वधूला आपल्याबरोबर इंग्लंडला नेण्याचा विमानाचा भाडेखर्च वधूपित्याकडून मागितला, म्हणजे वर इंग्लंडमध्ये शिकणारा असो, की विमानातच लग्न लावण्याइतका पुढारलेला असो, तो 'घरपोच' मिळण्याचं बिल वाढतच आहे! अथवा वधू स्वतःच्या घरी नेण्याचं बिल तो दिवसेंदिवस वाढवीतच आहे असं म्हणा हवं तर! विवाह-सुधारणेच्या वाटेवर आपण आज कितव्या मैलाच्या दगडापर्यंत पोहोचलो आहोत?

जुन्या विवाहात आपल्याला पुष्कळच सुधारणा करायच्या होत्या. वधू-वरांच्या वयाचा आकडा वाढवायचा होता, हुंड्याचा आकडा कमी करायचा होता, जाती-पोटजातींतच विवाह झाले पाहिजेत, हे बंधन तोडायचं होतं. यांपैकी पहिली सुधारणा आपल्या कल्पनेपेक्षा यशस्वी झाली आहे. आपण जर 'अठरा' हे वधूचं मान्य असं वय म्हटलं, अन् 'चौवीस' हे कमाल वय म्हटलं तर, आज चोविसाव्या वर्षीदेखील सुशिक्षित वधूचा विवाह जुळवणं वधूपित्यांना अवघड जात आहे. ही एकच सुधारणा आगरकरांनाही घेरी येण्याइतकी यशस्वी कशी झाली, हे एक सामाजिक गूढच आहे! उलट दारिद्र्य व शिक्षण दोन्ही वाढत असूनही हुंड्याचा आकडा मात्र कमी झालेला दिसत नाही. तो साधारणपणे चौपटीनं वाढला आहे. आंतरजातीय विवाहाचं प्रमाणही मुंगीच्या पावलानंच वाढत आहे.

वधू-वराचं शारीरिक वय वाढलं म्हणजे लगेच तो 'प्रौढ विवाह' झाला, असं म्हणावं का? लग्नाबद्दलच्या मुला-मुलींच्या कल्पना, अनेक पदव्या मिळवल्यानंतरही बालिशच राहिलेल्या दिसत आहेत. विवाह म्हणजे मुलां-मुलींची-विशेषतः मुलांची 'मार्केट व्हॅल्यू' ठरवून घेण्याचा एक मोका! लग्न म्हणजे स्वतःच्या आप्तेष्टांवर 'इम्प्रेशन मारण्याची एक सोनेरी संधी!' पूर्वी बँड, गॅसच्या बत्त्या, नळेचंद्रज्योती यांच्या साहाय्यानं दोन्ही पक्षांची ऐपत जाहीर केली जाई. आज सिनेमासदृश आरास करून, हजारो निमंत्रणं पोस्टात टाकून साजऱ्या केलेल्या 'स्वागत समारंभा'नं तेच कार्य होत असतं. शिवाय मराठी दैनिकात आणि इंग्रजी सचित्र वीकलीमध्ये फोटो देऊन हजारो अनोळखी वाचकांपर्यंतही आपला विवाह आज पोहोचविला जातो.

वधू-वर निवडतानाही, ते घरात कसे वागतील, एकमेकांना कसे वागवतील, यापेक्षाही, पार्कमध्ये फिरायला जाताना किंवा सिनेमाच्या रांगेत उभे असताना जगाला कसे दिसतील, याचाच विचार अधिक होतो. आपण पागडी भरून मिळवलेला नवा ब्लॉक किंवा भरपूर किंमत देऊन आणलेला 'लेटेस्ट स्टाईल'चा सोफासेट यांचा पहिला उपयोग कोणता? आपण ते वापरून आराम करणं हा नव्हे, तर एखाद्या अल्पपरिचित पै-पाहुण्यानं, "वा! छान आहे की! केवढ्याला घेतला? आठशे चाळीस?. . . " असं म्हणून डोळे विस्फारणं हा

होय! नववधूचा व नववराचा प्राथमिक उपयोगही आजकाल इष्टमित्रांना चकित आणि लज्जित करणं हाच असतो. अगदी हुंड्याच्या रोख रकमेचा उपयोगही हाच असतो. जे लोक हुंड्याचे दहा हजार अन् मानपानाचे आठ हजार घेतात, ते त्या अठरा हजारांनी श्रीमंत होण्याइतके गरीब खास नसतात. पण 'बी. एस्सी. टेक.' झालेला आमचा मुकेश केवळ पाच हजाराला मिळाला असं झालं तर ती नामुष्की ठरेल म्हणून ठरेल लिलाव चढवावा लागतो.

म्हणून एका अर्थानं आमचे विवाह वैयक्तिक नसून 'सामाजिक' असतात. विवाह ठरताना तरी, 'लोकात बरं दिसलं पाहिजे' ही दृष्टी प्रमुख असते. जुन्या विवाहात हीच लौकिक दृष्टी प्रमुख होती; पण ती कदाचित् इतकी स्थूल, बाजारी आणि 'व्हल्गर' नव्हती. समाजाकरिता लावलेले बॅण्ड थंडावले, विजेचे दिवे विझले म्हणजे मग विवाहाची खाजगी बाजू सुरू होते. त्या बाजूत देखावा आणि भपका यांचा उपयोग नसून प्रेम, सौजन्य, समजूतदारपणा आणि घरंदाजपणा यांचं महत्त्व असतं. रूपाचंही महत्त्व असतं, पण त्या रूपात मनाच्या सौंदर्याचा अंतर्भाव करावा लागतो. ज्या वधूत समजूतदारपणा आणि प्रेमळपणा नाही, तिचं रूप लाकडी बाहुलीच्या रूपासारखं वाटूं लागतं. पण वधूपरीक्षेच्या वेळी आजचा सर्वसामान्य वर फक्त वधू 'स्मार्ट' आहे की नाही एवढंच पाहातो. कारण सिनेमागृहात लोकल गाडीत, 'स्मार्ट'पणाचंच महत्त्व अधिक असतं अन् हुंडा, मानपान यांचा तर भावी आयुष्यात काहीच उपयोग नसतो.

म्हणजे काय? अद्याप आपल्या वैवाहिक विचारांत प्रौढत्व आलेलंच नाही. पूर्वी वधू-वर वयानं लहान असत, तर आजही ते मनाचा बालिशपणा दाखवीत आहेत. पूर्वी आईबाप घराण्याच्या श्रीमंतीला महत्त्व देत, तर आज मुलंमुली स्वतःच रोख रकमेसाठी प्राण टाकीत आहेत. वास्तविक म्हाताऱ्या लोकांनी खरेदीपत्र करायला बसल्याप्रमाणं लग्नाच्या याद्या करायला बसायचा काळ संपल्यामुळे लग्नातलं पैशाचं महत्त्व कमी व्हायला नको होतं का? पण ते उलट वाढतच आहे. प्रौढ मुलांमुलींचे विवाह म्हणजे परस्परपरिचय आणि प्रेम यांच्यावर आधारलेले नकोत का? तसे ते बाहेर कधीकधी बाहेर दिसतातही, पण तरी प्रेमाबरोबर पैसाही काढण्याची कला वधू-वर अलीकडे शिकत आहेत. कधी कधी तर आमच्या पदवीधर प्रौढ वधूच बापाविरुद्ध फितूर होऊन आपल्या 'प्रेमवरा'ला बापाच्या तिजोरीचा पत्ता देतात!

शरीरानं प्रौढ झालेल्यांचे विवाहही, ते मनानंही प्रौढ नसतील तर, बालविवाहच ठरणार. वधू-वरांच्या निवडीच्या बाबतीत आपण अद्यापही प्रौढ झालेली नाही, असं म्हटलं पाहिजे. एकतर आपणाला विवाहाचा खरा उपयोग अद्याप माहीतच नाही, नाही तर तो उपयोग माहीत असूनही त्यापेक्षा आम्ही प्रतिष्ठेलाच विवाहात अधिक महत्त्व देतो असं म्हटलं पाहिजे. जिचे आई-बाप श्रीमंत आहेत अन् जिचा रंग गोरा आहे अशी मुलगी मिळण्यानं आमची सामाजिक प्रतिष्ठा वाढली, म्हणून आम्हांला आनंद होतो. पण प्रतिष्ठेचा अन् कौटुंबिक सुखाचा काहीच संबंध नसतो.

ते गुण परिचयानंच कळणार किंबहुना परिचयानेही कळतीलच असं नाही. अन् कळले तरी आपण त्यांना किंमत दिली पाहिजे ना? लग्न ठरविण्यातला उद्देशच चुकीचा असला तर, आपण चुकीच्या गोष्टींनाच महत्त्व देणार. लोकांपुढे 'मिरवणं' किंवा 'शोवींग ऑफ' हाच जर लग्न ठरविताना आपण उद्देश ठेवला तर, पैसा, पदवी, 'स्मार्टनेस' यांनाच महत्त्व येणार.

अनुक्रमणिका

कुणी कशाला महत्त्व द्यावं हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. पण लोकांत मिरवण्याच्या दृष्टीनं आपण वधूची वा वराची निवड केली तर, त्याला मी 'प्रौढविवाह' म्हणायला तयार नाही. तो झाला पुन्हा 'बालविवाहच!' वाटलं तर अशा विवाहांना तुम्ही 'नवे बालविवाह' म्हणा!

आपण, पाक्षिक चिंतन,
'हितवाद',
११ मे १९६८, पृ. (?).

अनुक्रमणिका

## आजचे लग्नसमारंभ

जुन्या डेक्कन कॉलेजमधील एक हिंदुत्वप्रेमी इंग्रज प्रोफेसर म्हणत असत : "मला हिंदू समाजात जन्म घेणं अधिक आवडलं असतं. कारण हिंदू लोकांत आठवड्यात तीन तरी सण असतात!"

आपण हिंदू लोक इतर देशांतल्या लोकांच्या मानानं 'गंभीर आहोत', हसणं, खेळणं, आपणाला माहीत नाही, अशा वार्ता पहिल्यापहिल्या इंग्रज अधिकाऱ्यांनी आणि प्रवाश्यांनी युरोपात पसरवून दिल्या, पण वस्तुस्थिती वेगळीच आहे. हिंदूंच्याइतके उत्सवप्रिय लोक जगात दुसरे नाहीत. अन् या उत्सवप्रियतेची सावली त्यांच्या धार्मिक विधींवरही पडली आहे. वास्तविक लग्न व मुंजी हे मुख्यतः धार्मिक विधी आहेत. पण त्यांना आपण यसस्वीपणे 'सोशल गॅदरिंग्ज्' बनवून टाकलं आहे! लग्नाला एक वेळ आनंदोत्सवाचं, ख्यालीखुशालीचं, हास्यविनोदाचं स्वरूप येणं साहजिक आहे. मुसलमानांत तर त्याला 'आनंदोत्सव' ऊर्फ 'शादी' हेच नाव आहे. ('शाद' म्हणजे प्रसन्न किंवा आनंदी.) पण आमचे लोक मांडव, लाडू, पोळ्या, मंगलाष्टके, याचे इतके भोक्ते की त्यांनी मुंजीसारख्या ब्रह्मचर्यव्रतारंभाच्या विधीतही मंगलाष्टके, एका ताटात जेवण ('मात्राभोजन'), आहेर, वाजंत्री या सर्व गोष्टी गोवून दिल्या आहेत. (काही लोकांना 'मात्राभोजन' या समासाचा विग्रह 'मात्रा सह भुज्यते यत्र' माहीत नसल्यानं ते अलाकडे 'मातृभोजन' ही दुरुस्ती करतात. ते हास्यास्पद आहे, हे या संदर्भात सहज आठवतं! )

जुन्या जमान्यात तर लग्नकार्य म्हणजे इष्टमित्रांना एक पर्वणी वाटे. दिवाळीत ज्याप्रमाणे सर्व काळज्या (आणि पैशाचे हिशेबही! ) विसरायच्या, त्याचप्रमाणेच लग्नकार्यातही त्या विसरायच्या अशी आपली रीत होती. आप्तस्वकीय स्त्री-पुरुषांचं तर त्यात संमेलन भरेच, पण आपल्या गावकरी मंडळींवर 'इंप्रेशन' मारण्याचाही तो एक मोका असे. अर्थात् गरिबांचे लग्नसमारंभही चारचार दिवस चालत. मग श्रीमंतांकडे लग्न असल्यास, 'गावात त्या आठवड्यात कुणाच्या घरी चूल पेटवायला बंदी होती' असं अभिमानानं म्हणण्याचा प्रघात आहे.

इंग्रजी शिक्षणानंतर आपण विवाहाचं वय आणि हुंडा या दोन बाबतींत सुधारणा घडवून आणण्याची घोषणा अनेकदा केली. पैकी वयाच्या बाबतीत आपण आज 'कल्पनेपेक्षा' यशस्वी होऊन बालवधूंच्या ऐवजी प्रौढ वधूंची समस्या निर्माण करून ठेवली आहे! पण हुंड्याच्या बाबतीत मात्र सुशिक्षित वधू-वरांनीच आमच्या सुधारकांचा पराभव केला आहे! आज जास्त शिकलेले वर जास्तच हुंडा मागतात. परदेशांत शिकून आलेले वर हुंड्याखेरीज परदेशाचा प्रवासखर्च मागतात. अन् शिकलेल्या, - विशेषतः प्रेमविवाह करणाऱ्या-कित्येक पदवीधर वधू याबाबतीत या सुशिक्षित लुटारूंना सामील असतात! पण कुणी मुद्दाम सुधारणा करण्याची मोहीम काढलेली नसूनही, विवाहसमारंभात आज नखशिखांत बदल झालेला अढळेल. 'चार दिवस लग्नसोहळा' ही आता केवळ 'दंतकथा' झाली आहे. एक दिवसात लग्न उरकणारेही आज थोडे उधळेच ठरत आहेत. 'बारा तासांत लग्न', 'तीन तासांत लग्न' हे आजकालचे 'ताजे दर' आहेत. मंगल कार्यात पहिले वऱ्हाडी भोजनाची पंगत बसवीत आहेत तोच, दुसऱ्या लग्नाचे वऱ्हाडी येऊन दाखल होतात!

आगगाड्यांमुळे ज्याप्रमाणे खुळचट स्पृश्यास्पृश्य कल्पना नष्ट झाल्या, त्याप्रमाणे शहरांतील जागेच्या टंचाईमुळे लग्नसमारंभातले कित्येक कालबाह्य विधी आणि सोहळे लुप्त झाले! 'रुखवत', 'मांडव परतणे', 'वरात' इत्यादी विधी शहरांत आजच इतिहासजमा झाले आहेत. पण ज्या सोहळ्यांना वेगळा वेळ वा वेगळी जागा लागत नाही, ते वेडे सोहळे बायकांच्या हौशी स्वभावामुळे अन् पुरुषांच्या भिडस्त धोरणामळे आज बारा तासांच्या लग्नांतही टिकून राहिलेले दिसत आहेत! एम.बी.बी.एस. वा एम.एः, बी.एड. झालेल्या वधू स्व-रचित, वाङ्मयीन उखाणे घेऊन वराला घास घालताना पाहिल्या म्हणजे, 'हौसेला मोल नाही' म्हणावं, की 'सुधारकांना बिचाऱ्यांना यश नाही' म्हणावं, हेच कळेनासं होतं!

पण अशा सुरांत लग्नसमारंभांबद्दल लिहायचं म्हटलं तर, आणखी दोन स्तंभ भरतील! अन् त्यांत काही उपयुक्त गोष्टी मात्र राहून जातील. आजचे मुंबई-पुण्याचे लग्नसमारंभ पाहिले, म्हणजे ते 'काल' च्या समारंभांहून सुधारलेले म्हणावे की बिघडलेले म्हणावे, हेच कळेनासं होतं. 'अक्षत', 'वरात', इत्यादी गोष्टींना फाटा मिळाला या दृष्टीने ते सुधारलेले म्हणावे लागतील; पण त्यातले ते दोन-दोन हजार निमंत्रितांचे 'स्वागत-समारंभ' आणि आहेराचे दरडोई नजराणे पाहिले म्हणजे जुन्यापेक्षा नवं नेहमीच सुधारलेलं नसतं, असं म्हणावं लागतं. वधू-वरपित्यांच्या व्यवसायाप्रमाणे आणि दर्जाप्रमाणे त्यांच्या ओळखी असणार ; अन् पुण्यासारख्या ठिकाणी त्या अफाटच असणार! इतक्या सर्वांना दोन तासांत 'या बसा' म्हणणंदेखील अवघड; मग पानसुपारी, अत्तर-गुलाब द्यायचे म्हटल्यावर तारांबळ उडणं साहजिकच आहे. वास्तविक वधू-वर पाहणं व त्यांच्या कृतार्थ मातापित्यांशी दोन शब्द बोलणं हा या 'रिसेप्शन'चा खरा हेतू. 'पानसुपारी' हेच त्याचं खरं नाव! 'पानसुपारी'त का कुणी खाण्यापिण्याचा घोळ घालतात? पण अलीकडे त्या पानसुपारीत लाडू, केक, वेफर्स, आइस्क्रीम, कोकाकोला, काय काय शिरलं आहे ते सांगण्याची सोय नाही. दोन हजार लोकांना आजच्या महागड्या काळात हे सर्व देणाऱ्या वधूपित्यांना एका मुलीच्या लग्नाला जो खर्च लागतो तेवढ्या खर्चात युद्धपूर्व पुण्यात दोनमजली बंगला सहज उभा राहिला असता. आजच्या काळात हुंड्याच्या रकमेत 'रिसेप्शन'सारख्या या अनावश्यक गोष्टीची रक्कम भरीला घातली तर, त्या बिचाऱ्या नव-वराला जागेकरिता पागडीला किंवा ॲडव्हान्सला तरी तो उपयोगी पडेल! म्हणजे 'रिसेप्शन'चा समारंभ टाळता येईल, असे मात्र मला म्हणायचे नाही. वधू-वरांच्या कुटुंबियांचे इष्टमित्र लग्नाच्या दिवशी नाही, तर कधी एकत्र येणार? पण आजच्या पानसुपारीला (कदाचित् इतर समाजांच्या 'मॅरेज पार्ट्या' पाहून) 'पार्टी' चं स्वरूप येई लागलं आहे. अन् इकडे निमंत्रणांच्या संख्येला मात्र काहीच ताळतंत्र राहिलेलं नाही! ती जवळजवळ एखाद्या 'मास मीटिंग' च्या हॅंडबिलासारखी, जो दिसेल त्या कधी कधी वर नावही न लिहिता दिली जातात! म्हणजे शब्दशः 'अगणित' पाहुण्यांना पार्टी देण्याचा मांड मांडला जातो! बरं इतकं करून ताज्या घरगुती स्वयंपाकाच्या प्रयोजनाने जे समाधान होई ते आजच्या दुकानातून पुरवठा केलेल्या उभ्या उभ्या खालेल्या पार्टीने होत नाही ते नाहीच!

मला वाटतं मध्यंतरी जेव्हा जेवणावळीवर बंदी असे, तेव्हा हॉटेलांना, हलवायांना अन् सोडा-वॉटरवाल्यांना कंत्राट देणाऱ्या पार्ट्या निघाल्या! या 'युद्धोत्तर पार्ट्या'त समाधान यजमानालाही नाही की पाहुण्यांनाही नाही. समाधान काय ते कंत्राटदाराला! म्हणून पानसुपारीत घुसलेल्या या खाण्यापिण्याला समंजस लोकांनी त्वरित फाटा दिला पाहिजे, असं मला वाटतं.

त्याचप्रमाणं, लग्न-कार्यातील आणखी एका आगंतुक प्रकाराला फाटा द्यावा अशी जाहीर सूचना करण्याची वेळ आली आहे. तो आगंतुक प्रकार म्हणजे 'आहेराचा'. 'आहेर आणू नये' अशा छापील सूचनाही

कित्येक विचारी यजमान अलीकडे निमंत्रणपत्रिकेतच छापतात आणि तरीही प्रथा नष्ट होत नाही. आहेरच्या प्रथेला मी 'आगंतुक' म्हटलेलं पाहून कित्येकांना नवल वाटेल; कारण 'आहेर' हा शब्द आणि हा रिवाज फार जुना आहे. पण जुना 'आहेर' केवळ प्रतीकात्मक आणि ठराविक असे. जुने आहेर आणि नवी 'प्रेझेंट्स्' यांच्या आशयात आणि स्वरूपातही फार फरक आहे. आहेर मुख्यतः व्याही आणि त्यांची कुटुंबीय मंडळी यांना, त्यांच्या दूरच्या वा जवळच्या संबंधांप्रमाणे होई. ते आहेर मुख्यतः पारंपरिक पोषाखांच्या स्वरूपात, म्हणजे स्त्रियांना लुगडी-खण, तर पुरुषांना पागोटी, उपरणी या स्वरूपात असत. त्याहून एकदोन पिढ्यांमागे डोकावून पाहिलं तर, पुरुषांच्या आहेराकरता तरी कोणी बाजारात गेलेलं दिसलं नसतं. बासनात जुने आलेले आहेर बांधून ठेवलेले असत, त्यातून रुमाल, पागोटी, उपरणी काढून तिळगुळाप्रमाणे त्यांची देवाण-घेवाण होऊन, जेवढा खर्च तेवढीच जमा होऊन बासन तसंच बांधलेलं राही! स्त्रियांच्या आहेराकरता मात्र नवी खरेदी होई; कारण त्यात हौस, आवड, नावड यांचं प्रस्थ बरंच असे. पण 'आहेर' याचा अर्थ 'मानाचा पोषाख' हाच असे. जुन्या दरबारांतही 'खिलात' म्हणून जो देत तो मानाचा पोषाख असे. पण वधू-वरांच्या हातांत विविध बाजारी वस्तूंची पार्सलं ठेवण्याची आजची चाल म्हणजे या जुन्या 'सिंबॉलिक सत्कारदर्शक' आहेराचं विडंबन होय! जुना मानाचा पोषाख फक्त वऱ्हाडी म्हणून मुद्दाम गावाहून आलेले किंवा लग्नघरी लग्नाकरिता प्रत्यक्ष येऊन राहिलेले अगदी जवळचे आप्त वा फार जुन्या कौटुंबिक ऋणानुबंधाचे लोकच एकमेकांना देत. आजचे लोक जेव्हा लग्न-मुंजीला जाताना स्टेनलेस्च्या वाट्या, प्लॅस्टिकच्या बादल्या, प्रवासी बॅगा, चहाचे ट्रे यांसारखे जिन्नस खरेदी करतात तेव्हा, त्यांना मानाच्या देणगीचं रूप न राहता, संसारोपयोगी वस्तू घेऊन देण्याचं म्हणजेच संसाराला हातभार लावण्याचं रूप येतं! जिथे उपयुक्ततेची दृष्टी आली तिथे सौंदर्याची आणि भावनेची दृष्टी संपुष्टात आली असंच म्हणावं लागेल. शिवाय जुन्या आहेरांत लगेच 'परत-आहेर' गृहीत धरलेला असे. आजच्या संसारोपयोगी देणग्यांना तेही रूप नाही. लग्नाच्या प्रत्येक मोसमात, पुण्यासारख्या खास लग्नाच्या बाजारपेठेत एकेक सामान्य स्थितीतले कुटुंब आहेराकरिता कितीदा बाजारात जातं, तेही विचार करण्यासारखं आहे. सारांश, ज्यांत प्रमाणही नाही, औचित्यही नाही अन् शोभिवंतपणाही नाही, त्या आगंतुक आणि खर्चिक चाली निदान नव्याने आणण्याचा वेडेपणा तरी नको!

दरवेळेला बाजार अन् दरवेळेला निवड नको म्हणून काही लोक रोख पैसेही वधू-वरांच्या हातावर ठेवतात. वधू-वरांच्या नोकरीच्या ठिकाणी दर लग्नागणिक वर्गणीच्या याद्या निघून ती पगारातून कापली जाते. पण या सर्व नव्या रिवाजांत, 'मानपान' व 'अगत्य' यांपेक्षा, 'अलावन्स्', 'कट्' 'पर्सेन्टेज्' या निर्जीव सरकारी शब्दांचा वास येऊ लागतो वा त्यातील 'ग्रेस' निघून जाते! त्यातच आणखी वाढदिवस आणि लग्नाच्या जुबिल्या या नव्या विधींची भर पडत आहे!

यात थोडा अतिरेक होत आहे, त्यातलं जिव्हाळ्याचं सौंदर्य निघून जात आहे, हे जर खरं असेल तर, त्यांत सुधारणा करणं 'देणारा'च्या हाती नसून 'घेणारां'च्या हाती आहे. रिसेप्शनच्या मांडवातले आहेर आणि 'पार्ट्या' (खाणंपिणं ) बंद करून त्यांना स्थान केवळ कौटुंबिक विधींतच ठेवलं पाहिजे. तरच याचं आजचं स्वरूप नाहीसं होईल!

केसरी, 'सहज संवाद',
८ जून १९६९, पृ. ८ व १०.

अनुक्रमणिका

## आपल्याकडील विवाहाची आर्थिक बाजू

यासंबंधात एक वाचक महाशय लिहितात :

सरकारने कायदा केला, परंतु ही चाल (वरदक्षिणेची) दिवसेंदिवस इतकी वाढत आहे की, काही घरे कायमची बरबाद होतात', असं म्हणून या पत्रलेखकाने वरपक्षाच्या अपेक्षांचे आकडे व याद्या दिल्या आहेत. (रु.१५,००० + ॲम्बॅसेडर + फ्लॅट + परदेशखर्च, इत्यादी, इत्यादी.) पत्रलेखकाने या सर्व अपेक्षांचं मूळ 'वरदक्षिणेची वा हुंड्याची चाल', असं धरून त्याविरुद्ध प्रचारात्मक लेखाची अपेक्षा केली आहे. माझा 'संवाद' अर्थातच प्रचाराकरिता नसून या रोगाचं गुंतागुंतीचं स्वरूप सागंण्याकरिता आहे. कारण प्रचारापासून कायद्यापर्यंत सर्व झाल्यावरही तो कायम आहे. नव्हे, वाढला आहे. अर्थात् त्याचं मूळ केवळ रूढीत नसून परिस्थितीत आणि मनोरचनेत आहे.

पहिली गोष्ट म्हणजे वरदक्षिणेचे मूळ केवळ वराच्या वा वरपित्याच्या द्रव्य-लोभात आहे असे नव्हे. वधूपित्याच्या अपत्यप्रेमातही त्याचे मूळ आहे. लग्नाच्या बाजारातील मागणी आणि किंमत यांच्या परस्परसंबंधातही ते आहे, प्रतिष्ठेच्या कल्पनांतही आहे. मध्यम वधूला स्थळ मिळवून देण्याची प्रेमळ इच्छा धरणारा वधूपिता 'वर्णा'तील वैगुण्य सुवर्णाने भरून काढण्याची लालूच कधी कधी स्वतः होऊनच दाखवितो! अर्थात् अशा मामल्यात कोणत्याच पक्षाला दोष देता येत नाही. कोणत्याही मार्गाने मुलीचे भले करण्यात दोष कोणता? वधूसह चालून येणारे द्रव्य वा सुवर्ण, दोन्ही हातांनी स्वीकारणाऱ्या वराला 'पसेकाढू' तरी कसं म्हणता येणार?

'विवाह म्हणजे दोन जीव एकत्र येणे' ही कल्पना आजच्या प्रौढविवाहाच्या काळाला जितकी लागू आहे तितकी जुन्या काळाला लागू नव्हती. त्या काळात दोन 'जीव' एकत्र येत नसत, तर एका जिवाचे त्याचे आईबाप सुचेल त्या मार्गांनी कल्याण करीत असत. त्या काळात 'मुलगा' पाहात नसत, तर 'घर' पाहात असत. मुलगी पाहात नसत, तर घराणे पाहात असत. 'मुलगा पुढे शिकेल नाही तर न शिकेल, मुलीला जन्मभर भाजीभाकरीला तर दादत नाही' अशी भाषा असे. म्हणजे दोन 'घरं' एकमेकांची 'इस्टेट' पाहून 'संबंध' (alliance) जोडीत. वधूपित्याच्या 'गबर' पणाचा पुढेमागे आपल्याला अप्रत्यक्ष उपयोग होईल, ही दृष्टी आजही अजिबात नाही असे नव्हे. आजच्या मुंबईतल्या वराने मुलीबरोबर राहायाला फ्लॅट देऊ शकणाऱ्या बापाच्या मागणीला अग्रक्रम दिला तर, त्याचं कराण 'दुष्ट रूढी', 'द्रव्यलोभ' यांतलं काही नसून, निव्वळ जीवनार्थ कलह हे आहे. विवाहाने जशी घरात एका माणसाची भर पडते तशी थोड्याफार इस्टेटीचीही भर पडावी अशीही अपेक्षा असते. निदान तसा मोका दिसल्यावर तोही लोभ सुटतो.

आणखीही एक कारण हे दुष्ट वर्तुळ कायम ठेवण्याला पुरेसे ठरते. आम्ही आमच्या दोघा मिळवत्या पदवीधर मुलांच्या लग्नांत तत्त्वनिष्ठ निर्लोभीपणा दाखवला तर, आमच्या तीन मुलींच्या लग्नांत आम्हांला पुन्हा 'दाही त्रिक तीस' हजार खर्चावे लागणारच आहेत. ते कुठून आणायचे? त्यापेक्षा एक डॉक्टर, एक एंजिनियर

अशा दोघा मुलांच्या लग्नांत दहा-पंधरा हजार मिळाले तर ते का सोडा हाही विचार तत्त्वनिष्ठेपेक्षा प्रभावी ठरतो.

पुण्यासारख्या शहरांत लग्न-समारंभाचा खर्चही भरमसाठ वाढला आहे. हुंड्यापेक्षाही या खर्चात बचत झाली तर हवी आहे. नाट्यप्रयोगाकरिता थिएटर भाड्याने मिळवणे जितके जिकिरीचे अन् खर्चाचे, तितकेच आज मंगल कार्यालय मिळवणे जिकिरीचे होऊन बसले आहे. शिवाय तो 'स्वागत-समारंभ' —की ज्यातला बराचसा खर्च धड 'ना मला ना तुला' अशा जातीचाच असतो! पानसुपारी, अत्तरगुलाब, 'गोटे' अन् अलीकडे जेवणावळी कमी झाल्यापासून 'ॲट्होम' रूपी नैवेद्यसमर्पण! 'नैवेद्य' म्हणायचं कारण, त्यात खाण्याकडे लक्ष पाहुण्याचंही नसतं की यजमानाचंही नसतं! शेकडो पाहुणे बोलावल्यावर अन् '५ ते ८' हा मोघम काल ठरविल्यावर ते खातात की न खाता जातात हे बघायलाही बिचाऱ्या वधूपित्याला फूरसत नसते. या निष्काम निरर्थक खर्चाच्या पर्वणीतून पाहुणेही सुटत नसतात. जातजाता स्टेनलेसच्या नाही तर प्लॅस्टिकच्या दुकानातून ते आहेर घेऊन पुढे जातात. काही दिवसांनी मंगल कार्यालयाच्याच एका पाख्यात 'प्रेझेंट्स'चे दुकान कार्यालयवालेच थाटतील अशी मला खात्री आहे. या सर्व देखाव्यात वराच्याही पदरात काही पडत नाही, वधूच्याही पदरात पडत नाही, की पाहुण्यांच्याही पोटात काही जात नाही. पण चार-दोन दुकानदार, कंत्राटदार मात्र लग्नसराईत फायदा मिळवतात. त्या मानाने हुंड्याचा खर्चही कमी अकारण म्हणावा लागेल.

माझ्या म्हणण्याचा अर्थ समारंभ नको असा नव्हे. समारंभाने विवाहविधीचं गांभीर्य वाढतं. शेकडो इष्टमित्र, प्रतिष्ठित पाहुणे यांच्या साक्षीने स्वीकारलेल्या वधूबरोबर गुण्यागोविंदाने नांदण्याची जबाबदारी नकळत वाढते. दोन साक्षीदार आणि एक रजिस्ट्रार यांच्यापुढे झालेल्या लग्नाच्या मानाने समारंभाने झालेल्या लग्नाने वधू-वरांची लोकलज्ज्ञा अधिक वाढावी, ही अपेक्षा असते. कारण अखेर माणूस स्खलनशील आहे. चुकीला पात्र आहे. समाजाच्या उंच अपेक्षांमुळे त्याच्या सौजन्याची व संयमाची उंची वाढेल अशी अपेक्षा असते. मंगलवाद्यं, मंगलाष्टकं, अभिनंदनं, प्रतिष्ठित पाहुण्यांची उपस्थिती यांचा उद्देश हाच असतो. पण समारंभ हा नेहमी व्यर्थ खर्चानेच शोभतो असे नव्हे! माणसं शुद्ध अभिनंदनाकरिताही येतात. एकमेकांच्या गाठीभेटी अशा मंगल वातावरणात व्हाव्या म्हणूनही येतात. आइस्क्रीम, गोल्डस्पॉट आणि विड्याची पानं (जी वाटेतच फेकून दिली जातात! ) यांच्याकरिता येत नाहीत. स्वागताचा खर्च नाममात्र (symbolic) केला तर, त्यात वैगुण्य न येता बचत होईल.

वरदक्षिणेचा लोभ वाटण्याची मी आर्थिक कारणं सांगितली, याचा अर्थ त्याचं मी समर्थन केलं असा नव्हे. विशेषतः दोन गोष्टींचं समर्थन कुणीच करू शकणार नाही. वधू पसंत असल्यावर वरदक्षिणेचा जो लिलाव चढविला जातो, तो हास्यास्पद आहे. त्यामुळे प्रौढ वधू-वरांना तर विवाहसंस्थेबद्दल तिरस्कारच वाटू लागतो. वरदक्षिणा देणं-घेणं वेगळं, अन् तिचा लिलाव पुकारणं वेगळं! वर्षाची लाख-सव्वालाखाची मिळकत असणारा वरपिता हुंड्याचा आकडा पंधरा हजारांवरून वीस हजारांवर नेण्याचा अट्टहास का करतो? तो त्याच्या 'प्रेस्टिज्'चा-इभ्रतीचा प्रश्न असतो, म्हणजे आजचा समाज तसं समजतो! मनुष्य 'इलेक्शन्'ला उभा राहिला म्हणजे जशी त्याची संपूर्ण सामाजिक पत वा किंमत पणाला लागते, तशी तो आपल्या मुलाचं लग्न ठरवितो तेव्हा त्याची 'total valuation' होते, अशी आपल्या समाजात एक अलिखित समजूत दिसते! राष्ट्राराष्ट्रांतही आंतरराष्ट्रीय कराराची बोलणी चालू असता, वरून शस्त्रसंन्यास, युद्धबंदी, जागतिक शांतता यांच्या गोष्टी चालल्या असल्या तरी शब्द बाहेर पडत असतात ते शस्त्रबळाच्या जोरावरच पडत असतात. विवाहाच्या

'निगोशिएशन्स्'ची स्थिती तशीच आहे. बाहेरून भाषा कुलशील, निर्लोभीपणा, 'जन्माचे संबंध' यांसारखी सोज्ज्वळ असली तरी त्याच्यामागे बळ असते ते पैशाचे असते.

पण आज आपल्या समाजात 'प्रीतिविवाह', वधू-वरांनी स्वतः ठरवलेले स्वयंवर विवाह हेही जारी आहेत. असं असून माझ्या या पत्रलेखकासारख्या वधू-पित्यांना हुंड्याचं अग्निकुंड धगधगताना का दिसावं? म्हणून तर मी म्हणतो की, या चालीचं मूळ जीर्ण रूढीत नसून जिवंत धनलोभात अन् प्रच्छन्न प्रतिष्ठा-कल्पनेत आहे. आजकाल 'मालती' आपल्या आईला किंवा 'माधव' आपल्या बापाला चोरट्या आवाजात आपला 'स्वयंनिर्णय' सांगतो. पण त्याबरोबर तो बापालाही 'स्वयंनिर्णय' देऊन टाकतो! लढाईपुरतं काम सेनापतीचं, तर तहाच्या अटी ठरवण्याचं काम मुत्सद्द्यांचं. हाच न्याय विवाहाला लागू आहे. प्रेमाचा झगडा वर्ष दोन वर्ष खेळून अखेर विवाहाचा निर्णय दोघांनी ठरवला की, त्यांचे आईबाप तो निर्णय स्वीकारण्याइतपतच आज सुधारलेले आहेत. पुढे माधवचा बाप म्हणतो, "लग्न तुझं तू ठरवलंस, ठीक आहे. आपण कऱ्हाडे, मुलगी कोकणस्थाची, त्यालाही हरकत नाही. पण पैशाअडक्याचं आमच्यावर सोपव! आम्ही तुझं थोडं मान्य केलं, आता तू आमचं थोडं मान्य कर. पैशाचं आणखी नुकसान कशाला करतोस? तुझ्या एंजिनियरींगला खर्च किती झाला माहिती आहे ना? शिवाय, वसंता उद्या मेडीकलला जाणार! बेबीला स्थळ आपल्या तोलाचं पाहायचं म्हणजे खर्च किती येईल ठाऊक आहे ना?...

समंजस माधव आपलं पुरोगामित्व 'प्रेमविवाह', 'पोटजातीबाहेर विवाह' एवढ्यावरच थोपवून धरतो. हुंड्याच्या बाबतीत वडिलांना मतस्वातंत्र्य देतो. मालतीचे वडील आपल्याला न विचारता ठरवलेलं लग्न म्हणून पैशाची मूठ आवळून धरू पाहतात अन् मग सुशिक्षित स्वयंवरक्षम मालती, हुंड्याचा आकडा माधवच्या वडिलांच्या तोलाचा करण्याकरिता वकिली करते! म्हणजे प्रौढविवाह, प्रीतिविवाह, स्वयंवरविवाह रूढ झाल्यावर हुंडा नष्ट होईल ही आशाही नष्ट होते. हुंड्यामुळे लग्न मोडायलाही वधूपित्याला स्वातंत्र्य उरत नाही. कारण मालतीची आई म्हणते, 'पोरीचा जीव गुंतालाय, तिच्या जिवापेक्षा चार दोन हजार का जास्त आहेत?"

अशी आहे 'हुंड्या'ची 'सायकॉलॉजी'. शिवाय, मुलींचे बाप हुंड्याच्या चालीबद्दल तक्रार करण्याइतपतच पुरोगामी असतात. मुलीच्या अंगावर तिच्या थोरल्या जावेपेक्षा दोन जिन्नस कमी घातले तर, दुर्लक्ष करण्याइतके उदारमतवादी नसतात! अशा आमच्या समाजात गडकऱ्यांनी कवितेत टाकलेली समस्या आजही खरी आहे.

मी माझ्या पत्रलेखकाची तळमळ ओळखतो. विशेषतः ते जेव्हा लिहितात की, "सुदैवाने मला एकच मुलगी आहे. वेळ आली तर ८-१० हजार खर्चही करीन. मी स्वतः माझ्या लग्नात चुकून घेतलेला हुंडा परत केलेला आहे." तेव्हा त्यांची तळमळ शुद्ध सामाजिक आहे हे उघड आहे. पण समाज केवळ आरोपींचाही बनलेला नाही की केवळ फिर्यादींचाही बनलेला नाही. किंबहुना जो आजचा फिर्यादी तो उद्याचा आरोपी असू शकतो!

अशा समाजाची कीव करावी की त्याला शिक्षा करावी हा एक प्रश्नच आहे!

केसरी, 'सहज संवाद',
७ डिसेंबर १९६९, पृ. ८.

अनुक्रमणिका

## आर्य वैश्य समाजाने दाखविलेले सामूहिक विवाहाचे धैर्य

काही आठवड्यांपूर्वी पुण्याच्या 'तेजस्वी' साप्ताहिकात पुसद येथील एका अद्‌भुत घटनेची हकीगत प्रसिद्ध झाली होती. 'कोमटी समाज' या नावाने सामान्य लोकांस माहीत असलेल्या 'आर्य वैश्य' व्यापारी समाजाने, एक अद्‌भुत मार्गाने आपल्या समाजातील विवाहाची समस्या सोडविली. त्यांनी एखाद्या सामाजिक परिषदेसारखे वधू-वरांचे व वधू-वरपित्यांचे एक प्रचंड संमेलन भरवून त्या संमेलनाच्या मंडपात जणू एक प्रचंड स्वयंवरमालिकाच भरविली होती! इतर परिषदांप्रमाणे या संमेलनात कित्येक ठराव तर झालेच, पण शिवाय इतर परिषदांत कधी न होणारी गोष्ट म्हणजे या मंडपात प्रत्यक्ष लग्नेही लागली व आणखी काही लग्ने ठरली!

वास्तविक ही एक घटनादेखील हिंदूंच्या काय, पण इतरांच्याही इतिहासात अपूर्व ठरण्यासारखी आहे. शिक्षणात व सुधारणेत पुढे असण्याचा गर्व वाहणारे ब्राम्हणादी वर्गही जे सामाजिक धैर्य व इच्छाबल दाखवू शकणार नाहीत, ते पुसद येथे आपल्या कोमटी समाजाने दाखविले. भर सभेत त्या समाजातील वधू-वर व्यासपीठावर येऊन आपली ओळख करून देत व विवाहाची तयारी जाहीर करीत. विवाह-समारंभातही या समाजाने सामूहिक निश्चयाने ज्या सुधारणा करून दाखविल्या, त्या करून दाखविण्याचा आमचा ब्राम्हणवर्ग गेली शंभर वर्षे नुसत्या प्रतिज्ञा करीत आहे! यातील कोणत्याही लग्नाला दोन-अडीचशे रुपयांहून अधिक खर्च लागला नाही व त्यातील काही भाग समाजाने सामूहिक रीतीने उचलला. एका दिवसात ठरलेल्या पस्तीस विवाहांतील पस्तीस जोडप्यांची एकत्र वरात पाहण्याला ते संबंध गावच्या गाव रात्री दाराबाहेर उभे होते.

आज पुढारलेल्या वर्गात 'विवाह' ही केवळ समस्याच नव्हे, तर डोकेदुखी होऊन बसली आहे. कुरूप वधूपासून सुस्वरुप वधूपर्यंत आणि निर्धन वधूपित्यापासून ते लक्षाधीश वधूपित्यापर्यंत सर्वांनाच, 'मुलीचे लग्न' म्हटले की डोके पिकण्याची वेळ येत आहे. इकडे हुंडाबंदीचे कायदे होतच आहेत, तर तिकडे सामान्य कुटुंबातील लग्नखर्च गेल्या पंचवीस वर्षांत तीन हजारांवरून पंधरा हजारांवर जाऊन पोहोचला आहे. वधूपित्याची ऐपत असो अगर नसो, मुलीचे लग्न म्हटले की दहा हजारांहून अधिक रक्कम वधूपित्याला बाजूला काढून ठेवावी लागत आहे.

आणि अडचण फक्त खर्चाचीच असते असे नव्हे. वधू-वरांच्या पसंतीतही सुशिक्षित वर्गातील तऱ्हेवाईकपणा दिवसेंदिवस वाढत आहे. माझ्या तर असे मनात येते की, कोमटी समाजातील ज्या चतुर आणि पुरोगामी महाभागाने वैवाहिक सुधारणेत ही धडाडी दाखविली त्याला आता ब्राम्हण समाजानेदेखील विवाहसमस्येपुरते आपले नेतृत्व द्यावे, कारण 'सुधारलेला' म्हणविणाऱ्या ब्राम्हणवर्गात विवाहसंबंधीच्या कल्पना आज अधिकाधिक बाजारी बनत आहेत. विवाह म्हणजे नडलेल्या पक्षाला लुटण्याची संधी ही कल्पना शिक्षणाच्या वाढीबरोबर वाढीलाच लागली आहे.

पण आजच्या विवाहातील अपव्ययासंबंधी एकदोन चुकीचे समज दुरुस्त करणे जरूर आहे. हुंडारूपी 'जिझिया कर' वरपक्षरूपी सुलतानाने बसविला आहे ही पहिली चुकीची कल्पना होय, हे मी अनेकदा माझ्या

लेखांतून सांगितले आहे. आपली सामान्य मुलगी योग्यतेपेक्षा अधिक चांगल्या घरात पडावी म्हणून पैसेवाल्या वधूपित्यांनी सुरू केलेली ती 'लाच' आहे! कोणत्याही गैरवाजवी रिवाजामुळे समाजवर्तनाचा तोल बिघडणे अपरिहार्य असते. वधूपित्यांनी चालू केलेल्या या 'करप्शन' मुळे विवाहात कुलापेक्षा आणि रूपापेक्षाही पैशाच्या थैलीला अधिक महत्त्व आहे. दुसरी चुकीची कल्पना म्हणजे हुंड्यानेच काय ते विवाहांना फाजील खर्चिक रूप आले आहे. वराला 'हुंडा' (किंवा आजच्या चोरट्या पद्धतीप्रमाणे म्हणजे मुलीच्या अंगावर माहेरचे सोने!) जर पाच हजार रुपये जात असेल तर निष्फळ 'रिसेप्शन', जेवणावळी आणि मानपान यांत दहा हजार रुपये जातात. त्या दहा हजारतलेही साडेनऊ हजार अकारण होत, हे आमच्या आधी पुरोगामी झालेल्या कोमटी समाजाने दाखवून दिले आहे.

पण कोमटी समाजाने शिक्षणाचा सुधारणेचा गर्व वाहणाऱ्या आम्हा पुढारलेल्या जातींना आणखी एक गोष्ट शिकवली आहे. हिंदू समाजरूपी प्रचंड प्रसादात सुधारकांना प्रवेश हवा असेल तर, आगरकरी साम्यवादाच्या आकाशातून मिळणारा नसून अठरापगड जातींच्या चौकीपाहाऱ्यांतून आणि चौकाचौकांतून मिळणारच आहे. कोमटी समाजाच्या याच समंजस आणि निश्चयी पुढाऱ्यांनी 'हिंदू समाज!' या अवाढव्य नावाने आक्रोश केला असता तर, ते अरुण्यरुदन वर्तमानपत्रांतच विरून गेले असते. पण ही व्यापारी जात इंग्रजी शिक्षणात थोडी मागासलेली, म्हणूनच व्यवहारात पुढारलेली आहे. तिने वर्तमानपत्री सुधारणेच्या मागे न लागता व हिंदू समाजरूपी गगनाला गवसणी न घालता, आपली 'जातगंगा' गोळा केली आणि प्रत्यक्ष सुधारणा पदरात पाडून घेतली. चार पिढ्यांपूर्वीचे सुधारक जर या कोमटी पुढाऱ्यांसारखे व्यवहारी असते तर, यांनी वेगळ्या जातींचे पुढारी गोळा करून त्यांच्याद्वारे प्रत्येक जातीची सुधारणा साधली असती. पण लेख आणि भाषणे यांच्याखेरीज आमच्या सुधारकांना माध्यम माहीत नव्हते! ते माध्यम संपूर्ण हिंदू समाजाला तर पोहोचणे शक्य नव्हते, अन् वेगवेगळ्या जातींचे अस्तित्व तर या 'हवेतील सुधारकां'ना मान्यच नव्हते. अखेर त्यांचे आवाहन सकाळच्या चहाबरोबरच विसरून जाणाऱ्या इंग्रजी शिक्षितांच्याच काय ते कानी पडे आणि वृत्तपत्रांच्या रकान्यांतच विरून जाई!

इंग्रज अंमलातील इंग्रजीशिक्षित ब्राह्मण हे अखिल हिंदू समाजाचे पुढारी होऊ शकतील, हा सुधारकांचा पहिला भ्रम होय. जाती मोडणे म्हणजे जाती नाहीतच असे समजून चालणे असे मानणे ही दुसरी चुकीची समजूत होय. या देशात शेकडो वर्षे छपन्न जाती आहेत व त्यांतील प्रत्येक जात स्वतःला इतरांहून श्रेष्ठ समजत आहे. ही वस्तुस्थिती आमच्या सुधारकांनी आणि क्रांतिकारकांनी आजही लक्षात घेतलेली नाही. ती त्यांनी लक्षात घेतली असती तर, कोणतीही सामाजिक सुधारणा हाती घेण्यापूर्वी त्यांनी विविध जातींतील पुढाऱ्यांचा विचार केला असता.

ब्राह्मण व ब्राह्मणेतर ही काल्पनिक विभागणी (dichotomy) करण्याऱ्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीही 'हिंदू वास्तवते'कडे अशीच डोळेझाक केलेली आहे. हिंदूंच्या शेकडो जातींतील 'अब्राह्मणत्व' एवढेच साधर्म्य उचलून पुढे काय साधण्यासारखे होते? कारण ब्राह्मणांखेरीज उरलेल्या जाती फिरून ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्याइतक्याच एकमेकांपासून भिन्न होत्या, हिंदू समाज काळाबरोबर बदलणे जरूर आहे. तसेच ती जाणीव प्रत्येक जातीला आली पाहिजे व प्रत्येक जातीने प्रत्येक सामाजिक बदलाला वेगळी संमती दिली पाहिजे. ती न

घेतल्याने 'सुधारणा' म्हणजे इंग्रजीशिक्षित ब्राह्मणांनी शोधून काढलेली एक नवी 'चैन' (luxury) अशी समजूत झाली आणि ब्राह्मणांच्या वर्चस्वातून मुक्त होणे एवढी एकच सुधारणा इतर जातींना दिसू लागली.

मिल्, स्पेन्सर यांचे प्राचीन विचार हिंदू समाजाला पाजण्यापूर्वी तो समाज एक आहे की 'अनेक' आहे याची चौकशी व्हायला हवी होती. सुधारणारूपी जल ज्या मार्गांनी विराट हिंदू समाजात पसरावयाचे त्या मार्गांची ओळख करून न घेता, ते जल 'हिंदू समाज' नावाच्या काल्पनिक अस्तित्वावर ओतले गेले. यामुळेच पुस्तकी सुधारक आणि व्यवहारी (वास्तववादी) सुधारक असा भेद करणे मला अनेकदा आवश्यक वाटते.

आजच्या कोमटी समाजाचे नेते वास्तववादी आहेत व कर्ते सुधारक आहेत, असे म्हटले पाहिजे. त्यांचे नुसते अभिनंदनच नव्हे, तर अनुकरणही ब्राह्मण, मराठा या आज प्रामुख्य पावलेल्या जातींनी करणे योग्य होईल! त्याखेरीज विवाहाला आलेले आजचे लिलावाचे स्वरूप नष्ट होणार नाही.

आर्य वैश्य, दिवाळी अंक,
१९७२, पृ. २१-२२.

**अनुक्रमणिका**

## आधुनिक लग्नसमारंभातील अराजक

जे सामाजिक बदल समाजसुधारकांच्या आक्रोशाने घडवून येत नाहीत ते पुष्कळदा केवळ आधुनिक राहाणीने आणि जागेच्या टंचाईने घडून येतात. आपल्या जुन्या सामाजिक कल्पनांत शिवाशिवीचे जे प्रस्थ होते ते शिक्षणाने किंवा आगरकरांसारख्यांच्या सडेतोड लेखांनी कमी झालेले नसून, रेल्वेतील प्रवास आणि शहारांतील हॉटेले यांनी घडवून आणलेले आहे. आपल्या विवाहकल्पनांत आणि विवाहसमारंभांत गेल्या तीस वर्षांत आश्चर्यकारक बदल झालेले आहेत. पण यांचेही श्रेय तत्त्वनिष्ठ सुधारकांपेक्षा तत्त्वनिरपेक्ष शहरी राहणीकडे जाते असे दिसून येईल.

माझ्या मनात या क्षणी विवाहसंस्थांतील बदलांपेक्षा विवाहसमारंभांतील बदलच आहेत. आपले जुने विवाहसमारंभ पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या चालीरीतींनी आणि संकेतांनी किती बांधलेले होते, ते आजही खेड्यांत गेल्यास पाहायला सापडेल. पण खेड्यांत जायलाही नको. शहरे आणि खेडी हा भेद काही दृष्टींनी अर्थशून्य आहे. कारण पुण्यासारख्या शहरातच खेड्याचा भाग भरपूर आहे. एका घरात लग्न लावण्याकरिता सरकारी रजिस्ट्रार आलेला असेल, तर त्याच्याच मागील गल्लीतील घरात हळद लावणे, नवरानवरीला न्हाऊ घालणे, घोड्यावरून मिरवत नवरदेव नवरीच्या घरी वाजतगाजत जाणे, वगैरे प्रकार चाललेले दिसतील. पण 'आधुनिक लग्न' याचा अर्थ मी माझ्यापुरता शहरी सुशिक्षितांचे लग्न असा घेत आहे. सुशिक्षितांच्या लग्नांत अनेक बदल आणि अनेक प्रयोग झालेले दिसतील. त्यांतील काही टिकले, तर काही आपोआपच बंद पडले. नोंदणीविवाह हे अशा बंद पडलेल्या प्रकारांतच आता आता अंतर्भूत करावे लागतील. ज्यांचा वैदिक पद्धतीने विवाह होण्याला कोणतीच हरकत नाही असेही सुशिक्षित वधू-वर केवळ चूष किंवा 'शौक' म्हणून नोंदणी पद्धतीने विवाह करीत. आताही अधूनमधून नौदणी पद्धतीने विवाह होतात, पण केवळ एक नोंदणी सोडली तर अशाही लग्नांत मानपान, प्रयोजने, पंगतीत आग्रह, विहिणींना लुगडी घेणे, विहिणींचे रुसवेफुगणे वगैरे सर्व प्रकार यथासांग होतात.

पण असे अपवादात्मक प्रकार सोडले तरी, शहरी लग्नसमारंभ म्हणून आज एक स्थिर किंवा 'स्टॅबिलाइझ' झालेला दिसेल. या नव्या लग्नात आढळून येणारा पहिला बदल म्हणजे वधूपक्ष-वरपक्ष दोघे एका गावातले असूनही दोघांनी मिळून एक कार्यालय भाड्याने घेणे. पूर्वी दोहोंपैकी परगावाहून येणाऱ्या पक्षालाच काय ते लग्नापुरते घर किंवा जानवसघर घ्यावे लागे. आता उभयपक्षांना सामावून घेणारी मंगलकार्यालये निघाल्याने मोठीच सोय झालेली आहे. केवळ लग्नाच्या वऱ्हाड्यांचीच नव्हे, तर घरमालकांचीही त्यात मोठी सोय झालेली आहे. गेल्या दहा वर्षांत पुण्यातील मंगलकार्यालयांची संख्या निदान दुप्पट झाली असेल. पुण्यातील काही घरमालक तर कुटुंबाला जागा भाड्याने देण्यापेक्षा विद्यार्थ्यांना टर्म बेसिसवर जागा देणे अधिक पसंत करतात. आणि त्याहीपेक्षा मंगल कार्यालय बांधून लग्नाच्या सीझनमध्ये केवळ दीड दिवसांपुरती पाचपन्नास लग्नांना जागा भाड्याने देऊन चौपट उत्पन्न वसूल करणे घरमालक पसंत करतात.

या मंगल कार्यालयांनी शहरातील लग्नांची मोठीच सोय केलेली आहे. मंगल कार्यालयबरोबरच आणखीही काही रिवाज शहरी लग्नांत रूढ झालेले आहेत. किंबहुना केवळ चोवीस तासच मंगल कार्यालय ताब्यात असते, एवढ्याने शहरी लग्नांचे स्वरूपच पालटून गेले आहे. त्यात कल्पनातील आटोपशीरपणा आला आहे. पूर्वीची लग्ने आठआठ दिवस, निदान चार दिवस तरी चालत. व्याहीभोजनापासून ते मांडवपरतण्यापर्यंत तब्बल चार दिवसांचा कार्यक्रम असे. पण आजचे दिड दिवसांचे लग्न आटोपशीर झाले असूनही व जुन्या लग्नांतील अनेक अर्थशून्य प्रकार त्यातून गळाले असूनही, या नव्या लग्नसमारंभात कित्येक अर्थशून्य, सौंदर्यशून्य आणि खर्चिक प्रकार शिरत आहेत.

त्यांतील सर्वात हास्यांस्पद आणि उपद्रवकारक प्रकार म्हणजे आहेरांच्या आधुनिक पद्धतींचा होय. मी 'आधुनिक पद्धती' मुद्दामच म्हणत आहे. कारण पूर्वीही आहेर होते; पण पूर्वीचे आणि आजचे आहेर यांत मोठेच अंतर आहे. पूर्वी केवळ नात्यातील अथवा दृढ ऋणानुबंधातील लोकच काय ते आहेर करीत. आणि ते आहेरही बाजारातून जाऊन आणलेल्या नवलपूर्ण 'प्रेझेंटस्'च्या स्वरूपात नसत, तर पारंपरिक शुभ वस्त्रांच्या स्वरूपाचे असत. इतरांपेक्षा काही तरी वेगळे, 'नवलविशेष' देण्याची त्यात धडपड नसल्याने, दर आहेराच्या वेळी बाजारात जाण्याचे कारण नसे. बहुतेक घरात पूर्वीच आलेल्या आहेरांचे बासन बांधलेले असे. म्हणजे आप्तेष्टांतील लग्नांत आहेर करण्याच्या निमित्ताने खिशातील (किंवा उसनवारीतील) पैसे काढून बाजारात जाण्याचा प्रश्न नसे, तर केवळ बासन सोडण्याचा प्रश्न असे. म्हणजे पूर्वी आलेलेच आहेर फिरून दुसऱ्यांना देऊन भागत असे.

पण आजच्या आहेरांनी पूर्वीच्या या सांकेतिक, कौटुंबिक आहेरांचे स्वरूप टाकून वधू-वरांना दिलेल्या वैयक्तिक 'प्रेझेंटस्' चे रूप घेतले आहे. पूर्वीचे आहेर व्याह्यांना अथवा वधू-वरांच्या मातापितरांना असत. आताची 'प्रेझेंटस्' खुद्द वधू-वरांना असतात. म्हणजे कित्येकदा दोन्ही पक्षांचे आहेर वराच्याच घरी जातात. कारण वधू त्या प्रेझेंटस्सह वराच्या घरी जात असते. अर्थात् मी अशाही काही वधू पाहिल्या आहेत की, आहेरांचा हा एकांगीपणा टाळण्याकरिता त्या आपल्याला आलेली प्रेझेंटस् आवर्जून माहेरी ठेवून जातात.

पण आहेर आणि प्रेझेंटस् यातील भेद तूर्त बाजूला ठेवला तरी, आधुनिक प्रेझेंटस्च्या पद्धतीत शिरलेला एक अतिरेक उपेक्षिता येत नाही. आज केवळ नात्यातील वधू-वरांनाच नव्हेत, तर इतर वधू-वरांनाही प्रेझेंटस् देण्याची उपद्रवकारक आणि हास्यास्पद चाल पडत आहे. 'अ' ने प्रेझेंट दिले, म्हणजे 'ब' ला रिक्त हस्ताने जाणे कमीपणाचे वाटते व अशा प्रकारे आहेराचे 'प्रेझेंट' होते व प्रेझेंटला शेवटी नजराण्याचे स्वरूप येते. त्यातच 'रिसेप्शन'च्या रूपाने दरबार भरवून वधू-वरांना एक प्रकारच्या तख्तावर बसविण्यात येते. आलेल्या पाहुण्यांनी त्यांच्यापर्यंत जाऊन त्यांचे अभिनंदन (आशीर्वाद नव्हे) करण्याची पद्धत पडली असल्याने, साहजिकच रिकाम्या हाताने अभिनंदनरूप मुजरा करणे अवघड जाते. विवाहसमारंभ साजरा करणाऱ्या लोकांना या करभाराची अपेक्षा असते असे मी म्हणत नाही. कित्येक समंजस लोक 'आहेर आणू नये' अशी स्पष्ट सूचना निमंत्रणपत्रिकेत नमूद करतात. पण जेवणाऱ्याने नको म्हटल्यावर आणि ताटावर हात घेतल्यावर हात बाजूला सारून जिलेब्या वाढणे हे ज्या देशात अगत्याचे लक्षण मानले जाते, त्या देशात 'आहेर आणू नयेत' म्हटल्यावरही लोकांनी आहेर घेऊन जाणे हे साहजिकच आहे. इकडे समारंभ साजरा करणारे लोक 'आहेर

नको' म्हणत असतात, तर तिकडे पुण्यासारख्या ठिकाणी दर हंगामात सुमारे पन्नास लग्नांना जाणारे लोक यंदा आहेरांपोटी पाचशे रुपये गेले असे कुरकुरत असतात!

या आहेरात सांकेतिक शुभवस्त्रदानाची कल्पना जाऊन संसारोपयोगी वस्तू देण्याची कल्पना शिरली हे साहजिकच झाले. पण दहा पर्सेस, पंधरा स्टेनलेस स्टीलची भांडी, वीस पेपरवेटस् अशी प्रेझेंटस् येऊन पडली म्हणजे अंबाबाईच्या साडीचोळीचा जसा त्या पुजाऱ्यांना लिलाव करावा लागतो, तशी त्या बिचाऱ्या वधू-वरांवर वेळ येते. मला तर वाटते, पंढरपूरच्या विठोबाच्या देवळाबाहेर अबीर, बुक्का, फुलमाळा यांची जशी दुकाने लागलेली असतात तशी पुण्याच्या प्रत्येक मंगल कार्यालयाच्याच एका 'विंग्'मध्ये प्रेझेंटस्ची दुकाने लवकरच थाटली जातील!

यात आणखी एक व्यवहारिक अडचण आहे. पुष्कळ लग्नसमारंभांत प्रेझेंट स्वीकारण्याला वधू-वरांशेजारी कोणी जबाबदार माणूसही बसलेले नसते. कुणी तरी फाजील उत्साही बारचौदा वर्षांची पोरे ते आहेर गोळा करीत असतात-याद्या करण्याचाही प्रयत्न करतात. पण त्या बिचाऱ्या पोरांना आहेर करणाऱ्या व्यक्तींची नावे थोडीच माहीत असणार? आहेर करणारे लोक त्या लहान मुलांच्याच काय, पण नवऱ्यामुलाच्याही ओळखीचे नसतात, मुलीच्याही ओळखीचे नसतात. ती माणसे असतात वरपित्याच्या अथवा वधूपित्याच्या ओळखीची! आणि ते वधू-वरपिते तर कुणाच्या तरी स्वागतात मांडवाच्या दाराशी गुंतलेले असतात.

भरमसाट आहेरपद्धतीच्या मी विरुद्ध असलो तरी ती पद्धती अस्तित्वात आहे तोपर्यंत एक व्यावहारिक शिरस्ता पाडण्यासारखा आहे. काही विवाहांत तो शिरस्ता पाळलेला मी पाहिलाही आहे. आलेल्या आहेरांची, शुभेच्छापत्रांची व अभिनंदन-तारांची पोच देणे हा मला सुचवायचा असलेला शिरस्ता होय. त्या पोचपत्रांत आहेर म्हणून दिल्या गेलेल्या वस्तूचा वा रकमेचा निर्देश असावा. म्हणजे तो आहेर 'खुद्द' पर्यंत पोचला की नाही हे आहेर करणाऱ्यांना समजेल व आभार मानण्याचे कर्तव्य केल्याचा आनंद पत्र लिहिणाऱ्याला मिळेल. पण पहिली गोष्ट ती ही की, प्रत्यक्ष आप्त किंवा आप्तप्राय जवळचे लोक यांखेरीज कोणीही आहेर करणे बंद झाले पाहिजे. तसे करणे आपुलकीचे लक्षण नसून आगाऊपणाचे लक्षण होय असे सर्वांनी निःसंकोचपणे मानले पाहिजे. ते घडण्याला काही व्यावहारिक मार्ग सुचविता येतील.

आहेरांनाच केवळ नव्हे, तर विवाहसमारंभालाच आज बेपर्वाईचे आणि बाजारी देखाव्याचे रूप येण्याला कारण आजचे हें स्वागतसमारंभ आहेत. पानसुपारी काय की फराळ काय, की भोजन काय, सर्वांनी एकत्र बसून आनंद घेण्याचे हे समारंभ आहेत. त्यात कोणीही, केव्हाही येऊन पानसुपारी, चहा, आईस्क्रीम, बटाटेवडा घेऊन जावे, या सवलतीत येणाऱ्यांची थोडीफार सोय असली तरी, आज या सोयीमुळे स्वागतसमारंभाचे स्वरूप किती अव्यवस्थित आणि बाजारी झाले आहे ते पाहिले म्हणजे खेद होतो. शिवाय, लग्नाच्या वेळच्या पानसुपारीव्यतिरिक्त पुनः हे अवाढव्य स्वागतसमारंभ करणे जरूर आहे की काय हाही एक प्रश्नच आहे. अगत्याचे, घरोब्याचे इष्टमित्र प्रत्यक्ष भोजनाला बोलवण्यात आनंद आहे हे कोणीही मान्य करील, पण आज जेवढ्या मोठया संख्येने लोक स्वागतसमारंभाला बोलावले जातात, तेवढ्या मोठ्या समुदायाला छोटा का होईना, फराळ देणे कित्येक लोकांना परवडतही नसेल. लग्नाच्या याद्या करताना स्वागतसमारंभाचा

खर्च एकट्या वधूपक्षाने करायचा की ज्याचा त्याने करायचा यावर कटू वादविवाद झालेले मी पाहिले आहेत. बिचारा वधूपक्ष गरजू असल्याने तो खर्च सोसतो म्हणून भरमसाट निमंत्रणे जातात की काय अशीही मला कधीकधी शंका येते. पण खर्च कोणीही करो, जवळच्या मंडळींच्या प्रयोजनाचा खर्च केल्यानंतर दूरच्या संबंधाच्या शेकडो लोकांच्या फराळाचा खर्च पुन्हा करणे आवश्यक आहे काय, हा एक प्रश्नच आहे. लोक येतात, ते वधू कशी आहे, वर कसा आहे हे पाहण्याकरिता व आनंदात सहभागी होण्याकरिता येतात. बटाटेवडे, सामोसे, आईस्क्रीम खाण्याकरिता, गोल्डस्पॉट पिण्याकरिता येतात असे मला वाटत नाही. पोरासोरांची गोष्ट सोडली तर, येणाऱ्या पाहुण्यांपैकी शेकडा नव्वद प्रौढ व वयस्क मंडळींना बहुधा टेबलावर मांडलेल्या पदार्थांपैकी निम्मे तरी वर्ज्य असतात. कुणाला डायबेटीस, कुणाला अल्सर, कुणाला संधिवात, कुणाला पाईल्स असे जरा कान दिल्यास ऐकू येते. परिणाम म्हणजे मांडलेल्या प्लेटस्मधील तीनचतुर्थांश फराळ वाया जातो. माझी कल्पना अशी आहे की, लग्नातील दोन प्रयोजनांना जेवढा खर्च होतो त्यापेक्षाही अधिक खर्च एका स्वागतसमारंभाला होतो आणि खुर्चीवर किंवा पाटावर बसून स्वस्थपणाने पिढीजात 'मेन्यू' चे षड्रससंपन्न जेवण जेवण्यात जो आनंद आहे तो, उभ्या केलेल्या चार बाजाराच्या जिनसांच्या फराळात नाही. उभ्याने खाणे हे तर आपल्या संस्कृतीत असंस्कृतपणाचे नि आरोग्य विघातक मानले गेले आहे.

आजकालच्या स्वागतसमारंभांतील इतरही कित्येक गोष्टी औचित्याच्या व खर्चाच्या दृष्टीने तपासून घेण्यासारख्या आहेत. येणाऱ्या शेकडो लोकांना आपण विड्याची पाने देतो. जुन्या काळी बहुतेक लोक विडा खात. त्या आरामशीर काळात तिथेच बसून विडा खाऊन जाण्यास त्यांना वेळ असे. आज आपण लग्नाच्या वेळी किंवा स्वागताच्या वेळी जी पाने देतो त्यांचे पुढे काय होते, जी सुपारीची पुडी देतो तिचे काय होते, बाजारातील पुड्या आयत्या विकत घेण्यास किती व्यर्थ खर्च होतो, याचा कोणी हिशेब केल्यास त्याचे डोळे फिरून जातील. मी तर बहुधा ती पाने व ती सुपारी रिक्षावाल्यालाच देऊन टाकतो.

कित्येक स्वागतसमारंभांत बसण्याची, जाण्याची व येण्याची व्यवस्थाच अशी असते की, कुणाला काय मिळाले याचा पत्ताच लागत नाही व काही मिळाले की नाही याची चौकशी करणेही शक्य होत नाही. वधूपक्षाचा खर्च मात्र पूर्वीच्या लग्नाच्या दसपट होतो. याचा अर्थ मी समारंभाच्या विरुद्ध आहे असा मात्र नव्हे. पण आजच्या समारंभात समारंभाच्या मुख्य उद्देशच सफल होत नाही ही माझी तक्रार आहे. समारंभाचा मुख्य उद्देश आनंदाच्या प्रसंगी केवळ आनंद व्यक्त करण्याकरिता जाऊन परिचय व लोभ वाढविणे हा होय, असे मी समजतो. समारंभाचे काही गौण उद्देशही असतात व ते परिचयवर्धनाच्या प्रमुख उद्देशाच्या मानाने गौण असले तरी, मानवी स्वभावाला धरून असतात व क्षम्य मानवी आकांक्षा पुऱ्या करणापेही असतात. उदाहरणार्थ, आपली ऐपत आणि सुस्थिती आतिथ्याच्या प्रसंगाने इष्टमित्रांना दाखविणे हाही अशा समारंभाचा उद्देश असतो. पैकी परिचयवर्धनाचे जे मुख्य कार्य ते अशा समारंभात कितपत होते? मी माझाच अनुभव आणि रुखरुख सांगतो. जेव्हा मी वधूपक्षाकडील निमंत्रणावरून सहकुटुंब जातो तेव्हा, केवळ पानसुपारी, आईस्क्रीम, सामोसे यांवर माझे समाधान नसते. स्वतः 'वर' तर वधू शेजारी 'कर कटावरी ठेवूनिया' उभाच असतो. त्याचे दर्शन तर होतच असते. पण माझ्यासारख्याला वराच्या आईबापांचा परिचय व्हावा, निदान दर्शन व्हावे, अशी स्वाभाविक इच्छा असते. पण एकाही लग्नात वराच्या आईबापांचा परिचय करून देण्याची व्यवस्था नसते, नव्हे तसे करणे या प्रसंगी उचित आहे याची कोणाला कल्पनाही दिसून येत नाही. जणू हे केवळ वधूपक्षाचेच 'फंक्शन' आहे, असा त्या स्वागतसमारंभातील खाद्यप्रधान स्वागतावरून भास होतो. वरपक्षाच्या निमंत्रणावरून स्वागत

समारंभाला गेल्यावरही स्थिती तीच! आम्हांला निमंत्रण देणाऱ्या वरपित्याचे व्याही कोण, विहीण कोण याची आलेल्या लोकांना साहजिकच जिज्ञासा असते. पण एकंदर समारंभावरून असा भास होतो की, वराची वधू जणू एकटीच लग्नाला उपस्थित राहिली आहे! आणि आजच्या अव्यवस्थित, परंपराशून्य आणि उपऱ्या स्वागतसमारंभात यापेक्षा दुसरे काय होणार? पूर्वीच्या लग्नसमारंभात आप्तेष्टांचे मान परंपरेने बांधलेले असत. तसेच सीमांतपूजनाच्या निमित्ताने शिस्तबद्ध, दरबारी परिचय समारंभही असे. आपण नव्या युगात जो नवा स्वागतसमारंभ निर्माण केला आहे, त्यात सिनेमासदृश देखाव्याव्यतिरिक्त एकही अर्थपूर्ण रिवाज आपण निर्माण करू शकलेलो नाही. लोकांनी येऊन उभ्याउभ्या खाऊन जावे व स्टेजवर उभ्या केलेल्या अथवा बसविलेल्या वधू-वरांचे दर्शन घेऊन जावे (व अर्थात् नजराणा देऊन जावे) एवढेच आजच्या स्वागतसमारंभाचे स्वरूप आहे.

वधू-वरांना शोरूममध्ये बसविल्याप्रमाणे बसविल्याने ते पुष्कळदा या मंगल आणि गंभीर समारंभातील आपली भूमिका विसरलेले दिसतात. वधू-वरांची भूमिकाही आशीर्वाद आणि अभिनंदन स्वीकरण्याची असते, हे सांगायला नकोच. काही वधू-वरांना प्रसंगाची व कर्तव्याची जाणीव असते. आदरणीय आप्तेष्ट येताच ते आपल्या सिंहासनावरून खाली उतरून पादस्पर्शपूर्वक नमस्कारही करतात. पण कित्येक वधू-वर वडिलांनी आपणांसही पूज्य वाटणारे आप्त किंवा मित्र त्यांच्यापर्यंत आणून पोचविल्यावर जागचे हालतही नाहीत की साधा नमस्कारही करीत नाहीत. कधीकधी तर ते गप्पा मारताना आढळतात. कारण पूर्वीची फाजील लाजण्याची रूढी बंद होताच आता खोट्या सलगीचे प्रदर्शन सुरू झाले आहे! यात अनादराचा भाग असतो असे नव्हे, तर अशा प्रसंगी पाळावयाचे जुने शिष्टाचार तुटले आहेत आणि नवे निर्मिण्याइतपत आज आपल्याजवळ आस्थाही दिसत नाही की कल्पकताही दिसत नाही. शहरातील लग्नाला येणाऱ्या इष्टमित्रांची संख्या स्वाभाविकच मोठी असणार. त्यांचे योग्य आतिथ्य करायचे तर, पहिली गोष्ट म्हणजे मनुष्यबळ हवे, आणि तेही केवळ संख्याबळ असून उपयोगी नाही, तर पढविलेल्या (ट्रेन्ड) स्वयंसेवकांचे बळ हवे. ते सर्वांनाच लाभते असे नव्हे. आणि मग खर्चापायी खर्च होऊन आलेल्या पाहुण्यांची अनास्था झालेली पाहावी लागते. मला कधीकधी अशी शंका येते की, निमंत्रणपत्रिका यंत्रावर छापून घेता येत असल्याने आणि पोस्टाच्या पेटीत टाकल्या की, शेकडो लोकांना घरपोच होत असल्याने, निमंत्रणाचा आणि अगत्याचा संबंध तुटत चालला आहे. निमंत्रित लोकही आपण गेले पाहिजे असे मनात समजत नाहीत. निमंत्रितांपैकी न येणाऱ्यांची संख्या किती हे पाहिले म्हणजे द्रव्याच्या अपव्ययाची कल्पना येते. ही सर्व अव्यवस्था आणि हा अपव्यय टाळणे शक्य होईल अशी या समारंभाची नवीन रचना करणे जरूर आहे. तसेच खाणावळीतल्या मेंबरांप्रमाणे एकेकाने येऊन जावे, हा प्रकारही मोठासा शोभिवंत नाही. आणि त्याने आप्तेष्टांच्या संमेलनाचे (गेट टुगेदरचे) तर काम होत नाहीच. अपव्यय कमी आणि अगत्य जास्त असे दृश्य ज्यांत दिसेल असे लग्नसमारंभ योजण्याची व निर्मिण्याची आवश्यकता आहे. तूर्त तरी आपण रुखवताच्या पदार्थांचे प्रदर्शन मांडण्यापलीकडे एखादा नवा पायंडा पाडल्याचे दिसत नाही. आणि तेही पदार्थ बाजारात मिळतात म्हणे! सर्व निमंत्रीत मंडळी एकत्र बसून आतिथ्याचा स्वीकार करू शकत असतील तरच त्यांना बोलावण्याचे सामाजिक आणि भावनात्मक सार्थक होईल. सध्याच्या समारंभांनी ते होत नाही.

आणि लग्नातील खर्च हा तर स्वतंत्रच विषय आहे. त्यातील हुंड्याचा प्रकार क्षणभर दृष्टीआड केला, तरीही इतर अपव्यय कमी नाही. एकीकडून खर्च वाढत आहे. तर दुसरीकडून लग्नासमारंभांतील अगत्य आणि शोभिवंतपणा कमी होत आहे. जागेच्या अभावामुळे लग्नसमारंभ मंगल कार्यालयांच्या सोयीवर अवलंबून राहात आहेत. आपण अक्षतीच्या आणि वरातीच्या मिरवणुकीला फाटा दिला ही सुधारणा समजतो, परंतु

स्वागतसमारंभाच्या निमित्ताने भाऊगर्दी जमविणे मात्र अपरिहार्य समजतो. म्हणजे एका तऱ्हेचा डामडौल (शो) बंद करून दुसऱ्या तऱ्हेचा 'शो' आपण गळ्यात घेतला आहे व तोही आपल्या व्यवस्थापनशक्तीच्या आहाराबाहेर गेला आहे. आटोपशीर, पण अगत्ययुक्त विवाहसमारंभाची नव्याने आखणी करणे हे हुंड्याची रूढी बंद करण्याइतकेच आवश्यक झाले आहे.

पण हुंड्याची पद्धती तरी आम्ही कुठे दूर करू शकलो आहोत? ती जुनी घातुक रूढी बंद करू शकलो नसलो, म्हणून तितकीच दुसरी खर्चिक आणि अर्थशून्य रूढी नव्याने घातल्याचे पाप आपल्या पिढीच्या हातून व्हावे असे थोडेच आहे!

स्त्री मासिक,
ऑगस्ट १९७३, पृ. ४९-५५.

## ५२

# विवाह : बंधन की साधन?

असे म्हणतात की, विवाह हा एक 'माणसे पकडण्याचा सापळा आहे.' या सापळ्यात शिरण्याला दार सोयीस्कर आहे, पण बाहेर पडण्याला मात्र दार नाही. अंग खरचटल्याखेरीज बाहेर पडता येत नाही आणि कधीकधी बाहेर पडल्यावर सापळ्यात होतो तेच बरे होते, असेही वाटणे शक्य असते. पाश्चात्य देशांतील कित्येक वैचारिक लाटांमुळे असो की आधुनिक शिक्षणामुळे असो, माणसे अलीकडे विवाहरूपी दोरखंडाशी वैचारिक हिसकाहिसकी करू लागली आहेत. ही हिसकाहिसकी कितपत शहाणपणाची आहे, कितपत फलप्रद आहे, हे तरुण पिढीलात पोक्त पिढीनेच सांगायला हवे.

विवाहसंस्था म्हणजे नंदनवनाचे दार आहे असेही म्हणता येणार नाही, की तो एक नरकवास आहे असेही म्हणता येणार नाही. पण या दोन्ही प्रकारच्या अनुभवांचे क्षण विवाहित माणसांच्या वाट्याला अधूनमधून येतात, हे खोटे नाही. भटक्या आणि जंगली अवस्थेतून 'गृहस्थावस्थे'त येताना, माणसाला अपरिहार्यपणे विवाह-बंधनांचा आधार लागला आहे. अर्थात् 'विवाह' ही चिरंतनची चैन नसून चिरंतनची तडजोड आहे, देवाणघेवाण आहे. ती चिरंतनाची 'कोर्टशिप' (प्रेमाराधना) आहे, असेही म्हणतात. पण देवतेची प्राप्ती झाल्यानंतर आराधना चालू राहू शकत नाही. सहकार्याला प्रारंभ करावा लागतो! भागीदारीला प्रारंभ होतो! आणि व्यापाराची असो की संसाराची असो, भागीदारी म्हटली की भांडण तरी आले, नाही तर तडजोड तरी आली. मौज अशी आहे की, नवराबायकोंना एकमेकांकरता मोठा त्याग करणे अवघड जात नाही. पण बारीकसारीक गोष्टींत तडजोड करणे, दुसऱ्याच्या मताला मान देणे अवघड जाते!

मला वाटते, 'छापील संसार' या की अशाच कोणत्याशा नाटकात, आधुनिक प्रेमविवाहित जोडप्याने संसार मांडल्यावरचे पहिले भांडण, 'कॅलेंडर कुठे लावायचे' या समस्येवरून होते, असे दाखवले आहे. अशा किरकोळ गोष्टींत बहुदा स्त्रिया पडते घेतात. पण आजच्या, बरोबरीचे नाते सांगणाऱ्या स्त्रिया 'पडते घेतात' याचा अर्थ 'नवऱ्याच्या मताला मान देतात' असा नव्हे, -केवळ टक्कर नको म्हणून वेड्याला वाट देतात! दुसऱ्याच्या मताला मान देणे, 'त्याला किंवा तिलाही मत असणारच' याची जाणीव ठेवणे, ही साधी गोष्टच सर्वांत अवघड आहे असे दिसून येईल. राजकारणापासून कुटुंबकारणापर्यंत सर्वत्र या साध्या जाणिवेचाच दुष्काळ आढळतो. गांधीजींसारख्या महात्म्यानेही स्वमताच्या आग्रहामुळे पत्नीचा एक प्रकारचा छळ केला. यावरून दुसऱ्याच्या मताला मान देणे (नुसती वाट देणे नव्हे) किती अवघड आहे, हे दिसून येईल.

इतर कुठल्याही भागीदारीपेक्षा नवराबायकोंची भागीदारी अधिक सुखदायकही असते आणि तापदायकही असते. कारण त्यांना सर्वच गोष्टी आपसात विभागून घ्यायच्या असतात. दोघांचे 'बजेट' एकच, दोघांनी राहायचे एकाच घरात, झोपायचे एकाच बिछान्यात, दोघांची मुले तीच, जगापुढे दोघांनी तेच समान हास्य धारण करायचे! अशी ही भागीदारी एकंदरीत कितीही फायद्याची वा सुखाची ठरत असो, आजच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या युगात दुःसह वाटली तर नवल नाही!

विवाह जमवण्यापेक्षाही विवाहोत्तर 'नांदणे' ('सुखासमाधानाने राहाणे') अवघड आहे! पण याला म्हणजे विवाहाला आणि नांदण्याला पर्याय सांगणे मात्र सोपे नाही. किंबहुना विवाहाला पर्याय शोधणे अन् आहार, निद्रा यांना फाटा देऊन त्यांच्या जागी काही गोळ्या घेऊन भागते का पाहाणे, सारखेच मूर्खपणाचे आहे. आहार, निद्रा आणि मैथुन ही जुन्या संस्कृत सुभाषितकाराने एका ओळीत बसविली आहेत, ती उगीच नव्हे.

विवाहाच्या ऐवजी एखादी पर्यायव्यवस्था शोधावयाची, म्हणजे प्रथम आपण विवाहापासून कशाकशाची अपेक्षा करतो, 'विवाह' आपल्या कोणकोणत्या गरजा पुरवितो, हे पाहिले पाहिजे. 'मैथुन' ही त्यातली केवळ एक गोष्ट झाली. घर करून देणे हा दुसरा उपयोग. अपत्यप्राप्ती हा तिसरा उपयोग. एकटेपणाचा निरास करणे अथवा मधुर सहवास-सुख देणे हा चौथा उपयोग. सपत्नीकत्वाच्या द्वारे इतर सपत्नीक व्यक्तींच्या घरी स्वागतार्ह ठरणे हा पाचवा उपयोग! आणि एकंदरीतच, स्त्रीला पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वात आणि पुरुषाला स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वात प्रवेश मिळाल्याने मानवी जीवनाचे अधिक खोल ज्ञान होणे हा विवाहसंबंध केल्याने होणारा आणखी एक फायदा होय.

ज्या वेळी माणूस विवाहाविषयी वा स्त्रीविषयी वैतागून बोलतो तेव्हा, तो विवाहाचे हे सर्व फायदे लक्षात घेऊन बोलत नाही. कधी केवळ लैंगिक व्यवहारच ध्यानात घेतो, तर कधी जेवणाखाण्याची सोयच तेवढी जमेस धरतो. आणि मग, 'आम्हांला या दोन्ही सोयींशिवाय जगता येईल' असे म्हणतो. त्याच्याही पुढे जाऊन आजच्या नवनीतीच्या भाषेत तो म्हणतो, 'लैंगिक भूक भागवायला लग्नाच्या खोड्यातच अडकून पडायला हवं असं नाही. अन् जेवायला खाणावळींना तोटा नाही.'

एक बुद्धिमान् आणि अफाट वाचन केलेला, एकाहून अधिक लग्ने आणि अनेक स्त्री-संबंध केलेला मनुष्य केवळ विवाहावरच नव्हे, तर स्त्री-जातीवरच रागावलेला मी पाहिला. तो पाश्चात्य डॉन जुऑनची स्त्रीद्वेष्टी सुभाषिते तर मोठ्या आत्मीयतेने उद्धृत करीतच असे. पण चालू लैंगिक अराजकाला शोभतील असेही उद्‌गार त्याने एकदा काढले. 'स्त्रीजात इतकी नालायक आहे, की त्यापेक्षा पुरुषांना समसंभोगाचा अवलंब केलेला बरा!' बेफाट बोलून मर्दुमकी गाजविण्याच्या दृष्टीने हे उद्‌गार चालू जमान्याला शोभण्यासारखेच असले तरी, त्या उद्गारांत 'विवाह' आणि 'स्त्री' या वस्तूंचे आकलन मात्र बेताचेच दिसते.

विवाह ही स्वच्छेने पत्करलेली एक 'relationship' आहे. तिजमध्ये अंतर्भूत आणि सूचित अशा जबाबदाऱ्या न कळता ते नाते अंधपणे पत्करले तर, ड्रायव्हिंग न शिकता मोटार चालविण्यातलाच प्रकार व्हायचा! माणूस आपल्या अडाणीपणाचा राग आपल्या हातातील यंत्रावर काढतो. पण मानवी संस्कृतीने हजारो वर्षांत संवर्धित केलेली ही संस्था अडाणीपणाने हाताळू लागल्यास वैतागाखेरीज वाट्याला काय येणार? विवाह करणे म्हणजे आयते आणि घाऊक सुख खरेदी करणे खासच नव्हे. कोणत्याही अन्य भागीदारीपेक्षा स्त्रीपुरुषांची ही भागीदारी अधिक नाजूक आणि गुंतागुंतीची आहे. समाजाने हजारो वर्षांत निर्माण केलेले वैवाहिक जीवनाचे संकेतही समजदारपणे वापरणे आवश्यक असते. धीमेपणाने, सुबुद्धपणाने या प्राचीन संस्थेचा आधार आणि आस्वाद घेण्याऐवजी धसमुसळेपणा केल्यास, यंत्रात हात घालून तो तोडून घेणाऱ्या अडाणी माणसाचेच नशीब वाट्याला येणार. पण आजकाल माणसे मूर्खपणा करून आणि दुःखी होऊनच थांबत नाहीत. वैतागाचे आणि

कटुतेचे 'तत्त्वज्ञान' करायला ती शिकलेली असतात! ज्याला 'नवविचार' हे नाव देण्यात येते ते तत्त्वज्ञान त्यांना हे कटुतेचे तत्त्वज्ञान बनविण्याला मदत करते.

विवाहव्यवस्थेला ऐनजिनसी पर्याय नाही हे कबूल केल्यावरही, काही पुरुषांना व स्त्रियांनाही विवाहाशिवाय राहावे लागते हे विसरता येत नाही. पण विवाहसंस्थाच कुचकामाची आहे असे म्हणून अविवाहित राहाणे वेगळे आणि अन्य कारणांनी अविवाहित राहाणे वेगळे. अनिच्छेने अविवाहित राहिलेल्या अशा लोकांच्या जीवनात केवळ कामक्षुधा भागविण्याचाच प्रॉब्लेम नव्हे, इतरही प्रश्न निर्माण होतील. कित्येक सामाजिक सुखांना असा मनुष्य पारखा होईल. विशेषतः, विवाहाशिवाय राहाणे स्त्रियांना अधिक अवघड जाते. कारण घराबाहेरील व्यवहारांना म्हणजे foreign relations ना तोंड देण्याकरता व बाहेरच्या जगात सोयीस्कर ढाल म्हणून त्यांना पुरुषाची गरज असते. शिवाय स्त्रियांना बाकी कितीही सुखे असली तरी अपत्यप्रेमाखेरीज जीवन रुक्ष आणि भकास वाटते. या दृष्टीने स्त्रियांच्या जीवनात तरी विवाहाला दुसरा पर्याय नाही.

पाश्चात्य वैचारिक आणि सामाजिक जीवनातील अलीकडच्या काही विचित्र लाटांच्या आहारी जाऊन तथाकथित 'न्यू वेव्ह'वाली मंडळी, 'विवाहसंस्थेला सहज बगल देता येईल', 'स्त्री-पुरुष विवाहाखेरीज राहिल्यास सुखात घाऊक भर पडेल', असे केवळ शब्दशौर्याखातर प्रतिपादीत असतात! त्यांचा देव फ्रेंच लेखक सार्त्र व त्याची सखी लग्नाशिवायच राहू शकतात, हे पाहून या मंडळींना आणखीच अवसान चढते. पण विवाह न करता एकत्र राहण्यातील तोटे सार्त्र जोडप्याच्या जीवनावरूनच सहज सिद्ध करता येतात.

थोडक्यात म्हणजे एखाद्या राज्याच्या आणि कायद्याच्या कक्षेत राहण्याचे शंभर तोटे दाखवता येतील, पण म्हणून अराजकात राहाणे सुखाचे होईल असे नव्हे. विवाहसंस्थेतील दोष दाखवणे सोपे आहे, पण तिच्याऐवजी दुसरी व्यवस्था सुचवणे सोपे नाही आणि स्त्री-विमोचनाचा मार्ग म्हणून जेव्हा कोणी विवाहसंस्थेला फाटा द्यायला सुचवते तेव्हा, तर घर पाडून सोपा बांधणाऱ्या माणसाचीच मला आठवण येते!

स्त्री मासिक,
ऑगस्ट १९७३, पृ. ८-९ व ९५.

अनुक्रमणिका

# ५३

## आधुनिक स्वयंवरातील अडचणी

'स्वयंवर' म्हटलं की, आपल्या मनात बाळपणी ऐकलेल्या सीतास्वयंवराच्या नाही तर द्रौपदीस्वयंवराच्या आठवणी जागृत होतात. पण 'स्वयंवर' या शब्दात तोच अर्थ आहे असं नाही. मुलीनं 'स्वतः होऊन वरलेला वर' एवढाच त्याचा अर्थ आहे. उलट त्या पौराणिक स्वयंवरात मुलीची पसंती बिनशर्त नसे, हे मला तरी एक वैगुण्यच दिसते. कोवळ्या रामाला, रावणाला न पेलणारे ते शिवधनुष्य पेलेल की नाही, या चिंतेनं सीतेचा पिता राजा जनक चिंतातुर झाला होता. द्रौपदीच्या स्वयंवरातून तर द्रौपदीला कल्पनाही नाही असं एक लचांड उद्‌भवलं! कोणाही आर्य वा अनार्य वधूनं पत्करलं नसतं असं 'अनेकपतिकत्वा'चं लचांड तिला गळ्यात घ्यावं लागलं! म्हणजे या प्राचीन स्वयंवरात वधूच्या पसंतीबरोबरच अनेक फालतू अटींनाही स्थान होतं. आधुनिक काळात स्वयंवराचा अर्थ अधिक सरळ आणि शुद्ध घ्यायला हवा. 'वधूनं स्वतः पसंत केलेला वर' एवढाच!

या प्रकारच्या शुद्ध स्वयंवराला अनुकूल अशी सामाजिक पार्श्वभूमीही सुदैवानं आज तयार झाली आहे. 'अष्टवर्षा' वधू 'पसंती' ती काय करणार? आजच्या 'अष्टादशोत्तर' वधूच त्यादृष्टीने अधिक परिपक्व असतात. सामाजिक कल्पनाही आता स्वयंवराला अधिक अनुकूल झाल्या आहेत. आणि तरी स्वयंवर-विवाह समाजात खरेखुरे रूढ झालेले दिसत नाहीत. मला वाटतं स्वयंवरासारख्या स्वातंत्र्यवादी आणि विवेकवादी विवाहात अलीकडे कथाकादंबऱ्यांतून पसरलेल्या प्रेमविवाहानं एक प्रकारची अडचणच उपस्थित केली आहे. वधूवरांनी परस्परांनी ठरविलेला विवाह हा प्रेमविवाहच असतो किंवा असला पाहिजे अशी आपण अलिकडे कल्पना करून घेतलेली आहे. वास्तविक स्वयंवर आणि प्रेमविवाह यांचा अनिवार्य संबंध नाही. पुराणातले अगदी प्रख्यात स्वयंवर-विवाह घेतले तर, ते प्रेमविवाह होते असं म्हणता येणार नाही. रुक्मिणीच्या विवाहाला 'प्रेमविवाह' म्हणता येईल; पण द्रौपदीच्या आणि सीतेच्या विवाहांना प्रेमविवाह कसं म्हणता येईल? तसं पाहिलं तर, स्वयंवर-विवाह रूढ करणं प्रेमविवाहापेक्षा अधिक सोपं आहे आणि आजच्या विवेकवादी युगाशी अधिक सुसंगतही आहे. प्रेम पूर्वयोजनेने करता येत नाही, त्यात योगायोगावर किंवा 'चान्स्'वरच अवलंबून राहावं लागतं. शिवाय, ही एक शारीरिक आणि सामाजिक गरज आहे. ती भागवण्याकरता योगायोगाची वाट पाहता येत नाही.

आजच्या प्रौढ वधू-वरांच्या काळातही विवाह ही अनेकदा आई-बाप, वडीलधारे, नातेवाईक यांची जबाबदारी ठरते. याचं कारण काय? कथाकादंबऱ्यांनी प्रेमाला प्रतिष्ठा दिली, तितकी स्वयंवराला दिली नाही. वधूनं किंवा वरानं विवाहाच्या वयात आल्यावर सरळ व्यवहारी (businesslike) पद्धतीनं विवाहबद्ध होण्याच्या गोष्टी काढणं, हे आजही आपल्याला चमत्कारिक वाटतं. तशी उदाहरणं दिसत नाहीत असं नाही. पण विवाहाची गोष्ट आई-बापांनी किंवा मध्यस्थांनी काढणं हे आपण जितकं रीतसर समजतो, तितकं मुलीनं स्वतः काढणं रीतसर समजत नाही. प्रौढ पदवीधर, जबाबदारीची नोकरी करणाऱ्या वराइतकाच पगार मिळवणाऱ्या वधूंचेही विवाह जुळवण्याची यातायात आज तरी बहुधा त्यांच्या आप्तांना करावी लागते. पुष्कळदा वधू-वरांच्या

जाहिरातींत अशा वधूंच्या जाहिरातीही आढळून येतात. याला कारण स्वयंवराला किंवा स्वतः ठरविलेल्या विवाहाला आपल्या अंतर्मनात असलेले गौणत्वच होय.

याचे परिणाम पाहाण्यासारखे आहेत. परिचयाशिवाय वा स्वतःच्या पसंतीशिवाय झालेले विवाह व त्यामुळे अनुभवाला येणारी 'incompatibility' (मानसिक विषमता) हा तर एक परिणाम आहेच. पण आणखीही काही परिणाम समाजाने ओळखायला हवेत. महाराष्ट्रीय मुलींचे परप्रांतीयांशी होणारे विवाह हा स्वयंवर पद्धतीला आपल्याकडे नसलेल्या प्रतिष्ठेचाच परिणाम होय, असे मी म्हटले तर काहींना आश्चर्य वाटेल. पण मानवी मनोरचनेचा थोडा विचार केला तर, ते पटायला हरकत नाही. वधूच्याच समाजातील वर सामाजिक दडपणाच्या आहारी जेवढे जातात तेवढे परप्रांतांतील वर जात नाहीत. त्यामुळे परप्रांतीय किंवा परधर्मीय वर हे विवाहविषयक सूचनेच्या अथवा 'प्रपोज' करण्याच्या बाबतीत जितका निःशंकपणे पुढाकार घेतात, तितका स्वप्रांतीय लोक घेत नाहीत, असे आढळून येते. परप्रांतांतून येणारे तरुण, बहुदा चांगल्या नोकरीवर आलेले व पुष्कळ शिक्षण घेतलेले असेच असणार. आपल्याकडेही तसे तरुण कमी नसतात; पण आपले तरुण स्वतःच्या समाजात असल्याने त्यांच्यावर सामाजिक दडपण असते. हे दडपण स्वयंवर पद्धतीला समाजाचं 'सँक्शन'-मान्यता—असल्याशिवाय कमी होणार नाही.

मला वाटतं पंडिता रमाबाईंसारख्या क्रांतिकारक विदुषीला आसाममधील हीनजातीय (मानलेल्या) वकिलाशी विवाह करणं शक्य झालं, पण स्वतःच्या प्रांतात त्या काळात तशाच तऱ्हेचा विवाह करणं रमाबाईंनाही तितकंसं सोपं गेलं नसतं! पण 'सँक्शन' देणं म्हणजे केवळ स्वातंत्र्य देणं नव्हे. वधूंना आणि वरांना नुसतं स्वातंत्र्य देणं म्हणजे एक प्रकारे त्यांच्या नापसंत वागणुकीकडे दुर्लक्ष करणंच असतं! समाजाची मान्यता याहून अधिक गोडीची आणि 'पॉझिटिव्ह' हवी. अशा गोडीगुलाबीच्या आणि सक्रिय सामाजिक मान्यतेलाच सामाजिक 'संकेत' किंवा 'रूढी' असं म्हणतात. नुसती मोकळी देणं म्हणजे 'रूढी' नव्हे. रूढीभोवताली परंपरेचं आणि विधीचं वलय असतं. आणि त्यामुळे वधू-वरांच्या कृतीला वा पसंतीला प्रतिष्ठा आणि पावित्र्य प्राप्त होतं.

आधुनिक स्वयंवरविधी निर्माण करण्याचा कल्पक आणि धाडसी प्रयोग अगदी अलीकडे कोणी केला असेल? ब्राह्मणकायस्थादी सुशिक्षित आणि पाश्चात्यानुयायी जातींनी नव्हे, तर 'मागासलेला' मानल्या गेलेल्या कोमटी समाजाने तो केला, ही केवळ नवलाची गोष्ट आहे! स्वयंवरविधीला एखाद्या परिषदेतील कागदी ठरावाच्या रूपाने मान्यता देऊन हा समाज वाट पाहात थांबला नाही. त्यातील वजनदार आणि व्यवहारपटू पुढाऱ्यांनी स्वयंवर मेळावे भरण्यास प्रारंभ केला. अशा मेळाव्यांच्या हकीगती हळूहळू सुशिक्षितांच्या वृत्तपत्रांतूनही येऊ लागल्या. कोमटी समाजातील या स्वयंवराचा प्रारंभ वधू-वरांच्या चोरट्या भेटीत होत नाही, तर शेकडो पोक्त पालकांच्या परिषदेत होत असतो. अशा मेळाव्यांत एकेका वधूनं वा वरानं अर्जुनाप्रमाणे तीर मारायचा नाही, तर स्वतःला 'इंट्रोड्यूस' करायचे! ही स्वतःची ओळख अनेक पालकांबरोबर अनेक वधू-वरही ऐकत असतात. यात फक्त पदव्या, प्राप्ती आणि इन्कम टॅक्स एवढ्यांचाच उच्चार होत नाही, तर तरुण वधू-वर भावी जोडीदारासंबंधीच्या आपल्या अपेक्षांचाही मोकळेपणाने उच्चार करतात. या वधूवर मेळव्याचं पर्थवसान केवळ कागदी ठरावात होत नसून, प्रत्यक्ष फलप्राप्तीत होत असते. मेळाव्यानंतर लगेच पस्तीस पस्तीस, चाळीस चाळीस विवाह ठरल्याचे आढळून येते. सधन व्यापारपटू कोमटी समाज हे विवाह सामुदायिक पद्धतीनं, बेतशीर (reasonable) खर्चात साजरे करतो. चाळीस चाळीस जोडप्यांची एकत्र वरात निघते.

अनुक्रमणिका

आधुनिक स्वयंवरातील अडचणी दूर करण्याचा उपक्रम एका मागासलेल्या समाजाने एवढ्या कल्पकपणे करावा, ही कौतुकाची गोष्ट नाही का?

मराठा, श्री. के. क्षी. उवाच,
१७ फेब्रुवारी १९७४, पृ. १ व ४.

अनुक्रमणिका

## कोमटी समाज घडवीत असलेले स्वयंवर मेळावे!

मी हा मजकूर लिहीत असता पुसद येथे आर्य वैश्य समाजाने भरविलेला बारावा वधू-वर मेळावा भरलेला असेल. या मेळाव्याची कल्पना अशी-या सधन व्यापारी समाजाने विवाहाची बिकट समस्या सोडविण्याकरता सामुदायिक स्वयंवरे घडवून आणण्याचे ठरविले. अशा भर परिषदेत एकेका वधूने आणि वराने उठून आपली माहिती, अनुरूपता आणि विवाहेच्छा जाहीर करावयाची. त्यानंतर त्याच मुक्कामात अशा काही वधू-वरांची लग्ने जुळून आल्यावर हुंडा, जेवणावळी वगैरेत फाजील खर्च न करता सामुदायिक लग्ने उरकून टाकावयाची. दोनचार वर्षांपूर्वी मी या निमित्ताने 'तरुण भारत' या पत्रातील माझ्या 'हितगुजा'मध्ये लिहिले होते. त्या वर्षी पुसद मुक्कामातील सुमारे पस्तीस विवाह अशा स्वयंवर मेळव्यामुळे जुळले आणि घडून आले. पस्तीस जोडप्यांची सामुदायिक वरात निघाली, ती मोठ्या उस्तुकतेने पाहण्याकरता भररात्री संपूर्ण गाव दारात उभा होता.

आर्य वैश्य अथवा कोमटी समाज हा आजच्या आपल्या प्रगतीच्या व्याख्येप्रमाणे प्रगतीच्या आघाडीवर खासच नाही. इंग्रजी शिक्षण, पाश्चात्य फॅशन, क्रांतीच्या आणि स्त्रीविमोचनाच्या गप्पा यांपैकी कशातच तो पुढारलेला नाही. पण मी मात्र तो समाज विवाहाच्या बाबतीत इंग्रजसदृश ब्राह्मण समाजापेक्षाही अधिक पुढारलेला आहे असे म्हणेन. त्याने विवाहाचा प्रश्न-की ज्याला आज किळसवाणे रूप आले आहे तो-ज्या धडाडीने सोडविला आहे तिजमध्ये धडाडी तर आहेच, पण त्याशिवाय वास्तववाद आणि नेतृतववादही आहे. मी 'नेतृत्ववाद' कशाला म्हणतो ते सांगितले पाहिजे. हिंदू समाज हा सांस्कृतिकदृष्ट्या एक असला तरी नेतृत्वाच्या दृष्टीने अठरापगड जातींत विभागलेला आहे. जेव्हा आपण लोक काय म्हणतील याची धास्ती घेतो तेव्हा, वस्तुतः 'जात' काय म्हणेल यासंबंधी ती धास्ती असते. पण एखादी सुधारणा करताना मात्र जातीपासून म्हणजे आपल्या समाजापासून अल्पसा प्रारंभ करण्याची वास्तवता आपण, विशेषतः ब्राह्मणसदृश जाती-कधी दाखवणार नाही. हे इंग्रजाळलेले लोक अखिल हिंदू समाज, पौर्वात्य राष्ट्रे, विसाव्या शतकातील विवाहसंस्था वगैरेत क्रांती करण्याच्या गप्पा मारतील, पण विवाहातील द्रव्यमाहात्म्यदेखील त्यांच्याने मोडवणार नाही.

यंदाचे वर्ष हे स्त्रीविमोचन वर्ष म्हणून दुमदुमत आहे. अनेक राजकीय, सामाजिक वैगुण्यांपासून स्त्रीची मुक्तता करण्याचे जाहीरनामे निघत आहेत. पण या वर्षाकरिता महाराष्ट्रातील मध्यमवर्गाने एकच कार्यक्रम डोळ्यांसमोर ठेवण्यासारखा आहे. तो म्हणजे आपल्यातील विवाहसंबंधांची द्रव्यलोभातून मूक्तता करून त्यांना साधेच पण शुद्ध सांस्कृतिक स्वरूप देणे. आजच्या विवाहसंबंधाला-सुशिक्षितांच्या विवाहसंबंधाला—मग सांस्कृतिक रूप नाहीच म्हणायचे की काय? नाईलाजाने तसे म्हणणे प्राप्त आहे.

हा प्रश्न नुसत्या हुंडयाच्या चालीचा नव्हे. आणि हुंड्याच्या चालीला नव्हे तरी 'हुंडा' या शब्दावर बहिष्कार घालण्यात तरी आपण अलीकडे यश मिळविलेच आहे. हुंडा किती देणार किंवा घेणार ही भाषा करण्याऐवजी आपण किती तोळे सोने घालणार, वरदक्षिणा किती देणार, ही भाषा वापरू लागलो आहोत. या दोन्ही भाषा बंद झाल्या तरी, लग्नातली लोभी द्रव्यदृष्टी नष्ट होईल असे नव्हे. आजचे सुशिक्षित लोक लग्न हा

व्यवहार आवेशाच्या भरात कधी कधी जितका वैयक्तिक समजतात तितका तो वैयक्तिक खासच नाही. मग ही वस्तुस्थिती आमच्या पुरोगामी सुशिक्षितांना आवडो वा न आवडो. जुन्या भाषेत लग्नाला दुसरा शब्द 'सोयरीक' असा आहे. त्यालाच इंग्रजीत 'अलायन्स' असे म्हणतात. म्हणजे लग्नाने केवळ दोन तरुण माणसे एकत्रित येत नाहीत, तर अनेक घरांचा एकमेकांशी नवीन संबंध जडतो. ही सोयरीक किंवा हा अलायन्स जमविताना इतर अनेक सामाजिक गुणांप्रमाणे आर्थिक स्थितीचाही विचार मनात येणे अपरिहार्य आहे. म्हणजे हुंड्याची रक्कम किंवा सोन्याचे तोळे दृष्टीआड केले तरी, एक मुलगी बायको म्हणून पत्करताना आपण काय काय पत्करीत आहोत अगर काय काय गमावीत आहोत हा विचार मनात येणे अपरिहार्य आहे. पण आज त्यात जर काही वाईट गोष्ट शिरली असेल तर ती म्हणजे या सर्वच गोष्टींना सांस्कृतिक मूल्यांच्या अभावी लिलावाचे स्वरूप येते. जास्तीत जास्त पैसा, जास्तीत जास्त स्टेटस्, जास्तीत जास्त रूप मिळविण्याचा एक मोका या दृष्टीने लग्नाकडे पाहिले जाते. पण गंमत अशी की, या जास्तीत जास्तीचा किंवा लिलाव बोलण्याचा जन्मभर टिकणाऱ्या सहवाससुखाशी फारच थोडा संबंध असतो. किंबहुना भलत्या गोष्टींना महत्त्व दिल्याने लग्नात आपण नकळत मानवी मूल्यांना मुकतो. पण याला कारण कोणते? आपला आरंभ सांस्कृतिक नसतो, संतोषात्मक नसतो, तर सामाजिक हावरेपणाचा असतो. चार लोकांत आपण मोठे ठरावे, निदान आपणांला मोठेपणाच्या गोष्टी करता याव्यात हा हेतू मनात ठेवून म्हणजे भपक्याकरता आज लग्ने जुळविली जातात.

या मानाने पूर्वीच्या अगदी तर्कशून्य —इर्रॅशनल-कसोट्याही सांस्कृतिकदृष्ट्या अधिक उपयुक्त होत्या असे मला वाटते. आपण इंग्रजीचे बौद्धिक दास किंवा 'आंग्लशूद्र' होण्यापूर्वी विवाहसंबंधात दोन अगदी (आजच्या दृष्टीने) अप्रस्तृत गोष्टींना महत्त्व दिले जाई. पहिली गोष्ट म्हणजे कूळ! वास्तविक मुलगी सुस्वरूप व सुशिक्षित असल्यावर कुळाचा प्रश्न निघतोच कोठे अशी आजची दृष्टी आहे! पूर्वीच्या जमान्यात ज्या आणखी एका 'फालतू' गोष्टीला महत्त्व दिले जाई ती म्हणजे मुलींची कुंडली. कुंडलीला महत्त्व द्यावे की नाही, तसेच कुळाला महत्त्व द्यावे की नाही हे स्वतंत्र प्रश्न आहेत. पण त्यांचा एक अप्रत्यक्ष उपयोग मात्र होत असे तो मी सांगू इच्छितो, त्यामुळे लग्नात आजच्या इतकी बाजारी आणि लिलावी दृष्टी शिरू शकत नसे. मला आठवते माझ्या वडिलांच्या पिढीत जास्तीत जास्त रूप, जास्तीत जास्त हुंडा ही दृष्टी नसे. माझ्या वडिलांचे वडील त्या काळात चांगली वकिली चाललेले, समाजात मान्यता असलेले गृहस्थ होते. माझे वडील रूपाने चांगले, श्रीमंताचे चिरंजीव आणि त्या काळात दुर्मिळ असे इंग्रजी शिक्षण घेणारे होते. तरीपण त्यांच्या विवाहाच्या वेळी 'जास्तीत जास्त हुंडा' किंवा 'जास्तीत जास्त रूप' ही दृष्टी ठेवण्यात आलेली नव्हती, याचे आम्हा मुलांना पुढे आश्चर्य वाटे. अगदी सामान्य रूपाची सामान्य घरातील मुलगीच आमच्या वडिलांच्याकरता पसंत करण्यात आली होती. आणि या आश्चर्यकारक पसंतीला दिले जात असलेले कारण त्याहूनही आश्चर्यकारक असे- 'पहिली सांगून आलेली लक्ष्मी परतवावयाची नाही!'

अर्थात् 'पहिली लक्ष्मी' किंवा छत्तीस गुण जुळणी या कल्पना खासच तर्कविरोधी आणि भोळसट आहेत. पण आजच्या लिलावी वृत्तीपेक्षा ही भोळसट वृत्तीदेखील मी पसंत करीन. कारण भोळसट वृत्तीने बऱ्या प्रकारे वा वाईट प्रकारे प्रश्न त्वरित मिटतो, पण लिलावी वृत्तीला अंतच नाही. यामुळे लग्नाची पसंती लांबणीवर पडत जाते. किंबहुना त्या लोभाचा अवशेष लग्नानंतरही धुमसत राहतो. 'मला आय. सी. एस.ची स्थळं सांगून आली होती पण-' असे विवाहानंतरही सांगत राहणाऱ्या कित्येक सुशिक्षित मुली दिसून येतील. ही झाली लोभी व लिलावी वृत्तीची शाब्दिक बाजू, पण तिला एक प्रत्यक्ष लाभ-हानीचीही बाजू आहे. ती म्हणजे लग्नानंतरही

टिकून राहणारा, वाढत जाणारा वरपक्षाचा 'काढूपणा'. वधूपक्षही कमी लोभी किंवा कमी काढू असतो असे नव्हे. नवऱ्याचा पगार पाहून त्यांची पसंती केल्यावर त्या पगारातच त्याच्या धाकट्या भावंडांची शिक्षणे होत आहेत किंवा वृद्ध मातापितरांचे औषधपाणी होत आहे हे पाहून ज्यांना हिस्टेरियाची फिट येते अशा एम.ए. झालेल्या वधू अनेकांनी पाहिलेल्या असतील.

हा सर्व हावरेपणा पाहिल्यावर पत्रिका पाहूनच काय, पण नुसत्या नावाच्या चिट्ठ्या टाकूनदेखील लग्ने जमविणे बरे असे वाटू लागते. कारण तर्कशुद्ध विचाराची परिसीमा गाठल्यावर जर हाती काही लागत असेल, तर ते 'लग्न ही एक लॉटरी आहे' एवढेच काय ते! लग्न जुळणे ही लॉटरी आहे. लग्नानंतर स्वभाव जुळणे ही तर त्याहून मोठी लॉटरी आहे. या लॉटरीत लोभीपणा आणि लिलावी वृत्ती यांची भर पडल्याने तिची दैवाधीनता, तिचा लॉटरीपणा कमी कसा होणार? विवाहाच्या क्षेत्रातील आजची सर्वांत मुख्य समस्या जर कोणती असेल तर ती म्हणजे त्या क्षेत्रातील लिलावी वृत्ती कमी करणे आणि त्या लिलावी वृत्तीला चिकटूनच वधूपरीक्षा वगैरेंच्या बाबतीत जे अनेक घाणेरडे प्रकार रूढ होत आहेत त्यांना छाट देणे!

आर्य वैश्य अथवा कोमटी समाजाने विवाहाच्या क्षेत्रात वाढत असलेल्या लोभी वृत्तीला आणि छळवादी प्रथांना डावलण्याचा जो एक धाडसी मार्ग शोधून काढला त्याचे पुन्हा कौतुक केल्याशिवाय राहवत नाही.

तेजस्वी,
१जून १९७५; पृ. ७, ८ व १०.

अनुक्रमणिका

## ५५

# विवाहातील आहेर-एक सक्ती! . . .

सुमारे दोन आठवड्यांपूर्वी कोमटी समाजाने नव्याने चालू केलेल्या स्वयंवर पद्धतीचे मी अभिनंदन केले होते. त्या पद्धतीने आजच्या वधूपरीक्षेच्या आणि हुंड्याच्या किळसवाण्या पद्धतीत सुधारणा होईल. परंतु आजच्या मध्यमवर्गीयांच्या विवाहसमारंभांत आणखी किती तरी बाजारी, पोकळ डौलाच्या आणि भपक्याच्या गोष्टी शिरल्या आहेत. त्यांतील प्रमुख गोष्ट आहेराची नवीन पद्धती ही होय. 'नवीन पद्धती' असे मी मुद्दामच म्हटले आहे. वास्तविक आहेराची पद्धत फार जुनी आहे. पण तिला आज आलेले रूप मात्र नवीन आणि बाजारी आहे. पूर्वी आहेर हे पांरपरिक आणि प्रतीकात्मक असत. वधू-वरांप्रमाणेच वधू—वरांच्या मातापितरांना महावस्त्र दिले जाई. आहेराला लगेच प्रति-आहेरही असे. म्हणजे, वरमाईला तिच्या बहिणीने किंवा मामीने लुगडे दिले तर, ती परत त्या बाईला तेवढ्याच तोलाचा आहेर करी. सामान्यतः या आहेराकरिता खरेदीला दुकानात जावे लागत नसे. वासनात पूर्वी आलेले आहेर असत. त्यातीलच एखादे उपरणे, एखादी लुगडे-चोळी काढून केली जाई.

आता आहेराची जागा प्रेझेंटस्नी घेतली आहे. आहेर करण्याची पद्धती व वेळही बदलली आहे. हल्ली वधू-वरांना जणू एका रंगमंचावर बसवितात आणि पान-सुपारी घ्यायला आलेले पाहुणे वधू-वरांच्या हातातच प्रेझेंट देतात.

या प्रेझेंटस्ना प्रतीकात्मक देणगीचे रूप न राहता, संसारोपयोगी वस्तूंच्या वर्गणीचे रूप आले आहे. कोणी प्रवासी बॅग देतो, कोणी टेबल लँप देतो, कोणी शेव्हींग सेट देतो, तर कोणी प्लॅस्टिकची बादली देतो! पूर्वी फक्त नातेवाईक किंवा अगदी घरगुती संबंधाचे लोकच आहेर करीत. आता, आहेराशिवाय जाणे काहीसे कमीपणाचे मानले गेल्याने देवदर्शनाला जाणारा प्रत्येक पुरूष जसा पैसा दोन पैसे ठेवतो आणि प्रत्येक स्त्री जशी मूठभर तांदूळ ठेवीत असे, तशी अवस्था आता या वधूवर-दर्शनाला आली आहे.

ऑफिसात आणि इतर नोकरीच्या ठिकाणी या आहेरांनी सामूहिक कराचे किंवा पट्टीचे रूप घेतले आहे. 'क्ष'च्या बहिणीच्या लग्नात त्याच्या ऑफीसच्या सेक्शनमधील प्रत्येकाने तीन-तीन रुपये घालून पन्नास-पंचावन्न रूपयांचा एक जिन्नस ऑफिसतर्फे वधूला दिला होता. मग दुसऱ्या 'क्ष'च्या घरच्या लग्नातही तशीच वर्गणी गोळा करणे क्रमप्राप्त ठरते. अशा प्रकारे लग्नाच्या प्रत्येक हंगामात जेवढे पैसे गोळा करून दिले जातात तेवढ्या पैसात एखाद्या गरीब स्थितीतील माणसाचे लग्नही होऊन जाईल!

पण आहेराचे हे बंड आता लग्नमुंजीपुरतेच मर्यादित राहिले आहे असे नाही. घराची वास्तूशांत, प्रत्येकाचा वाढदिवस यांसारख्या प्रसंगीही आहेर करण्याची नवीन पद्धत पडते आहे. लग्नाचे वाढदिवसही लक्षात ठेऊन त्या निमित्ताने आहेर करणारा माणूस लोकप्रिय ठरत आहे.

अनुक्रमणिका

म्हणजे ऑफिसमधील स्त्रीपुरुषांच्या जन्मतारखा लक्षात ठेवण्याची एक नवीनच सामाजिक जबाबदारी निर्माण झाली आहे. ऑफिसातून हल्ली स्त्रियांचा भरणा असल्याने, या आहेर प्रथेत डोहाळजेवणे, बारशी, इत्यादींचीही भर पडत आहे. डोहाळजेवणासारख्या किंवा बारशासारख्या अगदी कौटुंबिक प्रसंगाकरिता मोठमोठाली मंगल कार्यालये भाड्याने घेण्याचा प्रघातही पडत आहे!

या सर्व प्रकारांत सुबत्तेचा, खऱ्या स्नेहाचा आणि खऱ्या शेजारधर्माचा वाढता भाग असता तर मला आनंदच झाला असता. परंतु एकीकडून शेजारधर्म आणि आप्तधर्म कमी होत आहे. तर दुसरीकडून हे सिनेमासदृश समारंभ वाढीला लागत आहेत. बारशाला स्त्रियांची गर्दी होते. पण, डॉक्टरने दिलेल्या तारखेच्या आधीच प्रसूतीची वेळ आली तर, वाहन पाहून दवाखान्यात पोचवायला शेजारी पुढे येतीलच याची शाश्वती नसते. याहीपेक्षा मनाला क्लेश देणारे प्रसंग सांगण्याला संकोच वाटतो. पण सांगितले पाहिजेत. ज्यांच्या घरातील स्वागतसमारंभाला सहज सात-आठशे निमंत्रणे जातात आणि प्रत्यक्षात निदान पाचशे तरी लोक येतात त्यांच्या घरी दुर्दैवाने कोणाचे निधन होते तेव्हा, दहा माणसेही जमत नाही. त्यातली ओंकारेश्वरापर्यंत पराकाष्ठा चार-पाचच यायला तयार होतात. म्हणजे आमचे सामाजिक प्रसंग आणि संबंध जिव्हाळ्याचे न राहता, दिखाऊ आणि सिनेमासदृश होत आहेत असे म्हटले पाहिजे.

ही स्थिती समाजबंधनाच्या दृष्टीने फारशी चांगली नाही. देखावा फक्त एक दिवसापुरता डोळ्यात भरतो. तर खरे स्नेहसंबंध जन्मभर टिकायचे असतात. किंबहुना असेही दिसून येईल की, आपल्याकडील विवाहसमारंभांत जे छपन्न प्रकारचे विधी आणि प्रघात अंतर्भूत आहेत त्यांचा हेतू, जे कालपर्यंत परके होते त्यांना लग्नसमारंभाच्या केवळ दोन दिवसांत आपलेसे करणे हाच होता. पण त्यांतील कित्येक उपयुक्त प्रघातांना आजच्या बारा तास भाड्याने घेतलेल्या मंगल कार्यालयात अवसरच उरत नाही. याचे सर्वांत ठळक उदाहरण म्हणजे सीमंतपूजन हे होय. सीमंतपूजनात दोन्ही पक्षांतील समान (corresponding) नातेवाइकांना एकमेकांना भेटविणे आणि सर्वांचीच जाहीर उच्चाराने ओळख करून देणे, हा एक प्रमुख कार्यक्रम असतो. पण या कार्यक्रमाला हल्ली अवसरच सापडत नाही. आजच्या लग्नातील प्रमुख आयटेम् स्वागतसमारंभ हा होऊन बसला आहे. हा कार्यक्रम व त्याचे हे नाव, सर्वच नवीन आहे. पूर्वी यालाच लग्नातील 'पानसुपारी' असे म्हणत. बायकांच्या दृष्टीने म्हणजे हळदीकुंकू. आज या समारंभात पानसुपारीला गौण स्थान देण्यात आले आहे, प्रायः दरवाजाबाहेर घालविण्यात आला आहे. दाराबाहेर कोणीतरी बारा वर्षांच्या आतबाहेरील मुले पोरकट वृत्तीने अत्तर, गुलाब देत असतात. त्याच्या पूर्वीचा मुख्य कार्यक्रम, जसा वधू-वरांना नजराणा देण्याचा असतो तसाच उभ्या उभ्या करावयाच्या चहापाण्याचा असतो. एखादी 'डिश्', कॉफी, चहा किंवा गोल्डस्पॉट असा हा प्रकार असतो. त्याचे स्वरूप केवळ किरकोळ चहापाण्याचे असते. पण शेकडो लोकांना निमंत्रण देऊन ठेवल्यावर त्यापायी किती खर्च होत असेल त्याची सहज कल्पना होईल. शिवाय, एकत्र बसून भोजन स्वस्थपणे करण्यात जे समाधान असते, ते जणू एस. टी.च्या कॅन्टीनमध्ये उभ्या उभ्या केलेल्या या फराळात नसते. खर्चापरी खर्च होतो आणि उलट, कोणी चहा घेतला; कोणी घेतला नाही; कुणाला पेढे मिळाले, कुणाला मिळाले नाहीत, याची मुख्य यजमानाला वार्ताही पोहचत नाही.

आपले विवाह समारंभ भयंकर खर्चिक होत असूनही, त्यातून कोणतीच कौटुंबिक व सामाजिक फलनिष्पत्ती होत नाही. ते अधिक आटोपशीर आणि अधिक जिव्हाळ्याचे करणे शक्य आहे. मात्र, आपण त्या

समारंभाचा सिनेमा करण्याची प्रवृत्ती सोडली पाहिजे. कोमटी समाजाने आजच्या वधूपरीक्षेतील किळसवाणेपणा जसा घालविला आहे, तसाच त्यातील नाटकी भपका आणि यथार्थ खर्च कमी करण्याचादेखील त्यांचा प्रयत्न आहे. आम्हा पुढारलेल्या वर्गातील लोकांचा कल मात्र लग्नाचा लिलाव वाढविण्याकडेच आहे, ही शोचनीय गोष्ट आहे.

तेजस्वी,
१५ जून १९७५, पृ. २.

## ५६

# प्रेमविवाह आणि वैवाहिक सौख्य

आपल्या जुन्या विवाहात विवाहपूर्व प्रेमाला किंवा 'अनुनया'ला (कोर्टशिपला) स्थान नव्हते. म्हणजे जुन्या विवाहात तरुण पतिपत्नींचे एकमेकांवर प्रेम नसेच असे नव्हे. पण आपण आज जेव्हा तरुण-तरुणींतील प्रेमाचा उल्लेख करतो तेव्हा तसल्या अपरिहार्य कौटुंबिक प्रेमाचा तो उल्लेख नसतो. तो एका विशिष्ट तऱ्हेच्या प्रेमाचा उल्लेख असतो. दोन व्यक्तींत परिचयानंतर आकर्षण उत्पन्न होऊन दोघांना एकमेक जीवनात हवेसे किंवा अपरिहार्य वाटू लागणे, हा आजच्या प्रेमाचा अर्थ आहे. त्याला काव्यमय प्रेम किंवा रोमँटिक प्रेम असे म्हणता येईल. जुन्या बालविवाहाच्या आणि वडील माणसांनी ठरविलेल्या विवाहात या जातीच्या प्रेमाला जागा नसते.

मला आज असे सांगायचे आहे की, आधुनिक विवाहपूर्व प्रेम हा एक असाधारण रोमांचकारी अनुभव आहे. या अनुभवाशिवाय जीवन जगणारे लोक एका अपूर्व अनुभवाला मुकतात हे जितके खरे, तितकेच या अपूर्व आकर्षणाने वैवाहिक सुख मिळेलच अशी हमी नाही, हेही खरे. किंबहुना अशा प्रेमविवाहात दोघांचे न पटण्याचाच संभव अधिक. कारण त्यातील बरोबरीच्या नात्यामुळे आणि अतिपरिचयामुळे एकमेकांची अवज्ञा होण्याचा संभव जास्त. आणखी एक रूढ समज दुरुस्त केला पाहिजे. तो समज म्हणजे 'विवाहपूर्व प्रेमाचे पर्यवसान विवाहातच व्हायला हवे' हा होय. स्वयंस्फूर्त प्रेमाचा अनुभव ही मुख्य गोष्ट होय. या अनुभवाच्या अभावी जीवन उणेच होय, हे खरे. पण त्याचे पर्यवसान विवाहात होण्यासारखे नसले तरीही, त्या प्रेमाच्या उमाळ्याला दबविण्याचे कारण नाही. किंवहुना तो दबविला जात नाही.

उभयतांत प्रेम असूनही संसार सुखी न झाल्याची उदाहरणे सापडतात. ती का सापडावीत, किंबहुना सुशिक्षितांच्या घटस्फोटाच्या कित्येक केसेसमध्ये, त्यांचे प्रेमविवाहच झाले होते असे आढळते, असे का व्हावे? मला त्याचे पहिले कारण असे वाटते की, आधुनिक जीवनात नवरा-बायकोंना वाजवीपेक्षा अधिक सहवास, किंबहुना एकांतवास मिळतो. आणि त्यात प्रेमविवाहाच्या मूळ स्वरूपामुळेच दोघांचे नाते बरोबरीचे असते. पण संसार ही एक संस्था आहे. आणि कोणत्याही संस्थेत दोन 'संस्थाप्रमुख' असणे म्हणजे अनवस्था प्रसंगच होय! दोघांपैकी कोणी तरी प्रमुख आणि कोणी तरी दुय्यम ही भूमिका पत्करायला हवी. वादप्रिय आधुनिक वधू म्हणतील, मग ती दुय्यम भूमिका पुरुषांनी का पत्करू नये? याला कारण एवढेच की, कुटुंबातील पुरुषानेच बाह्य जगाला तोंड द्यावे, त्यानेच वेड्यावाकड्या प्रसंगांत संरक्षकाची भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा असते. स्त्रियांना त्यांच्या शरीरधर्मामुळे पतीचा आणि घराचा आश्रय घेणे अधिक सोयीचे असते. या नैसर्गिक परिस्थितीमुळे स्त्रिया सामान्यतः 'सबॉर्डिनेट'ची भूमिका घेणे पत्करतात. अलीकडे प्रत्येक क्षेत्रातच समानतेची भाषा ऐकू येते. स्त्री-पुरुषांतही समानता असावी, अशी आकांक्षा काही ठिकाणी उत्पन्न झाली आहे व तिला खतपाणी घातले जात आहे. समानतेची म्हणून एक नवीन चळवळ काही पाश्चात्य देशांत उभी राहिली आहे. या चळवळीचे उपसिद्धांत लक्षात न आल्याने आमच्याकडील काही स्त्रियाही स्त्रियांच्या 'लिब्' चळवळीचा पुरस्कार करीत आहेत. संसार ही एक संस्था म्हटल्यावर आणि स्त्रीपुरुषांतील शारीरिक असमानता लक्षात घेतल्यावर समानतेच्या या नवीन चळवळीतून सुखाची प्राप्ती होईल, की आहे ते सुख नष्ट होईल, हा एक प्रश्नच आहे.

समानतेच्या कल्पना काही तर्कपूजक स्त्रियांनी किती पुढे नेल्या आहेत, हे पाहिले म्हणजे कित्येकांना शिसारी येईल. प्रख्यात फ्रेंच तत्त्वज्ञ आणि लेखक सार्त्र यांची जीवनसखी (पत्नी नव्हे) या बाबतीत टोकाला गेलेली आहे. ती लग्न न करताच सार्त्रबरोबर (वेगळ्या अपार्टमेंटमध्ये) राहते. ती अत्यंत बुद्धिमान् असून प्रसिद्ध लेखिकाही आहे. पुरुषांनी स्थापलेल्या वर्चस्वासंबंधी लिहिताना ती अशक्यप्राय अशा टोकाला गेली आहे. पुरुषांनी लादलेल्या विषमतेचे उदाहरण म्हणून तिने संभोगातील रूढ आसनांचा उल्लेख केला आहे. या आसनांतही पुरुषाने आपलाच वरचष्मा स्त्रीवर लादला आहे, असे तिचे म्हणणे!

संसार-सुखाला म्हणजे पतिपत्नींनी एकत्र राहून सुख मिळविण्याला कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे व संसारी दांपत्य कोणकोणत्या प्रकारची सुखे मिळवू शकते, याचा आजच्या व्यक्तिवादी युगात नीट विचार केला जात नाही. कारण, विवाहविषयक सर्वच गोष्टी घाईघाईने केल्या जातात. इंग्रजीत 'घाईत लग्न करा आणि मग सावकाशपणे पश्चात्ताप करीत बसा!' अशा अर्थाची म्हण प्रसिद्ध आहे. पण प्रेमविवाहात घाई होण्याचाच संभव जास्त. वैवाहिक सुखाला प्रेमाखेरीज कोणत्या तरी गोष्टींची आवश्यकता आहे. मी तर पुष्कळदा म्हणतो, भावी पत्नीकडून प्रेमाची अधिक अपेक्षा करावी की 'आकलना'ची (understanding ची) अपेक्षा करावी? मी म्हणेन, पतिपत्नींनी एकमेकांना समजावून घेणे हे एकमेकांवर 'जान कुर्बान' करण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. तसेच ज्या कुटुंबात आणि वातावरणात आपला तरुण नवरा ('नवरा मुलगा' हा शब्दच येथे अधिक समर्पक आहे! ) वाढला त्याच्याशी समरस होण्याची तरुण मुलीला ताकद हवी. व्यक्तिवाद नेमका याच ठिकाणी कमकुवत ठरतो. नवऱ्याच्या कुटुंबाशी आणि सग्यासोयऱ्यांशी समरस न होण्याने त्याची पत्नी केवळ त्याचेच नुकसान करते असे नव्हे, तर आपल्या सुखातील विविधतेला आणि वैचित्र्यालाही मुकते. जुन्या संसारसुखात अनेक आप्तेष्टांचे अस्तित्व व सान्निध्य गृहीत धरलेले होते. त्या नात्यांना वेगवेगळी सर्वपरिचित नावे व त्यांचे वेगवेगळे मानपान रूढीने ठरविलेले होते. हे सर्व माहीत असणे आणि त्या परिसरात शालीनतेने व सफाईने वागता येणे हा जुन्या संस्कृतीचा महत्त्वाचा भाग होता. आप्तेष्टांची विपुलता म्हणजे एक वैभव मानले जाई. पण ही कल्पनाच आता लुप्त झाल्याने, 'आप्तेष्ट म्हणजे सुखात अडथळा' अशी कल्पना झाल्यासारखी दिसते. याचे एक बारीकसे गमक सांगतो.

हल्ली सर्वच शैक्षणिक, राजकीय वा कौटुंबिक गोष्टींत, 'पाश्चात्यांचे अनुकरण म्हणजे पुढारलेला' हे गृहीत धरले जाते. त्यामुळे लग्नानंतर 'मधुचंद्राला' (अर्थ काय तो देव जाणे! ) जाण्याची प्रथा पडत आहे. पूर्वी लग्नानंतर नवरानवरींनी उठत कुठे तरी दूर जाण्याची पद्धत नव्हती. किंबहुना तसे करणाऱ्या जोडप्याची गणना वेडपटात झाली असती. नूतन दांपत्याला दिवसातील काही वेळ एकांतवास हवा असणे साहाजिक आहे. पण बाकीच्या ज्या वेळात त्यांना रुक्ष दैनंदिन व्यवहार करायचा आहे, तेव्हाही त्यांच्यावर हल्ली एकांतवास लादला जातो. उलट आप्तेष्टांनी भरलेल्या घरात नित्याचे व्यवहार करण्यात कष्ट कमी होतील. आपल्याकडील नवविवाहीत जोडप्यांच्या जीवनात आप्तेष्टांचे स्थान मोठे गमतीचे असते. त्या जोडप्याच्या सुखात सुख मानणारे, त्या उभयतांवर प्रेम करणारे पण त्यांच्या प्रेमाच्या आड न येणारे, असा या आप्तेष्टांचा 'supporting role' असतो व त्यामुळे वधू-वरांच्या मुख्य भूमिकेला उठाव येतो. पण विशेष म्हणजे या आप्तेष्टांकडे वधू-वरांचे कौतुक करण्याचा, त्यांची गोड थट्टा करण्याचा 'रोल' असतो व त्या वधू-वरांच्या नवीन सुखात केवढे माधुर्य, केवढा रुचकरपणा येतो ते हिंदू कुटुंबात राहिलेल्यांनाच ठाऊक! या मधुर आणि मिश्र सुखाची गोडी काश्मीर किंवा

उटकमंड येथील भकास आणि अनोळखी वातावरणात कुठून येणार? आप्तेष्टांच्या थट्टेने या नूतन वधूला आपल्या वरासंबंधी त्याच्या बालपणासंबंधी व त्याच्या स्वभावविशेषासंबंधी सहज माहितीही मिळते.

पण जे विवाहापूर्वी जान कुर्बान करतात तेच विवाहानंतर भांडतात, वादविवाद करतात आणि असंस्कृत वातावरणातील असल्यास मारहाणही करतात, हे कसे काय? हाही एकमेकांना समजावून न घेण्याचाच परिणाम होय. अनुनयाच्या काळातील नाते विवाहानंतर एक दिवसात बदलते. जो पूर्वी जिवलग असतो तो आता यजमान अथवा मालक बनलेला असतो. त्याचा हा नवीन अधिकार आधुनिक मुलींच्या कधीकधी लक्षात येत नाही. त्या पूर्वीच्याच सलगीने व अधिकाराने वागू लागतात. पण त्यांचा पूर्वीचा जिवलग मात्र, त्यांनी 'सबॉर्डिनेट'ची जागा घ्यावी असी अपेक्षा करतो. कारण, 'नवरा' या शब्दात नवऱ्याचे सर्व 'घटनात्मक' अधिकार अंतर्भूत असतात. लग्नापूर्वीच्या बरोबरीच्या नात्याने वागल्यामुळे कित्येक जोडप्यांत वादविवादाचे व मानपमानाचे प्रसंग उद्‌भवतात.

सुशिक्षित पण असंस्कृत घरात मारहाणीचे प्रसंगदेखील उद्‌भवतात, असे मी म्हटले, याचे कित्येकांना आश्चर्य वाटेल. पण अनेक आधुनिक जोडप्यांचे जीवन पाहिल्यास, माझे विधान अतिशयोक्तीचे नाही असे आढळून येईल. या अतिप्रसंगाला कारणदेखील दोघांपैकी कोणीच नमते घेण्याला तयार नसते हे होय. या ठिकाणीच प्रेमविवाहितांचे प्रेम उणे ठरते. कारण योग्य ठिकाणी नमते घेण्याला प्रेमाचा उपयोग नसतो, तर तारतम्याचा आणि व्यवहारीपणाचा उपयोग असतो. लहान मुलाशी ज्याप्रमाणे तार्किकतेने वागून चालत नाही, त्याचा हट्ट किंवा आग्रह पुरविल्याचे नाटक आईलादेखील करावे लागते, तीच स्थिती नववधू-वरांची असते. शंभरातली नव्व्याण्णव भांडणे 'माझेच खरे' या आग्रहापायी झालेली आढळतील. सुशिक्षित जोडप्यात या हट्टापायी नुसता वाद होतो, तर असंस्कृत आणि अशिक्षित जोडप्यात याच हट्टापायी मारहाणीपर्यंत मजल जाते. शिवाय, 'शिक्षण' आणि 'संस्कृती' यांतही फरक आहे, हे आपण पुष्कळदा विसरतो. मनुष्य स्त्रियांशी कसा वागतो यावरून त्याची संस्कृती कळते.

वैवाहिक जीवनाचे मनुष्याच्या संस्कृतीत जर कोणत्या गुणाची भर पडत असेल तर ती 'प्रेमाच्या माणसाशी जमवून घेणे' या गुणाची होय. नुसते प्रेम असले म्हणजे जमवून घेण्याची तयारी असतेच असे नव्हे. प्रेम हा एक अमोल अनुभव खरा, पण तो एक हट्टही असतो. शिवाय 'प्रेम' खरे पण 'कुणाचे प्रेम? सुसंस्कृताचे की असंस्कृताचे' हा प्रश्न उरतोच. एका पाश्चात्य डॉक्टरने 'प्रेम' या विषयावर लिहिताना, 'प्रेम हे प्रेम करणारासारखे असते' असे म्हटले आहे. म्हणजे सभ्य माणसाचे प्रेम सभ्य असते, असभ्य माणसाचे प्रेम असभ्य असते, कुत्र्यामांजरांचे प्रेम जनावरासारखे असते. पोरकट माणसाचे प्रेम पोरकट असते, दिलदारांचे प्रेम दिलदार असते! म्हणजेच प्रेम असून शिवाय 'कल्चर' ही आवश्यक असते. दुसऱ्याशी वागता येणे हा संस्कृतीचा गाभा आहे. परक्याशी वागण्यापेक्षासुद्धा आपल्यावर प्रेम करणाराशी वागणे अवघड असते. कारण, आपण प्रेमिकाला नकळत 'exploit' करणे शक्य असते आणि आपल्यातील ही वृत्ती इतकी सहज आणि सूक्ष्म असते की, संस्कृतीशिवाय ती आपली आपल्याच लक्षात येत नाही!

केवळ आईबापांनी जमवलेल्या विवाहातच नव्हे तर स्वतः वधू-वरांनी जमवलेल्या विवाहातही कित्येकदा भांडणे का होतात, निदान ते विवाह सुखावह का होत नाहीत, ते यावरून लक्षात येईल.

अनुक्रमणिका

प्रेमविवाहाकडे अशा दृष्टीने पाहताच, 'मग प्रेमविवाहच नकोत' असे जुने लोक म्हणतात. पण स्त्री-पुरुषांच्या जीवनात प्रेमाला एवढे खोल स्थान आहे की, तुम्ही 'प्रेमविवाह' टाळू शकाल, पण प्रेम टाळू शकणार नाही. जे स्त्री-पुरुष विवाहात प्रेमाला स्थान देणार नाहीत ते विवाहबाह्य संबंधाच्या तडाख्यात सापडतील! आपल्या जुन्या समाजात विवाहातून प्रेमाची हकालपट्टी केली होती, त्यामुळेच अंगवस्त्र ठेवण्याच्या प्रकाराला समाजमान्यता मिळालेली होती! सुखवस्तू माणसांपैकी शेकडा सत्तर माणसांची अंगवस्त्रे असत असे म्हटले तर, अतिशयोक्ती होणार नाही. जे लोक विवाह जमविताना आणि संसार करताना कडक नीतिबाज (puritan) असत ते एखादी रखेली ठेवण्याइतके कसे वाहवत असत? त्यांनी एक जिवंत ऊर्मी मारण्याचा अस्वाभाविक प्रयत्न केलेला असल्यामुळेच पुढच्या दारी केलेला संयम मागच्या दारी फसत असे!

मनुष्याच्या जीवनात प्रेमही अटळ आहे आणि 'कल्चर' ही अटळ आहे. या दोन्ही प्रवृत्तींना एकत्र स्थान देणे हा विवाहसंस्थेचा उद्देश आहे. आणि विवाहसंस्थेत ते अपरिहार्यही आहे. नाही तर पूर्वीच्या जमान्याप्रमाणे घरात शुचिर्भूत अन् घराबाहेर बाहेरख्याली असे दुहेरी जीवन पुन्हा चालू करावे लागेल!

लोकसत्ता, दिवाळी अंक,
ऑक्टोबर १९७९, पृ. ८६-८८.

अनुक्रमणिका

**वाङ्मयीन मानसन्मान**

१९५१ बडोदा येथील १४ व्या वाङ्मय परिषदेचे अध्यक्षपद.
१९५९ मिरज येथे भरलेल्या ४१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड.
१९६० (जानेवारी) इंदोर येथील १६ व्या शारदोत्सवाचे अध्यक्षपद.
१९६० (नोव्हेंबर) ग्वाल्हेर येथील १५ व्या वाङ्मय परिषदेचे अध्यक्षपद.
१९६५ साहित्य ॲकॅडेमीच्या मराठी सल्लागार मंडळावर नेमणूक.
१९६५ 'टीकाविवेक' प्रकाशित.
१९६६ टीकाविवेकाला महाराष्ट्र राज्य पारितोषिक तसेच केळकर पारितोषिक प्राप्त.
१९६९ पुणे विद्यापीठाच्या 'टागोर व्याख्यानमालेचे व्याख्याते म्हणून निवड.
१९७६ 'तसबीर आणि तकदीर' या आत्मचरित्राचे प्रकाशन.
१९८४ श्री. के. क्षी. वाङ्मयीन लेखसंग्रहाचे प्रकाशन.

अनुक्रमणिका